व्यायामज्ञानकोश.

खंड दुसरा.

—: संपादक :—

श्री. दत्तात्रय चिंतामण मुजुमदार, बी. ए., एलएल्. बी., बडोदे.

किंमत सात रुपये.

श्री.

व्यायाम ज्ञानकोश.

खंड २ रा.



संपादक व प्रकाशक

श्री. रा. रा. दत्तात्रय चिंतामण मुजुमदार,

बी. ए., एल्एल्. बी., बडोदें.

संवत १९९३


शके १८५९

सन १९३७.

किंमत ७ रुपये.

मुद्रक,
रा. धोंडो नारायण विद्वांस.
श्रीरामविजय प्रेस, रावपुरा–बडोदें.
ता. १२ एप्रिल सन १९३७


श्री.
श्री. राजेसाहेब मिरज.
श्री. युवराज मिरज.
श्री. दादासाहेब पटवर्धन मिरज.
श्री. राजेसाहेब सांगली.
श्री. चंद्रशेखरायनमः
श्री. राजेसाहेब जमखिंडी.
श्री. राजेसाहेब भोर.
श्री. चिफसाहेब इचलकरंजी.


श्री. बाबासाहेब बिवलकर
श्री. नानासाहेब बिवलकर
KHALE B.S.


श्री. सौ. लक्ष्मीबाईसाहेब बिवलकर
B.S.KHALE


श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड,
सेनाखासखेल समशेर बहादर, बडोदें.
R. HALE



श्रीमंत दत्तात्रय चिंतामण ऊर्फ आबासाहेब मुजुमदार, बी. ए., एल्‌एल्‌. बी.

संपादक–व्यायामज्ञानकोश.

श्री.

व्यायामज्ञानकोश खंड २ रा.

प्रस्तावना.

गेल्या वर्षी मे महिन्यांत **व्यायामज्ञानकोशा**चा पहिला खंड प्रसिद्ध करून त्यांत मुलामुलींचे खेळांविषयीं सविस्तर माहिती जनतेस सादर केली. त्याच वेळेस दरसाल चैत्रमासीं एकएक खंड प्रसिद्ध करून एकंदर **व्यायामज्ञानकोशाचें** काम पुरें करण्याचा आमचा उद्देश असल्याचें आम्ही जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें **श्रीकाशीविश्वेश्वरां**चे कृपेनें आज हा दुसरा खंड प्रसिद्ध होत आहे. यांत सर्व प्रकारच्या देशी मर्दानी खेळांची माहिती एकत्र देण्यांत आली असून ती त्या खेळांचा प्रसार जनतेंत चांगले रीतीनें होण्यास उपयोगी होईल अशी पूर्ण आशा आहे.

व्यायामज्ञानकोशविषयक मुख्य योजना या पुस्तकांतहि स्वतंत्रपणें दिली असून दहाहि खंडांत कोणकोणते विषय कशा क्रमानें देण्यांत येतील तेंहि त्या योजनेंत प्रसिद्ध केलें आहे. त्यावरून हें एकंदर कार्य किती मोठें व कष्टाचें आहे याची योग्य कल्पना वाचकांस करतां येईल. प्रथम खंड प्रसिद्ध करूनच हें कार्य आटोपतें घ्यावें लागतें कीं काय अशी एकेकाळीं आम्हास भीति वाटूं लागली होती, पण गेल्या एका वर्षांतच **श्रीकाशीविश्वेश्वरांनीं** अनेक उदार व थोर मनाच्या आश्रयदात्यांस प्रेरणा करून त्यांचे प्रोत्साहनानें आम्हास आमचें अंगीकृत कार्य पुढें चालूं ठेवण्यास उत्साह व सामर्थ्य यांची जोड मिळवून दिली आहे. या परमेश्वरी कृपेबद्दल पुनः पुनः संतोष प्रदर्शित करावासा वाटतो.

मुख्य आश्रय म्हणजे आमचे पितृतुल्य व विद्याभिमानी श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज यांचा होय. श्रीमंत महाराजांस आमचे कार्याबद्दलची खबर मिळतांच आम्ही मागितल्याशिवायच, श्रीमंत महाराजांनीं **व्यायामज्ञानकोशा**चे खंड जेव्हां जेव्हां प्रसिद्ध होतील तेव्हां तेव्हां प्रत्येक खंडाच्या १०० प्रती सरकारांत घ्याव्यात म्हणून हुकूम दिला व अशा रीतीनें दहाहि खंडास मिळून ७,००० रुपये मदत मिळण्याची सोय करून दिली. यानंतर आमचे आप्तांपैकीं श्री. सरदार बाबासाहेब बिवलकर यांचे मदतीचा येथें उल्लेख करणें आवश्य वाटतें. त्यांनीं सर्व खंडांचे प्रसिद्धीसाठीं म्हणून एकंदर ३,००० रुपयांची मदत आपण होऊन दिली आहे. या दोन्हीहि मदतींमुळें **व्यायामज्ञानकोशाचें** कार्य जास्त नेटानें करण्याबद्दलचा आमचा उत्साह व हौस जास्त वाढली असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं.

आमचे श्वशुर श्रीमंत राजे सर बाळासाहेब मिरजकर यांची आम्ही आरंभिलेल्या प्रत्येक व्यायामकार्यास सर्व प्रकारची मदत आहे हें वाचकांस पुनः पुनः सांगण्याची जरूर नाहीं. अशा प्रकारची त्यांची मदत असल्यानेंच इतर अनेक मंडळींना प्रोत्साहन मिळून त्यांनींहि या आमच्या अंगीकृत कार्यास हातभार लावला आहे. महाराष्ट्रांतील अनेक व्यायामप्रेमी गृहस्थांनीं व संस्थांनींहि प्रसिद्ध झालेल्या प्रथम खंडाच्या प्रती विकत घेऊन आम्हांस प्रोत्साहन दिलें आहे. त्या सर्वांचा येथें नामनिर्देश करण्याची जरूर वाटत नाहीं. इतकें मात्र खरें कीं त्यांनीं जर अशा प्रकारचें प्रोत्साहन दिलें नसतें तर आमचें कार्य पुढें चालविण्यास आम्हांस उत्साह वाटला असतां कीं काय याबद्दल शंका वाटते.

या ठिकाणीं वाचकांपुढें एक गोष्ट मात्र मोठ्या निरुत्साहानें मांडावी लागत आहे याबद्दल वाईट वाटते. आमच्या या सर्वोपयोगी **व्यायामज्ञानकोश**कार्यास महाराष्ट्रांतील सुशि-क्षित समाजाकडून मात्र जसा मिळावयास पाहिजे तसा आश्रय मिळाला नाहीं हीच ती खेद-कारक गोष्ट होय. **श्रीकाशीविश्वेश्वर** त्यांस यापुढें तरी सुबुद्धि देऊन त्यांना त्यांच्या स्वयंस्फूर्तीनें आम्हांस आश्रय देण्याची प्रेरणा करो अशी त्या ईशचरणीं आमची प्रार्थना आहे.

प्रथम खंडाचें कार्य जनतेस कसें काय पसंत पडलें याबद्दलची कल्पना अनेक वृत्त-पत्रकारांनीं आपापले अभिप्राय प्रसिद्ध केले आहेत त्यांवरून करतां येण्यासारखी आहे. केसरी, सकाळ, ज्ञानप्रकाश, प्रभा, नवामनु, आनंद, पुरुषार्थ वगैरे अनेक वृत्तपत्रांनीं व मासिकांनीं प्रथम खंडाचे पसंतीबद्दल आपापले अभिप्राय वेळच्यावेळीं प्रसिद्ध करून आमचे कार्याविषयीं जनतेस यथार्थ कल्पना यावी अशी सोय चांगले रीतीनें करून दिली याबद्दल आम्हांस आनंद वाटतो.

प्रथम खंड मुलामुलींच्या खेळांसंबंधीं असून त्यानंतर लागलींच हा मर्दानी खेळांचा द्वितीय खंड प्रसिद्ध करण्यांत आमचा हेतु काय आहे याबद्दलचा थोडा खुलासा येथें करणें आवश्य वाटतें. खेळ, कसरती, मेहनती वगैरे जे व्यायामाचे विविध प्रकार आहेत त्या सर्वांचा मनुष्य-शरिरास आरोग्य मिळवून देणें व तें कायम टिकविणें हा जरी एक हेतु असला तरी त्याशिवा-यहि दुसरा एक महत्त्वाचा हेतु आहे. आमच्या मतें खेळ, कसरती वगैरे व्यायामाचे प्रकार हीं साधनें असून या साधनांनीं प्राप्त करून घेण्याचें मुख्य साध्य म्हणजे मर्दानी खेळ हेंच होय. या जीवनकलहांत, व्यक्तीस, समाजास किंवा राष्ट्रास जर चांगल्या रीतीनें जगावयाचें असेल तर त्यांनीं सदैव लढण्यास सज्ज राहिलेंच पाहिजे. जन्मास येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस आपल्या अस्तित्वासाठीं लढावेंच लागतें. कोणाहि मनुष्यप्राण्यास युद्ध टाळतां येणें शक्य नाहीं. मनुष्य-प्राणी कोणीहि असो, स्त्री असो किंवा पुरूष असो, बाल असो वा वृद्ध असो, कोणत्याहि स्थितींत त्यास आपलें युद्धविषयक कर्तव्य करणें भाग पडतें. मनुष्य कोठेंहि पळून गेला तरी तो जेथें जाईल तेथें त्याच्या चोहोंबाजूंनीं या युद्धाचा वेढा त्यास सदैव पडलेला असणारच. सध्यां प्रत्येक स्वतंत्र राष्ट्र आपापलें मनुष्यबळ वाढविण्याचेमागें लागलेलें दिसतें. प्रत्येक राष्ट्रास आपलें

देशांतील सर्व नागरिक बलशाली असावे असें वाटत असल्यानें सर्वत्र त्याच उद्योगास सुरवात झाली आहे. युक्तिप्रयुक्तींच्या सहाय्यानें नानाप्रकारचीं शस्त्रास्त्रें जरी मोठमोठीं संहारकार्यें करूं शकत असलीं तरी तीं योग्य रीतीनें वापरण्यास कांटक, धीट, धाडसी व बलशाली माणसांची अत्यंत जरूर असते ही गोष्ट सर्वमान्य ठरली आहे. अशा स्थितींत नानाप्रकारचे खेळ खेळून आरोग्य कायम राखणाऱ्या तरुणांस या द्वितीय खंडाचे सहाय्यानें आम्ही मर्दानी खेळांची माहिती करून देण्याची घाई कां केली याबद्दलचा खुलासा सहजच होण्यासारखा आहे. प्रथम खंडास योग्य आश्रय मिळाला नसता तर ही मर्दानी खेळांची प्रसिद्धि थांबवावी लागली असती, पण ईशकृपेनें तसा प्रसंग आला नाहीं याबद्दल आनंद वाटतो. इतकेंच काय पण श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज व श्रीमंत सरदार बिवलकर यांनीं दिलेल्या प्रोत्साहनामुळें पुढील तीन वर्षांत **व्यायामज्ञानकोशाचे** तृतीय, चतुर्थ व पंचम खंडहि सुलभ रीतीन प्रसिद्ध करतां येतील असा भरंवसा वाटतो. सत्य संकल्पाचा दाता नारायण सर्व मनोरथ पूर्ण करण्यास समर्थ आहे.

प्रस्तुत द्वितीय खंडास कोणी कशा प्रकारें सहाय्य केलें तें येथें सांगून ठेवणें आवश्य आहे. ज्यांनीं विशेष प्रकारचा आश्रय **व्यायामज्ञानकोशास** दिला आहे त्यांचे फोटो या खंडाचे सुरवातीस घातले आहेत. या द्वितीय खंडांतील प्रथम लेख पं. गोविंद विष्णु शास्त्री गाडगीळ (जोशी) यांनीं लिहून दिला असून त्यांत प्राचीन (पुराण) काळची युद्धविषयक समग्र माहिती सविस्तरपणें देण्यांत आली आहे. या लेखाचे सहाय्यानें वाचकांस बरीच अपरिचित अशी माहिती मिळणार असून विस्मृतीमुळें नष्ट होत चाललेल्या एका महत्वाचे विषयास नवीन उजळा मिळाल्यासारखें होणार आहे. आधुनिक युद्धकला व शस्त्रास्त्रें यांच्याशीं ही माहिती अजमावून पाहतांहि वाचकांचे अंतःकरणांतील बऱ्याच पूर्वग्रहांस चालना मिळण्याचा संभव आहे. यापेक्षांहि हा लेख मोठा झाला असतां, पण स्थलावकाशाचे मानानें तो कमी करावा लागला आहे. लेखक वे. गाडगीळ शास्त्री मोठे विद्वान शोधक व मार्मिक लेखक असल्यानें त्यांचा हा लेख सर्वांनीं समग्र वाचावा अशी आम्ही त्यांस शिफारस करतों. कुस्ती, जंबियाची कुस्ती, बिनोट या विषयांची एकंदर माहिती श्री. राजे बाळासाहेब मिरजकर यांनीं लिहून दिली. कुस्ती संबंधांतील सर्व फोटो पुण्यांतील प्रसिद्ध वस्ताद पहिलवान गुलाम दस्तगीर यांचे असून ते त्यांनीं मोठ्या आनंदानें व तत्परतेनें घेऊं दिले आहेत. बडोद्यांत प्रसिद्ध असलेल्या वज्रमुष्टि कुस्तीची माहिती येथील पहिलवान रा. कृष्णाप्पा बाळाप्पा यांनीं लिहून दिली असून ती वाचकांस चांगल्या रीतीनें समजावून देण्याचा यांनीं मोकळ्या मनानें प्रयत्न केला आहे. याशिवाय येथील रामदास व्यायामशाळेचे चालक रा. बा. गो. कोठी यांनीं भाला, ढाल तरवार, वगैरे विषयांवर सविस्तर माहिती लिहून दिली असून मर्दानी खेळांच्या माहितींत बरीच भर घातली आहे. यानंतरची महत्वाची मोठी मदत म्हणजे येथील प्रसिद्ध व्यायामतज्ञ प्रो. माणिकराव यांची होंय. व्यायामप्रवीण प्रोफेसर साहेबांनीं निरनिराळ्या लढाऊ हत्यारांच्या बंदेशाची सविस्तर माहिती लिहून दिल्यानें **व्यायाम-**

ज्ञानकोशाचे या द्वितीय खंडास बरेंच महत्व प्राप्त झालें आहे. ग्वाल्हेरचे श्री. सरदार माधवराव श्रीधर आपटे यांनीं घोड्यावरील बोथाटीच्या मर्दानी खेळाची सचित्र माहिती लिहून देऊन या नामशेष होऊं पहाणाऱ्या एका परंपरागत विद्येचें पुनरुज्जीवन केलें आहे व त्यामुळें महाराष्ट्रांतील तरुण पिढीस त्याबद्दल खरोखरच आनंद वाटल्याशिवाय रहाणार नाहीं.

माझे मित्र प्रो. लक्ष्मणराव सप्रे यांनीं या **व्यायामज्ञानकोश कार्यास** अमुक तऱ्हेची मदत केली असें सांगणें म्हणजे त्यांनीं केलेल्या मदतीस मर्यादित करण्यासारखें आहे. सर्व प्रकारच्या व्यायामांची, खेळांची व कसरतींची माहिती यांनीं हर प्रयत्नांनीं मिळवून ठेविली असल्यानें बाहेरून माहिती मिळूं शकणार नाहीं अशा कोणत्याहि विषयाची माहिती पुरविण्यास ते सदा तत्पर असतात. या त्यांच्या तत्परतेचा उपयोग **व्यायामज्ञानकोश** कार्याकडे आम्हांस फार चांगल्या रीतीनें करून घेतां आला. शिकार करणें हा एक मर्दानी खेळाचा प्रकार आहे. त्या खेळाची माहिती मला श्री. तात्यासाहेब पटवर्धन युवराज, मिरज, यांजकडून मिळाली. बडोदें येथील व्यायाम-प्रेमी **व** लेखनपटु जनरल नानासाहेब शिंदे यांना डुकराचे शिकारीची माहिती सविस्तर लिहून दिल्यानें आमचे कार्यांत त्या तऱ्हेचें वैगुण्य राहण्याची भीति दूर झाली. हत्तींच्या टकरी, साठमारी व डागदारी या मर्दानी गोष्टी बडोद्याबाहेर दुसरीकडे कोठेंहि पहाण्यास मिळत नाहीं अशी जुन्या काळापासून प्रसिद्धि आहे. या मर्दानी विषयांची माहिती आम्ही आमचे बालमित्र रा. नारायण ब. जोशी यांचे सहाय्यानें एकत्र केली. त्यासंबंधांत बडोदें सरकारचे खानगी कारभारी मे. सडेकर पवार यांनीं, श्रीमंत सरकार सयाजीराव महाराजांचा लष्करी पोषाखांतील एक सर्वोत्कृष्ट फोटो व साठमारी–डागदारी चालूं असतांना त्या खेळांच घेतलेले फोटो आम्हास प्रसिद्धीसाठीं देऊन **व्यायामज्ञानकोशाच्या** या द्वितीय खंडास मोठी शोभा आणली आहे.

अशा रीतीनें या द्वितीय खंडाचें अंतरंग तयार करण्याकडे कोणकोणाचें कसें सहाय्य झालें तें वांचकांस निवेदन केलें. इतक्या सर्व मंडळींनीं आपलेपणानें मदत केली नसती तर हा द्वितीय खंड प्रसिद्ध करण्याचें कार्य आम्हास अशक्य झालें असतें हें सांगणें नकोच. या सर्वांनीं जी मदत निरपेक्षपणानें **व्यायामज्ञानकोश** कार्यास केली व आम्हास उपकृत केलें तिजबद्दल स्थलाभावामुळें त्यांचे व्यक्तिशः आभार न मानतां, याठिकाणीं सर्वांचे एकत्र आभार मानतों व ह्या सर्वांनीं त्यांचा आम्हावरील लोभ असाच कायम ठेवून पुढील खंडांचे प्रसिद्धीच्या कामींहि अशीच बहुमोलाची मदत करावी अशी त्या सर्वांस आम्ही प्रार्थना करतों.

या द्वितीय खंडाचें बहिरंग सजविण्याकडेहि अनेकांचें अनेक प्रकारचें सहाय्य आम्हांस झालें आहे. प्रथम खंडाप्रमाणेंच हा द्वितीय खंडहि येथील श्रीरामविजय प्रेसमध्येंच छापला असून त्यासंबंधीचें एकंदर कार्य या छापखान्याचे व्यवस्थापक रा. कृष्णराव वामन मराठे यांनींच केलें आहे. तें कसें सुबक व चित्ताकर्षक झालें आहे तें वाचकांस प्रत्यक्षच या खंडाचें अवलोकनानें कळून येण्यासारखें असल्यानें जास्त लिहिण्याची जरूर नाहीं. श्रीरामप्रोसेस वर्क्सचे

व्यवस्थापक रा. शंकरराव धोंडोपंत विद्वांस यांनीं त्यांस दिलेल्या फोटोंचें ब्लॉक्स स्वस्त किमतींत तयार करून देऊन हा द्वितीय खंड वेळेवर (एक वर्षाचे मुदतींत) प्रसिद्ध करण्याचे कामीं फारच मोठें सहाय्य केलें असें म्हटल्याशिवाय रहावत नाहीं. तसेंच उज्जन येथील रा. विष्णु मार्तंड डिंगरे यांनींहि प्रथम खंडाचे विक्रीसंबंधांत तर मदत केलीच पण त्याबरोबरच या द्वितीय खंडाचे सजावटीसबंधांतहि पुष्कळ सहाय्य केलें आहे. त्यांचेच सहाय्यानें विदेशी कसरतीसंबंधीचा पुढील एक खंड प्रसिद्ध करण्याचें आम्ही योजिलें आहे. आमचे बालमित्र व सहाध्यायी रा. शंकर गोपाळ डोंगरे, बी. ए. यांची ओळख वाचकांस **व्यायाम** मासिक सुरूं झाल्यापासून म्हणजे गेल्या २२ वर्षांपासून झालेली आहेच. आम्ही हातीं घेतलेल्या व्यायाम कार्यास त्यांची लेखनविषयक सर्व प्रकारची मदत आतांपर्यंत सतत मिळत गेली असून तशीच ती या द्वितीय खंडास मिळाली आहे व पुढेंहि ईशकृपेनें तशीच ती मिळत राहील अशी सदिच्छा आम्ही बाळगतों.

आमचे कार्यास मुख्य मदत म्हणजे सहधर्मचारिणीचीं कर्तव्यें पूर्णपणें लक्षांत घेऊन आमचे कार्यांतील कामाचा अर्धाअधिक वाटा पतकरणाऱ्या आमच्या पतिनिष्ठ पत्नी सौ. लक्ष्मीबाई मुजुमदार यांची होय हें आम्ही आमचे चित्तास वाटणारा सहजप्राप्त संकोच किंचित् दूर सारून निवेदन करण्याची वाचकांची विनयानें परवानगी घेतों. फोटो घेणें, ते छापणें, लेखांच्या नकला करणें, फोटोंची विषयवार आकर्षक मांडणी करणें वगैरे पडतील त्या सर्व प्रकारच्या कामीं आम्हांस मदत करण्याची तर त्यांची नेहमींचीच तयारी आहे. पण सध्यां नवीन पतकरलेल्या **व्यायामज्ञानकोशाच्या** खडांची विक्री करण्याचे कामींहि, भिक्षा मागण्याचें काम हीन दर्जाचें समजलें जात असलें तरी, आमचेबरोबर केवळ **व्यायामज्ञानकोशास** जनतेजवळ आश्रय मागण्यासाठीं गावोगांवीं व घरोघरीं फिरण्यास त्या मोठ्या आंनदानें सर्वदा तयार असतात. अशा सहाय्याचे अभावीं आम्ही अंगीकारलेलें काम इतक्या सुलभ रीतीनें आम्हास करतांच आलें नसतें हें काय येथें सांगायला पाहिजे ?

ग्वाल्हेर येथील प्रो. दिवेकर यांनीं या खंडाची ओळख करून देण्यासंबंधांत दोन शब्द लिहिले असून पुण्याचे गीतावाचस्पति वे. भिडे शास्त्री यांनीं मर्दानी खेळांचें महत्व समजावून देणारा मार्मिक लेख लिहून देऊन आमचे कार्यास आशीर्वाद दिला आहे. अशा रीतीनें अनेक सहाय्यकांचे मदतीनें आम्ही हा खंड प्रसिद्ध करूं शकलों. याशिवाय नामनिर्देश करण्याचे विस्मरणानें राहून गेलेल्या अनेक मंडळींनींहि या कामीं आम्हांस सहाय्य केलें आहे. या सर्व सहाय्यकांचें ऋण आमचे डोक्यावर आहे व तें अंशतः कमी होण्यासाठीं आम्ही त्यांचें सप्रेम आभार मानतों.

मागील प्रथम खंडाप्रमाणेंच हा द्वितीय खंडहि जनतेस पसंत पडेल अशी आमची अपेक्षा आहे. देशी मर्दानी खेळांपैकीं एकहि खेळ या खंडांत आल्याशिवाय राहूं नये असा आम्ही प्रयत्न केला आहे. प्रत्येक विषय शक्य तितकीं जास्त चित्रें व सविस्तर माहिती देऊन

वाचकांस नीट रीतीनें सहज समजेल असा दिला आहे. या खंडांत एक अगदीं नवीन सुधारणा केलेली आहे. या खंडांतील प्रत्येक डाव अगर फेक यांची शिकणारांस नीट कल्पना यावी म्हणून त्या त्या क्रियेचीं सर्व चित्रें एका ठिकाणीं देऊन त्यांचेजवळच त्या क्रियेची संपूर्ण माहिती दिली आहे. अशा रीतीनें या खंडांतील सर्व डावांचे चित्रपटच आम्ही तयार केले आहेत. अशा प्रकारची योजना कोणत्याहि इंग्रजी कोशांत नाहीं. याप्रमाणें केल्यानें चित्रांची संख्या पुष्कळ जास्त झाली आहे व ब्लॉक्सहि जास्त मोठ्या आकाराचे करावे लागले आहेत. दरेक चित्रास निरनिराळे आकार देऊन त्यांचें सौंदर्य वाढविलें आहे. या खंडास मागील खंडाप्रमाणेंच कागद उत्तम प्रकारचा वापरला असून त्यासाठीं शाई तिप्पट जास्त किमतीची वापरली आहे. चित्रांची संख्या ७०० पर्यंत वाढली असून पृष्ठ संख्याहि त्यावरोबरच प्रथम खंडापेक्षां जास्त द्यावी लागली आहे. बायडिंगमध्येंहि सुधारणा करून तें या खेपेस उत्कृष्ट प्रकारचें करविलें आहे. इतक्या सर्व सुधारणा करूनहि या खंडाची किंमत पूर्वीप्रमाणेंच रु. ७ कायम ठेविली आहे इकडे वाचकांनीं दुर्लक्ष करूं नये अशी विनंति आहे. इतकें करूनहि या खंडांत अनेक चुका व दोष शिल्लक राहिले असतील हें आम्ही जाणून आहों. तथापि त्यांकडे दुर्लक्ष करून एकंदर कार्याकडे वाचकांनीं आपुलकीच्या भावनेनें पहावें व यांतील गुण तेवढेच घेऊन दोषांबद्दल आम्हास क्षमा करावी अशी आमची त्यांस सविनय प्रार्थना आहे.

अनेक व्यायामतज्ञांनीं आम्हास लेख लिहून देऊन मदत केली आहे. त्यांनीं लिहून दिली यापेक्षांहि जास्त माहिती त्यांस लिहून देतां आली असती. तथापि स्थलावकाशाचे अभावीं आम्ही त्यांतील थोडीच प्रसिद्ध करूं शकलों याबद्दल वाईट वाटतें. ज्यांनीं लेख लिहून दिले त्यांचे लेख योग्यरीतीनें मुद्रित होण्यांत अगर ते तपासण्यांतहि कांहीं चुका राहून गेल्या असतील तरी त्या न कळत राहिल्या आहेत असें समजून त्याबद्दल सर्वांनीं आम्हास क्षमा करावी.

आमचे हातून हा दुसरा खंड पूर्ण करविणाऱ्या **श्रीकाशीविश्वेश्वरांनींच** पुढील खंडांचें कार्यहि, आम्हास निमित्त मात्र पुढें करून, आमचेकडून पूर्ण करून घ्यावें व अशा तऱ्हेची ही राष्ट्रसेवा म्हणजेच ईशसेवा करण्याचें सामर्थ्य आम्हांस द्यावें अशी श्रीईशचरणीं विनंति करून ही अल्पशी प्रस्तावना आम्ही पुरी करतों.

रावपुरा, **बडोदें**

ता. १२–४–१९३७

व्यायामसेवक,

दत्तात्रय चिंतामण मुजुमदार.

श्री.



सतत उद्योग हीच देवपूजा.

व्यायाम ज्ञानकोश

मुख्य संपादक : श्री. द. चिं. मुजुमदार.

लाघवं कर्मसामर्थ्यं दीप्तोऽग्निर्मेदसः क्षयः।
विभक्तघनगात्रत्वं व्यायामादुपजायते ॥ १ ॥

खंड २ रा.

१ धनुर्वेद.
२ मल्लविद्याशास्त्र—
(१) भीमसेनी कुस्ती.
(२) हनुमंती कुस्ती.
(३) जांबुवंती कुस्ती.
(४) जरासंधी कुस्ती.
३ जंबियाची कुस्ती (बाकचे हात).
४ बिनोट.
५ वज्रमुष्टी कुस्ती.
६ अस्वलाबरोबर कुस्ती.
७ नामांकित हिंदी पहिलवान.
८ विटा.
९ मुकी.
१० भाला लढंत.
११ ढाल तरवारीची लढंत.
१२ लाठी लढंत.
१३ बाणाची लढाई.
१४ फरीगदका (लकडी).
१५ बंदेशचे डाव—
(१) तरवार. (२) बाना.
(३) माडू. (४) भाला.
(५) जंबिया. (६) लाठी.
१६ बोथाटी.
१७ गोफण.
१८ चक्र.
१९ कोयता.
२० फणा.
२१ बरसा.
२२ कुकरी.
२३ धारीये.
२४ गलोल (कामटीची).
२५ ,, (रबरी).
२६ वाघनखें.
२७ गदा.
२८ तिरंदाजी.
२९ तरवारीचे हात.
३० हनुमंती पटा.
३१ गुरुज.
३२ परशु.
३३ साठमारी व डागदारी.
३४ शिकार—
(१) डुकराची शिकार.
(२) हरणाची शिकार.
(३) वाघाची शिकार.
(४) सिंहाची शिकार.
(५) हत्तीची शिकार.

॥ श्रीराम ॥

व्यायामज्ञानकोश

योजना.

❋

खंडांची विभागणी.

(१) खेळ – देशी – हुतुतु, खोखो, वगैरे, **खंड १ ला.**
(२) खेळ – विदेशी – क्रिकेट, फुटबॉल वगैरे.
(३) मेहनती – देशी – दंड, बैठक, नमस्कार वगैरे.
(४) मेहनती – विदेशी – डंबेल्स, बारबेल्स वगैरे.
(५) कसरती – देशी – मल्लखांब वगैरे.
(६) कसरती – विदेशी – डबलबार, सिंगलबार वगैरे.
(७) मर्दानी खेळ – देशी – कुस्ती, पट्टा वगैरे, **खंड २ रा.**
(८) मर्दानी खेळ – विदेशी – बॉक्सिंग, फेन्सिंग वगैरे.
(९) शर्यती – देशी विदेशी – धावण्याची शर्यत, उंच उडी वगैरे.
(१०) स्वास्थ्यविचार – आहारशास्त्र, लंघनचिकित्सा, शरीरशास्त्र वगैरे.

प्रत्येक खंडांत सुमारें ५०० पृष्ठें व ५०० चित्रें देण्यांत येतील.

रचना.

व्यायाम करण्याचे हेतूंस अनुसरून विभाग – वर्गीकरण केलेलें आहे.

(१) करमणूक – खेळ – आट्यापाट्या, क्रिकेट वगैरे.
(२) शरीर तयार करणें – मेहनत – दंड, डंबेल्स वगैरे.
(३) शरिरावर ताबा मिळवणें – कसरती – मल्लखांब, डबलबार वगैरे.
(४) सामनेवाल्याचा पराजय करणें – मर्दानी खेळ – कुस्ती, बॉक्सिंग वगैरे.
(५) परीक्षा – शर्यती – ऊंच उडी, तारेवर चालणें. छातीवर हत्ती उभा करणें वगैरे.

श्री.

व्यायामज्ञानकोश

खंड २ रा.

लेखकवर्ग.

१ पं. गोविंद विष्णुशास्त्री गाडगीळ (जोशी).

२ श्री. सर. गं. ग. पटवर्धन, राजेसाहेब, मिरज (सिनीयर), लेखक 'मल्लविद्याशास्त्र'.

३ श्री. दत्तात्रय चिंतामण मुजुमदार, बी. ए., एल्एल्. बी., 'फरिगदका' या पुस्तकांचे कर्ते.

४ रा. अ. कों. गोडबोले, काशी, मालक श्री. कोंडभटनाना यांचा आखाडा.

५ रा. लक्ष्मण नारायण सप्रे, 'मल्लयुद्ध', 'जपानी कुस्ती', 'मल्लखांब', 'फरिगदका' वगैरे पुस्तकांचे कर्ते.

६ रा. वा. गो. कोठी, व्यायामविशारद, व्यवस्थापक, श्रीरामदास व्यायामशाळा, कसरत-अध्यापक, न्यु ईरा हायस्कूल, वडोदें.

७ रा. गजानन यशवंत माणिक ऊर्फ प्रो. माणिकराव, व्यवस्थापक, जुम्मादादा व्यायामशाळा, वडोदें.

८ श्री. सरदार माधवराव श्रीधर आपटे, ग्वाल्हेर.

९ रा. नारायण बळवंत जोशी, हत्तीखाना कामदार, वडोदें.

१० श्री. युवराज तात्यासाहेब पटवर्धन, मिरज (सिनीयर).

११ मे. नानासाहेब शिंदे, जनरल कमान्डिंग, बरोडा आर्मी, वडोदें.

अनुक्रमणिका.

विषय. पृष्ठ.

धनुर्वेद लेखाबद्दल दोन शब्द.

धनुर्वेद हा लेख श्री. **आबासाहेब मुजुमदार** यांच्या कृपेमुळें वाचकांस वाचावयास मिळत आहे. श्री. आबासाहेब यांनीं हा लेख लिहिण्याबद्दल जर आम्हांस प्रोत्साहन दिलें नसतें तर हा लेख आमचे हातून लिहून झाला असतां किंवा नाहीं याबद्दल वानवाच आहे, कारण "उत्पद्यन्ते विलीयन्ते" अशी आमची स्थिति असल्यामुळें लेख लिहिणें व तो छापणें आम्हांस शक्य नाहीं. अशा स्थितींत लेख छापला गेला याबद्दल वाचकांनीं श्री. आबासाहेबांस धन्यवाद द्यावे. धनुर्वेद हा किती व्यापक आहे हें आम्हीं या लेखाच्या आरंभीं आश्वत्थाम्याच्या वर्णनांत दाखविलेंच आहे. ह्यावरून धनुर्वेद हा विषय अपार समुद्र आहे हें वाचकांस कळून येईल. या समुद्रांतून कित्येक शतकें हिंदूंच्या येरझारा नसल्यामुळें हा रत्नाकर आम्हांस अज्ञात असा राहिला आहे, हें सुज्ञ लोक जाणत आहेत. अशी स्थिति असतां या अज्ञात उदधींतून वाट दाखविण्याचें काम अलीकडे कै. रावसाहेब वझे यांनीं केलें आहे. रावसाहेबांनीं "प्राचीन युद्धविद्या" रूपी नौका या समुद्रांत सोडली आहे. तिचाच मागोवा आम्हीं घेत आहों. आपल्या पूर्वजांचें यश आपणांसच टिकवावें लागतें किंवा वाढवावें लागतें. याप्रमाणें पहातां रावसाहेबांचा हा ग्रंथ गुर्जरनरेश श्रीमंत सयाजीराव महाराज गायकवाड यांच्या ग्रंथमालेंतून प्रसिद्ध झाला हें योग्यच झालें. कारण यामुळें श्रीमंतांचा आपल्या पूर्वजांविषयीं अभिमान प्रकट झाला. धनुर्वेद हा कृष्णयजुर्वेदाचा उपवेद असल्यामुळें या विषयावर कृष्णयजुर्वेदापासून माहिती मिळते. आम्हीं या विषयावर जो संग्रह केला आहे त्याचें प्राथमिक शिक्षण [कुस्ती, लाठी, तलवार, इत्यादि सर्वांनीं शिकण्यासारखें], माध्यमिक शिक्षण [सैनिक शिक्षण] व उच्च शिक्षण [सेनाध्यक्ष, शिक्षक, सेनापति इत्यादिकांचें शिक्षण] असे तीन विभाग केले आहेत. उच्च शिक्षण हें बुद्धिप्रधान असल्यामुळें हा विषय **व्यायामज्ञानकोशांत** लिहिणें शक्य नाहीं म्हणून प्राथमिक शिक्षण व सैनिक शिक्षण एवढाच विषय आमच्या लेखांत आला आहे. त्यांतहि प्राथमिक शिक्षणांतील कांहीं प्रकरणें अद्याप छापावयाचीं राहिलींच आहेत. लेखन-व्यवसायांत आमचा हा लेख पहिलाच आहे. म्हणून सुज्ञ वाचक लेखांतील दोषांबद्दल आम्हांस क्षमा करतील अशी आशा आहे. हा लेख लिहीत असतांना आमचे मित्र पं. नरहरिशास्त्री पेंडसे यांची आम्हांस बरीच मदत झाली. म्हणून त्यांचेहि आभार मानले पाहिजेत. शेवटीं सर्व व्यायामप्रेमी गृहस्थांस हा लेख आवडो व त्यांना धनुर्वेदाचा अभ्यास करण्याची सुबुद्धि होवो अशी नर्मदामातृचरणीं विनंति आहे.

—गोविंदशास्त्री गाडगीळ.

चूकदुरुस्ती.

पृष्ठ ४५, स्तंभ २ रा, ओळ २५ नंतर पुढील मजकूर वाचावा व नंतर त्यापुढील ओळ २६ वाचावी :—

(४) **भ्रामिका**—बाण मारणारानें चांगली मेहनत केलेली नसली आणि धनुर्धाऱ्याच्या शक्तीपेक्षां धनुष्य अधिक कठिण असलें म्हणजे सोडलेला बाण डुलत डुलत किंवा झोके घेत जातो. याला "भ्रामिका-गति" असें म्हणतात.

*　　*　　*

पृष्ठ ८८, स्तंभ १ ला, ओळ १ मध्यें "येईल तसेंच येथें लिहिलें" याऐवजीं "येईल." इतकेंच वाचावें.

श्री.

व्यायामज्ञानकोश खंड २ रा.

❋

दोन शब्द.

व्यायामज्ञानकोशाच्या द्वितीय खंडास दोन शब्द लिहिण्याचें काम मजकडे देऊन संपादकमहोदय श्रीयुत् मुजुमदार यांनीं माझा जो बहुमान केला आहे, त्याबद्दल त्यांचे आभार मानल्याविना कांहीं लिहिण्यास लेखणीच चालत नसल्यानें तें काम प्रारंभींच करून मग दोन शब्द लिहिण्यास धजणार आहे. धजणार म्हणण्याचें कारण असें कीं व्यायामाचा—विशेषतः कुस्ती, मलखांब वगैरेचा जरी मला लहानपणापासून नाद आहे. तरी व्यायाम या विषयावर अधिकारयुक्तवाणीनें कांहीं सांगण्यासारखें मजजवळ आहे, असें मला वाटत नाहीं. अध्ययन व अध्यापन हा माझा मुख्य व्यवसाय व निर्बल शरिरांत मानसिक सामर्थ्य रहात नाहीं म्हणून शरीर सुदृढ व निरोगी ठेवणें एवढाच माझा व्यायामाचा हेतु. परंतु उज्जयिनी येथें झालेल्या महाराष्ट्र शारीरिक शिक्षणपरिषदेच्या स्वागताध्यक्षाचा मला मान मिळाला असतां माझी व त्या परिषदेचे अध्यक्ष श्रीयुत् मुजुमदार यांची भेट झाली, ग्वाल्हेरला ते आले असतां ती ओळख दृढ झाली व या दोन शब्दांच्या खूणगांठीनें ती आतां दृढ बांधली जात आहे. दोन शब्दांची प्रस्तावना इतकीच पुरे.

व्यायामज्ञानकोशाचा प्रथम खण्ड प्रसिद्ध करितांना संपादकांनी जी योजना दिली, तिच्यांत हा द्वितीय खण्ड प्रसिद्ध करतांना थोडा बदल झालेला दिसतो. योजना करितांना मनुष्य हवेंत किल्ले बांधीत असतो. पण ते हवेंतले किल्ले जमिनीवर उतरवितांना अनेक कठीण गोष्टींशी तोंड द्यावें लागतें व त्यांवर विजय मिळविल्याशिवाय पुढें कांहींच करितां येत नाहीं. **व्यायामज्ञानकोश** संपादकांची अशीच स्थिति झाली असावी असें वाटतें. संकल्प केल्याप्रमाणें प्रथम खण्डांत ‘ व्यायामाचा इतिहास ’ देऊन त्यांनीं या **ज्ञानकोशाचा** पाया भरला व ‘ अर्भकांचे आणि लहान मुलांमुलींचें खेळ ’ या भागाने त्यावर बैठकीचे चिरे बसविले. पण पुढच्या अडचणींशीं झगडतांना साहजिकच प्रतिपक्षावर सरशी करून विजय मिळविणें व आपत्तींच्या माऱ्यांतून स्वसंरक्षण करणें या गोष्टींचें महत्त्व संपादकास पटलें असावें व म्हणूनच पूर्वीच्या योजनेप्रमाणें ‘ विदेशी मैदानी खेळ ’ न खेळतां त्यांस बगल देऊन, विजिगीषु वीरानें संरक्षक व आक्रामक अशीं दोन्ही प्रकारचीं शस्त्रास्त्रें कशीं वापरावी, याचेंच विवेचन विशेषतः केलें आहे. आपल्या अंगीकृत कार्यांत विजय संपादणाऱ्या प्रत्येक मनुष्यास—आणि अशी इच्छा

नसणारा कोण असणार—ही योजना औचित्यास धरूनच आहे असे वाटल्याविना कधींहि राहणार नाहीं.

प्राचीनकालच्या अज्ञानांधकारांत इतिहास प्रदीपाचे साह्याने जेथपावेतों मनुष्याची बुद्धि पाहूं शकते तेथपर्यंत आपणांस असेंच आढळून येते कीं मनुष्यांनीं आपल्या बुद्धीने आक्रामक व संरक्षक दोन्ही प्रकारची शस्त्रास्त्रें शोधून काढली होती. जुन्या संस्कृतीचे जे अवशेष पुरातत्व विद्येच्या अभ्यासकांस आजपावेतों सांपडले आहेत त्यांत अत्यंत प्राचीन दगडी हत्यारांपासून तो धातूंच्या शस्त्रास्त्रांपर्यंत सर्व प्रकारचीं आयुधें सांपडतात. आक्रामक शस्त्रांत सर्वांत प्राचीन म्हणजे परशु, भाले व धनुष्य बाण हीं होत. जगाच्या कित्येक भागांत प्राचीनकाळीं या शस्त्रांचीं टोंके दगडाची किंवा हाडांची केलेली असत, असें पृथ्वीच्या पोटीं सांपडलेल्या अनेक अवशेषांवरून खात्री लायक म्हणतां येतें. त्या काळीं संरक्षक असें साधन मात्र ढालीशिवाय दुसरें सांपडत नाहीं. या लांकडी किंवा कातडी असत. प्रस्तर युगांतून धातु युगांत आलें म्हणजे दगडाची जागा धातूनें घेतलेली दिसते. या युगांत नुसतीं टोंकेंच नव्हत तर आमूलाग्र दोन्ही प्रकारचीं—संहारक व संरक्षक—आयुधें धातूंची केलेलीं आढळतात. तलवारी, भाले, बरछी इत्यादि प्रमाणेंच कवच, जिरेटोप, ढाली इत्यादि वाबींतहि धातूंचाच उपयोग केलेला दिसतो. आरंभीं आरंभीं हीं आयुधें जड केली जात. पण घोड्यांचा उपयोग वाहनाच्या कामीं होऊन जेव्हां घोडदळें निर्माण झालीं तेव्हांपासून दोन्ही प्रकारचीं आयुधें वजनानें जितकीं हलकीं होऊं शकतील तितकी करण्याकडे प्रवृत्ति झाली. पुढें बंदुकीचा शोध लागून तिचा उपयोग युद्धांत होऊं लागल्यापासून हीं हत्यारें हळूं हळूं मागें पडूं लागली व व्यायामाची साधनें म्हणून त्यांच्या प्रतिकृतींचा उपयोग होऊं लागला. या खंडांत या शस्त्रास्त्रांचा समावेश व्यायाम साधनें म्हणूनच केला आहे.

धनुष्यबाणाचा उपयोग फार प्राचीन काळापासून सर्वच देशांत युद्ध व मृगया या दोन्ही कामांकडे केलेला आढळतो. हें शास्त्र पूर्णपणें भारतीय आहे. भारतीयांजवळून ही धनुर्विद्या मिश्र देशांत गेली. या देशांत सांपडलेली धनुष्यें माणसाच्या उंचीपेक्षां थोडी कमी लांब आहेत. बाणांची लांबी दोनपासून तीन फुटांपर्यंत सांपडते. या खण्डांत दिलेल्या धनुर्वेदांतील माहितीशीं या गोष्टींची तुलना सहज करितां येण्यासारखी आहे. ख्रिस्ती धर्म ग्रंथ बायबलच्या आधारावर असें सांगतां येते कीं यहुदी लोकहि धनुर्विद्येंत फार निष्णात होते. यांचीं धनुष्यें बांबूची, लांकडाचीं किंवा शिंगांचीं केलेलीं असत. आशियांतील सर्वच राष्ट्रें या कलेंत प्रावीण्य संपादण्याचा प्रयत्न करीत. यूरोपमध्यें आरंभींआरंभीं ही कला फारशी नव्हती. प्राचीन ग्रीक किंवा रोमन सेनांतून आशियामायनर आणि क्रीट मधीलच लोक धनुर्धर म्हणून ठेविले जात. पण ईसवीसनाच्या चौथ्या शतकानंतर मात्र रोमन लोकांनीं ही कला आपलीशी करून धनुर्धर घोडदळ तयार केले. मध्ययुगांतील बांके तीरंदाज म्हणून तुर्क व अरब प्रसिद्धच होते. आतांआतां पावेतों जपनांतहि ही विद्या आवर्जून शिकविली जात असे. पुरातत्ववेत्त्यांच्या शोधा-

वरून असेंहि म्हणतां येतें कीं दक्षिण अमेरिकेंतच नव्हे तर उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशांतहि धनुष्याचा प्राचनकालीं चांगलाच प्रचार होता. युरोपच्या इतिहासांत जर्मन व वेल्श धनुर्धरांचे पराक्रम प्रसिद्धच आहेत. युरोपमध्यें धनुष्याचा असा एक प्रकार प्रचलित होता कीं ज्याचा उल्लेख भारतवर्षांत क्वचित् सांपडतो. तो म्हणजे वक्रधनु (cross-bow) हा होय. हें धनुष्य एका लाकडाच्या ठोकळ्यावर बसविलेलें असतें व यास बाण लावून सोडण्यासाठीं एक प्रकारचा चाप किंवा घोडा असतो. स्विट्झलँडमधील आल्टडोर्फ हें ठिकाण या धनुष्याचा उपयोग करणाऱ्या विल्यम् टेल या शूर पुरुषासाठीं प्रसिद्ध आहे. खिस्ती धर्मयुद्धांत आशियांतील धनुर्धरांशीं सामना करितांना या धनुष्याचा पुष्कळच उपयोग होत असे. पण याच्या घातुकपणामुळें युद्धांतून या शस्त्राची बरेच दिवस हाकालपट्टी झाला होती. सातव्या हेनरीनें इंग्लँडमध्येंहि या धनुष्याच्या उपयोगास प्रतिबंध केला होता. वेल्श लोकांचे पांच फूट लांबीचे धनुष्य व एक वार लांबीचे बाण यांनी क्रेसी व अजीनकोर्टच्या युद्धांत चांगलीच करामत दाखविली होती. ईसवीसनाच्या पंधराव्या शतकांत बंदुकीच्या दारूचा शोध लागून बंदुकीचा उपयोग युद्धांत सरसहा होऊं लागल्यापासून या शस्त्राचा उपयोग कमीकमी होत गेला. रणक्षेत्रांत अगदीं अलीकडील बाणाचा उपयोग म्हणजे १८६० त ताकू येथें चिनी लोकांनीं केलेला होय. पण युद्धांतून जरी याचें उच्चाटन झालें तरी कला म्हणून ही धनुर्विद्या अजून पुष्कळ ठिकाणीं जीव धरून आहे. अठराव्या शतकांत इच्या पुनरुज्जीवनासाठीं कित्येक ठिकाणीं मण्डळें स्थापण्यांत आली. या मण्डळांपैकींच इंग्लँडांतील (Grand National Archery Society) ही प्रमुख आहे.

धनुष्यबाणांचा जरी शेवट बंदुकीमुळें झाला तरी तलवार, भाला इत्यादि साधनें अजूनहि उपयोगांत आहेत. लढाई हात घाईवर आली म्हणजे याच साधनांचा उपयोग अधिक होतो. शिवाय हीं शस्त्रें हलकीं असल्याने व यांचा मारा करितांना लक्ष्य तितकें अचल ठेवण्याची आवश्यकता नसल्यानें घोड्यावर बसूनहि यांचा चांगला उपयोग करितां येतो.–धनुष्याप्रमाणेंच हीं– हि आक्रामक साधनें आहेत. स्थलकाल भेदानें लांब, आंखूड, जड, हलकीं, हातांत ठेवावयाचीं, फेंकून मारावयाचीं अशी यांचीं अनेक रूपांतरें होत गेलीं व शिक्षण घेण्यासाठीं याच्या अनेक प्रतिकृतीहि प्रचालित झाल्या. पण या सर्वांतील सामान्य तत्व एकच. दुसऱ्यावर चाल करून जाणें व स्वतःचा बचाव करणें हाच या साधनांचा किंवा या साधनांमुळें होणाऱ्या व्यायामांचा हेतु. वरील हेतूची सध्यां आम्हांस पूर्ण विस्मृति पडली आहे ती जाऊन आमची वीरवृत्ति जागृत होण्यास अशा प्रकारच्या अनेक व्यायामांची अत्यंत तीव्र आवश्यकता आहे. ती या खण्डांत दिलेल्या माहितीने थोडी तरी पुरी होईल अशी आशा आहे.

कोणत्याहि प्रकारच्या शस्त्रास्त्रांची माहिती होण्यापूर्वींच मल्लविद्येस प्रारंभ झाला व शस्त्रास्त्रांचे वैपुल्य झालें असतांहि हीं विद्या जिवंत आहे. ही फार प्राचीन व सार्वदेशिकहि आहे. महाभारतांतील भीम जरासंधाच्या मल्लयुद्धाप्रमाणें होमरनेंहि एका कुस्तीचें फार सुंदर वर्णन केलें आहे. ग्रीक लोक मल्लयुद्धाचे दोन भाग करीत. प्रतिपक्षास खालीं पाडणें हा

नसणारा कोण असणार–ही योजना औचित्यास धरूनच आहे असें वाटल्याविना कधींहि राहणार नाहीं.

प्राचीनकालच्या अज्ञानांधकारांत इतिहास प्रदीपाचे साह्यानें जेथपावेतों मनुष्याची बुद्धि पाहूं शकते तेथपर्यंत आपणांस असेंच आढळून येते कीं मनुष्यांनीं आपल्या बुद्धीने आक्रामक व संरक्षक दोन्ही प्रकारची शस्त्रास्त्रें शोधून काढली होती. जुन्या संस्कृतीचे जे अवशेष पुरातत्व विद्येच्या अभ्यासकांस आजपावेतों सांपडले आहेत त्यांत अत्यंत प्राचीन दगडी हत्यारांपासून तो धातूंच्या शस्त्रास्त्रांपर्यंत सर्व प्रकारचीं आयुधें सांपडतात. आक्रामक शस्त्रांत सर्वांत प्राचीन म्हणजे परशु, भाले व धनुष्य बाण हीं होत. जगाच्या कित्येक भागांत प्राचीनकाळीं या शस्त्रांचीं टोंके दगडाची किंवा हाडांची केलेली असत, असें पृथ्वीच्या पोटीं सांपडलेल्या अनेक अवशेषांवरून खात्री लायक म्हणतां येतें. त्या काळीं संरक्षक असें साधन मात्र ढालीशिवाय दुसरें सांपडत नाहीं. या लांकडी किंवा कातडी असत. प्रस्तर युगांतून धातु युगांत आलें म्हणजे दगडाची जागा धातूनें घेतलेली दिसते. या युगांत नुसतीं टोंकेंच नव्हत तर आमूलाग्र दोन्हीं प्रकारचीं–संहारक व संरक्षक–आयुधें धातूंची केलेलीं आढळतात. तलवारी, भाले, बरछी इत्यादि प्रमाणेंच कवच, जिरेटोप, ढाली इत्यादि बाबींतहि धातूंचाच उपयोग केलेला दिसतो. आरंभीं आरंभीं हीं आयुधें जड केली जात. पण घोड्यांचा उपयोग वाहनाच्या कामीं होऊन जेव्हां घोडदळें निर्माण झालीं तेव्हांपासून दोन्ही प्रकारचीं आयुधें वजनानें जितकीं हलकीं होऊं शकतील तितकी करण्याकडे प्रवृत्ति झाली. पुढें बंदुकीचा शोध लागून तिचा उपयोग युद्धांत होऊं लागल्यापासून हीं हत्यारें हळूं हळूं मागें पडूं लागली व व्यायामाची साधनें म्हणून त्यांच्या प्रतिकृतींचा उपयोग होऊं लागला. या खंडांत या शस्त्रास्त्रांचा समावेश व्यायाम साधनें म्हणूनच केला आहे.

धनुष्यबाणाचा उपयोग फार प्राचीन काळापासून सर्वच देशांत युद्ध व मृगया या दोन्ही कामांकडे केलेला अढळतो. हें शास्त्र पूर्णपणें भारतीय आहे. भारतीयांजवळून ही धनुर्विद्या मिश्र देशांत गेली. या देशांत सांपडलेली धनुष्यें माणसाच्या उंचीपेक्षां थोडी कमी लांब आहेत. बाणांची लांबी दोनपासून तीन फुटांपर्यंत सांपडते. या खण्डांत दिलेल्या धनुर्वेदांतील माहितीशीं या गोष्टींची तुलना सहज करितां येण्यासारखी आहे. खिस्ती धर्म ग्रंथ बायबलच्या आधारावर असें सांगतां येते कीं यहुदी लोकहि धनुर्विद्येंत फार निष्णात होते. यांची धनुष्यें बांबूची, लांकडाचीं किंवा शिंगांचीं केलेलीं असत. आशियांतील सर्वच राष्ट्रें या कलेंत प्रावीण्य संपादण्याचा प्रयत्न करीत. यूरोपमध्यें आरंभींआरंभीं ही कला फारशी नव्हती. प्राचीन ग्रीक किंवा रोमन सेनांतून आशियामायनर आणि क्रीट मधीलच लोक धनुर्धर म्हणून ठेविले जात. पण ईसवीसनाच्या चौथ्या शतकानंतर मात्र रोमन लोकांनीं ही कला आपलीशी करून धनुर्धर घोडदळ तयार केले. मध्ययुगांतील बांके तीरंदाज म्हणून तुर्क व अरब प्रसिद्धच होते. आतांआतां पावेतों जपनांतहि ही विद्या आवर्जून शिकविली जात असे. पुरातत्ववेत्त्यांच्या शोधा-

वरून असेंहि म्हणतां येतें कीं दक्षिण अमेरिकेंतच नव्हे तर उत्तर ध्रुवाजवळील प्रदेशांतहि धनुष्याचा प्राचनकालीं चांगलाच प्रचार होता. युरोपच्या इतिहासांत जर्मन व वेल्श धनुर्धरांचे पराक्रम प्रसिद्धच आहेत. युरोपमध्यें धनुष्याचा असा एक प्रकार प्रचलित होता कीं ज्याचा उल्लेख भारतवर्षांत क्वचित सांपडतो. तो म्हणजे वक्रधनु (cross-bow) हा होय. हें धनुष्य एका लाकडाच्या ठोकळ्यावर बसविलेलें असतें व यास बाण लावून सोडण्यासाठीं एक प्रकारचा चाप किंवा घोडा असतो. स्विट्झलँडमधील आल्टडोर्फ हें ठिकाण या धनुष्याचा उपयोग करणाऱ्या विल्यम् टेल या शूर पुरुषासाठीं प्रसिद्ध आहे. ख्रिस्ती धर्मयुद्धांत आशियांतील धनुर्धरांशीं सामना करितांना या धनुष्याचा पुष्कळच उपयोग होत असे. पण याच्या घातुकपणामुळें युद्धांतून या शस्त्राची बरेच दिवस हाकालपट्टी झाला होती. सातव्या हेनरीनें इंग्लँडमध्येंहि या धनुष्याच्या उपयोगास प्रतिबंध केला होता. वेल्श लोकांचे पांच फूट लांबीचे धनुष्य व एक वार लांबीचे बाण यांनी क्रेसी व अजीनकोर्टच्या युद्धांत चांगलीच करामत दाखविली होती. ईसवीसनाच्या पंधराव्या शतकांत बंदुकीच्या दारूचा शोध लागून बंदुकीचा उपयोग युद्धांत सरसहा होऊं लागल्यापासून या शस्त्राचा उपयोग कमीकमी होत गेला. रणक्षेत्रांत अगदीं अलीकडील बाणाचा उपयोग म्हणजे १८६० त ताकू येथें चिनी लोकांनीं केलेला होय. पण युद्धांतून जरी याचें उच्चाटन झालें तरी कला म्हणून ही धनुर्विद्या अजून पुष्कळ ठिकाणीं जीव धरून आहे. अठराव्या शतकांत इच्या पुनरुज्जीवनासाठीं कित्येक ठिकाणीं मण्डळें स्थापण्यांत आलीं. या मण्डळांपैकींच इंग्लँडांतील (Grand National Archery Society) ही प्रमुख आहे.


धनुष्यबाणांचा जरी शेवट बंदुकीमुळें झाला तरी तलवार, भाला इत्यादि साधनें अजूनहि उपयोगांत आहेत. लढाई हात घाईवर आली म्हणजे याच साधनांचा उपयोग अधिक होतो. शिवाय हीं शस्त्रें हलकीं असल्याने व यांचा मारा करितांना लक्ष्य तितकें अचल ठेवण्याची आवश्यकता नसल्यानें घोड्यावर बसूनहि यांचा चांगला उपयोग करितां येतो.—धनुष्याप्रमाणेंच हीं—हि आक्रामक साधनें आहेत. स्थलकाल भेदानें लांब, आंखूड, जड, हलकीं, हातांत ठेवावयाचीं, फेंकून मारावयाचीं अशी यांचीं अनेक रूपांतरें होत गेलीं व शिक्षण घेण्यासाठीं याच्या अनेक प्रतिकृतीहि प्रचलित झाल्या. पण या सर्वांतील सामान्य तत्व एकच. दुसऱ्यावर चाल करून जाणें व स्वतःचा बचाव करणें हाच या साधनांचा किंवा या साधनांमुळें होणाऱ्या व्यायामांचा हेतु. वरील हेतूची सध्यां आम्हांस पूर्ण विस्मृति पडली आहे ती जाऊन आमची वीरवृत्ति जागृत होण्यास अशा प्रकारच्या अनेक व्यायामांची अत्यंत तीव्र आवश्यकता आहे. ती या खण्डांत दिलेल्या माहितीने थोडी तरी पुरी होईल अशी आशा आहे.

कोणत्याहि प्रकारच्या शस्त्रास्त्रांची माहिती होण्यापूर्वींच मल्लविद्येस प्रारंभ झाला व शस्त्रास्त्रांचे वैपुल्य झालें असतांहि हीं विद्या जिवंत आहे. ही फार प्राचीन व सार्वदेशिकहि आहे. महाभारतांतील भीम जरासंधाच्या मल्लयुद्धाप्रमाणें होमरनेंहि एका कुस्तीचें फार सुंदर वर्णन केलें आहे. ग्रीक लोक मल्लयुद्धाचे दोन भाग करीत. प्रतिपक्षास खालीं पाडणें हा

पहिला व जमिनीवर कुस्ती खेळणें हा दुसरा. या युद्धांत लंगोट किंवा कमरबंद धरल्यामुळें जीं भांडणें होत तीं टाळण्यासाठीं ग्रीक लोक दिगंबर होऊन कुस्ती खेळत. अंगास तैलमर्दन करावयाचें व घामानें तें निसरडें होऊं नये म्हणून त्यावर अखाड्यांतील माती टाकावयाची ही प्रथा त्या लोकांतहि असे. रोमन लोकहि याच धर्तीनें कुस्ती खेळत. मध्ययुगांत इंग्लँडमध्येंहि हा व्यायाम फार लोकप्रिय होता. अजूनहि इंग्लिश कुस्तीचे 'कॉर्नवाल' व 'कंबरलँड' या प्रादेशिक नांवानें दोन प्रकार प्रसिद्ध आहेत. पहिल्या प्रकारांत 'चारीकोने चीत' पैकीं तीन-कोने—दोन खांदे व एक कुला किंवा दोन्ही कुले व एक खांदा—जमिनीस लागले म्हणजे तो हारला असें समजतात. कंबरलँडच्या डावांत मुळीं जमिनीवर पडून कुस्तीच होत नाहीं. जमि-नीवर प्रतिपक्ष्यास पाडलें कीं डाव जिंकला असेंच समजलें जातें. जपानी 'जुजुत्सु' चें कुस्तीशीं किंवा मल्लयुद्धाशीं मुळींच साम्य नाहीं म्हटलें तरी चालेल. यांत शक्तीचीहि परीक्षा होत नाहीं व खेळहि होत नाहीं. प्रतिपक्ष्याचे शारीरिक मर्मस्थानावर आघात करून त्यास जाया करण्याची ही नुसती युक्ति आहे.

व्यायामज्ञानकोशाच्या या द्वितीय खंड समुद्रांत प्रवेश करण्यासाठीं एवढी नदी मुख प्रस्तावना पुरेशी आहे. पाश्चात्य भाषांतून या विषयांवर माहिती देणारी अनेक पुस्तकें आहेत. पण त्यांतहि भारतीय शस्त्रास्त्रांची माहिती बहुधा शून्यच. ही जागतिक साहित्यांतील उणीव नाहीशीं करून या विद्येंतहि भारतवर्षाचें स्थान प्रस्थापित करण्यासाठीं संपादकमहो-दयांनीं इतके श्रम करून व अनेक अडचणींना तोंड देऊन जी माहिती गोळा केली ती महाराष्ट्र जनतेपुढें ठेविली आहे. जनताजनार्दन संपादकांच्या या असामान्य सेवेनें संतुष्ट होवो व त्यांस पुढचे खंड प्रसिद्ध करण्यासाठीं साह्य करण्याचा वर देवो, एवढीच आशा प्रद-र्शित करून हे दोन शब्द पुरे करितो.

हरि रामचन्द्र दिवेकर.



श्री. कै. बाळासाहेब पटवर्धन (राजे कुरुंदवाड, मोठी पाती) व कै. रा. वा. कृ. देशमुख.

श्री. बाळासाहेब यांस व्यायामाचा अतिशय शोख होता. यांचा मेहनत मरणाचे आधी चार आठ दिवसच बंद राहिली. यांनीं आपले पदरीं अनेक पहिलवान ठेऊन मल्लविद्येस चांगले उत्तेजन दिले होते. पहिलवानांस आश्रय देण्याचे कामीं श्री. कै. खंडेराव महाराज गायकवाड यांचेप्रमाणेंच यांचा महाराष्ट्रांत लौकिक होता.

रा. वासुदेवराव देशमुख यांनीं चांगली मेहनत करून उत्तम प्रकारचें शरीर-सामर्थ्य मिळविलें होतें.

श्री.

व्यायामज्ञानकोश खंड २ रा.

उपोद्‌घात.

"तस्मात् सर्वेषु कालेषु–मामनुस्मर युद्धय च–"

गीतेंत जीं अनेक उपदेशपर वाक्यें आलीं आहेत त्यांतीलच वरील एक महत्वाचें उपदेशपर वाक्य आहे. यांतील **सर्वेषु कालेषु** हीं पदें विचार करण्यासारखीं आहेत. सर्वकालीं माझें–ईश्वराचें स्मरण ठेव आणि युद्ध कर असा या वाक्याचा अर्थ आहे. सार्वकालिक ईशस्मरणाबद्दल विशेषसा विचार करण्याची आवश्यकता नाहीं, कारण ती गोष्ट पूर्वकालीन आचार्यांप्रमाणें आधुनिक साधुसंतांनीं देखील मान्य केली आहे. ज्याप्रमाणें ईशस्मरणाचा सार्वकालिक उपदेश आहे त्याप्रमाणेंच सार्वकालिक युद्धाचा देखील या वाक्यांत उपदेश आहे. ही गोष्ट कोणालाहि नाकबूल करितां यावयाची नाहीं. सर्व कालीं या अर्थाच्या पदांचा ईश-स्मरणाशीं संबंध जोडावा, युद्धाशीं जोडूं नये असें कोणी म्हणेल तर ती गोष्ट भाषाशास्त्राचें दृष्टीनें अशक्य आहे. करितां सार्वकालिक युद्धाच्या उपदेशाचें तात्पर्य काय आहे याचा विचार करणें ओघानेंच प्राप्त होतें.



वे. शा. सं. **सदाशिवशास्त्री भिडे,**
गीतावाचस्पति.

युद्ध म्हणजे काय?

प्रतिकार करणें हें युद्धाचें शुद्ध स्वरूप आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. हा प्रतिकार मनुष्य जेव्हां शरीरबळानें करतो तेव्हां त्यास युद्ध म्हणणें सयुक्तिक दिसतें; पण प्रतिकार नुस्त्या शरीरसामर्थ्यानेंच होतो असें नाहीं, बुद्धि व मन हे दोन्ही अवयव–इंद्रियें–प्रतिकारक्षम असतात. विचार करणें हें बुद्धीचें काम असून वाईट गोष्टी बाजूस सारून चांगल्या गोष्टी करण्याचा निश्चय करणें हाच बुद्धीचा प्रभाव होय. या कार्यांत बुद्धीला अयोग्य किंवा वाईट-

दुष्ट वासनांशीं लढावें लागतें. या दुष्ट वासनांवर विजय मिळवितांना बुद्धीला जो झगडा करावा लागतो व जे अनेक प्रकारचे मोह दाबून टाकावे लागतात यालाच बुद्धीची लढाई असें म्हणण्यास हरकत नाहीं. बौद्धिक युद्धामध्यें ज्याची बुद्धि विजयी होते तोच मनुष्य कर्तबगारी, यशस्विता, वैभव इत्यादि गुणांस पात्र होतो. बौद्धिक युद्धाप्रमाणेंच मनुष्याला मानसिक युद्ध करावें लागतें. प्रेम, भावना, लौकिकाची चाड इत्यादि मनाचे धर्म होत. हे धर्म कित्येक वेळां आपल्या ध्येयाशीं अगर अंगीकृत कार्याशीं विरोधी असूं शकतात. इंद्रियांच्या वृत्ति आणि मन यांचा झगडा तर नेहमींच चालू असतो. या सर्वांवर योग्य दाब ठेवून बुद्धीच्या सत्प्रवृत्तीला अनुसरणें हाच मनाचा विजय होय. हें मानसिक युद्ध सामान्य मनुष्याला देखील नेहमीं करावें लागतें. या दोनहि प्रकारच्या अंतर युद्धांत विजय मिळवितां आला तरच त्याला आपल्या मानसिक व बौद्धिक शक्तींचा विकास घडवून आणतां येतो. अशा संयमी पुरुषाला ब्रह्मानंदापर्यंतचे सर्व आनंद मिळवितां येतात. यालाच **व्यास ऋषींनीं** आध्यात्मिक स्वराज्य असें म्हटलें आहे. महात्मा गांधींनीं आध्यात्मिक स्वराज्य हा शब्द प्रथम शोधून काढला, असें कोणी म्हणतात पण तें खरें नाहीं. व्यासांनीं महाभारतांत या आध्यात्मिक स्वराज्याचें स्वरूप फार मार्मिकपणें वर्णिलें आहे. "तस्मादेनं संम्यगवेक्ष्य लोभं–निगृह्य धृत्यात्मनि राज्यमिच्छेत् । एतद्राज्यं नान्यदस्तीह राज्यं–आत्मैवराजा विहितो यथावत् ॥" लोभादि विकारांबरोबर पराकाष्टेचें युद्ध करून ज्याचें मन व बुद्धि विजयी होतात त्यालाच आध्यात्मिक स्वराज्य प्राप्त होतें व असें आध्यात्मिक स्वराज्य मिळविणारा मनुष्य सर्वत्र विजयी होतो असा वरील श्लोकांत व्यास ऋषींचा अभिप्राय आहे. सारांश, मनुष्याला मन व बुद्धि यांच्याद्वारां विकार किंवा दुष्ट वासना यांचेबरोबर नेहमींच युद्ध करावें लागतें.

युद्धाचा तिसरा प्रकार.

बौद्धिक व मानसिक हे युद्धाचे दोन प्रकार झाले. असाच तिसरा प्रकारहि फार महत्वाचा आहे. तो म्हणजे शरीरसामर्थ्यानें केलें जाणारें युद्ध हाच होय. ज्याचें मन व बुद्धि पराभूत नसतील त्यालाच यशस्वीरीतीनें शरीरसामर्थ्यानें युद्ध करतां येतें. या शारीरिक युद्धांत असंख्य प्रकार झाले आहेत. पूर्वीं सांगितलेल्या बौद्धिक व मानसिक युद्धांचें खरें पर्यवसान या शारीरिक युद्धांतच असतें. म्हणून तीनहि प्रकारच्या युद्धांत शारीरिक युद्धासच श्रेष्ठत्व दिलें पाहिजे हें जरी खरें असलें तथापि मानसिक व बौद्धिक युद्ध कमी महत्वाचें आहे असें बिलकूल समजतां कामां नये. किंबहुना या शारीरिक युद्धाचा मानसिक व बौद्धिक युद्ध हा मूळ आधार किंवा पायाच आहे असें म्हणणेंच योग्य होईल. या तीनहि प्रकारच्या युद्धांचा विचार केल्यास गीतेच्या उपदेशवाक्यांतील **सर्वेषु कालेषु** हीं पदें योग्य व आवश्यक ठरतात. कारण वरील तीन प्रकारच्या युद्धांपैकीं कोणतें ना कोणतें तरी युद्ध मनुष्याला क्षणोक्षणीं करावेंच लागतें. त्याकरितां मनुष्यानें नेहमीं युद्धास सज्ज राहिलें पाहिजे.

शरीरबलाचें महत्व.

वेदान्तांमध्यें शारीरिक सामर्थ्याला मुळींच किंमत नाहीं असा सकारण व अकारण गैरसमज बहुतेकांचा झालेला असतो व या गैरसमजुतीनें अंशतः प्रत्यक्ष अर्जुनाला देखील पछाडलें होतें. पण भगवान—श्रीकृष्णानें शुद्ध ब्रह्मविद्येचा उपदेश करून त्याचा हा गैरसमज समूळ नाहींसा केला आणि त्याला असें पटवून दिलें कीं ईशचिंतनाप्रमाणेंच प्रतिकाराची देखील मानवी जीवितास अत्यंत आवश्यकता असते, मग तो ब्रह्मज्ञानी असला तरी माणुसकीचा हा नियम टाळून त्याला समाजांत रहातां येणार नाहीं. करितां प्रतिकाराची म्हणजे युद्धाची आटोकाट तयारी करून मनुष्यानें आपल्या जीवनक्रमाचा हा झगडा सारखा चालविला पाहिजे. त्याला कंटाळून उपयोग नाहीं. किंबहुना खऱ्या ज्ञानी पुरुषाला वाईटाचा प्रतिकार करण्यांत किंवा दुष्टांचा निग्रह करण्यांतच शुद्ध सात्विक आनंदाचा लाभ होतो. अशा योग्य प्रतिकाराखेरीज सामर्थ्याचा, विशेषतः शरीरसामर्थ्याचा, दुरुपयोग होऊं नये म्हणूनच सार्वकालिक युद्धाबरोबरच सार्वकालिक ईशचिंतनाचा उपदेश केला आहे. ईश्वर सद्‌गुणांचें निवासस्थान असल्यामुळें ज्याच्या हृदयांत ईशस्मरण जागृत आहे त्याचें शरीरसामर्थ्य किंवा बळ केव्हांहि विकारवश होणें शक्य नसतें. असें विकारवश न होणारें शुद्ध शारीरिक बळ हा प्रत्यक्ष ईश्वरांश होय अशी गीतेची शिकवण आहे. " बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् " असें श्रीकृष्णाचें वाक्य आहे. ज्या सामर्थ्याचा वाइटाच्या नाशाकडे किंवा दुष्टांच्या निग्रहाकडेच उपयोग होतो, त्या शारीरिक बलाला भगवंतांनीं वरील वाक्यांत ईश्वराचा अंश म्हटलें आहे. छळवादापासून गरिबांची किंवा गांजणुकीपासून अबलांची, तसेंच दुर्बळांची सोडवणूक करण्याचें पवित्र ध्येय पुढें ठेवून शरीरसामर्थ्य संपादन करणें म्हणजे ईश्वराची उपासना करणें होय असें गीताशास्त्रानें निर्विवाद सिद्ध केलें आहे. यावरून वेदांतशास्त्रानें सामर्थ्याची उपेक्षा केली नसून शरीरसामर्थ्याचें खरें महत्व सर्वांस पटवून दिलें आहे.

शारीरिक बलाविषयीं वेदांतशास्त्राचा दुसरा पण मुख्य सिद्धांत.

" नायमात्मा बलहीनेन लभ्यः" असें मुंडकोपनिषदांत स्पष्ट सांगितलें आहे. दशोपनिषदें हा वेदांतशास्त्राचा मूळ जीवनाधार होय. या उपनिषदांत देखील बळाचें महत्व कंठरवानें मान्य केलें आहे. आतां कोणी वरील वाक्यांतील बल या शब्दाचा अर्थ मानसिक बल किंवा बौद्धिक बल असा करून शारीरिक बळाशीं त्या वाक्याचा संबंध नाहीं असें म्हणतील तर ती अक्षम्य चूक आहे असें समजावें. याचा पूर्वापर संदर्भ लक्षांत घेतल्यास शारीरिक बलावांचून इतर मानसिक किंवा बौद्धिक बल असा अर्थ होणें सर्वथैव अशक्य आहे. (यासंबंधीं विशेष विस्तार पहावयाचा असल्यास उपनिषद्रत्नप्रकाश मुंडकोपनिषद् पान १०० पहा). दुर्बळ मनुष्याला अत्यंत सावधपणा, नियमित वर्तन, तपश्चर्या, इत्यादि विषयांचें आचरण करणें अशक्य आहे. नुसत्या मानसिक बळानें किंवा बौद्धिक बळानें या गोष्टी होत नाहींत. त्याला शरिराचा

काटकपणा, चिवटपणा, पराक्रम इत्यादि गुणांची आवश्यकता असते, तरच त्याला ज्ञानापासून ब्रह्मसाक्षात्कार संपादन करण्याची पात्रता येते. या मुंडकोपनिषदाप्रमाणेंच तैतीर्य उपनिषदाच्या आनंदवल्लींत आनंदाची मीमांसा पुढीलप्रमाणें केली आहे. "सैषा ऽऽनन्दस्य मीमांसा भवति। युवास्यात् साधु युवाध्यायकः। आशिष्ठो दृढिष्ठो बलिष्ठः। तस्येयंपृथिवी सर्वा वित्तस्य पूर्णा स्यात" (अर्थ) ती ही आनंदाची मीमांसा (व्याख्या) आहे. जो तरूण उत्साही आणि शीलवंत व ज्याची विद्या तेजस्वी आहे असा महत्वाकांक्षी, दृढनिश्चयी आणि बलवान असेल त्याला ही सर्व पृथ्वि संपत्तीनें परिपूर्ण होईल. (विशेष विस्तार उपनिषद्रत्नप्रकाश तैत्तिरीय उपनिषद् पान ५३ पहा). मनुष्याच्या पूर्णतेस महत्वाकांक्षा, दृढनिश्चय, चिकाटी या गुणांबरोबरच शारीरिक बळाची आवश्यकता असल्याचें उपनिषदांनीं स्पष्ट सांगितलें आहे. यावरून शुद्ध अशा शरीरसामर्थ्यास उपनिषदांनीं म्हणजेच वेदांतशास्त्रांनीं तुच्छ लेखलें नसून, त्याला अग्र-पूजेचा मान दिला आहे. असें असतां शरीरसामर्थ्याची उपेक्षा करणें हा सद्‌गुण समजला जावा !! या परतें राष्ट्राचें दुर्दैव तें कोणतें ? जुन्या काळांतील या हीन मनोवृत्तीला उलट कलाटणी मिळून सामर्थ्यसंपादनाकडे लोकांचें लक्ष वेधूं लागलें आहे ही भाग्याची गोष्ट होय. मनुष्यानें शरीरसामर्थ्याची हेळसांड केली तर त्याच्यांत अपुरेपणा कायम राहून तो सर्वच कामांत दुर्बळ ठरूं लागतो.

याकरितां मनुष्यानें व्यायाम, उपासना व विद्याध्ययन, या साधनांनीं आपल्या शरि-राचा, मनाचा व बुद्धीचा विकास घडवून आणणें अत्यंत आगत्याचें आहे. गेल्या शतकांत सुशिक्षित वर्गानें विद्याभ्यासाकडे पुष्कळ लक्ष दिलें, पण सामर्थ्यसंपादनाची अक्षम्य हेळसांड केली. या चुकीचें प्रायश्चित्त हल्लींच्या व मागच्या पिढीस चांगलेंच भोवलें आहे. अजूनहि सावध होऊन लोकांनीं शरीरसामर्थ्य संपादण्याचा हव्यास धरल्यास राष्ट्राची उन्नति होण्यास फारसा अवधि लागणार नाहीं.

अहिंसा.

"अहिंस्यन् सर्व भूतान्यत्र तीर्थेभ्यः" असें छांदोग्य उपनिषदांत म्हटलें आहे. कोणाहि प्राणिमात्राची हिंसा करूं नये असें या वाक्यांत सांगितलें आहे. परंतु योग्य कारणांवांचून, अशी अट त्याच वाक्यामध्यें श्रुतीनें दिली आहे. तिकडे दुर्लक्ष करून विंचू, सांपांसारख्या घातक प्राण्यांची हिंसा न करणारे खुळचट अहिंसावादी भेटतातच. परंतु "मोदेत साधुरपि वृश्चिक-सर्पहत्या" असें भागवतांत देखील सांगितलें आहे. तुकाराम महाराजांनीं देखील "विंचू देव्हाऱ्यासी आला। फुलें तुळसी न लगे त्याला॥ तेथें पैजाराचें काम। अधमासीं तो अधम॥" असें स्पष्ट सांगितलें आहे. इतकें असून देखील खुळचट अहिंसावाद करणाऱ्या लोकांच्या अज्ञानाची कींव करावी तितकी थोडीच आहे. खरी गोष्ट अशी आहे कीं अहिंसा म्हणजे कोण्याहि प्राण्यास ठार न मारणें हा उत्तम सद्‌गुण खरा; परंतु या जगांत कांहीं प्राणी व माणसें

देखील ठार मारण्याच्या योग्यतेचीच असतात, त्यांना संस्कृतांत वध्य असें म्हणतात. वध्याचा वध न करणें व अवध्याचा वध करणें हीं दोनहि पातकेंच होत. “यथाऽऽवध्ये वध्यमाने भवे द्दोषो जनाधिप। स वध्यस्यावधे दृष्ट इति धर्मविदो विदुः॥” असें महाभारतांत म्हटलें आहे. यावरून ज्या गोष्टींचा, दोषांचा अगर दुष्टांचा नाश करणें अत्यंत आगत्याचें आहे, त्यांचा नाश न करणें म्हणजे अहिंसा नव्हे तर उलट ती हिंसाच होते. सर्वभूतहिताला म्हणजे सार्वजनिक हिताला बाधक असणारे प्राणी किंवा मनुष्य यांची हिंसा करणें पाप नसून तें पुण्यच आहे असें योगवासिष्ठकारांनीं ठासून सांगितलें आहे. वासिष्ठकार म्हणतात—“बहूनां कंटकं यस्तु—पापात्मानदुरासदं। हन्यात् प्राप्तापराधं तु तस्य पुण्यफलं महत्॥” अशा पापी मनुष्याला नष्ट करण्यांतच म्हणजे त्याचा जोरानें प्रतिकार करण्यांत अत्यंत पुण्य आहे असें योगवासिष्ठकारांचें मत स्पष्ट आहे. सारांश अहिंसेची अमर्याद कल्पना उराशीं बाळगून आजपर्यंत कित्येकांनीं आपला व आपल्या राष्ट्रांचा घात करून घेतल्याचीं उदाहरणें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. महाभारतकारांनीं तर हिंसा व अहिंसा यांची अतिशय चिकित्सा करून छांदोग्याच्या वचनाप्रमाणेंच योग्य ठिकाणीं हिंसा करणें हाच धर्म होय असें निश्चित ठरविलें आहे. सत्यवान् आणि म्हातारा बाप द्युमत्सेन यांचा संवाद या विषयावर फार मार्मिकपणें महाभारतांत दिला आहे. त्यांत असें म्हटलें आहे कीं “अथचेदवधो धर्मोऽधर्मःको जातुचित्भवेत्। दस्यवश्चेन्नहन्येरन् सत्यवन् संकरोभवेत्॥” अर्थ (जर कोणाचाहि वध न करणें—दुष्टांचा सुद्धां—हाच धर्म असेल तर अधर्म कोणता? हें सत्यवाना, खुनी, दरोडेखोर इत्यादि दुष्ट लोकांचें पारिपत्य न होईल तर समाजसंकर होण्यास म्हणजे समाजाचा नाश होण्यास विलंब लागणार नाहीं.) सारांश मर्यादाशून्य अशा अहिंसेची कल्पना हें एक राष्ट्रावरील संकटच होय. असल्या घातक कल्पनेस मनुष्यानें आपल्या अंतःकरणांत बिलकुल थारा देतां कामां नये असा सर्व शास्त्रांचा अभिप्राय आहे. म्हणून हिंसेपर्यंतच्या प्रतिकाराविषयीं प्रत्येक माणसानें सज्ज असणें अत्यंत अवश्य आहे.

व्यायामाचें शास्त्र.

सर्व सामर्थ्यांत शरीरसामर्थ्य हेंच मुख्य आहे. कारण प्रत्यक्ष व्यवहारावर त्याचाच परिणाम घडावयाचा असतो. अशा विषयावर प्राचीन भारतियांनीं संशोधनपूर्वक शास्त्रीय विचार केला नसेल हें संभवनीयच नव्हतें. परंतु गेल्या १।२ शतकांत भरतखंडावर युरोपिअन संस्कृतीचा गडद छाप बसल्यामुळें शास्त्रीय विचार काय तो युरोपियपंडितांनीं केला आहे असा सर्वसाधारण समज झाला होता. त्यांत कांहींसा तथ्यांशहि आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण अगदीं किरकोळ गोष्टीपासून अत्यंत महत्वाच्या विषयांपर्यंत युरोपिअन लोकांनीं सर्व विषयांचीं शास्त्रें बनविलीं आहेत. केशरचनाशास्त्रापासून तों विद्युत् परमाणूंच्या शास्त्रापयत त्यांची शास्त्रीय दृष्टि चौफेर फिरती आहे. या त्यांच्या शास्त्रीय कल्पनांनीं दिपून जाऊन आम्हास

असें वाटूं लागलें कीं असली शास्त्रीय दृष्टि प्राचीन भारतीयांना प्राप्त झालेली नव्हती. हा गैर-समज दूर करण्याचे प्रयत्न सांप्रतकालीं अनेक दिशांनीं होत आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय. प्राचीन शास्त्राचा व त्या शास्त्राचे अवांतर कल्पनांचा साद्यंत व सप्रमाण संग्रह करणें ही त्यांतील पहिली व अत्यवश्यक गोष्ट आहे. अशा संग्रहाला ज्ञानकोश असें म्हणण्याची पद्धति आहे. हें ज्ञानकोशाचें कार्य जगांत प्रथमतः भारतीय ऋषींनींच करून दाखविलें. भगवान कृष्णद्वैपायन व्यासमहर्षि यांनींच प्रथम हा मोठा संग्रह करून दाखविला. व्यासाच्या पूर्वी असा महत्वाचा ज्ञानकोश या जगांत अस्तित्वांतच आला नव्हता. महाभारत हेंच या ज्ञानकोशाचें प्रसिद्ध नामाभिधान आहे. ज्या कालांत हा महाभारतरूपी मोठा ज्ञानकोश पूर्ण तयार झाला तो काल इ. स. च्या पूर्वी ५।६ शतकांइतका जुना असल्याचें इतिहास-संशोधकांचें मत प्रसिद्ध आहे.

व्यासांनीं या महाभारतरूपी ज्ञानकोशानें एकट्या हिंदु राष्ट्रावरच नव्हें तर अखिल भूमंडलावर उपकार करून ठेवले आहेत. अशा संग्रहाच्या योगानें सर्व शास्त्रीय कल्पनांना कायमचें स्थैर्य लाभून त्यायोगें मनुष्याच्या ज्ञानदृष्टीला चांगलाच उजळा मिळतो. महाभारतानें जाग-तिक संस्कृतीचें एकीकरण करून तें जगतापुढें मांडलें आहे. त्यामुळेंच महर्षि कृष्णद्वैपायन व्यासांचे सर्व जगावर उपकार झाले आहेत हें कोणीहि विद्वान मनुष्य प्रांजलपणें कबूल करील. महाभारतानंतर त्याच्या धर्तीवर संस्कृतांत अनेक पुराणग्रंथ झाले आहेत, परंतु महाभारताची श्रेष्ठता त्यायोगें कमी झाली नसून अधिकच वाढली आहे. व्यायामशास्त्राचादेखील असा संग्रह व्हावयास पाहिजे होता. कारण प्राचीन संस्कृत ग्रंथांत व अर्वाचीन मराठी ग्रंथांत देखील या शास्त्राची माहिती विखुरलेली आहे. त्या माहितीचें संकलीकरण होणें अत्यंत अगत्याचें आहे. शिवाय गेल्या ५–६ शतकांच्या जुन्या काळांत आमच्यांतील बरेच ग्रंथवाङ्मय मुसलमानांच्या धामधूमींत नष्ट झालें आहे. तथापि कित्येक शास्त्रांची व कलांची प्रत्यक्ष प्रक्रिया अव्याहतपणें चालूं होती त्यामुळें या व्यवहाराची परिभाषा सारखी बदलत गेली. उदाहरणार्थ–महाभारतांतील भीम व जरासंध यांच्या कुस्तीच्या युद्धांत डावपेंचांचीं अनेक नांवें व वर्णनें आलीं आहेत. परि-भाषा बदलल्यामुळें त्या डावपेंचांच्या वर्णनांवरून त्यांची माहिती तज्ज्ञांनासुद्धां काढतांना बरेंच परिश्रम करावे लागतात. शास्त्र आणि व्यवहार यांच्यांतील दुवे निखळून पडल्यामुळें व्यायामाची प्रत्यक्ष प्रक्रिया आज चालूं असली तरी तिचें शास्त्रीय स्वरूप निश्चित करणें कठीण झालें आहे. व्यायामांतील क्रीडा–खेळ, मर्दुमकी म्हणजे पराक्रम, परिश्रम किंवा मेहनत इत्यादि प्रकारांची माहिती शास्त्रीयरीत्या मिळणें दुरापास्त झालें होतें. कला व शास्त्र यांचा संबंध तुटला आणि कलेची प्रत्यक्ष क्रिया चालूं राहिली तरी तिला एक प्रकारचा हीनपणाच येत असतो. हिंदुस्थानांतील मर्दानी खेळ सुधारलेल्या आजच्या युरोपियन जगास देखील आश्चर्यचकित करीत आहेत, अशी माहिती वारंवार ऐकूं येते हें खरें, तरीपण क्रिकेट–फुटबॉलसारख्या सुधारलेल्या खेळांप्रमाणें या देशी खेळांस डौलदारपणा येत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं देशी खेळांना असावा तितका

शास्त्राचा भरपूर पाठिंबा मिळत नाहीं. ही उणीव भरून काढण्याकरितां व्यायामशास्त्राचा ज्ञानकोश तयार होणें फारच आगत्याचें होतें. असा ज्ञानकोश पूर्ण झाल्यावर खेळांपासून तों प्रत्यक्ष युद्धापर्यंतची शास्त्रीय माहिती एकत्र मिळण्याची सोय होईल आणि वर्तमान काला-प्रमाणें या विद्येंत योग्य ती भर घालून या विद्येचा उत्कर्ष घडवून आणणें तज्ज्ञ लोकांना शक्य होईल. बोथाटी हा शब्द व बोथाटीच्या खेळाचें वर्णन ऐतिहासिक पुस्तकांत पुष्कळ वेळां वाचावयास मिळतें. पण बोथाटी हें हत्यार कसें असतें तें पाहण्याकरितां श्रीमंत आबासाहेब मुजुमदार (बडोदें) यांना किती तरी प्रवास व शोध करावा लागला. कारण असले मर्दानी खेळ एक प्रकारच्या हीनपणामुळें किंवा गांवढळपणामुळें लोकप्रिय राहिले नाहींत. त्यामुळें लोकांतील त्यांचा प्रचारहि नष्ट झाला आहे. विलायती खेळांप्रमाणें या खेळांस उज्वलता आणावयाची असल्यास त्यांचा शास्त्राशीं मेळ घातल्यावांचून गत्यंतरच नाहीं. अशी स्थिति सर्व मर्दानी खेळांची झाली आहे. त्यांचें पुनरुज्जीवन व्यायाम-शास्त्राच्या संकलीकरणानेंच होईल अशी खात्री वाटते. खेळांप्रमाणेंच निरनिराळ्या हत्यारांचीं नांवें व त्यांची प्रक्रिया वगैरे गोष्टी ऐतिहासिक कथांतून पुष्कळच आढळून येतात. उदाहरणार्थ शिवाजी महाराजांनीं अफझुलखानाचा वध करितांना वाघनखाचा उपयोग केला कीं जमदाढीचा उपयोग केला अशा विषयीं इतिहासांमध्यें क्वचित् मतभेद आढळून येतो. या गोष्टीला फारसें महत्व कोणी देत नाहींत. कारण या दोन हत्यारांचा उपयोग कोणालाच माहीत नसतो. या हत्यारांना पूर्वींचीं नांवें काय होतीं तें देखील फारसें ऐकिवांत नाहीं. म्हणून जें अज्ञात असतें तें लेखकांच्या मतें उपेक्षणीय ठरतें. पण ही पद्धति चांगली नाहीं. प्रत्येक गोष्टीचा चांगला छडा लावण्याचें काम संशोधकांचें असतें. पण त्या त्या शास्त्रावरील अगर कलेवरील ग्रंथ उपलब्ध नसल्यास तो संशोधनाचा नाद तितकाच सोडून देऊन हा संशोधक आपला पुढील मार्ग सुधारतो. यावरून राष्ट्राच्या इतिहासांत वरील विषयांच्या आज्ञानामुळें किती अपुरेपणा राहतो हें निराळें सांगावयास नको.

ब्रह्मविद्या व व्यायामशास्त्र.

“ सा ब्रह्मविद्या सर्वविद्याप्रतिष्ठा ” मुंडकोपनिषदांत प्रारंभींच सर्वविद्याप्रतिष्ठा म्हणजे सर्व विद्यांना आधारभूत ही ब्रह्मविद्या आहे असें सांगितलें आहे. व्यायामशास्त्राचा आणि ब्रह्मविद्येचा संबंध कसा निकट आहे हें आम्हीं पूर्वी दाखविलेंच आहे. कोणतीहि विद्या अगर कला संपादन केल्यानंतर त्यांचा सदुपयोग करण्याची सत्प्रवृत्ति मनुष्याचें अंत:करणांत असली तरच त्याच्या विद्येचा किंवा कलेचा जगाच्या हिताकडे उपयोग होण्याचा संभव असतो. सावजनिक हिताच्या दृष्टीनें अवश्य असलेली ही मनाची सत्प्रवृत्ति उत्पन्न होण्यास ब्रह्मविद्या हेंच एक अद्वितीय साधन आहे. ह्याच उद्देशानें भगवान श्रीकृष्णांनीं आपल्या उपदेशांत सार्व-कालिक युद्ध व ईशचिंतन यांची जोड घातली आहे.

असें वाटूं लागलें कीं असली शास्त्रीय दृष्टि प्राचीन भारतियांना प्राप्त झालेली नव्हती. हा गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न सांप्रतकालीं अनेक दिशांनीं होत आहेत ही अभिनंदनीय गोष्ट होय. प्राचीन शास्त्रांचा व त्या शास्त्रांचे अवांतर कल्पनांचा साद्यंत व सप्रमाण संग्रह करणें ही त्यांतील पहिली व अत्यवश्यक गोष्ट आहे. अशा संग्रहाला ज्ञानकोश असें म्हणण्याची पद्धति आहे. हें ज्ञानकोशाचें कार्य जगांत प्रथमतः भारतीय ऋषींनींच करून दाखविलें. भगवान कृष्णद्वैपायन व्यासमहर्षि यांनींच प्रथम हा मोठा संग्रह करून दाखविला. व्यासाच्या पूर्वीं असा महत्वाचा ज्ञानकोश या जगांत अस्तित्वांतच आला नव्हता. महाभारत हेंच या ज्ञानकोशाचें प्रसिद्ध नामाभिधान आहे. ज्या कालांत हा महाभारतरूपी मोठा ज्ञानकोश पूर्ण तयार झाला तो काल इ. स. च्या पूर्वीं ५।६ शतकांइतका जुना असल्याचें इतिहास-संशोधकांचें मत प्रसिद्ध आहे.

व्यासांनीं या महाभारतरूपी ज्ञानकोशानें एकट्या हिंदु राष्ट्रावरच नव्हें तर अखिल भूमंडलावर उपकार करून ठेवले आहेत. अशा संग्रहाच्या योगानें सर्व शास्त्रीय कल्पनांना कायमचे स्थैर्य लाभून त्यायोगें मनुष्याच्या ज्ञानदृष्टीला चांगलाच उजळा मिळतो. महाभारतानें जागतिक संस्कृतीचें एकीकरण करून तें जगतापुढें मांडलें आहे. त्यामुळेंच महर्षि कृष्णद्वैपायन व्यासांचे सर्व जगावर उपकार झाले आहेत हें कोणीहि विद्वान मनुष्य प्रांजलपणें कबूल करील. महाभारतानंतर त्याच्या धर्तीवर संस्कृतांत अनेक पुराणग्रंथ झाले आहेत, परंतु महाभारताची श्रेष्ठता त्यायोगें कमी झाली नसून अधिकच वाढली आहे. व्यायामशास्त्राचादेखील असा संग्रह व्हावयास पाहिजे होता. कारण प्राचीन संस्कृत ग्रंथांत व अर्वाचीन मराठी ग्रंथांत देखील या शास्त्राची माहिती विखुरलेली आहे. त्या माहितीचें संकलीकरण होणें अत्यंत अगत्याचें आहे. शिवाय गेल्या ५—६ शतकांच्या जुन्या काळांत आमच्यांतील बरेच ग्रंथवाङ्मय मुसलमानांच्या धामधूमींत नष्ट झालें आहे. तथापि कित्येक शास्त्रांची व कलांची प्रत्यक्ष प्रक्रिया अव्याहतपणें चालूं होती त्यामुळें या व्यवहाराची परिभाषा सारखी बदलत गेली. उदाहरणार्थ—महाभारतांतील भीम व जरासंध यांच्या कुस्तीच्या युद्धांत डावपेंचांचीं अनेक नांवें व वर्णनें आलीं आहेत. परिभाषा बदलल्यामुळें त्या डावपेंचांच्या वर्णनांवरून त्यांची माहिती तज्ज्ञांनासुद्धां काढतांना बरेच परिश्रम करावे लागतात. शास्त्र आणि व्यवहार यांच्यांतील दुवे निखळून पडल्यामुळें व्यायामाची प्रत्यक्ष प्रक्रिया आज चालूं असली तरी तिचें शास्त्रीय स्वरूप निश्चित करणें कठीण झालें आहे. व्यायामांतील क्रीडा—खेळ, मर्दुमकी म्हणजे पराक्रम, परिश्रम किंवा मेहनत इत्यादि प्रकारांची माहिती शास्त्रीयरीत्या मिळणें दुरापास्त झालें होतें. कला व शास्त्र यांचा संबंध तुटला आणि कलेची प्रत्यक्ष क्रिया चालूं राहिली तरी तिला एक प्रकारचा हीनपणाच येत असतो. हिंदुस्थानांतील मर्दानी खेळ सुधारलेल्या आजच्या युरोपियन जगास देखील आश्चर्यचकित करीत आहेत, अशी माहिती वारंवार ऐकूं येते हें खरें, तरीपण क्रिकेट—फुटबॉलसारख्या सुधारलेल्या खेळांप्रमाणें या देशी खेळांस डौलदारपणा येत नाहीं. याचें कारण इतकेंच कीं देशी खेळांना असावा तितका

शास्त्राचा भरपूर पाठिंबा मिळत नाहीं. ही उणीव भरून काढण्याकरितां व्यायामशास्त्राचा ज्ञानकोश तयार होणें फारच आगत्याचें होतें. असा ज्ञानकोश पूर्ण झाल्यावर खेळांपासून तों प्रत्यक्ष युद्धापर्यंतची शास्त्रीय माहिती एकत्र मिळण्याची सोय होईल आणि वर्तमान कालाप्रमाणें या विद्येंत योग्य ती भर घालून या विद्येचा उत्कर्ष घडवून आणणें तज्ज्ञ लोकांना शक्य होईल. बोथाटी हा शद्ब व बोथाटीच्या खेळाचें वर्णन ऐतिहासिक पुस्तकांत पुष्कळ वेळां वाचावयास मिळतें. पण बोथाटी हें हत्यार कसें असतें तें पाहण्याकरितां श्रीमंत आबासाहेब मुजुमदार (बडोदें) यांना किती तरी प्रवास व शोध करावा लागला. कारण असले मर्दानी खेळ एक प्रकारच्या हीनपणामुळें किंवा गांवढळपणामुळें लोकप्रिय राहिले नाहींत. त्यामुळें लोकांतील त्यांचा प्रचारहि नष्ट झाला आहे. विलायती खेळांप्रमाणें या खेळांस उज्वलता आणावयाची असल्यास त्यांचा शास्त्राशीं मेळ घातल्यावांचून गत्यंतरच नाहीं. अशी स्थिति सर्व मर्दानी खेळांची झाली आहे. त्यांचें पुनरुज्जीवन व्यायामशास्त्राच्या संकलीकरणानेंच होईल अशी खात्री वाटते. खेळांप्रमाणेंच निरनिराळ्या हत्यारांचीं नांवें व त्यांची प्रक्रिया वगैरे गोष्टी ऐतिहासिक कथांतून पुष्कळच आढळून येतात. उदाहरणार्थ शिवाजी महाराजांनीं अफझुलखानाचा वध करितांना वाघनखाचा उपयोग केला कीं जमदाढीचा उपयोग केला अशा विषयीं इतिहासांमध्यें क्वचित् मतभेद आढळून येतो. या गोष्टीला फारसें महत्व कोणी देत नाहींत. कारण या दोन हत्यारांचा उपयोग कोणालाच माहीत नसतो. या हत्यारांना पूर्वींचीं नांवें काय होतीं तें देखील फारसें ऐकिवांत नाहीं. म्हणून जें अज्ञात असतें तें लेखकांच्या मतें उपेक्षणीय ठरतें. पण ही पद्धति चांगली नाहीं. प्रत्येक गोष्टीचा चांगला छडा लावण्याचें काम संशोधकांचें असतें. पण त्या त्या शास्त्रावरील अगर कलेवरील ग्रंथ उपलब्ध नसल्यास तो संशोधनाचा नाद तितकाच सोडून देऊन हा संशोधक आपला पुढील मार्ग सुधारतो. यावरून राष्ट्राच्या इतिहासांत वरील विषयांच्या आज्ञानामुळें किती अपुरेपणा राहतो हें निराळें सांगावयास नको.


ब्रह्मविद्या व व्यायामशास्त्र.

" सा ब्रह्मविद्या सर्वविद्याप्रतिष्ठा " मुंडकोपनिषदांत प्रारंभींच सर्वविद्याप्रतिष्ठा म्हणजे सर्व विद्यांना आधारभूत ही ब्रह्मविद्या आहे असें सांगितलें आहे. व्यायामशास्त्राचा आणि ब्रह्मविद्येचा संबंध कसा निकट आहे हें आम्हीं पूर्वीं दाखविलेंच आहे. कोणतीहि विद्या अगर कला संपादन केल्यानंतर त्यांचा सदुपयोग करण्याची सत्प्रवृत्ति मनुष्याचें अंत:करणांत असली तरच त्याच्या विद्येचा किंवा कलेचा जगाच्या हिताकडे उपयोग होण्याचा संभव असतो. सावजनिक हिताच्या दृष्टीनें अवश्य असलेली ही मनाची सत्प्रवृत्ति उत्पन्न होण्यास ब्रह्मविद्या हेंच एक अद्वितीय साधन आहे. ह्याच उद्देशानें भगवान श्रीकृष्णांनीं आपल्या उपदेशांत सार्वकालिक युद्ध व ईशचिंतन यांची जोड घातली आहे.

उत्कट आणि भव्य अशी महत्वाकांक्षा हीच पुरुषार्थ बुद्धि होय. या पुरुषार्थ बुद्धीला ज्ञानाची जितकी आवश्यकता आहे तितकीच सामर्थ्याची देखील आवश्यकता आहे. ज्ञानाला ज्याप्रमाणें विद्याभ्यास त्याप्रमाणें सामर्थ्याला व्यायाम असें असल्यामुळें व्यायामाच्या शास्त्राची उणीव भरून निघत आहे याबद्दल **व्यायामज्ञानकोश**कार यांचें अभिनंदन करावें तितकें थोडेंच आहे. असे प्रयत्न पाहिले म्हणजे भारतीय राष्ट्राचा केव्हां ना केव्हां तरी खास उत्कर्ष होईल असा भरंवसा वाटतो. जगन्मिथ्यात्वाच्या मायावादी अयोग्य कल्पनेनें राष्ट्राला एक प्रकारची भुरळ पडली होती. या बेशुद्धीमुळें आपल्या ऋषींच्या उपदेशाची देखील त्याला गाढ विस्मृति झाली आणि एखाद्या राजाधिराजाला आपल्या राज्यलक्ष्मीचें, बेशुद्धीमुळें विस्मरण होऊन स्वतःला भिकारी समजून त्यानें भिक्षा मागण्यास तयार व्हावें तशीच आमच्या समाजाची स्थिति झाली होती. " कल्पतरु तळवटी। बैसोनि झोळिया देत गांठी " या ज्ञानेश्वर महाराजांच्या वाक्याप्रमाणें नुस्तें करंटेपण आमच्या राष्ट्राच्या नशिबाला आलें. परंतु अनेक शतकांच्या शिक्षेमुळें ही बेशुद्धि थोडीथोडी कमी होऊन आपल्या वैदिक ऋषींचा उपदेश तरी काय आहे इकडे पाहण्याची शुभ वासना होऊं लागली हें सुचिन्हच होय. जर समाजानें ऋषिप्रणीत उपदेशांकडे नीट डोळे उघडून पाहिलें तर त्याला असें दिसून येईल कीं महान योग्यांची जी योग्यता तीच योग्य प्रतिकार करणाऱ्या योद्ध्याची होय. ब्रह्मांडीं प्राण नेऊन ब्रह्मरंध्राचा भेद करून ज्याप्रमाणें महायोगी प्रत्यक्ष ब्रह्मस्वरुपाला जाऊन मिळतो त्याप्रमाणेंच अन्यायाचा प्रतिकार करतांकरतां मरण पावलेला योद्धा प्रत्यक्ष ब्रह्मस्वरुपाला जाऊन मिळतो असें प्रत्यक्ष ऋषिवचन असतांना युद्धासारख्या महत्वाच्या योगास आमच्या राष्ट्रानें पराङ्मुख व्हावें ही खरोखर दुर्दैवाची गोष्ट होय. "द्वाविमौपुरुषौ लोके–सूर्यमंडल भेदिनौ। परिव्राड् योगयुक्तश्च–रणेचाभिमुखे हतः॥" येथील योगयुक्त हें विशेषण योग्याप्रमाणेंच समरंगणीं देह ठेवणाऱ्या रणपंडितास देखील लागूं करावयाचें हें विसरतां कामां नये. म्हणूनच त्याला म्हणजे अन्यायाच्या प्रतिकाराकरितां केल्या जाणाऱ्या युद्धाला धारातीर्थ असें शिष्ट लोकांनीं म्हटलें आहे. ऋषींच्या या दिव्य उपदेशाकडे लक्ष देऊन हिंदु समाजानें तरी यापुढें आपला मायावादी आळस झाडून या राष्ट्रीय विद्येकडे अवश्य लक्ष द्यावें. व्यायामशास्त्रासारखें शास्त्र ही राष्ट्रीय विद्या होय. या विद्येचें पुनरुज्जीवन करून श्रीमंत आबासाहेब मुजूमदार (बडोदें) यांनीं राष्ट्राच्या पुनरुज्जीवनास आरंभ केला आहे. हें त्यांचें कार्य पूर्ण यशस्वी होवो अशी ईशप्रार्थना करून हा लेख पुरा करितों.

सदाशिव गोपाळ भिडेशास्त्री,

चालक, गीताधर्ममंडळ, पुणें.



श्रीमंत दत्तात्रय चिंतामण ऊर्फ आबासाहेब मुजुमदार, बडोदें.

श्री.

नमः श्रीलक्ष्मणगुरुचरणाभ्याम् ॥


धनुर्वेद.

लेखक :—पं. गोविंद विष्णु शास्त्री गाडगीळ (जोशी)



युद्धशस्त्रास्त्रव्यूहादिरचनाकुशलो भवेत् ॥
यजुर्वेदोपवेदोऽयं धनुर्वेदस्तु येन सः ॥ ३८ ॥

शुक्रनीति अ० ४ प्रक० ३



अर्थ—ज्याच्या ज्ञानानें—ज्याचें ज्ञान झालें असतां युद्धामध्यें, शस्त्र वापरण्यांत, अस्त्र सोडण्यांत, सैन्याची व्यूहरचना करण्यांत, गनिमी काव्यानें लढाई लढण्यांत, मनुष्य निपुण होतो, तो हा यजुर्वेदाचा उपवेद, धनुर्वेद म्हणून प्रसिद्ध आहे.

धनुर्वेदाचा हा अर्थ वाचून व **व्यायामज्ञानकोशांत** हा विषय लिहिला जाणार हें मनांत येऊन, कित्येकांना अशी शंका येईल कीं या कोशांत या धनुर्वेदाचा अन्तर्भाव

कसा होतो, म्हणून, याबद्दल विचार केला पाहिजे. प्रथम व्यायाम शब्दाचा अर्थ काय होतो हें पाहूं आणि नंतर व्यायाम व धनुर्वेद यांचा संबंध कसा आहे याबद्दल सांगूं म्हणजे या शंकेचें उत्तर मिळेल.

व्यायामशब्दाचा अर्थ.

शरीरायासजननं कर्म व्यायाम-
संज्ञितम् ॥
तत्कृत्वा तु सुखं देहं विमृन्दीयात्
समन्ततः ॥३८॥

सुश्रुत अ० २४ चिकित्सितस्थान

अर्थ–शरिरामध्यें थकवा उत्पन्न करणारें जें कर्म–काम–त्याला व्यायाम असें नांव आहे. असा व्यायाम केल्यावर, सर्व शरीरभर सुख वाटेल असें मालिश करावें.

व्यायाम शब्दाचा हा अर्थ पुष्कळांना माहीत आहे, आतां व्यायाम शब्दाचे दुसरे अर्थ पाहूं. कौटिल्यानें व्यायाम शब्दाचा अनेक अर्थी उपयोग केला आहे.

एक अर्थ—

कर्मारम्भाणां योगाराधनो व्यायामः ।

अधि० ६ अध्या० १–२

अर्थ–कार्याच्या सुरवातीकरतां लागणारें सामान गोळा करणें किंवा तयार करणें याला व्यायाम असें म्हणतात.

दुसरा अर्थ—

'यत्र आत्मनः सैन्यव्यायामानां
भूमिरभूमिः परस्य स उत्तमो देशः ॥

अधि० ९ अध्या० १-२१

अर्थ–[विजयेच्छु राजा शत्रूवर स्वारी करण्यास निघाला असतां] ज्या देशांत आपल्या सैन्याला युद्धव्यापार अर्थात् युद्ध-विषयक हालचाली करण्यास पूर्ण अवकाश मिळतो परंतु शत्रूला अशी संधि मिळत नाहीं तो देश उत्तम होय.

चाणक्याच्या पहिल्या अवतरणांतील व्यायाम शब्दाचा भावार्थ उद्योग असा आहे व दुसऱ्यांतील अर्थ लढाई असा आहे. दोनहि ठिकाणीं शारीरिक कष्ट आहेतच.

महाभारतांत व्यायाम शब्द आला आहे त्याचा अर्थ काय होतो हेंहि आतां पाहिलें पाहिजे.

उत्तिष्ठमानं सौभद्रं गदया मूर्ध्न्य-
ताडयत् ॥
गदावेगेन महता व्यायामेन च
मोहितः ॥१३॥

द्रोणपर्व अ० ४९

अर्थ–[दौश्शासनि व अभिमन्यु यांचें गदायुद्ध झालें त्यांत एकमेकांनीं एकमेकांवर गदेचे प्रहार केले व दोघेहि जमिनीवर पडले. दौश्शासनि लवकर सावध झाला व त्यानें पुनः गदा उचलली आणि] उठत असलेल्या अभिमन्यूच्या डोक्यावर गदेनें प्रहार केला. मोठ्या वेगानें ही गदा डोक्यांत बसली व पूर्वीच्या युद्धांतील थकव्यामुळें तो बेशुद्ध झाला. महाभारतांत व्यायाम शब्द असलेली आणखीहि कांहीं स्थळें आहेत व त्या सर्व ठिकाणीं शारीरिक कष्ट हाच अर्थ आहे. व्यायाम–ओढाताण ४-४०-४१, व्यायाम–श्रम ३-२९६-२; व्यायाम--युद्ध, झगडा ५-१३८-२५ इत्यादि.

आतां व्यायाम शब्दाची व्युत्पत्ति पाहूं. वि+आ+याम असे व्यायामशब्दाचे तीन अवयव आहेत. आयाम शब्दाचा अर्थ

ल्र्थी हा मापनव्यवहारांत प्रसिद्धच आहे. भ[ग]वद्गीतेंत आयाम शब्दाचा अर्थ नियमन [अ]सा केला आहे. भग० ४ २९. आयाम [श]ब्दांत यमधातु नियमन करणें या अर्थी प्रसिद्ध आहे.

संस्कृत वाङ्मयांतील वरील सर्व उताऱ्यांवरून व्यायाम म्हणजे शारीरिक कष्ट हा सामान्य अर्थ सिद्ध होतो, मग हे कष्ट कोणत्याहि कारणानें असोत, युद्धामुळें असोत, फिरावयाला जाण्यानें असोत किंवा प्राणवायु नियमन केल्यामुळें असोत. हा व्यायामशब्दाचा अर्थ झाला.

वर लिहिल्याप्रमाणें आतां व्यायाम व युद्धशास्त्र किंवा धनुर्वेद यांचा संबंध काय हें पाहूं. युद्धशास्त्रांत शरीर मजबूत बनाविणें हें पहिलें तत्व सांगितलें आहे व मजबूत शरीर व्यायामाशिवाय होणें शक्य नाहीं ह्मणून युद्धशास्त्रांतहि व्यायामाचा अन्तर्भाव होतो हें वाचकांना कळून येईल. याकरितांच या **व्यायामज्ञानकोशांत** धनुर्वेद विषयक माहिती लिहिली पाहिजे.

धनुर्वेदाचें स्पष्टस्वरूप.

धनुर्वेद ह्मणजे काय याबद्दल एक श्लोक या लेखाच्या आरंभीं दिला आहे पण त्या श्लोकावरून धनुर्वेदाचा स्पष्ट बोध होत नाहीं. धनुर्वेद ह्मणजे केवळ धनुष्यबाणविद्या नसून शस्त्रें, अस्त्रें इत्यादि सर्वांचा धनुर्वेदांत अन्तर्भाव होतो इतकेंच त्या श्लोकावरून समजतें. महाभारतांत अश्वत्थाम्याचें वर्णन आलें आहे, त्या वर्णनावरून धनुर्वेदाचा स्पष्ट बोध होतो अशी आमची समजूत आहे. याकरतां त्या वर्णनांत काय सांगितलें आहे हें पाहूं.

दशाङ्गं यश्चतुष्पादमिष्वस्त्रं वेद तत्वतः ॥
साङ्गाँस्तु चतुरो वेदान् सम्यगाख्यानपञ्चमान् ॥ १४

शल्यपर्व, अ० ६

अर्थ—जो धनुर्वेदाचीं दश अंगें, चार पाय, बाणविद्या, अस्त्रविद्या तत्वतः म्हणजे उपपत्ती सहित जाणतो. तसेंच चार वेद, त्यांचीं सहा अंगें व इतिहास जाणतो. हीं दहा अंगें कोणतीं हें महाभारतांतील श्लोकांनींच ठरवूं. शांतिपर्वांत एकाठिकाणीं फौजेचीं आठ अंगें सांगितलीं आहेत तीं अशीं—

रथा नागा हयाश्चैव पादाताश्चैव पाण्डव ॥
विष्टिर्नावश्चराश्चैव देशिका इति चाष्टमः ॥ ४० ॥
अंगान्येतानि कौरव्य प्रकाशानि बलस्यतु ॥ ४७ ॥

शांति० अ० ५८

अर्थ—हत्ती, घोडे, रथ व पायदळ ही चार प्रकारची फौज, विष्टि—या फौजेचीं कामें करणारे नोकर, नाव—मोठमोठ्या नद्यांवरून फौजेची नेआण करण्यासाठीं लागणाऱ्या नावा, चरा—हेर, बातमी पोंचविणें, शत्रूची माहिती काढणें इ० कामें करणारे, देशिका—उपदेश करणारे हीं फौजेचीं आठ अंगें झालीं. या अंगांना श्लोक ४१ मध्यें प्रकाश अंगें असें म्हटलें आहे. प्रकाश अंग म्हणजे उघड दिसणारें अंग असा अर्थ आहे. या शिवाय गुप्त अंगेंहि फौजेचीं असतात. त्यांत गुप्तचर म्हणजे शत्रूच्या फौजेंत दुफळी उत्पन्न करणें, लढाईच्या

दिवसांत शत्रु राष्ट्र लुटणें, खोट्या कंड्या पिकवून लोकांना घाबरवून सोडणें इत्यादि अनेक कामें करणारे लोक असतात त्यांना गुप्तअंगें म्हणतात. शांतिपर्व अध्याय १०३ मध्यें षडंगसेनेचें वर्णन आलें आहे तें असें—

यदास्यान्महतीसेना हयनाग-
रथाकुला ॥
पदातियंत्रबहुला अनुरक्ता
षडङ्गिनी ॥ ३८

या श्लोकाचा अर्थ टींकाकार नीलकंठाचार्य यांनीं असा दिला आहे.

षडङ्गिनी—रथ तुरग मातङ्ग पदाति
कोश वणिक्पथवती ।

अर्थ—रथ, घोडे, हत्ती, व पायदळ अशी चार प्रकारची फौज, कोश-खजिना, वणिक्पथ—व्यापारी रस्ता. वर लिहिलेलीं आठ अंगें व त्यांत कोश व व्यापारी रस्ते मिळविले म्हणजे दहा अंगें होतात. तीं अशीं—चार प्रकारची फौज, कोश, व्यापारी रस्ते, फौजेचे नोकर, नावा, बातमीदार, व उपदेशक हीं दहा अंगे झालीं. धनुर्वेदाचे चार पाय कोणते याबद्दल नीलकंठांनीं एक श्लोक दिला आहे तो असा—

दीक्षा शिक्षाऽऽत्मरक्षा च एतत्-
साधनमेवच ।
धनुर्वेदस्य चत्वार एते पादाः
प्रकीर्तिताः ॥

शल्यपर्व अ० ६ श्लोक १४ टीका

अर्थ—दीक्षा-नियम-युद्धशास्त्रासंबंधीं नियम. शिक्षा—शिक्षण, आत्मरक्षा स्वतःचें संरक्षण, साधन—हत्यारें, आजाऱ्यांची राहाण्याची व्यवस्था, रणवाद्यें इ० युद्धोपयोगी सर्व सामान. हे चार पाय होत.इष्वस्त्रामिति इषु—म्हणजे बाण. बाणांचा उल्लेख करण्याचें कारण प्राचीनकाळीं धनुष्यापेक्षां श्रेष्ठ यंत्र युद्धामध्यें दुसरें कोणतेंहि नव्हतें. इतर कोणत्याहि शस्त्रापेक्षां बाणानें दूर अंतरावर शत्रूला घायाळ करतां येतें. तसेंच अस्त्रांचेंहि पण आहे. अस्त्रें हीं बाणापेक्षांहि भयंकर आहेत म्हणजे बाणापेक्षां अस्त्रें शत्रूचा संहार फार मोठ्या प्रमाणावर करतात. याकरतां बाण व अस्त्रांचा उल्लेख केला आहे. अश्वत्थामा हें सर्व तत्वतः जाणतो म्हणजे या सर्व शास्त्राची उपपत्ति जाणतो असें वर्णन त्या श्लोकांत केलें आहे. विश्वामित्रांनीं आपल्या धनुर्वेदांत धनुर्वेदाचे चार पाद लिहिले आहेत. त्यांचीं नांवें त्यांनीं दीक्षा, सङ्ग्रह, सिद्धप्रयोग, व प्रयोगविधि अशीं लिहिलीं आहेत. भावार्थ दोनहि श्लोकांचा एकच आहे.

नीलकंठांनीं धनुर्वेदाच्या दहा अंगांबद्दल एक श्लोक या श्लोकाच्या टीकेंत दिला आहे तोहि बरा आहे. तो श्लोक असा—

व्रतं प्राप्तिर्धृतिः पुष्टिः स्मृतिः
क्षेपोऽरिभेदनम् ॥
चिकित्सोदीपनं कृष्टिरिष्वस्त्रं
स्यादशाङ्गकम् ॥

अर्थ—व्रतं--नियम, प्राप्ति—मिळणें, धृति—धैर्य, स्मृति--स्मरण, क्षेप—सोडणें. अरिभेदनम् —शत्रूमध्यें भेद उत्पन्न करणें. चिकित्सा—रोगप्रतीकार. उद्दीपनं—उत्तेजनं. कृष्टि—विद्वान्. इषु—बाण व अस्त्र--हीं दहा अंगें आहेत.

या वर्णनावरून धनुर्वेद किती व्यापक व महत्वाचा आहे हें कळून येईल.

धनुर्वेदशिक्षण.

आतां या धनुर्वेदाचें शिक्षण प्राचीनकाळीं कसें मिळत असे याबद्दल विचार करूं. धनुर्वेदशिक्षण यामध्यें दोन गोष्टी मुख्य आहेत. एक या विषयाचें प्रत्यक्ष प्रायोगिक ज्ञान व दुसरें शास्त्रज्ञान. कोणत्याहि विषयाचें यथार्थ ज्ञान तेव्हांच होतें जेव्हां त्या विषयाबद्दल तत्व आणि व्यवहार या दोनहि अंगांचें ज्ञान मनुष्य संपादन करतो. अश्वत्थाम्याच्या वर्णनांत " वेद तत्त्वतः " असें पद आलें आहे त्याचा अर्थ तरी हाच आहे कीं--अश्वत्थाम्यानें धनुर्वेदाचा अभ्यास केला व तो व्यवहारांत त्याचा उपयोग करूं शकतो. तसेंच हा व्यावहारिक उपयोग केव्हां कसा करावा, त्याचें कारण काय इत्यादि सर्व गोष्टी तो जाणतो. कोणतेंहि काम करायचें म्हटलें म्हणजे तें काम करण्याची अंगीं योग्यता असावी लागते. या नियमाप्रमाणें धनुर्वेदाचें शिक्षण मिळवायाचें म्हणजे त्यालाहि अंगीं कांहीं योग्यता पाहिजे. ही जी काम करण्याची योग्यता म्हणजे शक्ति ही ज्या मनुष्याच्या ठिकाणीं आहे त्याला शास्त्रकारांनीं " अधिकारी " असें नांव ठेविलें आहे व याप्रमाणें धनुर्वेद शिकण्याला लायक कोण तेंहि त्यांनीं सांगितलें आहे तो श्लोक असा—

महाधनो महोत्साहः सम्पूर्णावयवो युवा ॥
श्रमव्यायामशीतोष्णक्षुत्तृष्णादि-क्षमः क्षमी ॥

विश्वामित्र.

अर्थ—संपन्न, उत्साहवान्, शरिरानें अव्यंग, तरुण. श्रम--आखाड्यांतील कामें, कुस्ती इ० व्यायाम--शस्त्रांदिकांची मेहनत, शीत--थंडी, उष्ण--उन्हाळा, क्षुधा--भूक, तृषा--तहान आदिपदानें अनेक प्रकारचीं संकटें सहन करणारा व क्षमी--सहनशील अशा प्रकारचा मनुष्य धनुर्वेद शिकण्याला लायक होतो. जगांत कोणताहि पुरुषार्थ साधावयाचा म्हणजे प्रथम त्याला शरिराची आवश्यकता आहे. ज्याचें शरीर मजबूत नाहीं तो मनुष्य जगांत काय पराक्रम करणार ? धनुर्वेदाच्या अभ्यासासाठीं प्रथम शरिराची तयारी केली पाहिजे ही गोष्ट स्पष्ट आहे व शास्त्रकार हेंच सांगतात.

कुर्याद्योग्यानि गात्राणि योध्दुमिच्छुः कृतश्रमः ॥

अर्थ—योद्धुमिच्छु—युद्धाची इच्छा करणारानें म्हणजे आपण लढण्याला लायक व्हावें अशी ज्याची इच्छा असेल त्यानें प्रथम मेहनत करावी व शरिराच्या सर्व अवयवांची तयारी करावी. याकरतां प्रथम शारीरिक शिक्षण पाहिजे, म्हणून शारीरिक शिक्षणापासून आपण विचार करूं. यालाच आम्हीं प्राथमिक शिक्षण असें नांव दिलें आहे. या शिक्षणांत आखाड्यांतील कामें व शस्त्रांचे हात एवढ्या शिक्षणाचा अन्तर्भाव होतो.

प्राथमिक शिक्षण.

आपल्या देशांत बौद्धिकशिक्षण व शारीरिकशिक्षण यांना आरंभ बरोबरच होत असे. उपनयन झाल्याबरोबर विद्याभ्यासाला सुरवात होते व याच वेळीं सूर्योपासना [सूर्यनमस्कार] सुरूं होते. शरिराच्या सर्व अवयवांना योग्य

व्यायाम देणारे एक सूर्यनमस्कारच आहेत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. या सूर्यनमस्कारांसंबंधीं सविस्तर व सोपपत्तिक माहिती औंध नरेश श्रीमंत बाळासाहेब पंडित प्रतिनिधि यांनीं प्रसिद्ध केली आहे हें श्रीमतांस भूषणावह आहे. म्हणून आम्हीं यासंबंधीं येथें विस्तार करीत नाहीं. या शारीरिक व्यायामाबरोबरच प्राचीन काळीं शस्त्रांच्या अभ्यासालाहि सुरवात होत असे हें पुढील वचनावरून दिसून येतें. तें वचन असें.

सप्तमे--चाष्टमे वर्षे ब्राम्हणस्योपनायनम् ॥
धनुःप्रतोदग्रहणे तत्र राजविशोः-क्रमान् ॥

नन्दभट्ट—षडशीति

अर्थ—वयाच्या सातव्या किंवा आठव्या वर्षी ब्राम्हणाचें उपनयन करावें व याच वर्षी क्षत्रियाला धनुष्य व वैश्याला चाबूक द्यावा. यावरून आपल्या देशांत शारीरिक शिक्षणाप्रमाणें लहान वयांतच शस्त्रास्त्रांचा अभ्यास सुरू केला जात असे हें दिसून येतें. द्रौपदी पुत्रांचा शस्त्राभ्यास बारा वर्षें संपल्याबरोबर सुरू झाला असें महाभारतांत लिहिलें आहे.

एते द्वादश वर्षाणि क्रीडामुत्सृज्य
बालकाः॥
अस्त्रार्थमवसन् भीष्मे बिभ्रतो व्रतमु-
त्तमम् ॥५२॥

द्रोण० अ० १०

भावार्थ—ते द्रौपदीचे पांच पुत्र लहान बालक १२ वर्षेपर्यंत लहानपणचे खेळ खेळून नंतर भीष्मांजवळ अस्त्रविद्येचा अभ्यास सुरू करते झाले व त्यांनीं अस्त्रविद्या शिकतांना जे नियम पाळावे लागतात ते उत्तमरीतीनें पाळण्यास सुरवात केली.

आतां शारीरिक शिक्षणाबद्दल विचार करूं. नमस्कार घरीं घालतां येतात व त्यांना साहित्य कांहीं लागत नाहीं पण कुस्ती इत्यादि व्यायामांची गोष्ट तशी नाहीं, त्यासाठीं आखाडा पाहिजे. आखाडा कसा असावा याबद्दल वसिष्ठांनीं लिहिलें आहे—

दैर्घ्ये रुद्रामिता दंडा विस्तारे नवदंडिका ॥
सगरैकतला मृद्वी श्रमभूमिः प्रशस्यते ॥

अर्थ—कुस्ती इत्यादिकांचा अभ्यास करण्यासाठीं अकरा दंड लांब व नऊ दंड रुंद असा आखाडा तयार करावा. (एक दंड म्हणजे चार हात) त्यांत मऊ तांबडी माती घालावी.

व्यायामाबद्दल सर्वसाधारण नियम शास्त्रकारांनीं पुढील प्रमाणें सांगितले आहेत :—

सर्वेष्वृतुष्वहरहः पुम्भिरात्म-
हितैषिभिः ।
बलस्यार्धेन कर्तव्यो व्यायामो
हन्त्यतोऽन्यथा ॥
वयोबलशरीराणि देशकाला-
शनानिच ।
समीक्ष्यकुर्यात् व्यायाममन्यथा
रागमाप्नुयात्॥

सुश्रुत० चिकि० अ० २४ टी०

अर्थ—सर्व मनुष्यांनीं आपलें कल्याण व्हावें म्हणून बाराहि महिने व्यायाम करावा व हा व्यायाम आपल्या शक्तीच्या निम्यानें करावा. व्यायाम करतांना वय इत्यादिकांचाहि विचार करावा. वय--बाल, तरूण, वृद्ध. बल-शक्ति. शरीर--उंच, ठेंगणें, कृश, स्थूल. देश—ऊष्ण, शीत, काल—उन्हाळा, पावसाळा, हिंवाळा, अशनं—खाणें—आहार. प्रत्येक

मनुष्यानें, ह्या सर्व गोष्टी लक्षांत ठेवाव्या व त्याप्रमाणें व्यायाम करावा. याविरुद्ध वर्तन झाल्यास रोग उत्पन्न होतो. प्रकृतीला व्यायाम पाहिजे त्यापेक्षां कमी घेतला तर स्नायू ढिले होतात व जास्त मेहनत केली तर स्नायूंवर ताण पडतो व त्यांची झीज होते आणि स्नायू शक्तिक्षीण होतात. व्यायाम करतांना कपाळावर, खाकेंत, नाकावर तसेंच हातापायांचे सांधे यांवर घाम आला आणि घशाला कोरड पडूं लागली, धाप लागली म्हणजे अर्धी शक्ति झाली असें समजावें. ज्याची उष्णप्रकृति आहे त्याला व्यायाम करतांना खाकेंत घाम लवकर येतो. ज्याचा मेंदू हलका असतो त्याला कपाळावर व डोक्याला घाम लवकर येतो. ज्याचे फुप्फुस कमजोर आहेत त्याला श्वास लवकर लागतो असें समजावें. असा बेताचा व्यायाम नित्य करीत गेलें म्हणजे शरीर हलकें राहतें, त्याला काम करण्याची शक्ति असते, तें थकत नाहीं, एकाच स्थितींत पुष्कळ वेळपर्यंत राहूं शकतें, कष्ट सहन होतात, त्याच्यांतील घाणीचा नाश होतो, जठराग्नि प्रदीप्त होतो व खाल्लेलें अन्न पचून जातें, असे व्यायामापासून अनेक फायदे होतात. कोणता व्यायाम घेतल्यानें शरिराच्या कोणत्या अवयवाला योग्य व्यायाम होतो याबद्दल अलीकडे कांहीं पुस्तकें लिहिलीं आहेत तीं पुस्तकें जिज्ञासूंनीं वाचावीं व या विषयाची विशेष माहिती मिळवावी. आखाड्यांत कुस्ती, जोर, बैठका, नमस्कार, बाही—ढकेल इत्यादि अनेक प्रकारचे व्यायाम केले जातात त्या सर्वांचा हेतु शरीर कमविणें हा होय. शरिराची कमाई किंवा शरीरसंपत्ति म्हणजे काय याबद्दल असें सूत्र आहे.

रूपलावण्यबलवज्रसंहननत्वानि
कायसंपत् ॥

योगसूत्र० पाद० ३ सू० ४५

अर्थ—रूप—सौंदर्य. व्यायाम करून शरिराच्या प्रत्येक अवयवाला इष्ट वळण मिळालें म्हणजे शरीर डौलदार दिसतें हेंच शरिराचें सौंदर्य होय. लावण्य–कांति–पाणीदार मोती जसें चमकतें त्याप्रमाणें शरिरांतहि एक प्रकारची चमक उत्पन्न होतें हेंच लावण्य समजावें. बल—शक्ति, व वज्रसंहननत्व—वज्रा प्रमाणें बळकट आहे शरीर ज्याचें तें वज्रसंहननत्व तात्पर्य-व्यायाम करून शरीर डौलदार बनविणें, शरिरांत कांति असणें, शक्ति असणें व शरीर लोखंडाप्रमाणें घट्ट असणें ही शरीरसंपत्ति होय. शरिराच्या आकाराप्रमाणें म्हणजे डौलाप्रमाणें कपडेहि पण वापरावे म्हणजे शरिराचें सौंदर्य चांगलें खुलतें. याबद्दल प्राचीन काळीं बराच विचार झाला होता असें निरनिराळे पोषाख, हातावर बांधण्याचे ताईत, दोरे, कल्लेदार मिशा, हातांत धारण करावयाचीं शस्त्रें यांचीं वर्णनें अनेक ठिकाणीं वाचावयास मिळतात त्यावरून दिसून येतें.

कुस्ती.

कर्षणैः सन्धिमर्माणां प्रतिलोमानु-
लोमतः ।
बन्धनैर्घातनं शत्रोर्युक्त्या तद्
बाहुयुद्धकम् ॥ ३३८ ॥

शुक्र० अ० ४ प्रक० ७

भावार्थ—शरिराचे निरनिराळे भाग युक्तीनें धरून त्यांना मागें किंवा पुढें ओढून सांधे किंवा नाजूक भाग यांचा घात करणें तसेंच

शत्रूच्या शरिराचे अवयव त्याच्याच शरिरांत निरनिराळ्या रीतीनें बांधून शत्रूला मारणें याला बाहुयुद्ध किंवा कुस्ती म्हणतात.

या युद्धांत शरिराचे सांधे व नाजुक भाग यांची माहिती असावी लागते. शरिराच्या सांध्यावर कसा आघात करावा, नाजूक भागावर काय केलें म्हणजे धक्का लागेल, तसेंच आपले सांधे व नाजूक भाग कसे रक्षण करावे, याची माहिती लागते. केवळ शारीरिक बलाचा उपयोग करून पशुपक्ष्यांपासून सर्व प्राणिमात्रांत हें युद्ध जारी आहे. माणसांतसुद्धां हा प्रकार दिसून येतो. सृष्टींत प्राण्यांच्या शरिराची रचना असते त्याप्रमाणें हीं युद्धें निरनिराळीं दिसून येतात. बैल शिंगांनींच लढतात. एडका धडक मारतो. घोडा, गाढव शत्रूला तोंडांत धरतात किंवा लाथा मारतात, जंगली डुकर वाघाच्या पोटावर शिंग मारतो इ० प्रकारांचें निरीक्षण करून शत्रूला धरावें कसें व त्याला मारावें कसें याचा अभ्यास करून कुस्तीचे निरनिराळे पेच बसविले आहेत. मनुष्यशरिराचा अभ्यास करून व सृष्टिनिरीक्षण करून वासिष्ठांनीं असे चाळीस पेच सांगितले आहेत. यांपैकीं कांहीं पेचांचीं नांवें **व्यायाम ज्ञानकोश** भाग पहिला पृष्ठ ५२ मध्यें आलेलीं आहेत. राहिलेल्या पेचांचीं नांवें येथें लिहितों. **विस्पष्टकरण**--खिळखिळें करणें, **मार्गगत**—सरळ ओढणें, **गजस्कंद**—खांद्यावर चढणें, **अपराङ्मुख**--पालथें पाडणें, **देवमार्ग**--वरओढणें, **अधोमार्ग**--खालीं दाबणें, **अमार्ग**--बाजूला ओढणें, **गमनाकुलं**--गरगर फिरविणें, **यष्टिघात**--काठीसारखें आपटणें, **वसुधादारण**--जमिनींत गाडणें, **गात्रबंध** -मिठीमारणें, **सुदारुण**-- आवळणें, **विपृष्ठं**--पिळणें, **सोदकं**--पिरगळणें, **शुथ**--ताणणें, **भूजावेष्टित**--हातांत धरणें, **बाहूमूल**--खांदे धरणें. कोणतेंहि काम करतांना कांहीं ठराविक पद्धतीनें बसावें लागतें, उभें रहावें लागतें, किंवा ओणवें रहावें लागतें याला '**स्थान**' असें म्हणतात व यालाच भाषेंत '**पवित्रा**' असें नांव आहे. हल्लीं पवित्रा शब्दाचा उपयोग खेळ, कुस्ती, लढंत इत्यादि मर्दानी खेळांत शरिराची जी विशिष्ट तऱ्हेनें राहण्याची पद्धति त्यामध्येंच करीत असतात. याप्रमाणें कुस्तीला उभे राहिलेले मल्लहि विशिष्ट तऱ्हेनें उभे राहतात त्याला पवित्रा म्हणतात व असे पवित्रे कुस्तींत निरनिराळे आहेत. वर सांगितलेले पेच वापरून माणसाला हत्तीचा पाय मोडतां येतो, वाघाला फाडतां येतें, हरणाला धरतां येतें किंवा मोठें वजन उचलून फेकून देतां येतें. या शारीरिक संपत्तीचा इतिहास निरनिराळ्या लेखकांनीं पहिल्या भागांत लिहिला आहेच. येथें ग्रीक लोकांनीं आपल्या हिंदुस्थानाबद्दल जें लिहिलें आहे तो भाग लिहावयाचा राहिला आहे म्हणून त्याबद्दल लिहिलें पाहिजे.

शरीरसंपत्ति.

सिकंदर बादशाहा हिंदुस्थानांत आला व त्याच्या पंजाबांत अनेक लहान लहान राष्ट्रांशीं लढाया झाल्या. या लहान लहान राष्ट्रांचें वर्णन ग्रीक लेखकांनीं लिहिलें आहे त्यांत या सर्व राष्ट्रांत दिसून येणारी लढाऊ वृत्ति व शारीरिकबल यांची ग्रीकांनीं प्रशंसा केली आहे. कथई—कठ, सोफाइट्स—सोपीथ—सौभूति, मल्लोई—मालव ऑक्सिड्राकेई—क्षुद्रक, सिबोई—

सिबि, अंबस्तई-अंबष्ठ इत्यादि अनेक लोकांशीं सिकंदराच्या लढाया झाल्या. कित्येक लढायांत सिकंदरास माघार घ्यावी लागली. जसें "एकाकिभिः क्षुद्रकैर्जितम्" पातंजल महाभाष्य ५–३–५२, या वाक्यावरून दिसून येतें. क्षुद्रक व मालव या दोन प्रजासत्ताक राष्ट्रांनीं आपली फौज एकत्र करून सिकंदराशीं लढाई दिली. त्यांत एकट्याच क्षुद्रकांनीं सिकंदराच्या फौजेचा पराभव केला, पण शेवट-पर्यंत विजय मिळविणें या संघालाहि शक्य झालें नाहीं. या उभय राष्ट्रांनीं आपले १०० राजदूत सिकंदराकडे पाठविले ते सर्व रथांत बसून सिकंदराकडे गेले. हे राजदूत दिसण्याला अत्यंत भव्य व शरिरानें असाधारण हृष्ट, पुष्ट होते. दुसरें उदाहरण कठांचें. यद्यपि कठांची सेना थोडी होती व सिकंदराची फौज जास्त होती तथापि या कठांनीं आपल्या वीरतेचा परिचय सिकंदराला चांगलाच करून दिला व आपली हार मानली नाहीं. कठांमध्यें अशी पद्धति होती कीं, लहान मुलांचें लालनपालन व मानसन्मान आईबापांच्या स्वाधीन नसून सरकारी अधिकाऱ्यांच्या हातीं होता. मुलांच्या शारीरिक परीक्षेसाठीं सरकारांतून एक अधि-कारी नेमला जात असे. या अधिकाऱ्यानें मूल अशक्त आहे किंवा याच्या शरिरांत व्यंग आहे असें सांगितलें तर तें मूल मारण्यांत येत असे. बालकाच्या जन्माच्या दुसऱ्या महि-न्यांत ही परीक्षा होत असे व मूल मारण्याची अंतिम आज्ञा नगराचा प्रधान अधिकारी देत असे. या कठांशेजारी सौभूति लोक राहात असत. हे कठ व सौभूति सौंदर्याचे भोक्ते होते. कठांमध्यें सर्वांत अधिक सुंदर मनुष्य राजा म्हणून निवडला जात असे. विवाहसंबंध निश्चित करणें मुलगे व मुली यांवरच अव-लंबून असे. हा संबंध जोडतांना कुलाकडे लक्ष दिलें जात नसे किंतु सुंदर आकृतीकडे लक्ष असे. कारण मुलीच्या सौंदर्याचाच समाजांत फार आदर असे. या कठसौभूतींप्रमाणेंच यादवां-तील वृष्णींमध्येंहि सौंदर्यभक्ति दिसून येते. वृष्णिहि आपला शासक निवडतांना सुंदर आकृतीकडे विशेष लक्ष देत असत. (महा-भारतशांतिपर्व अ० ८१). पोरस राजाचें भव्य शरीर व त्याच्यावर युद्धांत झालेल्या जखमा पाहून सिकंदर आश्चर्यानें थक्क झाला ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे.

ग्रीक लेखकांनीं या सर्व लोकसत्ताक राष्ट्रां-बद्दल जें लिहिलें आहे, त्यांत त्यांचें लक्ष लोकांच्या भव्य शरिराकडे विशेष वेधलें आहे हें मागें लिहिलें आहे.

या सर्व राष्ट्रांत वृजि हे अत्यंत बलशाली, शरीरसंपत्तिमान् म्हणून प्रसिद्ध आहेत.

मौर्यांच्या कारकीर्दींत ग्रीक वकील मेग्यास्थे-नीज यानें तत्कालीन एक सर्वप्रिय व्यायाम-पद्धति लिहिली आहे ती अशी. या पद्धतीचें नांव "संघर्षण" असें आहे. हें संघर्षण म्हणजे दोन व्यक्तींनीं आपलें शरीर एकमेकांवर घांसणें. हें संघर्षण अनेक रीतींनें करतात. संघ-र्षणाच्या वेळीं अंगाला चिकट पदार्थ लाव-तात. त्यायोगें कातडी घासली जात नाहीं. हें दोन व्यक्तींचें संघर्षण पहातांना फार मौज वाटते. हल्लीं दक्षिणेंत त्रिचनापल्लीच्या बाजूस या व्यायामाची पद्धति आहे. तेथें एरंडेल व मेण मिश्रण करून अंगाला लावतात.

व्यायाम झाल्यानंतर मालिस व नंतर स्नान असा क्रम आहे. आपल्या देशांत मालिस करणारे धंदेवाईक अलीकडच्या काळांत फार कमी दिसतात पण प्राचीन काळीं हीं कामें करणारे धंदेवाईक होते.

रामायणांत रामाला वनांत पाहण्यासाठीं जे अनेक लोक निघाले त्यांत "स्नापकोष्णोदकाः" १४ [स. ८३ अयोध्याकांड] असा उल्लेख आला आहे. स्नापकाः–उष्णोदकस्नापकाः–ऊन पाण्यानें स्नान करण्याची सोय करणारे धंदेवाईक लोक व उष्णोदकाः–अंगमर्दकाः–आंगमर्दन करणारे म्हणजे मालिस करणारे धंदेवाईक लोक अयोध्येंत होते अशी माहिती मिळते. प्राचीनकालीं मुलींच्या व्यायामाचीहि व्यवस्था होती असें रामायणावरून दिसून येतें. रामायणांत अराजकतेचें वर्णन आलें आहे. त्यांत एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं—

नाराजके जनपदे तूद्यानानि समागताः॥
सायान्हे क्रीडितुं यान्ति कुमार्यो हेमभूषिताः ॥१७॥

अयो० कांड स० ६७

अर्थ–देशांत अराजक स्थिति माजली असतां, सोन्याचे अलंकार घातलेल्या अशा कुमार्यः म्हणजे मुली संध्याकाळीं खेळण्याकरतां बागेंत येत नाहींत. अर्थात् देशांत सुव्यवस्था असतांना मुली पूर्वी बागेंत अनेक खेळ खेळत असत असें सिद्ध होतें. या खेळांतून मनाला करमणूक व शारीरिक व्यायाम होतो ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

कुस्तीला नियुद्ध, मल्लयुद्ध, बाहुयुद्ध, प्राणयुद्ध, इ. नांवें आहेत. वसिष्ठांचे वेळीं याला नियुद्ध म्हणत असत. पुढें हनुमंताचे वेळीं याला बाहुयुद्ध असें नांव पडलें व नंतर भीमसेनाचे वेळीं याला मल्लयुद्ध, प्राणयुद्ध अशीं नांवें पडलीं. या नियुद्धाचे दोन प्रकार आहेत, त्यांना हल्लीं व्यवहारांत हनुमंती कुस्ती व भीमसेनी कुस्ती म्हणतात. हल्लींच्या कुस्तींबद्दलची माहिती "व्यायाम" मासिकांत प्रसिद्ध होत असते. जरी कुस्त्यांचे दोन प्रकार आहेत तरी हल्लीं सर्वत्र आखाड्यांतून हनुमान हीच देवता पूजिली जाते. भीमसेन सांप्रदायाबद्दल विशेष माहिती मिळत नाहीं. भीमसेनीकुस्ती या शब्दावरून भीमाचा सांप्रदाय असला पाहिजे असें वाटतें व तो पंजाब, मथुरा इ. प्रांतांत आहे असें ऐकतों. या प्रांतांतून गदेच्या अभ्यासाला प्राधान्य आहे व गदेपासूनच व्यायामाला सुरवात होते.

शस्त्राभ्यास.

इषुर्ब्रह्मा गुणो विष्णुर्धनुर्देवो महेश्वरः।
एतेषां स्मरणं नित्यं कर्तव्यं जयमिच्छता॥

कोदण्डमण्डन

अर्थ–बाण हा ब्रह्मदेव, धनुष्याची दोरी हा विष्णु व धनुष्य म्हणजे साक्षात् महादेव होय. विजयेच्छू मनुष्यानें या तिघांचें स्मरण नेहमीं करावें.

प्राथमिक शिक्षणांत कुस्ती, जोर, मुद्गल जोडी, बैठका इ. ज्याप्रमाणें येतात त्याप्रमाणें शस्त्रांचा अभ्यासहि याच शिक्षणांत अन्तर्भूत होतो. शस्त्रांच्या अभ्यासाकरितां मैदान पाहिजे. तें कसें असावें याबद्दल विश्वामित्रांनीं आपल्या धनुर्वेदांत सांगितलें आहे.

भस्मास्थितुषपाषाणकण्टकण्ट-
किवर्जिताम्।
विस्तीर्णां विजनाकीर्णां श्रमभूमिं
समाश्रयेत्॥
समे गुप्ते शुचि स्थाने............॥

अर्थ—शस्त्रांच्या अभ्यासासाठीं जागा तयार करावी. तींत राख, हाडें, भुसा, दगड, कांटे, कांटेरीं झाडें हीं नसावीं. ती विस्तीर्ण म्हणजे प्रशस्त असावी व या जागेंत लोकांचा उपसर्ग नसावा. ती जागा सपाट असावी, व तिच्या चारहि बाजूंला कुंपण किंवा भिंत असावी व ती शुद्ध असावी म्हणजे त्या जागेच्या कडेला फुलझाडें असावीं व धूप इत्यादि द्यावे म्हणजे ती जागा शुद्ध राहाते. या जागेला श्रमभूमि असें म्हणतात.

आपल्या देशांत शारीरिक शिक्षण व शस्त्रशिक्षण यांना लहानपणींच आरंभ होत असे, हें मागें सांगितलेंच आहे. शस्त्राभ्यासासाठीं समभूमि म्हणजे मैदान पाहिजे. या मैदानांत लाठी इत्यादिकांचा अभ्यास करतां येतो. लाठीबद्दल वसिष्ठांनीं माहिती सांगितली आहे. जो दोन अंगुलें जाड व चार हात लांब असतो त्याला दण्ड ह्मणतात. हा दण्ड ब्रह्मचाऱ्यापासून संन्याशापर्यंत सर्वांनीं धारण करावयाचा असतो. दण्ड कसा असावा याबद्दल मनूनेंहि लिहिलें आहे.

ऋजवस्ते तु सर्वे स्युरव्रणाः
सौम्यदर्शनाः॥
अनुद्वेगकरा नृणां स त्वचोऽनग्निदू-
षिताः ॥ ४७ ॥ अ० २

अर्थ—ब्रह्मचाऱ्यांनी हातांत धरावयाचे दण्ड सरळ असावे, त्यांना मध्येंच भोंक पडलेलें नसावें किंवा चीर पडलेली नसावी. दिसायला सुंदर असावे, वरच्या सालीसह असावे, विस्तवानें जळलेले नसावे व लोकांना उद्वेग म्हणजे पीडा किंवा त्रास देण्यासाठीं या दण्डांचा उपयोग करूं नये. या दण्डांचा उपयोग कोणता हें वसिष्ठ सांगतात.

स्खलतः सम्प्रतिष्ठानं शत्रूणां च
विरोधनम् ॥
अवष्टम्भनमायुष्यं भयघ्नं दण्ड-
धारणम् ॥

अर्थ—चालतांना पडणाराला आधार, शत्रूंना धाक, सरळ व ताठ उभे करणारा, आयुष्यवर्धक, भीति नाहींशी करणारा असा हा दण्ड आहे व याच हेतूनें हा दण्ड हातांत घ्यावा.

लाठी.

वर दण्डाचें जें वर्णन केलें आहे, तें तो दण्ड ब्रह्मचाऱ्यांनीं घ्यावयाचा त्यासंबंधीं झालें. पण लाठीची गोष्ट तशी नाहीं. लाठी हें एक शस्त्र आहे. याचे अनेक उपयोग आहेत. लाठीचा उपयोग दण्डाप्रमाणें स्वसंरक्षणासाठीं आहे व युद्धासाठींहि आहे. दोन अंगुलांहून कमी जाडीची व चार हातांपेक्षां कमी लांबीची काठी हिला यष्टि असें म्हणतात. यष्टीलाच हल्लीं लाठी म्हणतात. लाठीचें एक हातानें फिरविणें व दोन हातांनीं परजणें असे दोन हात आहेत.

करेणादायलगुडं दक्षिणाङ्गुलिकं
नवम् ॥
उद्यम्य पातयेत्तेन नाशस्तस्य रिपोर्दृढः॥
उभाभ्यामथहस्ताभ्यां कुर्यात्तस्य
निपातनम् ॥

अक्लेशेन हि तत्कुर्वन् वधे सिद्धि-
मवाप्नुयात् ॥

अर्थ–उजव्या हातांत नवीन मजबूत लाठी घेऊन ती वर उचलून शत्रूला मारावी म्हणजे त्याचा नाश होतो. याप्रमाणें दोन हातांनीं लाठी धरून ती शत्रूवर मारावी. या कामीं लाठी फिरविण्याचा अभ्यास झाला पाहिजे व ती सहज मारतां आली पाहिजे म्हणजे शत्रूवर आघात करतां येतो. लाठी फिरवितांना आपलें रक्षण करणें व शत्रूवर आघात करणें हीं दोन तत्वें आहेत. वोथाटी उजव्या हातानें व डाव्या हातानें फिरवितात, पण लाठी डाव्या हातानें फिरविणें अगर मारणें याचा अभ्यास होत नाहीं तो अवश्य झाला पाहिजे. एकादे वेळीं शत्रूच्या आघातानें उजवा हात निकामी होण्याचा संभव असतो. अशा वेळीं डाव्या हातानें लाठी मारतां आली तर फार उपयोग होतो. जपानांत मुलांस दोनहि हातांनीं कामें करण्यास शिकवितात याचा उद्देश हाच आहे. काशीच्या पूर्व प्रांतीं आठ आठ दहा दहा हातांची उंच लाठी घेऊन लढणारे लोक आहेत. ही लाठी डोक्यावर मधोमध धरतात व पुढें मार व मागें रोक अशा रीतीनें लढतात. लहान मुलांना दोन किंवा अडीच हात लांब व एक अंगुळ जाड अशी लाठी देतात. प्रथम एका लाठीचें शिक्षण देतात व नंतर दोन हातांत दोन लाठ्या देतात. या लाठीला छोटी लाठी म्हणतात. ही छोटी लाठी व तरुण मुलें फिरवीत असलेली लाठी यांचे हात निरनिराळ्या आखाड्यांतून निरनिराळे आहेत. तरी मस्तक, कानशिल, बगल, व पोटऱ्या इत्यादि ठिकाणीं मार देणें हें सर्वांत साम्य आहे. शरिरावर नाजूक ठिकाणीं मार देणें हेंच आघातांतील तत्व आहे व असा वर्मी मार लागला तरच शत्रू घायाळ होईल. लाठी ही सर्वांना मिळण्यासारखी, कोठेंहि ठेवण्यासारखी व वाटेल तेव्हां वापरण्यासारखी आहे. लाठीच्या दोन्ही टोंकांस शेंब्या लावतात, म्हणजे जमिनीवर ठेवल्यानें ती झिजत नाहीं. तसेंच लाठी फुटूं नये म्हणून तिला तारेनें गुंफतात. या तारेमुळें तिचा मार जबर बसतो. लाठीला तेल देत असतात. लाठी फिरविण्याचा नित्य अभ्यास ठेवला म्हणजे दोन गोष्टी साधतात. एक लाठी लवकर लवकर फिरवितां येतें व दुसरी ती बराच वेळपर्यंत फिरवितां येतें. याप्रमाणें म्हणजे लवकर लवकर फिरविणें व बराच वेळ फिरविणें इतका अभ्यास लाठीचा झाला पाहिजे म्हणजे लाठीचा योग्य उपयोग करतां येईल. प्राचीन काळीं लढाईत लाठीचा उपयोग करीत असल्यानें. लाठीचा अभ्यास चांगल्या रीतीनें करीत असत.

धनुष्य.

आखाड्यांत लाठीपासून अनेक शस्त्रांचा अभ्यास आपले लोक करीत असत. त्या सर्वांत धनुष्य हें शस्त्र अत्यंत महत्वाचें गणलें जात असे. म्हणून आतां धनुष्याबद्दल विचार करूं. धनुष्य–विद्येचा विचार नऊ अंगांनीं करीत असतात. तीं अंगें अशीं आहेत—

१ **कोटी**–धनुष्याची कांब, तिचें सामान, माप, वजन इत्यादि.

२ **गुण**–धनुष्याची दोरी, तिचें सामान, माप, वजन इत्यादि.

३ **इषु**–धनुष्याला लावण्याचा बाण, माप, वजन इत्यादि.

४ **स्थान**–बाण मारण्यासाठीं उभे राहण्याची पद्धति-पवित्रा.

५ **आदान**–भात्यांतून बाण निवडून घेणें.

६ **सन्धान**–बाणाचा नेम धरणें-शिस्त.

७ **आकर्षण**–बाण लावल्यावर दोरी ओढणें.

८ **विसर्जन**–बाण सोडणें.

९ **कौशल्य**–धनुर्विद्येंत करतां येणारे चमत्कार.

या नऊ प्रकारांबद्दल लिहिणें म्हणजे साधनाबद्दल लिहिणें. हा साधनविचार लिहिण्यापूर्वीं धनुर्वेदशिक्षणाला आरंभ कसा होत असे याबद्दल प्रथम लिहूं.

ब्राह्मणाय धनुर्देयं खड्गं क्षत्रियसूनवे।
वैश्याय दापयेत् कुन्तं गदां शूद्राय दापयेत्॥

विश्वामित्र

अर्थ–ब्राम्हणाला–उत्तम मुलाला–धनुष्य द्यावें. क्षत्रिय–दुसऱ्या प्रतीचा मनुष्य–याला तलवार द्यावी, वैश्य तिसऱ्या प्रतीचा मनुष्य–याला भाला द्यावा व शूद्र–चौथ्या प्रतीचा मनुष्य याला गदा द्यावी; व शेवटीं निःशस्त्र लोकांनीं कुस्त्या कराव्या. अशीं पांच युद्धें विश्वामित्रांनीं सांगितलीं आहेत. वरील श्लोकांतील ब्राम्हण इत्यादि शब्द जातिवाचक समजूं नये. शिल्पादिशास्त्रांत हे शब्द जातिवाचक नाहींत तर माणसांच्या व इतर सर्व जिनसांच्या प्रती दाखवितात हें लक्षांत ठेवलें पाहिजे. ही गोष्ट विसरल्यानें फार घोटाळा होतो व पुष्कळदां ग्रंथांचा अर्थ भलताच करण्यांत येतो. वयाच्या सातव्या किंवा आठव्या वर्षीं या शस्त्राभ्यासाला सुरवात होत असे हें मागें सांगितलेंच आहे. या वयांत ज्या शस्त्रांचा अभ्यास व्हावयाचा तीं शस्त्रें मुलांच्या शक्तीप्रमाणेंच लहान असणार हें सांगावयास नको. या शस्त्रांच्या अभ्यासाला आरम्भ करतांना पूर्वीं उपनयन नांवाचा संस्कार करीत असत. ज्याप्रमाणें वेदाध्ययनाकरतां उपनयन संस्कार करतात, त्याप्रमाणें पूर्वीं निरनिराळ्या शास्त्रांच्या अध्ययनाकरतां उपनयन करीत असत. धनुर्विद्येच्या उपनयनाबद्दल पुढीलप्रमाणें माहिती मिळते–

धनुर्वेदोपनयन.

कृतोपवासः शिष्यस्तु धृताजिनपरिग्रहः ॥
संतर्प्यदानहोमाभ्यां सुरान्स्वाहाविधानतः ॥
बद्धाञ्जलिपुटस्तत्र याचयेद्गुरुतो धनुः ॥

अर्थ–धनुर्वेद शिक्षणाला ज्या दिवशीं आरंभ करावयाचा त्या दिवशीं शिष्यानें शुचिर्भूत व्हावें व उपवास करावा. होम करावा व देवतांना आहुति द्याव्या, तसेंच दान करावें. मग शिष्यानें दोन्ही हात जोडून गुरुजींपुढें नम्रतेनें उभें राहावें व आचार्य मला धनुष्य द्या म्हणून गुरुजींची प्रार्थना करावी.

अङ्गन्यासस्ततः कार्यः शिवोक्तः सिद्धिमिच्छता ॥
आचार्येण च शिष्यस्य पापघ्नो विघ्ननाशनः ॥
शिखास्थाने न्यसेदीशं बाहुयुग्मे च केशवम् ॥

ब्रह्माणं नाभिमध्ये तु जङ्घयोश्च गणाधिपम् ॥

अर्थ—नंतर आचार्यानें शिष्याला त्याच्या कार्यांत सिद्धि मिळावी म्हणून शंकरानें सांगितलेला, पापहारक व विघ्ननाशक असा शिष्याच्या ठिकाणीं अंगन्यास—निरनिराळ्या अवयवांना स्पर्श करणें—करावा. शेंडीला स्पर्श करून ब्रह्मरन्ध्राच्या ठिकाणीं " ॐ ऱ्हौं शिखास्थाने शङ्कराय नमः " हा मंत्र म्हणून महादेवाची स्थापना करावी. दोन्ही बाहूंना स्पर्श करून " ॐ ऱ्हौं बाह्वोः केशवायनमः " या मंत्रानें विष्णूची स्थापना करावी. नाभीला स्पर्श करून " ॐ ऱ्हौं नाभिमध्ये ब्रह्मणेनमः" ब्रह्मदेवाची स्थापना करावी. दोनहि मांड्यांना स्पर्श करून " ॐ ऱ्हौं जङ्घयोर्गणपतये नमः" मांड्यांचे ठिकाणीं गणपतीची स्थापना करावी. यानंतर—

शिष्याय मानुषं चापं धनुर्मंत्राभिमंत्रितम् ॥
काण्डात्काण्डाभिमन्त्रेण दद्याद्वेदविधानतः ॥

अर्थ—आचार्यानें शिष्याला " काण्डात्काण्डात्प्ररोहन्ति परुषः परुषः परि ॥ या धनुर्मंत्रानें अभिमंत्रण केलेलें धनुष्य वजनाला हलकें व लहान असें—वेदविधीप्रमाणें शिष्याला द्यावें.

प्रथमं पुष्पवेधञ्च फलहीनेन पत्रिणा ।
ततः फलयुतेनैव मत्स्यवेधञ्च कारयेत् ॥
मांसवेधं ततः कुर्यादेवं वेधो भवेत्रिधा ॥

अर्थ—नंतर त्या मनुष्यानें प्रथम फुलाचा वेध करावा, यावेळीं बाणाला फाळ असूं नये. यापुढें फाळ लावलेल्या बाणानें मत्स्यवेध करावा, व उपरान्त मांसवेध करावा.

एवं वेधत्रयं कुर्याच्छंखदुंदुभिनिःस्वनैः ॥
ततःप्रणम्य गुरवे धनुर्बाणान्निवेदयेत्॥

अर्थ—याप्रमाणें तीन प्रकारचे वेध करावे या वेळीं शंख, नगारा इत्यादि वाद्यें वाजवावीं. यानंतर शिष्यानें आचार्यांस नमस्कार करावा व मग आचार्यांनीं शिष्यास धनुष्य व बाण द्यावे.

येथें शिष्यानें तीन प्रकारचा वेध करावा व मग आचार्यांनीं धनुष्य बाण द्यावे असें सांगितलें आहे. यावरून हा विधि लहानपणींच होत नसून शिष्याकडून धनुष्याचा थोडासा अभ्यास झाल्यावर हा विधि होत होता असें दिसतें.

मांसवेधाच्या वेळीं शुभाशुभ विचारहि सांगितला आहे. शिष्यानें सोडलेला बाण मांसवेध करून पूर्व दिशेला पडला तर तो शिष्य विजयी व सुखी होतो. दक्षिणेला पडला तर क्लेश व परदेशगमन होतें. पश्चिमेला पडला तर धनधान्यसमृद्धि, तसेंच उत्तर दिशा व ईशान्य दिशा सोडून इतर सर्व उपदिशा ह्या कल्याणकारक समजाव्या.

अन्नपानादिभिश्चैव वस्त्रालङ्कारभूषणैः ॥
गन्धमाल्यैर्विचित्रैश्च गुरुं तत्र प्रपूजयेत् ॥

अर्थ--यादिवशीं गुरुजींची पूजा करावी. शिष्यानें गुरुजींना गन्ध लावावें. गळ्यांत--फुलांचा हार--घालावा. यथाशक्ति महावस्त्रादिक द्यावीं व भोजन घालावें.

हा धनुर्दानविधि कोणत्या दिवशीं करावा याबद्दल ज्योतिषाची माहिती दिली आहे ती अशी—

हस्त, पुनर्वसु, पुष्य, रोहिणी, उत्तरा, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, अनुराधा, अश्विनी व रेवती हीं दश नक्षत्रें शुभ समजावीं. तसेंच जन्मस्थ चंद्र, तिसरा, सहावा, दहावा, अकरावा, हे चंद्र उत्तम समजावे. तृतीया, पंचमी, सप्तमी, दशमी, त्रयोदशी, द्वादशी, ह्या तिथि आणि आषाढ ते कार्तिक हे पांच महिने शुभ समजावे. या पांच महिन्यांत धनुष्याचा अभ्यास करावा. कांहीं अनध्याय म्हणजे सुट्याहि सांगितल्या आहेत. दोन अष्टमी, चतुर्दशी, अमावास्या व पौर्णिमेचा अर्धा-दिवस या दिवशीं तसेंच भलत्याच वेळीं आकाशांत अभ्र आलें, ज्यादिवशीं मनः-स्वास्थ्य नसेल, बाण सोडतांना पहिलाच बाण लक्ष्याला लागला नाहीं, धनुष्य मोडलें किंवा प्रत्यंचा तुटली किंवा सर्प दिसला तर त्या दिवशीं अनध्याय समजावा. तसेंच मार्ग-शीर्षापासून ज्येष्ठापर्यंत अनध्याय समजावा.

धनुष्याचा अभ्यास करण्यापूर्वी साध्या धनुष्यानें अभ्यास करावा—

प्रथमं यौगिकं चापमभ्यासाय
नियोजयेत् ।
निजबाहुबलोन्मानात्किञ्चिद्धीनं
शुभं धनुः ॥ विश्वा०

अर्थ--प्रथम अभ्यासाकरतां यौगिक चाप घ्यावें. यौगिक चाप म्हणजे ज्याच्या योगानें धनुष्याची तयारी होते, धनुर्विद्येंत कौशल्य प्राप्त होतें असें धनुष्य घ्यावें व अभ्यास करावा. हें धनुष्य धनुर्धाऱ्यापेक्षां किंचित् कमी जोरदार असावें. धनुष्य ओढण्यांतच जर धनुर्धाऱ्याची शक्ति खर्च झाली तर लक्ष्यवेध-बरोबर होत नाहीं. म्हणून धनुर्धाऱ्यापेक्षां कमी जोरदार असेंच धनुष्य असावें. या प्राथमिक तयारींतच लेझीमचा अन्तर्भाव होतो. बहुतेक ठिकाणीं लेझीम लाकूड व लोखंड मिळून बनवितात. पण जुने लेझीम सर्व लोखंडाचेच आहेत व याचा आकार धनुष्या-सारखाच असतो. धनुष्य चाळवितांना निर-निराळ्या पवित्र्यांवर उभें रहावें लागतें व निरनिराळ्या पद्धतींनीं वांकावें लागतें. लेझीमचे जुने हात असेच धनुष्योपयोगी आहेत व हल्लींच्या हातांपैकीं कांहीं हात जुन्या हातां-सारखे आहेत.

बाणांचा अभ्यास.

बाण सोडण्याचा अभ्यास करण्याकरतां जी तयारी करावी लागते तिचें विवेचन असें आहे. धनुष्य इत्यादिकांच्या अभ्यासाकरितां मैदान कसें असावें याचें वर्णन मागें आलेंच आहे. या मैदानावर

कूटं करद्वयोत्सेधं वृषस्कन्धसमाकृतिं ॥
विश्वामित्र

तस्योपरि त्रिभागस्थं श्वेतं वा
रक्तमेव वा ॥
लक्ष्यं कृत्वापसृत्यास्मात् स्थानभूमिं
समाश्रयेत् ॥
जामदग्न्य

अर्थ–नेम मारण्यासाठीं व धनुर्धारी उभा राहण्यासाठीं अशा दोन जागा तयार कराव्या. वेधाच्या ठिकाणीं बैलाच्या खांद्यासारखा मऊ मातीचा गोळा असावा व तो दोन हात ऊंच आणि रुंद असावा व नंतर यावर

बाणांचे नेम मारावे. बन्दुक इत्यादि मारण्यासाठीं धातूच्या पत्र्याचें एक लक्ष्य करावें, त्याचे तीन भाग करून त्यांपैकीं एका भागांत पांढरे किंवा तांबडें चक्र करावें. या चक्रावर किंवा त्याच्या गर्भांत गोळ्या माराव्या. कित्येकांना या गोळ्या मारण्यासाठीं काळें व पांढरें आणि तांबडें अशीं एकांत एक लहान वर्तुळें रंगावीं व त्यास गोळ्या माराव्या असें सुचविलें आहे. या लक्ष्यापासून लांब, जवळ अशा निरनिराळ्या अंतरावर धनुर्धारी बसण्याच्या जागा कराव्या. या जागांना स्थानभूमि असें ह्मणतात. या जागांवरून बाण सोडावे. बाण सोडणें तो कमींत कमी दहा पावलें अंतरावरून आरंभ करावा. अभ्यासाकरितां घ्यावयाचे हे बाण सम असावे. अभ्यासाला सुरवात झाल्यानंतर वर्ष सहा महिने गुरुजींनीं विद्यार्थ्यांवर नजर ठेवावी व विद्यार्थ्यांची योग्यता ठरवावी. हीं विद्या तारण व मारण करणारी अशी आहे ह्मणून ही विद्या भलत्यालाच मिळाली तर तो आपल्यावरच उलटावयाचा यासाठीं नीट परीक्षा करून ही विद्या शिकवावी. याच मैदानावर इतर शस्त्रांचा अभ्यास होतो याबद्दल पुढें वर्णन येईलच.

धनुष्याची माहिती–

कोटी–धनुष्याची कांब.

द्रव्य—

धनुर्द्रव्यत्रयं प्रोक्तं दारु शृङ्गं च लोहकम् ॥

धनुष्याची कांब तीन द्रव्यांची करतात. तीं तीन द्रव्यें म्हणजे लांकूड, शिंग, व लोह म्हणजे धातु. यांत खालीं लिहिलेलीं लांकडें या कामाकरतां उत्तम समजावीं.

चान्दनं वेतसं सालं धावलं काकुभं धनुः ॥

चन्दन, वेत, साल–सालई, धावल, ककुभ–अर्जुनसादडा याशिवाय साक, वंश व अंजन हीं लाकडें वापरावीं.

माहिषं शारभं शृंगं रोहिषं वा धनुर्भवेत् ॥

ह्मैस, शरभ किंवा रोही, गवा यांच्या शिंगांचें धनुष्य होतें. या शरभाचें वर्णन असें आहे—

" शरभोऽष्टपाच्चतुरूर्ध्वपादो महाविषाण उष्ट्रमितो वनस्थः काश्मीरदेशप्रसिद्धो मृगाख्यः ॥

शरभ किंवा रोही मृगाला आठ पाय असतात; चार कमरेच्या वरती व चार खालीं. याला मोठमोठीं शिंगें असतात, हा उंटाइतका उंच असतो, वनांत राहतो, व काश्मीर देशांत मृग म्हणून प्रसिद्ध आहे. हल्लीं हा काश्मीरांत आढळत नाहीं.

सुवर्णं, रजतं, ताम्रं, कृष्णाऽयो धनुर्लोहकं॥

सोनें, चांदी, तांबें किंवा लोखंड यांचें धनुष्य करतात.

सुस्निग्धवंशजः स्निग्धो गुरुः परिणतिं गतः ।
अमध्यसरलो ग्राह्यो दण्डः सत्पुरुषोपमः ॥

विश्वामित्र.

धनुष्यासाठीं कांबीट घ्यावयाची ती चांगल्या बांबूची घ्यावी. हा बांबू पिचका नसावा, चांगला जून व वजनाला जड असा असावा, तो सत्पुरुषाप्रमाणें म्हणजे मध्यें सरळ असून दोन्ही टोकांस थोडा वांकडा असावा,

सत्पुरुषाचा पाय व मस्तक हीं उभ्या भागाशीं गुण्यांत असतात तशी धनुष्याची कांब असावी.

कामिनी भ्रूलताकारा कार्या कोटिः-
सुसंयता ।
जमदग्नि.

अर्थ—धनुष्याला लावण्याची दोरी नीट लावली म्हणजे ती सुंदर स्त्रीच्या भुंवईसारखी व्हावी.

पृथग्वा विप्रमिश्रं वा लौहं शार्ङ्गञ्च
कारयेत् ॥
शार्ङ्गस्नायुचितं कार्यं लौहं रत्न-
विभूषितम् ॥
कोदण्डमण्डन.

अर्थ—धनुष्य जेव्हां शिंगाचें किंवा धातूचें केलेलें असतें तेव्हां त्याच्या बळकटीसाठीं निरनिराळ्या पातळ पट्टया एकत्र जोडाव्या. वांबूंत अनेक धागे एका ठिकाणीं जुळलेले असतात म्हणून त्यांत स्थितिस्थापकता जास्त असते; अशी स्थितिस्थापकता शिंग किंवा धातूच्या धनुष्यांत चांगली उत्पन्न व्हावी, याकरतां या पट्टया जोडावयाच्या, शिंगाच्या धनुष्याला स्नायूंनीं गुंफून घ्यावें म्हणजे त्या पट्टया सुटावयाची भीति नसते. धनुष्य धातूचें केलेलें असून त्याला पट्टया जोडावयाच्या त्या जोडण्यास सोनें, चांदी किंवा रत्न यांचे बिंदु (रिव्हेट) वापरावे. धनुष्याच्या कांबीला पोलाद हीच धातू मुख्य आहे व तिजवर जोडणारे रुक्म बिंदु किंवा रत्नखचित काम याप्रमाणें करतात. तात्पर्य धनुष्याची कांब लवचिक असावी व ती मजबूत असावी.

धनुष्याच्या कांबीचें माप.

चतुर्हस्तं धनुःशस्तं द्वादशांगुल-
लस्तकम् ॥
अंगुलत्रितयायामं यवकोटिद्वया-
न्वितम् ॥
विश्वामित्र.

लस्तकादटनीं यावदनुपूर्वात्कृशः
कृतः ॥
श्लक्ष्णो दृढः परावृत्तो धनुर्दण्डः
प्रशस्यते ॥
जामदग्न्य.

ग्रन्थिद्वयान्तरं पर्व धनुर्मध्यं च
लस्तकम् ॥
सप्तपंच त्रिपर्वं वा धनुः श्रेष्ठं
यथोत्तरम् ॥
कोदण्डमण्डन

धनुष्याच्या कांबीचा मध्य त्याला **"लस्तक"** असें नांव आहे व दोन टोंकांना **" अटनी "** ह्मणतात. हल्लीं अटनीला **" गट्टू "** असें ह्मणतात. धनुष्याची लांबी चार हात असावी. लस्तकाची लांबी १२ अंगुळें असावी. लस्तक तीन अंगुळें रूंद असावें व दोन यव जाड असावें. लस्तकापासून अटनीपर्यंत धनुष्य पातळ पातळ होत गेलेलें असावें, तें गुळगुळीत असावें व पाठीकडे वळलेलें असावें. धनुष्याच्या कांबीच्या दोन गांठींमधील अंतराला **" पर्व "**--पेर असें म्हणतात. अशीं पेरें धनुष्याला तीन असतील तर उत्तम, पांच असलीं तर मध्यम व सात असलीं तर कनिष्ठ समजावें. चार, सहा किंवा आठ पेरांचें धनुष्य घेऊं नये. बांबूची वाढ किती जोरानें होते हें

त्याच्या पेरांच्या संख्येवरून समजतें. शिंगाचें किंवा धातूचें धनुष्य केलेलें असल्यास त्याला तीन, पांच किंवा सात पट्ट्या बसवाव्या, जितक्या पट्ट्या जास्त लावाव्या तितक्या त्या पातळ असल्या पाहिजेत हें सहज सिद्ध होतें.

धनुष्याच्या कांबीचें वजन.

श्रमे सप्तशतं वामे, दक्षिणे द्विशता-
धिकम् ॥
दृढभेदे तु साहस्रं, दूरे नवशतं
वरम् ॥
वरं प्राणाधिको वेगो न तु
प्राणाधिकं धनुः ॥
धनुषा पीड्यमानो हि धन्वी लक्ष्यं
न पश्यति ॥
अतो निजबलोन्मानं चापं स्याच्छुभ-
कारकम् ॥

विश्वामित्र

अर्थ—धनुष्याचा अभ्यास करण्यासाठीं डाव्या हातांत सातशें भार वजनाचें धनुष्य असावें व उजव्या हातानें अभ्यास करण्याच्या वेळीं नऊशें भारांचें धनुष्य असावें. एकाद्या कठीण वस्तूचा भेद करावयाचा असल्यास हजार भारांचें धनुष्य चांगलें व दूर अंतरावर बाण मारणें असेल तर नऊशें भारांचें धनुष्य असावें. जें धनुष्य वापरावयाचें त्या धनुष्याच्या जोरापेक्षां माणसाचा जोर जास्त असावा. माणसापेक्षां धनुष्याचा जोर जास्त असल्यास तें वांकवितांना मनुष्याला जड पडतें व त्यामुळें नेम बरोबर मारतां येत नाहीं, धनुष्याकडेच लक्ष जास्त लागतें व त्यामुळें नेम चुकतो. म्हणून नेहमीं आपल्या शक्तीपेक्षां कमी जोराचें धनुष्य मनुष्यानें वापरावें व हेंच धनुष्य त्याला सुखकारक होतें.

धनुष्याच्या कांबीचे दोष.

हीनमानं महादीर्घं पर्वलक्षण-
वर्जितम् ॥
कीटविद्धमपन्नंच बाह्याभ्यन्तर-
दूषितम् ॥
स्थूलसूक्ष्मगुणं विद्धं मध्यमत्स्यान्त-
रान्तरं ॥
विसूत्राग्रमसंग्राह्यं जीर्णत्वग्
जीर्णकर्कशम् ॥
तथार्धकठिनं चापि चापानष्टादशान्
त्यजेत् ॥

विश्वामित्र.

अर्थ—वर लिहिलेल्या श्लोकांत धनुष्याच्या कांबीचे एकंदर अठरा दोष सांगितले आहेत ते नसावेत.

१ **हीनमानं**—कांबीची लांबी, रुंदी, जाडी व वजन यांबद्दल मागें लिहिलें आहे त्यांत कमीपणा असणें.

२ **महादीर्घं**—लांबी फार असणें.

३ **पर्वलक्षणवर्जितं**—विषम पर्व नसलेली कांब.

मध्यावर पर्व आलें तर तेथें मोडण्याचा संभव जास्त.

४ **कीटविद्धं**—किड्यांनीं भोंक पाडलेलें.

५ **अपन्नं**--वांकडें वळलेलें.

६ **बाह्यदूषितं**--बाहेरची साल खराब झाली आहे असें.

७ **आभ्यंतरदूषितं**--आंतून खराब झालें आहे असें.

८ **स्थूलगुणं**--जाड दोरी लावलेली.

९ **सूक्ष्मगुणं**--फार बारीक दोरी लावलेली.

१० **विद्धं**--ज्याची दोरी किडली आहे किंवा खाल्लेली आहे असें.

११ **मध्यमत्स्य**--मधोमध चीर गेली आहे असें.

१२ **अंतरांतरं**--कांबीच्या आंतील धागे सुटले असलेलें.

१३ **विसूत्राग्रं**--दोरीचीं सुत्रें सुटलेलीं आहेत असें.

१४ **असंग्राह्यं**--हातांत नीटपणें धरतां येत नाही असें.

१५ **जीर्णत्वग्**--कांबीची साल झिजून गेली आहे असें.

१६ **जीर्ण**—पाठीकडून किंवा आंतून कोणताहि भाग झिजलेला आहे असें.

१७ **कर्कशं**—कांब फार ताठ झाली किंवा कठीण झाली आहे असें.

१८ **अर्धकठिनं**--कोणताहि भाग ताठ झालेलें.

देवानामुत्तमं चापं ततो न्यूनञ्च मानवम् ॥
सार्द्धपञ्चमहस्तं तु श्रेष्ठं चापं प्रकीर्तितम् ॥
तद्विज्ञेयं धनुर्दिव्यं शङ्करेण धृतं पुरा ॥
तस्मात् परशुरामेण ततो द्रोणेन धारितं ॥
द्रोणाद्गृहीतं पार्थेन ततः सात्यकिना धृतम् ॥

अर्थ--धनुष्याचे दिव्यधनुष्य व मानव धनुष्य असे दोन प्रकार केले आहेत. साडे पांच हात लांबीचें धनुष्य हें दिव्यधनुष्य समजावें व त्याहून कमी लांब ते मानवधनुष्य समजावें. मनुष्य आजानुबाहु--लांब हातांचा--असेल तरच तो असें लांब धनुष्य वापरूं शकेल. अशीं लांब धनुष्यें वापरणारीं माणसें म्हटलीं म्हणजे महेश्वर, परशुराम, द्रोण, अर्जुन व सात्यकि हीं होत. भगवान् रामचंद्रहि असें लांब धनुष्य वापरीत असत. कित्येकांनीं हें दिव्य धनुष्य पांच हात लांबीचें असतें असें लिहिलें आहे व परशुराम साडेचार हात लांबीचें धनुष्य वापरीत असत असें ते म्हणतात. वजनानें जड व शक्तीनें भारी अशीं धनुष्यें पण हेच आजानुबाहु लोक वापरूं शकतात.

शार्ङ्गंपुनर्धनुर्दिव्यं विष्णोः परमायुधम् ॥
वितस्तिसप्तमं मानं निर्मितं विश्वकर्मणा ॥
न स्वर्गे नच पाताले न भूमौ कस्यचित् करे ॥
तद्धनुर्वशमायाति मुक्त्वैकं पुरुषोत्तमम् ॥

अर्थ—शिंगाचें केलेलें जें धनुष्य त्याला पण दिव्य धनुष्य म्हणतात. विष्णूचें शार्ङ्ग धनुष्य सात विती म्हणजे साडेतीन हातांचें. हें विष्णूवांचून कोणीहि चालवूं शकत नाहीं.

चतुर्विंशाङ्गुलोहस्तः चतुर्हस्तं धनुःस्मृतम् ॥
तद्भवेन्मानवं चापं सर्वलक्षणसंयुतम् ॥
केषांचिच्च भवेच्चापं वितस्ति नवसंमितम् ॥

पौरुषेयं तु यच्छार्ङ्गं बहुवत्सर-
शोभितम् ।।
वितस्तिभिःसार्द्धषड्भिर्मितं
सर्वार्थसाधनम् ।।

अर्थ—चोवीस अंगुळांचा हात व चार हातांचें धनुष्य हें मानव म्हणजे मनुष्यांचें धनुष्य समजावें व तें मागें लिहिल्याप्रमाणें सर्व लक्षणयुक्त असावें. कित्येकांचें धनुष्य साडेचार हात लांबीचें असतें. मनुष्यांनीं वापरावयाचें शिंगाचें धनुष्य सव्वातीन हातांचें असतें.

अतिजीर्णमपक्कं च ज्ञातिघृष्टं
तथैव च ।।
दग्धं छिद्रं न कर्तव्यं बाह्याभ्यंतर-
हस्तकम् ।।
गुणहीनं गुणाक्रान्तं काण्डदोष-
समन्वितम् ।।
गलग्रंथि न कर्तव्यं तलग्रंथि तथैवच ।।
जामदग्न्य.

अर्थ—जामदग्न्यांनीं धनुष्याच्या कांबींत दोष सांगितले आहेत ते येणें प्रमाणें:— अतिजीर्ण, अपक्कं, ज्ञातिघृष्टं, दग्धं, छिद्रं, बाह्याभ्यन्तरहस्तकं, गुणहीनं, गुणाक्रांतं, काण्डदोष, गलग्रंथि, तलग्रंथि.

या शब्दांचा अर्थ असा आहे—

अपक्कं भङ्गमायाति चातिजीर्णं तु
कर्कशं ।।
ज्ञातिघृष्टं तु सोद्वेगं कलहो बांधवैः
सह ।।
दग्धेन दह्यते वेश्म छिद्रं युद्धविना-
शनम् ।।

बाह्ये लक्ष्यं न लक्ष्येत तथैवाभ्य-
न्तरेपि च ।।
हीने तु सन्धिते बाणे सङ्गरे
भङ्गकारकम्।।
आक्रान्ते तु पुनःक्वापि न लक्ष्यं
प्रथते दृढं ।।
गलग्रंथि तलग्रंथि पशुहानिकरं
धनुः ।।
एभिर्दोषैर्विनिर्मुक्तं सर्वकार्यकरं
स्मृतम् ।।

अर्थ--कोदण्डमण्डनकारांनीं त्यांच्या काळच्या पद्धतीप्रमाणें ही व्याख्या लिहिली आहे.

१ अतिजीर्ण- फार जून झालेला बांबू अतिशय कठिण होतो.

२ अपक्कं--फार कोवळा असलेला बांबू लवकर मोडतो.

३ दग्धं--[जळक्या बांबूनें घर जळतें] हा शिजून निघाल्यामुळें मोडावयाचा.

४ ज्ञातिघृष्टं--बांबूच्या बेटांत बांबू एकमेकांवर घासले जातात. असा घासलेला बांबू कमजोर असतो.

५ छिद्रं—बांबू किड्यांनीं भोंक पाडलेला असल्यास लवकर मोडतो. युद्धाच्या वेळीं मनांत हा मोडतो कीं काय ही चिन्ता लागून राहते. अशी चिन्ता मनांत लागून राहिली तर बाण लवकर सोडले जाणार नाहींत व यामुळें युद्ध बिघडतें.

६ बाह्याभ्यन्तरहस्तकं—धनुष्य खेंचल्यावर हात बाहेर किंवा आंत झाला तर नेम बरोबर लागत नाहीं.

७ गुणहीनं—दोरी आंखुड असली तर पूर्ण जोर लागत नाहीं

८ गुणाक्रांतं—लांब दोरीमुळेंहि जोर पुरा लागत नाहीं

९ गलग्रंथि—गळ्यापाशीं गांठ आली तर मध्यांत मोडतें.

१० तलग्रंथि—टोंकाला गांठ आली तर तेथेंच तुकडा पडतो.

या साठीं वर सांगितलेला कोणताहि दोष नसलेलें धनुष्य वापरावें.

प्रायो योज्यं धनुःशार्ङ्गं गजारोहा-
श्वसादिभिः ॥
रथिनांच पदातीनां वांशचापं
प्रकीर्तितम् ॥
कोदण्डमण्डन

अर्थ—हत्तीवरचे लोक व घोडेस्वार यांनीं शिंगाचीं धनुष्यें वापरावीं. रथी व पायदळ यांनीं वांश धनुष्य वापरावें. हा नियम साधारण मनुष्यांसाठीं आहे. विशेष वीरपुरुषांनीं आपल्या इच्छेप्रमाणें व झेपेल असें धनुष्य वापरावयास हरकत नाहीं असें प्राचीन युद्ध वर्णनांवरून दिसून येतें.

चतुर्हस्तं धनुःश्रेष्ठं त्रयः सार्द्धं तु
मध्यमम् ॥
कनीयस्तु त्रयः प्रोक्तं नित्यमेव
पदातिनः ॥
अश्वे रथे गजे श्रेष्ठं तदेव परि-
कीर्तितम् ॥
अग्निपुराण

अर्थ—चार हातांचें धनुष्य श्रेष्ठ, साडेतीन हातांचें मध्यम, व तीन हातांचें धनुष्य कनिष्ठ समजावें. पदातींनीं नेहमीं तीन हातांचें धनुष्य वापरावें व घोडेस्वार, रथी, व हत्तीस्वार यांनीं चार हातांचें धनुष्य घ्यावें असें अग्निपुराणकर्त्याचें म्हणणें आहे.

गुण—धनुष्याची दोरी.

द्रव्य—

ज्याद्रव्यं त्रितयं प्रोक्तं वंशभङ्ग-
त्वचस्तथा ॥
पट्टकौषेयकार्पाससूत्रं त्रेधावनं
स्मृतं ॥
हरिणं माहिषं गव्यं त्रेधास्नायूत्तमाः
स्मृताः ॥
लता चार्कलता मूर्वालताचौर-
मिति त्रिधा ॥
विश्वामित्र.

अर्थ—धनुष्याच्या दोरीसाठीं सूत, तांत किंवा लता यांचा उपयोग करावा. ताग, रेशीम, किंवा कापूस यांच्या सुताची दोरी करावी किंवा हरिण, म्हैस किंवा गाय यांची तांत वापरावी. तसेंच अर्कवेल, मोरवेल, व चौरवेल या वेलींचा तुकडा दोरी करतां वापरावा.

पट्टसूत्रो गुणः कार्यः कनिष्ठामान-
संमितः ॥
धनुः प्रमाणो निःसन्धिः शुद्धैः-
स्त्रिगुणतन्तुभिः ॥
वर्तितः स्याद्गुणः श्लक्ष्णः सर्वकर्म-
सहो युधि ॥
अभावे पट्टसूत्रस्य हरिणी-
स्नायुरिष्यते ॥
पक्ववंशत्वचः कार्यो गुणस्तु
स्थाविरो दृढः ॥
पट्टसूत्रेण संनद्धः सर्वकर्मसहो
युधि ॥

तत्कालहतगोकर्णचर्मणाच्छा-
गलेन वा ॥
निर्लोमतन्तुसूत्रेण कुर्याद्वा
गुणमुत्तमम् ॥
प्राप्ते भाद्रपदे मासे त्वगर्कस्य
प्रशस्यते ॥
तस्यास्तत्र गुणः कार्यः पवित्रः
स्थाविरो दृढः ॥
वृतार्कसूत्रतन्तूनां हस्तास्त्वष्टादशः
स्मृताः ॥
तद्वृतस्तद्गुणः कार्यः प्रमाणं तु
गुणे स्मृतम् ॥

जामदग्न्य.

अर्थ—तागाची करांगुलि इतकी जाड, धनुष्याच्या लांबी इतकी लांब असलेली, न सांधलेली, शुद्ध तंतूंची तिप्पट केलेली, नीट व मजबूत वळलेली, गुळगुळित, सर्व वापर सहन करणारी अशी दोरी धनुष्याकरतां तयार करावी. तागाच्या अभावीं हरिणाची तांत तसेंच गोकर्ण नांवाचा मृग व बकरा यांची तात घ्यावी. ही तांत गोकर्ण मृग किंवा बकरा यांना मारल्याबरोबर तावडतोब काढलेली असावी. जून बांबूच्या पाठीचा दोरीसाठीं उपयोग करावा. ती तागानें विणावी. तसेंच वाखाची दोरीहि गुणासाठीं वापरतात. अर्क इत्यादि सालींच्या धाग्यांची अठरा हात सुतळी बनवावी म्हणजे तिची एका धनुष्याला पुरेशी दोरी होते. प्रथम प्रथम झाडांच्या साली किंवा वेलीच धनुष्याच्या दोऱ्या म्हणून वापरीत परंतु पुढें पुढें त्यांचे धागे काढून ते नीट वळून त्यांची दोरी करण्याची चाल पडलेली दिसते.

घोषचापे क्रियाचापे युज्यते
सूत्रजो गुणः ॥
अर्कजो धर्मवद् ग्रीष्मे समये
विगुणो भवेत् ॥
स्नायूविघसवर्षासु पिच्छिलो-
न श्रमक्षमः ॥

कोदण्डमण्डन

अर्थ--अभ्यासाकरितां—नुसता आवाज करण्याकरतां सुताची दोरी घ्यावी. अर्क इत्यादि वेलींची केलेली दोरी उन्हाळ्यांत तापून जाते व त्यामुळें निरुपयोगी होते. स्नायू, तांत यांची केलेली दोरी पावसाळ्यांत बुळबुळीत होते, त्यामुळें उपयोगी पडत नाहीं म्हणून सूत किंवा रेशमाची दोरीच वापरावी. लढाईला हिंवाळ्याचे दिवस चांगले. याच महिन्यांत प्राचीनकाळीं बहुतेक युद्धें झालीं. आश्विनापासून फाल्गुनापर्यंतचा काळ लढायांना चांगला असें प्राचीनकालापासून समजत आले आहेत व ही परंपरा मराठशाहींतहि दिसून येते.

विघृष्टमसृणीभूतं गुणं भूयः
प्रमार्जयेत् ॥
अतिसूक्ष्ममतिस्थूलं ग्रंथितं ग्रंथि-
संश्लथं ॥
लोमशं पृथुपार्श्वं वा गुणं दोष-
वदुत्सृजेत् ॥

विश्वामित्र.

अर्थ--घिनघासलेली व बुळबुळीत झालेली दोरी वरचेवर धूत जावी. फार बारीक दोरी असली तर ती ताणली असतां तुटण्याचें भय असतें व तिच्यावर बाण नीट बसत नाहीं, तसेंच फार जाड दोरी चांगली ताणली जात

नाहीं. गांठ दिलेली दोरी असेल व ती ताणली तर तिचा ताण दोन्ही अंगांस सारखा बसत नाहीं. एका अंगास ताण जास्त बसल्यानें बाण तिरकस जातो. जिची गांठ ढिली झाली आहे किंवा सुटावयास आली आहे, अशी दोरी पुरा ताण घेत नाहीं; जी दोरी एका अंगाला बारीक तसेंच जिचीं सुतें सुटलीं आहेत अशा दोऱ्या अयोग्य समजाव्या. खिंड पडलेली दोरीहि टाकून द्यावी.

प्राचीनकाळीं युद्धसाहित्यांत नाना प्रकारचीं धनुष्यें, बाण, व दोऱ्या यांचा संग्रह प्रत्येक वीराबरोबर असे. कारण युद्धांत एक दोरी खराब झाली, किंवा तुटली किंवा धनुष्य तुटलें तर दुसरी वस्तु तावडतोब मिळाली पाहिजे अशी परिस्थिति असे. पूर्वी धनुष्यें व अशा दोऱ्या करण्याचे कारखानेच असत. इतकेंच नव्हे तर हीं विकणारे धंदेवाईक लोकहि होते. **शस्त्रविक्रयिकाश्चैव कर्तारश्च युधिष्ठिर** म० भा० अनु० अ० २३ असें या श्लोकावरून दिसून येतें. युद्धसामुग्रींत धनुष्यांनी भरलेले गाडे व बाणांचे गाडे सैनिकांबरोबर ठेवीत असत. या बाबतींत कौटिल्य अर्थ शास्त्र अधि० २ अ० १८ आयुधागाराध्यक्षाचें काम पहावें.

बाण.

द्रव्य—

बाणयोनिर्द्विधा प्रोक्ता शरनाराच-
संज्ञया ॥
शरो वैणवमौर्व्याख्यो नाराचो
लोहनिर्मितः ॥

विश्वामित्र.

ऋजुः सुवृत्तो मसृणः स्निग्धो
रन्ध्रविवर्जितः ॥
मानयुक्तस्तु निर्ग्रन्थिस्सतामग्रेसरः
शरः ॥
कठिनं वर्तुलं काण्डं गृह्णीयात्-
सुप्रदेशजं ॥
द्वौ हस्तौ मुष्टिना हीनौ दैर्ध्ये स्थौल्ये
कनिष्ठिका ॥

जामदग्न्य.

अर्थ—बाण दोन जिनसांचे करतात व त्यांना शर आणि नाराच असें म्हणतात. हे शर बांबू व इतर लांकूड यांचे केलेले असतात. नाराच धातूचे केलेले असतात. बाण सरळ, गोल, गुळगुळीत, चिवट, भोंक नसलेला, योग्य मापाचा, गांठ नसलेला, श्रेष्ठ पुरुषांतील मुख्यासारखा--सरळांत सरळ--असा असावा, तसेंच तो चांगल्या देशांत उत्पन्न झालेल्या कठिण लाकडाचा व गोल असा असावा. तो मुठीशिवाय दोन हात लांबीचा व करांगळीइतका जाड असावा.

फलं च शुद्धलोहस्य सुधारं तीक्ष्ण
मक्षतं ॥
योजयेद्वज्रलेपेन शरे पक्षानु
मानतः ॥

विश्वामित्र.

अर्थ—बाणास फाळ असावे, हे फाळ उत्तम पोलादाचे, उत्तम धार लावलेले, फार कठीण, व न मोडलेलें असें असावें. हें फाळ बाणाला पिसें लावतात त्यामानानें वजनाचे असतात व हे वज्रलेपानें बाणाला जोडतात.

कंक हंस शशादानां मत्स्यादक्रौंच-
केकिनां ॥

गृध्राणां कुरराणां च पक्षा एते सुशो-
भनाः ॥
षडंगुलिप्रमाणेन पक्षच्छेदं च कार-
येत् ॥
एकैकस्य शरस्यैवं चतुःपक्षान्नियोज-
येत् ॥
विश्वामित्र.

अर्थ—कंक--डोमकावळा, हंस, शशाद--बहिरीससाणा, मत्स्याद--बगळा, क्रौंच--करकोचा, केकि--मोर, गृध्र-गिधाड, कुरर-एक जातीचा करकोचा, या पाखरांचीं पिसें बाणाला लावण्याला चांगलीं समजावीं. या वांचून आणखीहि कांहीं पाखरांचीं पिसें बाणाला लावावीं. बाणाला लावावयाचें एकेक पीस सहा अंगुलें लांब असावें व दर एक बाणाला चार चार पिसें लावावीं. धनुष्या-पासून बाण सुटून तो लक्ष्याला वेधीपर्यंत मधल्या अंतरांत वाऱ्यामुळ बाण वांकडा-तिकडा होत असतो. तो असा वांकडातिकडा न व्हावा म्हणून बाणाला पिसें लावीत असतात.

दशाङ्गुलमितं पक्षं शाङ्र्गचापस्य
मार्गणे ॥
योज्या दृढाश्चतुःसंख्याः सन्नद्धाः
स्नायुतंतुभिः ॥
जामदग्न्य.

अर्थ—शार्ङ्ग धनुष्याच्या बाणाला पिसें लावावयाचीं त्या पिसांची लांबी प्रत्येकीं दहा अंगुलें असावी. हीं पिसें बाणाला स्नायूंनीं घट्ट आंवळून बांधावीं.

विरलं कोमलं जीर्णं संकीर्णं चूर्णितं
नतं ॥
बकध्वांक्षादिपक्षं च रूक्षं च
परितः क्षिपेत् ॥

अर्थ—विरल, कोवळीं, जीर्ण, तुटकीं, चुरलेलीं, वांकडीं व कठीण अशीं पिसें घेऊं नयेत. तसेंच बगळे व कावळे यांचीं पिसें बाणाला लावण्याला निरुपयोगी आहेत.

आरामुखं क्षुरप्रं च गोपुच्छं चार्द्ध-
चन्द्रकं ॥
सूचीमुखं च भल्लं च वत्सदन्तं
द्विभल्लकं ॥
कर्णिकं काकतुण्डं च तथा चान्या-
न्यनेकशः ॥
फलानि देशभेदेन भवन्ति बहुरूपतः॥

अर्थ—बाणांचे फाळ निरनिराळ्या कामा-साठीं निरनिराळे बनवितात व म्हणून त्यांच्या अनेक जाती होतात. त्यांचीं नांवें:—

१ **आरामुख**—चांभाराच्या आरीसारखी धार असलेला.
२ **क्षुरप्र**—वस्तऱ्यासारखी धार असलेला.
३ **गोपुच्छ**—गायीच्या शेपटीप्रमाणें आकार आहे असा.
४ **अर्धपुच्छ**—अर्धें शेपूट असलेला.
५ **सूचीमुख**—शेवटीं सुईसारखें टोंक असलेला.
६ **भल्ल**--भाल्यासारखें टोंक असलेला.
७ **अर्धचन्द्र**--शेवटीं अर्ध वर्तुळ फाळ असलेला.
८ **द्विभल्ल**--भाल्यासारखीं दोन टोकें शेवटीं असलेला.

९ कर्णिक--कळीप्रमाणें तोंड असलेला

१० काकतुंड--कावळयाच्या चोंची सारखा फाळ असलेला.

या शिवाय निरनिराळ्या हेतूनें निरनिराळे फाळ बनवितात व ते देशभेदानें निरनिराळे असतात.

आरामुखेन वै चर्म क्षुरप्रेण च कार्मुकं ॥
सूचीमुखेन कवचमर्द्धचन्द्रेण मस्तकं ॥
भल्लेन हृदयं वेध्यं द्विभल्लेन गुणः शरः ॥
लोहं च काककुंडेन लक्ष्यं गोपुच्छके-न च ॥

अर्थ--१ आरामुख बाण ढाल, इ. तोडावयास, २ क्षुरप्र बाण धनुष्य तोडावयास, ३ सूचीमुखबाण--कवच तोडावयास, ४ अर्धचंन्द्रबाण--मस्तक हात तोडण्यास, ५ भल्लबाण--हृदय फोडावयास, ६ द्विभल्लबाण--धनुष्याची दोरी तोडण्यास, ७ काकतुंड--धातूचा पत्रा फोडण्यास, ८ कर्णिकबाण--लोहमय बाण तोडण्यास.

याप्रमाणें विशेषेंकरून बाण वापरतात.

अन्यद्गोपुच्छकं ज्ञेयं शुद्धकाष्ठ विनिर्मितं ॥
मुखे च लोहकण्टेन विद्धं त्र्यंगुल-संमितम् ॥

अर्थ--दुसरा एक गोपुच्छबाण तयार करतात. त्याला फाळाच्या जागीं एका झाडाचा कांटा लावतात किंवा तीन अंगुलें लांब लोखंडाची सळई लावतात. या गोपुच्छ बाणानें बाण सोडण्याचा अभ्यास करतात किंवा निशाणबाजीचा अभ्यास करतात.

शरश्च त्रिविधो ज्ञेयः स्त्री पुमांश्च नपुंसकः ॥
अग्रेस्थूलो भवेन्नारी पश्चात्स्थूलो भवेत्पुमान् ॥
समो नपुंसको ज्ञेयः तल्लक्ष्यार्थं प्रशस्यते ॥
दूरपातो युवत्याच पुरुषो भेदये दृढम् ॥

अर्थ--बाणांचे पुरुष, स्त्री व नपुंसक असे तीन प्रकार म्हणजे ओळखण्याचीं लक्षणें आहेत. जो बाण मागें जाड होत जातो तो पुरुष, पुढें जाड होत जातो तो स्त्री व जो सारखा असतो तो नपुंसक समजावा. कठिण-वस्तु फोडण्यास पुरुषबाण घ्यावा, दूर अंतरावर लक्ष्यवेध करण्यास स्त्रीबाण घ्यावा, व नपुंसक बाण केवळ लक्ष्यवेध करतांना वापरावा.

बाणांच्या फाळाला धार द्यावी लागते त्याची कृति—

पिप्पली सैन्धवी कुष्टं गोमूत्रेण च-पेषयेत् ॥
अतिशीतमनाविद्धं पीतं नष्टं तथौषधम् ॥
अनेन लेपयेत् फालं लिप्तं चाग्नौ-प्रतापयेत् ॥
ततो निर्वापितं तैले पायितं-तद्विशिष्यते ॥

विश्वामित्र.

पंचभिर्लवणैः पिष्टं मधुसिक्तैः ससर्षपैः ॥
एभिः प्रलेपयेत् शस्त्रं लिप्तं चाग्नौ प्रतापयेत् ॥

शिखिग्रीवानुवर्णाभं तप्तपीतं
तथौषधं ॥
ततस्तुविमले तोये पाययेत्
शस्त्रमुत्तमम् ॥

जामदग्न्य.

अर्थ-पिंपळी, सैंधवी व कुष्ट हीं गोमूत्रांत वाटावीं व गार असतांनाच सगळीं खलून एक जीव करावीं. मग या मिश्रणानें फाळ सारवावा व विस्तवांत घालून तापवावा; नंतर बाहेर काढून तेलांत विझवावा म्हणजे उत्तम पाणी येतें.

पंचलवणें-सैंधव, बिडलोण, संवळखार, टाकणखार, व समुद्रमीठ-बारीक खलावीं व व त्यांत सर्षप व मध घालून एक जीव करावा. नंतर या लेपानें फाळ सारवावा आणि विस्तवांत घालून तापवावा व औषध जळूं द्यावें. मोराच्या मानेसारखा तो निळा झाला म्हणजे स्वच्छ पाण्यांत बुडवावा म्हणजे त्यास उत्तम पाणी येतें.

बाणाचे दोष.

जीर्णो विदीर्णः शीर्णत्वक् पादहीनोऽनृ
जुर्व्रणी ॥
स्थूलोऽतिसूक्ष्मः क्षीणश्च सर्वे दोषकराः
शराः ॥

विश्वामित्र.

स्थूलं नातिसूक्ष्मं च नापकं न कुभू-
मिजम् ॥
हीनग्रंथि विपक्कंच पांडुरं समयाऽऽ
हृतम् ॥
स्थूलग्रंथिविदीर्णं च वर्जयेदीदृशं
शरम् ॥

जामदग्न्य.

अर्थ-जीर्ण झालेला, फुटलेला साल निघालेला, लांबीला कमी असलेला, सरळ नसलेला, भोंकें पडलेला, जाड, फार बारीक, झिजलेला असें बाण वाईट समजावे. बाण फार जाड असूं नये, फार बारीक असूं नये, वाईट जमिनींत वाढलेला असूं नये, त्याची गांठ फुटलेली नसावी, तो फार पिकलेला नसावा. पांढरा नसावा, आयत्या वेळीं तयार केलेला नसावा, त्याचें पेर जाड नसावें, तो फुटलेला किंवा पिचका नसावा, असे बाण वापरण्याला चांगले नव्हेत. बाणांसाठीं वांबू तोडावयाचे ते कार्तिक वद्य पक्षांत तोडावे म्हणजे ते किडत नाहींत. "शरवंशा ग्रहीतव्या शरत्काले च पार्थिव ॥" याप्रमाणें बाण वापरावयाचे ते चांगले पाहून वापरावे.

सुस्निग्धकोमलं लोहं अभंग सुदृढं
च यत् ॥
द्वि द्वि हस्ताश्च नाराचाः कनिष्ठामान
स्थूलतः ॥

विश्वामित्र

सर्वलोहास्तु ये बाणा नाराचास्ते
प्रकीर्तिताः ॥
पंचभिः पृथुलैः पक्षैर्युक्ताः सिध्यंति
सर्वदा ॥

जामदग्न्य

अर्थ-चिवट, कोवळें, न फुटलेलें, व मजबूत लोखंड घेऊन त्याचे करंगुळीइतक्या जाडीचे दोन दोन हातांचे तुकडे केले म्हणजे

नाराच बाण होतात. हे नाराच बाण सबंध लोखंडाचे असावे व त्यांना पांच पांच मोठीं पिसें लावावीं. कठीण वस्तु या नाराच बाणांनींच फोडतां येतात.

नालीका लघवो बाणा मंत्रशक्त्या
प्रचोदिताः ॥
अत्युच्चदूरपातेषु दुर्गयुद्धेषु
संमताः ॥
जामदग्न्य.

अर्थ—नालीक बाण हे पोकळ व हलके असतात, मंत्रशक्तीनें यांना प्रेरणा देतां येते. धनुष्यानेंच हे बाण सोडले जातात. या बाणांत स्फोटक द्रव्यें असतात. दूर अंतरावर, फार उंचावर किंवा किल्ल्यांत टाकण्यांत यांचा उपयोग होतो.

लघुता दृढता चैव तथा खर-
तरास्यता ॥
बाणानामिति निर्दिष्टो भूभुजां
गुणसंग्रहः ॥
शरभल्लौ खरतरौ लघुदृढ-
शरौमतौ ॥
अर्धचंद्रस्तु कथितो लघु
तीव्रताननः ॥
नाराचस्तु शिरालःस्यातीक्ष्णाग्रः
कर्कशाग्रकः ॥
शक्तियष्ट्यादयो येऽन्ये ते तीक्ष्णाग्राः
प्रतिष्ठिताः ॥
युक्तिकल्पतरु.

अर्थ—बाणामध्यें तीन प्रमुख गुण पाहिजेत. हलका, मजबूत, व तीक्ष्ण धारेचा. या गुणांवरून बाणांचीं नावें ठरविलीं आहेत.

१ **शर**—वजनाला हलका व धारेनें तीक्ष्ण.
२ **भल्ल**—वजनाला जड व तीक्ष्ण धारेचा.
३ **अर्धचन्द्र**—हा हलकाच असतो व धार फार तीक्ष्ण असते. याचा फाळ अर्ध चंद्रासारखा असतो.
४ **नाराच**—हा जड असतो, याला " शिरा " म्हणतात. हा फार तीक्ष्ण व अत्यंत मजबूत असतो.
५ **शक्ति**—ही नाराचापेक्षां जड असते पण नाराचा इतकी कडक नसते.
६ **यष्टि**—ही हलकीच असते व ही पोकळ असून हिच्यामध्यें विष असतें, तें जखमेंत उतरतें.

ज्याप्रमाणें शक्ति, यष्टि इत्यादिकांमध्यें विष असतें त्याप्रमाणें बाणांच्या फाळाला बाहेरून विष लावीत असत. " शरवंशा " वनस्पतीवर स्वाती नक्षत्राचें पाणी पडलें म्हणजे ती वनस्पति पिवळी होते व हिचें मूळ विषारी होतें. मुळांत विष उत्पन्न झालें म्हणजे ती वनस्पति नेहमीं हालत असते ही त्याची खूण आहे. या वनस्पतीच्या मुळाचा लेप फाळाला लावला म्हणजे बाण विषारी होतो.

बाणांच्या गुणांप्रमाणें बाणांचीं कर्मेंहि सांगितलीं आहेत—

बाणमोक्षो धनुः कर्म बाणकर्म च
वेधनं ॥
छेदनं भेदनं चैव व्यूहनं ताडनं
तथा ॥

कौटि० अधि० २ अ० १८ भट्टस्वामी.

धनुष्याचें कर्म एकच, बाण सोडणें.
१. **छेदनं**—कापणें—तुकडा पाडणें. २. **भेदन**

–भेद करणें. ३. व्यूहन–एका पाठीमागून एक बाण सोडणें व एक रांग उत्पन्न करणें इत्यादि. ४. ताडन–रक्तबंबाळ करणें. हींच तीं बाणाचीं कर्मे होत.

स्थान–पवित्रा.

स्थानान्यष्टौविधेयानि योजने
भिन्नकर्मणां ॥
मुष्टयः पञ्च समाख्याताः व्यायाः
पञ्च प्रकीर्तिताः ॥

विश्वामित्र.

अर्थ–धनुष्य चालवितांना निरनिराळ्या पद्धतीनें शरिराची हालचाल करावी लागते म्हणजे विशिष्ट पद्धतीनें उभें राहणें, वांकणें इत्यादि प्रकार करावे लागतात त्यांना स्थान किंवा पवित्रा म्हणतात, कोणी बैठक असेंहि म्हणतात. असे पवित्रे आठ आहेत. धनुष्याची दोरी पकडण्याचे प्रकार पांच आहेत व धनुष्याची कांब धरण्याचे प्रकार पांच आहेत.

पवित्रे.

१ आलीढ—

आलीढे तु प्रकर्तव्यं सव्यं चैवानु
कुञ्चितम् ॥
दक्षिणं तु पुरस्ताद्वा दूरपाते
विशिष्यते ॥

डावा पाय ताठ पुढें व उजवा पाय मागें मोडलेला व दोन पायांत अंतर दोन हात. अग्निपुराणमतानें अडीच हात–असावें.

२ प्रत्यालीढ—

एतदेवविपर्यस्तं प्रत्यालीढ मिति
स्मृतम् ॥
तिर्यग्भूतो भवेद्वामो दक्षिणोपि
भवेदृजुः ॥

उजवा पाय ताठ पुढें व डावा जरा मोडून मागें, हे दोन्ही पवित्रे दूर अंतरावर बाण मारतांना करतात.

३ विशाख—

पादौ सविस्तरौ कार्यौ समौ हस्त-
प्रमाणतः ॥
विशाखस्थानकं ज्ञेयं कूटलक्ष्यस्य
वेधने ॥

एक हात अंतरावर दोन्ही पाय सारखे ठेवणें हा विशाख पवित्रा होय. या पवित्र्यावर उभें राहून बारीक लक्ष्यवेध करतात. अग्नि-पुराणमतानें या पवित्र्याचें अंतर दीड हात असावें.

४ समपाद—

अंगुष्ठगुल्फपाण्यंघ्र्यः श्लिष्टाः स्युः
सहिता यदि ॥
दृष्टं समपदं स्थानमेतल्लक्षणतस्तथा ॥

दोन्ही पाय टेकून सारखें उभे राहणें.

५ दर्दुरक्रम—

आकुञ्चितोरू द्वौयत्र जानुभ्यां
धरणिं गतौ ॥
दर्दुरक्रममित्याहुःस्थानकं दृढभेदने ॥

दोन्ही गुडघे जमिनीला टेकून खोटेवर शरीर टेकणें, हा पवित्रा कठिण वस्तु फोड-ण्याच्या वेळीं करतात.

६ गरुडक्रम—

सव्यं जानुगतं भूमौ दक्षिणं च
सुकुञ्चितं ॥

अग्रतो यत्र दातव्यं तं विद्याद्
गरुडक्रमम् ॥

उजवा गुडघा जमिनीवर ठेवावा व डावा पाय मागें मोडलेला असावा.

७ असमपाद—

स्थापनीयौ समौ पादौ निष्कंपौ च
सुसंगतौ ॥
असमे च पुरोवामे हस्तमात्र-
नतं वपुः ॥

एक पाय जरा पुढें ठेवावा व दुसरा जरा मागें ठेवावा.

८ पद्मासन—

पद्मासनं प्रसिद्धं तु चोपविश्य
यथाक्रमम् ॥
धन्विनां तत्तु विज्ञेयं स्थानकं
शुभ लक्षणम् ॥

एक गुडघा उभा व दुसरा खुरमांडी घालून बसल्याप्रमाणें. कित्येकांनीं पद्मासनाच्या ऐवजीं वीरासन शब्द या आसनाला लाविला आहे.

या शिवाय आणखी सहा पवित्रे सांगितले आहेत ते असे.

१ मंडल—

हंसपङ्क्तयाकृतिसमे दृश्येते यत्र
जानुनी ॥
चतुर्वितास्ति विच्छिन्ने तदेतन्मण्डलं
स्मृतम् ॥

२ जात—

गुल्फौ पार्ष्णिग्रहौचैव स्थितौ
पंचागुलान्तरौ ॥
स्थानं जातं भवेदेतद्वादशाङ्गु-
लमायतम् ॥

३ दण्डायत व विकट—

अथवा दक्षिणं जानु कुब्जं भवति
निश्चलम् ॥
दण्डायतो भवेदेव चरणःसह
जानुना ॥
एवं विकटमुद्दिष्टं द्विहस्तान्तर-
मायतम् ॥

४ संपुट—

जानुनी द्विगुणे स्यातामुत्तानौ
चरणावुभौ ॥
अनेन विधियोगेन संपुटं परिकीर्ति-
तम् ॥

५ स्वस्तिक—

किञ्चिद्विवर्तितौ पादौ समदण्डायतौ
स्थिरौ ॥
दृष्टमेव यथान्यायं षोडशाङ्गुल-
मायतं ॥
स्वस्तिकेनात्र कुर्वीत प्रणामं प्रथमं
द्विज ॥

६ गुणमुष्टि—

धनुष्याची दोरी खेंचण्याकरितां जी मूट बांधली जाते व दोरी पकडली जाते त्या मुठीला गुणमुष्टि म्हणतात. मुठीला मुद्रा असेंहि म्हणतात.

१ पताका—

दीर्घा तु तर्जनीयत्र आश्रितोऽङ्गुष्ठ
मूलकम् ॥

पताका सा च विज्ञेया नलिका दूर मोक्षणे ॥

आंगठ्याच्या बुडाला तर्जनीचें टोक लावणें, दूर अंतरावर बाण मारण्यासाठीं हिचा उपयोग होतो.

२ वज्रमुष्टि--

तर्जनी मध्यमामध्यमंगुष्ठो विशते यदि ॥
वज्रमुष्टिस्तु सा ज्ञेया स्थूले नाराच-मोक्षणे ॥

आंगठ्याचें टोक तर्जनी व मध्यमा यांच्या मध्यांत लावणें; ही मूठ नाराच बाण जोरानें मारण्याकरितां.

३ मत्सरी--

अङ्गुष्ठनखमूले तु तर्जन्यग्रं च संस्थितम् ॥
मत्सरी साच विज्ञेया चित्रलक्ष्यस्यवेधने ॥

आंगठा व तर्जनी यांची चिमटी चमत्कारिक लक्ष्य वेधण्याकरितां.

४ काकतुण्डी—

अङ्गुष्ठाग्रे तु तर्जन्या मुखं यत्र निवेशितम् ॥
काकतुण्डी च सा ज्ञेया सूक्ष्मलक्ष्ये नियोजिता ॥

तर्जनी, मध्यमा व आंगठा यांची चिमटी. बारीक लक्ष्य वेधण्यासाठीं.

५ सिंहकर्ण—

अङ्गुष्ठमध्यदेशं तु तर्जन्यग्रं सुसंस्थितम् ॥
सिंहकर्णः स विज्ञेयो दृढलक्ष्यस्य वेधने ॥

तर्जनी, अनामिका व आंगठा यांची चिमटी. नेहमीं उपयोगांत आणावयाची मूठ.

धनुर्मुष्टिसंधान.

धनुष्याची कांब धरण्याचे तीन प्रकार आहेत

सन्धानं त्रिविधं प्रोक्तमधऊर्ध्वं समं सदा ॥
योजयेत् त्रिप्रकारं हि कार्येष्वपि यथाक्रमम् ॥

१ अधः—अधश्चदूरपातित्वे--चिमटी पासून बाण उतरता धरणें, दृढवधाकरितां.

२ सम—समेलक्ष्येसुनिश्चले--चिमटीपासून बाण सारखा धरणें, सामान्य कामाकरतां.

३ ऊर्ध्व—

दृढस्फोटं प्रकुर्वीत ऊर्ध्वं सन्धान-योगतः ॥

चिमटीपासून कांबीपर्यंत बाण चढता धरणें, कठिण वस्तु फोडण्यासाठीं. कित्येक दूर वेधासाठीं असेंहि ह्मणतात.

जमदग्नींनीं कांब धरण्याचे पांच प्रकार सांगितले आहेत. वरील तीन प्रकार व आणखी दोन, निरंगुष्ठा व श्लथा; तसेंच "सम" याला "स्तनस्थान" असें नांव त्यांनीं दिलें आहे.

निरंगुष्ठा—आंगठा कांबीला न लावणें. सूक्ष्मवेधासाठीं याचा उपयोग होतो.

श्लथा—मुठीमध्यें कांब ढिली धरणें. चित्रवेधासाठीं. या स्थानाला ठाण मांडणें असें कित्येकांनीं म्हटलें आहे.

सन्धान—नेम धरणें इत्यादिकांचा अभ्यास.

समेगुप्ते शुचिस्थाने स्थानमालीढ-
मास्थितः ॥
प्राङ्मुखःस्थिरवाँङ्गोऽर्वाङ्मुख-
उदङ्मुखः ॥
दूरेस्त्रस्तांशु युगुलः सरलं गल-
मुद्वहन् ॥
गुरूपदिष्टमार्गेण शरसन्धान-
मभ्यसेत् ॥

विश्वामित्र.

अर्थ—शुद्ध व संरक्षित अशा पटांगणावर आलीढ पवित्र्यावर उभें राहून, पूर्व, पश्चिम किंवा उत्तरेकडे तोंड करून, दोन्ही बाहू नीट पसरून, मान व डोकें सरळ ठेवून, गुरुजींनीं सांगितलेल्या पद्धतीप्रमाणें बाण मारण्याचा अभ्यास ठेवावा.

श्रमेणास्खलितं लक्ष्यं दूरं च
बहुभेदनम् ॥
श्रमेणास्खलिता कृष्टिः शीघ्र-
सन्धानमाप्यते ॥
श्रमेणचित्रयोधित्वं श्रमेण
प्राप्यते जयः ॥
तस्माद्गुरुसमक्षं च श्रमः कार्यो
विजानता ॥

विश्वामित्र.

अर्थ—बाण मारण्याचा नेहमीं अभ्यास ठेवला म्हणजे नेम चुकत नाहीं, लांब पल्ल्यावर जोरानें बाण मारतां येतो, धनुष्य बिनचुक ओढतां येतें व लवकर नेम मारतां येतो, नाना प्रकारचें कौशल्य अंगीं येतें, विजय मिळतो म्हणून विद्यार्थ्यानें गुरुजींच्या देखरेखीखालीं अभ्यास करावा.

प्रथमं वामहस्तेन यः श्रमं
कुरुते नरः ॥
तस्यचापक्रियासिद्धिरचिरेणैव
जायते ॥
वामहस्ते तु संसिद्धे पश्चाद्दक्षिण-
मारभेत् ॥
उभाभ्यां च श्रमंकुर्यान्नाराचैश्च
शरैस्तथा ॥

विश्वामित्र.

अर्थ—जो विद्यार्थी प्रथम डाव्या हातानें बाण मारण्याचा अभ्यास करतो त्याला बाण लवकर मारतां येतात. डाव्या हातानें बाण मारणें म्हणजे डाव्या हातांत धनुष्य धरणें. मनुष्य ज्या हातांत धनुष्य धरतो म्हणजे धनुष्याची कांब धरतो, त्या हातानें तो बाण मारतो असें म्हणतात. डाव्या हातानें बाण मारण्याचा अभ्यास झाला म्हणजे उजव्या हातानें अभ्यास करावा. दोन्ही हातांनीं **शर** व **नाराच** हे दोनहि प्रकारचे बाण मारण्याचा अभ्यास ठेवावा.

प्रथमं चापमारोप्य चुल्लिकां बंधये-
त्ततः ॥
स्थानकं तु ततः कृत्वा सन्धानं तु
ततः परं ॥
सकृदाकृष्ट चापेन भूमिस्पर्शं न
कारयेत् ॥
नमः कुर्यात् शिवं विघ्नराजं गुरुं
धनुः शरान् ॥

विश्वामित्र.

अर्थ—अभ्यास करतांना पहिल्यानें धनुष्य घ्यावें, व त्याला दोरी लावावी, नंतर पवित्र्यावर उभें राहावें, आणि नेम धरावा. एकदां धनुष्य

ओढलें म्हणजे तें जमिनीला टेकूं नये. धनुष्य ओढण्यापूर्वी शंकर, गणपति, धनुष्य व बाण यांना नमस्कार करावा.

तोलनं धनुषश्चैव कर्तव्यं वाम-
पाणिना ॥
आदानं च ततः कृत्वा सन्धानं तद-
नंतरम् ॥
गुरोराज्ञा याचितव्या बाणस्याकर्षणं
प्रति ॥
प्राणवायु प्रयत्नेन हृदये च प्रपूरयेत् ॥
कुम्भकेन स्थिरं कृत्वा रेचकेन विस-
र्जयेत् ॥
इत्यभ्या स क्रिया कार्या धन्विना
सिद्धिमिच्छिता ॥

विश्वामित्र.

अर्थ—डाव्या हातानें धनुष्याची कांब तोलून धरावी, उजव्या हातानें बाण घ्यावा व नेम धरावा. बाण धनुष्याला लावून ओढण्यापूर्वी गुरुजींची आज्ञा घ्यावी. मग श्वास आंत ओढावा, शिस्त लावतांना श्वास कोंडावा, व श्वास सोडतांना बाण सोडावा. याप्रमाणें धनुष्य व बाण उत्तम चालवितां येण्याकरतां विद्यार्थ्यानें सतत अभ्यास करावा.

षण्मासात्सिध्यते मुष्टिः शराः संव-
त्सरेण च ॥
नाराचास्तस्य सिद्ध्यन्ति यस्य तुष्टो-
महेश्वरः ॥
पुष्पवद्धारयेद्बाणं सर्पवत्पीडयेद्धनुः ॥
धनवच्चिन्तयेल्लक्ष्यं यदीच्छेत्सिद्धि-
मात्मनः ॥
उदिते भास्करे लक्ष्यं पश्चिमायां
निवेशयेत् ॥
अपराण्हेच कर्तव्यं लक्ष्यं पूर्व-
दिगाश्रितम् ॥
उत्तरेण सदा कार्यमवश्यमव-
रोधकम् ॥

विश्वामित्र.

अर्थ—सहा महिने अभ्यास करावा तेव्हां धनुष्य व बाण नीट धरतां येतो व एक वर्ष अभ्यासानें बाण निशाणाला बरोबर लागतो. नाराच बाण लक्ष्य वेधून जाणें हें महादेवाच्या कृपेनेंच साधतें. हातांत बाण धरणें तो फुलांसारखा हलकें धरावा. धनुष्य धरणें व ओढणें तें सापाच्या नरड्याप्रमाणें घट्ट धरावें. धनुष्य हाललें तर बाण लक्ष्याला बरोबर लागत नसतो. लक्ष्याकडे नजर ठेवणें तें कृपण मनुष्य जसें नेहमीं धनाकडे लक्ष ठेवतो त्याप्रमाणें एकाग्र दृष्टीनें लक्ष लावावें. इतकी मेहेनत करावी तेव्हां बाण मारण्यांत सिद्धि मिळते व आजपर्यंतचे प्रसिद्ध धनुर्धर याच मार्गानें गेले आहेत. सकाळपासून दुपार-पर्यंत अभ्यासाच्या वेळीं लक्ष्य पश्चिमेला असावें व दुपारीं, मधल्यावेळीं, व संध्याकाळीं लक्ष्य पूर्वेकडे असावें. नेहमीं अभ्यासाकरितां लक्ष्य उत्तरेकडे ठेवावें व अभ्यास करावा.

कूटभूमिस्त्रिधाप्रोक्ता त्रि षट्
द्वादशकार्मुका ॥
पूर्वां पूर्वां विजित्यैतामाश्रये-
दुत्तरोतरम् ॥
कूटे सिद्धे च सिद्ध्यन्ति दूरदृढ-
समानि च ॥

विश्वामित्र.

अर्थ—बाण मारण्याचा अभ्यास करतांना प्रथम अंतर तीन धनुष्यें म्हणजे बारा हात

ठेवावें, म्हणजे बारा हातांवर वेध करावा. हा नेम बरोबर मारतां आला म्हणजे चोवीस हातांवर नेम मारावा व मग अठ्ठेचाळीस हातांवरून नेम मारावा. इतका अभ्यास चांगला झाला म्हणजे दूर अंतरावर बाण मारतां येतो, जोरानें बाण मारतां येतो व साधारण बाण पण मारतां येतो.

शलाकापातनाभ्यासं कुर्याद्दाण-
विशुद्धये ॥
ज्याघातमाचरेन्नित्यं मुष्टिसन्धान-
सिद्धये ॥
यःश्रमो दशभिःकाण्डैः स स्यादेक
शलाकया ॥
शलाकादशभिश्चैव एको ज्याघात-
घातने ॥

विश्वामित्र.

अर्थ—प्रथम नुसत्या काड्या मारण्याचा अभ्यास ठेवावा म्हणजे बाणांचा नेम मारतां येतो. धनुष्य नीट धरतां यावें याकरतां नुसती दोरी ओढून हळुं हळुं सोडणें असा अभ्यास करावा. दहा बाण मारण्यानें जें कौशल्य येतें तें एक काडी मारण्यानें येतें व दहा काड्या मारण्यानें जें कौशल्य येतें तें एक दोरी धरल्यानें येतें.

तिसृभिश्चांगुलीभिश्च चालना मूल-
पर्वभिः ॥
आकृष्य धनुराकर्णं कनिष्ठान्तं
निपीडितम् ॥
अङ्गुलीभिश्चतसृभिर्विशेषेण-
कनिष्ठया ॥
निपीड्यगुणमोक्षो यो व्यवच्छेदः
स उच्चते ॥

जामदग्न्य.

अर्थ—तीन अंगुळांचीं मुळें व पेरें यांनीं चाळवून करंगुळीनें नीट धनुष्य दाबून धरून ओढणें व चार बोटांच्या चिमटींत बाण व दोरी धरून कानापर्यंत ओढणें व झटकन् बाण व दोरी सोडणें याला "व्यवच्छेद" असें म्हणतात. धनुष्य चार हात लांब असतें व दोरीहि चार हात असते. धनुष्य मध्यांत धरून ओढलें म्हणजे धनुष्याचें दोन हातांचें वर्तुळ होतें. खांद्यापासून बोटांपर्यंत हातांची लांबी दोन हातांला कमी आहे व यासाठीं बाण कानापर्यंत ओढला म्हणजे धनुष्याचें नीट वर्तुळ होतें व बाणाला खूब जोर येतो. धनुष्य यापेक्षां कमी ओढलें तर जोर कमी होतो व जास्त ओढलें तरी जोर कमी होतो. धनुष्य कमी ओढलें तर त्याचा ताण कमी पडतो हें सहज लक्षांत येतें पण धनुष्य जास्त ओढलें असतां जोर कमी कसा होतो हें समजून घेतलें पाहिजे. धनुष्याची दोरी चार हातांची असल्यानें दोन हातांपेक्षां जास्त त्रिज्येचें वर्तुळ केलें म्हणजे धनुष्याच्या कांबीचा कांहीं भाग त्रिज्येंत येतो व यामुळें कांबींतील ताणांत दोन प्रकार होतात. जोर देणाऱ्या कांबीची लांबी कमी होते व बाणाला शक्ति कमी लागते. याकरतां जास्त शक्ति यावी म्हणून जास्त लांब धनुष्यें वापरतात, पण अशीं धनुष्यें वापरण्याकरतां हात लांब पाहिजेत. धनुष्याच्या काळांत आजानुबाहु माणसाचें महत्व यामुळेंच होतें.

अंगुलं चांगुलार्धं वा तदर्धं वा
पराङ्मुखं ॥
कर्णान्ताद्गुणमाकृष्य विमोक्षः
तेजनं स्मृतं ॥
ऊर्ध्वाधो दृढलक्ष्येषु समे दूरे
तथैव च ॥
कर्णे वा कर्णमध्ये वा कर्णान्ते
स्थापयेत् करं ॥
पूरके पूरयेद् बाणं कुम्भकेन च
लक्षयेत् ॥
मुक्तो रेचकयोगेन खगः सिद्धिं
परां व्रजेत् ॥

जामदग्न्य.

अर्थ–धनुष्याची दोरी मागें ओढल्यावर तिच्यामध्यें जोर येण्यासाठीं ती पाव किंवा अर्धें किंवा एक अंगुल मुरडावी. अशा रीतीनें जास्त शक्ति आणण्याला " तेजन " म्हणतात. बाण सोडावयाचा तो वर, खालीं, समोर इत्यादि कोणत्याहि लक्ष्यावर बाण सोडणें असलें तरी कानाजवळ–मग एका कडेला, मध्यें, किंवा पलीकडच्या कडेपर्यंत–ओढावा. बाण धनुष्याला लावतांना पूरक करावा, नेम धरतांना कुंभक करावा व बाण सोडतांना रेचक करावा ह्मणजे बाण बरोबर लागतो.

हिंदूंच्या प्रत्येक बाबतींत प्राणायामाची जोड आहे; साष्टांग नमस्कारांत, धनुर्विद्येंत, माप घालण्यांत व वांकून ताठ होण्यांत प्राणायामाचा (पूरक, कुंभक व रेचक यांचा) उपयोग पद्धतशीर सांगितला आहे.

लक्ष्यं चतुर्विधं प्रोक्तं स्थिरं चैव
चलं तथा ॥
चलाचलं द्वयचलं वेधनीयं
क्रमेण तत् ॥

जामदग्न्य.

अर्थ--ज्याला बाण मारावयाचा तें लक्ष्य चार प्रकारचें असतें. त्याला स्थिर, चल, चलाचल, द्वयचल असें म्हणतात.

स्थिर—

आत्मानं सुस्थिरं कृत्वा लक्ष्यं
चैव स्थिरं बुधः ॥
वेधयेत् त्रिप्रकारं तु स्थिरवेधी
स उच्यते ॥

जेथें बाण मारणारा एका जागीं निश्चल उभा असतो व लक्ष्यहि निश्चल असतें अशा लक्ष्याला " स्थिरलक्ष्य " म्हणतात व अशा स्थिर लक्ष्यावर बाण मारणारा " स्थिरवेधी म्हटला जातो.

चल—

चलं तु वेधयेद्यस्तु आत्मस्थानेषु
संस्थितः ॥
चलं लक्ष्यं तु तत्प्रोक्तमाचार्येण
सुधीमता ॥

बाण मारणारा एका जागीं स्थिर असतो व लक्ष्य चल म्हणजे चालतें असतें किंवा हालणारें असतें. अशा लक्ष्याला " चल लक्ष्य " म्हणतात व अशा लक्ष्यावर बाण मारणाऱ्याला " चलवेधी " म्हणतात.

चलाचल—

धन्वी तु चलते यत्र स्थिरलक्ष्ये
समाहितः ॥
चलाचलं भवेत्तच्च ह्यप्रमेयम-
निन्दितम् ॥

बाण मारणारा चालत असतो किंवा वाहनांचा उपयोग करीत असतो म्हणजे तो चल असतो व लक्ष्य स्थिर असतें त्याला " चलाचल " लक्ष्य म्हणतात व अशा बाण मारणाऱ्याला " दूरवेधी " म्हणतात.

द्वयचल —

उभावेव चलौ यत्र लक्ष्यं चापि धनुर्धरः ॥
तद्विज्ञेयं द्वयचलं श्रमेणैव हि साध्यते ॥

जेथें बाण मारणारा व लक्ष्य दोघेहि चल असतात त्या लक्ष्याला " द्वयचल " म्हणतात व अशा बाण मारणाराला " दृढवेधी " म्हणतात. अशा चल लक्ष्यावर बऱ्याच अभ्यासानें बाण मारतां येतो.

अभ्यास करण्याच्या जागीं जें कूटलक्ष्य असतें त्याला " स्थिरलक्ष्य " म्हणतात. एका जागीं उभे राहून उडतीं पाखरें किंवा धावणारा "हरिण" इत्यादि मारणें हें "चललक्ष्य" होय. किल्ल्यावरील निशाण किंवा शत्रूचा सेनापति इत्यादिकांवर नेम मारणें याला " चलाचल " लक्ष्य म्हणावें. चालत्या रथांत बसून किंवा घोड्यावरून हरिण, शिकार इत्यादिकांचा पाठलाग करीत असतांना नेम मारणें याला " द्वयचल लक्ष्य " म्हणतात.

लक्ष्यं तु पुरुषोन्मानं कुर्याच्चन्द्रकसंयुते ॥

अर्थ—अभ्यासाकरतां लक्ष्य स्थापन करावयाचें तें पुरुषाइतकें उंच असावें व तें चौकोनी असावें. या लक्ष्याच्या [टारजेट] मध्यभागीं सोळा अंगुळें व्यासाचा चंद्र असावा, त्याला काळा रंग द्यावा. या चंद्राबाहेर एक वर्तुळ असावें, या वर्तुळाबाहेर आणखी एक वर्तुळ असावें. लक्ष्याचा रंग पांढरा असावा, बाहेरच्या दोनहि वर्तुळांची कडा काळी करावी. याप्रमाणें बाहेरचें मोठें वर्तुळ, त्याच्या आंत दुसरें वर्तुळ, व मध्यावर चंद्र अशा लक्ष्य मारण्याच्या तीन जागा तयार होतात.

ऊर्ध्वभेदी भवेज्ज्येष्ठो नाभिभेदी च मध्यमः ॥
यःपादवेधी लक्ष्यस्य स धन्वी चाधमः स्मृतः ॥

विश्वामित्र.

अर्थ—जो धनुर्धारी चांदाच्या मध्यावर बाण मारील तो श्रेष्ठ समजावा, मधल्या वर्तुळांत बाण मारील तो मध्यम होय व जो मोठ्या वर्तुळांत बाण मारील तो कनिष्ठ असें म्हणतात. कित्येकांनीं हें लक्ष्य पुरुषाकार मानून तशी वरील श्लोकाची व्याख्याहि दिली आहे.

षष्टिधन्वन्तरे लक्ष्यमुत्तमं परिकीर्तितम् ॥
चत्वारिंशन्मध्यमं च विंशतिश्च कनिष्ठकम् ॥
शराणां कथितं ह्येतन्नाराचाणामथोच्यते ॥
चत्वारिंशच्च त्रिंशच्च षोडशं च भवेत्तथा ॥

विश्वामित्र.

अर्थ—बाण मारणें तो साठ धनुष्यें अंतरावरून मारावा. हें अंतर उत्तम होय. एक धनुष्य म्हणजे चार हात, साठ धनुष्यें म्हणजे दोनशें चाळीस हात म्हणजे एकशें वीस यार्ड

अंतर होतें. चाळीस धनुष्यांवरून मध्यम व वीस धनुष्यें हें मान कनिष्ठ होय. नाराच बाण मारणें तो चाळीस धनुष्यांवरून उत्तम, तीस धनुष्यांवरून मध्यम, व सोळा धनुष्यांवरून कनिष्ठ होय.

इह शतद्वितयं धनुषामिषोर्भवति
दूरगतेःपरमावधिः ॥
अधिकविंशतिकं धनुषः शतं इति
अयोमय बाणगतिःपरा ॥

कोदण्डमण्डन.

अर्थ—शर-बाण-फार लांब मारला तर तो दोनशें धनुष्यें अंतरावर जातो. हें अंतर म्हणजे शर लांब जाण्याची अगदीं सीमा झाली व एकशें वीस धनुष्यें म्हणजे नाराच बाणांची लांब जाण्याची पराकाष्ठा झाली. तात्पर्य दोनशें धनुष्यें ही बाण लांब जाण्याची अगदीं कडेलोट झाली. यापेक्षां जास्त अंतरावर बाण मारल्याची हकीकत हा अर्थवाद समजावा असें कोदण्डमण्डनकार म्हणतात. इग्लंडमध्यें बाण जास्त अंतरावर जाण्याचें प्रमाण ४०० यार्ड होतें व कमी अंतर २५० यार्ड समजलें जात असे. सन १७९४ साली तुर्की वकिलानें लंडन शहरांत ४८४ यार्ड अंतरावर लक्ष्य वेध करून दाखविला व सुलतान तर ८०० यार्ड अंतरावर बाण सोडतो असें त्यानें सांगितलें. अर्जुनाचे बाण कोसभर लांब जात असत असें लिहिलें आहे—

साग्रेक्रोशे स्थितान् घ्नन्ति द्विपांश्च
पुरुषान् रणे ॥ ४८ ॥

कर्णपर्व अ० १६

अर्थ—एक कोसाचे अंतरावर असलेल्या शत्रूंना किंवा हत्तीनां अर्जुनाचे बाण वेध करीत असतात.

सन्धानं त्रिविधं प्रोक्तमध ऊर्ध्वं समं
तथा ॥
योजयेत्त्रिप्रकारं हि कार्येष्वपि
यथाक्रमं ॥
अधश्च दूरपातित्वे समं लक्ष्ये
सुनिश्चले ॥
दृढास्फोटं प्रकुर्वींत चोर्ध्वसन्धान-
योगतः ॥

अर्थ—नेम धरण्याचे प्रकार तीन आहेत. अधः, ऊर्ध्व, व सम. जेव्हां बाण दूर मारावयाचा असतो तेव्हां अधःसन्धान करावें, स्थिर लक्ष्यावर बाण मारावयाचा तेव्हां बरोबर मध्यावर नेम धरावा हेंच समसन्धान होय. आणि जोरानें कोणास मारणें असेल तर ऊर्ध्वसन्धान करावें. मनुष्याच्या उंचीच्या मानानें छाती इतकें उंच जें लक्ष्य असतें त्याला "समलक्ष्य" ह्मणतात. छातीपेक्षां जास्त उंच जें लक्ष्य तें "ऊर्ध्वलक्ष्य" होय, व छातीपेक्षां कमी उंचीचें जें लक्ष्य तें "अधोलक्ष्य" समजावें. धनुष्यापासून सुटलेल्या बाणाबद्दल तीन गोष्टींचा विचार करावा लागतो. (१) बाणाची गति. (२) पृथ्वीचें आकर्षण. (३) वाऱ्याचा परिणाम. बाणाला मिळणाऱ्या गतीमुळें तो पुढें जात असतो. पृथ्वीची आकर्षणशक्ति त्याला खालीं ओढते आणि वारा बाणाच्या गतीला प्रतिबंध करतो म्हणजे बाणाची गती कमी करतो. या अनेक परिणामांमुळें बाण अगदीं सरळ न जातां तो थोडा थोडा खालीं खालीं असा होत जातो. हा प्रतिबन्धक परिणाम जर जास्त वेळ होत गेला तर बाण जास्तच खालीं

खालीं होत जाईल. बाणावर खरा परिणाम वाऱ्याचाच होत असतो. दूर अंतरावर बाण सोडावयाचा असेल तेव्हां व थोडासा वारा सुटला असतां याचा स्पष्ट अनुभव येतो. वाऱ्याच्या गतीचें ज्ञान झाडांचें हालणें किंवा गवत हालणें यावरून होतें. बाण कोणत्याहि अंगाला झुकणारा नसावा. झुकणारा बाण सुटला कीं पृथ्वीच्या आकर्षणानें झुकतो व नीट जात नाहीं. त्याची गति, बाण मारणाराची शक्ति व पृथ्वीची शक्ति यांच्या फळाच्या रेषेंत होते. या सर्व कारणांचा विचार करून दूर अंतरावर बाण मारावयाचा असल्यास "अधःसन्धान" करावें इत्यादि शास्त्रीय नियम शास्त्रकारांनीं सांगितले आहेत.

पूर्वापरौ समौ कार्यौ समांसौ निश्चलौ करौ ॥
चक्षुर्षास्पन्दयन्नैव दृष्टिं लक्ष्ये नियोजयेत् ॥
मुष्टिना च्छादयेल्लक्ष्यं शरस्याग्रं तथैवच ॥
सम्यग्दृष्टिगतं ज्ञात्वा ततो बाणं विसर्जयेत् ॥

विश्वामित्र.

अर्थ—विद्यार्थ्यानें मागचा व पुढचा असे दोनहि हात एका सपाटींत धरावे, दोनहि खांदे सारखे असावे, हात मुळींच हालूं देऊं नयेत, डोळ्यांची उघडझांप करूं नये, दृष्टि लक्ष्याकडे लावावी, धनुष्याची कांब ज्या मुठीनें धरली असेल तिची वरची बाजू लक्ष्यांत मिळवावी, बाणाचें टोंक लक्ष्यांत लावावें. तात्पर्य मुठीची वरची बाजू, बाणाग्र व लक्ष्य हीं तीन एका रेषेंत आलीं व लक्ष्यावर दृष्टि पूर्णपणें खिळून राहिली म्हणजे बाण सोडावा.

आदानं चैव तूणीरात्सन्धानं कर्षणं तथा ॥
क्षेपणं च त्वरायुक्तं बाणस्य कुरुते च यः ॥
नित्याभ्यासवशात्तस्य शीघ्रसन्धानता भवेत् ॥

विश्वामित्र.

अर्थ—जो मनुष्य भात्यांतून बाण काढणें, नेम धरणें, बाण ओढणें व सोडणें ही कामें लवकर लवकर करतो त्याला नेहमींच्या अभ्यासामुळें लवकर बाण मारणें साधतें. याला " शीघ्रसन्धान " असें म्हणतात.

प्रत्यालीढे कृते स्थाने अधःसन्धानमाचरेत् ॥
दर्दुरस्थानमासाद्य ऊर्ध्वसन्धानमिष्यते ॥

विश्वामित्र.

अर्थ—प्रत्यालीढ पवित्रा करून "अधःसन्धान" करावें आणि "दर्दुर" पवित्र्यावरून ऊर्ध्वसन्धान करावें. इतर पवित्र्यांवरून "समसन्धान" करावें. "वीरासन" पवित्र्यावरून बाण मारण्याचा अभ्यास करावा. हा पवित्रा सर्व कर्मांना उपयोगी आहे व या पवित्र्यावर थकवा येत नाहीं.

लक्ष्यबाणाग्रदृष्टीनां सङ्गतिस्तु यदा भवेत् ॥
तदानीं मुष्टितो बाणो लक्ष्यान्न स्खलति ध्रुवात् ॥

निर्दोषः शब्दहीनश्च सममुष्टिः
समोज्झितः ॥
भिनत्ति दृढवेधेन सायको नात्र
संशयः ॥
जामदग्न्य.

अर्थ—लक्ष्य, बाणाचें अग्र व नजर हीं तीनहि एका रेषेंत आलीं म्हणजे जो बाण मुठींतून सुटतो तो स्थिर लक्ष्यापासून चुकत नाहीं. बाण बरोबर लागण्यासाठीं आणखीहि कांहीं गोष्टींचा विचार केला पाहिजे. १ वारा—लक्ष्य जितकें दूर असेल तितका वाऱ्याचा परिणाम जास्त. २ लक्ष्य चल असेल तर त्याच्या गतीचें ज्ञान असावयास पाहिजे. ३ धनुर्धारी चल असल्यास व लक्ष्य स्थिर असल्यास धनुर्धाऱ्याला आपल्या गतीचें ज्ञान पाहिजे. बाणाच्या विरुद्ध दिशेस वारा वाहत असल्यास त्याचा परिणाम बाणावर होतो म्हणजे तो बाणाच्या गतीला अवरोध करतो. बाण ज्या दिशेला जाणारा आहे त्याच दिशेस वारा वाहत असेल तर बाणाच्या गतीला प्रतिबंध होत नाहीं. याचप्रमाणें प्रकाशहि व्यवस्थित असावा लागतो. साधारण प्रकाशांत बाणाचें अग्र बरोबर दिसत नाहीं. लक्ष्य फार बारीक दिसत असेल किंवा ओझरतें दिसत असेल तरीहि बाण बरोबर लागणार नाहीं. लक्ष्य चल असेल तर तें किती पुढें जाईल याचा अंदाज करून मग बाण सोडावा म्हणजे तो बरोबर लागेल. हें अंतर समजण्यांत चूक झाली तर बाण बरोबर लागणार नाहीं. याचप्रमाणें धनुर्धारी चल असल्यास समजावें. अशा वेळीं लक्ष्याच्या किंचित् पाठीमागें बाण सोडावा म्हणजे तो ठीक लागतो. या सर्व गोष्टी विचारांत घेऊन योग्य प्रकारानें धरलेला, योग्य रीतीनें सोडलेला व आवाज न करतां जाणारा बाण बरोबर लागतो, असा बाण चुकत नाहीं.

स्वाकृष्टो यस्तेजितश्च सुमुक्तो
गाढमुष्टितः ॥
नरनागाश्वकायेषु न स तिष्ठति
मार्गणः ॥
यस्य तृणसमा बाणा यस्येन्धनसमं
धनुः ॥
यस्य प्राणसमा मौर्वी स धन्वी
धन्विनां वरः ॥
जामदग्न्य.

अर्थ—ज्या धनुर्धाऱ्यानें बाण नीटपणें ओढला आहे व त्याला **तेजन** केलें आहे व नीट धरलेल्या मुठींतून तो सरळ सोडला आहे त्याचा बाण माणसें, घोडे किंबहुना हत्तीच्याहि शरीराला फोडून बाहेर जाण्यास थांबत नाहीं. तेजन म्हणजे बाणाला जास्त शक्ति येण्यासाठीं दोरीला थोडी मुरड घालणें. ज्याला बाण गवताच्या काडीप्रमाणें हलके वाटतात, ज्याला धनुष्य म्हणजे जळत्या विस्तवाप्रमाणें सणसणीत वाटतें व ज्याला धनुष्याची दोरी म्हणजे जीव कीं प्राण अशी वाटते तोच धनुर्धाऱ्यांमध्यें श्रेष्ठ होय. आपल्या हत्यारांची योग्य काळजी घेणारा व तीं योग्य रीतीनें वापरणारा, तात्पर्य जें काम करावयाचें त्यांत तन्मयता प्राप्त झाली आहे ज्याला, असा मनुष्यच त्या विद्येंत वाकबगार होऊं शकतो. साधारण मनुष्याचें हें काम नव्हे. अर्जुनानें रात्रंदिवस मन लावून अभ्यास केला तेव्हां तो धनुर्धर झाला.

तदभ्यासकृतं मत्वा रात्रावपि स पाण्डवः ॥
योग्यां चक्रे महाबाहुर्धनुषा पाण्डुनन्दनः ॥ २५
आदिपर्व अ० १३२

आकर्षण--बाण ओढणें

कैशिकः केशमूले च शरः शृंगे च सात्विकः ॥
श्रवणे वत्सकर्णश्च ग्रीवायां भरतो भवेत् ॥
अंसके स्कन्धनामा च पंच व्यायाः प्रकीर्तिताः ॥
विश्वामित्र.

अर्थ–धनुष्याला बाण लावल्यानंतर त्याची दोरी शेंडीपर्यंत ओढली तर त्या ओढण्याला "कैशिक" म्हणतात. कानाच्या वरील जागेपर्यंत ओढण्याला "सात्विक" म्हणतात. कानापर्यंत ओढण्याला "वत्सकर्ण" म्हणतात. गळ्यापर्यंत ओढल्यास "भरत" म्हणतात आणि खांद्यापर्यंत ओढण्याला "स्कंध" म्हणतात. याप्रमाणें बाणाला कमी जास्त जोर येण्यासाठीं धनुष्याची दोरी कमी जास्त ओढण्याचे पांच प्रकार आहेत. भारतीय धनुर्धरांची धनुष्य ओढण्याची सामान्य रीति म्हटली म्हणजे आकर्ण धनुष्य ओढणें ही होय. इग्लंडांतील तिरंदाजांची पद्धत हनुवटीपर्यंत धनुष्य ओढणें अशी आहे.

कैशिकश्चित्रयुद्धेषु अधोलक्ष्येषु सात्विकः ॥
वत्सकर्णः सदा ज्ञेयो भरतो दृढभेदने ॥
दृढभेदे च दूरे च स्कन्धनामान मुदिशेत् ॥
विश्वामित्र.

अर्थ–चमत्कारिक कौशल्य दाखविणें असतां 'कैशिक' आकर्षण; लक्ष्य खालीं असेल तर 'सात्विक' आकर्षण, नेहमींकरतां 'वत्सकर्ण,' जोरानें बाण मारावयाचा असेल तर 'भरत' आकर्षण आणि बाण दूर जावा व जोरानें लागावा या करतां 'स्कंध' आकर्षण याप्रमाणें बाण खेंचावा. "वत्सकर्णो दूरपाते" असा ही एक पाठ आहे. याचा अर्थ लक्ष्य लांब असेल तेव्हां 'वत्सकर्ण' आकर्षण करावें असा होतो.

केशान्ताच्चिबुकं यावदन्तरालं दशाङ्गुलं ॥
स्थानंचैषां विनिर्दिष्टं द्व्यंगुलं द्व्यंगुलं अधः ॥
कैशिकं सात्वतं चैव वार्षिघ्नं भारतं तथा ॥
छेदं च पंचमं प्रोक्तं ज्ञेयं निन्द्यं यथोत्तरम् ॥
जामदग्न्य.

अर्थ–शिखा व गाल यांमध्यें अंतर दहा अंगुलांचें आहे. यांत दोन दोन बोटांच्या अंतरानें बाण ओढण्याचे पांच प्रकार होतात. कैशिक, सात्वत, वार्षिघ्न, भरत व छेद हेच ते पांच प्रकार होत. यांतील पुढले पुढले टाकाऊ समजावे. पहिल्या आकर्षणांत सर्वांत जास्त शक्ति असून शेवटच्यांत सर्वांत कमी शक्ति आहे. पण या शेवटच्यांत कष्ट कमी असल्यानें साधारण माणसाला पुष्कळवेळ वापरण्यास हेंच आकर्षण उत्तम समजावें.

सम्यगारोपितं चित्ते सम्यग्दृष्टि
विभावितं ॥
बाणाग्रसमसूत्रस्थं लक्ष्यं हन्याद
संशयम् ॥
दृष्टिर्मुष्टिः शराग्रं च मनोबुद्धिश्च
हुंकृतिः ॥
लक्ष्यमध्ये षडैतानि पातयेद्युगपत्सदा ॥
जामदग्न्य.

अर्थ—लक्ष्यावर चित्त स्थिर करावें, दृष्टि एकाग्र ठेवावी, व चित्त बाणाच्या टोंकाशीं एका रेषेंत आणावें म्हणजे बाण बरोबर लागतो. नजर, मूठ, व बाणाचें टोक हीं एका रेषेंत आणि मन, बुद्धि व हुंकार या सहा गोष्टी लक्ष्याच्या ठिकाणीं मिळाल्या पाहिजेत म्हणजे बाण बरोबर नेमका लक्ष्य वेध करतो. अशाच अर्थाचा मुंडकोपनिषदांत एक मंत्र आला आहे. मुं० २ खं० २ मंत्र ३ व ४ पहा.

नेत्रवक्त्रशिरोग्रीवा मनः
सन्धानमेवच ॥
पूर्वा लक्ष्यगता नाम तान्यचलानि
कारयेत् ॥
शरेण शरवातेन पत्रपुंखमुखेन वा ॥
धन्वी संचालयेल्लक्ष्यं विद्धं पंचविधं
स्मृतम् ॥
जामदग्न्य.

अर्थ—डोळे, तोंड, डोकें, मान, मन, संधान व पुढला हात आणि बाणाचें टोंक व लक्ष्य हीं सर्व बाण मारण्याच्यावेळीं निश्चल पाहिजेत व एकाग्र पाहिजेत. यांत कांहीं चूक झाली तरी नेम चुकतो. लक्ष्यवेध झाला हें कसें समजावें तर लक्ष्याला बाण लागला, किंवा, बाणाचा वारा, पिसारा, पिस, बाणाचें अग्र यांचा स्पर्श झाला म्हणजे लहान किंवा हलकें असलेलें लक्ष्य हालतें या योगें लक्ष्य वेध झाला असें समजतात.

दृढं दूरं चलं सूक्ष्ममिति लक्ष्यं
चतुर्विधं ॥
तत्राल्पेनापि चापेन सिद्धिः
स्याच्चलसूक्ष्मयोः ॥
दृढदूरौ च दुःसाध्यौ कठिनौ
कर्षणं विना ॥
अतस्तदर्थमाकर्ष कर्मेदं षष्ठ-
मुच्यते ॥
जामदग्न्य.

अर्थ—दृढ, दूर, चल व सूक्ष्म असे लक्ष्याचे चार प्रकार आहेत. जें मोडतां मोडत नाहीं तें दृढलक्ष्य, जें फार अंतरावर आहे तें दूरलक्ष्य, जें चंचल आहे तें चललक्ष्य व जें बारीक दिसतें मग तें जवळ असो किंवा दूर असो तें सूक्ष्मलक्ष्य होय. यापैकीं चल व सूक्ष्म या लक्ष्यांना हलक्या धनुष्यानें किंवा बाणानें नेम मारतां येतो परंतु दृढ व दूर लक्ष्यांना जोरानें बाण मारल्याशिवाय भागत नाहीं. याकरितां जोरानें बाण मारण्याचें हें आकर्षण म्हणून सहावें एक स्वतंत्र प्रकरण सांगावें लागतें.

तत्र पूर्वां दृढां कृत्वा गाढमा-
कृष्य तां शनैः ॥
निजशक्त्यनुसारेण स्थापयेत्
कैशिके चिरम् ॥
जामदग्न्य.

अर्थ—पुढला हात नीट घट्ट करून मग धनुष्य जोरानें ओढावें आणि आपल्यांत शक्ति असेल तेथपर्यंत तें कैशिक आकर्षणांत ठेवावें. अशा अभ्यासानें दृढवेध करतां येतो.

लोष्ट्रं मेषविषाणादि चर्मदारु
शिलादिकं ॥
चक्रारूढं भ्रमद्गाढं मृत्पिण्डादि
दृढं विदुः ॥
जामदग्न्य.

अर्थ—मातीचा गोळा, मेंढ्याचें शिंग, इत्यादि, तसेंच कातडें, लांकूड, दगड इत्यादि पदार्थ, कुंभाराच्या चाकावर बसवून खूप जोरानें फिरत असलेली माती यांना दृढवेध म्हणतात.

काष्ठं सूचीमुखै र्भिद्याच्चर्म
धारामुखैः शरैः ॥
छेदः कार्योऽर्धचंद्राग्रैः शिरसो
जठरस्य च ॥
गुणबाहु धनुः पत्रछेदः कार्यः
क्षुरप्रकैः ॥
भल्लेन वा गुणच्छेदो बाणच्छेदो
द्विभल्लकैः ॥
शेषं दृढंच निर्भिद्यात् सूचीमुख-
शिलिमुखैः ॥
जामदग्न्य.

अर्थ—लांकूड सूचीमुख किंवा काकतुंड बाणानें भेदावें, चामडें धारामुख बाणानें छेदावें. मान किंवा पोट अर्धचंद्र बाणानें तोडावें किंवा चिरावें. दोरी, हात, धनुष्याची कांब, बाणाचा पिसारा हीं क्षुरप्र बाणांनीं तोडावीं. दोरीचे दोन तुकडे करणें असेल तर भल्ल बाणानें करावें. द्विभल्ल बाणानें बाण तोडावे व इतर कठीण वस्तु सूचीमुख बाणानें तोडाव्या.

द्विचतुः पञ्चसप्ताद्यैर्बाणानां कर्षणैः
स्थिरैः ॥
लोहपट्टस्य भेदेन धन्वी श्रेष्ठो
यथोत्तरम् ॥
जामदग्न्य.

अर्थ—धातूची पट्टी जो धनुर्धर दोन, चार, पांच, सात, बाण एकामागून एक मारून फोडतो तो श्रेष्ठ समजावा. एकदम सात बाण मारणारा धनुर्धर हा सर्वांत श्रेष्ठ होय.

दूरपातो दृढास्फोटो लघुत्वं
सूक्ष्मसाधनं ॥
मुष्टया पताकया बाणं स्त्रीचिन्हं
दूरपातनं ॥
स्कन्धव्यायेन वज्रस्य मुष्ट्या
पुंमार्गणेन च ॥
अत्यन्त सौष्ठवाद्बाहोर्जायते
दृढपेदिता ॥

अर्थ—दूर अन्तरावर बाण मारून जोरानें जिन्नस फोडणें असेल, हलुच काम करणें असेल किंवा सूक्ष्म वस्तु भेदणें असेल, तर स्त्रीचिन्ह बाण घ्यावा व तो पताका मुठीनें जोडावा आणि दूरपात गतीनें सोडावा, म्हणजे हीं कामें होतात. तसेंच स्कंधआकर्षण, वज्रमुष्टि, पुरुष-चिन्ह बाण व अतिशय हुषारी एवढ्या तयारीनें मारलेला बाण मजबूत जिन्नस फोडतो. तात्पर्य दूर पातासाठीं स्त्रीबाण व दृढघातासाठीं पुरुष बाण वापरावा.

गाढमर्दित मृत्पिण्डं चक्रवेग-
कृतभ्रमम् ॥
घटाच्छिन्नमनिर्भेद्यं यो भिनत्ति स
उत्तमः ॥

जामदग्न्य.

अर्थ—चांगल्या मऊ मातीचा गोळा, जोरानें फिरणाऱ्या कुंभाराच्या चक्रावरील मडक्यांत ठेवला असतां, मडकें न फोडतां जो मारतो तो उत्तम बाण मारणारा समजावा.

दूरपाते श्रमं कुर्याद् दृढवेधे
विधानवत् ॥
दूरपातस्य संसिद्धिर्दुष्करं
दृढवेधनम् ॥

कोदण्डमण्डन

अर्थ—धनुर्धाऱ्यानें दूरपात व दृढवेध यांसाठीं शास्त्रोक्त पद्धतीनें सारखाच अभ्यास केला तरी त्याला दूरपातांत यश येईल पण दृढवेधांत यश येणें कठीण जातें.

क्रियामिच्छन्ति चाचार्या दूरमि-
च्छन्ति भार्गवाः ॥
राजानो दृढमिच्छन्ति लक्ष्यमिच्छन्ति
चेतरे ॥
जनानां रञ्जन यस्माल्लक्ष्यपातात्
प्रजायते ॥
हीनेनापीषुणा तस्मात् प्रशस्तं
लक्ष्यवेधनम् ॥

कोदण्डमण्डन.

अर्थ—आचार्य म्हणजे धनुर्वेदाचे शिक्षक हे धनुर्वेदांत सांगितल्याप्रमाणें सर्व कामें विद्यार्थ्याला यावीं अशी इच्छा करतात. **भार्गव**—भार्गव ही पदवी म्हणून धनुर्वेदांत सांगितलें आहे. याचा अर्थ धनुर्वेदाचा अभ्यास केलेला, आचार्यापेक्षां कमी योग्यतेचा मनुष्य. हे दूर अंतरावर बाण जाणें चांगलें असें समजतात. राजे लोक दृढवस्तूचा भेद चांगला मानतात. बाण दूर अंतरावर जाणें व दृढभेद करणें हीं दोनहि कामें कौशल्याचीं आहेत, म्हणून वरील दोषे कौशल्य तेवढेंच पाहतात. साधारण जनता लक्ष्यवेधाची तारीफ करते. बाण नेमका लागल्यानें सर्व लोक खूष होत असल्यामुळें हलक्या बाणानें सुद्धां बरोबर नेम मारण्यास झटावें.

प्रथमं पुष्पवेधं च फलहीनेन
पत्रिणा ॥
ततः फलयुतेनैव मत्स्यवेधं च
कारयेत् ॥
जीववेधं ततः कुर्यादेवं वेधी त्रिधा
भवेत् ॥
एतैर्वेधैः कृतैः पुंसां शराः स्युः सर्व
साधकाः ॥

कोदण्डमण्डन.

अर्थ—प्रथम नुसत्या काड्यांनीं फुलांना बाण मारण्यास शिकावें. नंतर मत्स्यवेध—निश्चल वस्तु करावा. यानंतर जिवंतप्राणी—चल वस्तु—मारावे. याप्रमाणें तीनहि प्रकारचा अभ्यास झाला म्हणजे बाण उत्तमप्रकारें मारतां येतो.

विसर्जन—बाण सोडणें.

सूचीमुखा मीनपुच्छा भ्रमरी च
तृतीयका ॥
शराणां गतयस्तिस्रः प्रशस्ताः
कथिता बुधैः ॥

विश्वामित्र.

अर्थ–धनुष्यापासून बाण सुटला म्हणजे तो ज्या पद्धतीनें जातो त्या पद्धतीला त्या बाणाची गति म्हणतात. या गति १ सूचीमुखा, २ मीनपुच्छा व ३ भ्रमरी अशा तीन आहेत.

१ सूचीमुखा—

सूचीमुखागतिस्तस्य सायकस्य प्रजायते ॥
पत्रं विलोकितं यस्य अथवा हीनपत्रकम् ॥

जो बाण जात असतांना त्याचा पिसारा किंवा पिसें असून नसल्यासारखीं दिसतात त्या गतीला 'सूचीमुखा' गति म्हणतात.

२ मीनपुच्छा—

कर्कशेन च चापेन यः कृष्टोऽहीन मुष्टिना ॥
मीनपुच्छागतिस्तस्य सायकस्य प्रकीर्तिता ॥

कठीण धनुष्यापासून मोठ्या वेगानें सुटलेला जो बाण सूं सूं आवाज करीत जातो त्या गतीला 'मीनपुच्छ गति' म्हणतात.

३ भ्रमरी—

भ्रमरी कथिता ह्येषा सद्भिस्तु श्रमकर्मणि ॥
ऋजुत्वेन हि आयाति क्षेप्यमाणस्तु सायकः ॥

सुटलेला बाण अगदीं सरळ जातो त्या गतीला भ्रमरी म्हणजे भ्रमराप्रमाणें असलेली गति म्हणतात.

बाणाच्या अप्रशस्त गति चार आहेत—

वामगा दक्षिणा चैव ऊर्ध्वगाधोगमा तथा ॥
चतस्रः गतयः प्रोक्ताः बाणस्खलनहेतवः ॥

विश्वामित्र.

अर्थ–डावीकडे, उजवीकडे, वर व खालीं, असा बाण गेला म्हणजे नेम चुकतो म्हणून या गति नेम चुकविणाऱ्या गति म्हटल्या जातात.

१ वामगा—

कम्पते गुणमुष्टिस्तु मार्गणस्यहि पृष्ठतः ॥
सन्मुखीस्याद्धनुर्मुष्टिस्तदा वामे गतिर्भवेत् ॥

धनुष्यापासून बाण सुटण्याचे वेळीं बाण धरलेली मागील चिमुट हालली तर बाणाला तिरपी गति मिळते व तो डावीकडे जातो.

२ दक्षिणा—

ग्रहणं शिथिलं यस्य ऋजुत्वेन विवर्जितम् ॥
पार्श्वे तु दक्षिणं याति सायकस्य न संशयः ॥

धनुष्यापासून बाण सुटण्याच्या वेळीं जर कांबीची मूठ सरकली किंवा ढिली झाली तर बाण तिरपा जातो व लक्ष्याच्या उजवीकडे जातो.

३ ऊर्ध्वगा—

ऊर्ध्वं भवेच्चापमुष्टिर्गुणमुष्टिरधो भवेत् ॥
स मुक्तो मार्गणो लक्ष्यादूर्ध्वं याति न संशयः ॥

बाण सोडण्याचे वेळीं चिमूट धरणारा हात थोडासा खालीं गेला व कांब धरणारा हात जरा वर गेला म्हणजे बाण वर जातो.

४ अधोगमा—

मोक्षणे चैव बाणस्य चापे मुष्टिरधो भवेत् ॥
गुणमुष्टिर्भवेदूर्ध्वं तदाधोगामिनी गतिः ॥

बाण सोडण्याचे वेळीं धनुष्याची कांब धरणारा हात थोडासा खालीं गेला व चिमुट धरणारा हात जरा वर आला म्हणजे बाण खालीं जातो.

ऊर्ध्वगा व अधोगमा या दोन गतींबद्दल एकच श्लोक लिहिलेला आढळतो.

अधऊर्ध्वं हि चापस्य सन्धानं तु यदा भवेत् ॥
तदाऽधऊर्ध्वमायाति सायको नात्र संशयः ॥

याप्रमाणें बाण सुटण्याचे वेळीं दोनहि हात, धनुष्य व बाण हीं अगदीं निश्चल पाहिजेत म्हणजे बाण नेमका लक्ष्याला लागतो. या निश्चलतेकरतां मन स्थिर पाहिजे, इंद्रियें थकलेलीं नसावींत व बाण झटकन् सुटले पाहिजेत. मन चंचल झालें कीं नजर चळते व नेम चुकतो. हात दमले म्हणजे स्नायू ढिले पडतात व लक्ष्य चुकतें, याकरतां बाण मारणारानें या सर्व गोष्टींकडे लक्ष द्यावें.

चतुश्शतं च काण्डानां यो हिलक्ष्ये विसर्जयेत् ॥
सूर्योदये चास्तमये स श्रेष्ठो धन्विनां भवेत् ॥
त्रिशतैर्मध्यमो बाणै द्विशताभ्यां कनिष्ठकः ॥

विश्वामित्र.

एक मनुष्य बाण मारण्याची पराकाष्ठा करतो म्हणजे सकाळीं चारशें बाण मारणें व संध्याकाळीं चारशें बाण मारणें. येथें बाण मारणें म्हणजे लक्ष्यवेध असा अर्थ समजावा. असे एका दिवसांत आटशें बाण मारणारा मनुष्य उत्तम धनुर्धर होय. सकाळीं ४०० बाण मारणें म्हणजे सकाळपासून दुपारपर्यंत अर्थात् सहा तासांत म्हणजे ३६० मिनिटांत ४०० बाण अर्थात् एक मिनिटाला एक बाण असें प्रमाण पडलें. धनुर्वेदाच्या अभ्यासांत हें प्रमाण समजावें. कसलेला धनुर्धर एका मिनिटांत जास्त बाण सोडूं शकेल. धनुष्याला बाण लावून ते सोडणें या क्रियेंत एका मिनिटाला बरेच बाण सोडतां येतात. जपानांत एका धनुर्धाऱ्यानें आपल्या बादशाहासमोर एकसारखे चोवीस तास लागोपाठ ८१३३ बाण सोडून दाखविले व दुसऱ्यानें २० तासांपर्यंत एकसारखे एक मिनिटला चार प्रमाणें बाण सोडले. पहिल्याचें प्रमाण एक मिनिटास ५ हून जास्त असें पडतें. भारतीय धनुर्धर लागोपाठ बाण सोडीत असत. " क्षिपत्येकेन वेगेन पञ्चबाणशतानि यः ॥१९॥ उद्योगपर्व अ. ६०. अर्जुन लागोपाठ एकसारख्या वेगानें पांचशें बाण सोडीत असे असें वर्णन आहे. यावरून त्याचें हस्तचापल्य दिसून येतें. सकाळपासून दुपार पर्यंत ३०० बाण सोडणारा मध्यम मनुष्य होय व २०० सोडणारा कनिष्ठ समजावा.

बाणाग्रभागविनिविष्टविशुद्धदृष्टिः ॥
तिष्ठंचिरं स्थिरतरैर्देश सन्निवेशैः ॥
शक्तेर्वसानमिव चैकमथो मुहूर्तं ॥

द्वित्रीनथ त्रिचतुरानथ पंचचैव ॥

कोदण्डमण्डन.

अर्थ–बाणाच्या टोंकावर ज्याची दृष्टि सारखी खिळलेली आहे व जो याप्रमाणें सारखा उभा आहे त्याची ही एकाग्रता एक मुहूर्तभर म्हणजे अडीच घटका राहिली म्हणजे तो कनिष्ठ योद्धा होय. याप्रमाणें ज्याची एकाग्रता तीन मुहूर्त राहते तो मध्यम योद्धा समजावा व ज्याची एकाग्रता तीन चार मुहूर्त टिकेल तो उत्तम योद्धा होय. पांच मुहूर्त म्हणजे दोन प्रहर अशी एकाग्रता ज्याची राहते तो दिव्य पुरुष समजला जाईल.

सव्यसाची स विज्ञेय आशुकर्मा चिरक्रियः ॥

विश्वामित्र.

सव्यसाची स विज्ञेयो दृढवेधी च दूरतः ॥

जामदग्न्य.

अर्थ–ज्याला लवकर लवकर व पुष्कळ वेळपर्यंत बाण मारतां येतात तो किंवा दूर अंतरावर जो बाण मारूं शकतो तो सव्यसाची समजावा.

ज्याबाणधनुषां वारिपृष्ठादीनां च दूषणं ॥

बाणमोक्षं विना तस्मात् कुर्वीत प्रावृषि श्रमम् ॥

जामदग्न्य.

अर्थ–पावसाळ्यांत सर्द हवेमुळें दोरी, बाण, व धनुष्य, इत्यादि वस्तु खराब होतात म्हणून पावसाळ्यांत बाण न सोडतां घरांतच टणत्काराचा अभ्यास ठेवावा. या योगें अभ्यासहि राहतो व आयुधेंहि स्वच्छ राहतात.

अधःपुंखा ऊर्ध्वपुंखा मंदिका भ्रामिका तथा ॥

चतस्रो गतयो दुष्टाः शुद्धा सा पंचमी शुभा ॥

जामदग्न्य.

अर्थ–बाणांच्या चार गति अशुभ आहेत व पांचवी शुभ म्हणजे लक्ष्यवेध बरोबर करणारी अशी आहे. अधःपुंखा, ऊर्ध्वपुंखा, मंदिका व भ्रामिका या गतींनीं बाण बरोबर लक्ष्यवेध करीत नाहीं.

१ **अधः पुंखा**–पुढला हात वर गेला किंवा मागला हात खालीं गेला म्हणजे बाण वर जातो व ती गति अधःपुंखा-पिसारा खालीं झालेली-गति समजावी. हिनें बाण लक्ष्याच्यावर जातो.

२ **ऊर्ध्वपुंखा**–वर लिहिलेल्याच्या उलट स्थिति म्हणजे ऊर्ध्वपुंखा गति होय. हिनें बाण लक्ष्याच्या खालीं जातो.

३ **मंदिका**–धनुर्धाऱ्याचा जोर कमी झाला किंवा धनुष्यच मऊ, हाताची मूठ ढिली यांपैकीं कोणत्याहि कारणानें बाणाचा वेग कमी होतो. ह्या गतीला मंदिकागति म्हणतात.

५ **शुद्धा**–बाण वांकडा, तिकडा न जातां सरळपणें लक्ष्यांत जाऊन शिरतो व तो योग्य प्रमाणांत केलेला आणि यथाशास्त्र सोडलेला असल्यामुळें आपलें काम उत्तम करतो, म्हणून या गतीला शुद्धगति म्हणतात व हीच गति उत्तम समजावी.

नाराचानां तु गतयो दुष्टा स्युर्नव-
संख्यया ॥
आद्याश्चतस्रः पूर्वोक्ताः पञ्चमी
तत्र सीतिका ॥
षष्ठी तु मत्स्यपुच्छा स्यात् कंपा-
ख्या सप्तमी मता ॥
गोमूत्रिका चाष्टमी स्यात् त्रोटी च
नवमी गतिः ॥
जामदग्न्य.

अर्थ—शरांसंबंधीं चार अशुभ गति वर सांगितल्या आहेत. नाराच बाणांच्या एकंदर नऊ अशुभ गति आहेत, त्यांपैकीं शरांच्या ज्या चार वाईट गति सांगितल्या आहेत त्याच नाराचांनाहि लागूं आहेत. त्याशिवाय सीतिका मत्स्यपुच्छा, कंपा, गोमूत्रिका व त्रोटी या पांच अशुभ गति आहेत. शरांपेक्षां नाराच बाण जड असतात, तसेंच ते वेगानें जाण्यासाठीं त्यांना पिसेंहि अधिक असतात; म्हणून नाराचगतींत जास्तदोष उत्पन्न होतात.

६ **सीतिका**—नाराच बाण उच्चपुंख जात असले म्हणजे आपल्या मंदगतीमुळें "सी" असा आवाज करीत जातात म्हणून या गतीला सीतिका गति म्हणतात.

७ **मत्स्यपुच्छा**—नाराच बाणांना पिसें नसलीं व बाण मारणारा वाकबगार नसला म्हणजे किंवा पिसें फार मोठीं असून तीं वरून कडकड करीत येत असलीं म्हणजे तीं माशाच्या शेपटीसारखीं दिसतात म्हणून या गतीला मत्स्यपुच्छा म्हणतात.

८ **सकंपा**—कात्रीच्या बाहेर दोरी गेली व जोरानें नेम मारला नाहीं म्हणजे बाण कांपत कांपत जातो, या गतीला "सकंपा" गति म्हणतात.

९ **गोमूत्रिका**—नाराच बाण आंखूड पडले व लस्तकाच्या पुढें थोडेच बाहेर राहिले म्हणजे कांपऱ्या गतीनें जाऊं लागतात व त्यामुळें वांकडे तिकडे जातात, या गतीला गोमूत्रिका-नागमोडी गति म्हणतात.

१० **त्रोटी**—नाराच बाणाला पिसें नसलीं व बिनमेहेनती माणसानें ते मारले म्हणजे ते तिरपे जातात. या गतीला त्रोटी—थोडी-गति म्हणतात.

११ **शुद्धा**—नाराच बाण आवाज न करतां, न हालतां, लक्ष्यामध्यें पिसांपर्यंत घुसून जातात तिला शुद्धगति म्हणतात. ही गति उत्तम होय. प्रत्येकानें ही गति साधण्याचा प्रयत्न करावा.

जे शर मधोमध बोटावर तोलून धरले तर एका अंगाला फाळ व एका अंगाला पिसारा असे नीट बोटावर राहतात व झुकत नाहींत ते बाण चांगले. हे दूरपातासाठीं निवडून ठेवावे. नाराच बाण सुद्धां असे तपासून पारखून ठेवावे. रोजच्या सामान्य व्यवहाराला थोडे चुकीचे बाण चालतात पण चढाओढीच्या वेळीं शेलकेच बाण पाहिजेत म्हणजे ते आपलें काम बिनचूक करतात. बाण अगदीं बरोबर लागावा, त्यानें इष्ट वस्तु नेमकी फोडावी, असें वाटत असेल, तेव्हां तो यथाशास्त्र तयार झालेला, वजनदार, मजबूत, व उत्तम धारेचा पाहिजे आणि असे शेलके बाण धनुर्धर लोक निराळे काढून ठेवीत असत.

कौशल्य.

योगक्रियाशलाकाज्या श्रमोत्कर्षो
दृढं तथा ॥
दूरतश्चित्रयुद्धं च दशकर्माणि
कार्मुके ॥
गतिसिद्धिस्तु तत्पूर्वं कार्या स्थिर-
तया सदा ॥
वेगसिद्धिर्भवेच्छेदात्तेजनं वेध-
वेधनात् ॥
उपदेशक्रिया यस्य श्रमोभ्यासो
दिनेदिने ॥
तस्य सिद्धयन्ति नाराचाः षट्सु
कर्मसु ते क्षमाः ॥
सद्गतिच्छेद भेदादि घातस्पर्श-
प्रवेशनाः ॥
विश्वामित्र.

अर्थ—बाण मारण्याच्या कौशल्यांत दहा गोष्टी येतात, त्या अशा—१ योग, २ क्रिया, ३ शलाका, ४ ज्या, ५ श्रम, ६ उत्कर्ष, ७ दृढ, ८ दूर, ९ चित्र, १० युद्ध. हीं कसबें साध्य होण्यापूर्वीं नीट अभ्यास करून गतिसिद्धि मिळविली पाहिजे. गतिसिद्धि मिळविल्यावर वेगसिद्धि साध्य होते, नेम मारतां मारतां वेगसिद्धि मिळवितां येते. जो धनुर्धर तज्ज्ञ पुरुषाच्या देखरेखीखालीं दररोज अभ्यास व श्रम करतो त्याला नाराचांचीं सहा कामें साध्य होतात. तीं सहा कामें अशीं—१ सद्गति, २ छेद, ३ भेद, ४ घात, ५ स्पर्श, ६ प्रवेशन हीं होत.

१ **क्रिया**—चित्त एकाग्र करून सर्व शरीर किंवा शरिराचा कोणताहि अवयव वाटेल तेव्हां अगदीं निश्चल करतां येणें याला क्रिया म्हणतात.

२ **योग**—धनुष्याची कांब, दोरी, बाणाचें अग्र व नजर हीं एका रेषेंत आणणें म्हणजे योग होय. समत्वं योग उच्यते ।

क्रिया व योग हीं ज्याला उत्तम रीतीनें साधलीं तो यमालाहि जिंकूं शकतो.

कर्मयोग विधानज्ञो ज्ञात्वैवं
विधिमाचरेत् ॥
मनसा चक्षुषा दृष्टया योगशिक्षुर्यमं
जयेत् ॥
अग्निपुराण.

३ **शलाका**—काड्या मारण्यांत प्राविण्य मिळविणें याला शलाका म्हणतात.

एकाद्या मजबूत वस्तूला भोंक पाडून, त्या भोंकांतून काडी आरपार मारतां आली म्हणजे शलाकासिद्धि झाली असें समजावें.

४ **ज्या**—धनुष्याची दोरी धनुष्याला लवकर लवकर लावणें, सोडणें व ताणणें या गोष्टी उत्तम रीतीनें करतां आल्या म्हणजे दोरीचा अभ्यास झाला. दोरीच्या अभ्यासानें बाण सोडण्याचा अभ्यास व बाण सोडण्याच्या अभ्यासानें गतिसिद्धि अशी परंपरा आहे.

५ **श्रम**—धनुष्याला बाण लावणें व नेम धरणें याबद्दल पुष्कळ अभ्यास करावा लागतो याला श्रम असें म्हणतात. असे परिश्रम केले म्हणजे धनुष्यापासून सुटलेला बाण नेमका लक्ष्याला लागतो व अचूक बाण मारतां येतो. अचूक बाण मारणें हें श्रमाचें फळ आहे.

६ उत्कर्ष—धनुष्य जोरानें ओढून वारंवार सोडणें, पुष्कळ जोरानें धनुष्य वांकवितां येणें व सोडतां येणें याला उत्कर्ष म्हणतात.

७ दृढ—लोखंडाचा पत्रा किंवा अशाच कठीण वस्तु बाणानें फोडणें म्हणजे दृढ.

८ दूर—आपल्यापासून फार दूर अंतरावर बाण मारतां येणें.

९ चित्र—झांकलेली वस्तु मारणें, आश्चर्य कारक कामें बाणाकडून करविणें. याला चित्र म्हणतात.

१० युद्ध--दोन हत्तींची टक्कर लागली असली किंवा जनावर आपल्या अंगावर चालून आलें तर त्याच्या मर्म स्थानीं अचूक बाण मारून त्याला धायाळ करणें किंवा ठार मारणें याला युद्ध म्हणतात. आपल्या प्रतिस्पर्ध्याशीं लढतांना हीच गोष्ट करावयाची असते म्हणून या गोष्टीलाहि युद्धच म्हणतात.

नाराच बाणांच्या सहा कामांचें स्पष्टीकरण.

१ सद्गति—लांब अंतरावर बाण बरोबर इष्ट गतीनेंच घालविणें याला सद्गति किंवा उत्तम गति म्हणतात.

२ छेद—अर्धचंद्रादि विशिष्ट जातींच्या बाणांनीं दुसऱ्यांचे बाण तोडणें किंवा लक्ष्याला बाण मारून त्याचे तुकडे करणें याला च्छेद म्हणतात. या कामीं क्षुरम व आरामुख हे बाणहि वापरतात.

३ भेद—सूचीमुख इत्यादि बाणांनीं लक्ष्याला भोंक पाडणें याला भेद म्हणतात.

४ घात—काकतुंडादि बाणांनीं किंवा खुणा केलेल्या बाणानें लक्ष्याला फोडणें याला घात म्हणतात.

५ स्पर्श—लक्ष्याला बाण नुसता चाटून जाईल अशा तऱ्हेनें मारणें याला स्पर्श म्हणतात. मुलाच्या डोक्यावरील लिंबु फोडणें चिलमीतील विस्तव उडाविणें इत्यादि गोष्टी याच जातीच्या होत. शत्रूला धाक दाखविण्याकरितां याचा उपयोग होतो.

६ प्रवेशन—लक्ष्यामध्यें असलेल्या भोकांतून बाण आरपार घालविणें याला प्रवेशन म्हणतात. फुलांच्या माळेंतून बाण घालविणें हें या जातीचें आहे. नाराच बाणांना पिसारा नसतो यामुळें असल्या गोष्टी नाराचांनींच होतात. शरांना पिसारा असल्यामुळें स्पर्श किंवा प्रवेशन शरांनीं होत नाहीं.

जमदग्नींनीं कौशल्याच्या याच गोष्टी सांगितल्या आहेत, मात्र क्रियेची व्याख्या त्यांची निराळी आहे. "पवित्र्यावर उभें राहणें, धनुष्याची मूठ बरोबर धरणें व नेम मारणें म्हणजे क्रिया होय."

चित्रवेध ही गोष्ट चमत्कार म्हणून करावयाची असते. तिचें वर्णन असें आहे.

चित्रं चित्रसमभ्याससाध्यं बुद्धि-
प्रपंचितं ॥
शिक्षेतदर्थं लाभाय कीर्तये
कौतुकाय च ॥
तद्धस्तलाघवात् सूक्ष्म चललक्ष्यस्य
भेदनात् ॥

अल्पसंस्पर्शनात् सूक्ष्मसुषिरे
संप्रवेशनात् ॥
वक्त्रेकण्टकनिःपुंखो भयतोमुख-
पत्रिणाम् ॥
अनेकानांच युगपद्बाणानां
संप्रमोचनात् ॥
एवमादिकभूतानि कर्मनिर्माण-
नैपुणात् ॥
चित्रं चित्तचमत्कारकारी सर्वस्य
जायते ॥

कोदण्डमण्डन.

अर्थ—ज्याप्रमाणें कागदावर, दगडावर किंवा लाकडावर चित्र पाहिलें म्हणजे मनुष्याला कौतुक वाटतें, त्याप्रमाणें धनुष्यबाणांच्या सहायानें अनेक प्रयोग चमत्कार वाटतील असे करतां येतात. याकरितां शक्ति व युक्ति यांची जोड पाहिजे आणि निरनिराळी कल्पना पाहिजे. या चमत्कारांना चित्र म्हणतात. असें चित्रकर्म संपत्ति मिळविण्यासाठीं, कीर्तिसाठीं व लोकांना कौशल्य पाहून आश्चर्य वाटावें म्हणून करीत असतात आणि याकरितांच लोक शिकतात व अभ्यास ठेवीत असतात.

चित्रकर्म—

१ हालणारे व बारीक असें लक्ष्य हातांच्या चपलतेनें अचूक मारणें, बारीक काडी किंवा केस तोडणें.

२ बारीक भोंकांतून बाण घालविणें किंवा नाजूक वस्तूला थोडासा स्पर्श करणें.

३ ज्यांना दोन्ही बाजूंला फाळ आहेत असे बाण तोंडांत कांटे भरल्याप्रमाणें भरणें.

४ अनेक (दहा बारा) बाण एकदम सोडणें.

याप्रमाणें साधारण मनुष्याला करतां येणें अशक्य, परंतु ज्याचा हात हलका व ज्यानें पुष्कळ मेहेनत केली आहे त्याला साध्य अशा अनेक गोष्टी चित्रकर्मांत येतात.

स्मशानस्तंबभेदश्च विकटस्यापि
भेदनं ॥
यमलार्जुनभेदं च निदध्याद्विधि
योगतः ॥
एतेनैव विधानेन छंदाकृष्ट-
धनुर्गुणौ ॥
धनुष्मन्तौ विदध्यातामन्योन्यशर-
भेदनम् ॥

कोदण्डमण्डन.

दर्भाची किंवा लव्हाळ्याची काडी तोडणें, मोठा दगड फोडणें, एका मागें एक असलेलीं दोन झाडें तोडणें इत्यादि गोष्टी अशाच अभ्यासानें साध्य होतात. याच प्रमाणें समोरासमोर दोन धनुर्धाऱ्यांनीं उभें राहून खूण होतांच बाण सोडणें व ते एकमेकांवर आपटणें असा प्रयोग करतां येतो.

बाण मारणारांचे त्यांच्या कौशल्यावरून पुढीलप्रमाणें प्रकार होतात.

१ दृढघाती—

अयश्चर्मघटश्चैव मृत्पिण्डश्च
चतुष्टयं ॥
यो भिनत्ति न तस्येषुर्वज्रेणापि
विदार्यते ॥
सार्द्धाङ्गुलप्रमाणेन लोहपत्राणि
कारयेत् ॥
तानिभित्वैक बाणेन दृढघाती
भवेन्नरः ॥

चतुर्विंशति चर्माणि यो भिनत्ती-
षुणा नरः ॥
तस्य बाणो गजेन्द्रस्य कायं निर्भिद्य
गच्छति ॥
अयस्तु काकतुण्डेन चर्म
चारामुखेन हि ॥

लोखंड, कातडें, घागर किंवा मातीचे चार गोळे जो एका बाणानें फोडतो त्याला दृढघाती म्हणतात. अर्ध्या अंगुळापासून दीड अंगुळापर्यंत जाड पत्रा व पांच कातड्यापासून चोवीस कातड्यापर्यंत जाड जिनसा एका बाणानें फोडणें ही या कामाची पराकाष्ठा झाली. पत्रा काकतुंडानें व कातडीं आरामुखानें फोडावयाचीं.

२ दृढवेधी व ३ घटवेधीः—

भ्राम्यज्जले घटो वेध्य श्चक्रे
मृत्पिण्डकं तथा ॥
भ्रमन्तं वेधयेद्योहि दृढवेधीस
उयच्ते ॥
मृत्पिण्डञ्च घटंचैव विध्येत्
सूचीमुखेन हि ॥

एका चाकावर बाजूला मडकें किंवा गोळा ठेविले असतां जो फोडतो किंवा पाण्यांत वर्तुळाकार फिरणारा घडा जो फोडतो त्याला घटवेधी म्हणतात. कुंभाराच्या चाकावर मातीचा एक गोळा ठेवून तो, चाक गरगर फिरत असतांना सारखा फिरत राहतो, त्याला बाण मारणारा दृढवेधी म्हटला जातो. हा मातीचा गोळा चक्राच्या मधोमध नसतो हें सांगावयास नको. हा घडा किंवा गोळा सूचीमुख बाणानें फोडावयाचा.

४ युगी—

बाण भंग करावर्त काष्ठच्छेदन-
मेव च ॥
बिन्दुकं गोलकयुगं योवेति जयी
भवेत् ॥

गरगर फिरणारे लांकूड किंवा बाण याला जो फोडतो त्याला युगी म्हणतात. बाण मारणारासमोर तें लांकूड एका प्रदक्षिणेंत दोनदां येतें व तें या दोन वेळां एकएका बाणानें फोडतां येतें म्हणून या कर्माला "युगकर्म" म्हणतात.

५ बाणच्छेदी—

लक्ष्यस्थाने धृतं काण्डं सन्मुखं
च्छेदयेत्ततः ॥
किञ्चित् मुष्टिं विधाय स्वां तिर्यग्
द्विफलकेषुणा ॥
सम्मुखं बाणमायान्तं तिर्यग्बाणं न
सञ्चरेत् ॥
प्राप्तं शरेण यच्छिद्याद्बाणच्छेदी स
उच्यते ॥

लक्ष्याच्या जागीं एक बाणच ठेवावा, जो आपल्या बाणानें तो बाण उभा चिरून टाकतो किंवा बाणानें बाण तोडतो त्याला बाणच्छेदी म्हणतात. या बाणच्छेदाबद्दल,

सम्मुखं वा समायान्तं केनाचिन्मुक्त-
मम्बरे ॥
शरं शरेण यो भेत्ति बाणच्छेदी स
उच्यते ॥

असा लिखित पोथींत पाठ आहे.

सूक्ष्मवेधी—

काष्ठेऽश्वकेशं संयम्य तत्र बद्ध्वा-
वराटिकां ॥

हस्तेन भ्राममाणं च यो हन्ति स धनुर्धरः ॥

एका लाकडाला घोड्याचा केस बांधावा व त्याच्या एका टोंकाला कवडी बांधून ती गरगर फिरत असतांना जो फोडतो तो सूक्ष्म वेधी होय.

७ काष्ठवेधी—

लक्ष्यस्थाने न्यसेत्काष्ठं सार्द्रं गोपुच्छसन्निभं ॥

यच्छिद्यात्तत् क्षुरप्रेण काष्ठवेधी स जायते ॥

लक्ष्याच्या जागीं, गाईच्या शेपटीइतक्या जाडीचें ओलें लांकूड ठेवून, तें जो क्षुरप्र बाणानें फोडतो किंवा तोडतो त्याला काष्ठवेधी म्हणतात.

८ चित्रयोधी—

लक्ष्ये बिन्दुंन्यसेच्छुभ्रं शुभ्रबन्धूक पुष्पवत् ॥

हन्ति तं बिन्दुकं यस्तु चित्रयोधि स उच्यते ॥

लक्ष्याच्या जागीं सुपारीच्या फुलाएवढा पांढरा ठिपका लावून, तें लक्ष्य आपल्याभोंवतीं फिरत असतांना त्या ठिपक्याला जो बाण मारतो, त्याला चित्रयोधी म्हणतात.

९ गोलभेदी-

काष्ठगोलं युगं क्षिप्रं दूरमूर्ध्वं व्यवस्थितं ॥

असम्प्राप्तं धरापृष्ठे तद्गोपुच्छमुखेन हि ॥

यो हन्ति शरयुग्मेन शीघ्रसन्धानयोगतः ॥

स वै धनुर्भृतां श्रेष्ठः पूजितः सर्व पार्थिवैः ॥

लाकडाचे दोन चेंडू आपल्यापुढें असलेल्या माणसानें एका मागून एक उंच फेकले असतां ते एकामागून एक दोन बाण मारून जो फोडतो त्याला गोलभेदी म्हणतात.

१० शब्दवेधी—

लक्ष्यस्थाने न्यसेत्कांस्यपात्रं हस्तद्वयान्तरे ॥

ताडयेच्छर्कराभिस्तच्छब्दः सञ्जायते यदा ॥

यत्र चैवोद्यते शब्दस्तं सम्यक् तत्र चिन्ततेत् ॥

कर्णेन्द्रियमनोयोगाल्लक्ष्यं निश्चयतां नयेत् ॥

पुनःशर्करया तञ्च ताडयेच्छब्दहेतवे ॥

पुनर्निश्चयतां नेयं शब्दस्थानानुसारतः ॥

ततः किञ्चित् कृतं दूरं नित्यं नित्यं विधानतः ॥

लक्ष्यं समभ्यसेद्धान्ते शब्दवेधनहेतवे ॥

ततो बाणेन हन्यात्तदवधानेन तीक्ष्ण धीः ॥

एतश्च दुष्करं कर्म भाग्ये कस्यापि सिद्धयति ॥

लक्ष्याचे ठिकाणीं एक कांशाचें भांडें ठेवावें व त्याला खडा मारून आवाज करावा. हें भांडें डोळ्यांनीं न पाहतां नुसत्या आवाजा-

वरून जो फोडतो तो शद्बवेधी होय. अंधारांत आवाजावरून शत्रूला मारण्यास या अभ्यासाची आवश्यकता आहे.

११ **बाणावली**--धनुष्याच्या दोरीला एक मूठभर बाण लावून ते तिरपे, एकदम दहा दिशांना सोडले म्हणजे त्याला "चापबाणावली" म्हणतात. असेच बाण एकदम घेऊन एकामागून एक सोडले म्हणजे त्याला "गुण-बाणावली" म्हणतात. एकदम पुष्कळ बाण न घेतां बाणापाठीमागें बाण सोडणें व त्यांची एक रांग दिसेल असें करणें याला "बाणावली" म्हणतात.

याप्रमाणें निरनिराळें अनेक प्रकारचें कौशल्य आहे व जे धनुर्धर आपली बुद्धि वापरून, सामर्थ्य खर्चून, व सतत अभ्यास करून या विद्येंत यश संपादन करतात त्यांची मोठी कीर्ति होते. भगवान् रामचंद्रांनीं पायीं व एकटे असतांना चौदा हजार राक्षस मारले.

चतुर्दशसहस्राणि रक्षसां भीम-
कर्मणांम् ॥
हतानि सहसायुद्धे रामेणैक
पदातिना ॥

अर्जुनानें खालीं उकळणाऱ्या तेलांत पाहून वर मत्स्ययंत्राचा वेध केला. पृथ्वीराजहि उत्तम शब्दवेधी होता. या गोष्टी इतिहासांत धनुर्धरांचीं नांवें चिरस्मरणीय झाल्याची उदाहरणें आहेत.

धनुष्याचा अभ्यास करतांना कोणत्या-बाबतींत चुका होतात हें मागें ठिकठिकाणीं आलेंच आहे तथापि पुनरपि त्या येथें एक-वार सांगितल्या पाहिजेत. हे दोष टाळावे म्हणूनच येथें एकत्र लिहिले आहेत.

१ **पाय**--पायांचीं बोटें उचलूं नयेत, जमिनींत रोवूं नयेत, टांचेवर उभें राहूं नये, मागचा पाय ढिला असूं नये.

२ **गुडघा**--गुडघे जास्त किंवा कमी प्रमाणांत वांकवूं नयेत व ते लटपटूं देवूं नयेत.

३ **मांड्या**--लटपटूं नयेत व वांकड्या नसाव्या.

४ **कंबर**--कंबर वांकवूं नये, फार ताठ नसावी.

५ **पोट**--धनुष्याचा अभ्यास करतांना पोट साफ असावें.

६ **छाती**--छाती धडधडूं नये किंवा संकुचित करूं नये.

७ **मान**-सरळ ठेवावी, वाकडी करूं नये.

८ **डोकें**--डोकें हालविणें, वर खालीं करणें, बाजूला करणें इत्यादि अयोग्य गोष्टी करूं नयेत. डोकें सरळ ठेवावें.

९ **तोंड**--तोंड उघडें ठेवणें, दांत आवळणें, हसणें इ. करूं नये, तें बंद ठेवावें.

१० **नजर**--वर, खालीं, बाजूला नसावी. समोर लक्ष्यावर खिळलेली असावी.

११ पुढचा व मागचा हात, मूठ, बाण सोडणें, गति व संधान मागें लिहिल्या-प्रमाणेंच असावीं.

१२ **श्रम**--खोकला येणारीं, दमेकरी, दुःखी, कामी, क्रोधी, हीं माणसें श्रमाला चांगलीं नाहींत. याप्रमाणें धनुर्विद्येंत एकूण एक्यांशीं दोष येतात ते धनु-र्धाऱ्यानें टाळावे.

धनुष्याच्या काळांत धनुष्य व बाण यांना अत्यंत महत्व होतें, अर्थात् निरनिराळीं धनुष्यें बनविणें, बाण तयार करणें या गोष्टी प्राचीन वाङ्मयांत स्वाभाविकच ठळकपणें दिसल्या पाहिजेत म्हणून आतां या विषयाकडे वळूं. प्रथम धनुष्य हा विषय घेऊं.

पूर्वींच्या काळीं धनुष्यें लांकूड, शिंग, व धातू यांची करीत असत हें मागें लिहिलेंच आहे. धनुष्य शब्दाचे जे निरनिराळे पर्याय संस्कृत वाङ्मयांत आढळतात त्यावरून धनुष्याची कुलकथा समजते. चाप व धनु यांचा एक अर्थ वर्तुळखंड असा आहे. ओढलेलें धनुष्य वर्तुळखंडासारखें आकारानें होत असल्यामुळें, चाप व धनु यांचा अर्थ धनुष्य असा झाला. कोदंड म्हणजे भुंवई, धनुष्याचा पण आकार भुंवईसारखा आहे, म्हणून कोदण्ड म्हणजे धनुष्य असें ठरलें. कार्मुक शब्दाचा एक अर्थ कळक असा आहे व कळकाचींच प्रायः धनुष्यें करीत, म्हणून धनुष्याला कार्मुक नांव मिळालें व कळकाला धनुर्वृक्ष असें लोक म्हणूं लागले. पिंपळालाहि धनुर्वृक्ष म्हणतात. यावरून लोक पिंपळाच्या फांदीचेंहि धनुष्य करीत असले पाहिजेत. वडाच्या पारंबीचेंहि धनुष्य करीत व त्याला चामड्याची वादी लावीत असत, याला 'अजगव' म्हणत. अज म्हणजे वड व गव म्हणजे बैल. या धनुष्याला "पिनाक" म्हणतात व हें शंकराचें धनुष्य म्हणून प्रसिद्ध आहे. मांधात्याचें धनुष्य "अजगव" असल्याचें प्रसिद्ध आहे. [वनपर्व अ० १२८ श्लोक ३४] "अजगव" म्हणून बकऱ्यासारखे लांब केंस असलेले लहान बैल आहेत व ते हिमालयाच्या आसमंतात भागीं असतात. त्यांच्या शिंगाचें किंवा पाठीच्या कण्याचें धनुष्य करीत असावे, असेंहि पण कित्येकांनीं लिहिलें आहे. दुसरीं धनुष्यें शिंगाचीं व त्याला तांत लावीत असत. "शार्ङ्गधनुष्य" विष्णूचें म्हणून प्रसिद्ध आहे. अर्जुनाचें धनुष्य गेंड्याचें होतें व त्याला नांव "गांडीव" असें होतें. गांडीव शब्दाची व्युत्पत्ति दोन तऱ्हेनें करतात. गंडी—वज्रग्रंथी—बळकट गांठ—अशा गांठी ज्या धनुष्याला आहेत तें. दुसरी व्युत्पत्ति--गंडा--खड्गमृग--गेंडा--गेंड्याच्या पाठीच्या कण्याचें केलेलें धनुष्य. अर्जुनाला हें धनुष्य खांडववन दाहाचे वेळीं मिळालें ही गोष्ट प्रसिद्ध आहे. धातूचें धनुष्य करून त्याला रेशमाची दोरी लावली म्हणजे त्याला "गांडीव" म्हणावें असेंहि कित्येकानीं सुचविलें आहे. वराहाच्या-रानडुकराच्या कण्याचींहि धनुष्यें करीत असत असें दिसून येतें.

सिन्धुराज्ञोऽर्धचन्द्रेण वाराहं
स्वर्णभूषितम् ॥ ३९
भीष्म प० अ० ९२

बांबूचें धनुष्य करून त्याला कापसाची दोरी लावली म्हणजे त्याला कोदण्ड म्हणावें. याप्रमाणें धनुष्याचे चार प्रकार होतात. धनुष्यांना बळकटी आणण्याकरतां व शोभेकरितां त्यांचे भोवतीं सोन्याच्या पट्ट्या किंवा कड्या आवळून बसवीत असत. हेमपट्टानुबद्ध, रुक्मांगद, स्वर्णभूषित अशीं विशेषणें धनुष्याला लावलेलीं आढळतात, त्यांचा अर्थ हाच आहे. तसेंच धनुष्याचे पाठीसहि सोन्याची किंवा इतर धातूची पट्टी बसवीत. "हेमपृष्ठानि चापानि" अशा शब्दांवरून ही गोष्ट सम-

जून येते. रावणाचें धनुष्य तर " मुक्तामणि–विभूषितम् " १० [अर० कां० स० ५१] मोतीं व मणी यांनीं शृंगारलेलें होतें. रामचंद्राचें धनुष्य " हेमपृष्ठ " असून तें " हेमवज्र विभूषितम् " असें होतें–

इदं दिव्यं महच्चापं हेमवज्र-
विभूषितम् ॥ ३२

अर० कां० स० १२

हें धनुष्य अगस्तींनीं रामाला दिलें होतें. वज्र शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक अर्थ, फार बळकट पोलाद व दुसरा अर्थ हिरा. दोनहि अर्थ येथें संभवतात. कर्णाच्या धनुष्याचें नांव " कालपृष्ठ " असें आहे. काल म्हणजे लोखंड असा एक अर्थ आहे, अर्थात् धनुष्याचे पाठीस जाड लोखंडी पट्टीहि बसावीत असत. रामलक्ष्मणांचीं धनुष्यें " चित्रानुलेपने " अशीं होतीं असें रामायणांत वर्णन आढळतें. यावरून धनुष्यावर दाट रंगाची चित्रविचित्र नक्षीहि काढीत असत असें दिसतें. पाण्डवांनीं अज्ञातवासांत असतांना आपलीं धनुष्यें शमीवृक्षाच्या ढोलींत ठेविलीं होतीं व उत्तरगोग्रहणाच्या वेळीं उत्तरानें तीं खालीं काढलीं. त्यांचें वर्णन महाभारतांत आलें आहे [विराटपर्व अ. ४२ व ४३] पहा.

बिन्दवो जातरूपस्य शतं यस्मिन्
निपातिताः ॥
सहस्रकोटिसौवर्णाःकस्यैतद्धनुरुत्तमम्॥

अर्जुनाच्या धनुष्यावर, जातरूप व सुवर्ण नांवाच्या दोन प्रकारच्या टिकल्या–[बिंदु] शेंकडों हजारों बसविल्या होत्या. भीमाच्या धनुष्याचे पाठीवर सोन्याचे हत्ती खोदून बसविलेले होते.

वारणा यत्र सौवर्णाः पृष्ठे भासन्ति
दंशिताः

धर्मराजाच्या धनुष्याच्या पाठीवर तांबड्या पिवळ्या रंगाच्या व चकचकित अशा 'इंद्रगोप' किड्यांच्या सोन्याच्या आकृति काढलेल्या होत्या. नकुळाच्या धनुष्यावर सोन्याचे तीन मोठे सूर्य बसविले असून सहदेवाचें धनुष्य सोनें व मणी यांनीं शृंगारून त्यावर सोन्याच्या टोळांचीं चित्रें काढलीं होतीं. धनुष्याला 'त्रिनतम्' असें विशेषण लावलेलें आढळतें. तसेंच 'त्रिनत' असें धनुष्याचें एक नांवहि आहे. धनुष्य ओढलें असतां दोरीचा मध्यभाग व धनुष्याचीं दोनहि टोंकें या तीन ठिकाणीं तें वांकलेलें दिसतें म्हणून हें विशेषण त्यास लावीत असावेत किंवा इंग्लंडांत तीन तुकडे जोडून धनुर्दंड करीत असत त्यामुळें तें धनुष्य तीन ठिकाणीं वांके, म्हणून लोक त्यास त्रिनत म्हणत असावेत.

धनुष्याची दोरी बैल किंवा हरिण यांच्या स्नायूंची--तांतींची करीत म्हणून दोरीला " गव्या " असें एक नांव पडलेलें आहे. दुसरें नांव " गुण " दोनतीन–द्विगुण–दोऱ्या वळून केलेली दोरी ती गुण. " मौर्वी " असेंहि पण दोरीला म्हणतात. " मूर्वा "–चिल्हा–नांवाच्या एका चिवट वेलीपासून बनविलेली ती मौर्वी. या दोरीला " शिंजिनी " असें म्हणतात. यावरून या दोरीला लहान लहान घुंगुर बांधीत असले पाहिजेत. धनुष्याचे दोरीला " लाचक " असा एक शब्द आहे. त्याचा मूळचा अर्थ झाडाची साल असा आहे. यावरून कोणत्या तरी काळीं एकाद्या झाडाच्या चिवट सालीचा लांब तुकडा कापून त्याचा

धनुष्याचे दोरीसारखा उपयोग करीत होते असें वाटतें. वांबूच्या सालीचा दोरी करितां उपयोग करतात. धनुष्याच्या दंडाला दोरी नेहमींच लावून ठेविली तर दंडाचा ताण किंवा जोर नाहींसा होतो, याकरितां धनुष्याचे एका टोंकाला दोरी अडकवून ठेवलेली असते व धनुष्याचा उपयोग करावयाचे वेळीं धनुष्य वांकवून ती दुसऱ्या टोंकांत अडकविण्यांत येते. याप्रमाणें दोरी अडकविल्यानंतर धनुष्याची कांब व दोरी यामधील अंतर १२ अंगुळें असावें. कमी जास्त असूं नये असें शास्त्रकारांचें म्हणणें आहे.

विन्यासो धनुषश्चैव द्वादशां-
गुलमन्तरम् ॥
ज्यया विशिष्टः कर्तव्यो नातिहीनो
न चाधिकः ॥
अग्नि पु०

बाण.

संस्कृत वाङ्मयांत बाणाला जे अनेक शब्द वापरले आहेत ते निरनिराळ्या कारणानें वापरले आहेत. त्यांत बाणाचें घटकद्रव्य, त्याचा फाळ, पिसारा व गति हे प्रकार मुख्य आहेत. म्हणून आतां एकेक प्रकाराबद्दल क्रमशः विचार करूं. घटकद्रव्य–कदंब, कांड, पीलु, पुष्कर, विशिख, शर, शृंगज, सुपर्वन् इ. शब्द बाणाच्या घटक द्रव्याचे वाचक आहेत. कंदब किंवा पुष्कर वृक्षाच्या जून फांद्या, शर, विशिख, कांड, इत्यादि निरनिराळ्या प्रकारचे पांढरे व काळे बोरू, पीलु जातीच्या ताडाच्या झाडाचा मधला दांडा, सुपर्वन् नांवाचा कळक व शृंगज–कोणा एकाद्या जनावराचें सरळ शिंग यांचे बाण पूर्वी करीत असत असें वरील शब्दांवरून दिसून येतें. परंतु राज्यांची वाढ झाल्यावर बाणहि पुष्कळ लागूं लागले व अशा वृक्षांपासून पाहिजे तितके व सर्वतोपरी उत्तम बाण मिळणें कठीण होऊं लागलें. तेव्हां गरज ही अक्कल सुचविते या म्हणीप्रमाणें बाणाच्या द्रव्यांतहि फरक पडला. याच्या पुढचे बाण म्हणजे अर्धे लोखंडाचे किंवा सगळे लोखंडाचे हे होत. अशा लोखंडी बाणांना "अर्ध नाराच व नाराच" अशीं नांवें होतीं. या शिवाय माकड, हत्ती, किंवा बैल यांच्या हाडांचेहि सगळे बाण किंवा नुसतें फळ करीत असत. "तेषां मुखानि आयस, अस्थि, दारवानि" कौटि. अ० अधि. २ अ. १८–१२. चाणाक्यानें बाणाचे फाळ लोखंड, हाडें व लांकूड असे तीन प्रकारचे सांगितले आहेत. पण हाडांचे फाळ लावलेले बाण शरिरांत घुसल्यास विषारी बाणाच्या जखमेप्रमाणें जखम होऊन ती बरी होत नसे. म्हणून असले बाण युद्धांत निषिद्ध मानले गेले होते. **पिसारा**–बाणाला जीं अनेक प्रकारचीं पिसें लावीत त्यावरून अनेक नांवें प्रचारांत आलीं. कलापी, शिखंडी, इत्यादि नांवावरून बाणांस मोरांचीं पिसें लावीत हें उघड दिसतें. त्याचप्रमाणें गार्ध्रपत्र, कंकपत्र [बहिरी ससाणा] इत्यादि नांवांवरून गिधाडें, ससाणा, या पक्ष्यांचीं पिसें बाणांस लावीत असत. अर्जुनाच्या बाणांना गिधाडांचीं पिसें लावलेलीं होतीं–

विपाठाः पृथवः कस्य गार्ध्रपत्राः
शिलाशिताः ॥७॥
विराटपर्व अ० ४२

बाणाचे पिसाऱ्याचे भागाला " पुंख " असें सामान्य नांव आहे. पुंख शब्दाचा दुसरा अर्थ वहिरीससाणा असा आहे. या वरून कंक पक्ष्याचींच पिसें बाणाला मुख्यतः लावीत असत. नाराचासारखे सबंध लोखंडाचे केलेले जड बाण किंवा " विपाठा " सारखे मोठे बाण यांना हवेंत तोलून धरूं शकतील अशीं बहुधा गिधाडांचींच मोठीं पिसें लावीत असत. बाणाला पिसें दोन किंवा चार लावीत असत. क्वचित् सहाहि लावीत. बाणाला षड्जवाज–असा शब्द लावलेला आढळतो. वाज–पंख या वरून हें दिसून येतें. कित्येक ठिकाणीं बाणांस हेममुख, रुक्मपुंख अशीं विशेषणें दिलेलीं आढळतात. भीमाचे बाण हेममुख होते–

कस्येमे शुकपत्राभैः पूर्वैरर्धैः
सुवाससः ॥
उत्तरैरायसैः पीतैर्हेमपुंखैः
शिलाशितैः ॥ १०
विराट० अ० ४२

हीं पिसें प्रत्यक्ष सोन्याचीं बनविणें अशक्य असल्यामुळें एकाद्या सोनेरी रंगाच्या पक्ष्यांचीं पिसें बाणांस लावीत असले पाहिजेत किंवा " हेमपिनद्धपुंखः " असें जें एक बाणाला विशेषण येतें त्यांत सांगितल्याप्रमाणें पिसें सोन्याच्या पट्ट्यांनीं, तारांनीं, कड्यांनीं, किंवा जरतारी दोऱ्यानें बळकट आवळून बाणास बांधीत अथवा बसवीत असत. क्वचित् बाणाला घुंगुर असल्याचेंहि आढळून येतें. बाण चित्र-विचित्र असेहि करीत असत. सहदेवाचे बाण असे घुंगुर लावलेले व चित्रविचित्र होते—

येत्विमे भास्कराकाराः सर्वपारसवाः
शराः ॥
एते चित्रक्रियोपेताः सहदेवस्य
धीमतः ॥ १७
विराट० अ० ४३

" **किंकिणी सायको महान्** " १२
विराट० अ० ४२

फळ.

बाणाच्या फळाच्या आकारावरून बाणास अनेक नांवें दिलेलीं आढळतात व म्हणून या नांवांवरून फळाच्या आकाराचा बोध होतो. प्रथम बाण शब्दाचाच अर्थ पाहिला तर " गाईचा आचळ " असा एक अर्थ आहे. यावरून बाणाचें फळ एका काळीं आचळाच्या आकाराचें होतें असें दिसतें. मागें बाणांचीं कांहीं नांवें लिहिलीं आहेत व त्यांच्या फळांचे आकारहि लिहिले आहेत. आतां आणखी कांहीं लिहितों–१ **कर्णी** किंवा **वराह कर्ण**-डुकर इत्यादि जनावरांच्या कानांप्रमाणें दोन उलटे कांटे असलेलें फळ ज्या बाणास आहे. असा बाण शरिरांत घुसल्यानंतर ओढून काढ-तांना आंतडीं बाहेर येतात. २ **बस्तिक**–फळ व बाणाचा दांडा यांचे जोडाचे जागीं शिथिल असलेला. याचा हेतु असा कीं--हा बाण शरिरांत घुसल्यानंतर बाहेर काढतांना शरदंड मात्र बाहेर निघावा व फळ तसेंच शरिरांत घुसून राहावें. बस्तिक म्हणजे शिंगाचा केलेला बाण असाहि एक अर्थ केला आहे. ३ **सूचि**-कर्णी जातीच्या बाणासारखाच हा बाण पण पुष्कळ कांटे असलेला. ४ **कपिश**–जड पोलादाचा बाण. याला धनुष्य फार ओढावें लागत नाहीं पण

हा शरिरांत घुसतो. ५ **जिह्मग**--या बाणाचा नेम एकीकडे धरल्यासारखा दिसतो व बाण दुसरीकडेच जाऊन लागतो, अर्थात् याचा शरदंड किंचित् वांकडा असला पाहिजे. ६ **नालीक**–नाल शद्बाचा मूळ अर्थ कमळ इत्यादि वेलींसारख्या वेलींचा पोकळ देठ; तेव्हां या बाणाशीं नळीचा कांहींतरी संबंध आहे. याचें फाळ पोकळ असतें व त्यामुळें याला हें नांव पडलें असावें. हा याचा एक अर्थ झाला. दुसरा अर्थ सगळाच लोखंडाचा बनविलेला पण लहान क्षुद्र नाराच असा आहे. जमदग्नींनीं सांगितलेला अर्थ मागें दिला आहे. फार दूर, फार उंच व किल्ल्याच्या तटावरून आंत टाकण्यास उपयोगी असा हाच बाण होय. या सहा बाणांचा उपयोग युद्धांत करूं नये असा प्राचीनकाळीं नियम होता पण भारतीय युद्धांत कर्णी व नालीक यांचा उप- योग दोनहि बाजूंकडून सरसहा केला जात असे. इग्लंडांत चौथ्या एडवर्डाचे वेळीं रात्रीं एकमेकांना इशारा देण्याकरतां शीळ वाजल्या- प्रमाणें आवाज करणारे बाण वापरीत असत. चिनी लोकहि असाच एक बाण करीत असत. नालीक बाणाचा असाहि अर्थ होईल असा कित्येकांनीं तर्क केला आहे, पण ही केवळ शद्ब- व्युत्पत्ति आहे. यामुळें हा अर्थ ग्राह्य धरतां येत नाहीं. १ **अवीकर्ण**–उंदीर किंवा मेंढा यांच्या कानासारखा फाळ असलेला. २ **इपिका**– चित्रकाराच्या कुंचलीच्या आकारासारखा फाळ असलेला. ३ **क्षुर**–वस्तऱ्यासारखें फाळ असलेला किंवा पुढें टोंक व दोन्ही बाजूंना धार असलेला [तीक्ष्णाग्रः पार्श्वधारः] ४ **शिलीमुख**–बेडकीच्या तोंडाप्रमाणें फाळ असलेला. ५ **कर**–पंजाच्या आकारासारखें फाळ असलेला. ६ **चटकामुख**–सापाचे व चिमणीचे मुखाप्रमाणें फाळ असलेला. ७ **कूर्मनख**–कांस- वाच्या पायाच्या आकाराचें फाळ असलेला. ८ **विपाठ**–ताक घुसळण्याच्या रवीच्या माथ्या- प्रमाणें फाळ असलेला. ९ **भल्ल**--मासे धरण्याच्या गळाप्रमाणें मोठें फाळ असलेला. १० **विशिख**– नागाच्या फणी सारखें फाळ असलेला. ११ **विकर्ण**--अंकुशासारखें फाळ असलेला. इत्यादि. या शिवाय विशिखा, वितास्तिक,--[एक वीत लांबीचा] क्षुद्रक इत्यादि लहान आकाराच्या बाणांचा उपयोग दोघां योध्यां- मध्यें अंतर फार थोडें असे तेव्हां करीत. म्हणूनच अशा बाणांस " आसनवेधी " व " लघुवेधी " असें म्हणत असत. असे वितास्तिक बाण कसे सोडावे हें भारतीय युद्धांत ५--६ जणच जाणत होते असें द्रोण- पर्वांत एका ठिकाणीं म्हटलें आहे.

येतु वैतास्तिकानाम शरा आसन्न-
योधिनः ॥ ४२
निकृष्टयुद्धे द्रोणस्य नान्येषां सन्ति-
ते शराः ॥
ऋते शारद्वतात् पार्थात् द्रौणेर्वैक
र्तनात्तथा ॥ ४३
प्रद्युम्नयुयुधानाभ्यामभिमन्योश्च
भारत ॥ ४४

द्रोणपर्व अ० १९१

लक्ष्याचें स्वरूप व अंतर यांवरूनहि बाणांना निरनिराळीं नांवें प्राप्त झालीं आहेत. तीं अशीं १ **दूरवेधी**-लांब अंतरावर जाणारे. २ **दृढवेधी**–कठिण लक्ष्य भेदणारें. ३ **सूक्ष्मवेधी**– गुंजेसारखे लहान लक्ष्य भेदणारे. ४ **मृदुवेधी**–

अंड्यासारखे मृदु लक्ष्य वेधणारे. ५ **शब्दवेधी** आवाजावरून अदृश्य लक्ष्य भेदणारे.

वाण मुख्यतः काळ्या किंवा पांढऱ्या वळकट वेळूचे अगर कळकाचे करीत आणि कांहीं वाण अर्धे लोखंडाचे किंवा सबंध लोखंडाचेहि करीत असत. असे अर्धनाराच किंवा नाराच वाण पाण्डवकालीं भारतवर्षाच्या प्राच्य देशांत होत असत. राजसूय यज्ञाचे वेळीं पूर्वेकडील राजांनीं असले अनेक वाण पांडवास करभार म्हणून दिले होते.

नाराचानर्धनाराचान् शस्त्राणि विविधानि च ॥
एतद्दत्वामहद्द्रव्यं पूर्वदेशाधिपा नृपाः ॥ ३५

सभापर्व अ० ५१

वाणाची लांबी सामान्यतः " **त्रिपुट** " " **त्र्यरत्नि** " असे. " **त्रिपुट** " याचा एक अर्थ " **हात** " असा आहे व दुसरा अर्थ " वाण " असा आहे. या वरून वाण कमीत कमी एक हात लांब असे. एका टीकाकारानें पुट म्हणजे वीत असा अर्थ दिला आहे. या वरून बाणाची लांबी दीड हात होते. **अरत्नि** म्हणजे मुंडाहात. अर्थात् बाणाची लांबी जास्तींत जास्त तीन मुंडेहात असावी. बारा मुठी लांबीचा बाण उत्तम, अकरा मुठींचा मध्यम व दहा मुठींचा कनिष्ठ असें आग्निपुराणकारानें सांगितलें आहे.

ज्येष्ठस्तु सायकोज्ञेयो भवेद्द्वादश मुष्टयः ॥
एकादशस्तथा मध्यः कनीयान् दश मुष्टयः ॥

दंत म्हणजे वाणाचें टोंक असा एक अर्थ आहे. यावरून वाणाचे टोंकास एखाद्या जनावराचा दांत लावीत असावें असें अनुमान होतें. तसेंच विषांकुर म्हणजे एखाद्या झाडाचा विषारी कांटा, हाहि फाळाचे ठिकाणीं लावण्याची पद्धत होती. पण पुढें यांचे ऐवजीं फाळ लोखंडाचेच लावण्याची पद्धत सर्रास सुरू झालेली दिसते. कित्येक प्रसंगीं वाणाचें हें टोंक विषांत बुडवून वाळवून ठेवीत असत. पण युद्धामध्यें 'दंतयुक्त' ' विषांकुर ' व ' विषलित ' वाण वापरूं नयेत असा प्राचीनकाळीं नियम होता. वाणाचे फाळाला ' शंकु ' असें एक नांव आहे.

शंकूचा एक अर्थ दोन अंगुळें लांब असा आहे. अर्थात् एकाकाळीं बाणाच्या टोंकाची लांबी दोन बोटें होती व आकार पिरामीड सारखा होता. युरोपांत 'क्रॉस बो' धनुष्याचे बाणाचा फाळ पिरामीडच्याच आकाराचा होता. या धनुष्यांचा ख्रिस्त्यांनीं एकमेकांवर उपयोग करूं नये असा तेथें नियम होता. बाणांचीं टोकें गंजून जाऊं नयेत म्हणून त्यांस वरचेवर तेल पाजीत. बाणांच्या टोंकांना धार वरचेवर लावावी लागे व धार लावण्याचा धंदा करणारे लोक असून त्यांना 'कर्मारजीवी' 'शाणाजीवी' म्हणत असत. कधीं कधीं बाणांचे फाळांस शिळेवर घांसून धार लावीत. आपलें लाघव व हस्त कौशल्य शत्रूस कळावें म्हणून बाणावर वीरांचीं नांवें खोदीत असत व अशा बाणांस ' नामांकित ' असें म्हणत असत. कर्ण असें बाण युद्धांत वापरीत असे असें महाभारतांत लिहिलें आहे.

आत्मनामाङ्कितान् घोरान् राधेयः
प्राहिणोच्छरान् ॥३७॥

द्रोणपर्व. अ० १५९

तसेंच द्रोणाचार्याजवळ जे अनेक देशींचे राजपुत्र शिकत असत त्या राजपुत्रांजवळ त्यांचींच नांवें खोदलेले बाण असत.

ते स्म लक्ष्माणि विभिदुर्बाणैर्नामां-
कशोभितैः ॥२६॥

आदिप. अ० १३४

भारतीयांचीं बाणांचीं टोंकें इतकीं अत्यंत तीक्ष्ण होतीं. कीं त्यांनीं वीरांचीं शिरें धडापासून वेगळीं करतां येत, रथाचीं चाकें मोडतां येत, चिलखतें फोडून ते शरिरांत घुसत. अशाच एका तीक्ष्ण धारेच्या अर्धचंद्र बाणानें भीमानें जयद्रथाच्या डोकीचे पांच पाट काढले होते. धनुर्धराचे बळाची परीक्षा आरंभीं धनुष्य वांकविण्यांतच होत असे. जिंकलेल्या शत्रूचे अंगाला धनुष्यकोटीनें स्पर्श करणें किंवा धनुष्याची दोरी त्याचे गळ्यांत अडकविणें ही पराजय जाणविण्याची आर्यांची एक रीति होती. धनुष्याला बाण लावण्यापूर्वीं दोरी दोन चारदां ओढून पहाणें याला ' वेपन ' अशी संज्ञा असे. ' आदान, संधान ' इत्यादि संज्ञांबद्दल मागें लिहिलेंच आहे. धनुष्याला अनेक बाण लावून ते एकाच लक्ष्यावर एकसारख्या वेगानें सोडणें किंवा अनेक बाण अनेक लक्ष्यांवर एकदम सारख्या वेगानें सोडणें, याचप्रमाणें अंधाऱ्या रात्रींत नुसत्या आवाजावरून लक्ष्यवेध करणें, अथवा डोळे बांधून आवाजावरून लक्ष्यवेध करणें याला ' रहस्य ' असें यथार्थ नांव धनुर्वेदांत दिलें आहे. अशी रहस्यविद्या जाणणारे अलीकडील धनुर्धर म्हटले म्हणजे **राणा सरतानसिंह, रा. इनामदार** व **प्रो. दास** हे होत.

कवच—चिलखत.

शरीरावरकं शिल्पं वर्म इत्यभिधीयते ॥
शरीरावरकत्वं च लघुतादृढता तथा ॥
दुर्भेद्यतेति कथिता वर्मणां
गुणसङ्ग्रहः ॥
स्वल्पता गुरुता चैव मृदुता
सुखभेद्यता ॥
विरुद्धवर्णता चेति वर्मणां
दोषसङ्ग्रहः ॥

युद्धजयार्णव.

अर्थ—शरिराचें संरक्षण करण्याचें जें साधन त्याला कवच असें म्हणतात. हीं कवचें धातु, कातडें, व लांकूड यांचीं करतात. गहूंभर जाड पत्र्याचें मजबूत केलेलें कवच, डोक्याला घालण्याचें शिरस्त्राण, हीं कमरेवरील शरिराचें संरक्षण करतात. कवच हें शरिराला झांकणारें, वजनाला हलकें, मजबूत व न मोडणारें किंवा न फुटणारें असें असेल तर चांगलें. हे कवचाचे गुण समजावें. शरिराला लहान पडणारें, वजनाला जड, मऊ, सहज फुटणारें व सहजपणें शत्रूच्या नजरेस येणारें असें कवच वाईट समजावें. कवच घातलें आहे ही गोष्ट शत्रूच्या लक्षांत येऊं नये असें तें असावें. कवच अंगाला चिकटून बसलें म्हणजे त्याचा—हालचालींना अडथळा होत नाहीं व तें हलकें आणि चिवट असलें म्हणजे तलवारीचा आघात योग्य प्रकारें सहन करतें. चिलखतांचीं जीं वर्णनें आढळतात त्यावरून

चिलखतांची दुर्भेद्यता व मौल्य हीं दिसून येतात. "शैक्यायस" "कार्ष्णायस" "आयस" इत्यादि नांवें कवचाचीं आढळतात. हीं सर्व नांवें उत्तम पोलादाचीं आहेत. व हींच नित्योपयोगी आहेत. कवचें दोन प्रकारचीं तयार करीत. १ लोखंडी पत्र्याचे लहान लहान तुकडे सापाच्या कांतींप्रमाणें एकमेकांवर जोडणें, या कवचाचें नांव "निर्मोक." सापाच्या कांतीलाहि निर्मोक असा शद्ब आहे. २ लोखंडी तारा किंवा कड्या यांचें जाळें विणून त्याचें चिलखत वनविणें याला नांव "जाल" असें आहे. या जालमय कवचापेक्षां निर्मोक कवचें अर्थात् जास्त दुर्भेद्य आहेत. म्हणून निर्मोक शद्बाचा विशेष अर्थ "दुर्भेद्य कवच" असा आहे. कवचाला वारवाण [र. वं. ४—५५] व वाणवार असे शद्ब आहेत. यावरून मुख्यतः धनुष्यापासून सुटणाऱ्या वाणांपासून आपलें रक्षण व्हावें याकरतांच हीं कवचें अस्तित्वांत आली असलीं पाहिजेत असें वाटतें.

शस्त्रांची जसजशी वाढ होत जाईल व सुधारणा होत जाईल त्या वरोवरच कवचांचीहि

चिलखत अंगावर घातलेला सैनिक.



चित्र नं. १

वाढ होणार व सुधारणा होणार हें सहज सिद्ध आहे. घटोत्कचाचें कवच "कांशाचें" होतें. विराटाच्या योद्ध्यांचीं कवचें तांबें, लोह व चांदी यांचीं होतीं—

शरैः संच्छिद्यमानानां कवचानां
महात्मनाम् ॥
ताम्र राजतलौहानां प्रादुरासी-
न्महास्वनः ॥ ७

विरा० पर्व० अ० ६२

चिलखतांवर सोन्या रुप्याचीं फुलें, कमलें, सूर्यचंद्राची आकृति, व बिंदु इत्यादि कुसरीचीं कामेंहि करीत असत. विराट व त्याचे पुत्र यांचीं कवचें पोलादी तारा व पत्रे यांचीं केलेलीं असून त्यांवर सोन्याचें पाणी दिलेलें होतें व त्यांवर सोन्याचीं कमलें, सूर्यचंद्र, डोळे, भोंवरे, इत्यादि शेंकडों काढलेले होते. चिलखतावर कधीं कधीं वैदूर्य मण्याच्या गोळ्याहि जडवीत असत—

तरुणादित्यसङ्काशं वैदूर्यगुलि-
काचितम् ॥
विशीर्ण पतितं भूमौ कवचं कस्य
कांचनम् ॥ ४५

रामा० अर० सर्ग० ६४

पूर्व देशच्या राजांनीं पाण्डवांना राजसूय यज्ञाचे वेळीं ज्या अनेक वस्तु करभार म्हणून दिल्या त्यांत हस्तिदन्ती कवचेंहि त्यांनीं दिलीं होतीं—

मणिकाञ्चनचित्राणि गजदन्त-
मयानि च ॥
कवचानि विचित्राणि शस्त्राणि
विविधानि च ॥

सभापर्व अ० ५१


कवचाला "मर्मच्छेद" असा एक शब्द आढळतो. यावरून प्राचीनकाळीं सर्व शरीर झांकणारें एकच कवच करीत नसून निरनिराळे अवयव—मर्मस्थानें—झांकण्यासाठीं वेगवेगळीं कवचें करीत असत असें दिसतें. असे कवचांचे निरनिराळे प्रकार चाणाक्यानें सांगितले आहेत शिरस्त्राण, कंठत्राण, कूर्पास [कोपरापर्यंत आवरण], वारवाण [घोट्यापर्यंत आवरण], पट्ट [बिन बाह्यांचें आवरण], नागोदारिका—अंगुलित्राण अधि० २ अ० १८—१७. अंगुलित्राण व तल—हीं दोन कवचें विशेष प्रकारचीं व विशिष्ट उपयोगाचीं अशींच करीत असत. धनुष्य नेहमीं डाव्या हातांत धरावें लागतें व बाण जेव्हां जोरानें निघून जातो त्यावेळीं त्याचा स्तंब व पिच्छ डाव्या हाताचे बोटांस घासतो. या घासण्यानें बोटांस इजा होऊं नये म्हणून "अंगुलित्राण" धारण करीत असत. तसेंच धनुष्याची दोरी डाव्या दंडाचे आंतील भागास घांसून जाऊं नये म्हणून "तल" नांवाचें कवच दंडास बांधीत; हें बहुधा गोधा म्हणजे सुसरीच्या पाठीच्या जाड कातड्याचें करीत असत. या कवचाला गोधा हाहि एक पर्याय वाचक शब्द आहे त्यावरूनहि ही गोष्ट सिद्ध होते.

मुष्टियुद्धांत 'कीलकवच' घालीत असत. मुक्की (बॉक्सिंग) खेळतांना मुठीला दृढता येण्यासाठीं आंगठा आंत घालतात व जी मूठ वळतात तिला 'वज्रमुष्टि' असें म्हणतात. असल्या वज्रमुष्टीचा मर्मस्थानावर आघात होऊं नये म्हणून कीलकवच (बारीक खिळ्यांचीं टोकें थोडथोडीं वर आणलेलीं असें) घालीत असत. वर सांगितलेली

धातूंचीं कवचें मोठ्या योग्यतेचे लोक घालीत, पण सामान्य शिपाई जाड कातड्याचें कंचुक —जाकीट—घालीत असत व त्याला 'वीरंधर' म्हणत असत. तरवारीपासून आपलें रक्षण व्हावें म्हणून ढालीचा उपयोग करतात. या ढालीला फलरु, फल व चर्म असें तीन शब्द आहेत. ढाली कांसवाची पाठ किंवा गेंड्याचें कातडें यांच्या करतात. लांकडाच्या तसेंच कातड्यांच्या ढाली व कवचे इत्यादि करण्याची माहिती कश्यपांनीं सांगितली आहे. वसिष्ठ धनुर्वेदाचे वेळीं ही काश्यपकवचविद्या होती असें सुज्ञांनीं म्हटलें आहे. ज्याप्रमाणें भारतीयांच्या शस्त्रांस तीक्ष्ण धार होती त्याप्रमाणें कवचेंहि पण अभेद्य अशींच निर्माण होत होतीं. जयद्रथवधाच्या दिवशीं कौरव सैन्यांत अर्जुनाचा रथ घुसला त्यावेळीं द्रोणाचार्यांनीं दुर्योधनाला एक अभेद्य कवच दिलें व दुर्योधन अर्जुनापुढून निघून गेला. मागून अर्जुनानें दुर्योधनावर बाण सोडले, पण तें कवच घातल्यामुळें अर्जुनाचे बाण दुर्योधनाला लागत असूनहि ते सर्व फुकट गेले असें वर्णन महाभारतांत आलें आहे.

सांग (लोखंडी भाला)

सुमेरसिंग गारदी याची सांग व ढाल.



चित्र नं. २

अष्टाविंशांस्तु तान् बाणान् तान्
विप्रेक्ष्य च निष्फलान् ॥५॥

द्रोणपर्व अ० १०३

तसेंच हें कवच 'अभेद्य' आहे असेंहि अर्जुनानें म्हटलें आहे. ढाल बनविणारा हिंदु-धर्मशास्त्राप्रमाणें सरळ स्वर्गलोकीं निघून जातो अशी ढालींची महती गाइली आहे.

भाता.

बाण ठेवण्याचें साधन म्हणजे भाता होय. भात्यास 'जंभ' व 'कलाप' असें दोन शब्द आहेत. विश्वामित्राबरोबर जाणाऱ्या रामलक्ष्मणांचे भाते मोरपिसांचे होते.

कलापिनौ धनुष्याणी शोभयानौ
दिशो दश ॥७॥

वा. रा. बाल. स. २२

जंभ शब्दावरून जांभई देतेवेळीं तोंडाचा जसा आकार होतो तसा भात्याच्या तोंडाचा आकार असून तो मोरपिसांचा करीत असत असें दुसऱ्या शब्दांवरून दिसून येतें. भाते, बैल इत्यादिकांच्या शिंगांचे, कातड्याचे, किंवा धातूचे करीत व त्यावर सोन्याची नक्षीहि काढीत. युद्धांत हत्ती, घोडे, रथ व पायदळ या चतुरंग दळाजवळ भाते असत व त्यांचीं नांवेंहि निरनिराळीं आहेत. बाणांनीं भरलेले व रथांत ठेवण्याचे भाते फार मोठे असत, त्यांस 'तूणीर' म्हणत असत. एका तूणीरांत दोनशें बाण ठेवीत असत. रथ्याजवळ चारशें साधे बाण असावे व ते दोन भात्यांत ठेवावें असें वर्णन आहे.

चतुश्शतञ्च काण्डानां
तूणद्वयनिवेशितम् ॥

कोदण्डमण्डन.

घोडेस्वार व हत्तीस्वार यांचे भाते मध्यम असून त्यांस "उपासंग" म्हणत आणि पायदळ शिपायाचा भाता लहान असून त्याला "निषंग" म्हणत असत.

सानुकर्षाः सतूणीराः सवरूथाः
सतोमराः ॥
सोपासङ्गः सशक्तीकाः सनिषङ्गः
सहर्ष्टयः ॥ ३

महा० उद्यो० अ० १५५

नकुलाचा भाता पंच नख होता. विराटपर्व अ० ४२. पंच नख म्हणजे पांच नखांचे प्राणी, जसें हत्ती, सिंह व कासव इत्यादि. यावरून यांच्या कातड्यांचे भाते करीत असावे असें वाटतें. नकुलाच्या भात्यावर पांच सिंहांचीं चित्रेंहि पण काढिलीं होतीं—

नकुलस्य कलापोऽयं पञ्चशार्दूल-
लक्षणः ॥ १५

विरा० अ० ४३

भात्यांमध्यें चंदनाचें पीठ भरीत असत व त्यांत बाण ठेवीत. भारतीयांचें भाते व बाण अक्षय्य होते असें वर्णन आहे. विशेषतः रामाचे बाण लक्ष्याला वेधून परत येत ही गोष्ट प्रसिद्ध आहे. अगस्तींनीं असेच दोन भाते रामाला दिले होते.

तूणी चाक्षय्यसायकौ ॥ ३३

वा० रामा० अर० १२

आस्त्रेलियांतील मूळ रहिवाशांचे "बूमरँग" परत येतात हें पाहीपर्यंत या गोष्टीवर लोकांचा विश्वास बसत नसे.


धनुष्य हें मुख्य शस्त्र असल्यामुळें त्याबद्दल येथपर्यंत विवेचन झालें. आतां चक्रादि इतर शस्त्रांचें वर्णन लिहूं.

चक्र.

चक्रं षड्हस्तपरिधि क्षुरप्रांतं सुनाभियुक् ॥
त्रिहस्तदण्डं त्रिशिखं लोहदन्तं सपाशकम् ॥

अर्थ—चक्राचा घेर सहा हातांचा असून त्याला बाहेरच्या बाजूस वस्तऱ्यासारखी धार असावी. चक्राला चांगली बैठक असावी व बैठकीला तीन हातांचा दाण्डा असावा. चक्राच्या पात्याचे तीन तुकडे असतात त्याला

निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें.



चित्र नं. ३

एक लोखंडी दांत असून, ते फिरविण्याकरतां पाश असावा. चक्राच्या दांड्याच्यावर एक बैठक असते. त्या बैठकीवर चक्र बसवून भोंवरा फिरवितात, त्याप्रमाणें पाशाच्या योगानें चक्र गरगर फिरवावें व फेकून द्यावें. दांडा आपल्या हातांत राहून गरगर फिरणारें तें चक्र शत्रूला कापून टाकतें. चक्राचे दोन भेद आहेत, 'सुदर्शन' व 'विकर्तन' १ सुदर्शन–डावीकडून उजवीकडे म्हणजे प्रदक्षिण फिरतें. २ विकर्तन–उजवीकडून डावीकडे फिरतें म्हणजे अप्रदक्षिण फिरतें. करवतण्याच्या यंत्रांतील जे गोल करवत असतात ते या चक्रासारखे असतात.

चक्राचे हात सात आहेत—

छेदनं भेदनं पातो भ्रमणं शयनं तथा ॥
विकर्तनं कर्तनञ्च चक्रकर्मेदमेव च ॥
अग्निपुराण.

१ **छेदनं**–कापणें, २ **भेदनं**–फोडणें, ३ **पात**–पाडणें, ४ **भ्रमण**–कांतणें, ५ **शयन**–लोळविणें, ६ **विकर्तन**–करवतणें, ७ **कर्तन**–तुकडा पाडणें.

हें चक्र फिरविण्यास व वापरण्यास शक्तीची फार आवश्यकता आहे. श्रीकृष्णावांचून हें चक्र शस्त्र म्हणून वापरल्याचें प्राचीन दुसरें उदाहरण मिळत नाहीं. चक्राचा घेर सहा हात म्हणजे दोन हातांचा व्यास होतो, यावरून हें चक्र सायकलीच्या चाकाएवढें असतें. याला प्रथम दांड्यावर हातांत तोलून धरलें पाहिजे, नंतर कुंभाराच्या चाकाप्रमाणें याला गति देऊन फेंकावयाचें म्हणजे हें काम लहानसहान नाहीं. श्रीकृष्णाच्या काळीं हिंदुस्थानांत चार च"पुरुषव्याघ्र"होते. बळराम, कृष्ण, जरासंध व भीमसेन. यावरून श्रीकृष्णाच्या शक्तीची कल्पना येईल. अश्वत्थाम्यानें ह्या चक्राची मागणी श्रीकृष्णाजवळ केली होती पण त्याला तें पेलतां येईना म्हणून त्यानें हा नाद सोडून दिला असें महाभारत सांगतें. श्रीकृष्णाला खांडववनदाहाचे वेळीं चक्र मिळालें. त्याचें नांव 'व्रजनाभ' असें होतें.

व्रजनाभं ततश्चक्रं ददौ कृष्णाय पावकः ॥२३ अ० २२५

भगवान् विष्णूचें जें चित्र काढतात त्या चित्रांत विष्णूच्या एका हातांत चक्र काढीत असतात. हें चक्र निराळें व श्रीकृष्ण युद्धांत वापरीत असे तें चक्र निराळें; हें आतां वाचकांच्या लक्षांत येईल. विष्णूच्या हातांतील हें लहान चक्र डोकीला साफा बांधून त्यावर धारण करतात व असा मनुष्य सिक्ख लोकांत आढळतो. हें चक्र एक हात व्यासापर्यंत आढळतें. याचे वर्णनाचा श्लोक असा आहे.

चक्रन्तु कुण्डलाकारमन्ते स्वाश्रिसमन्वितम् ॥
नीलं सलिलवर्णं तत् गतयश्चक्रसंश्रिताः ॥

अर्थ–हें चक्र कुंडलाकार म्हणजे गोल असतें व शेवटीं अश्रि म्हणजे धार असते. याचा वर्ण निळ्या पाण्याच्या रंगाप्रमाणें असतो. याचे हात मोठ्या चक्राच्या सात हातांप्रमाणेंच समजावें. गणेश पुराणांत "रथांगपाणि" म्हणून गणपतीचें वर्णन आढळतें. अर्थात् हें मोठें चक्र समजावें.

कुन्त—भाला.

हस्तः सप्तोत्तमः कुन्तः षड्हस्तै-
श्चैव मध्यमः ॥
कनिष्ठः पञ्चहस्तैस्तु कुन्तमानं
प्रकीर्तितम् ॥

अर्थ—सात हात लांबीचा भाला उत्तम, सहा हातांचा मध्यम व पांच हातांचा भाला कनिष्ठ समजावा. हत्तीस्वार व घोडेस्वार यांचे भाले पायदळी शिपायांच्या भाल्यांपेक्षां लांब असतात. पायदळाजवळचा भाला पांच हातांचा असतो.

भाला व कुन्त हे एकमेकांचे पर्यायवाचक शब्द समजले जातात व याप्रमाणें संस्कृत वाङ्मयांत प्रयोग केलेले आढळतात. पण कुन्ताचें वर्णन स्वतंत्र रीतीनें केलेलें आढळतें तें असें—

कुन्तस्त्वयोमयाङ्गः स्यात् तीक्ष्णपूट-
ङ्गषडाश्रिमान् ॥
पञ्चहस्तसमुत्सेधो बृहत्पादो
भयङ्करः ॥

अर्थ—कुन्त पांच हात लांब असतो. हा खालपासून वरपर्यंत सर्व लोखंडाचाच असतो. खालचा भाग गोल असून दिसण्यांत भयंकर दिसतो. वरचा भाग तेज असून याला सहा फाळ असतात. याचे सहा हात आहेत.

उड्डीनमवडीनञ्च निडीनं
भूमिलीनकं ॥
तिर्यक्कुलीनं निखातञ्च षण्मार्गाः
कुन्तमाश्रिताः ॥

अर्थ—१ **उड्डीन**—वरचा मार, २ **अवडीन**—खालचा मार, ३ **निडीन**—विशेष पद्धतीनें मार, ४ भूमिलीन, ५ तिर्यक्कुलीन, ६ निखात—खोदणें.

कित्येकांनीं कुन्ताचें आणखी निराळें वर्णन लिहिलें आहे—

एकादशकरः कुन्तो नवहस्तस्तु
शाबलः ॥

कुन्त अकरा हात लांब असतो व नऊ हात लांब असणारा तो शाबल होय.

दशहस्तामितः कुन्तः फालाग्रः शङ्कु-
बुध्नकः ॥
शुक्राचार्याः

कुन्त दहा हात लांब असतो, वरती फाळ असतो व खालीं शंकूप्रमाणें बूड असतें. 'कण्ठावर्त', 'कंकणावर्त', 'पृष्ठावर्त', 'कक्षावर्त' असे कुन्ताचे चार पवित्रे आहेत. सांप्रत 'सांग' म्हणून जें शस्त्र पहावयास मिळतें तें कुन्ताप्रमाणें सर्व लोखंडाचें असतें; म्हणजे वरतीं फाळ भाल्यासारखा व खालचा दांडा सर्व लोहमय असतो व बूड गोल असतें. या दांड्यावर खोदकाम केलेलें असतें व याची उंची पांच हात असते. या सांगेनेंच वीरवर बाजीप्रभु देशपांडे यांची सेना लढली होती. भाल्याचा अभ्यास हल्लीं चालूंच आहे. अलीकडील इतिहासांत श्रीमंत नागपूरकर भोसले यांचे भालाईत प्रसिद्ध आहेत. युद्धसमयीं 'भालाभर दिवस राहिला' असे उद्गार इतिहासांत आढळतात.

खड्ग—तलवार.

खड्गः पद्मपलाशाग्रो मण्डलाग्रश्च
शस्यते ॥
करवीरदलाग्रश्च घृतगन्धो विमलप्रभः॥

पंचाशदङ्गुलं श्रेष्ठं हीनं यत्तत्ततोऽ
धमम् ॥
पट्टिशं तरुवारिं च दीर्घकं नारसिं-
हकम् ॥
कात्यायनं बालकं च खड्गभेदाः
प्रकीर्तिताः ॥
ईषद्वक्रश्चैकधारो विस्तारे चतुर-
ङ्गुलः ॥
क्षुरप्रान्तो नाभिसमो दृढमुष्टिश्च
चन्द्ररुक् ॥

अर्थ–खड्गाचे तीन प्रकार आहेत. १ कमल-पत्राप्रमाणें गोल आकार, २ मंडलाप्रमाणें जरा वांकडा आकार व ३ कण्हेरीच्या पाना-प्रमाणें सरळ आकार. याला तुपासारखा वास यावा व त्यांत विजेप्रमाणें चमक असावी. ही तलवार ५० अंगुळें लांब असली म्हणजे उत्तम समजावी व हिला 'पट्टा' असें म्हणतात. याहून कमी लांबी झाली म्हणजे अनुक्रमें तिला तलवार, दीर्घक–(सुरा), नारसिंहक–(कट्यार), कात्यायन–(जंबिया) व बालक–(वाघनखें) अशीं नांवें आहेत. तरवार थोडी वांकडी असून तिला एका अंगासच धार असावी व ती वस्तऱ्यासारखी तीक्ष्ण असावी, तिची रूंदी चार अंगुळें व उभी केली असतां नाभीइतकी ऊंच असावी. मूठ मजबूत व तिला चंद्राप्रमाणें तेज असावें म्हणजे ही उत्तम तलवार होय.

तलवार हें सर्वांत प्राचीन शस्त्र आहे. इंद्राचें वज्र म्हणजे तलवार किंवा भाला असावा असें सुज्ञांचें मत आहे. वरतीं उत्तम तलवारीचें सामान्य वर्णन आलें आहे. त्यापेक्षां स्पष्ट वर्णन पुढील श्लोकांत केलें आहे तो श्लोक असा–

शुद्धांगः शुद्धवर्णश्च सुनेत्रः
सुस्वरश्च यः ॥
मृदुस्पर्शः सुसन्धेयः तीक्ष्णधारो
महागुणः ॥

अर्थ–ज्याचें अंग शुद्ध आहे, वर्ण शुद्ध आहे, ज्याचा नेत्र चांगला आहे, स्वर उत्तम आहे, हाताला मऊ लागणारा, मोडला असतां सांधणारा, व तीक्ष्ण धारेचा खड्ग उत्तम. येथें खड्ग म्हणजे तलवारच समजावी.

दीर्घता लघुता चैव स्वरविस्तीर्णता
तथा ॥
दुर्भेद्यता सुघटता खड्गानां गुण-
संग्रहः ॥
खर्वता गुरुता चैव मन्दता तनुता
तथा ॥
सुभेद्यता दुर्घटता खड्गानां दोष-
संग्रहः ॥
यावत्योर्गुणयोर्दैर्घ्ये तदर्धाङ्गुलयो
यदा ॥
प्रसरेत्तच्चतुर्थांशमिति वै मान-
मुत्तमम् ॥
युक्तिकल्पतरुः


अर्थ–तलवार लांब असावी, ती हलकी असावी, तिचा आवाज मोठा असावा, ती कशावरहि हाणली तरी मोडतां कामां नये, व मोडली तर लवकर सांधली जावी, म्हणजे ही तलवार उत्तम होय. जी तलवार आंखूड, जड, लवचिक नाहीं व फार पातळ, मोडणारी व

चक्र.

चक्रं षड्हस्तपरिधि क्षुरप्रांतं सुनाभियुक् ॥
त्रिहस्तदण्डं त्रिशिखं लोहदन्तं सपाशकम् ॥

अर्थ—चक्राचा घेर सहा हातांचा असून त्याला बाहेरच्या बाजूस वस्तऱ्यासारखी धार असावी. चक्राला चांगली बैठक असावी व बैठकीला तीन हातांचा दाण्डा असावा. चक्राच्या पात्याचे तीन तुकडे असतात त्याला

निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें.



चित्र नं. ३

एक लोखंडी दांत असून, ते फिरविण्याकरतां पाश असावा. चक्राच्या दांड्याच्यावर एक बैठक असते. त्या बैठकीवर चक्र बसवून भोंवरा फिरवितात, त्याप्रमाणें पाशाच्या योगानें चक्र गरगर फिरवावें व फेकून द्यावें. दांडा आपल्या हातांत राहून गरगर फिरणारें तें चक्र शत्रूला कापून टाकतें. चक्राचे दोन भेद आहेत, 'सुदर्शन' व 'विकर्तन' १ सुदर्शन–डावीकडून उजवीकडे म्हणजे प्रदक्षिण फिरतें. २ विकर्तन–उजवीकडून डावीकडे फिरतें म्हणजे अप्रदक्षिण फिरतें. करवतण्याच्या यंत्रांतील जे गोल करवत असतात ते या चक्रासारखे असतात.

चक्राचे हात सात आहेत—

छेदनं भेदनं पातो भ्रमणं शयनं तथा ॥
विकर्तनं कर्तनञ्च चक्रकर्मेदमेव च ॥
अग्निपुराण.

१ **छेदनं**–कापणें, २ **भेदनं**–फोडणें, ३ **पात**–पाडणें, ४ **भ्रमण**–कांतणें, ५ **शयन**–लोळविणें, ६ **विकर्तन**–करवतणें, ७ **कर्तन**–तुकडा पाडणें.

हें चक्र फिरविण्यास व वापरण्यास शक्तीची फार आवश्यकता आहे. श्रीकृष्णावांचून हें चक्र शस्त्र म्हणून वापरल्याचें प्राचीन दुसरें उदाहरण मिळत नाहीं. चक्राचा घेर सहा हात म्हणजे दोन हातांचा व्यास होतो, यावरून हें चक्र सायकलीच्या चाकाएवढें असतें. याला प्रथम दांड्यावर हातांत तोलून धरलें पाहिजे, नंतर कुंभाराच्या चाकाप्रमाणें याला गति देऊन फेंकावयाचें म्हणजे हें

काम लहानसहान नाहीं. श्रीकृष्णाच्या काळीं हिंदुस्थानांत चार च "पुरुषव्याघ्र" होते. बळराम, कृष्ण, जरासंध व भीमसेन. यावरून श्रीकृष्णाच्या शक्तीची कल्पना येईल. अश्वत्थाम्यानें ह्या चक्राची मागणी श्रीकृष्णाजवळ केली होती पण त्याला तें पेलतां येईना म्हणून त्यानें हा नाद सोडून दिला असें महाभारत सांगतें. श्रीकृष्णाला खांडववनदाहाचे वेळीं चक्र मिळालें. त्याचें नांव 'व्रजनाभ' असें होतें.

व्रजनाभं ततश्चक्रं ददौ कृष्णाय पावकः ॥२३ अ० २२५

भगवान् विष्णूचें जें चित्र काढतात त्या चित्रांत विष्णूच्या एका हातांत चक्र काढीत असतात. हें चक्र निराळें व श्रीकृष्ण युद्धांत वापरीत असे तें चक्र निराळें; हें आतां वाचकांच्या लक्षांत येईल. विष्णूच्या हातांतील हें लहान चक्र डोकीला साफा बांधून त्यावर धारण करतात व असा मनुष्य सिक्ख लोकांत आढळतो. हें चक्र एक हात व्यासापर्यंत आढळतें. याचे वर्णनाचा श्लोक असा आहे.

चक्रन्तु कुण्डलाकारमन्ते स्वाश्रिसमान्वितम् ॥
नीलं सलिलवर्णं तत् गतयश्चक्रसंश्रिताः ॥

अर्थ–हें चक्र कुंडलाकार म्हणजे गोल असतें व शेवटीं अश्रि म्हणजे धार असते. याचा वर्ण निळ्या पाण्याच्या रंगाप्रमाणें असतो. याचे हात मोठ्या चक्राच्या सात हातांप्रमाणेंच समजावें. गणेश पुराणांत "रथांगपाणि" म्हणून गणपतीचें वर्णन आढळतें. अर्थात् हें मोठें चक्र समजावें.

कुन्त—भाला.

हस्तः सप्तोत्तमः कुन्तः षड्हस्तै-
श्चैव मध्यमः ॥
कनिष्ठः पञ्चहस्तैस्तु कुन्तमानं
प्रकीर्तितम् ॥

अर्थ—सात हात लांबीचा भाला उत्तम, सहा हातांचा मध्यम व पांच हातांचा भाला कनिष्ठ समजावा. हत्तीस्वार व घोडेस्वार यांचे भाले पायदळी शिपायांच्या भाल्यांपेक्षां लांब असतात. पायदळाजवळचा भाला पांच हातांचा असतो.

भाला व कुन्त हे एकमेकांचे पर्यायवाचक शब्द समजले जातात व याप्रमाणें संस्कृत वाङ्मयांत प्रयोग केलेले आढळतात. पण कुन्ताचें वर्णन स्वतंत्र रीतीनें केलेलें आढळतें तें असें—

कुन्तस्त्वयोमयाङ्गः स्यात् तीक्ष्णपूट-
ङ्गषडाश्रिमान् ॥
पञ्चहस्तसमुत्सेधो बृहत्पादो
भयङ्करः ॥

अर्थ—कुन्त पांच हात लांब असतो. हा खालपासून वरपर्यंत सर्व लोखंडाचाच असतो. खालचा भाग गोल असून दिसण्यांत भयंकर दिसतो. वरचा भाग तेज असून याला सहा फाळ असतात. याचे सहा हात आहेत.

उड्डीनमवडीनञ्च निडीनं
भूमिलीनकं ॥
तिर्यक्लीनं निखातञ्च षण्मार्गाः
कुन्तमाश्रिताः ॥

अर्थ—१ उड्डीन—वरचा मार, **२ अवडीन**—खालचा मार, **३ निडीन**—विशेष पद्धतीनें मार, **४ भूमिलीन, ५ तिर्यक्लीन, ६ निखात**—खोदणें.

कित्येकांनीं कुन्ताचें आणखी निराळें वर्णन लिहिलें आहे—

एकादशकरः कुन्तो नवहस्तस्तु
शाबलः ॥

कुन्त अकरा हात लांब असतो व नऊ हात लांब असणारा तो शाबल होय.

दशहस्तमितः कुन्तः फालाग्रः शङ्कु-
बुध्नकः ॥
शुक्राचार्याः

कुन्त दहा हात लांब असतो, वरती फाळ असतो व खालीं शंकूप्रमाणें बूड असतें. 'कण्ठावर्त', 'कंकणावर्त', 'पृष्ठावर्त', 'कक्षावर्त' असे कुन्ताचे चार पवित्रे आहेत. सांप्रत 'सांग' म्हणून जें शस्त्र पहावयास मिळतें तें कुन्ताप्रमाणें सर्व लोखंडाचें असतें; म्हणजे वरतीं फाळ भाल्यासारखा व खालचा दांडा सर्व लोहमय असतो व बूड गोल असतें. या दांड्यावर खोदकाम केलेलें असतें व याची उंची पांच हात असते. या सांगेनेंच वीरवर बाजीप्रभु देशपांडे यांची सेना लढली होती. भाल्याचा अभ्यास हल्लीं चालूच आहे. अलीकडील इतिहासांत श्रीमंत नागपूरकर भोसले यांचे भालाईत प्रसिद्ध आहेत. युद्धसमयीं 'भालाभर दिवस राहिला' असे उद्गार इतिहासांत आढळतात.

खड्ग—तलवार.

खड्गः पद्मपलाशाग्रो मण्डलाग्रश्च
शस्यते ॥
करवीरदलाग्रश्च घृतगन्धो विमलप्रभः॥

पंचाशदङ्गुलं श्रेष्ठं हीनं यत्तत्ततोऽधमम् ॥
पट्टिशं तरुवारिं च दीर्घकं नारसिंहकम् ॥
कात्यायनं बालकं च खड्गभेदाः प्रकीर्तिताः ॥
ईषद्वक्रश्चैकधारो विस्तारे चतुरङ्गुलः ॥
क्षुरप्रान्तो नाभिसमो दृढमुष्टिश्च चन्द्ररुक् ॥

अर्थ–खड्गाचे तीन प्रकार आहेत. १ कमलपत्राप्रमाणें गोल आकार, २ मंडलाप्रमाणें जरा वांकडा आकार व ३ कण्हेरीच्या पानाप्रमाणें सरळ आकार. याला तुपासारखा वास यावा व त्यांत विजेप्रमाणें चमक असावी. ही तलवार ५० अंगुळें लांब असली म्हणजे उत्तम समजावी व हिला 'पट्टा' असें म्हणतात. याहून कमी लांबी झाली म्हणजे अनुक्रमें तिला तलवार, दीर्घक–(सुरा), नारसिंहक–(कट्यार), कात्यायन–(जंबिया) व बालक–(वाघनखें) अशीं नांवें आहेत. तरवार थोडी वांकडी असून तिला एका अंगासच धार असावी व ती वस्तऱ्यासारखी तीक्ष्ण असावी, तिची रूंदी चार अंगुळें व उभी केली असतां नाभीइतकी ऊंच असावी. मूठ मजबूत व तिला चंद्राप्रमाणें तेज असावें म्हणजे ही उत्तम तलवार होय.

तलवार हें सर्वांत प्राचीन शस्त्र आहे. इंद्राचें वज्र म्हणजे तलवार किंवा भाला असावा असें सुज्ञांचें मत आहे. वरतीं उत्तम तलवारीचें सामान्य वर्णन आलें आहे. त्यापेक्षां स्पष्ट वर्णन पुढील श्लोकांत केलें आहे तो श्लोक असा–

शुद्धांगः शुद्धवर्णश्च सुनेत्रः सुस्वरश्च यः ॥
मृदुस्पर्शः सुसन्धेयः तीक्ष्णधारो महागुणः ॥

अर्थ–ज्याचें अंग शुद्ध आहे, वर्ण शुद्ध आहे, ज्याचा नेत्र चांगला आहे, स्वर उत्तम आहे, हाताला मऊ लागणारा, मोडला असतां सांधणारा, व तीक्ष्ण धारेचा खड्ग उत्तम. येथें खड्ग म्हणजे तलवारच समजावी.


दीर्घता लघुता चैव स्वरविस्तीर्णता तथा ॥
दुर्भेद्यता सुघटता खड्गानां गुणसंग्रहः ॥
खर्वता गुरुता चैव मन्दता तनुता तथा ॥
सुभेद्यता दुर्घटता खड्गानां दोषसंग्रहः ॥
यावत्योर्गुणयोर्दैर्घ्ये तदर्धाङ्गुलयोगु यदा ॥
प्रसरेतच्चतुर्थांशमिति वै मानमुत्तमम् ॥

युक्तिकल्पतरुः

अर्थ–तलवार लांब असावी, ती हलकी असावी, तिचा आवाज मोठा असावा, ती कशावरहि हाणली तरी मोडतां कामां नये, व मोडली तर लवकर सांधली जावी, म्हणजे ही तलवार उत्तम होय. जी तलवार आंखूड, जड, लवचिक नाहीं व फार पातळ, मोडणारी व

मोडली तर न सांधणारी ती तलवार वाईट समजावी. तलवार जितक्या मुठी लांब असेल तितकीं अंगुलें ती रुंद असावी व तितके यव किंवा रुंदीच्या चतुर्थांश इतकी ती जाड असावी म्हणजे ती तलवार उत्तम होय. हिला खड्ग म्हणतात. देवीचें हें आयुध आहे.

निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें.



चित्र नं. ४

गंभीरतारध्वनिता खड्गस्य शुभ-
लक्षण ॥
तंत्रीस्वरसमो यस्मिन् भवेत्
खड्गे हतेध्वनिः ॥
तंत्रीध्वनिरयं खड्गः कुलश्रीधन
नाशनः ॥
युद्धजयार्णव.

अर्थ—तलवारीचा आवाज गंभीर व तार असा असावा म्हणजे ती तलवार चांगली. ज्या तलवारीचा आवाज सतारीच्या तारेप्रमाणें होईल ती तंत्रीस्वर तलवार होय. ही तलवार वाईट समजावी.

सांप्रत तलवारीचा अभ्यास होतच आहे व ठिकठिकाणीं त्या त्या परंपरेप्रमाणें पवित्रे व हात चालू आहेत. शास्त्रकारांनीं तलवारीचे सात पवित्रे सांगितले आहेत ते असे—

१ **शिखरक**—उजवापाय पुढें, डावापाय मागें, ढाल छातीजवळ, तलवार डोक्यावर—मारण्याच्या उद्देशानें—नजर शत्रूच्या नजरेशीं भिडलेली. या पद्धतीनें उभें राहणें हा शिखरक पवित्रा होय.

२ **कापोलक**—छातीजवळील ढालीचा डावा हात पुढें करून ढाल डाव्या कानाजवळ आणणें, बाकी सर्व शिखरक पवित्र्याप्रमाणें. हा कपोलक पवित्रा समजावा.

३ **ग्रीवास्थान**—ढाल छातीला स्पर्श करून व उजव्या हातांतील तलवार छातीजवळ आणून प्रसंग ओळखणें [शत्रूशीं कशा प्रकारें लढावें याचें चिंतन—अशी मुद्राकरणें—].

४ **भूमंडल**—ढाल छातीजवळ तिरकस धरणें व तलवार जमिनीकडे धरणें आणि शत्रूचें छिद्र कोणतें हें लक्ष्यांत आणणें—अशी मुद्रा करणें.

५ **तीक्ष्णाग्र**—तलवारीचा हात बगलेंत धरणें व अग्र पुढें करणें व ढाल पुढें धरणें.

६ **मुनय**—नाभिपासून गळ्यापर्यंत एवढ्या अंतरांत तलवारीचा अग्र भाग कापून काढणें. याला खड्गविद्या जाणणाऱ्या पुरुषांनीं मुनय असें म्हटलें आहे.

७ **पंचघात**—मस्तक, डावा भाग, उजवा भाग, गळ्यापासून बेंबीपर्यंत व खालीं पोटऱ्या, या पांच ठिकाणीं वार करणें याला पंचघात असें म्हणतात. यावेळीं रोकणें, मारणें, चपलाई दाखविणें व रचनाघात—विशेष रीतीनें चढाई करणें —हीं कामें करावीं लागतात.

तलवारीचे एकूण अडतीस हात सांगितले आहेत.

१ **भ्रान्त, २ उद्भ्रान्त, ३ आविद्ध**—हे तीन हात शत्रूच्या शस्त्रप्रहारापासून आपल्या रक्षणाकरितां सांगितले आहेत.

४ **आप्लुत**—शत्रूवर आक्रमण करणें.

५ **सृत**—पवित्र्यावर उभें राहून एका ठिकाणीं मार दाखवून व दुसऱ्याच ठिकाणीं वार करणें. याला " छल " असेंहि म्हणतात.

६ **परिवृत्त**—शत्रूच्या डाव्या व उजव्या बाजूस प्रसंगाप्रमाणें जाणें.

७ **संपात**—एकमेकांवर आघात करणें.

८ **समुदीर्ण**—शत्रूपेक्षां आपली स्फूर्ति [चपलता] जास्त दाखविणें.


९ **भारत**—शरिराच्या निरनिराळ्या अंगां-जवळून तलवार फिरविणें.

१० **कौशिक**-कांहीं विशेपरीतीनें तलवार फिरविणें.

११ **सात्वत**—ढालीच्या आड तलवार दडवून शत्रूवर वार करणें.

१२ **प्रसृत**—तलवारीच्या अग्रानें शत्रूच्या देहाला स्पर्श करणें.

निरनिराळ्या प्रकारचीं हत्यारें.



चित्र नं. ५

१३ **निवृत्त**–जो पाय पुढें असतांना शत्रु आपल्या अंगावर चालून येतो तो पाय तावडतोब मागें घेणें व शत्रूचा वार चुकविणें. तसेंच नेहमीं शत्रूच्या व आपल्या दोघांच्या तलवारींचें जें अंतर, त्या अंतराच्या आंत कधींहि न येतां जर आपण इतक्या अंतरावर उभे राहिलों व वर सांगितल्याप्रमाणें शत्रूच्या चढाईच्या वेळीं पाय बदलला तर आपल्या अंगावर वार सहसा होणार नाहीं. तसेंच आपण शत्रूवर चपळतेनें वार केला तरी सुद्धां तावडतोब पवित्रा बदलणें याला निवृत्त असें म्हणतात.

१४ **विप्लुत,-१५ श्येनपात, १६ उध्धूत, १७ अवधूत, १८ सव्य, १९ वाम, २० अलक्षित, २१ विस्फोट, २२ कराल, २३ इन्द्र, २४ महासख, २५ विकराल, २६ निपात, २७ विभीषक, २८ भयानक, २९ समग्रकमल, ३० अर्धकमल, ३१ तृतीयांशकमल, ३२ पादकमल, ३३ पादार्धकमल, ३४ प्रत्यालीढ, ३५ आलीढ, ३६ वराह, ३७ ललित.**

पट्टा.

❀

पट्टिशः पुंप्रमाणं स्यात् द्विधारः तीक्ष्णशृंगकः ॥
हस्तत्राणसमायुक्तो मुष्टिः खड्गः सहोदरः ॥

वैशंपायन.

अर्थ–पट्ट्याचा आकार जवळजवळ तलवारी सारखाच असतो. हा मनुष्याइतका लांब असतो, याला दोनहि बाजूंनीं धार असते. याचा पुढचा भाग फार तेज असतो. हा पकडण्यासाठीं जी मूठ असते तिला 'खोपडा' म्हणतात. यांत हाताचा पंजा व मनगट यांचें चांगलें रक्षण होतें.

पट्टिशः सोऽसिसमो हस्तबुध्न-श्चोभयतो मुखः ॥

शुक्राचार्याः

महाराष्ट्राच्या अलीकडील इतिहासांत प्रसिद्ध पटेगीर पुरंदरचे किल्लेदार वीरमणी मुरारबाजी व भाऊसाहेब पेशवे हे दोघेहि प्रसिद्ध आहेत. पुरुष उंचीचा पट्टा जयपूरला आहे.

हत्तीच्या सोंडेंत पट्टा देऊन त्यालाहि लढवितात.

क्षुरिका–छुरी–सुरी.

तलवार, पट्टा, सुरी, कट्यार, जंबिया, हीं सर्व शस्त्रें एकाच जातीचीं आहेत हें वरतीं आलेंच आहे. हल्लीं जंबियाचेच हात बहुतकरून करीत असतात. जंबिया, सुरी किंवा कट्यार हीं हत्यारें भोकसण्याच्याच मुख्य कामाचीं आहेत. सुरीचे कांहीं पवित्रे शास्त्रकारांनीं सांगितले आहेत ते येथें लिहितों–

१ **भैरव**–डावा पाय पुढें व डावा हात पुढें आणि उजव्या हातांत सुरी व तो उजव्या कानाजवळ धरणें याला भैरव पवित्रा म्हणतात.

२ **पुलिवाल**–डावा पाय पुढें. उजव्या हातांत सुरी घेऊन तो हात पाठीकडे न्यावा व

डाव्या हातांत एक दंडा [दोन हात लांबीचा] घेऊन तो हात पुढें करणें.

३ शुनक–नंतर सुरीच्यासमोर दंडा धरणें, पाय मागच्या प्रमाणें. नंतर उजवा हात फैलावून सुरी खालीं करावी व डावा हात छातीजवळ–दंडा छातीजवळ न्यावा. पुनः उजवा हात वर करावा.

४ ललित–नंतर सुरी डाव्या बाजूला व दंडा उजव्या बाजूला करावा. हा ललित पवित्रा समजावा.

५ नंदक–नंतर सुरी पुढें करावी व दंडा छातीबरोबर धरावा. पुनः सुरी छातीजवळ-व दंडा सुरीच्या समोर करणें.

६ रोपितक–दोन्ही गुडघ्यांमध्यें उजवा हात ठेवून सुरीच्या टोंकानें पृथ्वीला स्पर्श करावा व डावा हात फैलावून देणें हा रोपितक पवित्रा.

७ पात्रांगुल–सुरीचा हात मस्तकावर धरणें व डाव्या हातांतील दंडा समोर फेकणें हा पात्रांगुल पवित्रा.

८ व्याघ्रनख–सिंहाप्रमाणें सुरीसहित उजवा हात वर व डाव्या हातांतील दंडा खालीं धरणें हा व्याघ्रनख पवित्रा.

९ पादग्राह–सुरीसहित मूठ डाव्या गालाच्या खालीं धरून व दंडा उजव्या छातीपुढें आणि अर्ध्या गालापर्यंत धरून डावा पाय पुढें करून उजव्या पायानें त्याला स्पर्श करणें. पुनः उजवा पाय पुढें व डाव्या पायानें त्याला स्पर्श करणें. याप्रमाणें बराच वेळ करणें याला पादग्राह म्हणतात.

याप्रमाणें पदप्राप्ति, अनुक्षेप, सर्पिका, मत्तेभगति, वायसीगति, कर्कटीगति व पंचाननगति असे सात पवित्रे आणखी सांगितले आहेत.

तलवारीची परीक्षा अनेक प्रकारांनीं करतात. रूप, वर्ण, नेत्र इत्यादि अनेक प्रकारांनीं तलवार तपासावी लागते. म्हणून प्रथम ज्या लोखंडाची तलवार बनवितात त्या लोखंडासंबंधीं थोडीशी माहिती लिहूं.

नकुल हा तलवारबहाद्दर होता त्यानें ही माहिती लिहिली आहे.

त्सारुकौ यमजावुभौ ॥ ६२

आदिपर्व अ० १३२

प्रथम तलवारीला प्राचीनकाळीं आठ नांवें होतीं तीं अशीं—१ **असि**, २ **विशसन**, ३ **खड्ग**, ४ **तीक्ष्णवर्मा**, ५ **दुरासद**, ६ **श्रीगर्भ**, ७ **विजय**, ८ **धर्मपाल** किंवा **धर्ममाल**. मागाहून या नांवांत आणखी अनेक नांवांची भर पडली. तीं नांवें–१ **निस्त्रिंश**, २ **चंद्रहास**, ३ **ऋष्टि**, ४ **कौक्षेयक**, ५ **मण्डलाग्र**, ६ **करपाल**, ७ **करवाल**, ८ **तलवार**, किंवा **तरुवारि** इत्यादि. तलवारीच्या परीक्षेंत लोहपरीक्षा प्रथम आहे.

निरङ्गसाङ्गभेदेन ते लोहा विविधा मताः ॥
निरङ्गाः काञ्चिपाण्ड्यादि भेदा बहुविधा मताः ॥
असिकर्मसु ते शस्ता नानाव्याधिविनाशनाः ॥

नकुलः

अर्थ--निरंग व सांग अशा दोन प्रकारचें लोखंड असतें. निरंग लोखंड अनेक प्रकारचें असतें. काञ्चि, पाण्ड्य इत्यादि त्याचीं नांवें

आहेत. हें लोखंड तलवारीकरतां उत्तम म्हणून समजतात व ही निरंग तलवार अनेक विघ्नांचा नाश करणारी असते.

वक्ष्यन्ते प्रायशोस्मात्सांगाः
खड्गादिकर्मसु ॥
नामभेदेन चिह्नानि
लोहानामभिदध्महे ॥

अर्थ—प्रायः सांग शस्त्रें लोखंडाचींच बनवीत असतात. या सांग लोखंडाचीं दहा नांवें आहेत व त्यांचीं लक्षणेंहि आहेत. तीं अशीं—

१ रोहिणी—

क्षुद्रांगं सुदृढं यस्य नील-
मीषत्प्रतीयते ॥
रोहिणीं तां विजानीयात्तत्क्षणे
बहुवेदना ॥

ज्या लोखंडाचे अवयव लहान व कठीण आणि रंग किंचित् निळा त्याला रोहिणी नामक लोखंड म्हणतात.

२ नीलपिंड—

नीलपिण्डंसमांगञ्च नीलपिण्डं
विदुर्बुधाः ॥

जें लोखंड नील वर्णाचें असतें त्याला नीलपिण्ड लोखंड म्हणतात.

३ मयूरग्रैवक—

मयूरकण्ठसंस्थानमङ्गं यस्यप्रतीयते ॥
मयूरग्रैवकं लोहं ते विदुर्मुनिपुङ्गवाः ॥

ज्या लोखंडाचा अवयव मोराच्या कंठाप्रमाणें निळा असतो त्याला मयूरग्रैवक लोखंड म्हणतात.

४ मयूरवज्र—

नागकेसरपुष्पाभमङ्गं यस्य
प्रतीयते ॥
मयूरवज्रकंप्राहुर्लोहशास्त्र-
विदोजनाः ॥

ज्या लोखंडाचें अंग नागचाफ्याच्या फुलाच्या कांतीप्रमाणें असतें त्याला मयूरवज्र लोखंड म्हणतात.

५ तित्तिरांग—

यस्मिंस्तित्तिरपक्षाभमंगलोहं
प्रतीयते ॥
दुर्लभंतन्महामूल्यंतित्तिरांगं-
सुपाकजम् ॥

ज्या लोखंडाचें अंग कवड्याच्या पंखाच्या रंगाप्रमाणें असतें त्याला तित्तिरांग लोखंड म्हणतात. हें लोखंड फार दुर्लभ अतएव फार किंमतीचें असतें. अर्थात् या लोखंडाची तलवार मूल्यवान् असणार.

६ सुवर्णवज्रक—

सुवर्णसदृशाकारादङ्गभूमिः
प्रतीयते ॥
सुवर्णवज्रकं विद्याद्बहुमूल्यं
महागुणम् ॥

ज्या लोखंडाचें अंग सोन्याप्रमाणें दिसतें त्याला सुवर्णवज्रक लोखंड म्हणतात व हें लोखंड फार किंमतीचें असतें.

७ शैवालमालान—

अविच्छिन्नं सुसूक्ष्मांगं दूर्वा-
भांगमपाकजम् ॥
यस्मिन्शैवालमालानमाहुस्तं
मुनिपुङ्गवाः ॥

जें लोखंड अविच्छिन्न, ज्याचे अवयव फार बारीक, दूर्वेप्रमाणें ज्याचा रंग, ज्याला शुद्ध करावें लागत नाहीं, तें शैवालमालान लोखंड होय.

८ **मौषलवज्र–**

शुक्लं पार्श्वद्वयं यस्य मध्ये स्वर्ण-
मयाङ्गकम् ॥
धूमवत् सीमसंस्थानं मौषलं
वज्रकं विदुः ॥

ज्या लोखंडाच्या दोनहि बाजूंना श्वेतप्रभा दिसते, मध्यें सोन्याप्रमाणें रेषा चमकतात, शेवटीं धुराप्रमाणें रंग दिसतो, त्याला मौषलवज्र म्हणतात.

९ **कंकोलवज्र–**

मृणालनालप्रतिमं विवरैर-
ग्रसंस्थितैः ॥
कंकोलवज्रकं प्राहुः स्वर्णकं
वज्रचिन्तकाः ॥

जें लोखंड जमिनीवर पडलें असतां कमळाच्या तंतूप्रभाणें त्याला लहान लहान छेद पडतात तें कंकोलवज्र.

१० **ग्रंथिवज्रक--**

अंगं प्रतीयते यत्र बहुग्रंथि
समन्वितम् ॥
दुर्लभं तन्महामौल्यं ग्रंथिवज्रक-
मुच्यते ॥

ज्या लोखंडांत ठिकठिकाणीं गांठी दिसून येतात त्याला ग्रंथिवज्रक लोखंड म्हणतात व हें मूल्यवान असतें.

नकुलाच्या मताप्रमाणें ही माहिती लिहिली. दुसऱ्या अनेक लोहशास्त्रकारांनीं अशीच निरनिराळी माहिती दिली आहे ती त्या त्या ग्रंथांत पहावी. येथें आणखी जास्त माहिती देतां येत नाहीं.

तलवार बनविल्यावर तिला तीक्ष्णधार आणणें आणि तिच्यामध्यें सुगंध उत्पन्न करणें या दोन मुख्य क्रिया करावयाच्या असतात.

सुगंधाची कृति–

तलवार साफ करून तिच्या धारेवर मीठ किंवा खारी राख मातींत मिसळून तिचा लेप करावा व आगीमध्यें तिला तापवावी. पुनः पाणी व एकदोन वेळां खाऱ्या राखेनीं तिला स्वच्छ धुवावी व अनेक तरळ पदार्थ तिला पाजावे. शुक्राचार्यांनीं तलवारीला पाजण्याकरतां– **१ रुधिर, २ तूप, ३ दूध, ४ पाणी, ५ हरिणीचें दूध, ६ तेल,** व राख मिसळून, असे पदार्थ सांगितले आहेत.

तलवार हे पदार्थ प्यायली म्हणजे तिच्या देहांतून अनेक प्रकारचा सुगंध येतो. यांपैकीं **कमळ, चांफा, कुंकु, तूप** व कण्हेर यांच्या फुलांसारखा तलवारीला वास येत असेल तर तो शुभ समजावा व ही तलवार शुभ होय. **गोमूत्र, मेद, वसा,** यांसारखा वास येत असल्यास तो अशुभ समजावा.

तलवार इत्यादि शस्त्रें घांसून साफ करणें किंवा तलवारीला अनेक प्रकारचें पाणी आणणें, तिला रुधिरादि अनेक पदार्थ पाजणें, [तलवार रक्तादि पदार्थांत बुडवून ठेवणें किंवा लाकडी यंत्रानें रक्तादिकांचें घर्षण करणें] या सर्व कामाला " **शिकल** " असें म्हणतात व हें काम करणारा तो शिकलगार.

लोखंडाच्या भेदावरून तलवारीला निरनिराळीं नांवें पडतात. त्यांपैकीं लोहार्णव ग्रंथांतून कांहीं नांवें सांगतों—

१ धवलगिरि–

रूप्यासत्र समाभूमिरंगं श्वेतंप्रतीयते ॥
तं धवलगिरिं पांडयं पण्डिताः प्रवदन्ति हि ॥

जी तलवार पांड्य लोखंडाची बनते तिला धवलगिरि म्हणतात. पांड्य लोखंड चमकदार व रुप्याप्रमाणें शुभ्र असतें.

२ कालगिरि–

तन्वी पत्रावली काला सौवर्णाभासिपत्रिका ॥
प्राहुः कालगिरिः पाण्ड लोहशास्त्रविशारदाः ॥

ज्या तलवारीच्या अंगीं थोडीं थोडीं सोन्याचीं चिन्हें किंवा चमक दिसते तिला कालगिरि म्हणतात.

३ कज्जलगात्रक–

धारा शुभ्रा भवेद्यस्य मध्यं कज्जलसन्निभम् ॥
कृष्णरङ्गैश्चितं गात्रं विद्यात्कज्जलगात्रकम् ॥

ज्या तलवारीची धार शुभ्र असते, मधला भाग काळा असतो ती तलवार कज्जलगात्रक समजावी.

४ कुटीरकं—

सूक्ष्मं रजतपत्राभमंगे कृष्णासिपत्रिका ॥
कुटीरकः समाख्यात............॥

ज्या तलवारीमध्यें रजतपत्राचीं चिन्हें असतात किंवा कृष्णवर्ण असतो तिला कुटीरक म्हणतात.

५ केतकीवज्र—

केतकीपत्र सदृशमङ्गं यस्य प्रतीयते ॥
विद्यात् केताकिवज्रं त...वारालौहं प्रचक्षते ॥

ज्या तलवारींत केतकी पत्राप्रमाणें चिन्हें असतात ती तलवार केतकीवज्र होय.

६ कान्तिलौह—

निरङ्ग रौप्यपत्राभमीषन्नीलनिभं च यत् ॥
दुर्लभं तन्महामूल्यं कान्तिलौहं प्रचक्षते ॥

जी तलवार रुप्याप्रमाणें चमकते व जिच्यावर नीलवर्णाची किंचित् छटा दिसते ती कान्तिलौह समजावी.

७ दमनवक्र—

अङ्गं दमनपत्राभमङ्गे यस्मिन् प्रतीयते ॥
विद्याद्दमनवक्रं तु तीक्ष्णधारं महागुणम् ॥

ज्या तलवारीच्या ठिकाणीं कुंद वृक्षाच्या पानाप्रमाणें चिन्हें दिसतात ती तलवार दमनवक्र समजावी.

८ कालखड्ग—

कृष्णभूमिसुवर्णाभं मीषद्रूक्त्रांग सङ्गतम् ॥
डाहुली वज्रकं विद्यात् कालसंज्ञमथापरे ॥

जी तलवार दिसायला काळी दिसते पण जिची चमक सोन्यासारखी असते तिला कालखड्ग म्हणतात.

९ नकुलांग—

ऊर्ध्वगं कपिलाभासमङ्गं यस्मिन् प्रतीयते ॥
नकुलांगं तु तं विद्यात् स्पर्शस्तस्याहिनाशनम् ॥

ज्या तलवारीमध्यें ऊर्ध्वगामी कपिल प्रकाश दिसतो तिला नकुलांग म्हणतात. या नकुलांग तलवारीला स्पर्श करण्याबरोबर सर्प मरून जातो.

१० क्षुद्रवज्र—

……मालिकायस्य क्षुद्रांगं कुण्डलीकृतम् ॥
क्षुद्रवज्रकनामानं प्राह नागार्जुनो मुनिः ॥

ज्या तलवारीवर कुंडलाकार माला दिसून येते त्याला क्षुद्रवज्र म्हणतात.

११ महत्खड्ग—

अन्तर्गाढं चिन्हहीनं विशालं मध्ये स्थूलं स्थूलधारातितीक्ष्णं ॥ रक्षो वक्षः च्छेदनार्थं महान्तं कृत्वा खड्गं देवराजोतिहृष्टः ॥

ज्या तलवारीचा अंतर्भाग कठिण, गात्र सर्व चिन्हांनीं वर्जित, मध्यभाग स्थूल आणि अत्यंत तेजस्वी तिला ‘ महत् ’ म्हणतात. इंद्रानें राक्षसांचा वध करण्याकरितां हें मोठें खड्ग निर्माण केलें.

१२ वामनाक्ष—

वामनाक्षं महान्तं तु येन तन्तु र्न जायते ॥
छेदे गाढं चिन्हहीनं प्राहुःखड्गं विचक्षणाः ॥

जी तलवार पुष्कळ लढाया लढूनहि तुटत नाहीं किंवा वांकत नाहीं तिला वामनाक्ष म्हणतात.

१३ माहिष—

एरण्डबीजप्रति ममङ्गंयस्मिन् प्रतीयते ॥
माहिषाख्यः स वै खड्गो नीलमेघसमच्छविः ॥

ज्या तलवारीवर एरण्डाच्या बीप्रमाणें चिन्हें असतात व जिची कान्ति नीलमेघाप्रमाणें असते ती माहिष तलवार.

१४ अङ्गपत्र—

घृष्टे यस्मिन् भवेत् खड्गे शरीरं प्रतिविम्बितम् ॥
अंगपत्राभिधं खड्गं प्राहुःखड्गं विचक्षणाः ॥

जी तलवार घासल्यावर जिच्यामध्यें आरशाप्रमाणें प्रतिबिंब पडतें तिला अंगपत्र म्हणतात.

१५ गजवज्र—

यस्याङ्गे स्थूलरेखा धनमसृणरुचिः सर्वतो व्याप्य तिष्ठेत् । धारातीक्ष्णाति सूक्ष्मा प्रविशतिरुधिरस्पर्शमात्रेणखड्गः ॥ यस्याम्भःपीयमानं शमयति निखिलं व्याधिमाधिं समग्रां । वैरिश्रेणिं विशन्तां प्रवदति गिरिशो वज्रमेतद्गजादि ॥

ज्या तलवारींवर स्थूलरेषा दिसतात, जी घट्ट आहे, जिची धार तेज आहे, जिच्या पाण्यानें आधिव्याधि नष्ट होतात, त्या तलवारीला भगवान् शंकरानें गजवज्र म्हटलें आहे.

"ज्या तलवारीचा रंग हरित [पन्ना] मण्यासारखा असतो व जिच्यावर डाग मुळींच नसतात ती तलवार उत्तम होय. श्रीकृष्णाची अशीच तलवार होती व या तलवारीनें कृष्णानें बाणासुराचे बाहु छाटून टाकले" "ज्या तलवारीचा रंग गवताच्या रंगाप्रमाणें असतो व जिच्यामध्यें सुताप्रमाणें बारीक तंतु दिसतात आणि जी तोडली असतां तुटत नाहीं तिला 'रोहिणीवाल' म्हणतात. रावणाची तलवार अशी होती" ही माहिती अभिलषितार्थ चिन्तामणींत लिहिली आहे.

तलवारीची परीक्षा आठ प्रकारांनीं करतात. ते आठ प्रकार असे. **१ अंग, २ रूप, ३ जाति, ४ नेत्र, ५ अरिष्ट, ६ भूमि, ७ ध्वनि** आणि **८ मान.** या आठांपैकीं ध्वनि व मान हीं कृत्रिम बनवितां येत नाहींत. बाकीचीं अंगें कुशल कारागीर बनावट करूं शकतो.

१ **अंग**—संपूर्ण तलवारीवर जीं चिन्हें दिसतात तशीं चिन्हें तलवार तुटली असतां जोडली गेली तर दिसणें याचें नांव अंग.

२ **रूप**-तलवारीचा काळा अगर शुभ्र इत्यादि रंग तें रूप.

३ **जाति**—रूपावरून समजून येणारी ती जाति.

४ **नेत्र**—अंगादिकांवांचून जी जाति तो नेत्र.

५ **अरिष्ट**—तलवारीच्या शुद्धतेचा जो अपसूचक धर्म तो अरिष्ट.

६ **भूमि**—अंगादिकांना धारण करणारी ती भूमि.

७ **ध्वनि**—तलवारीचा जो आवाज तो ध्वनि.

८ **मान**--वजन.

तलवारीचे अंगप्रकार १०० **रूप**, ४ जाति, ४ नेत्र, ३० अरिष्ट, ३० भूमि, २ ध्वनि, ८ मान.

१ **अंगांचीं नांवें**—१ रूप्य, २ सुवर्ण, ३ गज, ४ ऊरु, ५ नील, ६ श्वेत, ७ स्थूल, ८ कृष्ण. ९ अरुण, १० श्वेत, ११ अम्भोज, १२ गदा, १३ अतिमानन, १४ कला, १५ ग्रंथि, १६ स्थिर, १७ तित्तिर, १८ माला, १९ जीरक, २० षट्पद, २१ ऊर्ध्व किंवा लांगल, २२ मारिच, २३ व्याल, २४ अश्व, २५ बर्ह, २६ अंजन किंवा कज्जल, २७ क्षेत्र, २८ नागार्जुन मतानें क्षुद्रक लोहार्णव मतानें कुंडलवज्र, २९ मक्षिका, ३० तुष, ३१ गव, ३२ व्रीहि, ३३ क्षुमा, ३४ सर्षप, ३५ सिंही, ३६ तंडुल, ३७ गोक्षुर, ३८ शिव किंवा शिरा, ३९ नख, ४० ग्राह, ४१ अतासि, ४२ केश, ४३ उपल, ४४ द्रोणी, ४५ काक, ४६ कपाल, ४७ पत्र, ४८ तुवरी, ४९ बिंबी, ५० फळी, ५१ सर्षपा, ५२ नीली, ५३ रक्त, ५४ वचा, ५५ रसोन, ५६ सुमना, ५७ यज्ञ, ५८ शमी, ५९ रोहित, ६० प्रोष्ठी, ६१ मारिष, ६२ मार्क किंवा भृंग, ६३ खुर, ६४ तडित्, ६५ मेघ, ६६ आद्रि, ६७ गुंजा,

६८ शिवा, ६९ दूर्वा, ७० विल्व, ७१ मसुर, ७२ शोण–शण, ७३ शठी, ७४ मार्जारक, ७५ केतकी, ७६ मूर्वा, ७७ वज्र, ७८ कलाप, ७९ चंपक, ८० वज्र, ८१ वला, ८२ न्यग्रोध, ८३ वंश, ८४ असन, ८५ ज्येष्ठी, ८६ जाल, ८७ पिपीलिका, ८८ नल, ८९ रजः, ९० कूष्मांड, ९१ रोम, ९२ स्नुही, ९३ कर्कंधू, ९४ वकुल, ९५ रसाल, ९६ महिष, ९७ स्वच्छ, ९८ ऋतु, ९९ वक्र, १०० अंग.

लोहविशारदमुनींनें या अंगांचें वर्णन केलें आहे. ग्रंथ विस्तार फार होईल म्हणून या प्रत्येक अंगाची व्याख्या लिहितां येत नाहीं.

तलवारीचें अंग तलवारीला व्यापून असतें. अरुणवज्राला सूर्यकिरणांचा स्पर्श झाला असतां अग्नीच्या ज्वाला बाहेर निघतात. याच्या स्पर्शानें रात्रीं कमल फुलतें. गदावज्राच्या घावानें शूल उत्पन्न होतो. तिल वज्राच्या घावानें तेलाप्रमाणें हाडांचा रस होऊन वाहूं लागतो, षट्पदवज्रानें--कॉलरा होतो. अश्ववज्र--याच्या पाण्यानें घोड्याचे रोग बरे होतात, प्रोष्ठीवज्र--पाण्यांत माशाप्रमाणें तरंगतें, वलावज्र--वातावर औषध आहे.

२ **रूप**--नील, कृष्ण, पिशंग व धूम.

३ **जाति**--ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र.

४ **नेत्र**--१ चक्र, २ पद्म, ३ गदा, ४ खड्ग, ५ शंख, ६ डमरू, ७ धनुष्य ८ अंकुश, ९ छत्र, १० पताका, ११ वीणा, १२ मत्स्य, १३ लिंग, १४ ध्वज, १५ इंदु, १६ कुंभ, १७ शूळ, १८ शार्दूल, १९ सिंह, २० सिंहासन, २१ गज, २२ हंस, २३ मयूर, २४ जिव्हा, २५ दशन, २६ पुत्रिका, २७ चामर, २८ शैल, २९ पुष्पमाला, ३० भुजंगम.

तलवारीमध्यें नेत्राचें स्थान नियमित आहे व अंग सर्वत्र असते. ज्याप्रमाणें मनुष्य सर्वांग युक्त असूनहि नेत्रहीन असेल तर तो निकामी होतो, त्याचप्रमाणें तलवार सर्वांगानें युक्त असून नेत्रहीन असेल तर ती तलवार पण बेकाम समजतात. ज्या तलवारीमध्यें चक्राप्रमाणें नेत्र असतो तिला 'चक्रनेत्र' तलवार म्हणतात इत्यादि.

५ **अरिष्ट**--१ छिद्र, २ काकपद, ३ रेखा, ४ भेक, ५ मूषिक, ६ बिडाल ७ शर्करा, ८ नीली, ९ मशक, १० भृंग, ११ सूचक, १२ त्रिबिंदु, १३ कालिका, १४ पावी, १५ कपोत, १६ काक, १७ खर्पर, १८ शकली १९ क्रोडी, २० कुशपत्र, २१ जालिक, २२ कराल, २३ कंक, २४ खर्जुर, २५ भृंग, २६ पुच्छ, २७ खनित्र, २८ लांगल, २९ शूर्प, ३० बडिश.

तलवारीमध्यें अरिष्टाचें स्थान नियमित नाहीं. तलवारींत एकहि अरिष्ट असणें चांगलें नव्हे. तलवारींत दोन अरिष्टें शुभ समजावीं. जसें एका विषानें दुसरें विष मारलें जातें त्याप्रमाणें येथें समजावें.

६ **ध्वनि**—

नखेन वाऽथ दण्डेन तथा लोह-
शलाकया ॥
लोष्ट्रेन शर्कराभिर्वा ध्वनिविज्ञान
मुच्यते ॥

हंसकांस्ये तथा मेघो टक्काकाकश्च
तंत्रिका ॥
गर्दभःप्रस्तरश्चैव ध्वनिरष्टविधः
स्मृतः ॥
पूर्वे चत्वारःशुभदाः परे निन्दा-
स्पदा तथा ॥

युद्धजयार्णव.

तलवारीचा आवाज पहाणें असेल तर नख, काडी, सळई, दगड किंवा वाळू यांनीं ठोकून पहावी म्हणजे ध्वनि कळतो. तलवारीचे आवाज आठ प्रकारचे असतात. हंस, कांसें, मेघ, नगारा, कावळा, वीणा, गाढव व दगड. पैकीं पहिले चार आवाज शुभ समजावे व बाकीचे चार आवाज अशुभ समजावे. नागार्जुनाचे मताप्रमाणें ध्वनि असेच आहेत.

७ **मान**--उत्तम व अधम दोन प्रकारचें आहेत.

८ **भूमि**--दिव्य आणि भौम. यांपैकीं दिव्य लोखंडाची तलवार अत्यंत शुभ समजण्यांत येते.

तलवार कशी वापरावी.

खड्गं प्रशस्तं मणिहेमयुक्तं कोशे
सदा चन्दनचूर्णयुक्तम् ॥
संस्थापयेद्भूमिपतिःप्रयत्नाद्रक्षेत्त-
थैनं स्वशरीरवच्च ॥
दिवा च पूजयेदेनं गन्धमाल्यादि-
सम्पदा ॥
उच्छिष्टो न स्पृशेत्खड्गं निशिकुर्यान्न
शीर्षके ॥
खड्गे न पश्येद्वदनं तथा विवृणु-
यान्न च ॥
न चास्य कथयेन्मूल्यं यातिदेशं
कथञ्चन ॥

अर्थ—तलवारीच्या मुठी इत्यादि ठिकाणीं सोन्याचें पाणी दिलेलें असावें, तसेंच मुठीवर रत्नें इत्यादि चढवावीं. म्यानामध्यें चन्दनाचें पीठ घालून त्यांत तलवार ठेवावी. आपण आपल्या शरिराची काळजी घेतों त्याप्रमाणें तलवारीला जपावें. दिवसां तलवारीची पूजा करावी. माला चढविणें इत्यदि गोष्टी करतांना उष्ट्या हातानें तलवारीला स्पर्श करूं नये, झोंपतांना डोक्याजवळ तलवार ठेवूं नये. तलवारींत रूप पाहूं नये. कामा वांचून तलवार म्यानांतून बाहेर काढूं नये, तलवारीची किंमत कोणाला सांगू नये व ठेवण्याची जागाहि पण कोणास माहीत असूं नये. तलवार स्वयं म्यानांतून वर येणें युद्धसूचक आहे व तलवार स्वयं चमकणें विजयसूचक आहे. तलवार कमी करावयाची असल्यास तोडूं नये, तर घासून घासून ती कमी करावी. असावधपणें तलवारीला हात लावूं नये. तलवारींतून स्वयं आवाज निघणें मृत्युसूचक आहे. तलवार किंवा खड्ग हें देवीचें मुख्य आयुध आहे.

तलवारीचे देश.

उत्तमलोखंड—

लोहं प्रधानं खड्गार्थं प्रशस्तं
तद्विशेषतः ॥
खटी खट्टरीबीक वंशशूर्पारकेषु च ॥

विदेहेषु तथाऽङ्गेषु मध्यमग्राम-
वेदिषु ॥
सह्यग्रामेषु नीचेषु तथा कालंजरेषु च ॥

प्रत्येक देशांतील तलवारींचें वर्णन—

खटी खट्टर जाता ये दर्शनीयास्तुते
मताः ॥
कामच्छिदःस्वार्थिकार्ये मर्मज्ञा
गुरवस्तथा ॥
तीक्ष्णच्छेदःसहावंगा दृढाःशूर्पा-
रकोद्भवाः ॥
असहाश्चैव विज्ञेयाःप्रभावन्तो
विदेहजाः ॥
अंगदेशोद्भवास्तीक्ष्णा सहस्ताः
सुदृढास्तथा ॥
लघवश्च तथा तीक्ष्णा मध्यमग्राम-
सम्भवाः ॥
असारा लघवस्तीक्ष्णा वेदिदेश-
समुद्भवाः ॥
सह्यग्रामोद्भवाःखड्गाः सुतीक्ष्णा
सघवस्तथा ॥
निर्व्रणानिर्मलास्तीक्ष्णा श्चीनदेश-
समुद्भवाः ॥

तलवारीवर वाघ, सिंह, हत्ती, घोडे, युद्ध, ब्रीदवाक्य, इत्यादि नानाप्रकारचें खोदकाम करतात, त्याचप्रमाणें मुठीवरहि करतात. ज्याप्रमाणें धनुष्याच्या काळांत थाटदार धनुष्यें बनवीत असत त्याचप्रमाणें तलवारीच्या काळांतहि थाटदार तलवारी बनवीत असत. धर्मराज, नकुल व सहदेव यांच्या तलवारीचें वर्णन महाभारत विराटपर्व अ० ४२--४३ मध्यें आलें आहे. तलवारीसंबंधानें—

दाक्षिणात्या असिचर्मिणः ॥५॥

शांतिपर्व अ० १०१

असा महाभारतांत उल्लेख आहे व मराठ्यांची तलवार प्रसिद्ध आहे.

गदा

❀

पञ्चाशदङ्गुलादण्डे दले त्वर्धाङ्गुला
गदा ॥
दलानि षोडशैवस्तुः कुलिशांगुल-
मातृकः ॥
षष्ट्यंगुला लोहयष्टिर्द्विकुम्भा पञ्च-
किंकिणी ॥

वसिष्ठः

अर्थ—गदेचा दांडा पन्नास--अंगुळें लांबीचा पाहिजे. तिला मुठीकडे एक लहान बोंड असावें व मारण्याच्या अंगाला एक मोठा गोळा असावा. या गोळयाचा व्यास दहा अंगुळें असावा व त्याला बूड व शेंडा या दोनहि अगांस सोळा सोळा पाकळ्यांचीं कमळें असावीं व वरतीं एक एक अंगुळाचा कळस असावा. एकंदर गदेची लांबी साठ अंगुळें असावी व तिच्या दोन टोंकांना दोन गोळे [एक लहान व एक मोठा] असून पांच घुंगुर असावे. गदा परजतांना घुंगुरांच्या आवाजानें उत्साह वाढतो. कित्येकजण तळाशीं व माथ्याशीं दोहींकडे घुंगुर लावतात.

गदेचे हात ३८ आहेत ते खालीं लिहिल्याप्रमाणें आहेत.

१ संत्याग, २ अवदंश, ३ वराहोद्धत, ४ हस्तौ, ५ अवहस्त, ६ आलीन, ७ एकहस्त, ८ अवहस्त, ९ द्विहस्त, १० बहुपाश, ११ कटिरेचित, १२ उद्गत, १३ उरोघात १४ ललाटघात, १५ विधमन, १६ करोद्धूत, १७ विमान, १८ पादाहति, १९ विपादक, २० गात्रसंश्लेष, २१ भ्रांत, २२ गात्रविपर्यय, २३ ऊर्ध्वप्रहार, २४ गोमूत्रं, २५ सव्यगोमूत्र, २६ दक्षिणगोमूत्र, २७ पारक, २८ तारक, २९ दंड, ३० कबरीबंध, ३१ आकुल, ३२ तिर्यग्बंध, ३३ अपामार्ग, ३४ भीमवेग, ३५ सुदर्शन, ३६ सिंहाक्रांत, ३७ गजाक्रांत, ३८ गर्दभाक्रांत.

कित्येकांनीं एकंदर गदेची लांबी सात हात सांगितली आहे.

वैशंपायनानें गदेचें वर्णन पुढीलप्रमाणें लिहिलें आहे.

गदाशैक्यायसमयी सतारपृथु-
शीर्षका ॥
शंकुप्रावरणा घोरा चतुर्हस्तसमुन्नता ॥
यथा क्षात्र काया च (??) किरीटान्वित-
मस्तका ॥
सुवर्णमेखला गुप्ता गजपर्वत-
भेदिनी ॥

गदेचे हात—

मण्डलानि विचित्राणि गतप्रत्या
गतानि च ॥
अत्र यंत्राणि चित्राणि स्थानानि
विविधानि च ॥
परिमोक्षं प्रहाराणां वर्जनं परि-
धावनम् ॥

अभिद्रवणमाक्षेपमवस्थानं सविग्रहम् ॥
परावृत्तं सन्निवृत्तमवप्लुतमुपप्लुतम् ॥
दक्षिणं मण्डनं चैव सव्यं मण्डल-
मेव च ॥
अविद्धं च प्रविद्धं च स्फोटनं ज्वालनं
तथा ॥
उपन्यस्तमपन्यस्तं गदामार्गाश्च
विंशतिः ॥

अर्थात्–ही गदा फेकून मारण्याची आहे. हिचा शिकारींतहि उपयोग करतात. महाभारतांत भीमाची गदा अशीच वर्णिली आहे. वर लिहिलेले २० हात हेच कित्येकांनीं १५ हातांत बसविले आहेत व कित्येकांनीं याच हातांना गदेचे पवित्रे असें म्हटलें आहे.

रामचंद्राच्या काळीं गदायुद्धांत हनुमान प्रसिद्ध होते. श्रीकृष्णाच्या काळांत जरासंध, बलराम, भीमसेन, दुर्योधन हे गदायुद्धांत प्रसिद्ध होते. भीमानें व दुर्योधनानें बलरामाजवळ गदेचा विशेष अभ्यास केला हें प्रसिद्ध आहे. गदेनें शत्रूचा घात करावयाचा असला तर तिचा गोळा चांगलाच जड पाहिजे. असा जड गोळा फेकून मारणें, हें काम सोपें नाहीं, याला बरीच शक्ति लागते. सांप्रत गदेचा व्यासंग सुटला आहे तो पुनः सुरू होणें इष्ट आहे.

बाहुयुद्ध–कुस्ती.

पूर्वी बाहुयुद्धाबद्दल माहिती लिहिलीच आहे. येथें एकच गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, युद्धांत शत्रूला मारण्याचा प्रसंग आला तर आठ पेचांनीं मारावा असें शुक्राचार्यांनीं सांगितलें आहे. ते पेच असे आहेत.

वामपाणिकचोत्पीडा भूमौनिष्पेपणं
बलात् ॥
मूर्ध्निपादप्रहरणं जानुनोदरपीडनम् ॥
माल्लराकारया मुष्ट्या कपोले
दृढताडनम् ॥
कफोणिपानोप्यसकृत् सर्वतस्तल-
ताडनम् ॥
छलेन युद्धे भ्रमणं नियुद्धं स्मृत-
मष्टधा ॥
शत्रुष्वेतानि युञ्जीत न मित्रेषु
कदाचन ॥

अध्याय ४ प्र. ७

अर्थ--१ डाव्या हातानें शत्रूचे केंस पकडणें. या प्रमाणें श्रीकृष्णानें कंसाचे केंस पकडले.

२ शत्रूचा जमिनीवर चुरा करणें.

३ शत्रूला जमिनीवर पाडून डोक्यावर लाथा मारणें.

४ शत्रूला जमिनीवर पाडून पोटावर गुडघ्यानें प्रहार करणें.

५ माल्लरमुठीनें शत्रूच्या कानशिलांवर तडाके देणें.

६ शत्रूच्या मर्मस्थानीं कोपरखळ्या देणें व त्याला जमिनीवर पाडणें. भीमानें बकासुराला कोपरखळींनें मारलें.

७ शत्रूला चापट्या देणें.

८ मर्मस्थानीं आघात पोंचावा म्हणून शत्रूला गरगर फिरविणें व भूमीवर आपटून मारणें. ही आज्ञा सिक्खांचे दहावे गुरु फौजांवाले कलगीधर गोविंदसिंह यांनीं क्वचित प्रसंगीं केली होती.

विश्वामित्रानीं धनुष्य, चक्र, भाला, तलवार, सुरी व गदा अशीं सहा मुख्य शस्त्रें सांगितलीं आहेत व शेवटीं शस्त्र नसणारांनीं कुस्त्या कराव्या असें त्यांनीं सांगितलें आहे. या सर्वांचें वर्णन लिहून झालें.

शस्त्रविचार.

दूरे चान्ते च यच्छस्त्रं शत्रुघातकरं
भवेत् ॥
तदस्त्रमिति जानीयादन्यथा शस्त्र-
मुच्यते ॥

विश्वामित्र.

अस्यते क्षिप्यते यच्च यंत्रमंत्रादिभिः
सदा ॥
अस्त्रं तदन्यथा शस्त्रं असिकुन्तादिकं
यथा ॥
उत्तमं मांत्रिकास्त्रेण यांत्रिकास्त्रेण
मध्यमम् ॥
शस्त्रैः कनिष्ठं युद्धं च बाहुयुद्धं
ततोऽधमम् ॥

जामदग्न्य.

अर्थ–जें शस्त्र दूर अंतरावर किंवा जवळ शत्रूचा घात करतें तें अस्त्र होय व जें केवळ जवळच्या जवळच शत्रूला मारण्याकरतां उपयोगी पडतें तें शस्त्र होय. जें आयुध यंत्रमंत्रादिकांनीं फेकतां येतें तें अस्त्र होय. तलवार, भाला हीं शस्त्रें आहेत. अस्त्रांनीं लढणें हें उत्तम युद्ध, यंत्रानें लढणें हें मध्यम, शस्त्रानें लढणें कनिष्ठ व कुस्ती हें अधमयुद्ध समजावें.

मागें लिहिलेल्य शस्त्रांचे अस्त्र व शस्त्र

असे दोन विभाग शास्त्रकारांनीं सांगितले आहेत. अस्त्रशस्त्रांचें हें सामान्य लक्षण समजावें. कारण कांहीं आयुधें अस्त्र व शस्त्र दोनहि प्रकारचीं आहेत. जसें भाला हातांत घेऊन लढतां येतें व तो फेकूनहि मारतां येतो.

अस्त्रं तु द्विविधं प्रोक्तं निर्मायं मायिकं तथा ॥
शरादिकं तु निर्मायं मायिकं दहनादिकम् ॥

जामदग्न्य.

"निर्मायअस्त्र" म्हणजे शरादि. याला निर्माय म्हणण्याचें कारण असें कीं, शराची माहिती मनुष्याला असते म्हणजे शर कसा सुटतो व त्याची शक्ति किती हें समजतें, पण अग्नि इत्यादिकांचें तसें नाहीं. ज्याच्या शक्तीचा बरोबर अंदाज करतां येत नाहीं तें मायिक अस्त्र. मायिक म्हणजे " मय " शिल्पज्ञानें केलेल्या रचनेप्रमाणें माणसाला फसविणारें व मोह उत्पन्न करणारें असाहि अर्थ समजावा असें सुज्ञांनीं लिहिलें आहे. असो. शस्त्रें हातांत घेऊन लढतां येतें व फेकून मारूनहि लढतां येतें हें आपण पाहिलें. फेकून मारण्याच्या शस्त्रांना " यंत्रमुक्त व पाणिमुक्त " असे पारिभाषिक शब्द आहेत. " क्षेपणीचापमंत्रादि यंत्रमुक्तं प्रकीर्तितम् " क्षेपणी धनुष्य इत्यादि हीं यंत्रमुक्त समजावीं. " शिला तोमर शूलादि पाणिमुक्तं तथैव च " दगड, तोमर, शूल हीं फेकून मारण्याचीं शस्त्रें समजावीं. कांहींना " मुक्तसन्धारित " म्हटलें आहे. मुक्त--सोडलेलें व सन्धारित--धरलेलें. जें हातांत धरून लढतां येतें व सोडूनहि लढतां येतें तें मुक्तसन्धारित होय.

"कुन्तप्रासादिकं चैव मुक्तसन्धारितं स्मृतम्" भाला, प्रास हीं सन्धारित होत. " खड्गादिकं अमुक्तंच बाहुयुद्धं विनायुधम्. "

जें शस्त्र--तलवार इत्यादि--केवळ हातांत घेऊनच लढतां येतें त्याला "**अमुक्त**" म्हणतात व बाहुयुद्ध म्हणजे कुस्ती ही तर आयुधावांचूनच होते. याप्रमाणें शस्त्र फेकणें किंवा न फेकणें या प्रकारांवरून युद्धाचे पांच प्रकार झाले. याबद्दल संग्रहश्लोक असा आहे.

यंत्रमुक्तं पाणिमुक्तं मुक्तसन्धारितं तथा ॥
अमुक्तं बाहुयुद्धं च युद्धं पंचविधं स्मृतम् ॥

उशनस्.

हीं पांचहि युद्धें जाणणें म्हणजे अर्थात् बहुतेक सर्व शस्त्रांचा उत्तम अभ्यास करणें असें सिद्ध होतें व हें काम साधारण नाहीं. हें काम जो करून दाखवील, यांत जो नैपुण्य मिळवील, तो त्याकाळीं शिक्षक होत असे. याचप्रमाणें या पांच युद्धांत जो जितकी योग्यता दाखवील त्याप्रमाणें धनुर्वेदाच्या पूर्वी पदव्या मिळत असत हें पुढील श्लोकावरून दिसून येईल.

आचार्यःपञ्चयुद्धःस्याच्चतुर्युद्धः कविःस्मृतः ॥
द्वाभ्यांचैव भवेद्योद्धा चैकेन गणको भवेत् ॥

उशनस्.

अर्थ--पांचहि प्रकारचें युद्ध ज्याला येतें तो **आचार्य**, चार युद्धें जाणतो तो **कवि**--ज्ञाता, दोन युद्धें जाणतो तो **योद्धा** व एक

युद्ध जाणतो तो **गणक** समजावा. तीन युद्धें जाणणारा तो **रथी** होय. याशिवाय भट आणि योध असे दोन शब्द योद्धा याचे पर्याय म्हणून कोशकार देत असतात. हे दोन शब्दहि पदव्याच आहेत असें वाटतें. वरच्या श्लोकांत पहिल्या चरणाचें दुसरें अर्ध "**चतुर्भिर्भार्गवः स्मृतः**"–अशा प्रकारें कांहीं पोथ्यांतून निराळें आढळतें, अर्थ विशेष नाहीं.

धनुर्वेदशिक्षक.

धनुर्वेदे गुरुर्विप्रः प्रोक्त वर्ण-
द्वयस्य च ॥
युद्धाधिकारःशूद्रस्य न स्वयं किन्तु
शिक्षया ॥
देशस्थैःसङ्करै राज्ञः कार्या युद्धे
सहायता ॥

शुक्रनीति.

अर्थ–धनुर्वेद ब्राह्मणांनीं शिकावा व इतरांना शिकवावा, तो शूद्राला शिकवूं नये. शूद्रानें युद्ध करणें तर कोणाचा तरी चाकर म्हणून युद्ध करावें. राष्ट्रांतील संकर जातींनीं राजाला युद्धांत मदत केली पाहिजे असा निर्बंध सांगितला आहे. वरच्या श्लोकाबद्दल अग्निपुराणांत 'देशस्थैः सङ्गरैः' असा पाठ आहे. त्याचा अर्थ–सङ्गरैः–प्रतिज्ञाबद्धैः असा होतो. हे प्रतिज्ञाबद्ध लोक म्हणजे निरनिराळे संघ--व्रात, गण इत्यादि, तसेंच जंगली लोक, आणि स्वयंसेवक समजावे असें आम्हांस वाटतें.

वरच्या श्लोकांत ब्राम्हणांनीं धनुर्वेद शिकवावा असें लिहिलें आहे हें सामान्य विधान समजावें. कारण इतिहासावरून सर्व लोक धनुर्वेद शिकवीत असत असें दिसून येतें. मागें द्रौपदीपुत्रांना भीष्मपितामह धनुर्विद्या शिकवीत असत असें लिहिलेंच आहे. दुसरें उदाहरण अर्जुनाचें. अर्जुन शिकून तयार झाल्यावर धनुर्वेद शिकवीत असे व त्याचेकडे अनेक राजपुत्र शिकत होते.

अर्जुनं ये च संश्रित्य राजपुत्रा
महाबलाः ॥
अशिक्षन्त धनुर्वेदं रौरवाजिन-
वाससः ॥
तत्रैव शिक्षिता राजन् कुमारा वृष्णि-
नन्दनाः ॥
रौक्मिणेयश्चसाम्बश्च युयुधानश्च
सात्यकिः ॥
सुधर्माश्चानिरुद्धश्च शैब्यश्च
नरपुंगवः ॥

महा. सभा. अ० ४

अर्थ--पांडवांच्या राज्याची विभागणी होऊन इंद्रप्रस्थ नगरींत पांडव राहूं लागल्यावर अर्जुन तेथें धनुर्वेद शिकवीत असे, अर्जुनाजवळ अनेक देशींचे राजपुत्र शिकत असत. अनिरुद्ध, सांब, सात्यकि, इत्यादि वीर अर्जुनाजवळच शिकले. तसेंच प्रद्युम्न, अभिमन्यु हे वीरहि अर्जुनाचेच शिष्य आहेत.

यौ तावर्जुन शिष्यौ ते प्रियौ बहुमतौ
सदा ॥

मौसलपर्व अ० ६

तौ–प्रद्युम्न व सात्यकि.

अभिमन्यूबद्दल—

धनंजयोपदेशेन श्रेष्ठमिष्वस्त्र
कर्माणि ॥ ३६

द्रोणपर्व अ० ७

अभिमन्यूला तर सर्वांनींच थोडें थोडें शिकविलें आहे—

भीष्मादवाप्य चास्त्राणि द्रोणाद्रामात्
कृपात्तथा ॥
अस्त्रैः समत्वं सम्प्राप्य रुक्मिकर्णा-
र्जुनाच्युतैः ॥ ७०

द्रोणपर्व. अ० २२

अभिमन्यूनें भीष्म, द्रोण, बलराम, कृप या सर्वांपासून अस्त्रें संपादन केलीं. बलरामानें भीमसेन व दुर्योधन यांना गदायुद्ध शिकविलें हें प्रसिद्धच आहे. रुक्मी "द्रुम" नांवाच्या किन्नरापासून चतुष्पाद धनुर्वेद शिकला असें महाभारतांत सांगितलें आहे.

यः किंपुरुषसिंहस्यगन्धमादन-
वासिनः ॥
कृत्स्नं शिष्यो धनुर्वेदं चतुष्पाद-
मवाप्तवान् ॥ ३

अ० १५८ देशा. वा. उद्योगपर्व.

रामायणांत गुहराजाचें वर्णन आलें आहे. हा निषध देशाचा अधिपति व वनाचा राजा असें याचें वर्णन वाल्मीकीनें केलें आहे—

चतुरंग ह्यपि बलं प्रसहेम वयं
युधि ॥ ८

सर्ग ८६ वा. रा. अरण्यकाण्ड.

पंचनावां शतान्येव समानिन्युः
समन्ततः ॥ १०

स० ८९ वा. रा. अरण्यकांड

या गुहाजवळ चतुरंग दल व पांचशें नांवा आहेत. अर्थात् हें सैन्य शिक्षित आहे व या सैन्याचें शिक्षण त्यांच्याच परंपरेंतून मिळत असलें पाहिजे. याचप्रमाणें व्याधराजा एकलव्य याला द्रोणाचार्यांनीं व्याध म्हणून शिकविण्याचें नाकारल्यावर त्यानें द्रोणांची मूर्ति केली व आपणच स्वयंप्रतिभेनें धनुर्वेदाचा अभ्यास सुरू केला व त्यांत प्राविण्य मिळविलें. याचें वर्णन महाभारतांत आलें आहे तें असें—

इष्वस्त्रे योगमातस्थे परं नियम-
मास्थितः ॥ ३४

महा. भा. आदि. अ० १३२

या सर्व वर्णनावरून त्रैवर्णिक व इतर लोक यांत धनुर्वेदाचा अभ्यास होत होता व सर्व लायक माणसें ही विद्या शिकवीत असत असें दिसून येतें.

धनुर्वेदाच्या आचार्यांना केवळ धनुर्वेदच शिकून भागत नसे, त्यांना इतर विद्याहि याव्या लागत असें वर्णन आढळतें.

इष्वस्त्र वरसंपन्नमर्थशास्त्र-
विशारद ॥
सुधन्वानमुपाध्यायं कच्चित्त्वं तात
मन्यसे ॥ १४

वा. रा. अर. कां सर्ग १००

वेदं षडंगं वेदाहमर्थविद्यां च
मानवीं ॥
त्रैयम्बकमथेष्वस्त्रं शस्त्राणि
विविधानि च ॥ १

महा. भा. द्रोणपर्व अ० १

पहिल्या श्लोकांतील सुधन्वा हे राम व लक्ष्मण इत्यादिकांचे धनुर्विद्येचे गुरु आहेत.

हे धनुर्विद्या, अस्त्रविद्या व अर्थशास्त्र जाणत असत. वसिष्ठांनींहि रामादिकांना धनुर्वेदाचें शिक्षण दिलें असें रामायणांत व अन्यत्र लिहिलें आहे. दुसऱ्या श्लोकांत द्रोणाचार्यांचें वर्णन केलें आहे व तें त्यांनीं स्वतःच केलेलें आहे. या श्लोकांतहि अर्थशास्त्राचा उल्लेख आहेच. अर्थशास्त्रांत राजनीति सांगितलेली असते व राजनीतीचा उपयोग धनुर्वेदांत होतो. कारण धनुर्वेद हें साधन आहे व साध्य दुसरेंच आहे. अर्थात् या साधनाचा उपयोग केव्हां व कसा करावा हें राजनीति सांगते. युद्धशास्त्रज्ञहि मुत्सद्यांची कारवाई किंवा बुद्धि हा युद्धाचा आत्मा मानतात व प्रत्यक्ष रणांगणावर शिपाई लढणें हें युद्धाचें शरीर मानतात. म्हणून धनुर्वेदाच्या पूर्णतेला राजनीतीची अत्यंत आवश्यकता आहे व तेव्हांच धनुर्वेद पूर्ण होतो. याकरितां पूर्वीच्या काळीं धनुर्वेदाबरोबर राजनीतिहि शिकवीत असत हें बरोबर आहे. असे धनुर्वेदाचे महान् आचार्य प्राचीनकाळीं बरेच होऊन गेले. त्यांत वसिष्ठ, विश्वामित्र, सुधन्वा, जमदग्नि, परशुराम, अगस्ति, शुक्राचार्य, अग्निवेश, भरद्वाज, द्रोणाचार्य, अश्वत्थामा, शरद्वान्, कृपाचार्य इत्यादि ब्राह्मण व अनेक राजे होते. त्यांमध्यें सूर्यवंशी व चंद्रवंशी बहुतेक सर्व प्रसिद्ध राजे उत्तम धनुर्धर होऊन गेले. क्षत्रियांमध्यें रामचंद्र, भीष्मपितामह, अर्जुन, रुक्मी, श्रीकृष्ण, बलराम, सात्यकि हे प्रसिद्ध आहेत. अलीकडील इतिहासांत राणा पृथ्वीराज चव्हाण प्रसिद्ध धनुर्धर होऊन गेले. यांपैकीं वसिष्ठ, विश्वामित्र, जमदग्नि, भरद्वाज, वैशंपायन आणि शुक्राचार्य यांनीं धनुर्वेदावर ग्रंथ लिहिले आहेत. या ग्रंथांमध्यें जशी शस्त्रास्त्रांची वाढ होत गेली, त्याप्रमाणें कमी जास्त मजकूर आहे. त्याचा क्रम सुज्ञांनीं बसविला आहे तो येणेंप्रमाणें—

पहिला धनुर्वेद वसिष्ठांचा. यांत केवळ तंत्रयुद्ध म्हणजे हातांनीं करावयाचे युद्धाची माहिती आहे. तसेंच कुस्ती, काठी, दगड, गोफण, पाश यांचा उपयोगहि सांगितला आहे. रामरावणकाळीं सुग्रीव, हनुमान, अंगद हे कुस्तीच लढत असत. वाली व रावण हेहि मल्लयुद्धांत प्रसिद्ध आहेत. रामकालीं पायदळ शिपाई दगड, गोफण, झाडें यांचाच विशेष उपयोग करीत. रामरावण युद्धांत यांचेंच प्राधान्य दिसून येतें. धनुष्य हें शस्त्र विश्वामित्रानेंच शोधून काढलें, म्हणजे त्यानें त्याला उत्तम शास्त्रीय स्वरूप दिलें. यामुळें धनुष्यविद्येचे मुख्य आचार्य विश्वामित्रास मानतात. विश्वामित्रानें ही विद्या उग्र तपश्चर्या करून शंकरापासून मिळविली, ही विद्या रामाला शिकविली व हिच्याच जोरावर रामानें रावणाचा नाश केला. विश्वामित्रधनुर्वेदांत धनुष्य, बाण, चक्र, तलवार, कट्यार, गदा, भाला, यांची माहिती आहे. या नंतर परशुरामानें तपश्चर्या करून शंकरापासून एक धनुर्वेद संपादन केला. तो जामदग्न्य धनुर्वेद होय. यांत स्फोटक द्रव्यांचा उपयोग असून स्फोटकदारु [बंदुकी इत्यादिकांची दारु] हिला जमदग्नि म्हणजे जळता--विस्तव--हेंच नांव आहे. या धनुर्वेदांत पहिल्यानें अस्त्रांना आरंभ होतो. हत्यारांचे शस्त्र व अस्त्र असे दोन भेद केले जातात व अस्त्रांचे मायिक व मांत्रिक असे भेद याच

धनुर्वेदांत सांपडतात. जामदग्न्य धनुर्वेदांत १ ब्राह्म,२ नारायण,३ शैव,४ ऐन्द्र,५ वायव्य, ६ वारुण, ७ आग्नेय अशा सात अस्त्रांची माहिती आहे. या विद्येच्या जोरावर परशुराम पराक्रमी झाला. यानंतर भरद्वाजांनीं एक धनुर्वेद संपादन केला व तो द्रोणाचार्य, कृपाचार्य, यांमार्फत कौरव पांडवांना शिकविला गेला. भारतीय युद्धांत जामदग्न्यधनुर्वेदाचे अनुयायी भीष्म व कर्ण होते व इतर योद्धे भारद्वाज धनुर्वेदाचे अनुयायी होते. या दोहोंची टक्कर म्हणजे भारतीय युद्ध होय. रामरावणयुद्धांत राक्षस वसिष्ठधनुर्वेदाचे अनुयायी व रामचंद्र विश्वामित्र धनुर्वेदाचे अनुयायी होते. म्हणजे वसिष्ठधनुर्वेद व विश्वामित्रधनुर्वेद यांचा झगडा हें रामायण-युद्ध होय. भारतीय युद्धाचे वेळीं जरासंध, बलराम, भीम, दुर्योधन हे वसिष्ठधनुर्वेदांत प्रवीण होते. विश्वामित्रधनुर्वेद या वेळीं मागें पडला होता. भारतीयांचा धनुर्वेद म्हणजे असुर, देव, राक्षस, गंधर्व, नाग इत्यादि लोकांचा अनुभव होय. भारद्वाज धनुर्वेदाची पोथी अद्यापि उपलब्ध झाली नाहीं. तींत अनेक अस्त्रांची माहिती असावी. कारण भरद्वाजांच्या विद्युत्शास्त्रकौशल्यावरून असें वाटतें. भरद्वाज हा शद्बसुद्धां भरद्--भर घालणारा व वाज--[सामर्थ्य] सामर्थ्य देणारा, सामर्थ्य पुरविणारा या अर्थाचा आहे. आणखी एक वैशंपायनांचा धनुर्वेद आहे. त्यांत अस्त्रांची माहिती आहे पण त्यांची कृति दिलेली नाहीं.

वरच्या वर्णनावरून घातक शस्त्रांची वाढ कशी होत गेली हें समजून येईल. या घातक शस्त्रांच्या वाढीबरोबरच संरक्षक शस्त्रांचीहि वाढ होत गेली. वसिष्ठधनुर्वेदाच्या वेळीं काश्यप कवचविद्या होती. या काश्यप विद्येंत लाकडी व कातड्याच्या ढाली, कवचें इत्यादिकांची माहिती आहे व गढ्या, किल्ले बांधण्याची माहिती आहे. यानंतर संरक्षक पद्धतींत दुसरी मोठी सुधारणा म्हटली म्हणजे उशनसाची "संजीवनी विद्या". ही संजीवनी विद्या म्हणजे व्यूहरचना, व्यूह म्हणजे सैन्याची व्यवस्थित मांडणी. एक सैनिक मेला कीं खालच्यानें त्याचें स्थान स्वीकारावें. याप्रमाणें परंपरा सारखी चालली तर कोणी मेल्यामुळें कामास अडथळा येऊं नये अशी योजना या व्यूहांत आहे. हीच संजीवनी विद्या होय. ही संजीवनी विद्या शुक्राचार्यांनीं आपल्या औशनसधनुर्वेदांत सांगितली आहे. ही विद्या बृहस्पतीचा मुलगा कच यानें असुरांपासून सुरांकडे आणली, परंतु ती सुरांकडे फार दिवस नांदलेली दिसत नाहीं. मौर्यांपासून मराठशाहीअखेरपर्यंत हिंदु सैनिकांनीं या विद्येचा उपयोग केलेला दिसत नाहीं. या संजीवनी विद्येचा किंवा व्यूह विद्येचा उत्कृष्ट उपयोग भारतीय युद्धांत दिसून येतो. या युद्धांत दोनहि बाजूला व्यूहविद्या-कुशल सैन्य होतें म्हणूनच ही लढाई अठरा दिवस लांबली. नाहीं तर सन १७६१ च्या पानिपतच्या तिसऱ्या युद्धाप्रमाणें एकाच दिवसांत सर्व निकाल झाला असता.

प्राथमिक शिक्षणांत धनुष्यादि सहा शस्त्रांचें वर्णन लिहून झालें. भारतीय आर्यांनीं आणखी परशु, शक्ति, तोमर इत्यादि अनेक शस्त्रांचा उपयोग केला आहे. अशा बत्तीस

शस्त्रांचें वर्णन येथें लिहितां येईल तसेंच येथें लिहिलें. त्याशिवाय धनुष्याचे विशेष कौशल्याचे चमत्कार व मृगया, शस्त्रसमारंभ, स्त्रियांचें धनुर्वेदशिक्षण इत्यादि प्रकरणें लिहिलीं म्हणजे प्राथमिक शिक्षण हा विषय पूर्ण होईल. परंतु या निबंधांत हा विषय स्थलसंकोचास्तव आम्हाला लिहितां येत नाहीं.

प्राथमिक शिक्षणाबद्दल येथवर लिहून झालें. राजपुत्रांचें प्राथमिक शिक्षण व सैनिक शिक्षण घरींच व्हावयास हरकत नाहीं व याप्रमाणें रामचंद्र व त्यांचे बंधु व कौरव पांडव यांचें शिक्षण राजधानींतच झालें असें रामायणमहाभारतांवरून दिसून येतें. सैनिक शिक्षणांत घोडा, रथ व हत्ती यांचा अंतर्भाव होतो, अर्थात् यांना संभाळून आपलें संरक्षण करणें अशीं दोन कामें सैनिकाला करावीं लागतात व हें काम करणें लहान वयांत शक्य नाहीं. तसेंच रथ, घोडा, हत्ती हीं साधनें सर्वांना मिळणें कठीण, याला राजाश्रयच पाहिजे. याकरितां मोठ्या वयांत शिकावयाचें व राजाश्रयानें मिळणारें असें सैनिक शिक्षण याचा आतां विचार करूं.

सैनिक–शिक्षण.

नीतिशस्त्रास्त्रव्यूहादिनतिविद्याविशारदाः ॥
अबाला मध्यवयसःशूरा दान्ता दृढांगकाः ॥
स्वधर्मनिरता नित्यं स्वामिभक्ता रिपुद्विषः ॥
सेनाधिपाः सैनिकाश्च कार्या राज्ञाजयार्थिना ॥

शुक्रनीति अ० २

जितहस्तोजितमतिर्जितदृग् लक्ष्यसाधकः ॥
नियतां सिद्धिमासाद्य ततो वाहनमाहरेत् ॥

अग्निपु०

अर्थ—जयार्थी राजानें सैन्यांतील शिपाई व त्यांचे अधिकारी लोक हे नीतिशास्त्र, शस्त्र, अस्त्र, व्यूहरचना, नति म्हणजे शत्रूवर जय मिळविणें, यांत तरबेज असे तयार करावे. तसेंच हे सैन्यांतील लोक तरुण व मध्यमवयाचे असावे आणि ते इंद्रियनिग्रही, शरिरानें मजबूत, आपल्या कामांत तत्पर व राजावर प्रीति करणारे आणि शत्रूचा द्वेष करणारे असे असावे.

धनुष्याचा अभ्यास पुरा झाल्यावर, अर्थात् हात, दृष्टि, बुद्धि व लक्ष्यसिद्धि यांत पूर्ण निष्णात झाल्यावर, वाहन म्हणजे घोडा, रथ इत्यादि, हीं ग्रहण करावीं म्हणजे यांचा अभ्यास सुरू करावा.

सैन्यांतील शिपाई कसे असावे याबद्दल शुक्रनीतींतील श्लोक वर लिहिले आहेत. हल्लीं सामान्यपणें समजूत अशी आहे कीं शिपाई म्हणजे आडदांड माणूस; पण हें राष्ट्राच्या अवनतीचें लक्षण आहे असें समजावें. कारण ज्या शिपायांवर राज्याचें रक्षण अवलंबून आहे, ते जर नुसते आडदांड माणूस असतील तर राष्ट्रनाश झाला म्हणून निश्चित समजावें. याकरितां सैनिकांना नीति समजली पाहिजे, ते

आपल्या युद्धशास्त्रांत निपुण असले पाहिजेत, त्यांनीं इंद्रियनिग्रह करावा, राष्ट्रावर प्रेम करावें, आपले शत्रु कोण हें त्यांनीं ओळखावें इत्यादि नियम शुक्राचार्यांनीं सैनिकांकरितां सांगितले आहेत. हें किती महत्वाचे आहेत हें सुज्ञवाचकांस सांगावयास नको. हिंदु सैनिकांत या सद्गुणांचा अभाव झाल्याबरोबर हिंदुस्थानची राखरांगोळी झाली हें इतिहासज्ञांस विदित आहेच. तसेंच राष्ट्राच्या उत्कर्षाच्या काळांत असे शिपाई नसतात हेंहि इतिहासज्ञ जाणतच आहेत. असो.

सैनिकांचें वय.

सैन्यांतील शिपाई वयानें लहान नसावे व मध्यम वयाचे असावे असें वर लिहिलें आहे, पण यावरून वयाचा निश्चित बोध होत नाहीं. परंतु अन्यत्र वयाबद्दल शुक्राचार्यांनीं सांगितलें आहे तें असें—

मनुष्य गजयोर्बाल्यं यावद्विंशति वत्सरम् ॥ १५४

नृणां हि मध्यमं यावत् षष्टिवर्षं वयः स्मृतम् ॥ १५५

अ० ४ प्रक. ७

अर्थ—मनुष्य आणि हत्ती हे वयाच्या वीस वर्षेपर्यंत बालक म्हणजे लहान समजावे आणि मनुष्य २० वर्षांपासून ६० वर्षांपर्यंत मध्यम वयाचा समजावा.

वाल्मीकिरामायणांत विश्वामित्रानें रामाला यज्ञरक्षणासाठीं दशरथाजवळ मागितला असतां दशरथ म्हणतो,

ऊनषोडशवर्षो मे रामो राजिवलोचनः ॥

न युद्धयोग्यतामस्य पश्यामि सह राक्षसैः ॥ २

बालकांड सर्ग २०

अर्थ—रामाचें वय ऊनषोडश म्हणजे १५ वर्षें वयाचें आहे, अर्थात् राक्षसांशीं लढण्याला योग्य अशी रामाची योग्यता मला दिसत नाहीं. दशरथाच्या बोलण्याचा भावार्थ असा कीं, राम अजून लहान--बालक आहे, अर्थात् तो युद्धांत भाग घेण्यास योग्य नाहीं. यावरून सोळा वर्षांपासून मनुष्य लढण्यास लायक होतो असा निष्कर्ष निघतो. या श्लोकावर टीकाकारहि हाच अभिप्राय व्यक्त करतात. "षोडशवर्षः क्षत्रियकुमारो युद्धार्ह इति शास्त्ररीतिः" तात्पर्य, १६ वर्षांपासून मनुष्य लढण्याला लायक होतो म्हणजे तो सैनिक म्हणावयास हरकत नाहीं. म्हणून कमींत कमी १६ वर्षांपासून ६० वर्षें वयापर्यंत मनुष्य सैनिकाचें काम करूं शकतो असें सिद्ध होतें.

सैन्यांत भरती झालेला व सैनिकाचें शिक्षण घेत असलेला जो मनुष्य त्याला हल्लीं रिक्रुट म्हणतात व ज्याचें शिक्षण पूर्ण झालें तो शिपाई म्हटला जातो. त्याचप्रमाणें पूर्वीच्या काळीं सैन्यांत शिक्षण घेत असलेले व शिकून तयार झालेले असे सैनिकांचे दोन प्रकार करीत असत.

शिक्षितं व्यूहकुशलं विपरीतमशिक्षितम् ॥ ११

शुक्र० अ. ४ प्रक. ७

अर्थ—सैन्यांत भरती झाल्यावर ज्याचें शिक्षण चालू आहे त्याला 'अशिक्षित'

म्हटला जाई व ज्याचें शिक्षण पुरें झालें अर्थात् व्यूहरचना ज्याला शिकविली गेली तो " शिक्षित " म्हटला जात असे.

शिबिर.

सैनिकांची छावणी कोठें असावी व कशी असावी याबद्दल नियम पुढीलप्रमाणें आहेत.

ग्रामाद्बहिःसमीपेतु सैनिकान् धारयेत सदा ॥
ग्राम्यसैनिकयोर्नस्यादुत्तमर्णाधमर्णता ॥ ३७९
सैनिकार्थंतु पण्यानि सैन्ये सन्धारयेत् प्रथक् ॥ ३८०

शुक्र. अ० ४ प्रक. ७

अर्थ—गांवाच्या बाहेर पण गांवापासून जवळ सैनिकांची छावणी असावी. गांवचे लोक व छावणींतील शिपाई यांचा देण्याघेण्याचा व्यवहार नसावा. सैन्याकरतां बाजाराची व्यवस्था छावणींतच करावी.

छावणीचे दोन प्रकार आहेत.ज्या छावणींत शिपायांचें शिक्षण सुरू असतें, तेथें राहण्यासाठीं घरें, बाजारहाट इत्यादि सर्व प्रकारची व्यवस्था असते. अशा छावण्यांतून सैन्याच्या अधिकाऱ्यांना राहण्यासाठीं घरेंहि पण असतात. अशा छावणीचें हें वर लिहिलेलें वर्णन आहे. याला निवेश असें म्हणतात. दुसरी छावणी केवळ शिपाई व त्यांचे अधिकारी यांची असते. ही छावणी तंबूतच असते आणि ही वाटेल तेव्हां हालवितां येते व डोंगरांत, अडचणीच्या ठिकाणीं, किल्ल्यावर कोठेंहि ठोकतां येते. हिला शिबिर असें म्हणतात किंवा स्थानीय असेंहि म्हणतात. या छावणीला गोट किंवा सेनेचा तळ अशीं मराठी नांवें दिलेलीं आढळतात. गोट कोणाचा ? होळकरांचा, असें शत्रूला समजतांच शत्रू पळून जात असे असा होळकरांच्या गोटाचा दरारा होता. इतिहासांत ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

शिबिराकडे [निवेशा] जाण्याचा रस्ता ८ दण्ड रुन्द असावा असें चाणाक्यानें सांगितलें आहे [अधि० २-४-४] व या रस्त्याला ' व्यूहपथ ' असें नांव आहे. सैनिक ज्या जागेवर कवाईत—व्यायाम—करतात त्या जागेला " खलूरिका " असें नांव आहे. यालाच परेडीचें मैदान म्हणतात. या मैदानावर सैनिकांचा रोजचा कार्यक्रम पुढीलप्रमाणें सांगितला आहे—

सायंप्रातः सैनिकानां कुर्यात् सङ्गणनं नृपः ॥
जात्याकृतिवयोदेशग्रामावासान् विमृश्य च ॥ ३८८

पत्यश्वरथद्विपाःसूर्योदये बहिः सन्धिदिवसवर्जं, शिल्पयोग्याःकुर्युः । तेषु राजा नित्ययुक्तःस्यादभीक्ष्णं चैषां शिल्पदर्शनं कुर्यात् । कृतनरेन्द्राङ्कं शस्त्रावरणमायुधागारं प्रवेशयेत् । अशस्त्राश्चरेयुरन्यत्रमुद्रानुज्ञातात् । नष्टं विनष्टं वा द्विगुणं दद्यात् । विध्वस्तगणनां च कुर्यात् ॥

कौटि० अ० ५ अ० ३

सैनिकैरभ्यसेन्नित्यं व्यूहाद्यनुकृतिं नृपः ॥
तथाऽयनेऽयने लक्ष्यमस्त्र पातैर्विभेदयेत् ॥३८७॥

शुक्र. अ. ४ प्रक. ७

अर्थ—सैन्यांतील शिपायांची प्रतिदिवशीं सकाळ संध्याकाळ उपस्थिति पहावी [हजेरी

द्यावी]. सैन्यामध्यें निरनिराळया जातींचे व निरनिराळया प्रांतांतील लोक असतात. सैन्यांत भरती झालेल्या प्रत्येक माणसाची माहिती लिहिलेली असावी. या माहितींतील मुख्य गोष्टी येणेप्रमाणें आहेत. **जाति**—त्याची जात कोणती अर्थात् प्रथम नांव लिहावें व त्यापुढें जाति लिहावी. **आकृति**—देहाचें वर्णन. यांत रंग, उंची, देहावरील खाणाखुणा लिहिलेल्या असाव्या. **वय**- किती वर्षें झालीं तो आंकडा, देश, गांव व गांवांतील ठिकाण यांची नीट चौकशी करून सर्व वर्णन लिहिलेलें असावें. शिपाई भगोडा झाला म्हणजे सैन्यांतून पळून गेला किंवा त्याच्याकडून दुसरा कांहीं अपराध झाला तर त्याचा तपास लावण्यास या माहितीचा उपयोग होतो.

पूर्वी सैन्यांत पायदळ, घोडदळ, रथी व हत्तीस्वार असे चार प्रकारचे लोक असत. या सर्वांची सकाळीं उपस्थिति पाहिल्यावर सर्वांनीं सुर्योदयाबरोबर परेडीच्या मैदानावर जावें. तेथें राजानें सैनिकांच्या शिक्षकांकडून प्रतिदिवशीं सैनिकांना शिल्पं—म्हणजे शिक्षण द्यावें व या वेळीं राजानें स्वतः उपस्थित राहावें. राजा कवाईत पाहाण्यास उपस्थित राहणार असल्यास प्रथम राजाला सर्व शिपाई अभिवादन करतात म्हणजे सलामी देतात. दररोज शिपाई व त्यांचे शिक्षक व सैन्याचे अधिकारी परेडीच्या मैदानावर आपापल्या जागीं व्यवस्थित उभे राहिल्यावर प्रथम राजाला अभिवादन करून मग परेडीला आरंभ होतो. परेड संपल्यावर कृतनरेन्द्राङ्कं—केलें आहे राजचिन्ह ज्याच्यावर असें, आयुधावरणं-म्हणजे शस्त्र व कपडे इत्यादि, आयुधागारं—[प्रति] शस्त्रादि ठेवण्याचें स्थान—कोठी यामध्यें, प्रवेशयेत्—हीं सर्व ठेवावीं. परेडीच्या वेळीं हत्ती, घोडे, रथ, तसेंच त्यांचे सामान व सर्वांना लागणारीं शस्त्रास्त्रें आणि कपडे हें सर्व सरकारी सामान असतें. हें सरकारी कोठींत ठेवून मग शिपायांनीं आपल्या वासस्थानीं [बराकींत] जावें. आज्ञेवांचून कोणीहि शिपायानें सशस्त्र हिंडूं नये. शस्त्रादि सरकारी सामानाची जबाबदारी कोठीवरील अध्यक्षावर आहे. सरकारी काम चालत असतांना अर्थात् कवाईत, पहारा इत्यादि काम करीत असतांना शस्त्रादि मोडलीं तर त्याचें नुकसान सरकार भरील, परंतु सरकारी कामाखेरीज इतर वेळांत शस्त्रादि सरकारी सामान मोडलें किंवा नादुरुस्त झालें किंवा नाहींसें झालें तर त्याची जबाबदारी कोठीच्या अध्यक्षावर आहे. नुकसानीच्या दुप्पट रकम त्यानें भरून द्यावी. तसेंच मोडलेल्या शस्त्रांची नोंद ठेवावी. याचा उपयोग नवीन शिपायांना शिकविण्याकरतां होत असतो. शिपायांना पौर्णिमा व अमावास्या हे पर्व दिवस आणि इतर नेमलेले दिवस या दिवशीं सुट्टया असाव्या. या सुट्टयांच्या दिवसांत शिपायांनीं आपापलीं शस्त्रास्त्रादि घांसून पुसून स्वच्छ करावीं, कपडे धुवावे, व वासस्थान म्हणजे राहण्याच्या जागेची सफाई करावी व अधिकाऱ्यांनीं हें सर्व तपासून पहावें. सुट्टयांच्या दिवशीं सणवार करणें, लष्करी खेळ खेळणें हीं कामें शिपाई करीत असतात. कवाईतीमध्यें शिक्षकांनीं शिपायांकडून व्यूहाची अनुकृति म्हणजे अनुकरण अर्थात् अभ्यास करवावा व अयने अयने म्हणजे दर सहा सहा महिन्यांनीं लक्ष्यवेध करवावा म्हणजे सैनिक लोक शिक-

लेलें विसरत नाहींत. हें सर्व " शिक्षित " म्हणजे शिकून तयार झालेल्या शिपायांसंबंधीं झालें. शिक्षित शिपायांनाहि दररोज कवाईत केली पाहिजे म्हणजे ते शिकलेलें विसरत नाहींत, शरिरांत सुस्ती चढत नाहीं, शस्त्रास्त्रादि स्वच्छ राहतात व सर्व सामान जागच्याजागीं राहतें. शिपायांना देहदंड हा अवश्य पाहिजे.

सुताडनैर्विनेयाहि मनुष्याः
पशवस्सदा ।।
सैनिकास्तु विशेषेण न ते वै
धनदण्डतः ।।१७५।।

शुक्र. अ० ४ प्रक. ७

अर्थ–माणसें व पशु यांना शिक्षा पाहिजेच. शिक्षेनेंच ते विनीत म्हणजे शिक्षित होतात. सैनिकांना तर ताडन म्हणजे देहदंडच पाहिजे म्हणजे ते शिक्षित होतात. सैनिकांना द्रव्यदंड करूं नये, द्रव्यदंडानें ते आपल्या कामांत तरबेज होणार नाहींत. अशिक्षित म्हणजे नवीन भरती झालेले [शिपायाचें शिक्षण पुरें न झालेले] यांना दररोज व्यूहरचना, शस्त्रास्त्रांचा अभ्यास इत्यादि शिकवावीं. तसेंच सैन्यांत राहावें कसें, सैनिकांचें कर्तव्य कोणतें, उतम शिपायी कसा होतो, सैनिक शिक्षणाचा उपयोग कसा करावा इत्यादि व नीतिशस्त्रास्त्रव्यूहादि या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें शिक्षण द्यावें.

राजानें सैनिकांना शिक्षकांकडून शिक्षण द्यावें म्हणून वर लिहिलें आहे, यासाठीं आतां हें शिक्षण कसें असावें व त्यांनीं शिकवावें कसें याबद्दल लिहूं. प्रथम अश्वशिक्षकाबद्दल लिहितों.

अश्वशिक्षक.

समा च विपुला चैव किंचित्पांशु
समन्विता ।।
एकान्ते विजने चैव रंगभूमिः
प्रशस्यते ।।
चक्रितं रेचितं वल्गितकं धौरित-
माप्लुतम् ।।
तुरं मन्दञ्च कुटिलं सर्पणं परि-
वर्तनम् ।।
एकादशास्कन्दितञ्च गतिरश्वस्य
वेत्ति यः ।।
यथाबलं यथार्थञ्च शिक्षयेत् स च
शिक्षकः ।।

अर्थ–घोड्याला शिकविण्याकरतां सपाट जागा पाहिजे. तिचें वर्णन असें आहे–ही जागा सपाट व विस्तृत असावी, तसेंच तिच्यामध्यें थोडी वाळू असावी. या मैदानावर शांतता पाहिजे, अर्थात जवळपास लोकवस्ती नसावी व या मैदानावर लोकांची वर्दळ नसावी. घोडा फिरविण्याच्या मैदानाला " रंगभूमि " असें म्हणतात.

घोड्याला फिरविण्याच्या अर्थात् चालविण्याच्या अकरा गति आहेत.

१ **चक्रितं**–चक्राकार फिरविणें, याचे सहा भेद आहेत.

२ **रेचितं**–मध्यम वेगानें चक्राकार फिरविणें, दुडकी चाल.

३ **वल्गितकं**–बाजी चाल.

४ **धौरितं**–तुरकी गाम चाल.

५ आप्लुतं–चौक चाल.

६ तुरं–वेगानें जाणें,याचे आठप्रकार आहेत.

७ मन्दम्–सावकाश चालणें, याचे १६ भेद आहेत.

८ कुटिलं–वक्रगतीनें जाणें.

९ सर्पणं–पुढें जाणें, यालाच लंघन असें म्हटलें तर त्याचे सात भेद आहेत.

१० परिवर्तनं–व ११ आस्कन्दितं–शत्रूवर आक्रमण करणें. या अकरा गति यथार्थ म्हणजे योग्य रीतीनें जो जाणतो व शिकवितो, तसेंच घोडा व मनुष्य यांची शक्ति जो जाणतो तो अश्वशिक्षक होय.

घोडेस्वार

घोड्यावर उत्तमरीतीनें बसणाराचें वर्णन असें केलें आहे—

तस्माद्वेगन्वितं वाहं तरुणं पुष्ट-
विग्रहम् ॥
वाहयेद्वाहकःसज्जस्तुरंगं सान्त्व-
यन्मुहुः ॥
न्हेषिते स्खलिते भीते तथा चोन्मार्ग-
गामिनि ॥
कुपिते भ्रांतचित्ते च षट्सु दण्डं
निपातयेत् ॥
न्हेषिते स्कन्धमुद्दिष्टं स्खलिते
जधनान्तरम् ॥
भीते वक्षस्थलं हन्याद्वक्रं चोन्मार्ग
गामिनि ॥
कुपिते पुच्छ संस्थानं भ्रान्ते जानुद्वयं
तथा ॥
सर्वस्यप्राप्त दण्डस्य दण्डमेकं
निपातयेत् ॥
अस्थाने ताडिते बाजी बहुन् दोषान-
वाप्नुयात् ॥
तावद्भवन्ति ते दोषा यावज्जीवत्यसौ
हयः ॥
दृढासनोऽश्वतत्वज्ञःप्राज्ञःसत्व-
बलोत्तरः ॥
सुस्थान दण्डपाती च सोत्तमो
वाहकः स्मृतः ॥

अर्थ–ज्या घोड्यावर स्वारी करावयाची तो घोडा वयानें तरुण, शरिरानें पृष्ट, स्वाराला वाहून नेण्याला समर्थ व वेगानें चालणारा असा असावा. स्वारानें घोड्याला सजवून मग त्यावर आरूढ व्हावें. घोड्याला मारूं नये, वारंवार त्याचें सान्त्वन करावें, पाठीवर थाप देणें, चुचकारणें इत्यादि. ज्याचें आसन दृढ असतें म्हणजे जो घोड्यावर बसला असतां मागें पुढें होत नाहीं, स्वारीच्या घोड्याचा स्वभाव जो नीटपणें ओळखतो, प्रसंगीं कसें वागावें हें जो नीटपणें जाणतो, तसेंच बलवान् घोड्याला आवरून धरणारा आणि योग्य ठिकाणींच जो घोड्याला ताडन करतो तो उत्तम घोडेस्वार समजावा.

घोडा खिंकाळूं लागला, चालतांना अडखळूं लागला किंवा भ्याला किंवा आडवाटेला जाऊं लागला, तो रागवला आणि भ्रमिष्ट झाला तर अशा सहा प्रसंगींच घोड्याला शासन करावें. हें शासन कोठें करावें याचा क्रम असा सांगितला आहे; घोडा खिंकाळूं लागला तर खांद्यावर, अडखळूं

लागला तर ढुंगणावर, भ्याला तर वक्षःस्थळावर, आडवाटेला गेला तर तोंडावर, रागावला असतां शेपटीच्या मुळावर, अमिष्ट झाला असतां दोनहि गुडघ्यांवर याप्रमाणें ताडन करावें. तसेंच खोडकर घोड्याला आढी घालावी किंवा कायदा लावावा.

घोड्याला भलत्याच ठिकाणीं मारलें असतां घोड्याचे अंगीं दोष उत्पन्न होतात, व ते घोड्याच्या आयुष्यभर तसेच राहतात. तात्पर्य, अयोग्य रीतीनें घोड्याला वागविलें असतां घोडा खोडकर बनतो, वस्तुतः घोडा वाईट नाहीं असें अश्वतज्ज्ञांचें म्हणणें आहे.

पञ्चयोजनान्यध्वाष्टमानि दशेति
पृष्ठवाह्यानामश्वानामध्वा ॥
कौ. अ. अधि. २–३०–४४

स्वारीचा घोडा एका दिवसांत पांच, आठ किंवा दहा योजनें [एक योजन म्हणजे चार कोस] जाऊं शकतो. असें कौटिल्यानें लिहिलें आहे. अश्वशाला कशी बांधावी, घोड्याचें लालनपालन कसें करावें, घोड्याची परीक्षा कशी करावी इत्यादि माहिती मूलग्रंथांतूनच वाचकांनीं वाचावी येथें या पेक्षां जास्त लिहितां येत नाहीं. अलिजाबहादर शिंदे यांचे घोडेस्वार बाबासाहेब आपटे उत्तम घोडेस्वार म्हणून प्रसिद्ध होते.

घोडेस्वाराचें वर्णन लिहून झालें. सैन्यांतील घोडेस्वाराला दोन कामें करावीं लागतात. घोडा संभाळावा लागतो व शस्त्र चालवावें लागतें. सैन्यांतील घोडेस्वाराचें वर्णन पुढीलप्रमाणें आहे.

सादिनश्च तथा कार्याः शूरा व्यूह-
विशारदाः ॥
वाजिगतिविदःप्राज्ञाः शस्त्रास्त्रैर्युद्ध
कोविदाः ॥१३३॥
शुक्र. अ० २

अर्थ–सैन्यांतील घोडेस्वार हे शूर, व्यूहरचना जाणणारे, घोड्याची गति जाणणारे, प्राज्ञ–शहाणे अर्थात प्रसंग पडेल तसें वागणारे व शस्त्रास्त्रादि चालविण्यांत निपुण असे असले पाहिजेत.

गजशिक्षक–अनीकस्थ.

प्रभद्रादिजातिभेदं गजानाञ्च
चिकित्सितम् ॥
शिक्षांव्याधिं पोषणञ्च तालुजिव्हा-
नखैर्गुणान् ॥१२७॥
आरोहणं गतिंवेत्ति स योज्यो
गजरक्षणे ॥
तथाविधा धोरणस्तु हस्तिहृदय
हारकः ॥१२८॥
शुक्र. अ० २

अर्थ–प्रभद्र, मन्द्र, इत्यादि हत्तींच्या जाति, तसेंच हत्तीची चिकित्सा [औषधें] शिक्षा–शिक्षण चार प्रकारचें, व्याधि–रोग, पोषण, तालु, जिव्हा, नख इत्यादिकांवरून हत्तीचे गुण ओळखणें, आरोहण–हत्तीवर बसणें–[याचे आठ प्रकार आहेत] व त्याच्या गति–[युद्धांतील चाली सात] हें सर्व जो जाणतो, त्याच प्रमाणें हस्तिहृदयहारक–म्हणजे हत्तीचें मन ओळखून त्याला ताब्यांत ठेवणारा आणि प्रसंग पडेल त्याप्रमाणें धोरणानें वागणारा हा गजशिक्षक होतो.

वरील श्लोकामध्यें "स योज्यो गजरक्षणे" असें म्हटलें आहे व या श्लोकाचा अर्थ गजरक्षक असा होतो आणि चाणाक्यानें गजशिक्षक व गजरक्षक असें दोन स्वतंत्र मनुष्य सांगितले आहेत. तसेंच आधोरण म्हणजे महात हा अर्थ प्रसिद्ध आहे, हे तीन स्वतंत्र असणें फारच चांगलें. पण या तिहींचें काम जाणणारा गज शिक्षक होऊं शकतो. याला अनीकस्थ असें म्हणतात.

हत्तीस्वार

❀

शूरमारोहकंकुर्याद्वशगं च
विशेषतः ॥
शूरत्वं कातरत्वं च तदायत्तं
गजे यतः ॥
शारं प.

युद्धशिक्षा—

उपस्थानं, संवर्तनं, संयानं, वधावधो,
हस्तियुद्धं, नागरायणं, सांग्रामिकं च ॥
शोभावशेन व्यायामं भद्रं भद्रं च
कारयेत् ॥
मृगसंकीर्ण लिंगं च कर्मस्वृतु
वशेन वा ॥
कौटि. अधि. २–३२

अर्थ—हत्तीवर स्वार होणारा हा माणूस शूर असावा आणि विशेषें करून हत्तीला ताब्यांत ठेवणारा असावा. कारण या स्वाराच्या अंगीं जसा शूरपणा असेल तसा हत्ती पण शूर होतो. स्वार भितरा असेल तर हत्ती भितरा होतो.

हत्तीला युद्धशिक्षण सात प्रकारचें देतात—

१ **उपस्थानं**—उंच होणें, वांकणें, दोर, काठी, निशाण यांवरून उडी मारणें इत्यादि कवाईत.

२ **संवर्तनं**—निजणें, बसणें, खळग्यावरून उडी मारणें.

३ **संयानं**—सरळ, वांकडें, गोलाकार, नाग-मोडीप्रमाणें चालणें. कित्येकांनीं मंडळ धरणें एवढाच अर्थ दिला आहे.

४ **वधावधः**—घोडा, रथ, माणूस तुडविणें किंवा आपटणें, टक्कर देणें, फेकून देणें इत्यादि.

५ **हस्तियुद्ध**—दुसऱ्या हत्तीबरोबर लढाई.

६ **नागरायण**—वेशीवर, तटबंदीवर टक्कर मारणें.

७ **सांग्रामिकं**-युद्ध—मैदानी लढाई व सौतिक युद्ध.

युद्धांत करावयाचीं हीं कामें आरंभी हत्तीला शिकवावयाचीं असतात, हें शिक्षण देत असतांना हत्तीच्या कमरेला दोर बांधावा, गळ्यांत साखळदंड घालावा व नेहमीं हत्तीच्या कळपांत ठेवून काम करावयास लावावें.

अर्थ—हत्तीला व्यायाम अर्थात् शिक्षण कसें द्यावें या बद्दल नियम सांगितला आहे तो असा—**शोभावशेन**—बलाप्रमाणें, **भद्र**—उत्तम, **मन्द्र**—मध्यम **संकीर्ण**—मिश्र [भद्रादिकांपासून उत्पन्न झालेला] व मृग याप्रमाणें जसा हत्ती असेल तसेंच ज्याची ज्या कामाकरतां योजना करावयाची असेल [युद्धादि] त्याप्रमाणें व ऋतुवशेन म्हणजे पावसाळा, हिवाळा इत्यादि ऋतूं प्रमाणें शिक्षण द्यावें.

रथ शिक्षक–रथिक

एभिर्गुणैश्चसंयुक्तो धुर्यान् युग्यांश्च
वेत्तियः ॥
रथस्य सारं गमनं भ्रमणं परिवर्तनम् ॥
॥१३१॥
समापतत् सुशस्त्रास्त्र लक्ष्य संधान
नाशकः ॥
रथगत्या स रथयो हय संयोग
गुप्तिवित् ॥१३२॥
शुक्र. अ० २

दैन्यं हर्षश्च खेदश्च रथिनश्च
महाबल ॥ १७
सर्वमेतद्रथस्थान ज्ञेयं रथ
कुटुंबिना ॥ २०
वा. रा. युद्धकांड सर्ग १०५

अर्थ–एभिर्गुणैः–मागें घोड्यासंबंधीं जें लिहिलें आहे तें सर्व जाणणारा अर्थात् घोड्याच्या चाली इत्यादि ज्ञान ज्याला आहे असा, त्याचप्रमाणें रथाला घोडे जोडणें, सोडणें, निरनिराळ्या रीतींनें रथ चालविणें, **गमन**–जाणें **भ्रमण**–वाटोळे फिरणें, **परिवर्तन**–मागें हटणें, पळणें इत्यादि, तसेंच **विनिमय**–वर लिहिलेल्या गतींचा योग्य उपयोग करणें, त्याचप्रमाणें **रथस्य सारं**–रथाची मजबुती जाणणें आणि शत्रूकडून होत असलेल्या अस्त्रशस्त्रादिकांचा प्रहार चुकविणें व घोडयांचें रक्षण करणें, रथ्याला होत असलेला त्रास इत्यादि ओळखणें हें सारथ्य कर्म होय. रथिकानें हें सारथ्यकर्म शिकवावें. ज्याप्रमाणें हल्लीं घोडेस्वारांत नवीन मनुष्यांना घोडयावर बसावयास शिकविण्याचे पूर्वी लाकडीघोड्यावर बसावयास शिकवितात त्याचप्रमाणें रथ शिक्षणांत प्रथम "वैनयिक रथ" घोडे शिकविण्याचा रथ–घसीट, बिन-चाकी गाडी असे.

सैन्यांत भरती केलेले घोडे रथासाठीं व स्वारीसाठीं, याप्रमाणें हत्ती पण स्वारी-साठीं, यांना प्रथम निरनिराळ्या रीतीनें चालावयास शिकवीत असत. कारण हत्तीकडून निराळीं कामें [युद्धाचीं] करवावयाचीं, घोडे-स्वारांकडून निराळीं कामें करवावयाचीं व रथ्यांचीं कामें निराळीं; तसेंच पायदळाचें काम पण निराळें. प्रत्येक प्रकारची फौज कांहीं विशिष्ट गुणांमुळें व निरनिराळ्या कामा-साठीं तयार केली जाते. म्हणून प्रथम काम हत्ती व घोडे यांना पुढें करावया लागणाऱ्या युद्धाप्रमाणें चालावयास शिकविणें हें आहे; तसेंच हें काम संघानें करणें म्हणजे पुष्कळांनीं बरोबरच काम करणें याला व्यूह असा प्राचीन शब्द आहे व हल्लीं संघ असें म्हणतात. व्यूहाचें वर्णन पुढें करण्यांत येईल. तेथें याचा जास्त खुलासा करूं. तात्पर्य हत्तीस्वार, घोडेस्वार, रथस्वार व पदाती यांना निरनिराळ्या रीतीनें व व्यूहानें चालावयास शिकविणें याला कवाईत म्हणतात. यालाच प्राचीन शब्द "पदन्यास" असा आहे. म्हणून शिक्षकांचें प्रथम काम या चारहि प्रकारच्या फौजेला कवाईत शिक-विणें व दुसरें काम युद्धाचें शिक्षण देणें. प्रत्येक फौजेचीं युद्धाचीं कामें निरनिराळीं आहेत म्हणून प्रत्येक फौजेचें युद्धशिक्षण निरनिराळें होणार. सैन्यांत सर्वांत जास्त महत्व घोडदळाला असतें म्हणून प्रथम शिक्षकांनीं घोडेस्वारांना

जों निरनिराळीं युद्धें शिकवावयाचीं त्यांचें वर्णन लिहूं.

घोडेस्वारांचीं युद्धें.

अभिसृतं परिसृतमतिसृतमपसृतमुन्मथ्यावधानं वलयो गोमूत्रिकामण्डलं प्रकीर्णिका व्यावृत्तपृष्ठमनुवंशमग्रतःपार्श्वाभ्यां पृष्ठतो भग्नरक्षा भग्नानुपात इत्यश्वयुद्धानि॥
कौटि० अ० १०-५ ५८

अर्थ—

१ **अभिसृतं**–शत्रूच्या सैन्यावर समोर चाल करणें.

२ **परिसृतं**–शत्रुसैन्याच्या समोर, मागून व बगलेवर हल्ला करून शत्रुसैन्याला गराडा घालणें.

३ **अतिसृतं**–शत्रुसैन्याची फळी फोडून पलीकडे धांवून जाणें.

४ **अपसृतं**–शत्रुसैन्याची फळी फोडून पुनः माघारी येणें.

५ **उन्मथ्यावधानं**–शत्रुसैन्याच्या आजूबाजूला घिरट्या घालून शत्रूला त्रास देणें, अडथळा करणें.

६ **वलय**–निमुळत्या वाटेनें शत्रूवर चाल करून जाणें.

७ **गोमूत्रिका**–नागमोडीच्या रस्त्यानें किंवा नागमोडीप्रमाणें जाणें.

८ **मण्डलं**–शत्रुसैन्याची एकादी बाजू तरी मारून काढून शत्रूला घेरणें.

९ **प्रकीर्णिका**–मिश्रहालचाली करणें.

१० **व्यावृत्तपृष्ठं**–शत्रूसमोर माघार घेणें व शत्रू अंगावर घेऊन पुनः उलटणें–हल्ला चढविणें.

११ **अनुवंशं**–शत्रूशीं लढतां लढतां युद्ध सोडून आपल्या सैन्यांत प्रवेश करणें.

१२ **अग्रतःपार्श्वाभ्यांपृष्टतोभग्नरक्षा भग्नानुपातः**–शत्रूच्या अघाडीच्या, बगलेच्या अथवा पिछाडीच्या सैन्यानें पाठ फिरविली असतां शत्रूचा पाठलाग करणें, आपल्या भंगलेल्या सैन्याचें संरक्षण करणें, शत्रूच्या भंग पावलेल्या सैन्यावर तुटून पडणें. याप्रमाणें घोडदळी लढाईचे बारा प्रकार आहेत.

हत्तीचीं युद्धें.

प्रकीर्णिकावर्जान्येतान्येव चतुर्णामङ्गानां व्यस्तसमस्तानां वा घातः। पक्षकक्षोरस्यानां च प्रभञ्जनमवस्कन्दःसौप्तिकं च॥ १०-५, ५९ व ६०. कौटि० अ०

अर्थ–१. प्रकीर्णिकावर्जानि – मिश्रयुद्धामध्यें चपलता, दक्षता इत्यादि गोष्टींची फार आवश्यकता आहे. हत्ती शरिरानें स्थूल असल्यामुळें सपाटभूमि व पाणी यावांचून इतर ठिकाणीं हत्तीचा उपयोग फार कमी होतो. मिश्र हालचालींमध्यें तर अनेक प्रकार करावे लागतात. म्हणून मिश्र हालचाली सोडून वर लिहिलेले अश्वयुद्धाचे सर्व प्रकार हत्तीयुद्धांत येतात.

हत्तीस्वारांकडून होणारीं विशेष युद्धें—

१ चतुर्णामङ्गानां व्यस्तसमस्तानां वा घातः- शत्रूचें सैन्य विस्कळित किंवा संघटित अशा चतुरंग बलाचा नाश करणें.

२ पक्षकक्षोरस्यानां च प्रभञ्जनमवस्कन्दः—शत्रुसैन्याचा मधला भाग, बगला व बाढत्या बाजू यांच्यावर हल्ला करून त्यांना जर्जर करणें आणि त्यांची दाणादाण उडाविणें.

३ सौप्तिकं—रात्रीं शत्रु झोपला असतां त्याजवर छापा घालणें. याप्रमाणें हत्तीयुद्धें आहेत.

रथ्यांचीं युद्धें.

❀

उन्मथ्यावधानवर्जान्येतान्येव स्वभूमावभियानापयानस्थित युद्धानीति ॥ १०-५ ६१. कौटि. अ०

अर्थ—१. उन्मथ्यावधानवर्जानि—शत्रूवर हल्ला करून त्याची लांडगेतोड करणें व त्यास अडविणें. या प्रकाराखेरीज वरील अश्वयुद्धाचे सर्व प्रकार रथयुद्धें समजावीं. शत्रूची लांडगेतोड करण्याकरितां शत्रूला आपल्या हल्ल्याची यत्किंचित चाहूल लागूं न देणें, शत्रूच्या अंदाजापेक्षां दूर अंतरावरून धावून येणें व आडवाटेनें येणें इत्यादि कामें करावीं लागतात तेव्हां शत्रूची लांडगेतोड करतां येते. अशा प्रकारचा हल्ला रथस्वारांकडून होणें शक्य नाहीं. रथस्वार सपाट मैदानावर उत्तम काम देतो.

शिवदिग्विजयांत मराठी घोडेस्वारांची चपलता लिहिली आहे. तें वाक्य असें आहे-- "वीस, पंचवीस, पन्नास कोशांवरून रातवेरात करून छापा देऊन दुसरीयाची फौज लुटावी."

रथ्यांकडून होणारीं विशेष युद्धें—

१ स्वभूमौ अभियानं अपयानं स्थित-युद्धम्—आपल्या जागेवरून शत्रूवर हल्ला करणें, प्रसंगाप्रमाणें मागें हटणें, आणि ठाण मांडून लढाई देणें हे रथयुद्धाचे प्रकार समजावे.

घोडेस्वार, हत्तीस्वार व रथी यांनीं करावयाचीं युद्धें सांगितलीं, पण लढाई सुरू झाली असतां--युद्धाच्या हालचालींना आरंभ झाला असतां—व खास युद्धाच्या दिवसांत वरील सर्व सैन्याला लढाईशिवाय आणखी युद्धोपयोगी कामें करावीं लागतात. या कामांचाहि शिक्षणांत अंतर्भाव होतो, म्हणून तीं कामें कोणतीं तें आतां लिहितों.

घोडदळाचीं कामें.

१ **भूमिवासवननिचयः**-युद्ध कालांत छावणीची जागा निर्भय करणें, छावणीवर पहारा देणें, आसपासच्या रानावनांतून शत्रूला हुसकून लावणें.

२ **विषमतोयतीर्थवातरश्मिग्रहणं**-शत्रूला चाल करून येण्यास कठीण असलेली, पाणवठ्याची सोय असलेली आणि ऊन व वारा अनुकूल असलेली अशी छावणीकरितां जागा काबीज करणें.

३ **वीवधासारयोर्घातोरक्षा वा विशुद्धि-स्थापना च**—शत्रूची रसद आणि कुमक बंद पाडणें आणि आपली सुरक्षित

राखणें, आपल्या सैन्यांत शत्रूच्या हेरांचा प्रवेश होऊं न देणें व आपल्या सैन्यास धीर देणें.

४ **बलस्यप्रसारवृद्धिवाहूत्सारः पूर्वप्रहारो, व्यावेशनं, व्यावेधनं, आश्वासः, ग्रहणं, मोक्षणं**–शत्रूच्या सैन्याला आपल्या छावणीच्या आसपास फिरकूं न देणें व आपल्या छावणीच्या चोहों बाजूंचा मार्ग मोकळा राखणें, शत्रूच्या सैन्यावर पहिला तडाखा मारणें, शत्रुसैन्यांत बेखबर घुसून त्याला घाबरविणें, आणि शत्रूची पांगापांग करणें, आपल्या घाबरलेल्या सैन्याला धीर देऊन आपल्या सैन्याची पुनः व्यवस्था करणें, शत्रूचे योद्धे व भगोडे [पळपुटे] पकडणें, तसेंच आपले सैनिक पकडले गेले तर त्यांची बंधमुक्तता करणें.

५ **मार्गानुसारविनिमयः** —आळीपाळीनें शत्रूची टेहळणी करणें.

६ **कोशकुमाराभिहरणं**–शत्रूचा खजिना लुटणें व त्याचे राजपुत्र पकडणें–कैदकरणें.

७ **जघनकोट्यभिघातः**–शत्रूच्या पिछाडीवर किंवा अघाडीवर हल्ला करणें.

८ **हीनानुसारणं**–आपल्या सैन्याची फळी फुटली तर त्यांना मदत करणें.

९ **अनुयानं**–शत्रुसैन्याचा पाठलाग करणें.

१० **समाजकर्म**–आपल्या पांगलेल्या सैन्याला पुनः एकत्रित करणें, याशिवाय खबर देणें, बातम्या पोंचाविणें, डांक नेणें आणणें, प्रसंगीं पलायन करणें, हीं कामें घोडेस्वारांचीं समजावीं.

हस्तिसैन्याचीं कामें.

प्रयाणे पूर्वयायित्वं वनदुर्गप्रवेशनम् ॥
अकृतानां च मार्गाणां तीर्थानां च प्रवर्तनम् ॥
तोयावतारसन्तारावेकाङ्गविजयस्तथा ॥
अभिन्नानामनीकानां भेदनं भिन्नसंग्रहः ॥
विभीषिका विघातश्च प्राकारद्वारभञ्जनम् ॥
कोशनीतिभयत्राणं हस्तिकर्मप्रचक्षते ॥

कामन्दकनीति स० १९

अर्थ–सैन्याच्या आघाडीला चालून रस्ता, मुक्कामाची जागा आणि पाण्याचे उतार तयार करणें, तसेंच जलदुर्ग सर करण्याकरतां, ज्या नद्यांवर नांवा चालतात अशा नद्या तरून जाण्याकरितां, अज्ञात वनांतून वाट काढण्याकरतां, उंच जागेवर चढणें किंवा उतरणें याला मदत करण्याकरतां, अडचणीच्या व धोक्याच्या जागेंत प्रवेश करणें, घोडेस्वारादिक मदतीला नसतांना केवळ हत्तीच्या बळावरच जय मिळविणें, शत्रुसैन्यांतील मुख्य भागाचा मोड करणें, दुभंगलेल्या आपल्या सैन्याची मधली जागा भरून काढणें व आपल्या सैन्याची जुळवाजुळव करणें. शत्रूच्या शिबिराला आग लावणें किंवा सैन्यांत आग पसरविणें व शत्रूला भीति दाखविणें, शत्रु सैन्याची कत्तल करणें, किल्ल्याचे बुरूज, दरवाजे व वेशी यांचा भंग

करणें, खजिना वाहून नेणें किंवा पळविणें, राजा इत्यादिकांना वाहून नेणें, भ्यालेल्यांना आश्रय देणें, शत्रूची फळी फोडणें. याप्रमाणें हत्तिसैन्याचीं कामें समजावीं. सांप्रतच्या तोफा म्हणजे प्राचीनकाळचे हत्ती आहेत.

रथ्यांचीं कामें

चतुरंगस्य सैन्यस्य निषेधो बल-
रक्षणम् ॥
भेदस्य भिन्नसन्धानं रथकर्म
प्रकीर्तितम् ॥

काम० नीति० स० १९

अर्थ-शत्रूनें आपल्या सैन्यावर चोहोंबाजूनें हल्ला केला असतां तो परतविणें आणि स्वतःच्या सैन्याचें संरक्षण करणें. शत्रुसैन्य एकत्र जमलें असल्यास तें दुभंगणें, त्यास घाबरवून सोडणें, आपलें सैन्य पांगलें असल्यास एकत्र जमविणें. युद्धकालीं आपल्याला अनुकूल असेल ती जागा पटकावणें व प्रतिकूल स्थानापासून हटून जाणें आणि भीम घोष करणें.

हल्लींच्या मशीनगन्स किंवा टँक म्हणजे प्राचीन काळचे रथी होत. प्राचीन काळच्या सैन्याच्या तीन अंगांचें वर्णन लिहून झालें. आतां पायदळी सैन्याचें शिक्षण, युद्ध व लढाईच्या दिवसांतील कामें याबद्दल क्रमानें लिहूं---

पदाति शिक्षक

निम्नस्थलप्रकाशकूटखनकाऽऽकाशदिवारात्रियुद्धव्यायामं च विद्यात् ।

कौटि. अ० २--३३--१०

अर्थ--पायदळी शिपायांना प्रथम पाय जुळवून चालणें म्हणजे व्यवस्थित संघानें चालणें हें शिक्षण द्यावें, मग निरनिराळ्या शस्त्रांचा अभ्यास शिकवावा. यानंतर सांघिक युद्धें शिकवावीं, तसेंच दऱ्याखोऱ्यांतून किंवा पठारावर युद्ध करणें, मैदानी लढाया व गनिमी कावा, खंदकांतील युद्धें, आकाशयुद्ध, दिवसाचें युद्ध व रात्रियुद्ध हीं युद्धें शिकवावीं, तसेंच केवळ पायदळ शिपायांच्या युद्धांचें शिक्षण द्यावें. याशिवाय रथी, हत्ती व घोडेस्वार यांच्या बरोबर व्यूहामध्यें असतांना करावी लागणारी कवाईत व स्वतंत्र पायदळाचे व्यूह यांचें शिक्षण द्यावें. येणेंप्रमाणें पदाति शिक्षकानें पायदळी शिपायांना शिक्षण द्यावें.

पायदळाचीं युद्धें.

सर्वदेशकालप्रहरणमुपांशुदण्डश्च ॥६२

कौटि० अ० १०--५

अर्थ--शत्रुसैन्याच्या सर्व भागांवर अर्थात् निरनिराळ्या फौजेवर सर्व काळ मारा करणें आणि अकस्मात् गुप्त हल्ला चढविणें हीं पायदळी सैन्याचीं दोन युद्धें आहेत.

पायदळाचीं कामें.

सर्वदेशकालशस्त्रवहनं व्यायामश्च॥१७

कौटि० अ० १०--४

अर्थ--पदातींनीं सर्व ऋतूंत आणि सर्व स्थळीं युद्धाला सज्ज असावें आणि प्रत्यक्ष लढाई करावी.

चतुरंग दळामध्यें हत्ती, रथी व घोडेस्वार यांच्या शक्तीपेक्षां पायदळाची शक्ति कमी

असते, तसेंच वरील सैन्याचा वेगहि पण कमी असतो, म्हणून चतुरंग दलामध्यें पदातींचा शेवटचा क्रम लागतो.

तस्मात् पत्ती बलंबलम् ॥ समरांगण.

येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं हत्ती, रथ किंवा घोडा हे स्वतंत्र नसून मनुष्य वागवील तसेच वागणारे आहेत. या सर्वांवर पायदळ शिपाईच आरूढ होतो व हस्त्यादिकांचा उपयोग करून घेतो. मनुष्यानें आपल्या शक्तीची उणीव भरून काढण्याकरतां निरनिराळ्या साधनांचा उपयोग केला आहे. माणसापेक्षां घोडा फार जलद पळतो व माणूस जाईल तेथें त्याच्या बरोबरीनें तो येतो, असें पाहून मनुष्य घोड्यावर स्वार झाला आणि शत्रूचा पाठलाग करणें, त्याच्यावर अकस्मात् हल्ला करणें व प्रसंगविशेषीं प्राणरक्षणासाठीं त्वरेनें पळून जाणें इत्यादि घोड्याचे उपयोग त्यानें करून घेतले, पण घोड्यावर बसून शत्रूवर दुरून हल्ला होऊं शकत नाहीं. कारण घोडा पळवितांना मनुष्याला सपाट्यानें शस्त्रास्त्रें चालवितां येत नाहींत. घोडा सांभाळावा लागतो. ही उणीव भरून काढण्याकरतां रथाची योजना मनुष्यानें केली. स्वारीचा पळणारा घोडा हाच रथाला जोडला गेला, अर्थात् त्वरेनें पळण्याचें काम झालें. रथांत कामाची विभागणी झाली. सारथ्यानें घोडे पळवावे व रथ्यानें दुरूनच शत्रूवर बाणांची वृष्टि करावी आणि शत्रूला परास्त करावा. याप्रमाणें मनुष्यानें साधनांत बद्दल केला पण त्याबरोबरच शत्रूनें कवचविद्याहि वाढविली. शत्रूनें घराच्या भिंती फार जाड बांधल्या, नगराला तट बांधले व अजस्त्र किल्लेहि पण बांधावयास सुरवात केली. याचा प्रतिकार कसा करावा? हा पुनः प्रश्न उभा राहिला, कारण घोडेस्वारांचे भाले किंवा रथ्यांचे बाण घराच्या जाड भिंती, शहरांचे तट किंवा अजस्त्र किल्ले भेदूं शकत नाहींत म्हणून यांचा भेद करणारा प्रचंड शक्तिमान हत्ती हा प्राणी मनुष्यानें हाताशीं धरला व त्याच्याकडून हे भेद करविले. पण केवळ एकटे हत्तीच हें काम करूं शकत नाहींत. हत्तीच्या पाठीवर मनुष्याला पुनः स्वार व्हावें लागतें; एकंदरींत शेवटीं मनुष्यच श्रेष्ठ ठरतो व हेंच शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. "तस्मात् पत्ती बलंबलम्". तसेंच युद्धाचा अंतिम निर्णय किंवा आखिरी फैसला शूर शिपायांच्या रक्त वाहण्यानेंच होत असतो. अन्य साधनांचा नाश किंवा मोडतोड यांनीं होत नसतो. म्हणून पायदळ शिपायांचें शिक्षण हें फार महत्वाचें आहे. याकरितां पायदळ शिपाई शरिरानें असाधारण हृष्टपुष्ट, सर्व संकटें सहन करणारे, युद्धशास्त्राचे ज्ञाते, दैशिक भावनावान् व शत्रूपेक्षां तीक्ष्ण शस्त्रास्त्रांनीं युक्त असे तयार करावे, हेंच पदातींचें शिक्षण होय.

चतुरंग दलांतील प्रत्येक फौजेचें स्वतंत्र रीतीनें शिक्षण, युद्धें व कामें हीं सांगून झालीं. आतां सर्व सैन्यानें एकदम घ्यावयाचें शिक्षण म्हणजे व्यूहांचा अभ्यास हें होय. म्हणून व्यूहशास्त्राबद्दल येथें लिहूं.

समग्रस्य तु सैन्यस्य विन्यासः
स्थानभेदतः ॥
सव्यूह इति विख्यातो युद्धेषु
पृथिवीभुजाम् ॥७॥

बृह. परा. स्मृ. अ० १०

अर्थ–युद्धामध्यें आपलें सैन्य निरनिराळ्या जागीं ठेवून एकंदर सैन्याची जी विशिष्ट रचना--आकार युक्त- त्याला व्यूह असें म्हणतात.

व्यूहाः प्राण्यङ्गरूपाश्च द्रव्यरूपाश्च कल्पिताः ॥

वीर. राज. प्र. पृ. ४०१

व्यूहानामथसर्वेषां पंच वा सैन्य-कल्पना ॥
द्वौपक्षौ वक्षकुक्षौ द्वौ एवं पञ्चाङ्ग-कल्पना ॥

औशनस

अर्थ–व्यूहाची रचना दोन प्रकारांनीं करतात. एक जगांत जशीं प्राण्यांचीं शरिरें आढळतात त्याप्रमाणें व्यूहाचा आकार बनवितात व दुसरा पदार्थांच्या आकाराप्रमाणें व्यूहाचा आकार असतो.

प्राणिव्यूह.

जगांतील प्राण्यांचीं शरिरें विवक्षित हालचालींना सोइस्कर अशीं बनलेलीं आहेत. प्राणी हा एक सैन्याचा समूह किंवा राज्यच आहे. या राज्याची बळकटी आणि स्थैर्य कायम राहून त्याला वाटेल तिकडे विजयाकरतां हिंडतां यावें, या बेतानें शरिराची रचना झाली आहे. शरिरांतील अत्यंत महत्वाचें स्थान म्हणजे हृदय व पोट हें आहे. या जागांचें सर्वतऱ्हेनें व सर्वप्रकारांनीं संरक्षण व्हावें आणि शरिराच्या इतर अवयवांचा या संरक्षणाच्या कामीं उपयोग व्हावा अशी शरिराची मांडणी आहे. शत्रूकडे आपले नेहमीं तोंड असावें म्हणजे शत्रूला धरण्यास व शत्रूपासून आपला बचाव करण्यास सोईचें पडतें. या तोंडाजवळच चारहि बाजूंचीं खबर देणारीं इंद्रियें असतात व तेथून सुटणाऱ्या आज्ञेप्रमाणें हृदय व पोट नेहमीं मध्यभागीं असतें. अशा प्रकारें या शरीररूपी सैन्याची व्यवस्था असते. याप्रमाणें शरिराचें निरीक्षण करून सैन्याचे व्यूह शास्त्रकारांनीं बसविले आहेत.

द्रव्यव्यूह.

सृष्टींतील पदार्थांची रचनाहि त्या जिनसांवर होणाऱ्या आघातांचा योग्यप्रकारें प्रतिकार करतां यावा अशीच झालेली आहे. पृथ्वीचा निरनिराळा आकार स्थिर राहावा म्हणून त्याला उपयोगी असे स्फटिक असतात. त्रिकोणी जिनसेचे कोन लवकर मोडतात तसे षट्कोनी पदार्थांचे मोडत नाहींत. गोलवस्तु सर्वांत जास्त अभंग असते. त्यांत ही वस्तु पोकळ असली तर तिचें वजन व घनफळ कमी असून ती शक्तींत तितकीच असते. या गोष्टी पण लक्षांत घेऊन निरनिराळ्या पदार्थांच्या आकारांचे सैन्याचे व्यूह रचतात.

तात्पर्य, आपल्या जवळ असलेले सैनिक, त्यांचे हातून आपणास करवून घ्यावयाचें काम व त्या कार्याला अनुकूल आणि त्या संख्येंत होण्यासारखी उत्तमांत उत्तम रचना मनांत आणून, व्यूह रचना करावयाची असते. सेनापतीचें मोठें कौशल्य या सैन्यरचनेंतच असतें, कारण सैन्याची योग्य रचना झाली म्हणजे तेंच सैन्य जास्त काम देऊं शकतें.

सैन्याची रचना सामान्यतः पांच प्रकारांनीं करतात. मध्यभाग, दोन बाजू, आणि पुढला व मागचा भाग, हेच ते पांच प्रकार होत. पुढल्या भागाला मुख किंवा बिनी

म्हणतात. मागील भागाला पृष्ट किंवा पिछाडी म्हणतात. दोन बाजूंना पक्ष किंवा बगल म्हणतात आणि मध्य भागाला वक्ष किंवा मध्यभाग म्हणतात.

व्यूहाची सामान्य रचना.

मुखे रथाः गजाः पृष्ठे तत्पृष्ठेच पदातयः ॥
पार्श्वयोश्च हयाः कार्या व्यूहस्यायं विधि.स्मृतः ॥
औशनस.

अर्थ—सर्वांच्यापुढें बिनीला रथी, दोहों-बाजूंना घोडेस्वार, मध्यें हत्ती व पिछाडीला पायदळ, अशी व्यूहाची सामान्यतः रचना असते.

रथी हे शत्रूचा हल्ला दुरूनच परतवूं शकतात, कारण हल्ल्याच्या वेळीं रथ्याला त्वरेनें पळतां येतें व पळत असतां शत्रूवर बाणांचा पाऊस पाडतां येतो. तसेंच रथांनीं अडूं नये व त्यांना वाटेल त्या ठिकाणीं मदत करतां यावी म्हणून रथी सर्वांच्यापुढें असतात. शत्रू जवळपास आल्यास त्यांजवर हल्ला करून शत्रूला मागें परतविण्याचें काम घोडेस्वारांचें, म्हणून दोहों बाजूंला घोडेस्वार उभे करतात. हत्ती हे मोठे स्थिर जणूं किल्लेच, यासाठीं सैन्याचें मुख्य निशाण, प्रमुख मंडळींच्या आज्ञा व सैन्यांतील सैन्याला लागणारा सांठा पुरविण्याचें तें मोठें केंद्र समजावें; याकरितां ते मध्यें असतात व पायदळ शिपाई सर्वांच्या मागें असतात. जेथें जशी आवश्यकता भासेल त्याप्रमाणें त्यांचा उपयोग करितां येतो आणि शत्रूच्या अवजड माऱ्यापासून शिपायांचा बचाव होतो; रथी हे स्वतःचें सर्व सामान घेऊन व तें स्वतः बरोबर बाळगून स्वतंत्ररीतीनें आणि फार कौशल्यानें लढणारे, घोडेस्वार चपल आणि स्वतःचें काम स्वावलंबनानें करणारे, हत्ती हे फार बळकट पण अवजड आणि नोकरांच्या ताब्यांत दिलेले व स्वतंत्ररीतीनें युद्धें न करणारे. तसेंच पायदळाचें. पायदळ सुटसुटीत, कोठेंहि जाऊं शकणारें पण दुसऱ्याच्या ताब्यांत वागणारें आणि मैदानावर तर प्रसंगीं दुसऱ्याच्या आश्रयानें राहणारें. असे प्रत्येक सैन्याचे युद्धविषयक गुणदोष समजावें.

व्यूहरचनेचा दुसरा प्रकार.

गजस्यपार्श्वरक्षार्थं चत्वारस्तुरगास्तथा ॥
रथस्य चाश्वांश्चत्वारः समास्तस्य सधर्मिणः ॥
धन्विनश्चर्मिणस्तुल्याः पुरस्ताश्चर्मिणोरणे ॥
पृष्ठतो धन्विनः पश्चाद्धन्विनां तुरगा रथाः ॥
रथानां कुञ्जराश्चाश्वा दातव्या पृथिवीपते ॥
पदातिकुञ्जराश्वानां संघः कार्यः प्रयत्नतः ॥

अर्थ—एका हत्तीच्या बाजूंवर हल्ला होऊं नये म्हणून त्याच्या बाजूला चार घोडेस्वार असावे. याप्रमाणेंच रथाकरितांहि चार घोडेस्वार असावे. हे घोडे रथाला जोडलेल्या

घोड्यांसारखे व त्यांच्याच जातीचे असावे म्हणजे प्रसंगविशेषीं रथाला जोडतां येतात. नुसते पायदळी धनुर्धर हे मागच्या सैन्याला ढालाइतांसारखेंच होत; हे ढालाईत सर्वांच्या पुढें रस्ता करणें, टेहळणीं करणें, पहारा देणें इत्यादि कामाला उपयोगी पडतात; म्हणून व्यूहरचनेचा दुसरा प्रकार शास्त्रकारांनीं सांगितला आहे तो असा—वर सांगितलेल्या ढालाइतांच्या पाठीमागें धनुर्धर, धनुर्धरांच्या मागें घोडेस्वार, घोडेस्वारांच्या मागें रथी व रथ्यांच्या मागें हत्ती, अशीहि एक व्यूह रचण्याची चाल आहे. युद्धामध्यें पायदळ, घोडेस्वार व हत्ती यांची जूट असावी व या असल्या एका जुटीला गुल्म [तुकडी] असें म्हणतात. सैन्याचा हा मूल घटक आहे. असले अनेक घटक मिळून सैन्य झालेलें असतें.

व्यूहरचनेचे दोन प्रकार सांगितले. पण यापेक्षांहि व्यूहाचे अनेक प्रकार संभवतात. भारतीय युद्धांत पाण्डवांनीं दुसऱ्या दिवशीं क्रौंचव्यूह रचला, त्यांत अघाडीवर व बगलेला हत्तीच उभे केले होते व यामुळें त्यांनीं आघाडी व बगल अभेद्य करून टाकली.

पक्षकोटिप्रपक्षेषु पक्षान्तेषु च
वारणाः ॥ ५५

भीष्मपर्व अ० ५०

तात्पर्य, प्रसंगाप्रमाणें व्यूहरचना करावी हेंच तत्व आहे. म्हणून कोणता व्यूह रचावा हें सैनापतीनें त्या वेळच्या परिस्थितीप्रमाणें ठरवावें. व्यूह रचनेंत जूट व शिस्त हीं दोन महान तत्वें आहेत व याबद्दल शास्त्रकारांनीं पुष्कळच सांगितलें आहे. जिज्ञासूंनीं मूल ग्रंथच पहावे. तरी शिस्तीबद्दल थोडें लिहिलें पाहिजे.

सैन्याची शिस्त.

पञ्चारत्निर्धनुस्तास्मिन् धन्विनं
स्थापये द्युधि ॥
त्रिगुणेऽश्वं गजरथौ योज्यौ पञ्च-
गुणे तथा ॥
शमान्तरस्तु पुरुषस्तुरङ्गस्त्रिश-
मान्तरः ॥
कुञ्जरः स्यन्दनश्चैव स्मृतौ
पञ्चशमान्तरौ ॥
तथाऽनीकस्य रन्ध्रन्तु पञ्चचापं
प्रचक्षते ॥
तथा च खलु युध्येरन् पत्यश्वर-
थदन्तिनः ॥
यथा भवेदसम्बाधः व्यायामे
विनिवर्तने ॥
असङ्करेण युध्येत सङ्करः
सङ्कुलावहः ॥
महासङ्कुलयुद्धे तु संश्रयरन्
महागजान् ॥

काम० स० २.

अर्थ—युद्धभूमीवर सैन्य कसें उभें करावें याचे नियम असे आहेत. पायदळाच्या दोन शिपायांमध्यें १४ अंगुळें अंतर राहील अशा रीतीनें पायदळ शिपाई उभे करावे. **शम** (१४ अंगुळें) अंतर समजावें. पायदळाच्या एका रांगेमागें दुसरी रांग पांच **अरत्नि** अंतरावर असावी. **अरत्नि** म्हणजे चोवीस

अंगुळें व चोवीस अंगुळें म्हणजे एक हात. अर्थात् पांच हात अंतरावर दुसरी रांग असावी. दोन घोडेस्वारांमध्यें बेचाळीस अंगुळें अंतर राहील अशारीतीनें घोडेस्वारांची रांग उभी करावी. घोडेस्वारांच्या एका रांगेमागें दुसरी रांग तीन धनुष्यें म्हणजे पंधरा हातांवर उभी करावी. दोन रथ्यांमध्यें सत्तर अंगुळें अंतर असेल अशा रीतीनें रथ्यांची रांग लावावी. या रांगेमागें दुसरी रांग पंचवीस हात अंतरावर उभी करावी. रथ्यांप्रमाणेंच हत्तींचा हिशेब समजावा.

या सैन्याच्या अघाडीचीं टोकें, बगला व मध्य या प्रत्येकामधील अंतर पांच धनुष्यें म्हणजे पंचवीस हात असावें. अघाडीचें सैन्य पिछाडीचें सैन्य, बगलांचें सैन्य व मध्यावरचें सैन्य या प्रत्येक विभागाला 'अनीक' अशी पारिभाषिक संज्ञा आहे. असे पांच अनीक मिळून व्यूह होतो. 'अनीक समुदायत्वाद् व्यूहस्येतिवचनात्.' एक अनीक म्हणजे एकेका बाजूचा एक व्यूहच असतो. व्यूह म्हणजे सैन्याची व्यवस्थित रचना, हें पूर्वी सांगितलेंच आहे. पायदळ शिपाई, घोडेस्वार, रथी व हत्ती यांमध्यें अंतर किती असावें हें वर सांगितलें. हें अंतर कवायतीचे वेळीं व युद्धाचे वेळीं उपयोगी पडतें. हें सामान्य प्रमाण सांगितलें आहे असें समजावें. आवश्यकतेप्रमाणें हें अंतर वाढवितां येतें. तात्पर्य, ज्यायोगें सैन्याला परेडीच्या मैदानावर किंवा युद्धामध्यें हालचाली करण्याला सुखकारक जाईल असें अंतर सैन्यामध्यें असावें.

युद्धामध्यें 'असङ्करेण युध्येत' असा विधि सांगितला आहे. संकर म्हणजे मिश्रण अर्थात्, पायदळ, रथी, घोडेस्वार व हत्ती यांनीं एकमेकांत मिसळूं नये. अशी अव्यवस्था झाली तर रथी किंवा हत्ती यांना आपलीच फौज तुडवून पुढें जावें लागेल किंवा अडून राहावें लागेल. तात्पर्य, प्रत्येक फौजेच्या हालचालींना अडथळा होईल अशी गर्दी करूं नये व या योगें लढाई बिघडेल, म्हणून फौजेमध्यें अत्यंत कडक शिस्त असली पाहिजे व अशी शिस्त सैन्याच्या अंगीं आणण्यासाठीं त्यांना शिक्षणहि असेंच कडक शिस्त ठेवून दिलें पाहिजे. तरच व्यूहरचना करतांना व युद्धामध्यें सैनिक व्यवस्थितपणें वागतील. क्वचित् प्रसंगीं शत्रूचा अकस्मात् किंवा जबरदस्त हल्ला झाला व पायदळ किंवा घोडदळ मागें हटविणें भाग पडलें व या फौजेला मागें हटण्यास पुरेशी जागा नाहीं व वेळ नाहीं तर या पायदळानें किंवा घोडेस्वारांनीं हत्तीच्या आश्रयानें उभें राहावें.

व्यूहाचीं कामें.

अङ्गविभागे सङ्गते स्थाने गमने
व्यावर्तने प्रहरणे च ॥

कौटि० अ० १०–६–५०

निरनिराळें सैन्य परस्पर किती अंतरावर उभें राहावें हें सांगितलें. आतां या सैन्यानें व्यूहरचना कशी करावी, व्यूह रचून मोडावे कसे इत्यादि कामें सांगूं. यालाच 'व्यूहकर्म' असें नांव आहे.

१ **अंगविभागः**—अंग म्हणजे व्यूहाची एक बाजू. याचा विभाग करणें म्हणजे एक बाजू कमी करणें, अर्थात् व्यूहरचना

करून रोजचें शिक्षण संपल्यावर किंवा युद्धामध्यें एकाद्या बाजूची फौज दुसरीकडे नेणें इत्यादि काम म्हणजे व्यूहभेद करणें, हा अंगविभाग होय.

२ **संघात**–संघात म्हणजे समुदाय. ज्याप्रमाणें व्यूह मोडणें हें एक काम, त्याप्रमाणें व्यूह जोडणें म्हणजे व्यूहाचीं निरनिराळीं अंगें त्या त्या ठिकाणीं रचणें. अर्थात् व्यूहरचना यालाच संघात म्हणतात.

३ **स्थानं**–तळ देणें, आपल्या सैन्याला युद्धाला योग्य अशी जागा पटकावणें.

४ **गमनं**–शत्रूवर चालून जाणें. शत्रूवर कशारीतीनें गेलें असतां आपल्याला यश येईल अशारीतीनें कूच करणें.

५ **व्यावर्तनं**–शत्रूसैन्यावर हल्ला चढविणें, मागें फिरणें.

६ **प्रहरणं**–शत्रूशीं युद्ध करणें.

हे व्यूहकर्माचे सर्व प्रकार भारतीय युद्धांत दिसून येतात.

व्यूहभेद–व्यूहभेद करण्यासाठीं शत्रूच्या निरनिराळ्या भागांवर हल्ला करावा लागतो किंवा आपल्या सैन्याची जूट करून कोठें तरी एका जागीं आपलें सामर्थ्य एकवटून लाकडांत पाचर मारल्याप्रमाणें शत्रूची फळी फोडावी लागते. भारतीययुद्धाच्या दुसऱ्या दिवशीं भीष्मांनीं पांडवांच्या पिछाडीवर व उजव्या आणि डाव्या बगलेवर—

ववर्ष शरवर्षाणि वृद्धः
कुरुपितामहः ॥९॥

अभिद्यत ततो व्यूहः तस्मिन् वीर-
समागमे ॥१०॥

भीष्मपर्व अ० ५२

बाणांचा पाऊस पाडला, तेव्हां पांडवांचा व्यूह फुटला. याचप्रमाणें —

न व्यूहो भिद्यते तत्र कौरवाणां
कथञ्चन ॥

रक्षितः सत्यसन्धेन भारद्वाजेन
संयुगे ॥८॥

नाभिद्यत महाव्यूहो भीमेन च
सुरक्षितः ॥९॥

भीष्मपर्व अ० ५७

अभिद्येतां ततो व्यूहौ तस्मिन्
वीरवरक्षये ॥३५॥

भीष्म. अ० ७५ इत्यादि स्थलें पहावीं.

पांडव व कौरव दोनहि पक्षांकडील व्यूह फुटले.

व्यूहरचना–व्यूह रचण्यापूर्वी सर्व सैन्य एकत्र होतें, यावेळीं सैन्याचे अधिकारी आपापल्या तुकडीजवळ उभे राहतात. याला 'योग' असें म्हणतात. भारतीय युद्धांत रोज सकाळीं असे सर्वजण एकत्र होत असत.

महत्यपररात्रेच तव सैन्यस्य
मारिष ॥

योगो योगेति सहसा प्रादुरासी-
न्महास्वनः ॥४॥

कर्णपर्व. अ० ११

यानंतर सेनापतीची आज्ञा सुटेल त्याप्रमाणें निरनिराळीं सैन्यें व्यूहामध्यें सामील होण्यासाठीं रवाना केलीं जातात किंवा सेनापतिच

स्वतः व्यूहाच्या निरनिराळ्या अंगांत फौजा आणून उभ्या करतो. जयद्रथवधाच्या दिवशीं सकाळीं द्रोणाचार्य स्वतः चपल घोड्यावर बसले व त्यांनीं निरनिराळ्या फौजा योग्य स्थानीं उभ्या केल्या आणि व्यूहरचना केली.

ततः शङ्खमुपाध्याय त्वरयन् वाजिनः स्वयम् ॥
संग्राममनसः शूरास्तत्रतत्र व्यवस्थिताः ॥८॥
इतस्ततस्तान् रचयन् द्रोण- श्चरति वेगितः ॥१०॥

द्रोणपर्व अ० ८७

भारतीय युद्धाच्या पहिल्या दिवशीं अनेक नायकांनीं, सैन्यावरच्या अधिकाऱ्यांनीं—व्यूहरचना केली. पहिल्या दिवशीं रचलेल्या कौरवांच्या व्यूहाचें नांव 'सर्वतोमुख' असें होतें.

सरथानीकवान् व्यूहो हस्त्यङ्गो नृपशीर्षवान् ॥
वाजिपक्षः पतत्युग्रः प्रहसन् सर्वतोमुखः ॥३८॥
द्रोणेन विहितो राजन् राज्ञा शान्तनवेन च ॥
तथैवाचार्यपुत्रेण बाल्हीकेन कृपेण च ॥३९॥

भीष्मपर्व अ० १७

व्यूहरचना झाल्यावर **नायक**--त्या त्या बाजूच्या सैन्यावरील अधिकारी, **सेनापति**—सर्व सैन्यावर देखरेख ठेवणारा, **व्यूहरक्षक**—रचलेला व्यूह भंगू नये याविषयीं दक्ष, **सैन्यव्यवस्थापक**-घायाळांना मागें आणणें इत्यादि कामें करणारा, **सेनापतिपति**–युद्धाचें धोरण ठरविणारा, असे पांच मुख्य अधिकारी भारतीय युद्धांत व्यूहाबद्दल काळजी घेत असत.

याचप्रमाणें व्यूहरचनेला व युद्धाला योग्य जागा पटकावणें, शत्रूवर चाल करणें, मागें हटणें, युद्ध करणें हे भारतीय युद्धांतील सर्व प्रकार जिज्ञासूंनीं मुळांतूनच वाचावे. ग्रंथविस्तार फार होईल म्हणून येथें लिहितां येत नाहींत.

व्युहरचनेचीं साधनें.

तूर्यध्वजपताकाभिर्व्यूहसंज्ञाः प्रकल्पयेत् ॥
स्थाने याने प्रहरणे सैन्यानां विनये रतः ॥१४॥

कौटि० अ० २–३३

वामदक्षिणसंस्थो वा मध्यस्थो वाऽग्र संस्थितः ॥
उच्चैः संश्रावयेद् व्यूहसंकेतान् सैनिकान् नृपः ॥
श्रुत्वा तान् सैनिकैः कार्यमनुशिष्टं यथा तथा ॥
भेरीपटहगोपुच्छशङ्खवेण्वादि निः स्वनैः ॥
ये व्यूहरचका यानऽयपयानादि- बोधकाः ॥
व्यूहरचनसङ्केतान् वाद्यभाषासमी- रितान् ॥
स्वसैनिकैर्विनाकोपि न जानीयात् तथाविधान् ॥

नियोजयेच्च मतियान् व्यूहान्
नानाविधान् सदा ॥
अश्वानां च गजानां च पदातीनां
पृथक् पृथक् ॥

शुक्र० अ० ४० प्र ७

अर्थ—सैन्यरचना करण्याकरतां सैन्याला आज्ञा द्याव्या लागतात. प्राथमिक शिक्षणाचे वेळीं शस्त्रांचे एकेक हाताला एक शद्ब म्हणजे नांव असतें. तो शद्ब उच्चारला असतां मनुष्य त्या शस्त्राचा तो हात करितो. सैन्यामध्येंहि असेंच आहे. फौजेची हालचाल होण्याकरितां शिक्षक आज्ञा देत असतो, त्या सैनिकांना ऐकूं जातात; पण मोठमोठ्या फौजा आज्ञेबरोबर कशा हलवाव्या, याकरितां निरनिराळ्या युक्त्या योजल्या आहेत. मनुष्याच्या आवाजापेक्षां वाद्यांचा आवाज मोठा असतो. तसेंच एकाद्या वाद्याबरोबर दुसरीं अनेक वाद्यें वाजवून त्या आवाजाला मोहक, कर्कश, गंभीर, उग्र इत्यादि स्वरूप आणतां येतें. या गोष्टीं लक्षांत घेऊन सैन्यामध्यें शिक्षणाकरतां अनेक वाद्यांचा उपयोग करण्यांत आला आहे. सैन्याला आज्ञा करतांना त्या आज्ञेचे विभाग पाडण्यांत येतात. म्हणजे आज्ञेच्या शद्बाचे दोन विभाग पाडतात. आज्ञेच्या शद्बाच्या पहिल्या उच्चाराबरोबर सैन्यानें सावध व्हावें व दुसऱ्या उच्चाराच्या शेवटच्या अक्षराबरोबर काम करावें. याप्रमाणें सैन्याला ज्या आज्ञा द्यावयाच्या त्या विचारपूर्वक द्याव्या लागतात व या आज्ञांचे शद्ब असेच विचारपूर्वक बसवावे लागतात.

मोठ्या सैन्याला आज्ञा देतांना आणखी एक तत्व सांगितलें आहे—

राजानें सैन्याच्या समोर किंवा डाव्या बाजूस, उजव्या बाजूस, मध्यावर, कोठेंहि उभें राहून सैन्याला आज्ञा द्यावी. राजा नसल्यास प्रथम सेनापतीनें आज्ञा द्यावी. ती आज्ञा नायकांनीं (सैन्याच्या तुकड्यांचे अधिकारी) पुनः उच्चारावी व नायकांच्या आज्ञेबरोबर सैन्यें हलावीं. याप्रमाणें आज्ञेची वांटणी होते. एकट्या सेनापतीच्या आवाजापेक्षां सैन्याच्या अनेक अधिकाऱ्यांनीं उच्चारलेला आवाज फार मोठा होतो व मोठा आवाज परिणामकारक होतो म्हणून अशी व्यवस्था केलेली असते. सैन्याच्या हालचालीकरितां **तूर्य**—वाद्यें, **ध्वज**—निशाण व **पताका**—झेंड्या यांनीं **व्यूहसंज्ञा**—सैन्यरचनेचे संकेत बसवावे व या संकेतांवरून व्यूहाचीं कामें चालवावीं. व्यूहाचीं सहा कामें. व्यूहभेद, व्यूहरचना इत्यादि मागें सांगितलीं आहेत. या संकेताची माहिती सैनिकांवांचून इतरांस नसावी. युद्धकालांत तर या संज्ञा प्रतिदिवशीं बदलाव्या. यायोगें आपले बेत शत्रूला समजत नाहींत. आदल्यादिवशीं रात्रीं उपस्थितीच्या वेळीं बदललेल्या संज्ञा सैनिकांना सांगून ठेवाव्या, म्हणजे दुसऱ्या दिवशीं सकाळीं सैन्याकडून काम घेण्यास सोपें पडतें. नगारा, ढोल, पडघम, शंख इत्यादि नानावाद्यें व्यूहरचनेच्यावेळीं वाजवावीं. बकुर नांवाचें एक रणवाद्य आहे, याचा उल्लेख ऋग्वेदांत आला आहे. ऋ० मं० १–११७–२१

भारतीय युद्धांत सैन्याच्या हालचाली ध्वज, पताका व वाद्यें यांवरच होत असत, असें तेथील वर्णनावरून दिसून येतें. तिसऱ्या दिवशीं युद्ध कसें चालत असे,

याच्या वर्णनाचा स्पष्टच श्लोक आहे तो असा—

अनुमानेन संज्ञाभिर्नामगोत्रैश्च संयुगे ॥
वर्तते च तथा युद्धं तत्र तत्र विशांपते ॥७

भीष्म० अ० ५७

अर्थ—अनुमानेन--गर्दीच्यावेळीं अंदाजानेंच काम घ्यावें लागतें. संज्ञा—युद्धाच्या हालचालींचे अनेक संकेत. नाम--प्रत्येक सैन्याला एक नांव असतें. हें नांव देशावरून पडलेलें असतें. जसें द्रोणाचार्यांच्या जबरदस्त हल्ल्यामुळें सृंजय व केकय हे दोघेहि पळाले.

सृंजयाः केकयैः सार्धं पलायनपराभवन् ॥३३॥

भीष्म० अ० ७५

गोत्र—म्हणजे कुल. निरनिराळीं सैन्यें एकत्र केल्यावर त्या सर्वांचा व्यवहार एकसमयावच्छेदानें होण्यासाठीं निरनिराळ्या पलटणींचा संबंध ठेवणें. गोत्रांत ज्याप्रमाणें अनेक कुलें असतात, पण सर्वजण आपणास एकाच कुलाचे समजतात, तसाच हा व्यवहार आहे. आजच्या काळांतहि कोणत्या पलटणी आपसांत मिसळूं शकतात म्हणजे प्रसंगविशेषीं एकमेकांच्या सैनिकांची मदत घेऊं शकतात याबद्दल नियम ठरलेले आहेत. जयद्रथवधाच्या दिवशीं अर्जुनाचा रथ कौरव सैन्यांत घुसला, पण मागाहून कोणी मदतीला येऊं शकला नाहीं. अर्जुनाबरोबर बहुतकरून सात्यकि असे व अर्जुनाच्या पाठोपाठ कौरव सैन्यांत घुसण्याचा सात्यकि प्रयत्न करीत होताच, अशा स्थितींत आपण संकटांत आहों असा अर्थ बसविलेले शंखाचे आवाज भगवान् श्रीकृष्ण काढीत होते व या आवाजांचा अर्थ धर्मराजाला समजत असे, असें युधिष्ठिराच्या उद्गारावरून दिसून येतें.

पाञ्चजन्य रवो घोरःपुनरासीद्विशांपते ॥२०
तं श्रुत्वा निनदं घोरं धर्मपूत्रोऽभ्यभाषत ॥
नूनं व्यसनमापन्ने सुमहत् सव्यसाचिनि ॥२२

द्रोणपर्व अ० १२७

याचप्रमाणें जयद्रथाला मारल्याबद्दल श्रीकृष्णानें पुनः विजयध्वनि केला. तो आवाजहि युधिष्ठिरानें ओळखला.

श्रुत्वा महान्तं तं शद्बं धर्मराजो युधिष्ठिरः ॥
सैन्धवं निहतं मेने फाल्गुनेन महात्मना ॥१३८

द्रोणपर्व अ० १४६

व्यूहांबद्दल निरनिराळी माहिती थोडक्यांत लिहिली. आतां कांहीं महत्वाच्या व्यूहांबद्दल लिहूं. प्रथम प्रत्येक योद्ध्याजवळ युद्धावर जातांना सामान किती पाहिजे हें लिहिलें पाहिजे.

तत्र चापानि चत्वारि द्वे वामे द्वे च दक्षिणे ॥
चतुश्शतं च काण्डानां तूणद्वयनिवेशितम् ॥
सपिच्छानां शराणांच नाराचाणां शतद्वयम् ॥
यथोपपादमन्येस्युरर्धचंद्रादयोपिच ॥

कोदण्डमण्डन.

खड्गं चर्म गदां शक्तिं परिघं
मुग्दरं तथा ॥
वज्रं च परशुं कुन्तं पट्टिशादींश्च
धारयेत् ॥
द्वौ कुन्तौ द्वे गदे सिल्लसप्तपट् च
चतुष्टयम् ॥
चक्रादि च यथा लाभं इयती
गजसंभृतिः ॥
न रथो न गजो यस्य सोऽश्वमेव
समारुहेत ॥
कटिबद्धैकतूणीरः खड्गशक्ति-
धनुर्युतः ॥

अर्थ—एका रथ्याजवळ उजवीकडे दोन व डावीकडे दोन अशीं चार धनुष्यें असावीं. चारशें शर--बाण व दोनशें नाराच बाण आणि अर्धचन्द्र बाण जसे मिळतील अगर लागतील तसे असावे. एक धनुर्धर सकाळीं चारशें व दुपारीं चारशें असे आठशें बाण एका दिवसांत मारूं शकतो हें मागें लिहिलेंच आहे. या धोरणानें एका दिवसाच्या बेगमी-पुरती सहाशें बाणांची तरतूद केली आहे. मोठमोठ्या योध्यांना वर लिहिल्यापेक्षां जास्त बाण लागत असत असें कर्णाच्या आज्ञेवरून दिसून येतें.

उपासंगान् षोडश योजयन्तु ॥२४

द्रोणप० अ० २

कर्णानें आपल्या रथांत सोळा भाते ठेवावे म्हणून आज्ञा केली. योद्ध्याजवळ चार धनुष्येंहि लहान मोठ्या आकारांची असावींत असें दिसतें. कारण शत्रू जवळ आला म्हणजे त्याला मोठ्या धनुष्यानें नीट नेम मारतां येत नाहीं असे उद्‌गार धृष्टद्युम्नानें द्रोणाचार्यांना मारण्यासाठीं लगट केल्यावेळीं काढले आहेत. याशिवाय तलवार, भाला, शक्ति, गदा इत्यादि शस्त्रें रथ्यानें आपल्याजवळ ठेवावीं.

एका हत्तीवर दोन भाले, दोन गदा व चार ते सात सिल्ल, आणि चक्र इत्यादि लागतील त्याप्रमाणें ठेवावे. तसेंच दोन अंकुशधारी, दोन धनुर्धारी, व दोन खड्ग, भाला इत्यादि चालविणारे अशीं सहा माणसें असावीं असें अग्निपुराणांत लिहिलें आहे.

ज्याला रथ किंवा हत्ती बसायला नाहीं त्यानें घोड्यावर बसावें. घोडेस्वाराच्या कमरेला एक भाला असावा व हाताशीं तलवार, शक्ति व धनुष्य असावें. घोडेस्वाराला हातांत धरावयास भालाहि सांगितला आहे.

अर्धचन्द्रं च चक्रं च शकटं
मकरं तथा ॥
कमलश्रेणिका गुल्मान् व्यूहानेवं
प्रकल्पयेत् ॥

अर्धचंद्र, चक्र, शकट, मकर, कमलश्रेणी याप्रमाणें अनेक व्यूह रचतात आणि हे व्यूह फोडण्यासाठीं निराळे व्यूह रचतात. त्यांपैकीं कांहीं प्रमुख व्यूहांची माहिती लिहिली पाहिजे—

१ **अर्धचंद्र**—या व्यूहांत सैन्याची रचना चंद्राच्या कोरेप्रमाणें असते. शत्रुसैन्यावर तीन बाजूंनीं मारा करतां यावा, त्याला पुढच्या अंगास जाण्यास वाव मिळूं नये म्हणून हा व्यूह रचतात. शत्रुसैन्यापेक्षां आपलें सैन्य जास्त आहे अशी खात्री असल्यावांचून हा व्यूह उपयोगी पडत

नाहीं. चंद्राचे पुढें आलेले फांगाडे शत्रु-कडून दोन्ही अंगांनीं हल्ला होऊन तोडले जाण्याचें यांत भय असतें. पाण्डवांनीं भारती युद्धाच्या तिसऱ्यादिवशीं अर्धचंद्र व्यूह रचला होता.

अर्धचन्द्रेण व्यूहेन व्यूहं तमतिदारुणम् ॥११

भीष्मपर्व अ० ५६

तसेंच संशप्तकांनींहि चंद्रव्यूहाची रचना केली होती.

व्यूह्यानीकं रथैरेव चन्द्राकारं मुदा युताः ॥१

द्रोण० अ० १८

२ **चक्र — चक्रव्यूहश्चैकमार्गो ह्यष्टधा कुण्डलीकृतः॥** गाडीच्या चाकाप्रमाणें हा व्यूह रचतात. यांत मध्यापासून सैन्याचा पुरवठा सगळीकडे चाकाच्या आऱ्यांच्या मार्फत होत असतो. या व्यूहांत आठ वलयें असून जाण्यायेण्याला एकच रस्ता असतो. शत्रूनें कोणीकडूनहि आपल्यावर चाल केली तरी त्याला तोंड देतां यावें, या हेतूनें हा व्यूह रचतात. शत्रूचें लष्कर किती आहे, कोठें कोठें आहे व तें कोणीकडून हल्ला करील याचा नेम नसला म्हणजे या व्यूहाचा उपयोग होतो. द्रोणाचार्यांनीं युद्धाच्या दुसऱ्या दिवशीं व अभिमन्युवधाचे दिवशीं चक्रव्यूह रचला होता.

व्यूहस्तु चक्रशकटो भारद्वाजेन निर्मितः ॥२२॥

भीष्मपर्व अ० ८७

चक्रव्यूहो महाराज आचार्येणा-भिकल्पितः ॥१३

द्रोणपर्व अ० ३४

३ **शकट--शकटः शकटाकाराः॥** दोन बाजूला दोन चक्रव्यूह अर्धे अर्धे व मध्यें चौरस भाग अशी सैन्याची मांडणी करणें हिला शकटव्यूह म्हणतात. शत्रूनें अर्धचंद्र व्यूह केला असला म्हणजे त्याला तोंड म्हणून हा व्यूह उपयोगी पडतो. शत्रूच्या चढाई करून येण्याऱ्या सर्व लोकांना तोंड देण्याचें सामर्थ्य यांत आहे व आपल्या सैन्याच्या कोणत्याहि भागाला यानें मदत होऊं शकते. शकटाच्या मध्यापासून चारी अंगाला आऱ्यांकडून सैन्य व शस्त्रें यांचा पुरवठा होतो व याला शत्रूला प्रतिरोध करतां येत नाहीं. भारतीय युद्धांत अकराव्या दिवशीं कौरवपक्षाकडे द्रोणाचार्यांनीं शकट व्यूह रचला होता.

अस्माकं शकटव्यूहो द्रोणेन विहितोऽभवत् ॥

द्रोणपर्व अ० ७।२४

सिकंदर बादशाहाशीं पंजाबांत कथई—कठ लोकांनीं जें दारुण युद्ध केलें होतें त्यावेळीं कठांनीं “ शकट ” व्यूह रचला होता असें यूनानी—ग्रीक—लेखकांनीं लिहून ठेविलें आहे.

४ **मकर—चतुष्पाद् मकरो दीर्घस्थूल-वक्त्रद्विरोष्ठकः ॥** शकट व्यूहाला पुढें शत्रूच्या सैन्याची फळी फोडण्यासाठीं त्रिकोणाकृति तोंड केलें म्हणजे हा व्यूह होतो. यांत बाजूंचीं चाकें सुसरीच्या पायां-प्रमाणें मोडून लांबवितां येतात. शत्रूनें अर्ध-

चंद्रव्यूह केला असतां आपला बचाव करण्यासाठीं शकटव्यूह उत्तम व शत्रूचा नाश करण्यासाठीं मकरव्यूह उत्तम समजावा. सेनापतीनें आपल्या व शत्रु-सैन्याच्या संख्येवरून या रचना योजण्याचा विचार करावा. भारतीय युद्धांत भीष्मांनीं पांचव्या दिवशीं कौरव सैन्यांत मकरव्यूह रचला होता.

अरक्षन् मकरव्यूहं भीष्मोराजन्
समन्ततः ॥४

भीष्म० अ० ६९

पाण्डवांनीं सहाव्या दिवशीं आपलें सैन्य मकराकार रचलें होतें.

तसेंच कर्णानें पण सोळाव्या दिवशीं मकरव्यूह रचला होता.

व्यूहं व्यूह्य महेष्वासो मकरं
शत्रुतापनः ॥१४

कर्ण० अ० ११

५ **कमल**—कमलव्यूह—चक्रव्यूहासारखाच असतो. परंतु यांत निरनिराळ्या पाकळ्या शत्रुनाशाला उपयोगी पडतात. चक्रव्यूह बचावासाठीं असतो व कमलव्यूह चढावासाठीं रचतात. द्रोणाचार्यांनीं जयद्रथाभोंवतीं कमलव्यूह रचला होता.

व्युहस्तु चक्रशकटो भारद्वाजेन
निर्मितः ॥२२॥

द्रोण० अ० ८७

पंतांनीं या व्यूहाचें वर्णन केलें आहे—

शकट व्यूहीं पद्मव्यूह तयाच्याहि
कर्णिकेमाजी ॥

कमल व्यूहाच्या पाकळ्या कमळाच्या दांड्याभोंवतीं फिरण्यासारण्यासारख्या केलेल्या असतात. एक पाकळी दोन घटका युद्ध करून बाजूला सरकते व दुसरी पाकळी तिच्या जागीं येऊन लढते. यामुळें सैन्याला विसावा मिळतो व शत्रूला जेर करतां येतें.

थोड्या तरी तुज व्हाव्या जिंकाया
साजणासि सा घटिका ॥

व्यूहं व्यूह महाबाहो मकरं शत्रू-
नाशनम् ॥ ४

भीष्म० अ० ७५

असें जयद्रथ वधाच्यावेळीं श्रीकृष्णानें म्हटलें आहे तें याच धोरणानें.

६ **श्रेणिका**—नागमोडी माळेप्रमाणें जी सैन्याची रचना तिला श्रेणिका म्हणतात. शत्रूकडे तोंड केलें म्हणजे याच रचनेला "सर्पव्यूह" म्हणतात. लढाईत खंदक खणले जातात ते श्रेणिकाकारच असतात. प्रचंड घातक अस्त्रांच्या माऱ्यानें आपलें फार नुकसान होऊं नये म्हणून किंवा आपलें सैन्य विरळ व लांब पसरण्याकरतां हा व्यूह रचतात.

७ **क्रौंच**—**क्रौंचानां खेगतिर्यादृक् पंक्तितः संप्रजायते ॥ तादृक् संचारयेत् क्रौंच-व्यूहं देशबलं यथा ॥** करकोचे उडूं लागले म्हणजे पाचरीसारख्या आकारानें उडतात. पुढें एक, त्याच्यामागें दोन, त्याच्यामागें चार, अशी पसरट योजना यांत असते. शत्रूची फळी फोडण्यासाठीं या व्यूहाचा उपयोग होतो. यालाहि 'सूचीमुख' असें नांव आहे. शत्रूच्या वेढ्यांत आपण सापडूं नये म्हणून हा

व्यूह रचतात व शत्रूची सांखळी जुळण्यापूर्वीच ती तोडून आपल्याला बाहेर पडतां येतें. भारतीय युद्धांत सहाव्या दिवशीं भीष्मांनीं क्रौंचव्यूह रचला होता.

क्रौंचेन महता राजन् प्रत्यव्यूहत वाहिनीम् ॥१५

भीष्मपर्व. अ. ७५

८ **श्येन**–**सूक्ष्मग्रीवं मध्यपुच्छं स्थूलपक्षं तु पंक्तितः ॥ बृहत्पक्षं मध्यगलपुच्छं श्येनं मुखे तनु ॥** पुढें एक रथ, मागें सात हत्ती, तीस घोडेस्वार, शंभर पायदळ, बाजूला भालाईत; मध्यें आठ रथ, तीस घोडेस्वार व दोन हत्ती, अशी सैन्याची रचना असली म्हणजे तिला श्येनव्यूह म्हणतात. या रचनेंत बहिरी ससाण्याप्रमाणें पुढें चोंच, दोन बाजूला पसरलेले पंख, मागें पाय व शेपटी हीं असून, सर्व सैन्याचा मोहरा वाटेल तिकडे फिरवितां येतो. काकव्यूह, बलाकाव्यूह किंवा क्रौंचव्यूह यांच्या नाशासाठीं हा व्यूह रचतात. या व्यूहांत घोडेस्वारांची भरती जास्त असते व हा सुटसुटीत असून वाटेल तेव्हां वाटेल तेथें उतरून झडप घालण्यास उपयोगी पडतो. पाण्डवांनीं पांचव्या दिवशीं श्येनव्यूह रचला होता.

श्येनेन व्यूहराजेन तेनाजय्येन संयुगे ॥७॥

भीष्म० अ० ६९

श्रीशिवाजी महाराज आपल्या घोडेस्वारांचा असाच उपयोग [वाटेल तेव्हां वाटेल तेथें उतरून झडप घालणें] करीत असत.

९ **गरुड**—गरुडव्यूह —श्येनव्यूहाप्रमाणेंच असतो. परंतु त्याचा विस्तार मोठा असतो. रामायणांत सुग्रिवाचें सैन्य समुद्रावरून पलीकडे गेल्यावर लंकेजवळ सैन्याचा तळ पडला तेव्हां सैन्यामध्यें गरुडव्यूहाची रचना केली होती असें वर्णन आढळतें.

द्वारमाश्रित्य लंकायाः रामस्तिष्ठति सायुधः ॥

गरुडव्यूहमास्थाय सर्वतो हरिभिर्वृतः ॥१२

युद्धकांड० सर्ग० ३०

येथें लक्षांत ठेवलें पाहिजे कीं सुग्रिवाजवळचें सर्व सैन्य पायदळच होतें.

रामरावणयोर्युद्धे हरयो वै पदातयः ॥१४

शांति० अ० ९५

यावरून सुग्रीवसैन्यांत कशी शिस्त होती हें कळून येतें.

भारतीय युद्धांत बाराव्या दिवशीं द्रोणाचार्यांनीं गरूड व्यूह रचला होता.

व्यूढं दृष्ट्वा सुपर्णं तु भारद्वाजकृतं तदा ॥४

द्रोणपर्व, अ० २०

सांप्रत आरमारी किंवा वैमानिक युद्धांत जेथें सैन्य विरळ असतें पण केन्द्रीभूत व

चपल असणें आवश्यक असतें तेथें हा व्यूह रचीत असतात.

१० **पुष्करिणी**–चारहि बाजूंनीं पायऱ्या असणाऱ्या एका हौदाप्रमाणें सैन्याची रचना करणें याला पुष्करिणी म्हणतात. अशी रचना बचावासाठीं फार उपयोगी आहे. आपण हल्ला करावयाचा नाहीं, परंतु आपला बचाव करावयाचा व शत्रूला थकवून टाकावयाचा या हेतूनें हा व्यूह रचतात व संधि मिळतांच हा व्यूह मोडून त्याची " **मालाकार** " रचना करून शत्रूला वेढतां येतें. वाटर्लूचे लढाईत ड्यूक ऑफ वेलिंग्टन यानें हा व्यूह रचला होता व संधि मिळतांच हा व्यूह मोडून मालाकार सैन्य पसरून नेपोलियनचा पराजय करण्यांत आला. यावांचून **बलाका, अग्नि, सिंह, काक** इत्यादि अनेक व्यूह आहेत. बलाका व्यूहाला **सूचीमुख** किंवा दुसरें नांव **शलाका** असें आहे. हा व्यूह लॉर्ड किचनेर यांनीं ट्रान्सवालच्या लढाईत बोअर लोकांना कोंडण्यासाठीं रचला होता. अग्निव्यूह गेल्या यूरोपीय महायुद्धांत वार्सा इत्यादि किल्ले घेण्यांत जर्मन सेनापतींनीं रचला होता.

व्युहभेद.

❀

सैन्यमल्पं बृहद्वापि दृष्ट्वा मार्गं रणस्थलम् ॥
व्यूहैर्व्यूहेन व्यूहाभ्यां संकरेणापि कल्पयेत् ॥
भेत्तुकामः परानीकं संहतैरेव भेदयेत् ॥
भेदरक्षापरेणापि कर्तव्या संहतिस्तथा ॥

शत्रूचा व्यूह भेदावयाचा असेल तेव्हां शत्रूवर चाल करून जावयाचा मार्ग व आपला मागचा मार्ग [आपल्याला मदत मिळावयाचा मार्ग] हे दोनहि मार्ग लक्षांत घ्यावे आणि रणस्थल आपल्याला अनुकूल आहे किंवा नाहीं याचा विचार करून मग शत्रूशीं प्रतिव्यूह रचून लढाई करावी. प्रतिव्यूह रचतांना कदाचित् समयाप्रमाणें अनेक व्यूह रचावे. भारतीय युद्धांत असे एकाच दिवशीं अनेक व्यूह रचल्याचें दिसून येतें. भारतीय युद्धाच्या सहाव्या दिवशीं आरंभीं मकरव्यूह पांडवांनीं रचला होता, पण ' मध्यंदिने गते सूर्ये ' अभिमन्यूला पुढें करून भीमाला मदत म्हणून, मागून —

ते कृत्वा समरव्यूहं सूचीमुखमरिन्दमाः ॥
बिभिदुर्धार्तराष्ट्राणां तद्रथानीकमाहवे ॥ ५९

भीष्म. अ० ७७

सूचीमुख व्यूह रचला. तसेंच तेराव्या दिवशीं द्रोणाचार्यांनीं चक्रव्यूह रचला होता. सकाळीं पांडवसैन्य निराळ्या व्यूहानें उभें राहिलें होतें, पण या चक्रव्यूहांत प्रवेश करण्यासाठीं, पुढें अभिमन्यु व मागें युधिष्ठिराच्या रक्षणाखालीं (श्लोक ३ अ० ७३ द्रोण०)

प्रणिधायानुयास्यामो रक्षन्तः सर्वतोमुखाः ॥ २१

द्रोण. अ० ३५

सर्वतोमुख व्यूह रचला गेला. या सर्वतोमुख व्यूहाचें लक्षण असें आहे.

अमार्गश्चाष्टवलयी गोलकः
सर्वतोमुखः ॥

तात्पर्य, शत्रूशीं लढतांना शिस्तीनें व संघानेंच लढावें असें शास्त्रकारांचें सांगणें आहे.

व्यूहानां च समारम्भान् दैवगान्धर्व-
मानुषान् ॥
तैरहं मोहयिष्यामि पाण्डवान् व्येतु
ते ज्वरः १०
उद्योग अ० १६५

भीष्माचार्यांना सैनापत्याचा अभिषेक झाला तेव्हां दुर्योधनाला धीर येण्याकरितां भीष्मांनीं जें भाषण केलें त्यांत वर लिहिलेलाहि एक श्लोक आला आहे. या श्लोकांत देव, गंधर्व व मनुष्य यांचे व्यूह मी जाणतों असें भीष्माचार्य म्हणत आहेत. यावरून व्यूहविद्या ही अनेकांच्या अनुभवाचें फळ आहे असें सिद्ध होतें. तसेंच व्यूहविद्येला 'व्यूहशास्त्र' असा प्रयोग महाभारतांत आढळतो.

व्यूहं तं पूरयामासुर्व्यूहशास्त्र-
विशारदाः ॥ २०
भीष्म. अ० ८७

यावरून ही व्यूहविद्या भारतीय आर्यांनीं किती परिणतावस्थेला नेली होती याची कल्पना येईल. या विषयावर सोपपत्तिक स्वतंत्र ग्रंथ लिहावा लागेल एवढेंच येथें वाचकांना सुचवून ठेवतों.

सैनिकांनीं रचावयाच्या व्यूहाची कल्पना यावी एवढी माहिती येथें लिहून झाली. आतां सैनिकांच्या शिक्षणांतील दोन महत्वाच्या गोष्टी येथें लिहितों.

शस्त्रसन्धानविक्षेपःपदादिन्यासतः
कला ॥
गजाश्वरथगत्या तु युद्धसंयोजनं
कला ॥
सारथ्यं च गजाश्वादेर्गतिशिक्षा-
कला स्मृता ॥
वाद्यसंकेततो व्यूहरचनादि कला
स्मृता ॥
संध्याघाताकृष्टिभेदैर्मल्लयुद्धं कला
स्मृता ॥
कलापंचकमेतद्धि धनुर्वेदागमे
स्थितम् ॥
आदानमाशुकारित्वं प्रतिदानं चिर-
क्रिया ॥
कलासु द्वौगुणौ ज्ञेयौ द्वे कले
परिकीर्तिते ॥
शुक्र. अ० ४ प्रक० ३

अर्थ—सैनिकांच्या शिक्षणांत किती तैयारी पाहिजे व सैनिक शिकून कसे तयार झाले पाहिजेत याचें उत्कृष्ट वर्णन वरील श्लोकांतून आलें आहे. पवित्र्यावर नीट उभें राहणें व कवाइतीचे वेळीं सैनिकांचीं पावलें नीट पडणें म्हणजे पदन्यास, तसेंच शस्त्रें ग्रहण करणें व नीटपणें चालविणें ही एक कला. घोडा, रथ, हत्ती यांना युद्धाचें उत्तम शिक्षण देणें ही दुसरी कला. घोडा व हत्ती यांचें सारथ्यकर्म

ही तिसरी कला. व्यूह रचतांना इत्यादि प्रसंगीं उत्तम रीतीनें वाद्यें वाजविणें ही चौथी कला व शत्रूच्या मर्मस्थानीं आघात करून शत्रूला कुस्तींत मारणें ही पांचवी कला, याप्रमाणें धनुर्वेदांत पांच कला सांगितल्या आहेत. कोणतेंहि काम लवकर लवकर करणें व पुष्कळ वेळ करीत राहणें याला कला असें म्हणतात.

सैन्याचें बाह्यांग कसें उत्कृष्ट असावें हें वरील श्लोकांवरून समजलें. आतां सैन्याचें अंतरंग कसें असावें हें पहा.

शारीरं हि बलं शौर्यबलं सैन्यबलं तथा ॥
चतुर्थमास्त्रिकबलं पञ्चमं धीबलं स्मृतम् ॥
षष्ठमायुर्बलं त्वेतैरुपेतो विष्णुरेव सः ॥

अर्थ—सैन्यांतील लोक शरिरानें हृष्टपुष्ट व कष्ट सहन करणारे असावे हें शारीरबल. सैनिक शूर असावे हें शौर्यबल. सैन्याची सर्व प्रकारची व्यवस्था ठेवावी व सैनिकांत एकी असावी हें सैन्यबल. चवथें अस्त्रबल, म्हणजे शत्रूपेक्षां आपली अस्त्रें तीक्ष्ण असणें व सदोदित तयार ठेवणें. पांचवें बुद्धिबल म्हणजे शत्रूनें टाकलेला डाव उलटून टाकणें, याला बुद्धि पाहिजे व सहावें बल म्हणजे आयुर्बल. याचा अर्थ राष्ट्राचें अंतर्बाह्य शत्रूंपासून रक्षण व व्यवस्थित कारभार या योगें राष्ट्राची उन्नति होते अर्थात् लोक सुखी होतात. याप्रमाणें प्रजा सुखी ठेवणें व राष्ट्रांतील सर्व लाकांना सानक शिक्षण देणें हें आयुर्बल समजावें. सैनिकांची सतत भरती होणें हेंच आयुष्य. हें आयुष्य प्रजा सुखी असणें व सर्व प्रजेला सैनिक शिक्षण देणें यावांचून शक्य नाहीं. इतकी सैन्याची तयारी करणें म्हणजे तो विष्णु समजावा अर्थात प्रतिईश्वर होय.

सैन्यांतील नाच व गायन.

श्रावयेत् सैनिकान्नित्यं धर्मं शौर्यविवर्धनम् ॥
सुवाद्यनृत्यगीतानि शौर्यवृद्धिकराण्यपि ॥८६

शुक्र. अ० ५

अर्थ—सैन्यांतील शिपायांना त्यांचे अंगीं शौर्य वाढण्याकरितां पराक्रमाच्या गोष्टी ऐकवाव्या. तसेंच उत्तम वाद्यें, नाच व गायन हींहि ऐकवावीं. तात्पर्य, शौर्यवृद्धिकारक वाङ्मय, नाच, गायन आणि वाद्यें यांचा अभ्यास सैन्यांत व्हावा. हें मनाच्या करमणुकीचें साधन आहे. शिपायांच्या देहाबरोबर मनाचीहि काळजी घ्यावी. मनुष्याचें मन व देह दोहोंनाहि शिक्षण पाहिजे. वाद्यांमध्यें कवाइतीचे वेळीं वाजविण्याचा प्रकार, युद्धाबद्दल, शोकाबद्दल व करमणूकीबद्दल असे अनेक भेद आहेत. नृत्यामध्यें वीरनृत्य असावें. भारतीय योद्धा अर्जुन हा नृत्यकला शिकला होता ही गोष्ट प्रसिद्ध आहे.

स च गान्धर्वमखिलं ग्राहयामास मां नृप ॥

वनपर्व

भीष्मपितामह युद्धांत नाचत असत.

स नृत्यन् वै रथोपस्थे दर्शयन्
पाणिलाघवम् ॥ २२
भीष्म. अ० ५९

पांडव सैन्यावर हल्ला करतांना भीष्मपितामह रथांत नाचत असत. यावेळीं बाणांचा पाऊस पाडावा लागे. भीष्मांचें धनुष्य यावेळीं गोल चक्रासारखें दिसें व पितामह एकदां उत्तरेला, एकदां दक्षिणेला, एकदां पश्चिमेला, एकदां पूर्वेला झुकलेले दिसत, असें व्यासांनीं लिहिलें आहे. दुसऱ्या अनेक योध्यांच्या नृत्यांचीं वर्णनें भारतीय युद्धांत लिहिलीं आहेत. इतकेंच नव्हे तर सतराव्या दिवशीं कर्णानें रचलेला व्यूहच नाचल्यासारखा दिसत होता असें लिहलें आहे.

नृत्यतीव महाव्यूहः परेषां
भयमादधत् ॥ २७
कर्णपर्व अ. ४६

युद्धदेवता महादेव, कार्तिकस्वामी [सेनानीनामहंस्कन्धः], गणपति यांचीं नृत्यें प्रसिद्ध आहेत. युद्धांतील नृत्याचा उल्लेख ऋग्वेदांतच आला आहे, इतकी ही नृत्यकला प्राचीन आहे. व्यायामज्ञानकोश खंड १ ला पृ. ११ ते १३ पहा. वृष्णींच्या नृत्यकलेचें वर्णन हरिवंशांत आलें आहे [अ. १४६], तसेंच सिकंदर बादशाह हिंदुस्थानांत आला त्यावेळच्या प्रजासत्ताक राज्यांबद्दल इतिहासलेखक एरियन आपल्या ग्रंथांत [६—३] "हीं प्रजासत्ताक राष्ट्रें नृत्य आणि गायन यांचीं प्रेमी आहेत" असा उल्लेख करतो. या उताऱ्यांवरून नृत्यकला भारतीयांमध्यें कशी होती याचें दिग्दर्शन होतें. सांप्रत विशेषतः वीरनृत्य सुरू होणें आवश्यक आहे. नृत्याबद्दल येथें इतकेंच लिहूं शकतों. सैनिकांनीं गाणीं कोणतीं गावीं याबद्दल कौटिल्यानें लिहिलें आहे.

जातिसंघकुलकर्मवृत्तस्तवं च
योधानां वर्णयेयुः ॥ ४७
अधि० १०—३ ४७

अर्थ—जाति क्षत्रियत्वादि अर्थात् क्षात्रधर्माचें वर्णन करणें, संघ अनेक लोकसत्ताक राष्ट्रांचा समुदाय [आपसांत ऐकमत्य असलेला], **कुलं**—अभिजन—देशांतील रहिवासी. **कर्म**—जीवन वृत्तांत, **वृत्त**—सदाचार. याप्रमाणें गाणीं गावीं. हीं सूतानें गावीं. सूत म्हणजे येथें इतिहासवेत्ता असा अर्थ आहे व मागधानें [मगध—स्तुतिपाठक—भाट] योद्ध्यांची स्तुति करावी. भारतीय युद्धांत संध्याकाळीं युद्ध आटोपल्यावर सैन्यामध्यें वीरगायन व वादन चालत असे.

गीतवादित्रशब्देन व्यक्रीडन्त
यशस्विनः ॥ ५५
भीष्म० अ. ८६

महाराष्ट्रांत पोवाडे म्हणणें हा वीरगायनाचाच एक प्रकार आहे व हा धंदा करणाराला "शाहीर" असें म्हणतात.

सैन्यांतील खेळ.

पूर्वी सैन्यांत हत्ती, घोडे व रथ असत. अर्थात हत्तियुद्धें [साठमारी], घोड्यांच्या शर्यति, रथांच्या शर्यति व पायदळाच्या कुस्त्या इत्यादि खेळ खेळले जाणें हें स्वाभाविक आहे.

रथांच्या शर्यति लावणें ही चाल भारतीयांत फार प्राचीन आहे. तैतिरीय संहिता व ब्राम्हण ग्रंथांत याचें वर्णन आढळतें. वाजपेय यज्ञाचे वेळीं १७ रथांना घोडे जुंपून त्यांची शर्यत लावीत असत. हें अंतर सुमारें ३॥ मैल लांबीचें असे. या वेळीं सतरा नगारे एकदम वाजवून शर्यतीला उत्तेजन देत असत. राजसूय यज्ञांतहि रथांची धांवाधाव सांगितली आहे. तैतिरीय संहिता व ब्राम्हण, कांड एक पहा.

छांदोग्योपनिषदांतहि शर्यतीचा उल्लेख आला आहे. [अ० १–३–५]

जरासंधाची छावणी यमुनेच्या तीरावर पडली असतां संध्याकाळीं सैनिकांच्या कुस्त्या होत होत्या असें वर्णन गार्गी संहितेंत केलें आहे.

जरासन्धो मागधेन्द्रो दिग्जयाय विनिर्गतः ॥

यमुनानिकटे तस्य शिबिरोऽभू- दितस्ततः ॥

इत्यादि.

पूर्वी हत्तींबरोबर लढाई होत असे ही गोष्ट इतिहासांत प्रसिद्ध आहे. तसेंच वीरांचीं द्वंद्व-युद्धें होत असत हेंहि इतिहासज्ञांना माहीत आहे. कर्णानें द्वंद्वयुद्धासाठीं अर्जुनाला आव्हान दिलें. जरासंधाचें व भीमाचें द्वंद्वयुद्ध झालें इत्यादि गोष्टी प्रसिद्ध आहेत. यूरोपांत खिस्त्यां-तहि द्वंद्वयुद्धें होत असत. इग्लंडमध्यें शंभर वर्षांपूर्वी द्वंद्वयुद्धें होत असत. शिल्पशास्त्रकारांनीं नगररचना सांगतांना सार्वजनिक कामासाठीं एकंदर नऊ जागा असाव्या असें सांगितलें आहे. त्यांत " बलालोक " म्हणजे सैन्याच्या कवाइती व खेळ पाहणें याकरितां हा मंडप असावा असें त्यांनीं लिहिलें आहे.

वीरांचा इतिहास.

सैनिकांनीं वीर पुरुषांचा इतिहास वाचावा, ऐकावा, गायन करावा याबद्दल मागें लिहिलें आहे. लव व कुश यांनीं असाच रामाचा इतिहास गाइला ही गोष्ट प्रसिद्ध आहे. सांप्रत ज्याप्रमाणें वीरांचीं कृत्यें लिहिलीं जातात अशाचप्रकारें प्राचीन काळीं लेखनाची चाल होती. एका बोअरनें दहा गोळ्या मारल्या तर अकरा प्राण घेतले जातील पण नऊ घेतले असें होणें अशक्य आहे, असें बोअर लोकांच्या नेमाबद्दल लिहिलें जातें. याचप्रमाणें बृहदारण्य-कांत काशी किंवा विदेह देशांतील क्षत्रिय-कुमारांच्या तीक्ष्ण बाणांचा दृष्टांत आला आहे.

यथा काश्यो वा वैदेहो वोग्रपुत्रउज्ज्यं धनुरधिज्यं कृत्वा

द्वौ बाणवन्तौ सपत्नाति व्याधिनौ हस्ते कृत्वोपतिष्ठेत् ॥

बृह० ३–८–२


अर्थ—ज्याप्रमाणें काशी देशांतील किंवा विदेह देशांतील क्षत्रियकुमार दोरी उतरलेलें धनुष्य चटकन् पुनः सज्ज करून शत्रूला अत्यंत घायाळ करणारे तीक्ष्ण टोंकांचे दोन बाण घेऊन शत्रूवर चालून जातो.

तसेंच निरनिराळ्या देशांतील लोक कसे लढवय्ये असत इत्यादि वर्णन महाभारतांत लिहिलें आहे.

प्राच्या मातंगयुद्धेषु कुशलाः
कूटयोधिनः ॥
तथा यवनकांभोजा मथुराम-
भितश्च ये ॥
एतेऽश्वयुद्धकुशला दाक्षिणात्यासि-
चर्मिणः ॥
सर्वत्र शूरा जायन्ते महासत्वा
महाबलाः ॥
शांतिपर्व अ० १०१

अर्थ–प्राच्य देशांतील लोक [वंग, पुण्ड्र, सुह्म, कामरूप व कलिंग] हत्तियुद्धांत निपुण आहेत व गनिमी काव्यानें लढणारे आहेत. तसेंच पश्चिमेकडील यवन, कांभोज [पामीर व बदख्शाँ] व मथुरेच्या आसपासचे लोक उत्तम घोडेस्वार आहेत. दाक्षिणचे लोक तलवारबहाद्दर आहेत. शूर व बलवान् असे लोक हिंदुस्थानांत सर्व प्रांतांत होतात. स्थलसंकोचास्तव हा विषय आम्ही येथेंच सोडून देतों.






श्री. सर गं. ग. **पटवर्धन**, के. सी. आय. ई.,

राजेसाहेब, मिरज [सिनीयर].

॥ श्रीगजाननप्रसन्न ॥

मल्लविद्याशास्त्र



(१) भीमसेनी (२) हनुमन्ती (३) जांबुवन्ती (४) जरासंधी कुस्ती.

उपोद्घात.

लेखक :—श्री. **सर गं. ग. पटवर्धन**, राजेसाहेब, मिरज (सिनीयर),
के. सी. आय. ई.



मर्दानी खेळांत कुस्तीचा खेळ फार महत्वाचा आहे. कुस्ती हा हिंदुस्थानवासियांचा मुख्य राष्ट्रीय खेळ आहे. हिंदुस्थानांतील प्रत्येक विद्यार्थ्यानें ह्या विद्येचा अभ्यास करून आपलें शरीरसामर्थ्य सुधारलें पाहिजे. मेहनतीचा प्रकार या दृष्टीनें देखील कुस्तीची मेहनत फार उत्तम प्रकारची समजली जाते. शरिराचे सर्व स्नायूंस व शरिराचे आंतील निरनिराळ्या इंद्रियांस कुस्ती खेळल्यानें चालना मिळून तीं मजबूत व कार्यक्षम बनतात. कुस्तीच्या व्यायामानें शरीर जसें तयार होतें तसें दुसऱ्या कोणत्याहि मेहनतीनें होत नाहीं असें युरोपियन व्यायामशास्त्रज्ञाचेंहि मत आहे. याशिवाय कुस्तीची विद्या अशी विचित्र आहे कीं ती जाणणारा कमी शक्तीचा मनुष्य देखील जास्त शक्तीच्या प्रतिस्पर्ध्यावर जय मिळवूं शकतो. कुस्ती खेळल्यानें नुसतें शरीरच तयार होतें असें नसून कुस्तीची मेहनत करणाराचें मनहि तितकेंच खंबीर होतें. कुस्ती खेळणाराचे अंतःकरणांत, उत्तम प्रकारचा आत्मविश्वास उत्पन्न होतो. शिवाय प्रसंगावधान, धैर्य, आक्रमणशीलता, वगैरे अनेक प्रकारच्या गुणांचेंहि कुस्ती खेळत राहिल्यानें संवर्धन होतें. कुस्ती खेळणाऱ्या माणसास कोणत्याहि प्रकारच्या साधनांची जरूर

नसते. पुष्कळ वेळां कुस्ती खेळणारा मनुष्य प्रतिस्पर्ध्याचे हातांतील हत्यार चटकन काढून घेऊन त्याजवर जयहि मिळवूं शकतो. जंबियाची कुस्ती, माडूची कुस्ती, बिनोट, लाटीबंदेश, तरवारबंदेश वगैरे प्रकारच्या खेळांत मुख्य भाग कुस्तीचाच असतो. म्हणून या कुस्तीच्या खेळाचा उपयोग तरूणांनीं अवश्य करावा.

आपल्या सुदैवानें कुस्तीची कला आपल्या पूर्वजांनीं फार उच्च कोटीस नेलेली आहे. वेदकालापासून हिंदुस्थानांत मल्लविद्येचा प्रचार आहे. श्रीकृष्ण, भीम वगैरे अनेक थोर पौराणिक विभूतींनीं या विद्येंत उत्तम प्रकारचें प्राविण्य मिळविलें होतें असें इतिहासावरून दिसतें. कुस्ती पाहण्यास हल्लीं देखील हजारों माणसें जमतात. अगदीं अलीकडे गुलाम, गामा, वगैरे हिंदी मल्लांनीं जगांतील मल्लांत पहिला नंबर मिळविला असून अजूनपर्यंत कायमहि ठेविला आहे. अशा महत्वाच्या या मर्दानी खेळाची संपूर्ण माहिती आम्ही मोकळे मनानें **मल्लविद्याशास्त्र खंड १ व २** यांत सचित्र दिलेली आहेच. त्या माहितीची पुनरुक्ति **व्यायामज्ञानकोशांत** होऊं नये म्हणून हा कुस्तीचा विषय आम्ही या ठिकाणीं निराळे तऱ्हेनें दिला आहे. कुस्ती शिकणारास व शिकविणारास सुलभ जावें म्हणून पूर्वीच्या **मल्लविद्याशास्त्र** या पुस्तकांत खेळणारांच्या उभे राहण्याच्या स्थितीस अनुसरून डावांची माहिती दिलेली आहे. या वेळेस फक्त कुस्तीचे डावांचा हेतु लक्षांत घेऊन त्याप्रमाणें डावांचे निरनिराळे भाग केले आहेत.

आमचे देशांतील पुष्कळ सुशिक्षित माणसांची अशी समजूत झालेली दिसते कीं, खऱ्या आणिबाणीचे प्रसंगीं जपानी कुस्ती (जूजुत्सू) जास्त उपयोगी पडण्यासारखी आहे. त्याचें कारण, जूजुत्सूंत सामनेवाल्यास जाया करण्याचे ज्याप्रकारचे अनेक डाव दिलेले आहेत त्याप्रकारचे डाव आपले देशी कुस्तींत येत नाहींत असें सांगण्यांत येतें. ही समजूत अत्यंत चुकीची आहे. आमचे मल्लविद्येंत सामनेवाल्यास जाया करण्याचे, त्याचा प्राण घेण्याचे अनेक डाव आहेत, पण त्या डावांचा रोज खेळण्याच्या कुस्तींत उपयोग करूं देणें इष्ट नसल्यानें ते डाव करण्याची मनाई केलेली आहे. तसेच वाटेल त्या विद्यार्थ्यास तसले डाव शिकविले असतां त्यांचा दुरुपयोग होण्याचाहि संभव असल्यामुळें हे हानिकारक डाव योग्य विद्यार्थी पाहूनच त्यास शिकविण्यांत येतात. याच कारणामुळें नेहमींच्या कुस्तीचे दंगलांत अशा प्रकारचे डाव खेळलेले दिसत नाहींत. जपानी कुस्तीचीं सचित्र पुस्तकें छापलेलीं आहेत. त्यांत अशा प्रकारचे पुष्कळ डाव दिलेले असल्यानें वरीलप्रमाणें लोकांचा गैरसमज झाला असला पाहिजे. अशा डावास 'नेस्त्या' म्हणतात.

कुस्तीचे जे निरनिराळे डाव आहेत त्यांचा एकंदरीनें विचार केला तर त्यांचे मुख्य चार विभाग होतात.

(१) **भीमसेनी–(शक्तीचे डाव)**–केवळ शक्तीच्या योगानेंच होणारे डाव.

(२) **हनुमन्ती–(युक्तीचे डाव)**–खरे डाव हेच होत. या डावांमुळें कमी शक्तीचा मनुष्य जास्त शक्तीचे सामनेवाल्यास चीत करूं शकतो.

(३) **जांबुवन्ती**–(बांधाचे डाव)–सामनेवाल्यास चीत न करतां त्याचे हातपाय बांधून त्यास आपले कबजांत घेण्याचे डाव.


(४) **जरासंधी**–(**नेस्त्या**)–हातपाय मोडण्याचे, सामनेवाल्याचा जीव घेण्याचे डाव.

कुस्तीचा कोणताहि डाव घेतला तर त्याचा समावेश वरील चार प्रकारांपैकीं कोणत्या तरी एका प्रकारांत होतो. शक्तीचे डाव खेडेगांवचे कुस्ती खेळणारे अडाणी लोक फार करतात. जाणत्या वस्तादाजवळ ही विद्या शिकावयास न मिळाल्यामुळें केवळ शक्तीच्या जोरावर प्रतिपक्षास चीत करावयाचा प्रयत्न अशा लोकांकडून होतो. या त्यांच्या खेळास ' **डाव** ' असें नांव देणें देखील योग्य नाहीं. पण अशा प्रकारचे अडाणी लोकांचे खेळ दंगलींत होतात. म्हणून या प्रकारचे खेळांचेहि कांहीं नमुने 'शक्तीचे डाव' म्हणून येथें दिले आहेत. नंतर खऱ्या डावाचे कांहीं नमुने दिले आहेत. त्यांत नमुन्यासाठीं १–२ साखळ्या दिल्या आहेत. दोघेहि खेळणारे कुशल असले म्हणजे एकसारखे डावामागें डाव कसे करतात त्याचेहि नमुने दिले आहेत. यानंतर 'बांधाचे डाव' दिले आहेत. आपले कडील सध्यां प्रचलित असलेल्या कुस्तींत सामनेवाल्यास चीत करणें हेंच मुख्य ध्येय समजलें जातें. म्हणून नुसत्या बांधाचे डावांस कोणी फारसें महत्व देत नाहींत. कारण त्या डावांनीं सामनेवाला बांधला गेला तरी तो चीत होत नाहीं व त्यामुळें कुस्ती संपत नाहीं. असें असलें तरी अशाप्रकारचे डाव ऐन प्रसंगीं उपयोगीं पडण्यासारखे असल्यानें त्या डावांचे थोडे नमुने दिले आहेत. **नेस्त्या**बद्दल वर उल्लेख आलेला आहेच.

याप्रमाणें येथें दिलेली ही कुस्तीची माहिती वाचकांस अगदीं नवीन तऱ्हेची व उपयुक्त वाटेल अशी आमची समजूत आहे. पुण्याचे प्रसिद्ध कुस्तीगीर गुलाम दस्तगीर यांनीं बऱ्याच डावांचे फोटो दिले असल्यामुळें ते शास्त्रीय दृष्ट्यां बरोबर आलेले आहेत हें सांगण्याचें कारण नाहीं. ज्ञानकोशांत अनेक विषयांची माहिती यावयाची असल्यानें कुस्तीची माहिती थोडक्यांत दिली आहे. जनतारूपी जनार्दनास ही अल्पसेवा मान्य होवो अशी श्रीगजाननाचे चरणीं प्रार्थना आहे.

ह्या विषयाची ज्यांस संपूर्ण माहिती पाहिजे असेल, त्यांचेसाठीं ह्या विषयाचे स्वतंत्र ग्रंथ छापून तयार आहेत, त्यांचा उपयोग करून त्यांनीं ती मिळवावी. मात्र या विषयाची पुस्तकांत कितीहि माहिती दिलेली असली तरी जाणत्या वस्तादाची जरूर राहतेच हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.


१ भीमसेनी कुस्ती (शक्तीचे डाव).



डाव नं. १

चित्र संख्या. १-४

लंगोट्याचा निकाल-प्रकार १ ला-(डाव नं. १):-खेळणारे उजवे पवित्र्यावर समोरासमोर उभे असतांना आपण चित्र नं. १ प्रमाणें पुढें जाऊन आपले डावे हातानें त्याची कमर धरावी व आपला उजवा हात त्याचे दोन्ही पायांमधून लंगोट्याचे खालून घालावा. नंतर त्यास आपले छातीनें मागें रेटावें व दोन्हीं हातांनीं एकदम जोर करून त्यास चित्र नं. २ प्रमाणें वर उचलावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें त्याचें डोकें खालीं व पाय वर करून त्यास जमिनवर टाकून चित्र नं. ४ प्रमाणें चीत करावें.




चित्र नं. १

लंगोट्याचा निकाल–प्रकार २ रा. (डाव नं. २):– सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण आपली मान त्याचे उजवे बगलेखालीं घालून आपले उजवे हातानें त्याची कमर चित्र नं. १ प्रमाणें धरावी. नंतर आपला डावा हात त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें त्याचे दोन्ही पायांचे आंतून पुढचे बाजूनें आंत घालावा. नंतर त्यास एकदम जोरानें उचलून चित्र नं. २ प्रमाणें आपले उजवे खांद्यावर घ्यावें. नंतर एकदम पुढें वांकून त्यांस चित्र नं. ३ प्रमाणें खालीं टाकून चीत करावें.




चित्र नं. २



चित्र नं. ३

डाव नं. २

चित्र संख्या ५–७



चित्र संख्या. ८-१०

डाव नं. ३

लंगोट्याचा निकाल उलटा-(डाव नं. ३)-आपली मान समोरच्या गड्याचे उजवे हाताखालून पलीकडे न्यावी व आपला उजवा हात त्याचे पाठीवर टाकून त्याची कमर धरावी चित्र नं. १. त्याच वेळीं आपला डावा हात त्याचे दोन्ही पायांचे मधून मागचे अंगास न्यावा. व त्यास दोन्ही हातांनीं मजबूत धरावें. नंतर त्याचे पाय वर व डोकें खाली करून चित्र नं. २ प्रमाणें उचलावें व चित्र नं. ३ प्रमाणें खाली टाकून चीत करावें.




चित्र नं. १


जडजप्पा–कमर मोड–(डाव नं. ४):–उजवे पाय पुढें ठेवून खेळणारे एकमेकाचे हात चित्र नं. १ प्रमाणें धरून उभे असतात. त्यावेळीं डाव करणारानें समोरच्याचे धरलेले हात एकदम सोडून आपले हात समोरच्या गळ्याचे बगलेंतून घालून त्यास चित्र नं. २ प्रमाणें जोरानें दाबावें. याप्रमाणें करतांना पुढें सरकून समोरच्याचे जवळ जाऊन त्यास धरावें लागतें. हाताची घट्ट मिठी मारून धरल्या-नंतर आपले छातीनें त्यास मागें दाबावें व हातानें त्यास आपलेकडे ओढावें म्हणजे तो चित्र नं. ३ प्रमाणें मागें लवतो. तसेच त्यास आणखी मागें दाबलें म्हणजे तो चित्र नं. ४ प्रमाणें मागें चीत पडतो.



चित्र नं. २




चित्र नं. ३




चित्र नं. ४

डाव नं. ४ चित्र संख्या ११–१४




डाव नं. ५ चित्र संख्या १५-१६

लंगोट्याचा कोल्ह-नांगर-लाट-(डाव नं. ५)-सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें आपले पुढें ओणवा उभा असेल तर आपण आपला डावा हात त्याचे दोन्ही पायांचे मधून मागचे बाजूनें घालून त्याचे पोटाकडील चड्डी धरावी व आपला उजवा हात त्याचे पोटाखाली घालून त्यास धरावें. नंतर डावे हातानें त्यास चित्र नं. २ प्रमाणें मागून उचलून जमिनीवर टाकून चीत करावें.




डाव नं. ६ चित्र संख्या १७–१८

आरेंज–(डाव नं. ६) सामनेवाला त्याचे हात आपले बगलेचे खालून घालून आपणास धरील तर आपण आपले दोन्ही हात त्याचे हाताचे खालीं ठेवून आपले उजवे हातानें आपल्या डाव्या हाताचें मनगट घट्ट धरावे. नंतर आपल्या दोन्ही हातांनीं त्याचे दोन्ही हात कोपराचे खालून चित्र नं. १ प्रमाणें जोरानें वर दाबावे. त्याचे दोन्ही हात आपले बगलें खाली असतात ते आपल्या दोन्ही हातांनीं घट्ट दाबून ठेवावे व त्याचे हात वर जोरानें ढकलावे म्हणजे त्याचे हातास ताण लागतो. नंतर आपलें डोकें त्याचे छातीस लावून त्यास चित्र नं २ प्रमाणें वर उचलून जोरानें खाली त्याचे पाठीवर टाकून चीत करावें.




डाव नं. ७ चित्र संख्या १९–२०

मान दाबून चीत करणें–(डाव नं. ७)–सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें जमिनीवर बसला असेल तर आपण त्याचे डावे बाजूस उभे राहून आपला डावा हात त्याचे मानेवर ठेवावा व आपला उजवा हात त्याचे दोन्ही पायांचेमध्यें मागचे बाजूनें घालून त्या हातानें त्याची पोटाकडील चड्डी धरावी. नंतर आपले डावे हातानें त्याची मान जोरानें खालीं दाबून उजवे हातानें त्यास मागचे बाजूनें नं. २ प्रमाणें उचलावे. नंतर तसेंच जास्त उचलून त्यास पाठीवर टाकून चीत करावे.



डाव नं. ८ चित्र संख्या २१–२३

समोरची मोहरीची उखेड–(डाव नं. ८)–सामनेवाला आपले समोर उभा असतांना त्याचे जवळ जाऊन आपले दोन्ही हातांनीं त्याची चड्डी त्याचे दोन्ही बाजूनीं खालचे बाजूनें बोटे घालून धरावी व त्यास छातीनें दाबून चित्र नं. १ प्रमाणें वर उचलावा. नंतर तोल घेऊन आपला डावा पाय त्याचे पायावर मागचे बाजूनें चित्र नं. २ प्रमाणें मारुन त्यास आपले उजवे बाजूस ढकलावे व त्याचा तोल मागचे बाजूस गेला म्हणजे त्यास चित्र नं. ३ प्रमाणें पाठीवर खाली टाकून चीत करावे. सामनेवाल्याचे दोन्ही पाय वर ढकलले जावे म्हणून त्याचे पायांस चित्र नं. २ प्रमाणें आपले डावे पायानें जोरानें चाट मारावयाची असते म्हणजे त्यास चीत करणें सोपें जातें.




शक्तीचे डाव.

चित्र संख्या २४–२६

डाव नं. ९


घुटणा (डाव नं. ९)–चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाला जमिनीवर बसला असेल तर आपण त्याचे डावे बाजूस जावे व आपला डावा गुडघा त्याचे मानेवर ठेवून त्याची मान जोरानें खाली दाबावी. त्याचवेळीं आपले डावे हातानें त्याचे उजवे ढुंगणावरील चड्डी व उजवे हातानें त्याचे डावे ढुंगणावरील चड्डी धरावी. नंतर गुडघ्यानें त्याची मान खाली दाबावी व आपले दोन्ही हातांनीं त्यास मागील बाजूनें चड्डी धरून चित्र नं. २ प्रमाणें वर उचलावे. व त्यास चित्र नं. ३ प्रमाणें उताणा करून चीत करावें. नंतर त्याचे छातीवर आपला गुडघा ठेवून त्यास दाबून ठेवावे.



डाव नं. १०


चित्र संख्या २७–२८

मोळीचा निकाल–(डाव नं. १०)–सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचे दोन्ही हात आपले उजवे बाजूस घेऊन चित्र नं. १ प्रमाणें जोरानें धरावें. नंतर आपला डावा हात त्याचे पाठीचे बाजूनें त्याचे दोन्ही पायांचे मधून घालावा. नंतर आपले उजवे हातानें त्यास आपले छातीवर उचलावें व त्याचवेळीं डावे हातानें त्यास वर ढकलून चित्र नं. २ प्रमाणें जमिनीपासून वर करावें. नंतर त्यास उजवे हातानें आपले बाजूस ओढून जमिनीवर उताणा टाकून चीत करावे.




डाव नं. ११ चित्र संख्या २९–३१

चित्तापछाड–(डाव नं. ११)–आपण जमिनीवर बसलों असतांना सामनेवाला आपले पाठीवर असेल तर संधि साधून आपण आपले दोन्ही हातांनीं चित्र नं. १ प्रमाणें त्याची मान धरावी व दोन्ही हातांचीं बोटें एकमेकांत अडकवावी. नंतर चित्र नं. १ प्रमाणें जरा उंच होऊन त्याची मान जोरानें एकदम खालीं व पुढें ओढावी म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें आपले पुढें ओढला जातो. त्यास याप्रमाणें ओढतां यावे म्हणून आपण चित्र नं. १ प्रमाणें उंच असतो ते एकदम चित्र नं. २ प्रमाणें खालीं वाकावे. नंतर पुन्हां चित्र नं. ३ प्रमाणें बसते होऊन त्यास ताकतीनें ओढून पुढें आणावा व चीत करावा.




डाव नं. १२ चित्र संख्या ३२–३३

लंगोट्याची झोळी–(डाव नं. १२)–सामनेवाला आपले समोर जमिनीवर बसला असेल तर आपण त्याची मान आपले उजवे पायाचे मांडीनें खालीं दाबावी व आपला डावा हात त्याचे उजवे बाजूनें पोटाखालून घालून दोन्ही पायांचेमधून चित्र नं. १ प्रमाणें मागें आणावा. नंतर त्यास आपले डावे हातानें चित्र नं. २ प्रमाणें वर उचलून त्यास पाठीवर टाकून चीत करावा.




डाव नं. १३ चित्र संख्या ३४–३६

दुहेरी पट–(डाव नं. १३):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण एकदम खालीं वाकून चित्र नं. १ प्रमाणें त्याचे पुढें बसावें व आपले दोन्ही हात त्याचे पायाचे बाहेरून मागें नेऊन त्याच चित्राप्रमाणें त्याचे दोन्ही पाय गुडघ्याचे वरचे बाजूस जोरानें धरावें. आपली मान त्याचे उजवे बाजूस चित्राप्रमाणें ठेवावी. नंतर छातीचा व पायाचा नेट करून त्यास चित्र नं. २ प्रमाणें उचलून उभें रहावें. नंतर त्यास झटक्यानें फिरवून चित्र नं. ३ प्रमाणें उताणा करून खालीं आणावें व जमिनीवर टाकून चीत करावें.



डाव नं. १४ चित्र संख्या ३७–३८


उखाड–(डाव नं. १४) :—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण आपले डावे हातानें त्याची कमर धरावी व उजव्या हातानें त्याचा उजव्या हाताचा दंड चित्र नं. १ प्रमाणें धरावा. यावेळीं आपण गुडघ्यांतून जरा खालीं लवावें व नंतर एकदम गुडघे ताठ करून त्यास आपले छातीचा नेट लावून चित्र नं. २ प्रमाणें त्यास आपले डावे अंगावर उचलावें. नंतर त्याचें डोकें खालीं व पाय वर करून त्यास जमिनीवर उताणें टेऊन चीत करावें त्यास एकदम डोक्यावर जोरानें टाकलें तर त्याचे मानेस इजा होण्याची भीति असते.



डाव नं. १५ चित्र संख्या ३९–४०


छातीचा धक्का–(डाव नं. १५):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण चित्र नं. १ प्रमाणें आपले दोन्ही हात त्याचे छातीसमोर न्यावे व चित्र नं. २ प्रमाणें त्याचे छातीवर जोरानें धक्का मारून त्यास मागें उताणें पाडावें. सामनेवाला पवित्र्यावर उभा नसून सरळ उभा असेल तर त्याचा तोल लवकर जातो.

२ हनुमन्ती कुस्ती (युक्तीचे डाव.)




डाव नं. १ चित्र संख्या ४१–४२

दस्ती–(डाव नं. १):—सामनेवाला आपले पुढें उभा असेल तर त्याचा उजवा हात आपण आपले डावे हातानें धरावा व त्याचे उजवे हाताचा दंड आपले उजवे हातानें आंतले बाजूनें चित्र नं. १ प्रमाणें धरून उभें रहावें. नंतर आपले उजवे व डावे हातांनीं त्याचा हात आपले उजवे बाजूस ओढावा म्हणजे सामनेवाला आपले पुढें येतो. तो आपले पुढें आला कीं आपण आपले डावे हातानें त्याची कमर व उजवे हातानें त्याचा उजवा हात धरून चित्र नं. २ प्रमाणें उभें रहावें. या डावानें आपणास सामनेवाल्याचे पाठीवर जातां येतें. नंतर मागचे बाजूनें त्याचेवर अनेक प्रकारचे डाव करतां येतात.




डाव नं. २ चित्र संख्या ४३–४४

दस्तीची तोड–(डाव नं. २):—आपणावर सामनेवाल्यानें दस्तीचा डाव करण्याचा प्रयत्न केला तर आपला हात ओढून तो आपणास त्याचेपुढें आणणार त्याचेआधीं आपण आपले उजवे हातानें त्याचा दंड आंतलें बाजूनें चित्र नं. १ प्रमाणें धरावा व त्याचेवरच उलट दस्ती करावी. म्हणजे त्याचा उजवा हात आपण आपले उजवीकडे जोरानें ओढावा म्हणजे त्याची पाठ आपणाकडे येते. त्यानंतर लागलीच त्यास चित्र नं. २ प्रमाणें धरून उभें रहावें. यानंतर निरनिराळे डाव आपण करूं शकतों.




डाव नं. ३ चित्र संख्या ४५–४६

कोणीताल–(डाव नं. ३):—सामनेवाला त्याचा डावा हात आपले उजवे खांद्यावर ठेऊन उभा असेल तर आपण आपला डावा हात त्याचे उजवे खांद्यावर ठेऊन चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर त्याच चित्राप्रमाणें आपले उजवे हातानें त्याचे डावे हाताचा दंड खालचे बाजूनें धरावा व आपला उजवा पाय मागें असतो तो पुढें टाकावा. नंतर त्याचा डावा हात आपले उजवे हातानें एकदम जोरानें वर उचलून आपले डोक्यावरून पलीकडे आपले डावे बाजूस झोकावा म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें आपले पुढें येतो. नंतर आपले उजवे हातानें त्याची कमर धरून त्याचेमागें उभें रहावें.




डाव नं. ४ चित्र संख्या ४७–४९

दंडलोट–(डाव नं. ४):—सामनेवाला आपले उजवे खांद्यावर त्याचा डावा हात टेकून उभा असेल तर आपण आपला डावा हात त्याचे उजवे खांद्यावर ठेवावा. नंतर आपला उजवा हात कोपरांतून वाकवून तो चित्र नं. १ प्रमाणें त्याचे डावे हाताखालीं ठेवावा. नंतर त्याचा डावा हात आपले उजवे हातानें एकदम जोरानें वर उडवून आपले डोक्यावरून आपले डावे बाजूस झोकावा म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें आपले पुढें येतो. नंतर त्यानें आपणावर टांगेचा डाव करूं नये म्हणून आपण आपले कमरेस उजवीकडे झटका देऊन व आपला उजवा पाय त्याचे डावे पायाचे मागें ठेऊन त्यास पुढें झटका देऊन चित्र नं. ३ प्रमाणें खालीं आणावें व त्याची कमर व हात त्या चित्राप्रमाणें धरून उभें रहावें.




डाव नं. ५ चित्र संख्या ५०–५२

आंतली टांग–(डाव नं. ५):—सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें आपले मागें उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें धरावा व आपले उजवे पायानें त्याचे डावे पायास आंतून आपली टांग (पाय) लपेटावी. त्याचा हात आपले हातांतून निसटूं नये म्हणून त्याच्या उजव्या हाताचे मनगट आपण आपले डावे हातानें मजबूत धरावें. नंतर आपण आपला उजवा पाय एकदम मागें उडवावा व उजवा खांदा पुढें लववावा म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें वर उचलला जातो. नंतर आपला उजवा खांदा जमिनीवर टेकावा म्हणजे तो जमिनीवर उताणा पडतो. नंतर आपलें धड (शरीर) त्याचे अंगावरून पलीकडे टाकून चित्र नं. ३ प्रमाणें त्यास चीत करून दाबून ठेवावे.




डाव नं. ६ चित्र संख्या ५३–५४

आंतल्या टांगेची हूल–(डाव नं. ६):—सामनेवाला आपले मागें उभा असेल तर त्याचा डावा हात आपले डावे हातानें धरून त्यास त्या बाजूची (डावे बाजूची) टांग मारणार असे अवसान चित्र नं. १ प्रमाणें दाखवावें म्हणजे तो बचाव करण्यासाठीं आपले उजवे बाजूकडे सरकतो. त्यावेळीं आपण उजवे बाजूकडे त्याचा उजवा हात चित्र नं. २ प्रमाणें एकदम बांधावा व उजवे बाजूची आंतील टांग मारावी. याप्रमाणें त्यास फसविल्यामुळें (हूल दाखविल्यामुळें) त्याचेवर डाव करणें सोपें जातें.




डाव नं. ७ चित्र संख्या ५५–५६

आंतल्या टांगेची बंदी–(डाव नं. ७):—चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाला आपणावर आंतल्या टांगेचा डाव करणार असें वाटेल तर तो चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा हात मजबूत बांधणार त्याचे आधीं आपण एकदम जोर करून आपला उजवा हात चित्र नं. २ प्रमाणें मागें ओढून घ्यावा म्हणजे त्याचा अंदाज चुकल्यानें तो त्याच चित्राप्रमाणें पुढें खालीं येतो.




डाव नं. ८ चित्र संख्या ५७–५८

आंतल्या टांगेची रोख–(डाव नं. ८):—चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा हात त्याचे उजवे हातानें धरून तो आंतली टांग मारणार तोंच आपला तोल पुढें जाण्याचे आधीं आपण आपला डावा पाय जोरानें पुढें आणून चित्र नं. २ प्रमाणें त्याचे डावे पायाचे बाहेर आडवावा. याप्रमाणें केल्यानें त्याचे डावाची रोख होते.




डाव नं. ९ चित्र संख्या. ५९–६०

एकेरी पटाची टांग–(डाव नं. ९):––सामनेवाला आपले पुढें उभा असेल तर त्याचा पुढें असलेला उजवा पाय आपण पुढें वाकून आपले डावे हातानें धरून चित्र नं. १ प्रमाणें वर घ्यावा. नंतर आपले उजवे पायानें त्याचे डावे पायास चित्र नं. २ प्रमाणें टांग मारून चीत करावें.




डाव नं. १०　　　　चित्र संख्या ६१-६२

डगबेडी-(डाव नं. १०):--सामनेवाला आपले पुढें उभा असून तो त्याचा उजवा हात आपले पाठीवर उलटा टाकून आपणावर आंतली टांग मारण्यासाठीं त्याचा उजवा पाय आपले डावे पायांत अडकवील तर आपण आपला तोल मागें जाण्याचे आधीं आपला उजवा पाय त्याचे डावे पायाचे आंतले बाजूस चित्र नं. १ प्रमाणें ठेवावा. नंतर एकदम आपले दोन्ही पायांनीं त्याचे पाय मागें जोरानें उडवून आपण पुढें झोक टाकून आपले दोन्ही हात जमिनीवर टेकून पडावें म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें चीत पडतो.




डाव नं. ११ चित्र संख्या ६३-६४

लंगर-(डाव नं. ११):—सामनेवाला आपणा पुढें ओणवा उभा असला तर आपण त्याची कमर धरावी. नंतर एकदम कमर सोडून देऊन पुढें वाकावें व आपला डावा हात त्याचे डावे पायाचे लावणींत घालून त्याचा पाय चित्र नं. १ प्रमाणें वर उचलावा. त्याचा पाय उचलण्यास जोर मिळण्यासाठीं त्याच चित्राप्रमाणें आपले उजवे हातानें आपला डावा हात धरावा. नंतर त्याचा पाय जास्त वर उचलून आपले उजवे बाजूस फिरून त्यास चित्र नं. २ प्रमाणें उताणा पाडावा व चीत करावा.




डाव नं. १२ चित्र संख्या ६५–६६

बाळसांगडा–(डाव नं. १२):—सामनेवाला जमिनीवर पालथा असेल तर आपण त्याचा उजवा पाय उचलून आपला उजवा पाय त्याचे बाहेरचे बाजूने घालून चित्र नं. १ प्रमाणें त्याचेवर मोर्जाचूर (बाळसांगडा) डाव बांधावा. नंतर आपला डावा हात त्याचे मांडीखालून चित्र नं. २ प्रमाणें वर उचलून आपले उजवे बाजूस फिरवावा व त्यास चीत करावें. त्याचा पाय उचलल्या बरोबर आपण आपली मांडी जमिनीवर टेकून बसावें.




डाव नं. १३ चित्र संख्या ६७-६८

गोदी-(डाव नं. १३):—सामनेवाला आपले पुढें जमिनीवर बसला असेल तर आपण त्यास नेहमीप्रमाणें धरून त्याचे बाजूस बसावें. नंतर त्याचा डावा पाय जरा उभा असेल अशी संधि साधून आपला डावा हात त्याचे डावे पायाचे बाहेरून चित्र नं. १ प्रमाणें लवणींत घालून तो पाय त्याच चित्राप्रमाणें वर उचलावा. त्याचवेळीं आपण आपला उजवा हात त्याचे उजवे खांद्यावरून पलीकडे नेऊन उजवे हाताचें मनगट डावे हातानें धरावें म्हणजे तो आपले कबजांत येतो. नंतर त्याचा डावा पाय चित्र नं. २ प्रमाणें वर उचलून त्यास मागें दाबून चीत करावें.




डाव नं. १४ चित्र संख्या ६९-७०

आंतल्या टांगेची तोड १ ली-खडी लपेट-(डाव नं. १४) :--चित्र नं. १ प्रमाणें आपला डावा पाय सामनेवाला त्याचे उजवे पायानें बांधणार त्याचे आधीं आपण आपला डावा पाय उचलून मागचे बाजूनें त्याचे डावे पायाचे मागें लवणींत जोरानें चित्र नं. २ प्रमाणें मारावा व आपल्या उजव्या हातानें त्याच चित्राप्रमाणें धरून त्यास जोरानें मागें ढकलावें. या दोन्ही क्रिया एकदम झाल्या तर सामनेवाल्यास चीत करतां येतें.




डाव नं. १५ चित्र संख्या ७१–७२

आंतल्या टांगेची तोड २ री–(डाव नं. १५):—चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा हात बांधून सामनेवाला आपणावर टांगेचा डाव करणार तोंच आपण जरा त्याचे अंगापासून मागें सरावें व आपले उजवे हातानें त्याचा उजवा हात बांधून उलट त्याचे मागें नेऊन चित्र नं. २ प्रमाणें त्याचे पाठीवर चढवावा. नंतर त्यास आपले उजवीकडे झटक्यानें फिरवून चीत करावा.




डाव नं. १६ चित्र संख्या ७३–७५

बाहेरची टांग–(डाव नं. १६):—सामनेवाला आपले मागें उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले उजवे हातानें बांधावा व चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा पाय त्याचे उजवे पायाचे बाहेरचे अंगास लावावा. नंतर आपले पायानें त्यास मागें वर उचलावें व आपण चित्र नं. २ प्रमाणें पुढें वाकावें. नंतर आपला उजवा खांदा जमिनीस लावून पडावें व त्याच अवसानांत त्याचे अंगावरून पलीकडे जाऊन चित्र नं. ३ प्रमाणें त्यास चीत करून दाबून ठेवावें.



डाव नं. १७ चित्र संख्या. ७६–७८

कंबरेची ढाक–(डाव नं. १७):––सामनेवाला आपले बाजूस उभा असेल तर आपला उजवा हात त्याचे डावे हाताचे खालून त्याचे पाठीवरून नेऊन त्याची कमर धरावी व आपले डावे हातानें त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून उभें रहावें. नंतर एकदम कमरेंतून वाकून आपला उजवा पाय त्याचे पुढें टाकून त्याचे पोटाखालीं आपली पाठ येईल अशा रीतीनें जावें. नंतर ताठ होऊन आपले कमरेवर त्यास चित्र नं. २ प्रमाणें उचलावें. नंतर त्याच झोकांत त्यास चित्र नं. ३ प्रमाणें जास्त पुढें आणून जमिनीवर उताणें टाकून चीत करावें.




डाव नं. १८ चित्र संख्या ७९–८१

कलाजंग प्रकार १ ला–(डाव नं. १८):—सामनेवाला आपणापुढें उभा असेल तर आपण आपले डावे हातानें त्याच्या उजव्या हाताचा दंड आंतले बाजूनें मजबूत धरावा व आपले उजवे हातानें त्याच्या डावे हाताचें मनगट चित्र नं. १ प्रमाणें धरून उभें रहावें. नंतर एकदम पुढें वाकून आपले डावे बाजूस फिरून त्याचे उजवे हाताखालून डोकें काढून चित्र नं. २ प्रमाणें खालीं बसावें. त्याचवेळीं आपला उजवा हात त्याचे उजवे पायाचे मागून लवणीवर ठेऊन त्याचा पाय चित्र नं. २ प्रमाणें धरावा. नंतर त्याचा हात व पाय आपलेकडे ओढून त्यास आपले डोक्यावरून पुढें चित्र नं, ३ प्रमाणें जमिनीवर उताणें टाकावें व त्याचे छातीवर आपलें डोकें ठेवून त्यास दाबून ठेवावें.




डाव नं. १९ चित्र संख्या ८२–८३

कलाजंगची तोड प्रकार १ ला–(डाव नं. १९):—चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाल्यानें आपणावर कलाजंग करण्यासाठीं आपणास पाठीवर घेतलें तर आपणास तो पुढें टाकणार त्याचे आधीं आपण आपला तोल मागें टाकून आपला डावा पाय उचलून त्याचे डावे बाजूस चित्र नं. २ प्रमाणें मागून लावावा व त्यास आपले उजवे हातानें मागें दाबून चीत करावें.




डाव नं. २०   चित्र संख्या ८४–८६

कलाजंग–प्रकार २ रा–(डाव नं. २०):—चित्र नं. १ प्रमाणें आपले उजवे हातानें सामनेवाल्याचा उजवा हात धरून टांग मारण्याची तयारी करावी. याप्रमाणें केल्यास तो बचावासाठीं मागें आपले डावे बाजूस सरकतो. त्यावेळीं आपण त्याचा धरलेला हात तसाच धरून कमरेतून वाकून त्याचे पोटाखालून आपले उजवे बाजूस फिरून चित्र नं. २ प्रमाणें बसावें व आपला डावा हात त्याचे डावे पायाचे मागून घालून त्याचा तो पाय धरावा. नंतर आपले उजवे हातानें त्यास खालीं ओढून चित्र नं. ३ प्रमाणें खालीं आणावें व जमिनीवर टाकून चीत करावें.




डाव नं. २१ चित्र संख्या ८७–८९

कलाजंग–प्रकार ३ रा–(डाव नं. २१):—सामनेवाला आपल्यामागें उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले उजवे हातानें टांग मारण्यास धरतो त्याप्रमाणें धरावा. याप्रमाणें धरला म्हणजे सामनेवाला टांग लागू नये म्हणून चित्र नं. १ प्रमाणें बाजूस सरतो. त्यावेळीं आपण आपले उजवे बाजूस त्याचा हात धरलेला तसाच धरून ठेऊन त्याचे पोटाखालून चित्र नं. २ प्रमाणें फिरावें. नंतर त्याच बाजूनें जास्त फिरून चित्र नं. ३ प्रमाणें बसून त्यास वर उचलावा. याप्रमाणें फिरतांना त्याचे डावे पायाचे गुडघ्याचे लवणींत आपला डावा हात कलाजंगाप्रमाणें घालावा. नंतर उजव्या हातानें त्यास खालीं दाबून चीत करावें.




डाव नं. २२ चित्र संख्या ९०–९२

सकी–(डाव नं. २२):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर चित्र नं. १ प्रमाणें त्याचा हात दस्तीचे डावाप्रमाणें धरावा. नंतर दस्तीप्रमाणें त्याचा हात ओढून आपण पुढें सरून आपला पाय त्याचे उजवे पायाचे आंतून चित्र नं. २ प्रमाणें लावावा. त्यावेळीं त्याचा उजवा हात आपले उजवे हातानें त्याच चित्राप्रमाणें धरून ठेवावा. नंतर आपले पायानें त्याचा उजवा पाय आपलेकडे वर जोरानें ओढून त्यास हातानें मागें दाबून चित्र नं. ३ प्रमाणें चीत करावें.




डाव नं. २३ चित्र संख्या ९३–९४

सकीची हूल–(डाव नं. २३):—चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाल्याचा हात धरून आपण त्याचेवर दस्ती करून त्याचे पाठीमागें जाणार अशी हूल दाखवावी व दस्तीचा डाव न करतां चित्र नं. २ प्रमाणें सकी करून त्यास चीत करावें.




डाव नं. २४ चित्र संख्या ९५–९७

सकीची तोड–(डाव नं. २४):—चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाल्यानें आपणावर सकीचा डाव केला तर आपला तोल मागें जाण्याचे आधीं आपण आपला उजवा हात एकदम जोरानें आपले उजवे बाजूस झटका देऊन ओढावा व आपला हात सोडवून घेऊन चित्र नं. २ प्रमाणें त्याचे बाजूस जावें. आपण एकदम हात काढून घेतल्यामुळें व सामनेवाल्याचा तोल डाव करण्यासाठीं पुढें टाकलेला असल्यानें तो चित्र नं. २ प्रमाणें खालीं येतो. आपण लागलेच त्याचेवर चित्र नं. ३ प्रमाणें स्वारी बांधून त्यास चीत करावें.



डाव नं. २५ चित्र संख्या ९८–१०१

धोबीपाट-(डाव नं. २५) :—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण त्याचा हात आपले दोन्ही हातांनीं चित्र नं. १ प्रमाणें धरावा. नंतर एकदम आपले डावे बाजूस फिरून त्याचे पोटाखालीं चित्र नं. २ प्रमाणें जावें व त्याचा हात आपले उजवे खांद्यावरून पुढें आणून धरून ठेवावा. याप्रमाणें फिरतांना आपण आपले गुडघ्यांतून वाकून त्याचे पुढें जावें व खालीं बसून त्याचा हात ओढून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें पाठीवर घ्यावा. नंतर एकदम त्यास तसेच जोरानें आपलेपुढें जास्त ओढून चित्र नं. ४ प्रमाणें आणावा व जमिनीवर टाकून त्यास चीत करावें.




डाव न. २६ चित्र संख्या १०२–१०४

उलटी खाच-(डाव नं. २६):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें धरावा व आपला उजवा हात त्याचे डावे खांद्यावरून मानेवर ठेवावा. नंतर त्यास पुढें ओढावें म्हणजे तो मागें तोल टाकतो. अशावेळीं आपण एकदम पुढें वाकून आपले उजवे हातानें त्याचे डावे पायाचा मोचा आंतले बाजूनें चित्र नं. २ प्रमाणें धरावा व एकदम झटक्यानें तो पाय उचलून आपले उजवे बाजूस चित्र नं. ३ प्रमाणें वर आणावा. वरील सर्व क्रिया जलदीनें व स्फूर्तीनें झाल्या म्हणजे सामनेवाला मागें पडून चीत होतो.




डाव नं. २७ चित्र संख्या १०५–१०७

चकरीगिरा–(डाव नं. २७):—सामनेवाला आपलेसमोर उभा असेल तर आपण आपला उजवा हात त्याचे डावे बाजूनें मागें नेऊन चित्र नं. १ प्रमाणें त्याची कमर धरावी. नंतर त्याचा झोक मागें आहे अशी संधी साधून आपण आपला डावा पाय चित्र नं. २ प्रमाणें पुढें टाकून त्याचा पाय (आपला डावा हात त्याचे उजवे पायाचे आंतून घालून) त्याच चित्राप्रमाणें वर उचलावा. नंतर त्याचा पाय वर उचलीत आपण आपले उजवे बाजूकडे फिरून चक्कर घ्यावें व त्यास चित्र नं. ३ प्रमाणें चीत करावें.




डाव नं. २८ चित्र संख्या १०८–१०९

भैसा पछाड–(डाव नं. २८):—सामनेवाला जमिनीवर असेल तर आपण त्याचे बाजूस बसावें. नंतर आपला उजवा हात त्याचे उजवे हाताचे खालून बगलेंतून नेऊन त्याचे मानेवर चित्र नं. १ प्रमाणें ठेवावा. नंतर आपला डावा हात त्याचे पोटाचे खालून नेऊन त्या हातानें चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा हात धरावा. नंतर दोन्ही हातांनीं त्याची मान आपलेकडे ओढावी व आपले हातानें त्यास जमिनीवर चित्र नं. २ प्रमाणें दाबावें. नंतर तसेंच जास्त ओढून त्यास चीत करून छातीनें दाबून ठेवावें.




डाव नं. २९ चित्र संख्या ११०–११२

सीधी खोच–(डाव नं. २९):—सामनेवाला आपलेपुढें उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें धरावा. नंतर त्यास पुढें आपलेकडे ओढावा म्हणजे तो मागे तोल टाकून अडवतो. त्यावेळीं आपण एकदम पुढें वाकून आपले उजवे हातानें त्याचे पायाचा पोचा (घोट्याची वरील बाजू) आंतले बाजूनें धरून जोरानें वर तिरपा ओढून आपलेकडे उजवे बाजूस चित्र नं. २ प्रमाणें न्यावा. नंतर त्याचा तो पाय जास्त वर ओढून व त्याचा हात आपले डावीकडे ओढून आपण आपले डावीकडे फिरून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर पाडून चीत करावें.




डाव नं. ३० गिर्दबाह चित्र संख्या ११३–११६

गिर्दबाह–(डाव नं. ३०):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर त्याचा उजवा हात आपण चित्र नं. १ प्रमाणें आपले दोन्ही हातांनीं धरावा. नंतर त्याचा हात उंच करून आपण आपलें डोकें खालीं वाकवून आपले उजवीकडे त्याचे हाताखालून चित्र नं. २ प्रमाणें फिरावें. नंतर त्याचा धरलेला हात तसा उलट फिरवून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें पुढें आणावें व त्याचे कोपरावर आपलें डोक्यानें नेट लावावा म्हणजे तो आपले कबजांत येतो. नंतर आपले डावे हातानें त्याची कंबर व उजवे हातानें त्याचा उजवा दंड धरून चित्र नं. ४ प्रमाणें धरून उभें रहावें. हा डाव त्याचे पाठीवर जाण्याचा आहे. नंतर त्याचेवर एखादा डाव करून त्यास चीत करतां येते.




डाव नं. ३१ चित्र संख्या ११७-११९

अगलबंदी-(डाव नं. ३१)---सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें आपले पुढें ओणवा उभा असेल तर त्या चित्राप्रमाणेंच त्याचा हात धरून उभें रहावें. नंतर आपले डावे हातानें त्याचा डावा पाय धरून चित्र नं. २ प्रमाणें वर उचलावा. नंतर चित्र नं. २ प्रमाणें आपला उजवा पाय त्याचे उजवे पायास लावून ठेवावा. नंतर त्यास आपले उजवे हातानें वर ओढावें म्हणजे तो चित्र नं. ३ प्रमाणें जरा उताणा होतो. नंतर त्यास तसाच वर ओढून आपले डावे बाजूस फिरवून चीत करावा.




डाव नं. ३२ चित्र संख्या १२०–१२२

भुट्टा–(डाव नं. ३२):—सामनेवाला आपले समोर उभा राहून आपले दोन्ही हात चित्र नं. १ प्रमाणें त्याचे दोन्ही हातांनीं धरील तर आपण आपले उजवे हातानें त्याचा उजवा हात चित्र नं. २ प्रमाणें धरावा. नंतर आपल्या उजव्या हाताच्या अंगठ्यानें त्याचा उजवा अंगठा दाबावा व आपल्या बोटांनीं त्याचीं बोटें दाबून, त्याचा हात उलट बाहेरचे बाजूस मुरगळावा. म्हणजे त्याच्या डावे हाताची आपले उजवे हातावरील पकड सुटून तो आपले पुढें चित्र नं. ३ प्रमाणें येतो. नंतर आपले डावे हातानें त्याची कमर धरावी व उजवे हातानें त्याचे उजवे हाताचा दंड धरून उभें रहावें. हा डाव त्यास पुढें आणून आपण त्याचेमागें होण्याचा आहे. नंतर त्याचेवर डाव करून त्यास चीत करतां येतें.




डाव नं. ३३ चित्र संख्या. १२३–१२५

खडा पुस्तंग–(डाव नं. ३३):––सामनेवाला आपले पाठीमागें उभा असून आपणास त्यानें मागून धरलें असेल तर आपण आपल्या उजवे हातानें त्याचें उजवे मनगट व डावे हातानें त्याचे डावे मनगट चित्र नं. १ प्रमाणें धरावें. नंतर त्याचे हात आपले अंगापासून जरा वर पुढें उचलून आपण आपला डावा पाय त्याचे उजवे पायाचे मागचे अंगास चित्र नं. २ प्रमाणें ठेवावा. नंतर एकदम आपले डावे बाजूस फिरून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें मागें दाबावें. तसेंच जास्त मागें दाबून त्यास चीत करावें.




डाव न. ३४ चित्र संख्या १२६-१२८

समोरची बाहेरची गिरे-(डाव नं. ३४):—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण एकदम चित्र नं. १ प्रमाणें खालीं बसून त्याचे दोन्ही पट (पाय) धरावे व दुहेरी पटाचा डाव करण्याचा प्रयत्न करावा. आपण दुहेरी पटाचा डाव करणार असें वाटतांच तो आपल्या अंगावर भार टाकतो. दुहेरी पटाचा डाव होत नाहीं असें दिसतांच आपण आपला उजवा हात वर नेऊन चित्र नं. २ प्रमाणें त्याची चड्डी धरावी. नंतर एकदम झटक्यानें आपले उजवे बाजूस फिरावें म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें खालीं येतो. तसाच त्यास जास्त फिरवून चीत करावा.




डाव नं. ३५ चित्र संख्या १२९–१३१

कमंठा–(डाव नं. ३५):—सामनेवाला आपल्या बाजूस जमिनीवर चित्र नं. १ प्रमाणें असेल तर आपण आपला उजवा हात त्याचे मानेवर ठेऊन त्याचे डावे हाताचे बगले-खालीं घालावा व डावे हातानें त्याची चड्डी धरावी. नंतर त्यास आपण पलीकडे ढकलावें म्हणजे तो उलट बाजूस (म्हणजे आपलेकडे) जोर करतो. त्यावेळीं एकदम आपले हातांनीं हिसका मारून त्यास त्याचे उजवे बाजूवर चित्र नं. २ प्रमाणें करावें. लागलीच त्या चित्राप्रमाणें आपले दोन्ही पाय त्याचे पाठीस लावून त्यास पलीकडे पायानें ढकलावें व हातांनीं आपलेकडे ओढून चित्र नं. ३ प्रमाणें चीत करावें.




डाव नं. ३६ चित्र संख्या १३२–१३४

हाताची कमची–(डाव नं. ३६) :—सामनेवाला आपले पुढें जमिनीवर बसला असेल तर आपण आपला उजवा पाय त्याचे उजवे हाताचे वरून टाकून त्याचा हात आपले पायाचे लवणींत चित्र नं. १ प्रमाणें बांधावा. नंतर आपला डावा पाय त्याचे पाठीवरून चित्र नं. २ प्रमाणें पलीकडे टाकावा. नंतर आपला डावा हात त्याचे डोक्याचे पुढें जमिनीवर टेकून एकदम डंकी घेऊन आपले डावे बाजूवर पडावे म्हणजे तो चित्र नं. ३ प्रमाणें चीत होतो. या डावाची क्रिया नीट समजावी म्हणून तीन स्थित्या दाखविल्या आहेत पण डाव करतांना पाय पलीकडे टाकून चित्र नं. २ प्रमाणें उभें न राहतां एकदमच डंकी घेऊन त्यास चीत करावयाचे असतें.




डाव नं. ३७ डावांची सांखळी १ ली. चित्र संख्या १३५–१४४

डावांची साखळी १ ली–(डाव नं. ३७):—चित्र नं. १ प्रमाणें आपण सामनेवाल्यास धरून उभें रहावें. नंतर आपण त्याचेवर चित्र नं. २ प्रमाणें ढाकेचा डाव करावा. आपण ढाकेचा डाव केला कीं सामनेवाला चित्र नं. ३ प्रमाणें त्याचा उजवा पाय आपले उजवे पायावरून टाकून घोडाफलांगचा डाव आपल्यावर करण्याचा प्रयत्न करतो. त्यावेळीं आपला डावा हात त्याचे कमरेवर टाकलेला असतो तो ढिला करून एकदम आपले उजवे बाजूस झटका मारून काढून घ्यावा व चित्र नं. ४ प्रमाणें सामनेवाल्यावर (घोड फलांग करणाऱ्यावर) आपण सकी करावी. आपण सकी करणार असें दिसतांच सामनेवाला चित्र ५ प्रमाणें आपलेवर उलट सकीचा डाव करतो. याप्रमाणें तो आपणावर उलट सकी करूं लागला तर आपण त्यास त्याचे पाठीवर आपले उजवे हातानें धक्का मारून व आपले उजवे बाजूस फिरून त्याचे मागें चित्र नं. ६ प्रमाणें जावें. नंतर उभ्यानेंच त्याचेवर चित्र नं. ७ प्रमाणें आपण स्वारीचा डाव बांधावा. नंतर सामनेवाल्यानें त्याचे डावे बाजूस फिरून व उजवा हात जमिनीवर टेकून डंकी ध्यावी म्हणजे आपण चित्र नं. ८ प्रमाणें जमिनीवर येतो. याप्रमाणें आपण आल्यावर सामनेवाला आपणास चीत करूं शकेल म्हणून आपण आपला डावा पाय सामनेवाल्याचें डोक्यावरून पलीकडे नेऊन व आपले उजवे बाजूस फिरून जमिनीवर पालथे यावें. आपण जमिनीवर पालथे झाल्यानंतर सामनेवाला आपल्या उजव्या पायावर चित्र नं. ९ प्रमाणें मोजीचुराचा डाव करतो. त्यावेळी आपण आपल्या डाव्या पायानें त्यास चित्र नं. १० प्रमाणें धक्का देऊन त्याचेपासून सुटून जावे.




डाव नं. ३८ डावांची सांखळी २ री. चित्र संख्या. १४५-१४९

डावांची साखळी २ री–(डाव नं. ३८):—सामनेवाला आपल्यासमोर उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून त्याचेवर दस्तचा डाव करावा. याप्रमाणें आपण दस्ती करणार असें पाहून तो चित्र नं. २ प्रमाणें डावा हात आपले छातीवर ठेवून दस्तीची रोख करतो. दस्तीची रोख केली तर आपण त्याचे दोन्ही हात चित्र नं. ३ प्रमाणें बांधून मोळीची टांग करण्याची तयारी करावी. नंतर आपण मोळीची टांग त्यास चित्र नं. ४ प्रमाणें मारली तर तो त्याचे दोन्ही हातांनीं आपला उजवा हात चित्र नं. ४ प्रमाणें धरून आपलेवर उलट टांग करतो. आपलेवर तो टांग करणार असें दिसतांच आपण झटक्यानें आपले डावे बाजूस फिरून आपला उजवा हात चित्र नं. ५ प्रमाणें सोडवून घ्यावा व बाजूस जाऊन पुनः त्याचे समोर उभें रहावें.



डाव नं. ३९ एकामागून एक करण्याचे डाव. चित्र संख्या १५०–१६१


एकामागून एक करण्याचे डाव-(डाव नं. ३९):—सामनेवाला आपल्यासमोर उभा असेल तर आपण चित्र नं. १ प्रमाणें त्याचे उजवे बगलेखालून त्याचे पाठीवर जाण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें आपण त्याचेमागें जाऊं लागलों तर तो चित्र नं. २ प्रमाणें त्याचा पुढील उजवा पाय मागें उचलून ठेवतो व आपला डाव अडवितो. त्यावेळीं आपण एकदम त्याचे डावे बगलेखालून चित्र नं. ३ प्रमाणें त्याचे मागें जावें व नंतर आपण चित्र नं. ४ प्रमाणें त्याचेवर पुठीचा डाव करण्याचा प्रयत्न करावा. आपण चित्र नं. ४ प्रमाणें पुठी करणार तोंच सामनेवाला त्याचा डावा पाय चित्र नं. ५ प्रमाणें आपले उजवे पायाचे आंत अडवून पुठीची रोख करतो. याप्रमाणें आपला पुठीचा डाव त्यानें रोखला तर आपण आपला उजवा पाय त्याचे मागचे बाजूनें त्याचे पायावर चित्र नं. ६ प्रमाणें मारून लपेटचा डाव करून त्यास पाडण्याचा प्रयत्न करावा. याप्रमाणें आपण लपेटचा डाव करूं लागलों तर तो चित्र नं. ७ प्रमाणें एकदम पुढें वाकून जमिनीवर हात टेकतो व त्यामुळें आपला लपेटचा डाव होत नाहीं. याप्रमाणें त्यानें आपणास अडविलें तर आपण आपला डावा हात चित्र नं. ८ प्रमाणें त्याचे मानेवर टाकून त्यास आपलेकडे फिरवावें व त्याचेवर सकीचा डाव करण्याचा प्रयत्न करावा. आपला डावा पाय त्याचे डावे पायाचे आंतून घालावा व सकी करावी. याप्रमाणें आपण सकी करूं लागलों म्हणजे सामनेवाला आपणावर उलट सकीचा डाव चित्र नं. ९ प्रमाणें करून अडवितो आहे असें पाहतांच आपण आपले उजवे हातानें त्यास एकदम झटका देऊन आपण आपले उजवे बाजूस फिरावें म्हणजे सामनेवाला चित्र नं. १० प्रमाणें आपले पुढें येतो. त्यावेळीं आपण त्याचे बाजूस चित्र नं. १० प्रमाणें उभें राहून आपले उजवे हातानें त्याची चड्डी धरावी व आपला डावा पाय त्याचे डावे हाताचेपुढें ठेवावा व उभ्यानेंच त्याचेवर घिस्सा करून त्यास चीत करावें. चित्र नं. १० प्रमाणें धरल्यानंतर आपण आपले डावीकडे फिरून चित्र नं. ११ प्रमाणें जमिनीवर बसावें व त्यास उजवे हातानें ओढून चित्र नं. १२ प्रमाणें उताणा टाकावा व आपला उजवा पाय त्याचे अंगावरून पलीकडे टाकून त्यास चित्र नं. १२ प्रमाणें चीत करून दाबून ठेवावें. या डावांत त्यास शेवटीं उभा घिस्सा करून चीत केलें आहे.



डाव नं. ४० चित्र संख्या १६२–१६४


गर्दनची कमची–(डाव नं. ४०):—सामनेवाला जमिनीवर आपले पुढें बसला असेल तर आपण त्याचे बाजूस त्यास धरून बसावे. नंतर एकदम आपला उजवा पाय त्याचे मानेवर चित्र नं. १ प्रमाणें टाकावा व त्यास गळखोडा बांधण्याचा प्रयत्न करावा. गळखोडा बांधणार असें दिसतांच सामनेवाला उंच होतो त्यामुळें आपणास पायाची अढी घालतां येत नाहीं. अशा वेळीं त्याचे मागचे झोकाचा फायदा घेऊन आपण आपला डावा पाय त्याचे पाठीकडे चित्र नं. २ प्रमाणें लांब करून ठेवावा व एकदम आपले डावे अंगावर चित्र नं. ३ प्रमाणें पडावें. याप्रमाणें पडतांना आपले उजवे पायानें त्यास जोरानें मागें दाबावा म्हणजे तो चित्र नं ३ प्रमाणें चीत होतो.

३ जांबुवन्ती कुस्ती (बांधाचे डाव.)




डाव नं. १ चित्र संख्या १६५–१६६

पंजाचा आंतील भुट्टा–(डाव नं. १) :—सामनेवाला आपलेसमोर उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचे डावे हाताचीं बोटें, त्याचें बोटांत आपली बोटें घालून, धरावी. नंतर आपला डावा हात त्याचे डावे हाताचे खालून पलीकडे नेऊन त्याच्या डाव्या हाताचें मनगट आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें धरावें. म्हणजे त्याचे हातास उलट दाब येऊन तो आपले ताब्यांत येतो. नंतर आपले उजवे हातानें त्याचा डावा हात मागें दाबला म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें मागें पडतो. यावेळीं त्याचा डावा हात आपले कबजांत आल्यानें तो बांधला जातो. यावेळीं त्यानें जोर केला तर त्याचे हातास इजा होण्याची भीति असते.




डाव नं. २ चित्र संख्या १६७-१६८

उलटा हातखोडा–(डाव नं. २):—सामनेवाला आपलेसमोर उभा असेल तर चित्र नं. १ प्रमाणें आपण आपले उजवे हातानें त्याचा उजवा हात धरावा. नंतर त्यास आपलेकडे ओढून, आपले डावे हातानें त्याचा उजवा हात चित्र नं. २ प्रमाणें धरावा व आपल्या डावे हातानें आपल्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर त्याचा उजवा हात पिरगळून उताणा करावा व आपले डावे हातानें त्याचा उजवा हात कोपराचे मागून पुढें दाबावा. याप्रमाणें केल्यानें त्याचे हातास कळ लागते व तो बांधला जातो. तो जोर करील तर आपले उजवे हातानें त्याचा उजवा हात खालीं दाबावा व डावे हातानें तोच हात वर उचलावा म्हणजे तो पूर्णपणें आपले ताब्यांत येतो.




डाव नं. ३ चित्र संख्या १६९–१७०

मनगटाचा भुट्टा–(डाव नं. ३):—सामनेवाला आपलेपुढें उभा राहून आपल्या उजव्या हाताचें मनगट त्याचे डावे हातानें धरील तर आपण त्याचे डावे हाताचा पंजा आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें दाबावा व आपले डावे बाजूस फिरावे. नंतर आपला उजवा हात कोपरांतून वाकवून वर उचलून आपले डावे बाजूस न्यावा. याप्रमाणें करतांना त्याचा डावा हात मुरगळावा व त्याचे डावे हातावर कोपराचे मागचे बाजूनें आपले उजवे हाताचा दाब देऊन त्याचा हात खालीं दाबावा. याप्रमाणें त्याचा डावा हात कोपरांतून उलट दाबला गेल्यानें त्याचे हातास कळ लागते व तो चित्र नं. २ प्रमाणें बांधला जातो.




डाव नं. ४ चित्र संख्या १७१–१७२

दंडाचा भुट्टा–(डाव नं. ४):—चित्र नं. १ प्रमाणें सामनेवाल्यानें त्याचे डावे हातानें आपले उजवे हाताचा दंड धरला तर आपण त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें आपले डावे हातानें त्याचा डावा पंजा आपले दंडावर दाबावा व आपला उजवा हात कोपरांतून वाकवून वर न्यावा व त्याचे डावे हातावरून टाकावा. याप्रमाणें करतांना आपण आपले डावे बाजूस वळावे. त्याचवेळीं त्याचा डावा हात आपले डावे हातानें दंडावर दाबून धरावा व उजवे हातानें त्याचा डावा हात चित्र नं. २ प्रमाणें कोपराचे मागचे अंगानें खालीं दाबावा. याप्रमाणें केल्यानें त्याचा हात बांधला जातो. त्यानें आपले मानेवर हात ठेवला तर वरप्रमाणेंच त्याचा हात धरून **मानेचा भुट्टा** करता येतो.




डाव नं. ५ चित्र संख्या १७३-१७४

समोरचा गळबंध–(डाव नं. ५) :—सामनेवाला आपलेसमोर उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचे उजवे हाताचा आंगठा चित्र नं. १ प्रमाणें धरावा. नंतर त्याचे उजवे हातावरून आपला डावा हात टाकून त्याचा उजवा हात खालीं दाबावा. नंतर त्याचा उजवा हात आपले हातानें, आपले डावे हातावरून मागें वळवून त्याचे उजवे खांद्यावर न्यावा. याप्रमाणें करतांना आपला उजवा हात त्याचे डोक्यावरून मागचें अंगास न्यावा लागतो. नंतर आपला डावा हात त्याचे उजवे हातावर असतो त्या हातानें चित्र नं. २ प्रमाणें आपला उजवा हात धरावा. याप्रमाणें केल्यानें त्याची मान व गळा आपले हातानें बांधले जाऊन तो आपले ताब्यांत येतो. या डावांत त्याचा पकडलेला आंगठा शेवटपर्यंत धरून ठेवावयाचा असतो.



डाव नं. ६ चित्र संख्या १७५–१७६

बंगडा–(डाव नं. ६) :—सामनेवाला आपलेसमोर उभा असेल तर आपण आपला डावा हात त्याचे उजवे हाताखालून नेऊन त्याची कंबर धरावी. नंतर आपला उजवा हात त्याचे मानेवरून टाकून त्याची मान खालीं दाबावी व आपला उजवा हात त्याचे डावे हाताखालून नेऊन त्या हातानें आपल्या डाव्या हाताचें मनगट चित्र नं. १ प्रमाणें धरून बांध बांधावा. नंतर त्यास चीत करावयाचे असेल तर डाव्या हातानें त्याचा उजवा हात जोरानें दाबून त्यास आपले उजवीकडे फिरवावे म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें खालीं येतो. तसाच जास्त दाबून त्यास चीत करावे.



डाव नं. ७ चित्र संख्या १७७–१७८


बुलबुल फास-(डाव नं. ७):—सामनेवाला आपणावर उलटे पटाचा डाव करण्यास घुसून आला तर आपण आपले पट काढण्याचे आधीं त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें आपले उजवे हातानें धरावा व लागलीच आपला उजवा पाय त्याचे मानेवरून टाकून त्याचे डाबे हाताचे खालीं चित्र नं. २ प्रमाणें लावून बांध बांधावा.



डाव नं. ८

चित्र संख्या १७९–१८०


पुडी लपेट–(डाव नं. ८):—सामनेवाला आपले बाजूस बसला असेल अगर ओणवा होऊन उभा असेल तर आपण आपला डावा पाय त्याचे उजवे पायाचे आंत नेऊन एकलंगी टांगेप्रमाणें त्याचे उजवे पायास चित्र नं. १ प्रमाणें बांधावा. नंतर आपला उजवा पाय त्याचे मानेवरून टाकून त्यास चित्र नं. २ प्रमाणें बांधून बसावे. त्यास चीत करावयाचे असेल तर आपण एकदम पुढें आपले पोटावर पडावे म्हणजे तो चीत होतो.



आंतील एकेरी मोजीचूर–(डाव नं. ९):—सामनेवाला आपलेपुढें पालथा पडला असेल त्यावेळीं आपण त्याचा उजवा पाय धरून वर उचलावा व त्या पायाचेवरून आपला डावा पाय आंतले बाजूनें घालून त्याचे पायाचा पंजा आपली मांडी व पोट यांचेमध्यें दाबून त्याचे अंगावर चित्र नं. १ प्रमाणें बसावे. याप्रमाणें त्याचा पाय बांधला गेल्यानें तो आपले ताब्यांत येतो. त्याचे पायाचे पंजास आपलें वजनानें उलट जोर येत असल्यानें त्यास हालचाल करतां येत नाहीं.

डाव नं. ९–१० चित्र संख्या १८१–१८२


बाहेरचा एकेरी मोजीचूर–(डाव नं. १०):—सामनेवाला आपलेपुढें जमिनीवर पालथा निजला असेल तर आपण त्याचा उजवा पाय उचलून वर करावा व त्या पायांत आपला उजवा पाय बाहेरचे बाजूनें चित्र नं. १ प्रमाणें आंत घालावा. या वेळीं त्याच्या उजव्या पायाचें पाऊल आपली उजवी मांडी व उजवे बाजूचें शरीर याचेमध्यें राहील अशा रीतीनें त्याच चित्राप्रमाणें ठेवावें. याप्रमाणें त्याचा उजवा पाय बांधून त्या पायावर भार देऊन बसावें म्हणजे त्याचे पावलास रग लागते. यावेळीं तो बांधला गेल्यानें आपले ताब्यांत येतो.



गुडघ्याचा मोजीचूर–(डाव नं. ११):—सामनेवाला आपलेपुढें जमिनीवर पालथा पडला असेल तर आपण आपले हातानें त्याचा उजवा पाय धरून वर उचलावा व आपले डावे पायाचा गुडघा चित्र नं. १ प्रमाणें त्याचे उजवे बाजूचे मांडीचे मागचे अंगावर ठेवावा व त्याचा उचललेला पाय, आपली मांडी व पोट यांचेमध्यें दाबून ठेवावा. याप्रमाणें त्याचा पाय बांधल्यानें तो आपले ताब्यांत येतो. आपण खालीं वाकून त्याचे उजवे पायावर जोर टाकला तर त्याचें पावलावर उलट दाब येऊन तो पूर्णपणें आपले ताब्यांत येतो.


डाव नं. ११–१२ चित्र संख्या १८३–१८४

दोन पायांचा मोजीचूर–(डाव नं. १२):—समोरचा गडी आपले पुढें जमिनीवर पालथा निजला असेल तर आपण त्याचे दोन्ही पाय मागून उचलावे व त्याचे उजवे पायाचे बाहेरचे बाजूनें आपला उजवा पाय आंत घालावा व त्याचे डावे पायाचे बाहेरचे अंगानें आपला डावा पाय आंत घालावा. त्याचे दोन्ही पायांचीं पावलें आपल्या दोन्ही बाजूच्या मांड्या व पोटाचे भाग यांत दाबून धरावीं. याप्रमाणें त्याचे दोन्ही पाय बांधून बसल्यानें तो आपले ताब्यांत येतो. आपण त्याचें अंगावर खालीं वाकले तर त्याचे दोन्ही पायांचे पंजास मोच्यांतून उलट जोर आल्यानें इजा होण्याचा संभव असतो. त्याचे पायाचे मोजे बांधले जाऊन ते मोडता येतात म्हणून या डावास मोजीचूर असें नांव आहे. अर्थ न समजल्यानें त्या नांवाचा अपभ्रंश **मोतीचूर** असा झाला आहे.




डाव नं. १३ चित्र संख्या १८५-१८६

देवबंध–(डाव नं. १३):––सामनेवाला आपले बाजूस जमिनीवर बसला असेल तर आपण आपला उजवा पाय त्याचे उजवे हाताचे बाहेरून घालून आपले पायानें त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें बांधावा व आपले उजवे हातानें त्याची मान खालीं दाबावी. नंतर आपला डावा हात त्याचे डावे हाताचे बगलेखालून घालून मानेवर आणून (कस बांधावा) त्याची मान आपले डावे हातानें खालीं दाबावी. याप्रमाणें त्याचे दोन्ही हात व मान बांध-ल्यानें तो चित्र नं. २ प्रमाणें आपले ताब्यांत येतो.




डाव नं. १४ चित्र संख्या १८७–१८८

डगबेडी–(डाव नं. १४):—सामनेवाला आपले पाठीवर मागचे बाजूस उभा असेल तर आपण आपला उजवा पाय त्याचे डावे पायाचे मागून घालून चित्र नं. १ प्रमाणें पुढें आणावा व त्याचा तो पाय (गुडघ्याचे खालचा) आपले उजवे पायानें बांधावा. नंतर आपले कमरेचा हिसका उजवे बाजूस जोरानें मारून आपण चित्र नं. २ प्रमाणें जमिनीवर बसावे म्हणजे सामनेवाला आपले बाजूस जमिनीवर येतो. नंतर त्याचे डावे पायाचे मांडीवर आपला उजवा हात जोरानें टेकून बसावें. त्याचा डावा पाय आपले पायानें बांधला गेल्यानें तो आपले ताब्यांत येतो.



डाव नं. १५ चित्र संख्या १८९–१९०


कनसलाई–(डाव नं. १५):——सामनेवाला आपले बाजूस ओणवा उभा असेल तर आपण आपल्या हाताचे मनगट चित्र नं. १ प्रमाणें त्याचे मानेवर ठेऊन मान खालीं दाबावी. नंतर आपला डावा हात त्याचे उजवे बगलेचे खालून घालून बाहेर आणावा व त्या हातानें आपल्या उजव्या हाताचे मनगट त्याच चित्राप्रमाणें धरावें. याप्रमाणें त्याचा हात व मान बांधल्यानें तो आपले ताब्यांत येतो. त्यास खालीं पाडून चीत करावयाचा असेल तर आपला डावा पाय चित्र नं. १ प्रमाणें त्याचे उजवे पायाचे आंतले बाजूस टेकून ठेवावा व नंतर त्यास आपले उजवीकडे खालीं ओढावे म्हणजे तो चित्र नं. २ प्रमाणें खालीं येतो. तसाच जास्त फिरविला तर त्यास चीत करतां येते.



डाव नं. १६ चित्र संख्या १९१–१९२


खप्पा सीधा–(डाव नं. १६) :—सामनेवाला आपले बाजूस चित्र नं. १ प्रमाणें बसला असेल तर आपला उजवा हात त्याचे गळ्याखालून घालावा व त्या हातानें आपला डावा हात चित्रांत दाखविल्याप्रमाणें धरावा. याप्रमाणें त्याचा गळा बांधल्यानें तो आपले ताब्यांत येतो.

सामनेवाला आपलेपुढें पाठ करून उभा असेल तर चित्र नं. २ प्रमाणें त्याचेवर हा डाव बांधतां येतो. या दोन्ही प्रकारांत गळा दाबून [illegible] करतां येतें.



डाव नं. १७ चित्र संख्या १९३–१९४


मारुती स्वारी–(डाव नं. १७) :—सामनेवाल्यास जमिनीवर पालथा लांब करावा व नेहमीप्रमाणें त्याचे कमरेच्या दोन्ही बाजूंनीं आपले पाय घालून त्याचेवर स्वारी बांधावी. नंतर आपला उजवा हात त्याचे मानेचे डावे बाजूनें घालून त्याची मान चित्र नं. १ प्रमाणें आपले उजवे बाजूस जोरानें दाबावी. नंतर आपले उजवे हातानें त्याचे उजवे हाताचा दंड चित्र नं. २ प्रमाणें धरून त्याचा उजवा हात आपले डावे बाजूस जोरानें ओढावा. याप्रमाणें बांध बांधल्यानें तो आपले ताब्यांत येतो.



डाव नं. १८ चित्र संख्या १९५–१९६


पायाचा कस–(डाव नं. १८):—सामनेवाला आपले समोर बसला असेल तर आपले हातांनीं त्याची मान खालीं दाबावी व आपला डावा पाय त्याचे उजवे हाताखालून घालून त्याचे हातावर आपले दोन्ही पायाचा खोडा बांधावा. डाव्या पायाचा पंजा उजवे पायाचे लवणींत ठेऊन चित्र नं. १ प्रमाणें पायाचा कस (खोडा) बांधून बसावें. आपले उजवे पायाचे मांडीनें त्याची मान खालीं दाबावी. याप्रमाणें पकड बांधल्यानें तो आपले ताब्यांत येतो. नंतर आपले उजवे अंगावर चित्र नं. २ प्रमाणें बसावें म्हणजे तो तिरपा होतो. इच्छा असेल तर त्याचा डावा हात धरून त्यास चीत पण करतां येतें.

४ जरासंधी कुस्ती (नेस्तीचे डाव.)




डाव नं. १ चित्र संख्या १९७–१९८

बोटांची हातकटी–प्रकार १ ला–(डाव नं. १)—खेळणारे एकमेकांसमोर उभे राहून एकमेकांचे हात धरून ढकलाढकली करीत असतात. अशा वेळीं आपण आपल्या उजव्या हाताचीं बोटें त्याचे डावे हाताचे बोटांत घालावीं. नंतर एकदम आपलीं बोटें जमिनी-कडे खालीं वळवून त्याचीं, एक अगर दोन बोटें सरळ स्थितींत ठेवून आपले बोटांनीं धरावीं. याप्रमाणें त्याचीं बोटें सरळ व त्यावर आपलीं बोटें आडवीं करून धरलीं म्हणजे त्याचे बोटास आपलेकडे आपले बोटांनीं ओढल्यानें त्याचे बोटांवर उलट दाब येतो व त्यामुळें त्याचीं बोटें मोडतां येतात. चित्र नं.२ मध्यें त्याचीं बोटें आपलेकडे ओढून उलट दाबलेलीं दाखविलीं आहेत.



डाव नं. २ चित्र संख्या १९९-२००


बोटांची हातकटी—प्रकार २ रा-(डाव नं. २)—हा प्रकार वरच्यासारखाच आहे. वरचे प्रकारांत त्याचीं बोटें धरून, आपलीं बोटें आंतले बाजूस वाकविलीं होतीं. या प्रकारांत चित्र नं. १ प्रमाणें त्याच्या डावे हाताचीं बोटें आपले उजवे हाताचे बोटांत धरून नंतर आपलीं बोटें बाहेरचे अंगास फिरवून, त्याचे बोटांवर पकड बांधावयाची असते. चित्र नं. २ मध्यें त्याचीं बोटें बाहेरचे बाजूस दाबलेलीं दाखविलीं आहेत. त्याचीं बोटें आपलेकडे समोर जमिनीशीं समांतर ठेऊन, आपण आपलीं बोटें जमिनीकडे वाकवून त्याचे बोटांशीं काटकोण करून ठेवावयाचीं असतात. अशा रीतीनें ठेऊन, त्याचीं बोटें बाहेर मागें दाबून मोडतां येतात.




डाव नं. ३ चित्र संख्या २०१–२०२

साटा (मनगटाचा)-(डाव नं. ३)—सामनेवाला आपले समोर उभा असून त्याचे उजवे हातानें तो आपल्या डाव्या हाताचे मनगटाचे वरचे अंगास धरील तर आपण आपले उजवे हातानें त्याच्या उजवे हाताची पकड आपल्या डावे हातावर असते ती तेथेंच जोरानें दाबून धरावी. नंतर आपले दोन्ही हातांनीं जोर करून त्याचा उजवा हात वरून पिरगळून आपले उजवे बाजूस चित्र नं. १ प्रमाणें आणावा. याप्रमाणें त्याचा हात आणल्यानें तो उलटा होतो. त्यावेळीं आपले डावे हातानें चित्र नं. २ प्रमाणें त्याचे कोपरावर उलट दाब द्यावा म्हणजे तो आपलेपुढें खालीं येतो. याप्रमाणें त्याचा हात उलट धरून, कोपरास उलटें दाबल्यानें त्यास इजा होते. कोपरांतून हात मोडतां येतो.

साटा (दुहेरी)-(डाव नं. ४)—सामनेवाला त्याचे दोन्ही हात आपले दोन्ही बाजूंनीं समोरून आपले हातांखालून घालून आपणास धरलें तर आपण आपले दोन्ही हात त्याचे हाताचे बाहेरून घालून जोरानें चित्र नं. १ प्रमाणें दाबून धरावें. नंतर आपले दोन्ही हातांनीं त्याचे हात खालून वर ढकलावे म्हणजे त्याचे दोन्ही हातांचे कोपरांवर उलट जोर येतो व त्याचे हातास इजा करतां येते.



कसोटा-प्रकार १ ला-(डाव नं. ५)—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले डावे हातानें धरावा व चित्र नं. १ प्रमाणें आपले उजवे हाताचे मनगटानें त्याचे डावे बाजूचे मानेवर जोरानें मारावें. मनगटाच्या आंतले बाजूचें हाड असतें तें त्याचे मानेवर जोरानें मारावयाचें असतें. याप्रमाणें जोरानें मारल्यास त्यास चक्कर येतो.



डाव नं. ४–५ चित्र संख्या २०३–२०४

कसोटा–प्रकार २ रा–(डाव नं. ६)—सामनेवाला आपले समोर चित्र नं. १ प्रमाणें उभा असेल तर आपण आपला उजवा हात आपले डावे बाजूस न्यावा व नंतर एकदम जोरानें आपले उजवे हाताचे मनगटाचे बाहेरचे बाजूनें त्याचे उजवे बाजूचे मानेवर कसोटा मारावा. यावेळीं देखील आपल्या मनगटाचे हाडानें त्याचे मानेस तडाखा मारावा म्हणजे त्यास इजा होते.



आडवा कसोटा–(डाव नं. ७)—सामनेवाला आपले बाजूस चित्र नं. १ प्रमाणें उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचे गळ्यावर समोरचे बाजूनें त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें कसोटा मारावा. या कसोट्यास जमाल पहिलवानाचा कसोटा म्हणतात. श्रीमंत खंडेराव महाराज गायकवाड यांचें पदरीं जमाल नांवाचा पहिलवान कसोटे मारण्यांत फार प्रवीण होता.


डाव नं. ६–७ चित्र संख्या २०५–२०६

हलकूमची आडीतली–(डाव नं. ८)––सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले उजवे हातानें चित्र नं. १ प्रमाणें धरावा व त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें आपले डावे हाताचे तळीनें (तळहाताची बाहेरची बाजू) त्याचे गळ्याचे घाटीवर जोरानें प्रहार करावा.

हाताचा मोजीचूर–(डाव नं. ९)–सामनेवाला आपलेपुढें जमिनीवर पालथा लांब पडला असेल तर आपण त्याचा उजवा पाय उचलून आपले डावे हातावर चित्र नं. १ प्रमाणें ठेवून धरावा. नंतर त्याचे पायाचा मोचा (मोजा) आपले छातीचा दाब देऊन उलट दाबावा म्हणजे त्याचा पाय दुखावतो.




डाव नं. ८–९ चित्र संख्या २०७–२०८




डाव नं. १० चित्र संख्या २०९–२१०

कालफांस (डाव नं. १०)—सामनेवाला जमिनीवर आपलेपुढें चित्र नं. १ प्रमाणें बसला असेल तर आपण आपला उजवा पाय त्याचे मानेवरून टाकून व आपले डावे पायांत आपला उजवा पाय त्याच चित्राप्रमाणें घालून त्याचेवर गळखोडा (कुंदा) बांधावा. सामनेवाला जोरदार असेल तर तो आपणास घेऊन चित्र नं. २ प्रमाणें उठतो. याप्रमाणें तो उठून उभा राहिला तर आपण आपले पायानें त्याचे गळयावर दाब द्यावा व आपले उजवे हातानें त्याचा डावा पाय धरून त्यास मागें उताणें जमिनीवर पाडावें.


उलटा हातखोडा–(डाव नं. ११)—सामनेवाला आपले डावे बाजूस उभा असेल तर आपण त्याचा उजवा हात आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें उलटा करून धरावा. नंतर त्याच्या उजव्या हाताचें मनगट आपल्या उजव्या हातानें त्याच चित्राप्रमाणें धरावें. आपले डावे हातानें त्याचा उजवा हात वर ढकलावा व उजवे हातानें त्याचा उजवा हात खालीं दाबावा म्हणजे त्याचा हात कोपरांतून मोडण्याचा संभव असतो. त्याचे हातास कोपराचे मागून उलट बाजूनें दाब येत असल्यामुळें त्याचे हातास इजा होते.






डाव नं. ११–१२ चित्र संख्या २११–२१२

बाहेरचा नौंदर–(डाव नं. १२)—सामनेवाला आपलेपुढें चित्र नं. १ प्रमाणें बसला असेल तर आपण आपले डावे हातानें त्याची कंबर धरावी व उजवे हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर त्याच चित्राप्रमाणें आपलें डोकें त्याचे उजवे दंडाचे मागचे अंगास टेकून त्याचा तोच हात पुढें ढकलावा व आपले उजवे हातानें त्याचा तोच हात मागें ओढून त्याचे पाठीवर चढवावा. (चित्र नं. १) जास्त वर चढविला तर हातास इजा होते.



डाव नं. १३ चित्र संख्या २१३–२१४

आंतील दुहेरी नौंदर–(डाव नं. १३)—सामनेवाल्यास जमिनीवर पालथा लांब करावा व त्यास छातीनें खालीं दाबावें म्हणजे तो चित्र नं. १ प्रमाणें हात ताठ करून वर उठतो. त्यावेळीं आपले दोन्ही हात त्याच चित्राप्रमाणें त्याचे हातांचे आंतून घालून त्याच्या हातांचीं मनगटें धरावीं. नंतर एकदम दोन्ही हात उलटे पिरगळून त्याचे पाठीवर चित्र नं. २ प्रमाणें चढवावे. हात जास्त वर चढविले तर त्याचे हातांस इजा होते.



डाव नं. १४

चित्र संख्या २१५–२१६

दुसरे बाजूचा नौंदर–(डाव नं. १४)—सामनेवाल्यास जमिनीवर पालथा लांब करावा. नंतर त्याचे उजवे बाजूस बसून चित्र नं. १ प्रमाणें आपले उजवे हातानें त्याचा डावा हात आंतून धरावा. नंतर त्याचें डावे हाताचें मनगट आपले डावे हातानें धरावें. नंतर त्याचा तोच हात चित्र नं. २ प्रमाणें त्याचे पाठीवर उलट चढवावा. जास्त वर हात चढविला तर त्याचे हातास इजा करतां येते.


उरेब धोबीपाट (एकेरी)–(डाव नं. १५)—धोबीपाटाचे डावाप्रमाणेंच हा डाव करावयाचा आहे. पण हा डाव करतांना सामनेवाल्याचा उजवा हात मुरगळून उलटा करून नंतर आपले उजवे खांद्यावरून चित्र नं. १ प्रमाणें धरावयाचा असतो. या डावांत आपण उभ्यानेंच त्याचा हात आपले दोन्ही हातांनीं खालीं दाबला तर मोडण्याचा संभव असतो.



डाव नं.१५–१६ चित्र संख्या २१७–२१८

उरेब धोबीपाट (दुहेरी)–(डाव नं. १६—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण आपले उजवे हातानें त्याचा डावा हात धरावा व डावे हातानें त्याचा उजवा हात धरावा. याप्रमाणें हात धरतांना ते पिळून उलटे होतील असे फिरवून धरावे म्हणजे त्याच्या हातांचीं कोपरें जमिनीकडे होतील. नंतर आपण आपले डोकें खालीं वाकवून त्याचे हातांखालून आपलें डावे बाजूस फिरावें व त्याचा उजवा हात आपले डावे खांद्यावरून पुढें व डावा हात आपले उजवे खांद्यावरून चित्र नं. १ प्रमाणें पुढें आणावा. नंतर दोन्ही हात खालीं दाबून व आपण पुढें लवून त्यास आपले पाठीवरून पुढें टाकावा. यांत उभ्यानें हात दाबले तर मोडतील.

आडवा उरेब भुट्टा–(डाव नं. १७)—सामनेवाला आपले उजवे बाजूस उभा असले तर त्याचा डावा हात आपण आपले डावे हातानें आपले छातीवरून डावे बाजूस ओढून चित्र नं. १ प्रमाणें धरावा. याप्रमाणें धरतांना त्याचा हात फिरवून उलटा करावा म्हणजे त्याचें कोपर आपले छातीस टेकेल. नंतर आपला उजवा हात लांब करून त्याच चित्राप्रमाणें त्याचे मानेचे घाटीवर दाबावा. नंतर त्याचा डावा हात आपले डावे हातानें मागें उलट दाबावा व त्याची मान आपले उजवे हातानें मागें दाबावी. याप्रमाणें डाव दिला तर त्याचे हातास इजा करतां येते.




डाव नं. १७–१८ चित्र संख्या २१९–२२०

भैसा पछाड (उभ्यानें)–(डाव नं. १८)—सामनेवाला आपले बाजूस उभा असेल तर आपण आपला उजवा हात त्याचे मानेवर चित्र नं. १ प्रमाणें ठेऊन त्याची मान खालीं दाबावी. नंतर आपला डावा हात खालचे बाजूनें नेऊन आपल्या दोन्ही हातांचीं बोटें एकमेकांत आडकवावीं. नंतर त्याची मान आपले दोन्ही हातांनीं दाबून त्यास आपले उजवे बाजूस फिरवून जमिनीवर आपटावा.

॥ श्रीगजाननप्रसन्न ॥

जंबियाची कुस्ती (बाकचे हात)



उपोद्घात.

❀

जुन्या काळीं बंदुकीचे दारूचा शोध लागला नव्हता त्यावेळीं हातघाईची लढाई होत असे. अशा वेळीं तरवार, पट्टा, जंबिया वगैरे हत्यारांचा उपयोग फार होत असे व त्यामुळें फौजेंतील लोकांस हीं हत्यारें चांगल्या रीतीनें वापरण्यास शिकवीत असत. प्रत्यक्ष लढाईचे वेळीं शत्रूपासून आपला बचाव करून त्यास मारतां यावें म्हणून या हत्यारांचा उपयोग करण्याच्या विद्या अस्तित्वांत आल्या होत्या. अशा विद्या शांततेच्या वेळीं देखील सैन्यांतील लोकांस शिकवून तरबेज करून ठेवीत असत. हीं हत्यारें योग्य रीतीनें व सफाईनें वापरतां यावीं म्हणून तीं वापरण्याच्या युक्त्या शिकवीत असत व त्याच बरोबर हीं हत्यारें जोरकस रीतीनें, कौशल्यानें व तडफेनें वापरतां यावीं म्हणून हातापायांस व नजरेस एका विशिष्ट तऱ्हेचें शिक्षण देऊन ते अवयव तयार करून घेत असत. त्या त्या प्रकारच्या हत्यारांचे वार नीट करतां यावे म्हणून त्या त्या अवयवांस तयार करण्यासाठीं कांहीं प्रकारच्या हालचाली, त्या त्या विद्यांचे वस्ताद बसवीत असत. त्यास 'घाई' असें म्हणण्याचा रिवाज आहे. ढाल, तलवारीचें युद्ध करण्याची

लेखक :—



श्री. सर गं. ग. **पटवर्धन**,
राजेसाहेब, मिरज (सिनीयर),
के. सी. आय. ई.

तयारी करण्यासाठीं फरीगदक्याची योजना करून निरनिराळ्या प्रकारचे वार नीट मारतां यावे म्हणून डोळे, हात, पाय, तयार करण्यासाठीं त्या मर्दांनी खेळांत कांहीं घाई बसविलेल्या आहेत. तीच स्थिति जंबियाचे कुस्तीची आहे.

माझेकडे सुमारें ४० वर्षांपूर्वी जंबियाची कुस्ती करणारे एक उत्तम वस्ताद आले होते. त्यांचे कौशल्य पाहून मी त्यांस कांहीं दिवस आपले जवळ ठेवून घेऊन या विद्येची माहिती मिळविली होती. जंबियाची कुस्ती आम्ही अनेक तालमींतून पाहिली आहे पण तिच्या घाई आमचे पहाण्यांत आल्या नव्हत्या.


शरिराचे निरनिराळ्या मर्मांचे जागेवर जंबियाचे वार कोठें कोठें मारतां येतात याची नीट कल्पना येण्यासाठीं एका मनुष्याचें चित्र देऊन त्यावर त्या जागा दाखविल्या आहेत. नंतर निरनिराळे हात मारून ते वाचविण्यासाठीं नजरेची व हातांची तयारी करण्यासाठीं कांहीं घाई दिल्या आहेत. या घाई नीट घटविणें जरी कंटाळवाणें वाटतें तरी त्या उत्तम रीतीनें करतां आल्या तर पुढील खेळास व ऐन प्रसंगीं त्यांची फार मदत होते. याच घाई दोघांनीं उभे राहून कराव्या. नंतर निरनिराळ्या वारांच्या तोडी, बसून व उभ्यानें करण्याच्या दाखविल्या आहेत व शेवटीं निरनिराळे वार व डाव करतांना **साखळ्या** कशा तयार होतात त्यांचे थोडे नमुने दिले आहेत.

हा खेळ जंबियाचा आहे तरी त्यांत वार करणाराचा हात धरल्यानंतर त्याचेवर कुस्तींतील निरनिराळे डाव करण्याची जरूर पडते म्हणून या खेळांत देखील चांगली कुस्ती येणें जरूर असतें. या खेळांत प्रतिपक्षास चीत करावयाचें नसून त्याचा हत्याराचा हात बांधून व त्याचे हातांतील हत्यार काढून घेऊन त्यावर आपण वार करावयाचा असतो. या प्रकारची कुस्ती प्रत्येक तरुणानें अवश्य शिकावी. पूर्व तयारी असल्याशिवाय आयत्यावेळीं नुसत्या माहितीचा उपयोग होत नाहीं. खऱ्या प्रसंगीं, मरण्याचा अगर मारण्याचा प्रश्न असतो त्या वेळीं, सर्व क्रिया डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच होणें जरूर असतें. आपलेपेक्षां जास्त ताकदीच्या जवानापासून आपला बचाव करावा लागतो. म्हणून या विद्येचें पद्धतशीर ज्ञान मिळवून पूर्व तयारी केल्याशिवाय भागत नाहीं. तरी जरूर त्या प्रसंगीं आपले व आपल्या कुटुंबांतील मंडळींचें रक्षण करण्यास समर्थ करणारी ही जंबियाची कुस्ती फार महत्वाची आहे. हल्लीं लढाईचीं साधनें जरी पुष्कळ वाढलीं आहेत तरी नेहमींच व्यवहारांत कांहीं दारुगोळ्याचा उपयोग होत नाहीं. तशाप्रसंगीं हल्लींचे काळीं देखील या विद्येचा फार चांगला उपयोग होईल. म्हणून ही जुनी विद्या निरुपयोगी आहे असें कोणी समजू नये. प्रत्येक तरुणानें Be prepared **'तयार असा'** या सूत्राप्रमाणें नेहमीं तयार असलें पाहिजे.

बाकचे हातांचा नकाशा:—जंबियाचे (बाकचे) निरनिराळे वार कोणत्या मर्मस्थानीं मारतात त्याची नीट कल्पना यावी म्हणून मनुष्याचें चित्र काढून त्याचे अंगावर

नांवें दिलीं आहेत. तसेंच वार मारण्याची दिशा समजावी म्हणून चित्रावर बाणांचीं टोकें दाखविलीं आहेत. चित्राचे खालीं निरनिराळ्या वारांच्या नांवांची यादी दिली आहे.

बाकचे हाताचा नकाशा.



चित्र संख्या २२१

बाकचे हातांचा नकाशा :—वारांचीं नांवें येथें दिलीं आहेत.

(१) तमाचा (२) कंबर (३) कोठा (४) चीर (५) शीर (६) हूल (७) अंतरा

(८) पलटा (९) जानु सीधा (१०) जानु उलटा (११) रान (१२) भंडारा उलटा (१३) भंडारा सीधा (१४) पालट (१५) कडक (१६) पहिलु सीधा (१७) पहिलु उलटा (१८) हलकूम सीधा (१९) हलकूम उलटा (२०) शहारग सीधी (२१) शहारग उलटी (२२) जानवा सीधा (२३) जानवा उलटा (२४) हेमायल सीधा (२५) हेमायल उलटा (२६) मोढा सीधा (२७) मोढा उलटा (२८) हसली सीधी (२९) हसली उलटी (३०) बगल (३१) सीना (३२) बाहेरा.

सलामी :—साध्या कुस्तीप्रमाणें या कुस्तींत देखील खेळाडू वृत्ति व दिलदारपणा दाखविण्यासाठीं कुस्तीच्या सुरवातीस एकमेकांस वंदन करण्याचा रिवाज आहे. तें वंदन कशाप्रकारें करावें त्याची रीत ठरविलेली आहे. सलामीचे उभ्यानें व बसून असे दोन फोटो दिले आहेत.

(१) एकानेंच निरनिराळे वार मारणें व समोरच्यानें ते नुसतें अडविणें.

जंबियाचे कुस्तींत मुख्य गोष्ट म्हणजे वार लागण्यापूर्वी सामनेवाल्याचा हात धरणें ही असते. शरिराचे निरनिराळ्या भागांवर वार मारण्याची संवय वार मारणारानें करणें जरूर असतें व हे निरनिराळे वार लागण्यापूर्वी सामनेवाल्यानें त्याच्या हत्याराचा हात डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच धरावयाची संवय करणें फार महत्वाचें आहे. म्हणून अशा प्रकारची संवय करण्यासाठीं सुरुवातीस एकानें निरनिराळे वार मारणें व सामनेवाल्यानें ते अडविण्याची संवय करणें हें जास्त सोपें व सोईचें असल्यानें प्रथम तशा प्रकारच्या कांहीं घाई दिल्या आहेत.

(२) वार मारणाराचे वार अडवून समोरच्या गड्यानें उलट वार मारणें व ते पहिल्या वार मारणारानें अडविणें.

वर सांगितल्याप्रमाणें संवय झाल्या नंतर वार अडविणारानें उलट वार मारण्याची संवय करावी व सामनेवाल्याचे वार पहिल्या गड्यानें अडविण्याची संवय करावी. यासाठीं अशा प्रकारच्या कांहीं घाई दिल्या आहेत.

या दोन्ही प्रकारच्या घाई प्रथम बसून कराव्या व नंतर उभ्यानें याच घाई कराव्या, म्हणजे उभ्यानें वार मारण्याची व अडविण्याची संवय होते.

(३) तोडी—वार मारणाराचा हत्याराचा हात कबजांत घेऊन त्यावर वार मारणें.

वरप्रमाणें बसून व उभ्यानें घाईची संवय झाल्यानंतर वार मारणाराचा हत्याराचा हात कबजांत घेऊन त्यास वार मारण्याची संवय बसून व उभ्यानें करावी. यासाठीं अशा कांहीं घाई दिल्या आहेत. यांतील कांहीं घाई बसून व कांहीं उभ्यानें करण्याच्या दिल्या आहेत.


जंबियाचे निरनिराळे वार कोणत्या जागीं मारावयाचें तें समजण्यासाठीं प्रथम चित्र दिलें आहे. त्या प्रमाणें सर्व वार मारण्याची व अडविण्याची संवय करावी. थोड्या वारांच्या घाई नमुन्यासाठीं या पुस्तकांत दिल्या आहेत.

(४) साखळ्या (जंबियाचे कुस्तीचे डाव).

जंबियाची कुस्ती करतांना दोघे खेळणारे

एकमेकांचे वार अडवून निरनिराळे कुस्तीचे डाव, तोडी वगैरे करतात व शेवटीं एकाचें हत्यार काढून घेतलें अगर त्याचा हत्याराचा हात बांधला म्हणजे ही कुस्ती संपते. या डावांची कल्पना नीट यावी म्हणून थोड्या डावांच्या साखळ्या दिल्या आहेत. या साखळ्या अनंत होऊं शकतात.

सूचना :--चित्रांतील पट्ट्यापट्ट्याचा गंजी-फ्राक असलेला गडी वार मारणारा असून साध्या गंजीफ्राकचा गडी वार अडविणारा (प्रतिपक्षी) आहे असें समजून ह्यापुढील माहिती वाचावी.



सलामी चित्र संख्या २२२–२२३

उभ्यानें सलामी--चित्र नं. १ प्रमाणें समोरासमोर उभें राहून एक-मेकांनीं एकमेकांचे उजवें मनगट डावे हातानें धरून सलामी घ्यावी.

बसून सलामी—चित्र नं. २ प्रमाणें खेळणारांनीं एकमेकांसमोर खुरमांडी घालून (पायांचीं पावलें आंतले बाजूस मुरडून त्यांवर) बसावें. नंतर आपण सामनेवाल्याचें उजव्या हाताचें मनगट आपले डावे हातानें व आपल्या उजव्या हाताचें मनगट सामनेवाल्यानें त्याचे डावे हातानें धरून सलामी घ्यावी.

(८) पलटा (९) जानु सीधा (१०) जानु उलटा (११) रान (१२) भंडारा उलटा (१३) भंडारा सीधा (१४) पालट (१५) कडक (१६) पहिलु सीधा (१७) पहिलु उलटा (१८) हलकूम सीधा (१९) हलकूम उलटा (२०) शहारग सीधी (२१) शहारग उलटी (२२) जानवा सीधा (२३) जानवा उलटा (२४) हेमायल सीधा (२५) हेमायल उलटा (२६) मोढा सीधा (२७) मोढा उलटा (२८) हसली सीधी (२९) हसली उलटी (३०) बगल (३१) सीना (३२) बाहेरा.

सलामी :— साध्या कुस्तीप्रमाणें या कुस्तींत देखील खेळाडू वृत्ति व दिलदारपणा दाखविण्यासाठीं कुस्तीच्या सुरवातीस एकमेकांस वंदन करण्याचा रिवाज आहे. तें वंदन कशाप्रकारें करावें त्याची रीत ठरविलेली आहे. सलामीचे उभ्यानें व बसून असे दोन फोटो दिले आहेत.

(१) एकानेंच निरनिराळे वार मारणें व समोरच्यानें ते नुसतें अडविणें.

जंबियाचे कुस्तींत मुख्य गोष्ट म्हणजे वार लागण्यापूर्वीं सामनेवाल्याचा हात धरणें ही असते. शरिराचे निरनिराळ्या भागांवर वार मारण्याची संवय वार मारणारानें करणें जरूर असतें व हे निरनिराळे वार लागण्यापूर्वीं सामनेवाल्यानें त्याच्या हत्याराचा हात डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच धरावयाची संवय करणें फार महत्वाचें आहे. म्हणून अशा प्रकारची संवय करण्यासाठीं सुरुवातीस एकानें निरनिराळे वार मारणें व सामनेवाल्यानें ते अडविण्याची संवय करणें हें जास्त सोपें व सोईचें असल्यानें प्रथम तशा प्रकारच्या कांहीं घाई दिल्या आहेत.

(२) वार मारणाराचे वार अडवून समोरच्या गड्यानें उलट वार मारणें व ते पहिल्या वार मारणारानें अडविणें.

वर सांगितल्याप्रमाणें संवय झाल्या नंतर वार अडविणारानें उलट वार मारण्याची संवय करावी व सामनेवाल्याचे वार पहिल्या गड्यानें अडविण्याची संवय करावी. यासाठीं अशा प्रकारच्या कांहीं घाई दिल्या आहेत.

या दोन्ही प्रकारच्या घाई प्रथम बसून कराव्या व नंतर उभ्यानें याच घाई कराव्या, म्हणजे उभ्यानें वार मारण्याची व अडविण्याची संवय होते.

(३) तोडी—वार मारणाराचा हत्याराचा हात कबजांत घेऊन त्यावर वार मारणें.

वरप्रमाणें बसून व उभ्यानें घाईची संवय झाल्यानंतर वार मारणाराचा हत्याराचा हात कबजांत घेऊन त्यास वार मारण्याची संवय बसून व उभ्यानें करावी. यासाठीं अशा कांहीं घाई दिल्या आहेत. यांतील कांहीं घाई बसून व कांहीं उभ्यानें करण्याच्या दिल्या आहेत.


जंबियाचे निरनिराळे वार कोणत्या जागीं मारावयाचें तें समजण्यासाठीं प्रथम चित्र दिलें आहे. त्या प्रमाणें सर्व वार मारण्याची व अडविण्याची संवय करावी. थोड्या वारांच्या घाई नमुन्यासाठीं या पुस्तकांत दिल्या आहेत.

(४) साखळ्या (जंबियाचे कुस्तीचे डाव).

जंबियाची कुस्ती करतांना दोघे खेळणारे

एकमेकांचे वार अडवून निरनिराळे कुस्तीचे डाव, तोडी वगैरे करतात व शेवटीं एकाचें हत्यार काढून घेतलें अगर त्याचा हत्याराचा हात बांधला म्हणजे ही कुस्ती संपते. या डावांची कल्पना नीट यावी म्हणून थोड्या डावांच्या साखळया दिल्या आहेत. या साखळ्या अनंत होऊं शकतात.

सूचना :--चित्रांतील पट्यापट्टयाचा गंजी-फ्राक असलेला गडी वार मारणारा असून साध्या गंजीफ्राकचा गडी वार अडविणारा (प्रतिपक्षी) आहे असें समजून ह्यापुढील माहिती वाचावी.




सलामी चित्र संख्या २२२–२२३

उभ्यानें सलामी--चित्र नं. १ प्रमाणें समोरासमोर उभें राहून एक-मेकांनीं एकमेकांचे उजवें मनगट डावे हातानें धरून सलामी घ्यावी.

बसून सलामी—चित्र नं. २ प्रमाणें खेळणारांनीं एकमेकांसमोर खुरमांडी घालून (पायांचीं पावलें आंतले बाजूस मुरडून त्यांवर) बसावें. नंतर आपण सामनेवाल्याचें उजव्या हाताचें मनगट आपले डावे हातानें व आपल्या उजव्या हाताचें मनगट सामनेवाल्यानें त्याचे डावे हातानें धरून सलामी घ्यावी.


१ एकानें वार मारणें व दुसऱ्यानें अडविणें.



डाव नं. १

चित्र संख्या २२४–२२५–२२६


पलटा–(डाव नं. १)—चित्र नं. १ प्रमाणें अवसानांत हात मागें घेऊन चित्र नं. २ प्रमाणें प्रतिस्पर्ध्याचे डावे छातीचे वरील भागांत जोरानें जंबियाचा वार करावा. वार लागण्यापूर्वीं वार करणाराचें उजवें मनगट सामनेवाल्यानें आपले डावे हातानें चित्र नं. ३ प्रमाणें मागें दाबून आपला बचाव करावा.



चित्र संख्या २२७–२२८–२२९

डाव नं. २


जानू (सीधा)-(डाव नं. २)––पलट्याचा वार अडविला असतां आपण आपला हात चित्र नं. १ प्रमाणें हिसक्यानें जोरांत मागें घेऊन चित्र नं. २ प्रमाणें प्रतिस्पर्ध्याचे डावे गुडघ्यावर जोरानें वार करावा. वार लागण्यापूर्वी सामनेवाल्यानें वार करणाराचें उजवें मनगट आपले डावे हातानें आपले डावीकडे दाबून चित्र नं. ३ प्रमाणें आपला बचाव करावा.



डाव नं. ३

चित्र संख्या २३०–२३१–२३२


जानू (उलटा)–(डाव नं. ३)—जानूचा वार अडविला असतां चित्र नं. १ प्रमाणें आपण आपला उजवा हात अवसानानें मागें घेऊन चित्र नं. १ प्रमाणें उजवीकडून डावीकडे डोक्यावरून फिरवून प्रतिस्पर्ध्याचे उजवे गुडघ्यावर चित्र नं. २ प्रमाणें वार करावा. वार लागण्यापूर्वी सामनेवाल्यानें वार करणाराचें उजवें मनगट आपले डावे हातानें आपले उजवीकडे मागें रेटून चित्र नं. ३ प्रमाणें आपला बचाव करावा.



डाव नं. ४ चित्र संख्या २३३–२३४–२३५


रान–(डाव नं. ४)—उलट्या जानूचा वार अडविला असतां चित्र नं. १ प्रमाणें आपला उजवा हात डोक्यावरून उजवीकडे फिरवून चित्र नं. २ प्रमाणें प्रतिस्पर्ध्याचे मांडीचे वरील भागास वार करावा. वार लागण्यापूर्वी सामनेवाल्यानें चित्र नं. ३ प्रमाणें वार करणाराचें उजवें मनगट आपल्या डाव्या हातानें जोरानें वर उचलून बाहेरचे अंगास दाबावें व आपला बचाव करावा.


२ सामनेवाल्याचा वार अडवून त्याचेवर वार करणें.



डाव नं. १ चित्र संख्या २३६–२३७


तमाचा व बाहेरा–(डाव नं. १)––चित्र नं. १ प्रमाणें वार करणारा तमाचा मारीत असेल तर प्रतिस्पर्ध्यानें आपल्या डावे हातानें चित्र नं. २ प्रमाणें त्याचा हात तटवून आपण त्याचेवर बाहेऱ्याचा वार करावा.






डाव नं. २ चित्र संख्या २३८–२३९

कमर व सीना–(डाव नं. २)––प्रतिपक्षी बाहेरा मारीत असेल तर आपण चित्र नं. १ प्रमाणें त्याचा बाहेऱ्याचा हात तटवून आपल्या उजव्या हातानें त्याचे कमरेवर वार करावा. याप्रमाणें केलेला वार सामनेवाल्यानें चित्र नं. २ प्रमाणें अडवून प्रतिस्पर्ध्याचे छातीवर सीन्याचा वार करावा.




डाव नं. ३ चित्र संख्या २४०–२४१

कोठा व बगल–(डाव नं. ३)—सीना मारलेला हात चित्र नं. १ प्रमाणें वार करणारानें आपले डावे हातानें अडवून आपल्या उजव्या हातांतील हत्यारानें प्रतिस्पर्ध्याचे डावे कोठ्यावर वार करावा चित्र नं. २ ह्याप्रमाणें मारलेला कोठ्याचा हात सामनेवाल्यानें अडवून वार करणाराचे बगलेंत वार करावा.



डाव नं. ४ चित्र संख्या २४२–२४३


चीर व उलटी हसळी–(डाव नं. ४)—बगल मारलेला सामनेवाल्याचा हात चित्र नं. १ प्रमाणें अडवून सामनेवाल्यावर त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें चीरचा वार करावा. सामनेवाल्यानें चित्र नं. २ प्रमाणें चीरचा वार अडवून वार करणारावर उलट्या हसळीचा वार करावा.



डाव नं. ९ चित्र संख्या २४४-२४५

शीर व सीधी हसळी–(डाव नं. ९)—उलट्या हसळीचा सामनेवाल्याचा वार चित्र नं. १ प्रमाणें अडवून वार करणारानें त्याचेवर त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें शीरचा वार करावा. वार करणाराचा शीरचा हात सामनेवाल्यानें चित्र नं. २ प्रमाणें बाजूस करून त्याचेवर त्याच चित्राप्रमाणें साध्या हसळीचा वार करावा.


३ तोडी.



चित्र संख्या २४६–२४७–२४८

तोड नं. १


तमाचाची तोड–(तोड नं. १)—वार मारणारानें सामनेवाल्यावर तमाचाचा वार मारला तर सामनेवाल्यानें त्याचा जंबियाचा हात धरून मुरगळावा व आपल्या डावीकडे चित्र नं. १ प्रमाणें जमिनीवर दाबून ठेवावा. नंतर चित्र नं. २ प्रमाणें दाबलेल्या हातावर आपला डावा गुडघा ठेवून चित्र नं. ३ प्रमाणें आपल्या छातीनें त्याचे दंडावर दाब देऊन त्याचे मर्मस्थानीं त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें वार करावा.



तोड नं. २

चित्र संख्या २४९–२५०


कमरेची तोड–(तोड नं. २)—वार करणारानें सामनेवाल्यावर कमरेचा वार मारला तर त्यानें आपले डावे हातानें त्याचें उजवे हाताचें मनगट धरून तो हात चित्र नं. १ प्रमाणें मागें ढकलावा व त्याचे बरगडींत चित्र नं. २ प्रमाणें वार मारावा.



तोड नं. ३ चित्र संख्या २५१–२५२

चीरची तोड–(तोड नं. ४)—वार मारणारानें आपलेवर चीरचा वार मारला तर आपण त्याचा उजवा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून उलट मुरगळावा व चित्र नं. २ प्रमाणें त्याचेवर जानव्याचा हात मारावा.

४ साखळी.



साखळी नं. १

चित्र संख्या २५३–२५६


तमाचाची साखळी–(साखळी नं. १)—वार करणारानें सामनेवाल्यावर तमाचाचा वार मारला तर सामनेवाल्यानें त्याचा हत्याराचा हात चित्र नं. १ प्रमाणें उलट मुरगळावा व त्याचेवर त्याच चित्राप्रमाणें बाहेऱ्याचा हात मारावा. तमाचाचा वार मारणारानें आपले डावे हातानें सामनेवाल्याचा उजवा हात त्याच चित्राप्रमाणें धरून चित्र नं. २ प्रमाणें त्यास मोळीची बाहेरली टांग मारावी व त्यास चित्र नं. ३ प्रमाणें खालीं जमिनीवर पाडावें. नंतर बाहेरा मारणारानें टांग मारणाराचे डावे पायाचे गुडघ्याचे बाहेरील डोळ्यावर आपले डावे पायाचे पंजाचा दाब देऊन व आपले उजवे पायानें त्याचे डावे पायास आकडीप्रमाणें बांधून चित्र नं. ४ प्रमाणें तमाचा मारणाराचा हत्याराचा हात आपले डावे हातानें पिरगळून त्याचें हत्यार काढून घ्यावें.



साखळी नं. २

चित्र संख्या २५७–२६०


कमरेची साखळी–(साखळी नं. २)—वार मारणारा आपणांवर कमरेचा वार मारील तर आपण आपल्या डाव्या हातानें त्याचें मनगट चित्र नं. १ प्रमाणें बाहेर मुरगळून त्याचे कोपरावर वार मारावा. हा वार लागण्याचे आधीं कमर मारणारानें सामनेवाल्याचा हात धरून त्याचेवर चित्र नं. २ प्रमाणें सकीचा डाव करावा. सकीचा डाव पुरा होण्याचे आधीं सामनेवाल्यानें चित्र नं. ३ प्रमाणें वार मारणारावर धोबी पाट करावा. धोबी पाट पुरा होण्यापूर्वीं सकी करणारानें सामनेवाल्यास खप्पा बांधून चित्र नं. ४ प्रमाणें त्याचा हात मुरगळून हत्यार काढून घ्यावें.



साखळी नं. ३

चित्र संख्या २६१–२६५

चीरची साखळी–(साखळी नं. ३)—वार करणारानें आपल्यावर चीरचा वार मारला तर आपण त्याचा हत्याराचा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून त्यास मागें ढकलावें व त्याचे हातावर त्या चित्राप्रमाणें हातकडी बांधावी. नंतर चित्र नं. २ प्रमाणें त्याचेवर सकीचा डाव करावा. सामनेवाल्यानें सकीचा डाव केला तर चीर मारणारानें चित्र नं. ३ प्रमाणें त्याचेवर स्वारी बांधावी. चीर मारणारा स्वारी बांधूं लागला तर सामनेवाल्यानें चित्र नं. ४ प्रमाणें त्यास बाहेरील टांग मारून चित्र नं. ५ प्रमाणें चीत करावें. नंतर त्याचा हत्याराचा हात मुरगळून हत्यार काढून घ्यावें.



साखळी नं. ४

चित्र संख्या २६६-२७०

शीरची साखळी–(साखळी नं. ४)––वार करणारानें आपल्यावर शीरचा वार केला तर आपण त्याचा हत्याराचा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून मागें ढकलावा व त्याचेवर बगलचा वार मारावा. वार करणारानें सामनेवाल्याचा हात चित्र नं. १ प्रमाणें धरून बगलचा वार अडवावा व तोच हात मुरगळून त्यास चित्र नं. २ प्रमाणें जमिनीवर आणावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें नमाजबंद बांधावा. नमाजबंद बांधतांना सामनेवाल्यानें धड मारून वार मारणारास चित्र नं. ४ प्रमाणें खालीं आणावें व चित्र नं. ५ प्रमाणें त्याचेवर बाळसांगडा बांधून त्याचे हत्यार काढून घ्यावें.



साखळी नं. ५

चित्र संख्या २७१–२७३

उलट्या मोळ्याची साखळी-(साखळी नं. ५)—वार मारणारानें आपल्यावर उलट्या मोळ्याचा वार केला तर आपण त्याचा हत्याराचा हात चित्र नं. १ प्रमाणें उजव्या हातानें धरून मुरगळावा व चित्र नं. २ प्रमाणें त्याचे पाठीवर जावें.सामनेवाला पाठीवर जातांच वार मारणारानें त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें त्याचा डावा हात मुरगळून त्याचे समोर यावें. नतर चित्र नं. ३ प्रमाणें वार मारणारा समोर निघाला तरी सामनेवाल्यानें त्याच चित्राप्रमाणें त्याचा हात मुरगळून हत्यार काढून घ्यावें.

ह्या डावांत सामनेवाल्याच्या हातांत जंबिया नसला तरी त्यानें वार मारणारापासून आपला बचाव कसा करावा तें दाखविलें आहे.

॥ श्रीगजाननप्रसन्न ॥

विनोट



उपोद्घात.

विनोटची विद्या हिंदुस्थानांत फार जुन्या वेळेपासून अस्तित्वांत आहे. जुन्या धामधुमीचे वेळीं या विद्येचा स्वसंरक्षणाकडे फार चांगला उपयोग होत होता. या विद्येंत निष्णात असलेलीं अनेक थोर माणसें पूर्वीं होतीं व वर्तमानकालीं देखील क्वचित् कोठें असतील. तरी पण सध्यां या विद्येचें नुसतें नांव शिल्लक राहिलें असून ही विद्या खरोखरी काय आहे याबद्दलची बरोबर कल्पना देखील फार थोड्यांस राहिली आहे. क्वचित् कोणी ही विद्या माहीत आहे असें म्हणतात. पण ते ही विद्या दुसऱ्यास चांगल्या रीतीनें दाखवूं शकत नाहींत अगर दाखवीत नाहींत. अशी स्थिति असल्या-मुळें ही विद्या म्हणजे कांहीं तरी जादू आहे अशी पुष्कळांची भ्रामक समजूत झालेली आहे अथवा याबद्दलच्या अति-शयोक्तीच्या कल्पना पसरलेल्या आहेत. तेव्हां याबद्दलची माहिती माझ्या देशबांधवांचे पुढें खुल्या मनानें मांडावी म्हणून हा अल्प प्रयत्न केला आहे.

लेखक :—



श्री. सर गं. ग. **पटवर्धन**,
राजेसाहेब, मिरज (सिनीयर),
के. सी. आय. ई.


विनोट हा हिंदी शब्द असून 'विन+ओट=नाहीं आड' असा याचा सरळ अर्थ आहे. शरिराचें रक्षण करण्यासाठीं आड धरण्यास कांहीं नाहीं अशा वेळीं हिमतीनें व युक्तीनें

स्वतःचा बचाव करण्याचें जें शास्त्र त्यास **बिनोट** असें नांव पडलें आहे. आपले शत्रूचे हातीं सुरी, तरवार, पिस्तूल वगैरेसारखें मारक शस्त्र असून आपले हातांत ढाल, काठी वगैरे कांहीं साधन नाहीं अशा स्थितींत समयसूचकता वापरून स्वतःचा बचाव करण्याचे विद्येस **बिनोट** म्हणतात. या विद्येच्या सहाय्यानें पूर्वींच्या काळीं कांहीं वस्ताद मंडळींनीं शत्रूंपासून आपला बचाव करून घेतला अशा हकीकती परंपरेनें आपले ऐकण्यांत आलेल्या आहेत व त्या खऱ्याहि आहेत. पण आमचे या बाबतींत असें मत आहे कीं ही विद्या खोटी नाहीं. अमुक मनुष्य बिनोट चांगली जाणतो याबद्दलची खरी परीक्षा एखाद्या प्रसंगीं त्याचे हातून या विद्येचा उपयोग होतो तेव्हांच पटतें. साधारण कुस्ती अगर फरीगदक्याची सूट खेळतांना एकच मनुष्य आपला सामनेवाला असतो, त्याचे हातांत प्राणघातक शस्त्र नसतें, अशा स्थितींत देखील त्याचेपासून आपला बचाव करणें जर कठीण जातें. तर मग खरोखरीच आपला शत्रू हातांत शस्त्र घेऊन आपणास मारण्यासाठीं येईल तेव्हां प्रसंगावधान ठेऊन व त्याचेपासून आपला बचाव करतां येऊन त्यास नामोहरम करणें म्हणजे किती तरी कठीण काम आहे. तेव्हां ही विद्या शिकून देखील शिकणारानें मी अमुक करीन असा अभिमान बाळगणें बरोबर होणार नाहीं. श्री छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं अफजुलखानाचे भेटीचे वेळीं बिनोटप्रमाणेंच कांहीं करामत करून स्वतःचा बचाव केला व त्यास ठार मारलें ही गोष्ट अगदीं सत्य आहे. पण अशा प्रकारचें धैर्य व प्रसंगावधान किती माणसें दाखवूं शकतील ?

ह्या पुस्तकांत सांगितलेले अगर अशाच प्रकारचे इतर डाव नीट समजून घेऊन त्यांचा एकनिष्ठेनें अभ्यास करणें जरूर आहे. शिवाय डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच बिनोटच्या क्रिया होणें जरूर असतें, नाहीं तर प्राणांस मुकण्याची वेळ यावयाची ! अशी स्थिति असल्यामुळें ही बिकट विद्या साध्य करण्याचें काम मोठ्या चिकाटीनें व लक्षपूर्वक केलें पाहिजे. ह्यांतील पुष्कळशा डावांत सामनेवाल्याचा शस्त्र धरणारा हात एकदम धरून उलट मुरगळावा लागतो. अशा वेळीं मोठ्या स्फूर्तीची जरूर असते.

बिनोटचे विद्येंत प्रसंगावधानाची विशेष जरूर असतें. मनुष्य स्वभावाचा विचार करून काम केलें तर आपला बचाव उत्तम तऱ्हेनें करतां येतो.


बिनोटचे डाव.



डाव नं. १

चित्र संख्या २७४-२७९


तमाचाचा वार–(डाव नं. १)—प्रतिस्पर्धी आपले अंगावर चित्र नं. १ प्रमाणें तरवार घेऊन चालून आला आणि त्यानें आपल्यावर तमाचाचा वार करण्यासाठीं त्याचा उजवा हात वर उगारला तर त्या वेळेस तो ज्या पवित्र्यावर उभा असेल तोच पवित्रा पुढें टेकून आपण त्याची नजर रोखून उभें रहावें. नंतर चित्र नं. २ प्रमाणें प्रतिस्पर्धी त्याचा उजवा पाय पुढें टाकून आल्यावर तमाचाचा वार करणार तोंच आपण स्वतः उजवा पाय पुढें टाकून डूब घ्यावी व आपले डावे पायाचा गुडघा जमिनीवर टेकावा आणि उजव्या पायाचा गुडघा उभा ठेवावा. त्याचा तरवारीचा हात खालीं येणार त्याचे आधीं आपला डावा हात उंच करून त्या हातानें त्याच्या तरवार धरलेल्या हाताचें मनगट अधांतरीं वरचेवर धरावें. अशा रीतीनें त्याचा हात धरतांना आपला अंगठा आंतील बाजूस व बोटें बाहेरचे बाजूस ठेवावीं. याप्रमाणें प्रतिस्पर्ध्याचें मनगट धरल्यानंतर आपल्या उजव्या हातानें त्याचा उजवा हात धरावा व त्याच अवसानांत त्याच्या उजव्या हाताखालून चित्र नं. ३ प्रमाणें फिरून उजवीकडे चित्र नं. ४ प्रमाणें बाहेर निघावें व त्याचा हात धरून उभें रहावें. नंतर त्याच्या उजव्या पाउलावर आपल्या डाव्या पायाचा पंजा चित्र नं. ४ प्रमाणें ठेवून तो पाय जोरानें दाबावा व धरलेला हात उलटा पिळून त्यास त्याच चित्राप्रमाणें पुढें दाबावें. नंतर आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें कोपर धरून तें उलट खालीं दाबावें. त्याच वेळीं उजव्या हातानें त्याचे हातास वर झटका देऊन व शक्य तितक्या जोरानें आपल्या दोन्ही हातांनीं त्यास स्वतःच्या उजव्या बाजूस ओढून चित्र नं. ५ प्रमाणें खालीं पाडावें. नंतर चित्र नं. ६ प्रमाणें आपल्या डावे पायाचा गुडघा त्याचे दंडावर ठेवून डाव्या हातानें त्याचे उजव्या हाताचें मनगट धरावें व आपल्या उजव्या हातानें त्याच्या तरवारीची मूठ पिळून तरवार काढून घ्यावी व त्याचेवर मारण्यास उगारावी.



डाव नं. २

चित्र संख्या २८०–२८३


शीरचा वार–(डाव नं. २)—प्रतिस्पर्ध्यानें लाठी घेऊन शीरचा हात मारण्यासाठीं त्याचे दोन्ही हात उंच केले तर त्यानें जो पवित्रा पुढें ठेविला असेल तो पवित्रा आपण पुढें ठेवून चित्र नं. १ प्रमाणें उभें राहावें. त्यानें शीरचा वार करतांच आपण स्फूर्तीनें पुढें जावें व उजवा पाय पुढें टाकून आणि डाव्या पायाचा गुडघा जमिनीवर टेकून चित्र नं. २ प्रमाणें बैठक घ्यावी. त्याची लाठी खालीं येणार त्याचे आधीं स्फूर्तीनें प्रतिस्पर्ध्याचे दोन्ही हात त्या चित्राप्रमाणें धरावें, आपल्या उजव्या हातानें त्याचा उजवा हात व डाव्या हातानें त्याचा डावा हात धरावा. नंतर उजवा पाय पुढें टाकून कलाजंगाच्या डावाप्रमाणें फिरून चित्र नं. ३ प्रमाणें उभें रहावें. यावेळीं उजव्या हातानें उजवा हात उजवीकडे वर पिळावा व डाव्या हातानें डावा हात डावीकडे खालीं पिळावा आणि चित्र नं. ३ प्रमाणें आपण आपली पाठ शक्य तितकी त्याचे पोटाला लावून ठेवावी. नंतर दोन्ही हातांनीं त्याचे दोन्ही हात उलटे पिळून चित्र नं. ४ प्रमाणें लाठी सोडवून घ्यावी.



डाव नं. ३

चित्र संख्या २८४–२८७


बगलचा वार–(डाव नं. ३)—सामनेवाला आपल्या बगलेवर जंबियाचा वार करणार असें दिसलें तर आपण त्याचेसमोर त्याचे नजरेस नजर रोखून चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर त्याचा जंबियाचा हात वार मारण्यासाठीं पुढें येणार तोंच पवित्र्यावर स्फूर्तीनें पुढें सरकून त्याच्या उजव्या हाताचें मनगट आपल्या डावे हातानें धरावें व त्याच अवसानांत चित्र नं. २ प्रमाणें दोन्ही गुडघे जमिनीवर टेकून त्याचे हाताखालीं बसावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें डाव्या पायाचा गुडघा उंच करून आपल्या उजव्या हातानें त्याच्या उजव्या हाताची मूठ धरावी व दोन्ही हातांनीं त्याची मूठ उलटी पिरगळून चित्र नं. ४ प्रमाणें उभें राहावें. नंतर त्याच्या हातांतील जंबिया काढून घ्यावा.



डाव नं. ४

चित्र संख्या २८८–२९१


पाठीवरचा वार-(डाव नं. ४)—आपण पाठमोरे उभें असतांना प्रतिस्पर्ध्यानें मागून येऊन चित्र नं. १ प्रमाणें आपल्यावर एकदम तरवारीचा वार करण्याची तयारी केली तर आपण आपला मागें असलेला डावा पाय उजवीकडे पुढें टाकून थोडेसें मागें त्याच्याकडे तोंड फिरवून उभें रहावें. वार आपल्या अंगावर येत आहे असे दिसतांच एकदम बसून बाजूस सरकून वार चुकवावा व जमिनीवर बैठक घ्यावी. नंतर उजवा हात लांब करून चित्र न. २ प्रमाणें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर त्याचे मनगट उलट बाजूस पिरगळावें व डाव्या हातानें त्याचें कोपर धरून आपल्या डाव्या हाताच्या तळव्यानें त्याचा उजवा हात चित्र नं. ३ प्रमाणें कोपरा पासून वर ढकलावा व मागचा उजवा पाय पुढें टाकावा. नंतर आपल्या उजव्या हातानें त्याचा उजवा हात खाली मागचे बाजूस पिरगळून चित्र नं. ४ प्रमाणें पाठीवर चढवावा व त्याच्या हातांतील तरवार काढून घ्यावी.



डाव नं. ५

चित्र संख्या २९२–२९६


हसळीचा वार–(डाव नं. ५)—प्रतिस्पर्धी एकदम अंगावर चालून आला व त्यानें आपल्यावर जंबियानें हासळीचा वार करण्यासाठीं त्याचा उजवा हात उगारला तर त्याच्या नजरेस नजर मिळवून आपण त्याच्या समोर सम पवित्र्यावर चित्र नं.१ प्रमाणें उभें रहावें. त्यानें उजवा पाय पुढें टाकून वार केला तर त्याचा वार आपणावर पुरा येण्यापूर्वी आपण एकदम पुढें सरकून दोन्ही गुडघे जमिनीवर टेकावे व त्याच्या हाताच्या खालीं जमिनीवर बसावें व चित्र नं. २ प्रमाणें आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर उभें राहून त्याची जंबिया धरलेली मूठ धरावी व चित्र नं. ३ प्रमाणें त्याचा उजवा हात उलटा पिळावा म्हणजे तो चित्र नं. ४ प्रमाणें खालीं वांकतो. लागलींच आपला उजवा पाय त्याच्या उजव्या दंडावरून त्याच्या पोटाखालीं नेऊन त्या पायाचा पंजा त्याच्या उजव्या पायांत आंतून अडकवावा. नंतर चित्र नं. ५ प्रमाणें त्याचा हात पिळून पाठीवर चढवून जंबिया सोडवून घ्यावा.



डाव नं. ६

चित्र संख्या २९७–३००

जनोईचा वार–(डाव नं. ६)—प्रतिस्पर्धी तरवारीनें जनोईचा वार करण्याकरितां आपल्या अंगावर आला तर आपण चित्र नं. १ प्रमाणें त्याचे नजरेस नजर रोखून उभें राहावें. त्याचा वार आपल्या अंगावर येत आहे असे दिसतांच मागें असलेला आपला उजवा पाय पुढें टाकून डुबून त्याचे हाताखालीं जावें व चित्र नं. २ प्रमाणें डाव्या गुडघ्यावर बैठक घेऊन उजवा पाय उभा ठेवावा आणि उजव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर उजव्या हातानें त्याचा उजवा हात पिळून आपण उभें रहावें व आपला डावा हात त्याच्या दंडावर ठेवून चित्र नं. ३ प्रमाणें त्याचा उजवा हात खालीं जमिनीवर दाबावा. नंतर आपला डावा पाय त्याचे उजवे हातावरून टाकून व तो हात आपले उजवे मांडीवर घेऊन चित्र नं. ४ प्रमाणें जमिनीवर बसावें. नंतर दोन्ही हातांनीं त्याचा उजवा हात उलट पिळून तरवार काढून घ्यावी.



डाव नं. ७

चित्र संख्या ३०१–३०५


भाल्याची हूल-(डाव नं. ७)—प्रतिस्पर्धी चित्र नं. १ प्रमाणें आपणास भाल्यानें हूल मारूं लागला तर आपण प्रथम डावा पवित्रा मागें उजवीकडे काढून व उजवा पाय पुढें टाकून भाल्याची खोंच चुकवून बाजूस व्हावें व डावे हातानें त्याचा भाला चित्र नं. २ प्रमाणें धरून शक्य तितका पलीकडे व खालीं ढकलावा. नंतर पुढें जाऊन चित्र नं. ३ प्रमाणें आपले उजवे हातानें त्याची मान धरावी व तोच हात त्याचे तोंडापुढें आणून त्याची हनुवटी जोरानें बाजूस ओढावी. त्याच अवसनांत चित्र नं. ४ प्रमाणें आपल्या उजव्या पायानें त्याच्या उजव्या पायाचे लवणींत टांग मारावी व त्याच वेळीं त्याची मान फिरवून चित्र नं. ५ प्रमाणें त्यास जमिनीवर पाडावें. नंतर त्यास छातीनें दाबून ठेऊन आपले दोन्ही हातांनीं भाला सोडवून घ्यावा.



डाव नं. ८

चित्र संख्या ३०६-३१०


गर्दनचा वार–(डाव नं. ८)—सामनेवाला आपला उजवा हात त्याच्या डाव्या हातानें धरून चित्र नं. १ प्रमाणें आपल्या मानेवर तरवारीचा वार करीत आहे असें दिसतांच त्याचा वार अंगावर येण्यापूर्वी पवित्र्यावर पुढें रुरकून चित्र नं. २ प्रमाणें आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरून वार रोखावा. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें आपल्या उजव्या हातानें त्याचा हत्याराचा हात धरून दोन्ही हातांनीं त्याचा हात उलट फिरवावा. त्याच अवसानांत आपल्या डाव्या पायानें त्याच्या डाव्या पायावर चित्र नं. ४ प्रमाणें बाहेरची टांग मारून चित्र नं. ५ प्रमाणें त्यास जमिनीवर पाडावें. नंतर डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें आणि आपल्या उजव्या हातानें तरवारीची मूठ धरून व त्याच्या हातास मुरड देऊन तरवार काढून घ्यावी.



डाव नं. ९

चित्र संख्या ३११–३१४


उलट्या जानव्याचा वार–(डाव नं. १)—प्रतिस्पर्धी चित्र नं. १ प्रमाणें आपल्यावर उलट्या जानव्याचा वार करण्याचे तयारींत असेल तर त्याचा वार अंगावर येण्यापूर्वीं पुढें जाऊन त्याचा उजवा हात आपल्या डाव्या हातानें धरावा व त्याच्या उजव्या पायाजवळ चित्र नं. २ प्रमाणें बैठक घ्यावी. त्याचवेळीं उजव्या हातानें त्याचा उजवा पाय घोट्याजवळ धरावा व शक्य तितक्या जोरानें त्याचा उजवा पाय झटक्यानें वर ओढून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर पाडावें. नंतर त्याचा उजवा पाय त्याचे पोटावर दाबून चित्र नं. ४ प्रमाणें त्याचे अंगावर बसावें व त्याचे हातांतील तरवार काढून घ्यावी.



डाव नं. १०

चित्र संख्या ३१५–३१९


हसळीचा वार--(डाव नं. १०)—प्रतिस्पर्धी त्याच्या डाव्या हातानें आपला उजवा हात धरून चित्र नं. १ प्रमाणें आपणावर जंबियानें हासळीचा वार करीत असेल तर त्याचा वार आपल्यावर येण्यापूर्वी आपण त्याच बैठकीवरून स्फूर्तीनें पुढें जाऊन चित्र २ प्रमाणें आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें आपला उजवा पाय त्याच्या उजव्या पायांत आंतून आडवा घालावा. नंतर त्या पायानें त्याचा पाय पुढें आपल्याकडे ओढून व छातीनें त्यास मागें रेटून चित्र नं. ४ प्रमाणें त्यास जमिनीवर पाडावें. नंतर चित्र नं. ५ प्रमाणें उजव्या हातानें त्याच्या जंबियाचे हाताची मूठ धरून व तो उलटा पिळून जंबिया सोडवून घ्यावा.



डाव नं. ११

चित्र संख्या ३२०-३२३


कडकचा वार–(डाव नं. ११)—प्रतिस्पर्धी चित्र नं. १ प्रमाणें आपणावर तरवारीनें कडकचा वार करणार तोंच वार अंगावर येण्यापूर्वी आपण आपला उजवा पाय पूढें टाकून पवित्रा काढून पूढें त्याचे बाजूस जावें व चित्र नं. २ प्रमाणें आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें. नंतर आपल्या उजव्या हातानें त्याचा गळा धरून त्यास मागें ढकलावें व त्याच अवसानांत आपल्या उजव्या पायानें त्याच्या उजव्या पायाचे लवणींत जोरानें टांग मारून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर पाडावें. नंतर चित्र नं. ४ प्रमाणें आपला डावा पाय त्याचे मानेवर आडवा टाकावा व डाव्या हातानें तरवार धरून दोन्ही हातांनीं त्याचा हात पिळून तरवार सोडवून घ्यावी.



डाव नं. १२

चित्र संख्या ३२४–३२७


गर्दनचा वार-प्रकार १ ला-(डाव नं. १२)—आपण पालथे निजलों असतां प्रतिस्पर्धी आपले पाठीवर बसून चित्र नं. १ प्रमाणें आपल्यावर वार करणार तोंच त्याचा वार करणारा हात खालीं येण्यापूर्वी चित्र नं. २ प्रमाणें आपल्या उजव्या हातानें त्याचा उजवा पाय धरावा आणि तो पाय झटक्यानें आपल्याकडे ओढून चित्र नं. ३ प्रमाणें त्यास जमिनीवर पाडावें. नंतर लगेंच त्याच्या उजव्या हाताचें मनगट आपल्या डाव्या हातानें धरावें. नंतर उजवीकडे स्फूर्तीनें फिरून उजव्या पायावर बैठक घ्यावी आणि डावा पाय त्याचे पोटावर चित्र नं. ४ प्रमाणें आडवा टाकावा. नंतर आपल्या उजव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट मुठीजवळ धरून हात उलटा पिरगळून तरवार सोडवून घ्यावी.



डाव नं. १३

चित्र संख्या ३२८–३३१

गर्दनचा वार–प्रकार २ रा–(डाव नं. १३)—आपण उताणें निजलों असतां प्रतिस्पर्धी आपल्या अंगावर बसून आपल्यावर चित्र नं. १ प्रमाणें तरवारीचा वार करणार तोंच त्याचा वार करणारा हात खालीं येण्यापूर्वी चित्र नं. २ प्रमाणें आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या पायाचा घोटा धरावा व आपल्या उजव्या हाताचा पंजा त्याच्या उजव्या गुडघ्यावर ठेवून त्याचा गुडघा जोरानें मागें ढकलावा व त्याच वेळीं आपल्या डाव्या हातानें त्याचा उजवा पाय आपल्याकडे ओढावा. याप्रमाणें केल्यास सामनेवाला चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर पडतो. त्यावेळीं आपण फिरून चित्र नं. ४ प्रमाणें जमिनीवर उठून बसावें. त्याच अवसानांत आपल्या डाव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट धरावें आणि आपल्या हातानें तरवारीची मूठ धरून हात उलटा पिरगळून तरवार काढून घ्यावी.




डाव नं. १४ चित्र संख्या ३३२–३३४

तरवारीची हूल–(डाव नं. १४)—प्रतिस्पर्धी चित्र नं. १ प्रमाणें तरवारीची हूल मारण्याच्या तयारींत असेल तर त्याचें हूलचें अवसान पाहून आपला उजवा पाय मागें काढून व बाजूस होऊन त्याची हूल चुकवावी व चित्र नं. २ प्रमाणें त्याच्या उजव्या हाताचें मनगट आपल्या उजव्या हातानें धरून त्याचा हात दूर करावा. नंतर त्याच अवसानांत चित्र नं. ३ प्रमाणें आपला डावा हात पुढून त्याच्या गळ्यावर ठेऊन त्यानें त्याचा गळा मागच्या बाजूस शक्य तितक्या जोरानें दाबावा आणि त्याच वेळीं त्याचा उजवा हात उताणा करून आपले छातीवर ठेवावा. नंतर छातीनें त्याच्या उजव्या हाताच्या कोपरास पुढें ढकलावें व त्याच वेळीं आपल्या उजव्या हातानें त्याच्या उजव्या हाताचें मनगट मागें ओढावें म्हणजे त्याच्या हातास रग लागून तो हातांतील तरवार टाकून देईल.

श्री.

वज्रमुष्टी कुस्ती



उपोद्घात.


❀

सर्वसाधारण जनसमाजाची कुस्तीबद्दलची जी कल्पना आहे त्यापेक्षां ही कुस्ती अगदीं निराळ्या प्रकारची आहे. खेळणारांपैकीं एक गडी चीत झाला म्हणजे कुस्ती झाली असें समजण्यांत येतें. पण वज्रमुष्टी लोक जी कुस्ती खेळतात त्या कुस्तींत एक गडी उताणा पडला तरी कुस्ती संपत नाहीं. उलट खालीं उताणा पडणारा गडी वरचे गड्यावर अनेक प्रकारचे डाव जास्त सुलभतेनें करूं शकतो. मनुष्य उताणा पडला तरी त्याचें तोंड सामनेवाल्याकडे असतें व त्याचे दोन्ही हात व दोन्ही पाय मोकळे असल्यानें त्यांचा उपयोग तो करूं शकण्याचे स्थितींत असतो. त्यामुळें तो खरोखरी सामनेवाल्याचे ताब्यांत गेलेला नसून प्रतिकार करण्यास समर्थ असतो. ह्या कुस्तीचा निकाल होतांना जेव्हां एक गड्याचा कचकड्याचा (हत्याराचा) हात डाव करणारा बांधतो व डाव करणाराचा हत्याराचा हात मोकळा असतो त्यावेळीं डाव करणारा विजयी झाला असें समजण्यांत येतें. ही कुस्ती खेळतांना खेळणारे गडी, उजवे

लेखक :—



श्री. द. चिं. मुजुमदार,
बडोदें.



चित्र संख्या ३३५–३३६

हाताचे बोटांत कचकड्याचें, अणकुचीदार पांच टोकें असलेलें, चित्र नं. ३३५ मध्यें दाखविलेलें हत्यार आपले बोटांत घालून चित्र नं. ३३६ प्रमाणें मूठ बंद करतात. नंतर त्या मुठीनें सामनेवाल्याचे डोक्यावर, गळ्यावर अथवा हातावर मार मारून समोरच्या गड्यास जेर करतात. कचकड्याचें पंजासारखें केलेलें हें हत्यार १ इंच जाड असून त्यास पांच टोकें असतात. त्यामुळें जेथें ह्याचा मार बसतो त्या ठिकाणीं सामनेवाल्याचें अंगांतून रक्त निघतें. याप्रमाणें कचकड्याचें हत्यार हातांत धरून मुठीचा जो प्रहार करतात तो वज्रासारखी कठीण मुष्टि असलेल्या मुठीनें केल्याप्रमाणें तीव्र असल्यानें यास वज्रमुष्टीचा प्रहार म्हणतात. अशा प्रकारचें कचकड्याचें हत्यार मुठींत धरून कुस्ती खेळतात म्हणून या कुस्तीस **वज्रमुष्टी कुस्ती** म्हणतात व ती खेळणारांस **वज्रमुष्टी पहिलवान** म्हणतात. या कुस्तीस **चीतपट कुस्ती** म्हणण्याचाहि रिवाज आहे. ही कुस्ती

म्हणजे हल्लीं हिंदुस्थानांत चालू असलेली साधी कुस्ती, जपानी कुस्ती व बॉक्सिंग या तीन प्रकारच्या खेळांचें मिश्रण आहे. साध्या कुस्तीप्रमाणें या कुस्तींत अनेक प्रकारचे डाव करावयाचे असतात. जपानी कुस्तीप्रमाणें या कुस्तीचा शेवट, सामनेवाल्याचा हात कबजांत घेऊन त्याचेवर बांध बांधल्यानंतर होतो व मुकीप्रमाणें या कुस्तींत मुठीनें सामनेवाल्यावर प्रहार करावयाचे असतात. या कुस्तींत कमरेचे वरचे अंगास व विशेषेंकरून डोक्यावर मार मारतात. साध्या कुस्तीप्रमाणें यांत नुसती जमीन धरून बसतां येत नाहीं. कारण सामनेवाला आपणावर प्रहार करण्याची भीति असते. या कुस्तींत हातांत कचकड्याचें हत्यार घालून मार मारावयाचा असल्यानें बॉक्सिंग अगर मुकीचे खेळांपेक्षां हा खेळ जास्त जोखमीचा आहे.

अशा प्रकारची कुस्ती खेळणारे पहिलवान आतां फार थोडे राहिले आहेत. बडोदें संस्थानांत ही कुस्ती खेळणारे सहा पहिलवान सध्यां नोकर आहेत व त्यांस देखील कुस्ती खेळतांना कचकड्याचें हत्यार हातांत घालून हात मारूं देत नाहींत. खरोखरीचे हात मारण्याची परवानगी दिली तर दोन्ही खेळणारे रक्तानें माखून जातात. प्रत्येक माराबरोबर घाव पडून रक्त वाहूं लागतें. ह्या प्रमाणें रक्तबंबाळ होऊन देखील येथील कुस्ती खेळणारांपैकीं एखादा इसम मेल्याचें ऐकण्यांत नाहीं अगर जखमी होऊन कायमचा निरुपयोगी झालेला माहीत नाहीं. अशा प्रकारें कुस्ती करूं देणें आतां निर्दयपणाचें समजलें जातें. त्यामुळें आतां हातांत नुसता रुमाल बांधून ही कुस्ती करून दाखवितात. त्याचा परिणाम असा झाला आहे कीं ह्या जुन्या विद्येबद्दल लोकांत आदर राहिला नाहीं. पहाणारांस ह्या कुस्ती खेळाणारांचें काय कौशल्य आहे याची कल्पना येत नाहीं. जुन्या वेळीं मल्लविद्या ही एक युद्धाची कला होती. या विद्येनें प्रतिस्पर्ध्याशीं युद्ध करून त्याचा प्राण घ्यावयाचा असे. श्रीकृष्ण, चाणूर, भीम, जरासंध यांचे कुस्तींचीं वर्णनें आहेत त्यांवरून त्याकाळीं कुस्तीचा शेवट एक गडी मरेल तेव्हांच होत असे असें दिसतें. त्यावेळीं मल्लविद्या फार उच्च दर्जास पोंहोचली असावी असें महाभारतांतील कुस्त्यांचीं वर्णनें व अनेक डावांचीं नांवें पाहून वाटतें. ही विद्या शिकण्यासाठीं त्यावेळीं गडी आपसांत खेळतांना समोरच्या गड्याचा प्राण घेत नसत हें उघड आहे. पण आणीबाणीच्या प्रसंगीं प्राण घेतां येईल अशा तऱ्हेचे डाव शिकवीत असत ही गोष्ट निर्विवाद आहे. वज्रमुष्टीसारखी कुस्ती प्राचीनकाळीं प्रचलित असावी असें वाटतें. कसेंहि असलें तरी प्राचीन काळच्या मल्लविद्येबद्दलचे ग्रंथ आमचे दुर्दैवानें आज उपलब्ध नाहींत, त्यामुळें त्याविद्येबद्दल कांहीं निश्चित अनुमान आज करतां येत नाहीं. तो प्रश्न बाजूस ठेविला तरी वज्रमुष्टी पहिलवान ज्या प्रकारची कुस्ती खेळतात तो प्रकार फार उत्तम आहे व तो आपण नष्ट होऊं देतां उपयोगी नाहीं. त्यांतील जोखमीचा भाग टाळण्यासाठीं एका हातांत बॉक्सिंगचा मोजा घालून ही कुस्ती शिकावी म्हणजे पूर्ण विद्या शिकतां येऊन फारशी इजा होण्याची भीति राहणार नाहीं.


श्री. खंडेराव महाराज गायकवाड यांना कुस्तीचा व सर्व मर्दानी खेळांचा फार शोक असल्यानें त्यांनीं तेलंगणांतून उत्तम वज्रमुष्टी पहिलवान आणून आपले पदरीं ठेविले होते व त्यांचेसाठीं स्वतंत्र तालमी (आखाडे) बांधून दिल्या होत्या. ह्या लोकांच्या कुस्त्या त्या वेळीं खरोखरीच्या होत असत व खेळणारे रक्तानें न्हाऊन जात. या लोकांस त्या वेळीं मोठमोठालीं बक्षिसें व वेतनें देऊन त्यांच्या गुणांचें व धैर्याचें चीज करण्यांत येत असें. हे पहिलवान देवीचे भक्त असतात. यांचे अखाड्यांत देवीची पूजा होते. वज्रमुष्टी पहिलवान कुस्ती खेळण्यास जाण्यापूर्वी या देवीची पूजा करून निघतात व देवीचे कृपेमुळेंच झालेल्या जखमा फार लवकर बऱ्या होतात असा या पहिलवानांचा दृढ विश्वास व अनुभव आहे. आतां मात्र या विद्येचा लोप होत चालला आहे. बडोद्याचे वज्रमुष्टी पहिलवान कृष्णाप्पा बाळाप्पा, यांनीं ज्ञानकोशासाठीं आपले या कुस्तीचे फोटो घेऊन देऊन त्याबद्दलची माहिती फार मोकळे मनानें सांगितली ह्याबद्दल आम्हीच काय पण सर्व महाराष्ट्रांतील जनता त्यांची ऋणी आहे. बहुतेक फोटोंत ते दिसत असून त्यांचेसमोर पहिलवान कनकाप्पा नरसाप्पा खेळत आहेत. कनकाप्पाचे वडील या प्रकारची कुस्ती करण्यांत फार प्रवीण होते.

श्री. सयाजीराव महाराज (थोरले) यांचे वेळीं हे पहिलवान बडोद्यास आले. पण श्री. खंडेराव महाराज यांचे वेळीं या कुस्तीस पुष्कळ उत्तेजन मिळून ही कुस्ती सर्व हिंदुस्थानभर प्रसिद्ध झाली. हल्लीं या प्रकारची कुस्ती म्हैसूरचे राज्यांतच होते. तेथें कांहीं वज्रमुष्टी पहिलवान दरबारचे आश्रयास आहेत. दसऱ्याचे दिवशीं या कुस्तीचा तेथें दंगल होतो. त्यावेळीं ह्या कुस्तीमुळें जें रक्त निघतें त्याचा टिळा म्हैसूरचे महाराजांचे कपाळास लावण्यांत येतो. बडोदें व म्हैसूर या दोन ठिकाणींच ही कुस्ती हल्लीं पहाण्यांत येते. ही कुस्ती करणारे पहिलवान तेलंगणांत राहणारे मोड ब्राम्हण आहेत. कांहीं कुटुंबांतील पुरुष वंशपरंपरेनें ही कुस्ती करीत असत. पण आतां या कुस्तीस पूर्वीप्रमाणें आश्रय नसल्यानें व ही कुस्ती खेळणें जोखमीचें असल्यानें ही हळूहळू नाहींशी होणार असें वाटतें.

नेहमींच्या कुस्तीपेक्षां ही कुस्ती ज्यास्त श्रमाची व तडफेची आहे. हींत खेळणारांस मुळींच विश्रांति मिळत नाहीं. खेळणारे जमिनीवर आले तरी साध्या कुस्तीप्रमाणें त्यांस बसून विश्रांति घेतां येत नाहीं. उलट उभे असतांना खेळणारांस जरा तरी विश्रांति मिळते, पण जमिनीवर आल्यानंतर जास्तच हालचाल करावी लागते. यामुळें ही कुस्ती खेळणाराचे अंगांत चपळता फार असावी लागते. जरा सुस्ती झाली तर मार बसून इजा होण्याचा संभव असतो. म्हणून ही कुस्ती खेळणाराचें शरीर फार स्वाधीन असून त्याचा दम वाढलेला असणें जरूर असतें. शरीर मजबूत, चपळ व लवचीक करण्यासाठीं या पहिलवान लोकांनीं स्वतंत्र प्रकारची व्यायामपद्धति बसविलेली आहे. या पद्धतीची सचित्र माहिती **मेहनतीचे प्रकार–देशी** या भागांत देणार आहोंत. या पद्धतीचा सामान्य लोकांत प्रचार नाहीं. ही पद्धति फार चांगली आहे.

तसेंच उताणें पडल्यानंतर सामनेवाल्यास दूर ढकलून उठतां यावें म्हणून हातांत व पायांत जोर येण्यासाठीं हे लोक दगड अगर वाळू भरलेलें पोतें, उताणें निजून हातानें व पायानें उचलण्याची मेहनत करतात. तो प्रकार त्या भागांतच दाखविला आहे. तसेंच अंगांत स्फूर्ति येऊन शरीर लवचिक व्हावें म्हणून हे पहिलवान अंतरपकडीचा मल्लखांब करतात. अंतरपकडीची माहिती देशी कसरतीचे भागांत दिली आहे.

दरवर्षी श्रावण शु॥ १५ ला हे पहिलवान लोक त्यांचे तालमींत त्यांचे कुलदेवतेचा—देवीचा उत्सव करतात. तालमींतील सर्व मातीचा ढीग करून त्यावर फुलें, पानें वगैरे लावून शोभा आणतात. त्या पूजेचा व पहिलवानांचा फोटो यासोबत चित्र नं. ३३७ चा दिला आहे. तसेंच बडोद्यांत या कुस्तीचे दोन निरनिराळे आखाडे (तालमी) आहेत. या निरनिराळ्या तालमींतील पहिलवानांच्या कुस्त्या दंगलांत लावण्यांत येतात. या दोन



चित्र संख्या ३३७

तालमींतील मंडळींचा, खेळण्यासाठीं येतात त्या वेळचे पोशाखांत घेतलेला, फोटो चित्र नं. ३३८ चा येथें दिलेला आहेत. ज्या दिवशीं कुस्त्या असतील त्या दिवशीं खेळणारे देवीची पूजा करून व अंगास गेरू व चंदन लावून अंगावर उपरणें पांघरतात व डोक्यास




चित्र संख्या ३३८

कोरी पगडी बांधतात. नंतर या मंडळींस वाजत-गाजत दंगलाचे ठिकाणीं नेण्यांत येतें. दंगलाचे मैदानांत खेळणारे मोठ्या वीरश्रीनें गर्जना करीत व उड्या मारीतच येतात. हा देखावा ज्यांनीं पाहिला नाहीं त्यांस हा प्रकार काय आहे हें न समजल्यानें त्यांचे मनांत भीति उत्पन्न होते. खेळतांना रक्तस्त्राव होऊं लागला म्हणजे खेळणारांचे अंगांत वीरश्रीचा सचार होतो व खेळणारे स्वतःचें भान विसरून जातात.


इतक्या या महत्वाच्या विद्येचा प्रसार करून ती निदान व्यायामसंस्थांतून तरी थोड्याफार फेरफारानें जिवंत ठेवणें जरूर आहे.

या कुस्तींत डोक्यावर, तोंडावर व हातावर वार मारण्याचा रिवाज आहे. मारांची कल्पना येथें दिलेल्या चित्र नं. ३३९ वरून चांगल्या रीतीनें येईल. शरिराचे इतर भागांवर हात मारणें गौण समजलें जातें.




चित्र संख्या ३३९

वज्रमुष्टी कुस्ती.




लेखक—पहिलवान
कृष्णाप्पा बाळाप्पा, बडोदें.

साधापवित्रा-(डाव नं. १)—कुस्तींत पवित्र्याचें महत्व फार असतें. आपला तोल न जातां पुढें व मागें सरकणें सुलभ होईल अशा प्रकारचे उभें राहण्याचे पद्धतीस पवित्रा म्हणतात. वज्रमुष्टीचे कुस्तींत दोन प्रकारचे पवित्रे आहेत. चित्र नं. १ प्रमाणें उजवा पाय पुढें व डावा पाय मागें ठेऊन, डावा हात पुढें लांब करून पवित्र्यावर उभे राहातात त्यास साधा पवित्रा म्हणतात. मागचा पाय पुढचे पायाचे अगदीं मागें न ठेवतां जरा तिरपा मागें ठेवावा म्हणजे तोल चांगला राहतो. तसेंच पुढील व मागील पायांत जास्त अंतर न ठेवतां चित्रांत दाखविल्याप्रमाणें सरळ उभें रहावें म्हणजे इच्छेप्रमाणें पुढें अगर मागें सरकणें सुलभ जातें. उजवा कचकड्याचा (हत्याराचा) हात खालीं व डावा रिकामा हात बचावासाठीं तोंडापुढें ऊंच ठेवावा म्हणजे डावे हातानें आपला बचाव करतां येतो. पवित्र्यावर उभें राहातांना सर्व शरीर सैल ठेवावें. शरिराचा कोणताहि सांधा ताठ ठेवूं नये.



पवित्रा नं. १–२ चित्र संख्या ३४०–३४१

कर्नातपवित्रा--[अथवा सरदंडा पवित्रा]-(डाव नं. २)—या पवित्र्यांत दोन्ही पाय पुढें मागें न ठेवतां चित्र नं. २ प्रमाणें एका रेषेंत ठेवून उभें राहावें. जरुरीप्रमाणें उजवे अगर डावे बाजूस पायांची चाळवाचाळव करून सरकावें. समोरचे गड्यास मारण्याची संधि सापडेपर्यंत खेळणारे गोलाकार फिरतात. या प्रकारचा पवित्रा ठेवून उभे राहिल्यानें सामनेवाल्यास आपले पटांत शिरणें कठीण जातें.




चित्र संख्या ३४२–३४४

डाव नं. ३

तमाचाचा मार–[मार नं. १]–(डाव नं. ३)—पवित्र्याची चाळवाचाळव केल्यानंतर योग्य संधि पाहून चित्र नं. १ प्रमाणें हत्याराचा हात मागें व वर घ्यावा. नंतर उजवा पाय जरा पुढें टाकून सामनेवाल्यावर तमाचाचा मार मारावा. तमाचाचा हात सामनेवाल्याचे डाव्या बाजूचे कानाचे वरचे अंगास मारावयाचा असतो. चित्र नं. २ मध्यें हात जरा पुढें गेल्यानंतर फोटो घेतलेला आहे. तमाचाची माराची खरी जागा डावे कानाचे वरचे अंगास असते.


आपणावर तमाचाचा वार केला तर आपण चित्र नं. ३ प्रमाणें आपले उजवे मनगटावर डावें मनगट ठेवून दोन्ही हातांनीं तमाचाचा मार रोकावा.



डाव नं. ४

चित्र संख्या ३४५–३४७


बाहेऱ्याचा मार–[मार नं. २]–(डाव नं. ४)—चित्र नं. १ प्रमाणें उजवा हात वर उचलून आपले डावे बाजूस कानाकडे न्यावा व नंतर उजवा पाय पुढें ठेवून चित्र नं. २ प्रमाणें सामनेवाल्याचे उजवे कानशिलावर बाहेरा मारावा. मार लागण्याच्या आधीं सामनेवाला चित्र नं. ३ प्रमाणें त्याचे डावे हातानें रोख करून स्वतःचा बचाव करतो.



चित्र संख्या ३४८–३५०

डाव नं. ५

तोंडाचा मार–[मार नं. ३]–(डाव नं. ५)—चित्र नं १ प्रमाणें आपला उजवा हात वर उचलून मागें न्यावा व चित्र नं. २ प्रमाणें सामनेवाल्याच्या तोंडावर मार मारावा. सामनेवाल्यानें आपले डावे हातानें मारणाराचा उजवा हात चित्र नं. ३ प्रमाणें खालीं दाबून बचाव करावा.



डाव नं. ६


चित्र संख्या ३५१–३६०

धोबीपछाड–[साखळी नं. १]–(डाव नं. ६)—सामनेवाला आपणास शीरचा मार मारण्याचा यत्न करील तर आपण त्याचा हत्याराचा हात आपले डावे हातानें चित्र नं. १ प्रमाणें धरावा. नंतर आपला उजवा पाय आपले डावे बाजूस पुढें ठेवून, त्याचे हाताखालून धोबीपछाडचे डावाप्रमाणें फिरून चित्र नं. २ प्रमाणें बसावें. नंतर त्याच अवसानांत त्यास आपले पाठीवरून पुढें ओढून चित्र नं. ३ प्रमाणें उताणा पाडावा व त्याचा उजवा हात जमिनीवर दाबून ठेवावा. नंतर दाबलेला हात तसाच ठेवून आपलें शरीर स्फूर्तीनें त्याचे अंगावर डंकी मारल्याप्रमाणें (धड फेंकल्याप्रमाणें) नेऊन चित्र नं. ४ प्रमाणें त्यास आपले पायांमध्यें दाबून बसावें.

याप्रमाणें त्याचे अंगावर बसलें तरी सामनेवाल्याचे हात व पाय मोकळे असल्यानें तो खालीं पडून न राहतां डाव करणारास हातानें मागें ढकलून उभें करण्याचा प्रयत्न करतो. सामनेवाल्यानें आपले पायानें व हातानें डाव करणारास चित्र नं. ५ प्रमाणें मागें ढकलवें म्हणजे तो चित्र नं. ६ प्रमाणें उभा राहतो. याप्रमाणें डाव करणारास दूर ढकलून उभें केलें तर त्यानें आपल्या उजवे हातानें सामनेवाल्याचा उजवा हत्याराचा हात चित्र नं. ७ प्रमाणें धरावा व आपला डावा हात त्या चित्रांत दाखविल्याप्रमाणें जमिनीवर टेकावा. नंतर लगेंच डाव करणारानें डंकीप्रमाणें (यास तेलंग भाषेंत पिलेमारी असें म्हणतात.) पाय वर उडवून व सामनेवाल्याचे डोक्यापलीकडे जाऊन चित्र नं. ८ प्रमाणें त्यास धरून बसावें. याप्रमाणें डाव करणारानें सामनेवाल्यास धरलें तरी त्याचा डावा हात व दोन्ही पाय मोकळे असल्यानें तो बचावाचा प्रयत्न करूं शकतो. सामनेवाल्यानें लागलींच आपला डावा हात डाव करणाराचे छातीस अगर गळ्यास लावून त्यास जोरानें मागें वर ढकलून ऊंच करावें व त्याच अवसानांत आपले दोन्ही पाय चित्र नं. ९ प्रमाणें डाव करणाराचे बगलेखालीं लावावें. याप्रमाणें केल्यानें डाव करणाराचे दोन्ही हात सामनेवाल्याचे पायांत बांधले जातात. नंतर पायांनीं डाव करणारास त्याचे उजवे बाजूकडे दाबून जमिनीवर पाडावें म्हणजे तो चित्र नं. १० प्रमाणें पडतो. या वेळीं डाव करणाराचे दोन्ही हात बांधल्यामुळें त्याचे पाय मोकळे असले तरी तो ते जवळ आणून सामनेवाल्यास ढकलूं शकत नाहीं. यामुळें हा बांध येथें पुरा होतो व कुस्ती संपते.

चित्र नं. ८ प्रमाणें सामनेवाला उताणा पडला असतांना त्याचे डोक्याचे बाजूस बसून डोकें पोटास लावून दाबून बसणें यास तेलंगीभाषेंत **सीसमपट्टू** (सीसम पकड) म्हणतात.


सीसमपट्टूची तोड करतांना तोड करणारानें आपले पाय चित्र नं. ९ प्रमाणें सामनेवाल्याचे बगलेखालीं लावून त्यास मागें ढकलून ऊंच करावें. त्यावेळीं तोड करणारानें डोकें बाजूस काढून त्याचे चड्डींत हात घालून त्यास बाजूवर उलटवावा व त्याचे हात बांधून चित्र नं. १० प्रमाणें बसावें.



डाव नं. ७

चित्र संख्या ३६१-३६३


खडा नमाजबंद-[बांध नं. १]-(डाव नं. ७)—सामनेवाला आपणास तमाचाचा मार मारण्यास आला तर आपण आपले डावे हातानें त्याचा हत्याराचा हात चित्र नं. १ प्रमाणें धरावा. डाव करणारानें आपल्या हाताखालून डोकें काढून गोल फिरावें म्हणजे सामनेवाल्याचा हात चित्र नं. २ प्रमाणें येतो. नंतर डाव करणारानें आपला डावा पाय त्याचे हातावरून चित्र नं. ३ प्रमाणें टाकावा व त्या पायानें सामनेवाल्याच्या हनुवटीस खालून वर दाबावें म्हणजे त्यास उलटतां येणार नाहीं. याप्रमाणें नमाजबंद बांधला तर सामनेवाला आपल्या कबजांत येतो.



चित्र संख्या ३६४—३६६

डाव नं. ८


बसून नमाजबंद–[बांध नं. २]–(डाव नं. ८)—सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें आपले पटांत घुसून आला व त्यानें आपले पट काढून आपणांस चित्र नं. २ प्रमाणें मागें पाडलें व आपला हत्याराचा हात धरला तर आपण आपले उजवे पायानें त्यास मागें ढकलावें. त्याचवेळीं आपला डावा पाय त्याचे उजवे हातावर टाकून त्याचा हत्याराचा हात आपले डावे हातानें धरावा. नंतर आपले उजवे अंगास एकदम झटक्यानें फिरून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें नमाजबंध बांधून बसावें.



डाव नं. ९

चित्र संख्या ३६७–३६९


मोतीचूर–[बांध नं. ३]–(डाव नं. ९)—सामनेवाला आपले समोर उभा असेल तर आपण चित्र नं. १ प्रमाणें लवून त्याचे पटांत शिरावें. सामनेवाल्यानें पट काढून दिले नाहींत तर आपण मागें बसून त्यास चित्र नं. २ प्रमाणें आपले अंगावर घ्यावें. नंतर आपले हत्याराचे हातानें त्याचा हत्याराचा हात धरावा व आपले उजवे पायानें त्याचा डावा पाय दूर जोरानें ढकलावा म्हणजे तो आपले पुढें चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर पडतो. यावेळीं त्याचा हत्यराचा हात आपण आपले उजवे हातानें धरलेला असतो तो तसाच धरून ठेवून आपला डावा पाय त्याचे उजवे पायाचे आंतून घालून चित्र नं. ३ प्रमाणें त्याचेवर मोतीचुराचा बांध बांधावा.



चित्र संख्या ३७०–३७३

डाव नं. १०


हात बांधल्यानंतर उलटवून बांध–[बांध नं. ४]–(डाव नं. १०)—सामनेवाला चित्र नं १ प्रमाणें आपले पटांत घुसून आला तर आपण आपले डावे हातानें त्याचा हत्याराचा हात धरावा व आपला डावा पाय त्याचे उजवे हाताचे खालून त्याचे मानेवर चित्र नं. २ प्रमाणें ठेवावा. नंतर आपले उजवे बाजूवर पडून त्याची मान आपले पायांनीं चित्र नं. ३ प्रमाणें खालीं दाबावी. नंतर त्याची चड्डी धरून त्यास चित्र नं ४ प्रमाणें उलटवावें म्हणजे तो बांधला जाऊन आपल्या कबजांत येतो.



डाव नं. ११

चित्र संख्या ३७४—३७६


कुशीनपट्टूची (गळ्याचे पकडीची) **तांड करून बांध**—[बांध नं. ५]-(डाव नं. ११)—आपण उताणें असतांना सामनेवाल्यानें त्याचा डावा हात आपले मानेखालून घालून चित्र नं. १ प्रमाणें आपला हत्याराचा हात, धरला व आपणावर कुशीनपट्टू केला तर आपण आपले डावे हातानें त्याची हनुवटी चित्र नं. २ प्रमाणें जोरानें वर मागें ढकलावी. नंतर त्याचा उजवा हात आपले डावे हाताचे बगलेंत धरून आपला डावा पाय त्याचे उजव्या हाताचे बाहेरच्या बाजूनें त्याचे गळ्यावर ठेवावा. नंतर त्याची मान आपले पायानें मागें व खालीं दाबून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें पाडून बांध बांधावा.



चित्र संख्या ३७७–३८१

डाव नं. १२


सीसमपट्टूची तोड करून बांध–[बांध नं. ६]–(डाव नं. १२)—आपण उताणे पडलों तर सामनेवाला आपले डोक्याचे मागें बसून आपलें डोकें त्याचे पायांत चित्र नं. १ प्रमाणें दाबून बसतो, त्यास सीसमपट्टू म्हणतात. आपणावर सीसमपट्टू केला तर आपण आपले दोन्ही हातांनीं चित्र नं. २ प्रमाणें त्याचें तोंड जोरानें वर ढकलावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें आपले दोन्ही पायांनीं त्याचे डोक्यास स्वारी बांधावी. नंतर त्यास आपले पायांनीं आपले डावे बाजूस चित्र नं. ४ प्रमाणें खालीं दाबावें व स्वारी पूर्ण बांधून चित्र नं. ५ प्रमाणें आपण बसतें व्हावें. नंतर त्यास आपले अंगावरून उलटवावें म्हणजे त्याचा हत्याराचा हात आपले अंगाखालीं दाबला जातो. चित्र नं. ५ मध्यें सामनेवाल्यास अर्धा उलटविला आहे म्हणून हत्याराचा हात मोकळा दिसत आहे.



डाव नं. १३

चित्र संख्या ३८२–३८४


नरसिंगगत पकड–[बांध नं. ७]-(डाव नं. १३)—सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें आपले पटांत शिरला तर आपण डावा पाय त्याचे उजवे हाताखालून त्याचे मानेवर चित्र नं. २ प्रमाणें टाकावा. नंतर चित्र नं. २ प्रमाणें त्याचे पाठीवरून फिरून चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर बसावें. यावेळीं त्याचा हत्याराचा हात आपले डावे हातानें दाबून त्याचा पाय आपले पायांनीं बांधून बसावें म्हणजे नरसिंगगतची पकड होते. या पकडींत सामनेवाल्याची मान व पाय यांस स्वारी बांधून बसावयाचें असतें.



डाव नं. १४

चित्र संख्या ३८५–३८९


गळफासाचा बांध–[बांध नं. ८]–(डाव नं. १४)—सामनेवाला चित्र नं. १ प्रमाणें उभा असेल तर आपण आपला डावा पाय त्याचे उजवे पायांत आकडीप्रमाणें घालावा. नंतर त्याचा उजवा पाय बाजूस ढकलून वर उचलावा व आपले डावे पायानें त्यास मागें ढकलून चित्र नं. २ प्रमाणें पाडावें व आपण उभें रहावें. चित्र नं. ३ प्रमाणें उभा असणाऱ्या गड्यानें आपला उजवा पाय सामनेवाल्याचे उजवे पायांत घालून बांध बांधला तर आपण त्याचा हात डावे हातानें धरावा. नंतर आपल्या डावे पायानें त्याचे डावे पायास धक्का मारावा म्हणजे तो चित्र नं. ४ प्रमाणें उताणा पडतो. त्या वेळीं आपण चित्र नं. ४ प्रमाणें उठून बसावें व चित्र नं. ५ प्रमाणें त्याचे गळ्यास गळफास बांधावा.



डाव नं. १५


चित्र संख्या ३९०-३९२

नमाजबंधाचा बांध–[बांध नं. ९]–(डाव नं. १५)—सामनेवाल्यानें आपल्या डोक्यावर शीरचा हात मारला तर त्या हाताचें मनगट आपण आपले डावे हातानें धरावें व आंतून फिरून चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर त्यास खालीं वांकवून आपला डावा पाय त्याचे उजवे हातावरून चित्र नं. २ प्रमाणें टाकावा. नंतर आपले पायानें त्याची मान जोरानें दाबून त्यास चित्र नं. ३ प्रमाणें उताणें पाडावें व बांध बांधावा.




डाव नं. १६ चित्र संख्या ३९३–३९४

स्वारीचा बांध–[बांध नं. १०]–(डाव नं. १६)—सामनेवाला जमिनीवर पालथा पडला असेल तर आपण त्यास स्वारी भरून चित्र नं. १ प्रमाणें बसावें. नंतर आपला उजवा हात त्याचे उजवे हाताखालीं घालून त्यास चित्र नं. २ प्रमाणें कुशीवर वळवून बांध बांधावा.



डाव नं. १७ चित्र संख्या ३९५–३९६

तबकफाडीचा बांध–[बांध नं. ११]–(डाव नं. १७)—सामनेवाला आपले पटांत घुसून आला तर आपण आपला डावा हात त्याचे उजवे पायाचे आंत चित्र नं. १ प्रमाणें घालावा. नंतर त्याचेवर तबकफाडीचा डाव करून त्यास चित्र नं. २ प्रमाणें पाडून बांध बांधावा. चित्र नं. २ प्रमाणें डावा हात त्याचे पायाचे आंत घातल्यावर उजवा हात त्याचे पायावरून नेऊन आपले दोन्ही हातांची गोफण बांधावी म्हणजे त्याचा पाय आपले गोफणींत येतो. आपण आपले उजवे बाजूवर पडावें व त्याचा डावा पाय आपले पायांनीं बांधावा. उजवा पाय आपले हातांनीं बांधलेला असतोच.



चित्र संख्या ३९७–३९८

डाव नं. १८


हाताचा बांध–[बांध नं. १२]–(चित्र नं. १८)—सामनेवाल्यानें आपले पट काढून आपणास चित्र नं. १ प्रमाणें मागें जमिनीवर पाडलें तर आपण आपले डावे हातानें त्याचा उजवा हात बांधावा. नंतर आपले डावे पायानें त्याचे उजवे पायास त्याच चित्रा-प्रमाणें पाय लावून धक्का मारावा, म्हणजे तो जमिनीवर पालथा पडतो. त्याच वेळीं आपला उजवा पाय त्याचे पाठीवर चित्र नंबर १ प्रमाणें टाकून एकदम आपले डावे बाजूस फिरावें व चित्र नं. २ प्रमाणें त्यास बांध बांधावा.

श्री.

अस्वलाबरोबर कुस्ती.



चित्र संख्या ३९९



चित्र संख्या ४००-४०१

अस्वलाबरोबर कुस्ती.



चित्र संख्या ४०२

वरील चित्रांत अस्वलाबरोबर होणारी कुस्ती दाखवली आहे. अस्वल कुस्ती करतांना सामनेवाल्या मनुष्यास पुढील दोन पायांनीं अत्यंत घट्ट धरून ठेवतें. या त्याच्या बांधांतून किंवा मिठींतून सुटका करून घेणें त्याबरोबर कुस्ती खेळणारास फार कठीण जातें आणि यासाठीं त्याचें अंगीं पुष्कळच शरीरसामर्थ्य असावें लागतें. अस्वल कुस्ती खेळतांना ज्या प्रकारचे बांध बांधते तसलेच बांध ज्या कुस्तींत खेळणारांकडून बांधले जातात त्या कुस्तीस जांबुवंती कुस्ती असें नांव पडलेलें आहे. पुराणांतून प्रसिद्ध असलेले जांबुवान, रीस योनींत जन्मले असून ते हनुमन्ताप्रमाणेंच पहिल्या दर्जाचे बलशाली व बुद्धिमान् रामभक्त होते. कृष्णावतारीं प्रत्यक्ष भगवंताशीं झालेलें त्यांचें मल्लयुद्ध प्रसिद्ध आहे. जांबुवंती कुस्तीचे तेच आद्यप्रवर्तक होत. रानांत फिरतांना कधींकधीं एखाद्या अस्वलाशीं गाठ पडून त्याजबरोबर झोंबाझोंबीचा प्रसंग येतो. त्या वेळेस सावधपणें त्याच्याशीं झगडून सुटका करून घेण्यांत या कुस्तीचा फार चांगला उपयोग होतो.

श्री.

नामांकित हिंदी पहिलवान.

(१) **रमजू सरफूदीन**—हे पंजाबी मुसलमान पहिलवान श्री. कै. खंडेराव म. गायकवाड यांचे पदरीं होते. यांचें वजन ४८० रत्तल व उंची ६ फूट असून हे दोन बैलांची मोट सहज ओढून काढीत. त्यांस या पेशामुळें पदमला गांव इनाम मिळालें होतें.

(२) **बूटा**—हेहि पंजाबी मुसलमान पहिलवान श्री. खंडेराव म. गायकवाड यांचे पदरीं होते. प. रमजू सरफूदीनशीं झालेल्या कुस्तींत हे सरस ठरले होते.

(३) **गुलाम अलिया**—यांनीं पॅरीसमध्यें जाऊन सॅन्डोशीं कुस्ती मागितली पण ती त्यास मिळाली नाहीं. सन १९०२ मधील पॅरीस येथील प्रदर्शनांत समग्र युरोपखंडांतील पहिलवानांत पहिला नंबर मिळवून यांनीं रुस्तम इ हिंद ही पदवी मिळविली.

(४) **कल्लू अलिया**—हे प. गुलाम अलियाचे धाकटे भाऊ असून यांनीं प्रसिद्ध शीख पहिलवान कीकरसिंगवर कुस्तींत विजय मिळविला होता.

(५) **गामा कल्लू**—प. कल्लूचे हे पुत्र असून राधनपुरच्या नबाबाचे आश्रित होते. सन १९१९ सालीं डेक्कन जीमखान्यावर पुणें येथें ना. गव्हर्नर साहेबांचे समक्ष झालेल्या पहिलवानांच्या कुस्त्यांत यांनीं पहिल्या नंबरचें सुवर्णपदक मिळविलें.

(६) **अहंमदबक्ष**—यांनीं सन १९१२ सालीं युरोपखंडांत जाऊन तिकडील पहिलवानांशीं झालेल्या कुस्त्यांत पहिला नंबर मिळविला.

(७) **गुलाम महुदीन व टीला**—या दोघांनींहि प. अहंमदबक्ष यांजबरोबर युरोपमध्यें जाऊन तिकडील मध्यम वजनाच्या पहिलवानांत श्रेष्ठत्व मिळविलें होतें.

(८) **रुस्तम इ हिंद गामा**—यांनीं युरोपियन पहिलवानांत श्रेष्ठत्व मिळविणाऱ्या रशियन पहिलवान बिस्कोस प्रथम बर्लीनमध्यें व नंतर हिंदुस्थानांत पतियाला येथें चीत केलें. अमेरिकेंतहि यांनीं विजय मिळवून हिंदी पहिलवानांचें सर्वश्रेष्ठत्व अद्यापि कायम राखलें आहे.

(९) **इमामबक्ष**—हे वरील जगत्‌विजयी गामांचे धाकटे बंधू असून सर्व पहिलवानांत प. गामांचे खालोखाल यांचेंच श्रेष्ठत्व मानलें जातें. दोघेहि बंधू पतियाळासंस्थानचे आश्रित आहेत.

(१०) **गुंगा**—यांनीं प. इमामबक्ष व प. गामा कल्लू यांशीं बरोबरीच्या कुस्त्या केल्या आहेत.

(११) **छोटूसिंग राजारामसिंग**—हे रजपुत पहिलवान मिरज (मोठी पाती) संस्थानचे आश्रित असून उत्तम कुस्ती खेळत असत.

(१२) **गोबर गूह**—हे बंगाली पहिलवान असून यांनीं युरोप व अमेरिका खंडांत जाऊन अनेक पाश्चात्य प्रसिद्ध पहिलवानांवर विजय मिळविला.




चित्र संख्या ४०३

(१) पहिलवान रमजू सरफुद्दीन, बडोदें.



(२) पहिलवान बूटा, बडोदें.

चित्र संख्या ४०४




चित्र संख्या ४०५

(३) पहिलवान गुलाम आलिया.




(४) पहिलवान कल्लू अलिया.

चित्र संख्या ४०६




चित्र संख्या ४०७

(५) पहिलवान गामा कल्लू.




(६) पहिलवान अहंमदबक्ष.

चित्र संख्या ४०८




(७) पहिलवान गुलाम महुद्दीन. पहिलवान ढीला.

चित्र संख्या ४०९




(८) पहिलवान रुस्तम इ हिंद गामा, पतियाळा.

चित्र संख्या ४१०




चित्र संख्या ४११

(९) पहिलवान इमामबक्ष, पतीयाळा




(१०) पहिलवान गुंगा, लाहोर

चित्र संख्या ४१२



चित्र संख्या ४१३


(११) पहिलवान छोटूसिंग राजारामसिंग, मिरज.



(१२) पहिलवान गोबर गूह, कलकत्ता. चित्र संख्या ४१४

श्री.

विटा.



उपोद्घात.

❀

मराठेशाहीच्या पुढील काळांत बंदुकीचा व तोफेचा उपयोग लढाईचे कामांत जास्त होऊं लागला होता, पण श्रीशिवाजी महाराजांचे वेळीं भाला, तरवार, पटा यां-सारख्या हत्यारांचाच लढाईचे वेळीं मुख्यत्वेंकरून उपयोग करण्यांत येत असे. त्यामुळें त्या वेळच्या लढाया हातघाईच्या होत असत. त्या काळीं हातघाईच्या लढाईंत वापरण्यासाठीं अनेक प्रकारचीं शस्त्रें प्रचारांत आलीं होतीं. त्या वेळच्या हत्यारांत भाला हें सर्वांत लांबून शत्रूस मारण्याचें हत्यार असे. त्याचा उपयोग पायदळास फारसा होत नसे. घोडेस्वार भाल्याचा उपयोग जास्त करीत. पायदळांत पटा, सांग (लोखंडी मुठीचा भाला), वाणा वगैरे हत्यारें वापरीत असत. हीं हत्यारें चांगल्या लांबीचीं असल्यामुळें त्यांचा मारा दूर असलेल्या शत्रूवर करतां येत असे. या काळींच विटा हें हत्यार जास्त अंतरावरून शत्रूस भोंसकतां यावें या हेतूनें प्रचारांत आणलें गेलें. हें हत्यार कोणी शोधून काढलें व केव्हां प्रचारांत आलें हें सांगण्यास आज कांहीं आधार नाहीं, पण हें हत्यार खास मराठ्यांचें आहे ही गोष्ट मात्र खरी. मराठ्यांच्या प्रत्येक लष्करांत कांहीं विटेकरी असत. अजून देखील जीं निरनिराळीं मराठी

लेखक :—




श्री. द. चिं. मुजुमदार,
बडोदें.

संस्थानें आहेत त्यांतून कांहीं ठिकाणीं नुसत्या शोभेदाखल म्हणून कांहीं विटेकरी लष्करांतून ठेवलेले दिसतात.

विटा म्हणजे सुमारें पाच फूट लांबीचा भाला व त्याचे बुडास ५–६ फुट लांबीची दोरी बांधून बनविलेलें हत्यार होय. भाल्यास १० इंच लांबीचें लोखंडी फळ बसविलेलें असतें. भाल्याचें बुडापासून एक फुटावर करंगळीच्या जाडीची एक मजबूत सुताची दोरी घट्ट बांधलेली असते. त्यामुळें या हत्याराचा मारा १० फुट लांबीवर असलेल्या शत्रूवर देखील करतां येतो. दोरीचें दुसरें टोंक उजवे हाताचे मनगटास घट्ट बांधतात व नंतर डावा हात पुढें व उजवा हात मागें ठेवून भाला धरतात व समोर असलेल्या शत्रूंवर जोरानें फेकून मारतात. भाला फेकून मारला तरी तो परत ओढून पुनः आपले हातांत घ्यावयाचा असतो. म्हणून दोरी हातास बांधून ठेवितात. याप्रमाणें फेकून मारलेला भाला परत मारणाराचे हातांत येत असल्यानें, एकच भाल्याचा अनेक वेळां उपयोग करतां येतो ही या हत्याराची खुबी आहे.

भाला समोर जोरानें नेमका फेकून मारणें व लागलींच तो परत ओढून आपले हातांत घेणें हें काम एकदम साधत नाहीं. यासाठीं मुद्दाम पुष्कळ सराव करावा लागतो. भाल्याचे फळाचे खालचे अंगास एक मोठा सुती गोंडा शोभेसाठीं लावतात. चित्र नं. ४१५ पाहिल्यानें याबद्दलची कल्पना येईल. आतां



चित्र संख्या ४१५

हें हत्यार व तें वापरणारे लोक फारच थोडे शिल्लक आहेत. दक्षिणेंतील कांहीं खेड्यांतून ह्या हत्याराचा खेळ क्वचित् शिल्लक राहिलेला दिसतो. कांहीं कांहीं कुटुंबांत या हत्याराची माहिती वंशपरंपरा चालत आलेली आहे. पण हल्लीच्या वातावरणाचा विचार करतां पुढें विटा म्हणजे काय हें समजण्यास देखील साधन राहणार नाहीं असें वाटतें.


श्रीमंत राजे बाळासाहेब मिरजकर (सिनिअर) यांचे मिरज तालुक्यांत सावळी नांवाचें लहान खेडें मिरजेपासून ३–४ मैलांवर आहे. तेथें चव्हाण नांवाचें शेतकऱ्याचें कुटुंब आहे. त्यांतील बहिरू तुकाराम चव्हाण व धोंडीबा तुकाराम चव्हाण हे दोघे भाऊ विट्याचा खेळ करतात. या घरांत वंशपरंपरेनेंच ह्या खेळाची माहिती आलेली आहे असें समजलें. बहिरू तुकाराम चव्हाण यांचे या खेळांचे फोटो घेतले आहेत. श्रीमंत मिरजकर यांनीं या लोकांस मुद्दाम मिरजेस बोलावून आणून त्यांचेकडून या खेळाची माहिती ज्ञानकोशासाठीं देवविली म्हणून ती आम्हांस महाराष्ट्रांतील व्यायामप्रेमी लोकांपुढें मांडतां आली.

आतां सर्वच जुनीं हत्यारें लढाईचे दृष्टीनें निरुपयोगीं झालेलीं आहेत, तरी त्यांचा उपयोग खेळ म्हणून करणें व्यायामदृष्ट्या जरूर आहे. विट्याचे खेळाचादेखील सुशिक्षित महाराष्ट्रीय तरुणांमधून प्रचार झाला पाहिजे. विटा घेतलेला मनुष्य मध्यभागीं उभा राहून त्याचे सभोंवतीं ४–५ माणसें पटे व मोठ्या ढाली घेऊन उभीं राहतात. नंतर विटेकरी जरूरीप्रमाणें पवित्रे बदलून ज्या बाजूनें हल्ला येण्याचा संभव असेल त्या बाजूस विट्याची फेक करतो. हल्ला करणारे लोक विट्याचा मार ढालीवर घेऊन आपला बचाव करतात. हा खेळ चालला म्हणजे मोठी मौज दिसते. एक मर्दानी खेळ म्हणून महाराष्ट्रानें ही विद्या संग्रहून ठेवण्यासारखी आहे. विटा करणाराचे हातापायांस उत्तम मेहनत होऊन अंगांत स्फूर्ति येते.

विटा खेळतांना अर्धी विजार, गंजीफरास अथवा अखूड बाह्याचा सदरा असा सुटसुटीत पोशाख असावा. विट्यास दोरी बांधून तिचें एक टोंक उजवे हाताचे मनगटास बांधतात. त्याची कल्पना चित्र नं. ४१५ वरून येईल.


विटा.

सलामी—या खेळांत भाग घेणारा विटेकरी व पटेकरी यांनीं चित्र नं. १ प्रमाणें डावे पाय पुढें ठेवून पवित्र्यावर उभें रहावें. विटेकऱ्यानें डावा हात पुढें व उजवा हात मागें ठेऊन चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें व पटेकऱ्यांनीं उजवे हातांत पटे व डावे हातांत मोठया ढाला घेऊन एका ओळींत उभें रहावें. नंतर सर्वांनीं आपले उजवे बाजूस तोंडें फिरवून चित्र नं. २ प्रमाणें मागें फिरावें व नंतर चित्र नं. २ प्रमाणें सर्वांचे डावे पाय मागें असतात ते उचलून, उजवे पायांचे-पुढें, मागचे बाजूस १–१॥ फूट अंतरावर चित्र नं. ३ प्रमाणें ठेवावे. म्हणजे डावे पाय पुढें व उजवे पाय मागें रहातील. नंतर प्रत्येकानें पुनः आपले उजवे बाजूस फिरून व उजवा पाय डावे पायाचे मागें ठेवून, चित्र नं. १ प्रमाणें मूळचे बाजूस तोंड करून उभें रहावें.




चित्र संख्या ४१६–४१८

वरप्रमाणें क्रिया करून मूळचे दिशेस तोंडें करून उभें राहिलें म्हणजे सलामी होते. सुरवातीस डावा पाय प्रत्येकाचा पुढें असतो. नंतर मागें तोंड फिरवून डावा पाय उचलून उजवे पायाचे पलीकडे ठेवावयाचा असतो व पुनः उजवीकडे फिरून, उजवा पाय उचलून डावे पायाचेमागें ठेवावा लागतो. एक सबंध चक्कर फिरून, दोन पवित्रे मागें जाऊन व पहिले बाजूस तोंड करून उभें राहिलें म्हणजे सलामीची क्रिया होतें. मागें फिरतांना विट्याचें (भाल्याचें) टोंक व पट्यांचीं टोंकें चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीकडे वांकवून पुनः चक्कर फिरून सुरवातीप्रमाणें वर आणून उभें रहावयाचें असतें.




चित्र संख्या ४१९

खेळतांना उभें रहावयाची रीत—सलामी झाल्यानंतर विटेकऱ्यानें मैदानाचे मध्यभागीं चित्र नं. ४१९ प्रमाणें उभें रहावें. त्याचे चारहि बाजूंस त्याचेवर हल्ला करणाऱ्या पटेकऱ्यांनीं त्याचेपासून १० फुटांपेक्षां जास्त अंतरावर उभें रहावें. नं. ४१९ च्या फोटोंत हल्ला करणारे तीनच पटेकरी आहेत व त्यांस फोटोचे सोईसाठीं म्हणून विटेकऱ्यापासून जवळ उभें केलें आहे. पण चित्र नं. ४२० चा फोटो प्रत्यक्ष खेळतांना घेतलेला आहे.



चित्र संख्या ४२०




चित्र संख्या ४२१

विट्याची फेक करून विटा परत घेण्याची रीत–चित्र नं. ४२१ यांत विटेकऱ्यानें एका बाजूस विट्याची फेक केलेली आहे. त्या वेळीं त्याचा डावा पाय पुढें असून उजवा हात पुढें आलेला आहे. पुढें गेलेला उजवा हात जोरानें मागें ओढून, फेकलेला विटा परत आला म्हणजे प्रथम डावे हातांत व नंतर उजवे हातांत चित्र नं. ४२२ प्रमाणें घ्यावयाचा असतो. याप्रमाणें विटा फेकून परत हातांत घेण्याचा चांगला सराव प्रथम करावा. नेहमीं उजवा पाय मागें व डावा पाय पुढें असेल त्या वेळीं चित्र नं. ४२२ प्रमाणें पवित्र्यावर उभें राहून विट्याची फेक करावी.



चित्र संख्या ४२२




चित्र संख्या ४२३-४२५

निरनिराळ्या दिशेस फेकी करण्याची रीत—चित्र नं. १ प्रमाणें मागील उजवा पाय वर उचलून उजवे बाजूस फिरावें व उचललेला उजवा पाय मागचे बाजूस ठेऊन (डावा पाय पुढेंच ठेवावा.) मागचे बाजूस चित्र नं. २ प्रमाणें तोंड करावें. नंतर त्या बाजूस विट्याची फेक करावी. नंतर पुनः मागील उजवा पाय उचलून, उजवे बाजूस फिरून, व उजवा पाय चित्र नं. ३ प्रमाणें मागें ठेऊन तिसरे बाजूस तोंड करून उभें रहावें.

चित्रें घेतांना तीन पटेवाले तीन बाजूस उभे केले होते म्हणून तीन बाजूस तोंडें फिरविलेलीं दाखविलीं आहेत. ज्याप्रमाणें जास्त पटेवाले भोंवतालीं असतील त्या मानानें जास्त बाजूस तोंडें फिरवितां येतात.

श्री.

मुकी.



उपोद्घात.

मुकी हा बॉक्सिंग सारखाच खेळ आहे. या खळाचा प्रचार काशीस पुष्कळ वर्षांपासून आहे. हातांत मोजे घालून हल्लीं बॉक्सिंग करतात पण पूर्वीं युरोपियन देशांतून देखील मोजे घातल्याशिवाय नुसत्या उघड्या हातांनीं बॉक्सिंग करीत असत. मुकीचे खेळांतहि हातांत कांहीं घालीत नाहींत. हा खेळ म्हणजे एक प्रकारची मारामारी आहे. पण ह्या मारामारींत भाग घेणारे लोक खेळ म्हणूनच्च यांत भाग घेतात. त्यामुळें कोणास लागलें तरी त्याबद्दल सरकारदरबारीं कधींच कोणी फिर्यादी करीत नाहींत. दरवर्षीं दिवाळीचे सुमारास आश्विनी पौर्णिमे-पासून कार्तिकी पौर्णिमेंपर्यंत व फाल्गुनांत धुळवडीचे दिवशीं मुकीचा खेळ काशींत अजूनहि होतो. दुर्गाघाटा-कडून ब्राह्मणमंडळी व ब्राह्मणघाटाकडून इतर सर्व जातीची मंडळी उभी राहून खेळ होतो. निदान गेल्या ३०० वर्षांपासून हा खेळ काशींत होत आहे. या खेळाची सुरवात कोणी व केव्हां केली तें नक्की समजत नाहीं. एका बाजूस सर्व प्रकारची ब्राह्मण मंडळी व दुसरे बाजूस अहीर वगैरे इतर सर्व जातीचे लोक यांच्यांत

लेखक :—



रा. रा. अ. कों. गोडबोले,

काशी.

हा खेळ होतो. ब्राह्मण मंडळींत महाराष्ट्रीय ब्राह्मणांची संख्या जास्त असते व ह्या मंडळींची उत्तम मुकी खेळणारे म्हणून प्रसिद्धिहि आहे. यांत भाग घेणारे ब्राह्मणांत चांगले वैदिक, शास्त्री वगैरे पढलेले विद्वान लोकहि असतात. इतकीं वर्षे झालीं तरी अजून ब्राह्मणमंडळींचीच दरवर्षी सरशी होते.

कांहीं वर्षांपूर्वी या खेळास सरकाराकडून बंदी करण्यांत आली होती, पण नंतर एक युरोपियन पोलीस कमीशनर मर्दानी खेळांचा शोखी काशीस आला होता. त्यानें आपले समक्ष मुद्दाम हा खेळ करविला व त्यांत भाग घेणारे लोक खेळ म्हणूनच त्यांत भाग घेतात असें त्यास दिसून आल्यानें त्यानें पुनः या खेळास परवानगी दिली. त्यावेळेपासून हा खेळ सतत चालू आहे.

दिवाळीचे सुमारास रात्री चांदणें असतें त्यावेळीं रोज रात्रीचें ८ ते ११ वाजेपर्यंत मुकीचा खेळ होतो. अगदीं लहान लहान मुलें या खेळास प्रथम सुरवात करतात व नंतर हळू हळू मोठीं माणसें मुकी खेळण्यास पुढें होतात. रस्त्यावरील ठरविलेल्या जागेचे पलीकडे समोरचे पक्षास हटविलें म्हणजे मागें हटणारा पक्ष हरला असें समजतात. दोन्ही बाजूंची चांगली खेळणारी कांहीं शिष्टमंडळी पंच म्हणून खेळ पाहण्यास बसतात व एखादे वेळीं खेळास घातकी मारामारीचें स्वरूप आलें आहे अगर एखाद्या इसमावर समोरच्या पक्षांतील जास्त मंडळींनीं एकदम हल्ला केल्यानें तो एकटा मनुष्य बचाव करूं शकत नाहीं असें दिसल्यास पंच मध्यें पडून खेळ थांबवितात. या खेळामुळें एखाद्या खेळणारावर ५–४ महिने आजारी होण्याचा प्रसंग येतो. पूर्वींपेक्षां अलीकडे या खेळाचें मान कमी झालें आहे. इंग्रजी शिक्षणाचा प्रसार जास्त होऊं लागल्यानें व शिक्षणाचे भाराखालीं शरीरसामर्थ्याचा ऱ्हास झाल्यानें नवीन तरूण पिढीमध्यें या मर्दानी खेळाची आवड कमी कमी होऊं लागली आहे ही वाईट गोष्ट आहे. काशी हें शहर पुरातन काळापासून विद्येचें माहेरघर समजलें जातें. येथील जुन्यातऱ्हेची विद्वान मंडळी अभ्यासाबरोबरच शरिराची जोपासना उत्तम रीतीनें करीत असत. अशक्त व भित्रें असणें यांत त्यांस कमीपणा वाटत असें. त्यावेळचा शिक्षणक्रमहि शरीरसामर्थ्याची हानि करणारा नसे. उच्च दर्जाची वैदिक व शास्त्री मंडळी उत्तम प्रकारें मुकी खेळणारीहि असत.

मुकी खेळणारी मंडळी इतर वेळीं मुद्दाम मुकीचा वेगळा अभ्यास करीत नाहींत. पण मुकी चांगली खेळतां यावी म्हणून दंड, बैठकी, कुस्ती वगैरे सारखे व्यायाम करून मात्र शरीर उत्तम प्रकारें तयार बनवितात. हातांच्या मूठी बंद करून बोटांच्या वरील हाडांनीं समोरच्यास मुकी (गुद्दा–ठोसा) मारावयाची असल्यामुळें हीं हाडें मजबूत बनविण्यासाठीं कित्येक मंडळी गंगेच्या घाटावर स्नानासाठीं जातांना लहानशा लोटींत दूध घेऊन जातात व त्यांतील थोडें दूध घाटावरील दगडावर ओतून त्यावर पालथा हात आपटण्याची संवय करतात. याप्रमाणें संवय केल्यानें त्याबाजूचीं हाडें मजबूत होऊन मुकीचा मार जोरानें बसतो. याशिवाय मुकीचा खेळ शिकविण्यासाठीं पद्धतशीर हात वगैरे

बसविलेले नाहींत. उजव्या व डाव्या दोन्ही हातांचा मुकी खेळतांना उपयोग करतात. एक हात आडवा ठेऊन त्यावर सामनेवाल्याची मुकी अडवून बचाव करतात व दुसऱ्या हाताची मूठ बंद करून त्या मुठीनें समोरच्या गड्याचे कानशिलावर मुकी मारतात. मुकीचा मुख्य मार कानशिलावरच असतो. तेथें मार बसल्यानें मनुष्य तिरमिरी येऊन बेशुद्ध होऊन पडतो. कमरेच्या वरचे भागावर कोठेंहि मुकी मारण्याची परवानगी असते.

या खेळांत शरीरसामर्थ्य व हिम्मत या दोन्हींची जरूर लागते. अगदीं लहानपणापासूनच या खेळास सुरवात करतात. त्यामुळें खेळणारांची नजर त्याकामीं योग्य प्रकारें तयार होते. त्याचा आत्मविश्वास वाढतो. मुकी खेळण्यास उभें राहिलें म्हणजे एक प्रकारचें अवसान येतें. ज्यास हिम्मत असते तो या खेळांत प्रवीणता मिळवितो. मारण्याची, त्याचप्रमाणें मार खाण्याची अशीं दोन्ही तऱ्हेची धमक व शक्ति अंगांत असावी लागते. तरच हा खेळ नीट साधतो.

श्री. नारायणगुरु बाळंभट देवधर व श्री. लक्ष्मणगुरु बाळंभट देवधर या दोघांची मुकीचे खेळाबद्दल पूर्वी हे काशीस होते त्यावेळीं फार ख्याति होती. हे मुकी खेळण्यास पुढें झालें म्हणजे समोरचे बाजूस पंचवीस पंचवीस माणसें असलीं तरी तीं एकामागून एक मागें हटत. कारण यांची एकच मुकी ज्यावर बसली तो मनुष्य तत्काल बेशुद्ध होऊन खालीं पडत असे. मी व माझे बंधु कै. नारायणगुरु गोडबोले पुष्कळ वर्षें मुकीच्या खेळांत भाग घेत होतों. अजून आमच्या आखाड्यांतील कांहीं मुलें दरवर्षी मुकीचे खेळांत भाग घेतात. चांगली मुकी खेळणारांची मुकी इतक्या जोरानें बसते कीं तसली मुकी मारून ती मंडळी एखादी पक्की टेबली वीट देखील सहज फोडूं शकतात.

बॉक्सिंगचे खेळांत गुद्दा मारतात तो समोर सरळ हात नेऊन मारतात, पण मुकीचे खेळांत मुकी मारतांना हात बाजूनें गोल फिरवून मुकी मारतात. बॉक्सिंग मधील गुद्दा नाकावर, तोंडावर, पोटावर, छातीवर वगैरे ठिकाणीं शरिराचे पुढील भागांवर मारतात. पण मुकीचा मार कानशील, बरगडी, जबडा, वगैरे सारख्या डाव्या-उजव्या बाजूंच्या भागांवर मारतात. बॉक्सिंगचा खेळ हल्लीं उघड्या हातानें खेळूं देत नाहींत. नरम मोजे घालून खेळ खेळावयाचा असल्यानें त्या खेळाचा अभ्यास नेहमीं करतां येतो तसा मुकीचा अभ्यास करतां येत नाहीं. अलीकडचे स्थितीचा विचार करून मुकीचे खेळासाठीं नरम गादीच्या हातमोजांचा उपयोग करणें जरूर आहे. तसें केलें तरच हा एक जूना उपयुक्त मर्दानी खेळ यापुढेंहि चालूं राहील. नाहींतर हा खेळ अजिबात नाहींसा होईल अशी भीति वाटते. हा खेळ अवघड असल्यानेंच याचा प्रचार काशीचे बाहेर कोठेंच झाला नसावा असें वाटतें. पण त्यास सौम्य स्वरूप दिलें तर या मर्दानी खेळाचा सर्व महाराष्ट्रभरहि प्रसार करतां येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.




मुकी खेळणारी ब्राह्मण मंडळी.



मुकी खेळणारी अहीर वगैरे मंडळी.

मुकी.



डाव नं. १

चित्र संख्या ३२६–३३२

मुकी-(डाव नं. १)—चित्र नं. १ प्रमाणें खेळणारांनीं एकमेकांचे समोर उभें रहावें. नंतर मुकी मारणारानें (उजवी कडील गड्यानें) डावा पाय वर उचलून अवसानानें पुढें टाकावा व त्याच अवसानांत मागील उजवा पाय चित्र नं. २ प्रमाणें पुढें ठेऊन उजवे हातानें समोरच्या गड्याच्या डावे कानशिलावर जोरानें मुकी मारावी. भुवईचें टोक व त्याचे पातळींत येणारा कानाचा कोपरा यांचे मधोमध जी पोकळ जागा असते त्या जागेवरच मुकीचा मार बसला तर सामनेवाल्यास इजा होऊन तो बेशुद्ध पडतो. पण त्या जागेवरचे अंगास मुकी लागली तर चांगला मार लागत नाहीं. त्या जागेच्या खालचे अंगास मुकी लागली तर जबड्याचे हाडास इजा होते व त्या जागेच्या आणखी जास्त खालीं मुकी लागली तर दाढेस इजा होते.

लेखक :—



रा. रा. ल. ना. सप्रे,
बडोदें.


वर प्रमाणें सामनेवाल्यानें आपणास (चित्र नं. २ प्रमाणें) मुकी मारली तर आपण त्याच चित्राप्रमाणें आपले डावे हातानें त्याचा उजवा हात अडवून त्याचा हात झटक्यानें बाजूस दाबावा व आपला उजवा पाय पुढें टाकून मुकी मारणारासच आपण आपले उजवे हातानें त्याचे डावे कानशिलावर मुकी मारावी.

आपण चित्र नं. ३ प्रमाणें मुकी मारली तर समोरचा खेळणारा त्याच चित्रांत दाखविल्याप्रमाणें एकदम खालीं बसून आपली मुकी चुकवितो.

समोरच्या गड्यानें बसून आपण मारलेली मुकी चुकविली कीं तो उठून उभा राहतो व त्याचा डावा पाय चित्र नं. ४ प्रमाणें पुढें टाकून त्याचे डावे हातानें तो आपले उजवे कानशिलावर त्याच चित्राप्रमाणें मुकी मारतो.

त्यानें आपणास चित्र नं. ४ प्रमाणें मुकी मारण्याचा प्रयत्न केला तर आपण स्फूर्तीनें आपला उजवा पाय चित्र नं. ५ प्रमाणें मागें नेऊन व त्याच अवसानांत आपल्या डाव्या हातानें त्याच चित्राप्रमाणें त्याचा डावा हात जोरानें बाजूस उडवून, आपला बचाव करावा.

नंतर लागलींच आपला मागें नेलेला उजवा पाय पुढें टाकून सामनेवाल्याचे डावे कानशिलावर मुकी मारावी. चित्र नं. ६ प्रमाणें डावा पाय पुढें ठेऊन मुकी मारूं नये. आपण मुकी मारली तर समोरचा गडी चित्र नं. ६ प्रमाणें त्याचे डावे बाजूस वाकून व पुढील डावा पाय बाजूस काढून त्याचा बचाव करतो. नंतर मागील डावा पुढें टाकून व सरळ उभें राहून सामनेवाला चित्र नं. ७ प्रमाणें त्याचे उजवे हातानें आपले उजवे कानशिलावर मुकी मारतो. यावेळीं आपण आपले उजवे हातानें त्याचा हात बाजूस उडवून आपला बचाव करावा.



डाव नं. २

चित्र संख्या ३३३-३३७

मुकी–(डाव नं. २)—आपल्या सामनेवाल्यांनीं आपणास चारी बाजूंनीं घेरल्यास आपण आपला बचाव करून त्यांचेवर कशा रीतीनें हल्ला करावा ते ध्यानांत येण्यासाठीं हा डाव दिला आहे.

आपले समोर सामनेवाला (डावे बाजूचा) चित्र नं. १ प्रमाणें उभा असेल तर आपला मागील उजवा पाय चित्र नं. २ प्रमाणें वर उचलून पुढें टाकावा व आपले उजवे हातानें समोरच्या गड्याचे डावे कानशिलावर मुकी मारावी. नंतर त्याच अवसानांत आपले डावे बाजूनें मागें फिरावें म्हणजे चित्र नं. ३ प्रमाणें उजवा पाय मागें व डावा पाय पुढें होतो. नंतर चित्र नं. ४ प्रमाणें आपला डावा पाय पुढें टाकून आपले डावे हातानें त्या बाजूच्या सामनेवाल्याचे (चित्रांतील उजवे बाजूचा गडी) उजवे कानशिलावर मुकी मारावी.


नंतर आपले उजवे बाजूस फिरावें, आपला उजवा पाय मागें न्यावा व चित्र नं. ५ प्रमाणें आपला उजवा हात वर करून उभें राहावें.

नंतर मागील उजवा पाय पुढें टाकून आपले उजवे हातानें त्या बाजूचे शत्रूस मुकी मारावी.

आजूबाजूचे शत्रूंच्या माऱ्याकडे चौकस नजर ठेवून, जरुरीप्रमाणें स्वतःचा बचाव करावा व त्या बाजूचे शत्रूस मुकी मारावी. बचावासाठीं प्रथमचे डावांत सांगितल्याप्रमाणें प्रसंगास जी क्रिया लागू पडेल तिचा उपयोग करावा.

वरील डावांत जे पवित्रे बदलण्याचें धोरण दाखविलें आहे त्याप्रमाणें पवित्रे बदलण्याचा चांगला सराव झाला म्हणजे चलाखीनें उड्या मारून व पलट्या घेऊन याच क्रिया जास्त जलदी व सफाईनें करतां येतात. त्याप्रमाणें केलें तर बचाव करणें सोपें जातें व मुकी जोरानें मारतां येते.

भाला लढंत.




हात नं. १


चित्र संख्या ४३८-४४१

भाला लढंत–(हात १ ला)—खेळणारांनीं चित्र नं. १ प्रमाणें डावे पाय पुढें ठेवून व भाले चित्राप्रमाणें धरून उभें रहावें. या स्थितीस **आराम** म्हणतात. नंतर चित्र नं. २ प्रमाणें डावा पाय ताठ व उजया पाय गुडघ्यांतून वाकलेला ठेवून व शरिराचा मागें झोंक टाकून 'हुशीयार' किंवा 'सावधान' स्थितींत चित्राप्रमाणें भाले धरून उभें रहावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें मागचे उजवे गुडघे जमिनीवर ठेवून व मागें अवसान घेऊन रहावें. यावेळीं भाल्यांचीं टोकें मागें जमिनीवर टेकून ठेवावीं. नंतर पुनः तसेंच वर अवसानानें उठून चित्र नं. ४ प्रमाणें भाले धरावे व सामनेवाल्यावर भाल्यानें खोंच मारावी. याप्रमाणें खोच मारतांना डावा हात पुढें लांब करावा. यावेळीं खेळणारांनीं भाल्यानें समोरच्या गड्याचा भाला अडवून बाजूस करावा व आपला बचाव करावा.

लेखक :—



रा. रा. बा. गो. कोठी,
बडोदें.




हात नं. २

चित्र संख्या ३४२–३४५

भाला लढंत–(हात २ रा)—डावीकडील इसमानें खांद्या वरून भाला फिरवून त्याचे भाल्याचे मागचे टोकानें आपल्यावर चित्र नं. १ प्रमाणें **तमाचाचा** वार मारला तर आपण मागें झोक घेऊन त्याच चित्राप्रमाणें आपले भाल्यानें त्याचा वार आडवावा. नंतर आपल्या भाल्याच्या मागच्या दांड्यानें चित्र नं. २ प्रमाणें समोरच्या गड्यावर **शीरचा** वार मारावा व त्याच चित्राप्रमाणें त्यानें उजवा पाय मागें घेऊन व गुडघा जमिनीवर टेकून वार आडवावा. नंतर समोरच्या गड्यानें उठून व त्याचा उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. ३ प्रमाणें आपल्यावर कमरेचा वार मारावा व आपण त्याच चित्राप्रमाणें वार आडवावा. नंतर आपण उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. ४ प्रमाणें समोरच्या गड्यावर खोंच मारावी व त्यानें उजवा पाय मागें घेऊन त्याच चित्राप्रमाणें आडवावी.

ढाल तरवारीची लढंत.



हात नं. १

चित्र संख्या ४४६-४५१

लेखकः—रा. रा. **बाबूराव गोपाळ कोठी,** (व्यायाम विशारद)
व्यवस्थापक, श्रीरामदास व्यायामशाळा; कसरत अध्यापक, न्यू ईरा हायस्कूल, बडोदें.

ढाल तरवारीची लढंत-(हात १ ला)—फरी व गदक्याचा खेळ हा ढाल तरवारीचा खेळ आहे. तरवारीचे ऐवजीं चामड्यानें मढविलेली काठी घेऊन खेळतात. रोजचे खेळांत इजा होऊं नये म्हणून चामडे मढविलेल्या गदक्याची योजना केलेली आहे. गदकाफरीचा चांगला अभ्यास झाला म्हणजे प्रत्यक्ष तरवार घेऊन खेळण्याचा सराव करावा.

उजवा पाय पुढें व डावा पाय मागें ठेऊन पवित्र्यावर उभें राहावें. नंतर चित्र नं. १ प्रमाणें डावे बाजूचे गड्यानें **तमाचाचा** वार आपणावर केला तर आपण त्याच चित्राप्रमाणें डावे हातांत धरलेली ढाल पुढें करून वार आडवावा व चित्र नं. २ प्रमाणें वार करणारावर आपण **कमरेचा** वार मारावा. सामनेवाल्यानें त्याच चित्राप्रमाणें उजवे बाजूस कमरेपुढें ढाल धरून वार आडवावा. नंतर कमरचा वार आडवणारानें चित्र नं. ३ प्रमाणें आपणावर **चीरचा** वार केला तर आपण त्याच चित्राप्रमाणें **चीरचा** वार आडवून चित्र नं. ४ प्रमाणें चीर मारणारावर **शीरचा** वार करावा. समोरच्या गड्यानें शीरचा वार आडवून चित्र नं. ५ प्रमाणें **अणीचा** (हुलचा) वार मारावा. आपण त्याच चित्राप्रमाणें वार आडवावा व चित्र नं. ६ प्रमाणें **बाहेरा** मारावा. समोरच्या गड्यानें त्याच चित्राप्रमाणें बाहेऱ्याचा वार आडवावा.

सूटचा (मारामारीचे खेळाचा) नमुना म्हणून वरील हात दाखविले आहेत. सूटमध्यें वाटेल तो वार वाटेल त्यावेळीं मारावयाचा असतो. आपसांत तरवारीनें सूट खळतांना फार काळजीनें खेळावें.

श्री.

लाठीलढंत

उपोद्घात.

❀

लेखकः—रा. रा. बाबूराव गोपाळ कोठी (व्यायाम विशारद),
व्यवस्थापक, श्री रामदास व्यायामशाळा; कसरतअध्यापक, न्यू ईरा हायस्कूल, बडोदें.

लाठीची कवायत करण्याचा रिवाज हल्लीं सर्व व्यायामशाळांतून चालू आहे. लाठीचा उपयोग शत्रूवर हल्ला करण्याचे कामीं करावयाचा असतो व त्यानें आपल्यावर लाठीनें हल्ला केला तर त्या हल्यापासून लाठीच्या सहाय्यानें आपला बचाव करण्यासाठींहि लाठीचा उपयोग करावयाचा असतो.

वरील हेतु चांगले रीतीनें साध्य करण्यासाठीं लाठी लढंतीचे हात बसविलेले आहेत. लाठी फिरविणाराचे कानाइतकी ऊंच व वजनदार लाठी सहज वापरतां यावी व आपल्या इच्छेप्रमाणें ती फिरवितांहि यावी म्हणून लाठीकवायतीच्या हातांचा चांगला सराव करावा. पण हे हात नीट करतां आल्यानंतर लाठी लढंत (लाठीची सूट) खेळण्याचा अभ्यास करण्याची खास जरूर आहे. कारण खऱ्या मारामारीचे प्रसंगीं लाठीची सूट खेळण्याचे संवयीचाच जास्त उपयोग होतो. अशा प्रकारचे कांहीं मारांचे व बचावाचे हात बसविलेले आहेत. पण परक्या तालमींतील सामनेवाल्या गड्यांशीं लाठीची सूट खेळतांना या हातांचा कोणताच क्रम राहूं शकत नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवणें जरूर आहे.

लाठीची सूट खेळण्याचा आपसांत सराव करावयाचा असेल तेव्हां लाठ्या एक एक इंच व्यासाच्या वेताच्या घ्याव्या व त्यांवर जाड चामड्याच्या सैल पिशव्या घालून त्या लाठ्यांनीं सूट खेळावी म्हणजे लाठी लागली तरी फारशी इजा होणार नाहीं. लाठीच्या सूटचे सामने करणें असेल तर **अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळानें लाठी** छूट (सूट) चे नियम प्रसिद्ध केले आहेत त्यांचा उपयोग करावा.

लाठी छूटचे नियम :—

(१) खेळण्याची **जागा** ४० फूट व्यासाची असावी.

(२) **लाठीची जाडी** एक इंच व्यासाची असावी. ती वेताची व कमावलेल्या जाड कातड्यानें मढवलेली असावी. मढाईच्या पिशवींतून लाठी सहज काढतां घालतां येईल इतकी ती पोकळ (सैल) असावी.

(३) **कानटोप** घालून सूट खेळावी. कानटोप तयार करतांना प्रथम कापड, त्यावर कापूस, नंतर चांदव्याच्या ठिकाणीं जाड पत्रा व भोंवतालीं जाड पुठ्ठा (कार्डबोर्ड) ठेऊन त्यावर कापूस, नंतर पुनः कापड घालून तयार करावा. कानटोपानें खेळणाराच्या डोक्याचें रक्षण होतें.

(४) **शिरस्त्राण** तारांनीं गुंफलेलें व कानटोपाप्रमाणें आंतल्या बाजूस कापसाची जाड गादी घातलेलें असावें.


(५) **दास्तानें**—मनगटापासून प्रकोष्ठापर्यंतच्या हाताच्या भागाचें संरक्षण होण्याचे दृष्टीनें जाड चामड्याचीं व आंतून गादी असलेलीं दोन दास्तानें घालावीं. त्यांस बांधण्यासाठीं वस्त्रें अगर बंद असावे. दास्तान्यांची लांबी नऊ इंच असावी.

(६) लंगोट नेसून वर अर्धी पँट (विजार) घालावी. अंगांत गंजीफरास घालावा.

(७) लंगोटाचे जागेवर व नाक, डोळा यांवर वार मारण्याची मनाई आहे.

सूटची कल्पना यावी म्हणून दोन प्रकारच्या सूटच्या घाई दाखविल्या आहेत. पण खऱ्या सूटच्या खेळांत मारांच्या व बचावाच्या हातांचा कोणताच अनुक्रम रहात नाहीं. लाठीच्या सूटचा खेळ मर्दानी आहे. त्यांत तडफ, हिंमत, मार सहन करण्याची शक्ति, प्रसंगावधान वगैरे गुणांची कसोटी होते. सूट खेळतांना शरिरास वार लागून जागा हिरवीनिळी झाली म्हणजे बचाव कसा करावा याची खरी स्वानुभवयुक्त माहिती मिळूं शकते. प्रत्यक्ष अनुभवानेंच खरी सूट शिकावयाची असते. तसेंच सूट खेळणाराची परीक्षा भिन्न भिन्न तालमींतील गड्यांशीं सूट खेळतांना व प्रत्यक्ष मारामारीचे प्रसंगींच होते.

लाठीलढंत.



डाव नं. १

चित्र संख्या ४५२–४५६

लाठीलढंत १ ली—चित्र नं. १ प्रमाणें लाठ्या धरून खेळणारांनीं उभें रहावें. आपापले डावे पाय पुढें व उजवे पाय मागें ठेवावे. नंतर शिष्टाचाराप्रमाणें सलामी घेऊन खेळण्यास सुरवात करावी. उजवे बाजूचे गड्यानें 'तमाचा'चा वार मारला तर समोरच्या गड्यानें चित्र नं. २ प्रमाणें आपले डोक्यावर व एकंदर शरिराचे जरा पुढें, डावे बाजूस उतरती लाठी धरून त्यावर तो तमाचाचा वार आडवावा. वार मारणारानें मागें असलेला उजवा पाय (पवित्रा) चित्र नं. २ प्रमाणें पुढें टाकून वार मारावा. बचाव करणारानें लाठी तिरपी धरलेली असते म्हणून उतरत्या लाठीवरून तो वार खालीं निसरून जातो. तमाचाचा वार चित्र नं. २ प्रमाणें अडविणारानें उजवा पाय पुढें टाकून 'शीर'चा वार चित्र नं. ३ प्रमाणें मारावा व उजवे बाजूचे गड्यानें चित्रांत दाखविल्याप्रमाणें लाठी तिरपी धरून तो शीरचा वार रोकावा.

शीरचा वार आडविणारानें वार करणारावर चित्र नं. ४ प्रमाणें 'कमरेचा' वार मारावा व त्याचे सामनेवाल्यानें डावे बाजूस उभी लाठी धरून चित्र नं. ४ प्रमाणें तो कमरेचा वार आडवावा. कमरेचा वार आडवून, डावे बाजूचे गड्यानें चित्र नं. ५ प्रमाणें 'खोचेचा' (हूलचा) वार समोरच्या गड्याचे पोटावर मारावा व सामनेवाल्यानें पुढें ठेवलेला उजवा पाय मागें नेऊन व जरा बाजूस सरकून चित्र नं. ५ प्रमाणें तो खोचेचा वार आडवावा व आपले लाठीनें समोरच्या गड्याची लाठी बाजूस जोरानें ढकलून द्यावी.



डाव नं. २

चित्र संख्या ४५७-४६२

लाठीलढंत २ री—आपण (उजवे बाजूचे गड्यानें) चित्र नं. १ प्रमाणें उजवा पाय पुढें ठेऊन सामनेवाल्याचे पोटावर 'खोच' मारावी. सामनेवाल्यानें जरा बाजूस होऊन व त्याच चित्राप्रमाणें डावे बाजूस लाठीचें टोंक खालीं जमिनीकडे करून आपली लाठी डावे बाजूकडे ढकलावी व त्याच अवसानांत त्याची लाठी आपले लाठीचे खालीं घालून ती जोरानें त्याचे डावे बाजूकडून वर उचलून उजवीकडे चित्र नं. २ प्रमाणें जमिनीवर दाबावी. याप्रमाणें झालें तर आपण आपली लाठी समोरच्या गड्याचे लाठीखालून चित्र नं. ३ प्रमाणें मागें ओढून काढून घ्यावी. नंतर लागलींच चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें उजवा पाय मागें नेलेला असतो तो पुढें टाकून चित्र नं. ४ प्रमाणें समोरच्या गड्यावर लाठीनें शीरचा वार करावा व त्याच चित्राप्रमाणें समोरच्या गड्यानें तो वार डोक्यावर लाठी जरा तिरपी धरून आडवावा. शीरचा वार आडविला असें पाहतांच आपण चित्र नं. ५ प्रमाणें समोरच्या गड्याचे उजवे बाजूनें उजवे बाजूचे कमरेवर वार मारावा व समोरच्या गड्यानें त्याचा उजवा पाय मागें घेऊन वार आडवावा. तो वार आडविला असें पाहून आपण समोरच्या गड्यास उलट वार करण्यास वेळ न देतां तिसरा वार त्याच्या पायाच्या खालच्या बाजूवर (तंगडीवर) चित्र नं. ६ प्रमाणें मारावा व सामनेवाल्यानें डावा पाय ऊंच करून पायावरील तो वार वाचवावा. या प्रकारांत एकानेंच लागोपाठ तीन वार मारले आहेत हें लक्षांत घ्यावें.

श्री.

बाणांची लढाई.

बाणांची लढाई या नांवावरून वाचकांचा गैरसमज होण्याचा संभव आहे. बाण म्हणजे धनुष्यबाण नव्हे. चित्र नं. ४६३ मध्यें दाखविल्याप्रमाणें एक हात लांबीच्या कामटीच्या टोंकास दोन इंच लांब व दारु भरून केलेली २–२॥ इंच घेराची कागदाची सुरळी बांधतात त्यास बाण म्हणतात. ही सुरळी पेटवून बाण टाकला म्हणजे तो दारूचे जोरानें ५०–६० फूट लांब जातो. दिपवाळीचे दिवसांत नाना तऱ्हेची सोडण्याची दारु तयार करून विकतात जींत वर सांगितल्याप्रकारचें लहान मोठे बाण विकण्यांत येतात. पण या बाणांचा लढाईच्या स्वरूपांत खेळ म्हणून फक्त वाई व पंढरपूर या दोन ठिकाणींच उपयोग करतात. रुपाया दीड रुपाया शेकड्याप्रमाणें हे बाण विकत मिळतात.

लेखक :—



श्री. द. चिं. मुजुमदार,
बडोदें.

वाईस दर वर्षी कार्तिक शु॥० १५ ला अशा प्रकारच्या बाणांच्या लढाईचा खेळ होतो. सतत १५० वर्षांपासून हा खेळ वाईस चालू आहे. त्या खेळास अजूनपर्यंत सरकारांतून बंदी करण्यांत आलेली नाहीं. ह्यांत भाग घेणारी मंडळी केवळ मर्दानी प्रकारचा खेळ म्हणूनच ही लढाई खेळतात. दरवर्षी या खेळांत १०–१२ माणसें कमी जास्त प्रमाणांत भाजली जातात. पण त्या बद्दलच्या फिर्यादी सरकार दरबारांत होत नाहींत. गणपति आळी, धर्मपूरी, ब्राह्मण आळी वगैरे भागांतील मंडळी एका बाजूस व मधली आळी, गंगापुरी वाड्या (श्री वाडी सिद्धनाथ वाडी) वगैरे भागांतील मंडळी दुसरे बाजूस असतात. प्रत्येक बाजूस सुमारें ५० इसम असतात. काशी सिद्धेश्वराचा बोळ व गणपति-घाट या जागीं हा खेळ दरवर्षी होतो. मधल्या आळीचें धर्मशाळेपर्यंत (निमजग्या पर्यंत) एका बाजूची मंडळी मागें सरली किंवा दुसरे बाजूची मंडळी पुलापर्यंत मागें सरली म्हणजे ती ती बाजू हरली असें समजण्यांत येतें.

धोमपासूनची आजूबाजूच्या खेड्यांतील मंडळी देखील या दिवशीं या खेळांत सामील होतात. सुताचे काकडे करून घेतात व त्यावर हे बाण पेटवून समोरच्या मंडळीचे अंगावर टाकतात. बाणापासून शरिराचा बचाव करण्यासाठीं घोंगडी किंवा पोतीं ओलीं करून




चित्र संख्या ४६३

अंगावर घेतात. कित्येकजण गुल पेटविलेला काकडा धरून व तो वाऱ्यानें विझूं नये म्हणून त्याचे आड पत्र्याचा तुकडा घेऊन खेळांत सामील होतात. कित्येकजण मोंगली एरंडाचीं वाळलेलीं लाकडें पेटवून घेतात व त्यांचेवर बाण पेटवितात.

उत्तम खेळाडू म्हणून नांवाजलेली जी मंडळी असतात ती पुढील बाजूस उभी रहातात व त्यांस बाण पुरविण्यासाठीं ३–४ मंडळी त्यांचेबरोबर असतात. एका रात्रींत ३०–३५ हजार बाण सोडण्यांत येतात. मधून मधून खेळास इतका जोर येतो कीं सबंध आळी पेटली आहे असा भास होतो. एखादे वेळीं पेटविलेला बाण शत्रूवर टाकण्याचे आधींच हातांतले हातांत फुटतो. त्यावेळीं बाण धरणारा मनुष्य चांगलाच भाजला जातो. रात्रीं एकदोन वाजेपर्यंत हा खेळ चालतो. तो पाहण्यास लोकांची पुष्कळ गर्दी जमते.

या खेळांत खेळणारांत हिम्मत असावी लागते. तसेंच त्याची दृष्टि तिजवर कोणताहि अनिष्ट परिणाम होणार नाहीं इतकी घटलेली असावी लागते. प्रसंगीं भाजलें तरी मागें न सरतां हिमतीनें शत्रूवर हल्ला सुरूं ठेवावा लागतो. मराठेशाहीचे मर्दानी काळांत हा खेळ सुरूं झालेला आहे. कालमानाप्रमाणें या खेळाचें प्रमाण कमी कमी होत आहे. अशा खेळांमुळें तरुणांचे मनांत मर्दानी गुणांचा विकास होतो.

श्री.



उपोद्घात.

❀

हनुमन्ती लकडी–बजरंगी थाट.

फरीगदक्याचा खेळ खरोखरी ढालतरवारीचा आहे. जुन्या वेळीं हातघाईचे लढाईचे प्रसंगीं तरवारीचा उपयोग फार होत असे व अजून देखील, नाना प्रकारच्या स्फोटक द्रव्यांचे सहाय्यानें उडणारीं शस्त्रें उपयोगांत आलीं आहेत तरी, तरवारीचा उपयोग पूर्णपणें नष्ट झालेला नाहीं. अगदीं आधुनिक तऱ्हेच्या लष्करांतून तरवारीनें आपलें अस्तित्व कायम ठेविलें आहे. खऱ्या आणीबाणीचे प्रसंगीं तरवारीचा उपयोग नीट करतां यावा म्हणून तरवार वापरण्याची संवय नेहमीं ठेवणें जरूर असतें. रोज सरावासाठीं खरी तरवार घेऊन द्वंद्व खेळणें शक्य नसल्यानें तरवारीचे बदलीं चामड्यानें मढविलेली काठी (गदका) व फरी (लहानशी चामड्याची ढाल) घेऊन खेळण्याचा प्रघात आहे. म्हणून या खेळास "फरीगदका" असें नांव पडलें आहे.


लेखक :—



श्री. द. चिं. मुजुमदार,
बडोदें.

खेळण्याचें सामान.

खेळणाराचे वयमानाप्रमाणें फरी व गदका यांचा आकार व माप कमीजास्त ठेवावें. मोठ्या वयाचे माणसासाठीं गदका ३ फूट २ इंच अगर ३ फूट लांबीचा असावा व फरी ९ इंच व्यासाची व मजबूत चामड्याची सुमारें १ रतल वजनाची असावी. (चित्रावरून फरीगदके कसे असतात त्याची कल्पना येईल.)



फरीगदके.

चित्र संख्या ४६४

पोषाख.

ह्या खेळासाठीं अमुक एक प्रकारचाच पोषाख पाहिजे अशी अवश्यकता नाहीं. तरी पण अलीकडे अर्ध्या विजारी व आखूड बाह्यांची कुडती वापरण्याचा रिवाज पडला आहे. या तऱ्हेचे कपडे असतील तर चांगले. विजारीचे आंत लंगोट अवश्य नेसावा म्हणजे पाय वेडावाकडा पडला तरी अपाय होत नाहीं. शिवाय **सूट** खेळतांना टोपी घालावी म्हणजे डोक्यावर गदक्याचा तडाखा बसला तरी डोक्याचा बराच बचाव होतो.

खेळाची जागा.

या खेळासाठीं निदान २०×२० फूट मापाची जागा असावी. यापेक्षांहि मोठें मैदान असलें तर बरेंच. संघाकडून हा खेळ खेळवून घ्यावयाचा असेल तर खेळणारांचे संख्येच्या मानानें मोठी जागा पाहिजे हें सांगणें नकोच.

खेळाचे मुख्य भाग.

या खेळाचे **घाई** व **सूट** असे दोन प्रकार आहेत. बचावासाठीं फरीचा उपयोग करावयाचा असतो व फरी डावे हातांत असते, ती जरूर त्याप्रमाणें वाटेल त्या जागीं चटकन नेतां यावी म्हणून त्या हातास व गदक्याचे हातास योग्य वळण व कार्यक्षमता आणणें जरूर आहे. या हेतूनें निरनिराळे हातांचा (मारांचा–वारांचा) अनुक्रम ठरवून त्यांच्या **घाई** (धडे) बसविले आहेत. दोन्ही हातांच्या क्रिया व पायांची चाळवाचाळव योग्य रीतीनें करतां यावी अशी योजना या 'घाई' बनवितांना जुन्या वस्ताद मंडळींनीं फार उत्तम प्रकारें केलेली आहे. म्हणून फरीगदका नीट खेळतां यावा अशी इच्छा असणारानें या निरनिराळ्या 'घाई' उत्तम रीतीनें घटविण्यास कंटाळूं नये. 'घाई' नीट खेळतां आली म्हणजे 'सूट' खेळण्यास फार मदत होते. फरीगदक्यांचा खरा मर्दानी खेळ म्हणजे 'सूट' खेळणेंच होय. यांतच खेळणाराच्या चलाखीची, धैर्याची, प्रसंगावधानाची व चिकाटीची खरी कसोटी होते. नुसती 'घाई' खेळणें अगर मिह्लतची 'सूट' खेळणें म्हणजे नुसती कसरत करणें होय.

निरनिराळ्या परंपरा.

उत्तर हिंदुस्थानांत फरीगदका खेळण्याचा रिवाज विशेष आहे. या खेळाच्या अनेक परंपरा, कांहीं हिंदु वस्तादांच्या व कांहीं मुसलमान वस्तादांच्या अशा प्रचलित आहेत. सर्व परंपरांतून मुख्य हात व तत्वें सारखीच आहेत. पण पेटातपशीलांत फरक आहे. अमुक परंपरेचा खेळ श्रेष्ठ आहे असें ठरविणें कठीण आहे. येथें ज्या परंपरेची लकडी देण्यांत येत आहे ती हिंदु परंपरेची आहे. या लकडीस '**हनुमन्ती लकडी**' म्हणतात व या परंपरेंतील उभें राहण्याचे पद्धतीस 'बजरंगी थाट' म्हणतात. श्री. कै. खंडेराव महाराज गायकवाड यांचे पदरीं दोन नामांकित लकडी खेळणारे होते. (१) शाळीग्राम वस्ताद व (२) रामसिंग वस्ताद. यांचे लकडीचे दोन आखाडे त्या वेळीं बडोदें शहरीं होते. त्यांपैकीं रामसिंगाचे कन्हयसिंग ठाकोर नावांचे एक शिष्य होते. ते येथील तिसऱ्या पलटणींत हवालदाराचे जागीं होते व त्या पलटणींत लकडीचे वस्ताद समजले जात असत. लष्करी


नोकरींतून पेन्शन घेतल्यावर ते माझे घरीं पहाऱ्यावर नोकर राहिले. त्यांनीं मोठ्या प्रेमानें व निष्कपट बुद्धीनें ही लकडी मला शिकविली. यानंतर मी लकडीचा खेळ अनेक व्यायामशाळांतून पाहिला. पण 'हनुमन्ती लकडी' मला ह्या सर्वांपेक्षां जास्त पद्धतशीर आहे असें वाटतें. या लकडीची माहिती थोडक्यांत मी खालीं देत आहें.



वस्ताद कन्हयसिंग ठाकोर.

चित्र संख्या ४६५

निरनिराळ्या वारांच्या जागा नीट समजाव्या म्हणून जागा दाखविणारें चित्र येथें दिलें आहे तें पहावें म्हणजे बरोबर कल्पना येईल.



चित्र संख्या ४६६

चित्राची समजूत :—(१) तमाचा–डावें कानशील. (२) बाहेरा–उजवें कानशील. (३) शीर–डोकें. (४) मोढे–खांदे. (५) भंडारा–डावी बरगडी. (६) पोखर–उजवी बरगडी. (७) कमर–कंबर. (८) कडक–गुडघा. (९) पालट–पायाचा घोटा. (१०) लंगोटा–लंगोट्याची जागा. (११) जनोई–उजवे खांद्यावर डावीकडे उतरता तिरपा वार.

सूट.

लकडीचा खरा खेळ म्हणजे सूटचाच खेळ होय. निरनिराळ्या घाई प्रथम शिकण्याचें कारण इतकेंच कीं, त्या नीट खेळतां आल्यानें सूट चांगली खेळण्यास मदत होते. अगदीं सुरवातीस पवित्रा चांगला तयार करणें अवश्य असतें; कारण सूट खेळतांना, मारासाठीं अगर बचावासाठीं स्फूर्तीनें व तोल न जातां, पवित्रा उचलतां येणें फार महत्वाचें असतें. तसेंच पवित्रा उचलल्यावर जितका लांब टाकून पुनः स्फूर्तीनें सहज परत घेतां येईल तितकें सूट खेळतांना फार फायदेशीर असतें. पवित्र्यावर जितका ताबा असेल तितका लांब अंतरावर वार मारतां येतो. म्हणून सूट चांगली खेळतां यावी अशी इच्छा असणारानें पवित्रा नीट तयार करण्यास कंटाळूं नये. तसेंच शिक्षकानें देखील पवित्रा नीट घटवून घेण्याची काळजी घ्यावी. पुष्कळ व चांगला मजकूर लिहितां यावा अशी ज्याची इच्छा असेल, त्यानें प्रथम लहानपणीं जसें अक्षर उत्तम घटविणें जरूर असतें, तीच स्थिति लकडीचे बाबतींत पवित्र्याची असते. लेख चांगले लिहिण्यास अक्षर घटविणें ज्याप्रमाणें वरवर पहाणारास फारसें जरूर वाटत नाहीं, तसेंच सूट खेळणाराचे लक्षांतहि पवित्र्याचें महत्व सहसा येत नाहीं. अक्षर चांगलें नसलें, म्हणजे तें लेखनव्यवसायांत किती त्रासदायक होतें, याची कल्पना लेखकांस अनुभवानें जशी पटते, त्याचप्रमाणें पवित्रा घटविण्याचें महत्व सूट खेळणारास अनुभवानें चांगलें समजतें. तरी सांगण्याचा हेतु इतकाच कीं पवित्र्याकडे दुर्लक्ष करूं नये. शिवाय पवित्रे चालणें ही एक उत्तम प्रकारची मेहनत आहे. त्यामुळें सर्वांगांस उत्तम प्रकारचा व्यायाम मिळून, दम चांगला वाढतो. ही मेहनत थोड्या जागेंत देखील उत्तम प्रकारें करतां येते.

पवित्रा नीट तयार झाल्यानंतर निरनिराळ्या घाई नीट घटविणें हें, सूट चांगली खेळतां यावी अशी इच्छा असेल तर, फार महत्वाचें आहे. लेखनाचे बाबतींत ज्याप्रमाणें लहान लहान वाक्यांची रचना शिकणें जरूर असतें, तशीच स्थिति निरनिराळ्या घाई शिकण्याची आहे. ढालीचा (फरीचा) व तरवारीचा (गदक्याचा) हात वाटेल त्या जागीं, डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच नेण्याची जरूर सूट खेळतांना पडते. म्हणून दोन्ही हातांवर ताबा येण्यासाठीं प्रथम नवीन शिकणाराकडून साधे धडे करून घेणें फार जरूर आहे. निरनिराळ्या घाई म्हणजे हात व पाय मजबूत व चपल करण्याचे व्यायामाचे प्रकार किंवा धडेच होत. लहान लहान वाक्यांची नुसती रचना करणें म्हणजे लेख लिहिणें नव्हें; त्याचप्रमाणें घाई खेळणें म्हणजे सूट खेळतां येणें नव्हें. सूट खेळण्याचा सराव न केला तर नुसत्या घाईचा उत्तम अभ्यास करणें निरुपयोगी आहे. तसेंच सूट देखील नुसती मिळून खेळण्यापासून उपयोग होत नाहीं. लकडी हा मर्दानी खेळ आहे. ढाल तरवारीनें लढण्याचें तें साधन आहे. त्यांत नुसता दिखाऊपणा उपयोगी नाहीं.

या खेळांत वाटेल त्याच्याशीं खेळून, त्यास मारून आपला बचाव करण्याची तयारी व तडफ अंगांत येणें जरूर आहे. हा खेळ क्षत्रियांचा–शिपाईबाण्याचे माणसांचा–आहे. म्हणून सूट खेळतांना समोरचा गडी आपला दुष्मन आहे अशी तात्पुरती भावना ठेवून दोन वार दिले घेतले जातील अशा अवसानानें खेळण्याची संवय असणें विद्यार्थ्यास जरूर आहे. आमचे वस्ताद कन्हयसिंग ठाकोर हे सूट खेळण्यासाठीं समोर उभे राहिले असतां त्यांची चर्या व एकंदर देखावा पूर्ण बदलून जात असे. त्या वेळेस त्यांच्या नजरेंत एक प्रकारचा तीक्ष्णपणा येत असे. नुसत्या डोळ्यांचे रोखांवरूनच अर्धें काम होतें. लकडी हें द्वंद्व आहे. हा कांहीं नुसता टेनीससारखा निरुपद्रवी खेळ नाहीं. असा हा खेळ शिकून जर मनांत मर्दानी भाव उत्पन्न न झाला तर तो खेळण्याचा काय उपयोग ? हा खेळ मर्दानीं खेळावयाचा असल्यानें जरा दणगटपणाचा आहे. ही मनाची मर्दानी भावना नुसत्या घाई खेळून अगर मिल्लतची सूट खेळून उत्पन्न होत नाहीं. तशी भावना न ठेवल्यास दंगलांत अगर मैदानांत तिऱ्हाईताशीं प्रसंग पडला म्हणजे धांदल उडते व नुसतें कौशल्य अगर दिखाऊपणा उपयोगी न पडून, मार खाण्याची पाळी येते. घरचेघरीं आपापसांत उत्तम सूट खेळणारे पुष्कळ असतात, पण खऱ्या प्रसंगीं दंगलांत परक्या गड्याशीं जो शिताफीनें खेळेल तोच खरा खेळणारा होय. म्हणून हा खेळ शिकविणारानें मुलें जरा तिखट स्वभावाचीं अशींच पाहून तयार करावीं. नाहीं तर भित्र्या अगर मेषपात्र मुलांस ही विद्या शिकविल्यानें वस्तादजीस आपलें नाव गमावण्याचा मात्र प्रसंग यावयाचा.

हलक्या वजनाचा गदका घेऊन देखील फक्त १० मिनिटेंच सूट खेळल्यानें हात थकून जाऊन गदका हातांतून पडण्याची वेळ येते. म्हणून तसें न होण्यासाठीं हातांस चांगला दमकसपणा येण्यास घाई खेळण्याचा सराव फार उपयोगी पडतो. याच हेतूनें घाई चांगल्या बिनचुक व पुष्कळ वेळपर्यंत खेळवून घ्याव्या. सुमारें अर्धा तासपर्यंत चांगल्या रीतीनें घाई खेळणारा गडी, सूट खेळतांना फक्त १० मिनिटांतच दमांतून उखडतो. म्हणून बराच वेळपर्यंत नुसत्या घाई खेळवून घेण्यांत केव्हांहि ढिलाई करूं नये.

घाईमध्यें शिकविलेले हात सूटमध्यें कोणत्याहि प्रकारचा अनुक्रम न ठेवितां, जरुरीप्रमाणें वापरावयाचे असतात व म्हणूनच यास **सूट** असें म्हणतात. पूर्वीं कधींहि घाई न खेळलेला मनुष्य सूट खेळूं शकेल, पण पद्धतशीर रीतीनें पवित्रा व घाई शिकून सूट खेळलेला मनुष्य अडाणी मनुष्यास सहज हरवूं शकतो असा अनुभव आहे. अडाणी मनुष्य एकदोन हात जोरानें मारतो पण त्यापासून सामनेवाल्यानें बचाव केला आहे असें दिसलें म्हणजे तो मनुष्य गांगरून जातो व पुढें काय करावें हें त्यास समजत नाहीं. त्यास स्वतःचा बचाव करणें तर फारच कठीण जातें.

यापुढें **हातकटीचे हात** दिले आहेत. ते सुरवातीस सूट खेळतांना शिकवूं नयेत. साधे


हात मारून चांगला अभ्यास झाला म्हणजे हे हात दाखवावे. दंगलांत लकडीचे सामने होतात त्या वेळीं या हातांचा फार उपयोग होतो. पण आरंभापासूनच हे हात दाखविले तर वार आखूड व हलके जाऊं लागतात. तसें होणें बरोबर नाहीं. मारामारींत ह्या हातांचा उपयोग होत नाहीं. कारण या हातकटीच्या हातांनीं सामनेवाल्यास वार मारले तर त्यांपासून सामनेवाल्यास फारशी इजा होत नाहीं, पण सामन्याचे खेळांत हे वार म्हणून गणले जातात. यासाठीं सूट खेळतांना थोडेसें मारामारीच्या स्वरुपांत जोरानें खेळण्याचा सराव जरूर करावा.

वस्ताद कन्हयसिंग यांचें असें सांगणें असें कीं, सूट खेळतांना तीन भाग धोरण बचावाचें ठेवावें व एक भाग धोरण माराचें असावें. फरीगदका खेळणें ही तरवारीची लढाई असल्यामुळें प्रत्येक खेळणारानें आपणांस जखम न होतां सामनेवाल्यास वार मारण्याचा प्रयत्न करावा. तसें न केल्यास शरीर जन्माचें अपंग होण्याचा, अगर जीव गमावून बसण्याचा संभव असतो. हें तत्व विसरून खेळणारे हातांत प्रत्यक्ष चामड्यानें मढविलेले गदके असल्यानें एकमेकांवर घुसून नुसती मारामारी करतात. असें करतांना दोन चार काठ्या लागल्या तरी हरकत नाहीं असें त्यांस वाटतें. पण ही समजूत चुकीची आहे. अशा रीतीनें खेळण्यांत कौशल्य नसतें. कोण जास्त मार खाऊन खेळूं शकतो याची चढाओढ असल्याचा देखावा या वेळेस प्रेक्षकांस दिसतो. सामनेवाल्यावर वार करण्यास संधि मिळेपर्यंत बचाव करून उभे रहाण्यांत खरोखरी कमीपणा नाहीं. कुस्तींत देखील असें करावें लागतें. क्रिकेट खेळतांना देखील चांगला बॉल पडला तर चांगला खेळणारा गडी तो बॉल मारण्याचा प्रयत्न करीत नाहीं. उलट तो नुसता अडवून आपला बचाव करतो. पण नंतर वाईट बॉल पडतांच त्याचा फायदा घेऊन टोला मारून धांवा करतो. तेंच धोरण फरीगदका खेळण्यांत ठेवावें.

चुरशीची सूट खेळतांना उगींच पवित्र्याची चाळवाचाळव करण्याची जरूर नतते. पुष्कळ ठिकाणीं खेळणारे अशा वेळीं उगींच पवित्र्यांची चाळवाचाळव करून स्वतःस दमवून घेतात असें पहाण्यांत येतें. आपला सामनेवाला जरी उगींच नाचानाची करीत असेल तरी आपण आपली फरी व गदका बचावावर रोखून सावधपणानें आपले जागेवरच उभें राहावें. नंतर जरूर पडेल तेव्हांच पुढें अगर मागें सरून वार मारावा. समोरचा गडी पवित्रे चाळवितो म्हणून आपण पवित्रे चाळवून दमूं नये.


तसेंच पुष्कळ वेळां खेळणारे सूट खेळूं लागले म्हणजे गोल फिरतात. खेळणारांपैकीं एकजण आपली जागा सोडून दुसऱ्याचे जागेंत जातो व त्याचे समोरचा खेळणारा पहिल्या गड्याचे जागीं जातो. त्याप्रमाणें खेळणारे गोलाकार फिरत खेळतात. अशा रीतीनें आपले जागेंत दुसऱ्या गड्यास येऊं देणें बरोबर नाहीं असें वस्ताद कन्हयसिंग म्हणत असत. पाट्या खेळतांना पाटी धरणारा मनुष्य समोरच्या गड्यास आपले पाटीमधून पलीकडे जाऊं देत नाहीं त्याप्रमाणें लकडी खेळतांना देखील सामनेवाल्यास आपले

जागेंत येऊं देऊं नये. पाटी धरणारा गडी ज्याप्रमाणें जरुरीप्रमाणें डावीकडे अगर उजवीकडे सरकून समोरच्या गड्यास आड-वितो त्याप्रमाणें उजवीकडे अगर डावीकडे पवित्रे काढून सामनेवाल्यास आडवावें. आपण पवित्र्यावर उभें असतांना समोरचा गडी आपले उजवे अंगास (त्याचे डावे अंगास) जाईल तर आपला पुढील उजवा पाय चित्र नं. ४६७ प्रमाणें उचलून तिरपा आपले



चित्र संख्या ४६७

उजवे अंगास ठेवावा व नंतर मागील पाय उचलून पुढील पायाचे मागें ठेवावा. जरूर त्याप्रमाणें वरप्रमाणें पवित्रे काढून उजवे बाजूस सरकावें व सामनेवाल्यास आडवावें. ज्याप्रमाणें तो सरकेल त्याप्रमाणें आपण सरकून (पवित्रे काढून) त्याचे पुढें उभें राहिले म्हणजे त्यास आपले मागें जातां येत नाहीं. याचे उलट सामनेवाला आपले डावे बाजूकडे (त्याचे उजवेकडे) जाऊं लागला तर आपला मागील डावा पाय उचलून आपले डावे अंगास चित्र नं. ४६८ प्रमाणें



चित्र संख्या ४६८

मागें तिरपा ठेवावा व नंतर पुढील उजवा पाय उचलून डावे पायाचे समोर ठेवावा. या-प्रमाणें पवित्रे बदलून डावे बाजूस सरकून त्यास आडवावें. सूटमध्यें वरप्रमाणें पवित्रे करण्याचा चांगला सराव करावा. चांगली संवय झाली म्हणजे सूट खेळतांना सामनेवाल्याचे नजरेस नजर रोखलेली ठेऊन उजवीकडे अगर डावीकडे सहज जातां येतें. हे पवित्रे समोर तोंड ठेऊन उजवे अगर डावे बाजूस सरकण्याचे आहेत.

तसेंच सामनेवाल्याचे अंगावर पुढें जावयाचें असेल तर त्यासाठीं देखील पवित्रा ठरलेला आहे. मागील पाय उचलून उजवे पायाचे मागें ठेवावा. नंतर पुढील उजवा


पाय उचलून जरुरीप्रमाणें पुढें टाकावा. नंतर पुन: मागचा पाय वरप्रमाणें उचलून उजवे पायाचे अगदीं जवळ पुढें ठेवावा. याप्रमाणें जरूर तितके पवित्रे टाकून सामनेवाल्याचे अंगावर जावें. या पवित्र्यानें समोर सरळ रेषेंत जातां येतें. हा पवित्रा देखील पुष्कळ वेळां नीट चालवून चांगला घटवून घ्यावा. त्याचे विरुद्ध दिशेस म्हणजे मागचे बाजूस जावयाचें असेल तर वर सांगितली आहे तिचे उलट क्रिया करून मागें जातां येतें. मागील डावा पाय जमिनीपासून जरा उचलून शरिराचा झोंक किंचित् मागें टाकावा व डावा पाय शक्य तितका मागें ठेवावा. नंतर पुढील पाय फार न उचलतां मागें ठेऊन पवित्र्यावर उभें रहावें. आणखी मागें जावयाचें असेल तर वर सांगितल्याप्रमाणें पुनः पाय चाळवून मागें जावें. याप्रमाणें शिकविणारानें सामनेवाल्यापासून मागें जावयाचे व त्याचेकडे पुढें जावयाचे असे दोन्ही पवित्रे शिकणाराकडून पुष्कळ वेळां करवून घ्यावे. पुढें अगर मागें जातांना पाठ न दाखवितां नजर सामनेवाल्याकडेच सारखी ठेवावयाची असते. कारण नजरेवरच सूटच्या खेळाचें यशापयश पुष्कळ प्रमाणांत अवलंबून असतें. शरीर मागें पुढें नेण्याची क्रिया सहज झाली पाहिजे. याशिवाय कित्येक प्रसंगीं सामनेवाला फार जलदीनें आपले अंगावर घुसून येतो. अशावेळीं वरप्रमाणें मागें जाणें सोईचें नसतें. अशा वेळीं दोन्ही पायांनीं एकदम मागचे बाजूस उडी मारून मागें जावें लागतें. एका उडीनें न भागल्यास लागोंपाठ दोन तीन वेळां उड्या माराव्या. उडी मारते वेळीं उजवा व डावा असे दोन्ही पाय जवळ असतील तितके बरें. म्हणजे उडी सफाईदार जाऊन लांब जाते. या वेळीं देखील नजर सामनेवाल्याकडेच समोर ठेवावी. याप्रमाणें मागें जातांना उड्या जरा तिरप्या पण दोन्ही पायांनीं एकदम मारण्याचा अभ्यास करावा. या योगानें मेहनत चांगली होऊन शरीर हलकें होतें. वर सांगितल्याप्रमाणें, उजवीकडे अगर डावीकडे, तसेंच पुढें अगर मागें, जाण्याचे असे हे सूटमधील पांच प्रकारचे पवित्रे आहेत. हे चांगले घटवावे. हे पवित्रे करतांना शरीर, सरळ व ताठ रहाणें जरूर असतें. शरिराचा देखावा बेंगरूळ दिसूं नये. याकडे शिकविणारनें चांगलें लक्ष ठेवावें.

रोज संवयीसाठीं खेळतांना दम लागल्यानंतर दम घेण्यासाठीं थांबावें लागतें. यावेळीं दम लागलेला असल्यामुळें एकाच जागीं उभें रहाणें इष्ट नसतें. अशावेळीं हळूं हळूं टेहलणें इष्ट असतें. या टेहलण्यानें दम उतरून अंगांत हुशारी कायम रहाते. घोड्यास देखील पळून आल्यानंतर एकदम एका जागीं उभें न करतां सावकाश टेहलविण्याचा रिवाज आहे. याप्रमाणें फिरणें तें देखील, ज्या त्या खेळणाराची हद्द दाखविण्यासाठीं समांतर रेषा काढलेल्या असतात त्या रेषांवर, हळूं हळूं लष्करी शिपायी टेहलतात त्याप्रमाणें दोघांनीं टेहलावें. एकानें उजवीकडून डावीकडे जावें, व त्याचवेळीं दुसऱ्यानें डावीकडून उजवीकडे जावें. याप्रमाणें थोडा वेळ फिरण्यानें जोरानें होणारा श्वासोश्वास सावकाश चालूं लागला म्हणजे खेळण्याचे जागेचे मध्यभागीं आपले



चित्र संख्या ४६९

रेषेवर दोघांनी यावें व चित्र नं. ४६९ प्रमाणें फरीगदका धरून सूट खेळण्यासाठीं तयारीनें उभें रहावें. नंतर चित्र नं. ४७० प्रमाणें फरीवर गदका जोरानें मारून अवाज केल्यानें समोरचे गड्यास सूचना मिळून खेळण्यास



चित्र संख्या ४७०


आव्हान केल्याप्रमाणें होतें. नंतर दोघांनीं सूट खेळण्यास सुरवात करावी. पुनः दम लागला म्हणजे थांबून टेहलावें व पुनः वरप्रमाणें खेळास सुरवात करावी.

सूट खेळतांना पुढें मागें सरण्याचे पवित्रे सांगितले आहेत. पण अगदीं जरूर पडल्या· शिवाय मागें सरूं नये. मागें सरणें म्हणजे जागचेजागीं उभें राहून खेळणारास आपला बचाव करतां येत नाहीं याचें तें द्योतक आहे. उलट आपण सामनेवाल्याचे अंगावर जाऊन त्यास मागें रेटलें पाहिजे. आपले वारांपासून त्यास त्याचा बचाव करतां आला नाहीं म्हणजे तो अनायासेंच मागें मागें सरतो.


कित्येक ठिकाणीं लकडी खेळतांना कमरेच्याखालीं मारण्याची मनाई असते. पण अशा रीतीनें खेळण्याची संवय झाली म्हणजे खालचे अंगाचा बचाव करण्याची संवय होत नाहीं. खऱ्या प्रसंगीं शत्रूशीं गांठ पडल्यास तो अशा कृत्रिम बंधनांचा नियम पाळीत नाहीं

व त्यामुळें आपला बचाव करणें कठीण होतें, म्हणून आमचे परंपरेंतील खेळांत कमरेच्या खालीं वार मारण्याची परवानगी आहे. फरीगदक्याचा खेळ ढाल-तरवारीचा आहे व त्यामुळें ढाल-तरवारीचा वार धारेच्या बाजूनेंच मारणें जरूर असतें. या दृष्टीनें विचार करून घाईंत खेळतांना मारावयाचे वार देखील गदका तशा रीतीनें फिरवून मारण्यास शिकविण्यांत येतें. प्रत्येक वार मारतांना हात अमूक तऱ्हेनें वळवून मारावा असें सांगण्यांत येतें; त्याचें कारण गदका तरवारीच्या जागीं धरलेला आहे असें शिकणारास समजावून सांगावें. वर जी माहिती सांगितलेली आहे त्यांत कित्येक ठिकाणीं गदक्यानें वार आड-वावा असें सांगितलें आहे. पण ते खरोखरीं बरोबर नाहीं. वार रोकावयाचा तो फरीनेंच रोकणें उत्तम. पण हल्लीं प्रत्यक्ष तरवारीनें सूट कोठेंच खेळत नाहींत. त्याऐवजीं गदकेच वापरतात. त्यामुळें गदक्यानें वार रोकणें कित्येक वेळां सोईचें असतें म्हणून त्याप्रमाणें गदक्यानें वार रोकण्याचा रिवाज पडला आहे. सिंगलस्टिकचे खेळांत जसा सर्व बचाव हातांतील काठीनेंच करावयाचा असतो तसाच हा प्रकार आहे.

खेळ संपल्यानंतर दोन्ही खेळणारांनीं खऱ्या दिलदारपणानें एकमेकांस वंदन करून खेळ संपविण्याची वहिवाट आहे. यासाठीं आमचे परंपरेंत एका ठराविक रीतीनें सलामी घेण्याचा रिवाज ठरविला आहे. सुरवातीस सलामी घेतात त्याप्रमाणें तीनदां गदक्यावर गदका मारून व दोनदां फरीवर गदके मारून दोघांनीं पुढील पाय मागें न्यावे व चित्र नं. ४७१ प्रमाणें फरीचे हातांत गदका धरावा. नंतर मागील पाय पुढें ठेऊन चित्र नं. ४७२ प्रमाणें गदक्यास गदका आडवावा व दोघांनीं उजवे हात पुढें करून सलामी घ्यावी. हात मिळविण्यापूर्वी खेळणारे केव्हां केव्हां अचानक गदका हातांत घेऊन सामनेवाल्यास मारण्याचा प्रयत्न करतात. म्हणून हात मिळेपर्यंत दोघांनीं गाफील राहूं नये. हात मिळाल्यानंतर मात्र खेळ बंद होऊन दोघांची दोस्ती होते. नंतर कोणी कोणास वार करावयाचा नसतो.




चित्र संख्या ४७१



चित्र संख्या ४७२

हातकटीचे हात :—या प्रकारांत सामनेवाल्यावर अमुक एक वार आपण मारणार असें दाखवून दुसराच वार मारावयाचा असतो. अशा प्रकारें हात नीट मारतां येण्यास पुष्कळ अभ्यास व्हावा लागतो व वार मारणाराचा हातावर चांगला ताबा यावा लागतो. वार मारणाराचे नजरेवरून तो कोणता वार मारण्याच्या विचारांत आहे हें खेळणारांस ओळखतां येतें. म्हणून हातकटीचे हात मारतांना वार मारणारानें आपले नजरेवर देखील एक प्रकारचा ताबा ठेवणें जरूर असतें. आपण खरोखरीं कोणता वार मारणार याचा अजमास आपले नजरेवरून देखील सामनेवाल्यास कळूं देतां उपयोगी नाहीं. असें केल्यानें तो तेव्हांच फसतो व आपला वार बरोबर बसतो. ह्या हातांबद्दलची कल्पना यावी म्हणून थोडे हात नमुन्यासाठीं येथें दिले आहेत.




चित्र संख्या ४७३

तमाचा मारून गदक्याचे हातावर वार मारणें :—चित्र नं. ४७४ प्रमाणें तमाचा मारून लगेंच सामनेवाला वार मारण्यासाठीं गदका पुढें आणणार तोंच चित्र नं. ४७३ प्रमाणें त्याचे गदक्याचे हातावर वार मारावा.



चित्र संख्या ४७४




चित्र संख्या ४७५

तमाचा मारून मनगटावर वार करणें:—चित्र नं. ४७४ प्रमाणें तमाचाचा हात मारावा व लगेंच सामनेवाल्याचे मनगटावर बाहेरचे बाजूनें चित्र नं. ४७५ प्रमाणें वार मारावा.




चित्र संख्या ४७६




चित्र संख्या ४७७

शिर मारून पुढील पायाचे आंगठ्यावर वार मारणें:—चित्र नं. ४७६ प्रमाणें शीर मारून अगर शीर मारण्याची हूल दाखवून चित्र नं. ४७७ प्रमाणें पुढील पायाचे आंगठ्यावर वार मारावा.



चित्र संख्या ४७८




चित्र संख्या ४७९

शीर मारण्याची हूल दाखवून अंतरा मारणें:—चित्र नं. ४७८ प्रमाणें शीर मारण्याची हूल दाखवून चित्र नं. ४७९ प्रमाणें अंतरा मारावा.



चित्र संख्या ४८०

तमाचाची हूल दाखवून पुढचे पायावर आंतील बाजूस वार मारणें:— तमाचाची हूल दाखवून पुढील पायाचे आंतील बाजूस चित्र नं. ४८० प्रमाणें वार मारावा.



चित्र संख्या ४८१

शीरची हूल दाखवून पुढील पायावर वार मारणें:— शीरची हूल दाखवून चित्र नं. ४८१ प्रमाणें पुढील पायावर वार मारावा.




चित्र संख्या ४८२

कडकची हूल दाखवून तमाचाचा वार मारणें :—कडकची हूल दाखवून चित्र नं. ४८२ प्रमाणें तमाचाचा वार मारावा.



चित्र संख्या ४८३

पालटची हूल दाखवून बाहेरा मारणें :—पालटची हूल दाखवून चित्र नं. ४८३ प्रमाणें बाहेरा मारावा.



चित्र संख्या ४८४




चित्र संख्या ४८५

भंडाऱ्याचा हात उडवून पायावर मारणें:—चित्र नं. ४८४ प्रमाणें भंडाऱ्याचा वार उडवून चित्र नं. ४८५ प्रमाणें पायावर वार मारावा.

श्री.

बंदेशचे डाव




उपोद्घात.

❀

प्राचीनकाळीं धर्मयुद्धाची मान्यता असल्यानें प्रत्येक इसम आपल्या स्वतःचें रक्षण करण्याची हरएक कला शक्य तितक्या पूर्ण रीतीनें शिकून घेण्यासाठीं अंतःकरणपूर्वक परिश्रम करून व गुरूची सेवा मनोभावानें करून त्या त्या विद्येंत निष्णात होत असे. प्राचीन युद्धांतहि अशा रीतीनें परिपूर्ण झालेल्या इसमासच मान्यता मिळत असे.

लेखक :—



प्रोफेसर माणिकराव,
बडोदें.

ही युद्धविद्या वेदकालीन आहे. जनतेच्या मालमत्तेचें रक्षण करण्यास धनुर्वेद वसिष्ठ ऋषीनें परमेश्वराची भक्ति करून मिळविला. हा धनुर्वेद निर्माण करण्याचें कारण वसिष्ठ ऋषि वनांत राहून आपल्या आश्रमांत तपश्चर्या करित असतां, राजा विश्वामित्र त्या वनांत मृगया करण्याकरितां गेला. ऋषीचा आश्रम पहातांच त्याठिकाणीं थोडी विश्रांति घेऊन पुढें जाण्याचें त्यानें ठरविलें. वसिष्ठानें राजाचा सत्कार मोठ्या प्रेमानें व मानमरातबानें केला. असा सत्कार अशा निर्जन वनांत या मुनिमहाराजांनीं कसा केला याचें विश्वामित्रास आश्चर्य वाटलें व त्यानें बराच शोध केल्यावर त्यास कळून आलें कीं, या मुनीजवळ एक कामधेनु आहे. या धेनूच्या बळावर

ते वाटेल ती गोष्ट निर्माण करूं शकतात. म्हणून त्यानें ती कामधेनु वसिष्ठाजवळ मागितली. ऋषि म्हणाले, 'या गाईच्या योगानें माझें कर्मकांड पूर्ण होतें, अर्थात् ही गाय देण्याची नाहीं. ही आश्रमांत रहाणारी आहे; ती आपण मागूं नये व मीहि देणार नाहीं. राजा या उत्तरानें रागावून जबरजस्तीनें गाय नेऊं लागला. परंतु गाय मोठमोठ्यानें हंबरडे फोडूं लागली. तरी पण राजास दया न येतां आपल्या सैन्यास गाय बांधून नेण्यास त्यानें आज्ञा केली. परंतु गाय जाईना व तिला सारखा मार पडूं लागला. तेव्हां वसिष्ठानें राजास गाय न नेण्यास पुष्कळ विनाविलें. पण त्याचा कांहीं उपयोग न झाल्यानें कामधेनूनें आपल्या सामर्थ्यानें म्लेंच्छ, यवन, शबर व शक असे लढवय्ये उत्पन्न करून विश्वामित्र राजाचा पराभव केला. नंतर विश्वामित्रानें तपश्चर्या व शंकराची आराधना करून त्यास प्रसन्न केल्यावर वर मागितला. तेव्हां शंकरानें त्यास धनुर्वेद दिला.

धनुर्वेद.

त्या धनुर्वेदाचें नांव विश्वामित्रधनुर्वेद असें पडलें. याच वेदांत तरवार, कट्यार, कुंत, सांग, धनुष्यबाण, गदा, माडू, विगैरे हत्यारें उत्पन्न होऊन त्यांचें महत्व वाढलें. वसिष्ठधनुर्वेदांत मल्लयुद्ध, काठी, दगड, पाश, गोफण, इतकाच शोध होता. त्यानंतर अनेक जणांनीं निरनिराळ्या प्रकारचे शोध करून संहार करण्याचे इलाज शोधून काढिले आहेत.

परशुरामानें तपश्चर्या करून देवास प्रसन्न केलें व स्फोटक द्रव्याचा शोधकरून जामदग्न्य धनुर्वेद मिळविला. याप्रमाणें धनुर्वेदांत अस्त्रांचा प्रारंभ झाला असल्याचें दिसतें.

यानंतर भारद्वाज ऋषींनें तप करून एक धनुर्वेद निर्माण केला. त्याचा फैलाव द्रोणाचार्य व कृपाचार्य यांनीं पांडव व कौरव यांना शिक्षण देण्यांत केला.

जामदग्न्य धनुर्वेदाप्रमाणें शिकलेले भीष्मपितामह व राजा कर्ण हे होते. श्रीकृष्ण बलराम, भीम व दुर्योधन हे वसिष्ठ धनुर्वेदाप्रमाणें शिक्षण घेतलेले होते. भारद्वाज धनुर्वेदाचा पत्ताच नसल्यानें त्याबद्दल कांहींच सांगतां येत नाहीं.

कवच विद्या.

ही विद्या वसिष्ठधनुर्वेदकाळीं अमलांत आली असावी असें दिसतें. कासवाच्या किंवा गेंड्याच्या पाठीच्या ढाली व हरणाच्या किंवा वनगाईच्या शिंगांचा उपयोग त्या वेळेपासून झालेला दिसतो. तलवारीच्या शिक्षणाकरितां काठीवर मढविलेली कातडी त्याच वेळेस उपयोगांत आणली. वज्र, खड्ग, असि—तलवार वगैरेंच्या मुठी हस्तीदंती अगर गव्याच्या शिंगाच्या तयार करीत असत.

हरणांचीं शिंगें अणकुचीदार घेऊन त्यांचे माडू बनवीत. हे माडू अद्याप अमलांत आहेत. वज्रमुष्टी योद्धे मुष्टियुध्दाकरितां गव्याच्या शिंगाचे अणकुचीदार कचकडे बनवीत. तेंहि आज वापरले जात आहेत.

संजीवनी विद्या पूर्वकाळीं असल्याचें दिसतें शुक्राचार्य यांनीं औशनस धनुर्वेदांत या

विद्येचा उल्लेख केला आहे. ही विद्या असुरांपासून बृहस्पतीचा मुलगा कच यानें प्राप्त करून देवांत तिचा शिरकाव केला.

पूर्वकाळीं एकाच वेळीं अनेक बाण शत्रूवर टाकण्याची कला होती असें आढळून येतें. कृतयुगांत महेश्वरासारखे धनुर्धारी दुसरे कोणी झाले नाहींत; तसेंच त्रेतायुगांत श्रीरामचंद्र भगवान महान् धनुर्धारी झाले. त्यांच्या पराक्रमाचा इतिहास माहीत नाहीं असा आबालवृद्धांत कोणी सांपडणार नाहीं.

अर्जुन हा सर्वश्रेष्ठ धनुर्धारी असल्याबद्दल निराळें लिहिण्याची जरूर नाहीं. त्यानें द्रोणाचार्य यांचे जवळून ती विद्या हस्तगत केली इतरहि नाना ठिकाणीं तप करून व त्यायोगें अनेक शस्त्रास्त्रविद्या प्राप्त करून आपलें नांव अजरामर केलें. याचवेळीं एकलव्यहि मोठा धनुर्धारी होता. हा द्वापार युगांतील पराक्रम आहे.

पृथ्विराज चव्हाण याचें नांव कोण जाणत नाहीं? दोन्ही डोळे गेले तरी महंमद घोरीस एकाच बाणानें अचूक विंधून जमीनदोस्त केलें, हा कलियुगांतील महान् पराक्रम मोजला जाईल.

वरील धनुर्वेद पांच प्रकारचा असल्याचें दिसून येतें. मल्लयुद्ध—भाला, तरवार, माडू आणि लठ्ठ अगर लाठी. ही लाठी केव्हां अमलांत आली याबद्दल विचार करतां असें दिसून येतें कीं द्वापार युगांत मथुरेचे राजे श्रीकृष्ण भगवान् यांचे मोठे बंधु बलराम यानीं मुसळ धारण केलें व या मुसळाच्या योगानें अनेक ठिकाणीं युद्ध केल्याचे दाखले सांपडतात. मुसळ कानाच्या पाळीइतके लांब ठेवण्याचा प्रघात असे.

शस्त्रातैर्भिन्दिपालैः परिघैर्मुसलैरपि।

(ग. पु. १. ३. ३२)

मुसळ, लठ, लाठी.

मुसळाचे आडवेउभे हात मारण्याचे असून रोकण्याचे, फिरविण्याचे, सैन्याच्या घेरांतून निघण्याचे, आंत शिरण्याचे, बसून चक्राकार गोल फिरण्याचे असे अनेक प्रकार असून तेच हात लठ्ठ, लाठी व बान्याच्या रूपानें निरनिराळ्या प्रकारानें जनता करीत आहे. मुसळें दोन प्रकारचीं असल्याचें आपणास माहित आहेच. एक सळाईदार व दुसरें जाड पण लहान. हें लहान मुसळ फेंकून मारण्याची चालहि पूर्वीं होती. जसजसे मनुष्याला नवीन नवीन शोध लागत गेले तसतसे मुख्य हत्यारांतहि बदल झाले आहेत. मुसळाच्या ठिकाणीं लठ धारण करणारे लोक निर्माण झाले. हे लठ म्हणजे पक्के बांबू-रामपुरी, मिर्झापुरी, रायबरेली, हरिद्वार, वगैरे वगैरे अनेक ठिकाणांचे—जवळजवळ गांठी असलेले, निमुळते व भरीव असत. या लठांना शाम, कड्या व सुरीच्या आकाराची विळीसारखीं पोलादी पातीं लावूं लागले. त्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत एका बासांत लोखंडाचे गोळे पांच पांच घालून त्यांवर दातांच्या आकारांची अणकुचीदार पाती लावूं लागले. या हत्यारास बाना असें म्हणतात. कित्येक ठिकाणीं तीक्ष्ण धारीचीं पातीं एक हात बांस चिरून त्यांत बसविण्याचें व त्यावर सुंदर सोन्यारुप्याच्या तारा लावून बांसाच्या गांठी गुंफून घेण्याचें सुरू

केलें. आजहि सासऱ्यानें जावयास मुलीस देते-वेळेस असे गुंफलेले लठ तिचे रक्षणार्थ म्हणून देण्याचा रिवाज आहे.

आजहि, जनता अधिकाधिक नाजूक निपजूं लागल्यानें लठ व बान्याच्या ऐवजीं लाठी म्हणजे पातळ काठ्या उपयोगांत येऊं लागल्या आहेत. लाठीच्या अनेक बांधण्या आहेत. लाठी, तलवार, माडू, जंबिया अथवा सुरी, भाला (यास कुंत म्हणतात) वगैरे सर्व प्रकारच्या हत्यारांचे हात निरनिराळे दिले गेले आहेत. जितके हात तितके त्यांचे रोक, म्हणजे प्रतिकारार्थ विरोधी हात; त्या रोकच्या लपेट (सफाइनें विरोधी हात लपेटून, गुंडाळून निसटणें), लपेटच्या छीना (प्रतिस्पर्ध्याचे हत्यार छिनवून हिसकावून घेणें) याप्रमाणें एकापेक्षां एक अशा चढत्या श्रेणीनें प्रत्येक कलेंतील नैपुण्याच्या पायऱ्या दिलेल्या आहेत. याशिवाय लपेटच्या फेकन (समोरच्या गड्याचें हत्यार फेकून देणें), लपेटच्या बांधण्या म्हणजे **बंदेश** असे उच्चतम प्रकार आहेत. या बंदेशास गांठी असें संबोधिलें तरी चालण्यासारिखें आहे.

वरील कोणत्याहि हत्यारास कसें धरावें, हत्याराचें माप किती असावें, तें कसें ठेवावें, कोठें ठेवावें वगैरेबद्दलहि नियम आहेत. पूर्वकालीं एक एक इसम पांच पांच हत्यारें बांधीत असे. याचा हेतु इतकाच कीं, ज्या ज्या वेळीं जसा प्रसंग असेल त्या त्या वेळीं तशा शस्त्रांचा उपयोग करितां यावा. बान्याची माहिती वर दिली आहे. त्याचप्रमाणें इतर शस्त्रांचीहि माहिती देणें आवश्यक आहे म्हणून ती अगदीं थोडक्यांत येथें देतों.

लाठी बंदेश.

"सो पटेत एक लठेत."

लाठी फिरविण्यांत मनुष्य तज्ञ झाल्यावर त्याला स्वतःचें शरिरांतील कोणत्याहि भागावर दुसऱ्या माणसानें आघात केल्यास स्वतःचा उत्तम प्रकारें बचाव कसा करावयाचा याकरितां निरनिराळ्या प्रकारच्या लढन्ती शिकाव्या लागतात. निरनिराळ्या प्रकारच्या लढन्ती बसविण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मनुष्याच्या कोणत्याहि शरिराच्या भागावर कशाहि प्रकारचा वार करण्यांत आल्यास त्यापासून त्याला स्वतःचा बचाव उत्तम तऱ्हेनें करतां यावा हाच होय. याच उद्देशानें निरनिराळ्या लढन्ती बसविण्यांत आल्या आहेत.

लढन्त एकचा कायदा अशा तऱ्हेनें करण्यांत आला आहे कीं त्यांमध्यें लढन्त करणारे दोन्ही खेळाडू आलटून पालटून एकमेकांवर वार करितात व ते रोकतात. या लढन्तमध्यें एका गड्यानें वार केल्यावर दुसरा गडी, आलेला वार रोकतो व नंतर प्रतिस्पर्ध्यावर वार करतो. अशा रीतीनें या लढन्तमध्यें आलटून पालटून वार करण्यांत व रोकण्यांत येतात.

लढन्त दोनचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे एकाच गड्यानें आपल्या प्रतिस्पर्ध्यावर एकसारखे एकामागून एक वार करीत राहणें व प्रतिस्पर्ध्यालाहि त्याच्यावर होत असलेले आघात स्वतःला कोणत्याहि प्रकारें इजा न होतां रोकतां येणें हाच होय.

लढन्त तीन शिकण्याचा मुख्य उद्देश म्हटला म्हणजे आपणांवर होणारा प्रतिस्पर्ध्यांचा वार रोकून त्याच्या निरनिराळ्या प्रकारें लपेट करितां येणें हा होय.

अशा प्रकारें मनुष्यास लाठी उत्तम तऱ्हेनें फिरवितां येऊन व वर दर्शविलेल्या तिन्ही लढन्ती चांगल्या प्रकारें करतां आल्यावर त्याला लाठींतील सर्वांत श्रेष्ठ अशी स्वतःचा बचाव करण्याची व प्रतिस्पर्ध्यास पराजित करून त्यास आपल्या ताब्यांत घेण्याची कला अवगत होते. ही कला म्हणजेच बन्देश करणें होय.

लाठींतील लाठीबंदेश ही कला सर्वांत उच्च दर्जाची समजली जाते. लाठीबंदेश जाणणारा मनुष्य स्वतःचा बचाव उत्तम प्रकारें करूं शकतो व आपल्या प्रतिस्पर्ध्यास पायाशीं लोळावयास लावूं शकतो. लाठी-बंदेशमध्यें निरनिराळ्या प्रकारचे बंदेश बसविण्यांत आले आहेत; आपल्या प्रतिस्पर्ध्यास जितकी कडक शिक्षा द्यावयाची असेल तशा प्रकारची कडक शिक्षा आपल्याला त्या त्या प्रकारचे बंदेश आपल्या प्रतिस्पर्ध्यावर बांधून देतां येते.

तलवार आणि बंदेश.

दोन हाती तलवारीचे हात अनेक आहेत. तसेच एक हाती तलवारीचे तर पुष्कळच आहेत. तलवारीच्या हातांचें शिक्षण, ज्याप्रमाणें पट्ट्याचे हात शिकतांना ते प्रथम काठीवर शिकविले जातात त्याप्रमाणें, लाकडाच्या तलवारीवर प्रारंभीं देण्यांत येतें. हे हात पक्के झाल्यावर मग बिनधारेच्या तलवारी घेऊन ते घटविण्यांत येतात व शेवटीं खऱ्या तलवारीचा उपयोग शिकणारास करून देतां येतो. तलवारीच्या हातांत अनेक तडफी, सरका, डुबी, काटछाट, आणि वार तसेंच आनी, हूली यांच्या फेंका, एकेरी, दोन तोंडी, चार तोंडी इतकेंच नव्हें तर सोळा मुखी सुद्धां करतां येतात.

वार, आनी, कडक व दाब या प्रत्येकाचे बंदेश आहेत. तलवारीचे उत्तम हात तयार कर-ण्यास जुना कापूस घालून काळ्या चिक्कट मातीचे पुतळे तयार करावे लागतात व त्यावर वार कराव-यास शिकवितात. तसेंच केळीच्या खांबावरहि संवयीसाठीं या हातांचे प्रयोग करवितात. या पुढची पायरी म्हणजे हात उत्तम तयार झाल्यावर केळीच्या खांबांत लोखंडाच्या सळ्या घालून त्यावर वार करवून ते घटवून घेतात. पूर्वीं तलवारींचें माप यजुर्वेदांतील खालील श्लोकांत दिल्याप्रमाणें असें...

"शतार्धमंगुलानां तु श्रेष्ठः खड्गः
प्रकीर्तितः
तदर्धो मध्यसंज्ञाभाक् ततो हीनं न
धारयेत्॥"

त्याचप्रमाणें महाभारतकाळीं तलवारीचे २२ प्रकारचे हात होते. त्यानंतर हे हात पुढें वाढत वाढत ३२ पर्यंत झाले आहेत. (प्राचीन युद्धविद्या पृ. ३८, ३९) कांहीं लोकांची समजूत अशी आहे कीं, पूर्वी तलवारींचीं नांवें नव्हतीं. म्हणून हीं जुनीं नांवें दिलीं आहेत.

खड्ग (तलवार)

१ रोहिनी वाल — २ यत्कुण
३ निखह — ४ भद्रांग

५ वेगीवाल
६ रिपुदारण
७ कच्छेल्लक
८ भीत
९ पट्टालक
१० तितरी पंजर
११ काल पंजर
१२ कोगी
१३ शिखरक
१४ कपोलक
१५ ग्रीवास्थान
१६ भूमंडल
१७ तीक्ष्णाग्र
१८ मुनय
१९ पंचघात

याशिवाय अनेक नांवें आहेत. परंतु स्थलसंकोचास्तव हात आखडतां घेणें भाग पडतें.

रजपूत, मोंगल, मराठे, शिख व गुरखे यांच्या वेळच्या तलवारींचीं नांवें खालील-प्रमाणें आहेत.

१ शिरोही मानाशाही
२ शिरोही पबाशाही
३ भुजी गोल्या
४ जुनी गुजराथ
५ लालुवाड
६ कर्नाटकी
७ उनाशाही
८ बडोदेंशाही (सकेला)
९ खुरासानी
१० इराणी
११ नागन (इराणी)
१२ हुसेनी
१३ अलेमानी (अरबी)
१४ अलेमानी (पटणी)
१५ मगरबी
१६ जनूबी
१७ हलबी
१८ गद्दारा
१९ पगरी
२० जफरताकिया
२१ अरबी
२२ तेगा (पट्टणी)
२३ निमचा
२४ खांडा
२५ कर्नाटकी सैफ
२६ सोसन पत्ता
२७ रुमीसुरा
२८ सुरा-तिरा धारी
२९ कत्ती हुसेनी
३० कत्ती नवाज खानी
३१ कत्ती हकीम खानी
३२ खोदीव कत्ती
३३ खड्ग नेपाळी
३४ किरपाण
३५ तेगा
३६ तखाराणा
३७ जोधाना
३८ चापानेरी तलवार
३९ खारीबाव
४० भवानी तलवार
४१ पालनपुरी तलवार
४२ तिरेंघाटी समशेर
४३ तेग तलवार
४४ रामपुरी कत्ती
४५ जयगुरु समशेर

आपल्या भारतदेशांत अनेक ठिकाणीं अनेक जातींच्या तलवारी तयार करीत असत. इंग्रज सरकारानें सर्व भारतदेश आपल्या ताब्यांत घेतल्यावर अस्सल हत्यारें जवळ जवळ नामशेष झालीं आहेत.

तलवारीचे वार अनेक प्रकारचे होते व आजहि कित्येक ठिकाणीं ते पहावयास सांपडतात. तलवारीचे मुख्य वार खालील प्रमाणें आहेत. शीर, कडक, दाब, जनेऊ, बाहेरा, गर्दन–काट आणि आनी. या हातांचे पोटभागहि पुष्कळ आहेत. वरील हातांच्या रोंकी, डुबी, फेकन, आडंगे व निरनिराळ्या प्रकारचे अनेक बंदेश आहेत. या बंदेशांचीं नांवेंहि अनेक आहेत. तरीपण त्यांपैकीं, थोडीं नांवें या ठिकाणीं देतों.

पूर्वींचीं नांवे.

१ माणिबंध पीडन
२ बाहुपाश
३ कंठ परिभ्रमण
४ करभंग
५ कक्षाबंधन
६ कंठपाश

७ पृष्ठबंध	८ परिवर्तन
९ स्वांग संकोच	१० द्वैधीकरण
११ प्रगह	१२ ग्रिवाभंग
१३ प्रभृति	१४ कुरपर
१५ मुखप्रयातन	१६ पदाकर्शन
१७ पादपाश	१८ कंसर पीडन
१९ पूर्ण पूज्य	२० मृगफास

हल्लींचीं नांवें.

१ शीसबंद	२ तेजबंद
३ निशाणबंद	४ देवबंद
५ जोधबंद	६ आडबंद
७ मखीबंद	८ अकलबंद
९ माहेरोल	१० मुष्कबंद
११ कमरबंद	१२ गलुबंद
१३ बाजूबंद	१४ पायबंद
१५ हाथी चिनगार	१६ हातकोडा
१७ डगबेडी	१८ जफरबंद
१९ फताबंद	२० बाल सांगडा
२१ कलसरी	२२ सिकंज्या
२३ नमाजबंद	२५ मगरमिठी

वगैरे वगैरे.

सुरी.

तिरे घाटी सुरी ही त्रेता युगांत जाहल्याचें दिसून येतें.

अभिलषितार्थ चिंतामणी या ग्रंथावरून खालील सुरीचे पवित्रे सांपडतात. त्यांचीं नांवें येणेंप्रमाणें.

१ पुल्लीबाल	२ शुनक
३ लुलीनय	४ रोपीतक
५ पोत्रांगुल	६ व्याघ्रनख
७ बादशाहा	८ पदप्राप्ती
९ अनुक्षेम	१० सार्पिका
११ मत्तेभगती	१२ वायसी
१३ करकटी	१४ पंचानन

हे पवित्रे कसे करावे याचें व्यवस्थित वणन सुद्धां या ग्रंथांत आहे. इतकेंच नव्हें तर गदायुद्ध, धनुष्य व धनुष्याच्या जाती, बाणांचीं नांवें, पवित्रे, आसनें, यांची माहिती, तसेंच खड्गांचीं नावें, पवित्रे व मोजमाप यांचेंहि वर्णन आहे. कवचें किती प्रकारचीं असतात वगैरे माहितीहि दिली आहे. हीं कवच म्हणजे हल्लींच्या वेळचीं दास्तानें म्हटलीं जातील. कुंत म्हणजे भाला याचेंहि नांवासह वर्णन आहे.

या आमचे लेखांत ज्या बांधण्या येणार आहेत त्यांत जंबिया, तरवार, लाठी, भाला व माडू, यांपैकीं कांहीं जुनीं नांवें दिलीं आहेत. कारण दोन वर्षांपूर्वीं मुसलमान लोकांच्या मुंबईस भरलेल्या एका शिक्षण परिषदेंत हैदराबादचे मुख्य मंत्री सर हैदरी साहेब असें म्हणाले कीं, कुस्ती व मैदानी खेळ हे आमच्याच ग्रंथांचे आधारें लोकांस शिकावयास मिळाले आहेत; परंतु सर साहेबांनीं वरील ग्रंथांचें अवलोकन केल्यास त्यांची ही समजूत सहज दूर होईल असें आम्हांस वाटतें.

विश्वामित्र धनुर्वेदांत कट्यारीचें नांव आहे परंतु सुरी अगर खंजिराचें नांव नाहीं. श्रीमहाराणा प्रतापसिंहजींच्या वेळीं खंजर नांव प्रसिद्धीस आल्याचें समजतें.


अभिलषितार्थ चिंतामणींत वरील पवित्रे असलेले दिले आहेत. यावरून अगदीं पुरातन कालांत या सुरीचा जन्म झाला असें मानण्यास भरपूर पुरावा आहे.

जमधर.

जम=यम+धर=धाड=दाढ=यमघाढ.

हें हत्यार दुधारी व दोन पातींचें असून तीक्ष्ण व अणचुकीदार असतें. श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांचे वेळीं हें उपयोगांत आलें आहे. हें हत्यार अंगरख्याच्या कुलाव्यांत ठेवण्याचा रिवाज होता असें दिसतें.

सरदार अब्दुलखानास जमधाड तलवारीनें



(१) जमधर. (२) तलवार. (३) कटार.

चित्र संख्या ४८६

श्रीशिवाजी महाराजांनीं मारिलें असें कित्येक इतिहासकार म्हणतात. यांत थोडी गडबड आहे. 'जमधर'च्या ठिकाणीं 'जमधाड' असा शब्द चुकून वापरला गेला आहे. त्यामुळें ही गैरसमजूत उत्पन्न झालेली दिसते. हें जमधर हत्यार आमच्याजवळ आहे. त्याचे चित्र या लेखांत दिलें आहे.

जंबिया.

हें हत्यार अरबस्थानांतून आलेलें आहे. अरब लोक आपल्या कमरेस हें हत्यार नेहमीं बांधून ठेवितात. हें हत्यार एका फुटापेक्षां जास्त मोठें नसतें. याला एक पातें असून दोन बाजूंस धार असते. याची अणकुची फार तीक्ष्ण असते व मूठ हस्तिदंती, गव्याच्या शिंगाची, सांबराच्या शिंगाची, कचकड्याची किंवा शिसवी लाकडाचीहि असते. या जंबियावर अनेक प्रकारच्या म्हणजे सोन्याचांदीच्या पट्टया व हिरे, माणिक, मोतीं वगैरे रत्नें बसवून त्याच्या मुठीची शोभा वाढविलेली असते. जंबिया कमरेस बांधण्याची कला आहे. या गांठी निरनिराळ्या प्रकारांनीं दिल्या जातात. याप्रमाणें जंबिया कमरेस बांधिल्यावर कंबर नेहमीं ताठ रहाते. हा कमरेचा पट्टा फेंट्यासारखा लांब परंतु रंगीबेरंगी असतो. कित्येकजण सांबराच्या चामड्याचे पट्टे करितात. या पट्ट्याला जंबिया ठेवण्याचें एक घर असतें. या घरास 'एक्का' नांवानें संबोधितात. या जंबियाचें म्यान फारच नामीं बनविलेलें असतें. तलवार, जंबिया व इतर हत्यारांचीं जीं म्यानें तयार होतात त्यांत जें लाकूड असतें, तें आडोळशाचें वापरिलें जातें. त्या लाकडावर नानाप्रकारचा कपडा चढविला जातो. व त्यावर जरदोषी चांदीसोन्याचा रुपेरी अगर सोनेरी गोफ लाविला जातो व त्यावर मगदुरीप्रमाणें मोंढळा, नक्क्या व कबजे बसविले जातात. म्यान एकदम पडून जाऊं नये म्हणून रेशमी अगर जरीचा गोफ लाविला जातो. त्याला गलतनी हें नांव आहे. या जंबियाचे अनेक हात असून त्यांच्या रोंक तितक्याच असून त्या हातांचे फेकन आणि बंदेशहि आहेत. त्या बंदेशपैकीं फक्त दोनच बंदेश या लेखांत दिले आहेत. त्यांचीं नांवें कमानबंद ऊर्फ कमरबंद व हातकडी. या दोन बंदांबद्दलचीच माहिती या लेखांत आहे.

हनुमंती पवित्रा हा बकेंत किंवा जंबियाच्या कुस्तीच्या वेळीं उपयोगी पडतो. कित्येक ठिकाणीं शेरधज या पवित्र्यानेंहि खेळतात. हा शेरधज पवित्रा हनुमंतीप्रमाणेंच आहे.

पेशकब्ज, कुकरी, किरपाण, कट्यार.

पेशकब्ज :—हें हत्यार सुरीसारखेंच आहे. तरी पण हें सुरीपेक्षां थोडें लांब असतें. सुऱ्या अनेक जातीच्या असतात. ह्या सुऱ्या अत्तरसुंब्याच्या प्रसिद्ध आहेत. पेशकब्ज हें मोंगलाई हत्यार आहे. याच्या जाती अनेक आढळतात. अकबर बादशहाच्या शिक्क्याचीं अनेक पेशकब्ज आम्ही पाहिलीं आहेत.

कुकरी :—ही महायुद्धाचे वेळेस फार उजेडांत आली. ही कुकरी गुरखे लोक आपल्याजवळ बाळगितात.

किरपाण :—शिखांचें किरपाण आतां कोण ओळखीत नाहीं? किरपाण लहानमोठीं असतात.

कट्यार:—हें हत्यार रजपूत स्त्रिया नेहमीं आपल्याजवळ ठेवीत असत.

लठ, बाना, लाठी, डांग व कुतका अगर दंडा.

कित्येक लोकांनीं अडीच तीन हातांच्या दंड्यास लठ या नांवानें संबोधिलें आहे.

लठ हा लाठीपेक्षां कितीतरी मोठा असल्यानें त्यास लठ हें नांव दिलें आहे. उत्तर हिंदुस्थानांत हे लठ वापरण्याची चाल आहे. हे लठ डोक्यापेक्षां उंचीला जास्त असतात. यांची किंमत प्रत्येकीं शंभर रुपयां-पर्यंतहि असते. हे लठ तयार करण्याची कला आहे.

बासांचे जंगलांत बांस पक्का तयार झाल्यावर काळोख्या रात्रीं ज्याला जवळजवळ गांठी असतात असा बांस कापून काढिल्यावर तो वांकडा होऊं नये म्हणून खालच्या बाजूस त्यास वजन बांधून लटकावून ठेवितात व त्यावर शिर्शेल तेल ओतीत असतात. या बांसाखालीं तेल वायां जाऊं नये म्हणून एक भांडें ठेवितात. तीन तीन महिने याप्रमाणें त्यांस तेल पाजण्यांत येतें. उत्तम लठ तयार करण्यास एक वर्षभर त्यास तेल पाजतात. हें तेल पिण्याचें बंद झाल्यावर या बांसास पाण्यांत टाकून पहातात. तो बुडाला म्हणजे तो उत्तम आहे असें समजलें जातें. नंतर त्याच्या गांठी तारेनें बांधण्यांत येतात व त्यास खालच्या बाजूनें दांतेदार 'शाम' बसवितात. या शामला आपण खोळी असें म्हणतों. बांसाच्या गांठी विषम असतात—३, ५, ७, ९.

गुजराथमध्यें लाठीस विळीसारखें पण वांकडें फळ बसवितात. या हत्यारास 'धारिया' असें म्हणतात. हें हत्यार खेड्यांतून कामें कारणारांच्याजवळ नेहमीं दृष्टीस पडतें.

डांग नांवाचें हत्यार गुजरातमध्यें वर्तणीये म्हणजे रखवाल (पाटीलकुलकर्णी यांचे पदरीं असलेले नोकर) वगैरे लोक वापरतात. ही डांग खांद्यापर्यंत उंचीला असते व तिला लोखंडाच्या कड्या बसविलेल्या असतात. या कड्या तीन, पांच, सात, नऊ अशा ठेवितात. कारण कड्यांची सम संख्या अशुभ समजतात.

धारियाचे मार तीन असतात. शीर, जनोई व कमर. केव्हां केव्हां धारियानें हातांवरहि तडाखे देतां येतात.

डांगेचे मारहि वरीलप्रमाणेंच आहेत. हीं डांग पायाच्या नळीवर मारण्याचा रिवाज जास्त आहे. समोरासमोर जेव्हां या डांगेचे मार चालतात, तेव्हां पवित्र्यावर काम चालतें. मार देणें व मार रोकणें याप्रमाणें प्रकार चालतो. डांगेवर डांग पडते त्यावेळीं त्यांतून अग्निस्फुलिंग निघूं लागतात.

कुतका.

कुतका हा दोन हातांचा व पक्क्या बांसाचा असतो व त्यास कित्येक बेमुर्वत्याहि म्हणतात. यास बेमुर्वती म्हणण्याचें कारण हा दंडा कोणाची मुर्वत (पर्वा) ठेवीत नाहीं. याचेंहि मार शीर, तमाचा, हातकट्टी वगैरे असून नळी फोडण्याचेंहि काम हा करितो. यालाहि धारियाचें फळ कोणी कोणी बसवितात.

प्रतिपक्षास हात कोणते मारावे व कोणते मारूं नये याचे नियम महाभारतकाळीं

असूनहि भीमसेनानें राजा दुर्योधन याचे मांडीवर गदेचा तडाखा देऊन जय मिळविला व आपली प्रतिज्ञा पुरी केली. त्याचप्रमाणें आजहि अनेक नियम केले तरी खेळण्याचे वेळेस काय होईल तें सांगणें वा लिहिणें कठीण आहे.

कुंत (भाला)

अभिलषितार्थ चिंतामणी या ग्रंथांत भाल्याचे तीन प्रकार दिले आहेत.

१ **गजकुंतः**—हत्तीवरून मारण्याचा भाला.

२ **अश्वकुंतः**—घोड्यावरून मारण्याचा भाला.

३ **पदातिकुंतः**—पायीं चालणाराचा भाला.

याच ग्रंथांत भाला फेंकण्याचे पांच पवित्रे दिले आहेत.

त्यांचीं नांवेंः—१ कंठवर्त. २ कंकणावर्त. ३ पुष्ठावर्त. ४ कक्षावर्त. ५ तर्जन्यावर्त.

हत्तीवरून भाल्याच्या फेंकी तसेच घोड्यावरून फेंकण्याचे हात किंवा मार यांचें मंडळ निरनिराळें होत असें. या ग्रंथांत फक्त पायदळाचेच पवित्रे दिले आहेत.

भाल्याच्या फेका दोन्ही हातांनीं करण्याचा परिपाठ दिसून येतो.

त्यावेळीं भाल्याचें फळ २० अंगुळें वापरिलें जात होतें. फळाकरितां उत्तम प्रकारचें पोलाद वापरीत असत. स्थलसंकोचास्तव सविस्तर खुलासा करणें या ठिकाणीं शक्य नाहीं. पूर्वीच्या भाल्याचें चित्र पहा.

या भाल्यासाठीं उत्तम व पवित्र जमिनींत पैदा झालेल्या भरीव व अगदीं जवळजवळ गांठीं असलेल्या पेऱ्यांचा काळा भोर बांबू पसंत करीत असत.

भाल्याची लांबी गजभाला, अश्वभाला, पदातीं भाला, या प्रकारानुरूप निरनिराळी आहे.

भाल्याचें फळ म्हणजे पात पडून जाऊं नये म्हणून त्यास दोन्ही बाजूनीं चिमटे लाविले जातात. भाल्याची पात दोन धारीं असून त्याची अणकुची अत्यंत तीक्ष्ण असते. अशा भाल्याचा उपयोग हल्लीं फौजेंतहि होत असलेला दिसत नाहीं. हल्लींच्या काळच्या भाल्याची लांबी आठ फूट; पांच इंच व फळाची रुंदी पावणेदोन इंच अशी आहे.

पूर्वीचे जुने भाले कोठें कोठें संस्थानांतून पूजेकरितां ठेविलेले दिसतात. त्याची खालची शाम अणकुचीदार व निमुळती नऊ इंचाची असते. असे जे भाले पूजेंत असतात, त्यांस रेशमी गोंडे व भगव्या फडक्याचें निशाण लाविलेलें दिसतें.

कांहीं भाले सर्वच पोलादाचे असतात. त्यांच्या पाती चौधारी असतात. भाल्याची लांबी आठ फूट दोन इंच असते. या भाल्यांच्या दांड्यांवर सुंदर नकशी केलेलीहि पहाण्यास सापडते. असा एक भाला शाहू महाराजांचे वेळचा आमचेकडे आहे.

सांग नांवाचें हत्यार भाल्यापेक्षां लहान व सबंध पोलादाचें असून त्याची लांबी सहा फूट चार इंच असते.

बर्ची नांवाचें हत्यार भाल्यासारखेंच

असतें. याचाहि उपयोग पायदळ शिपाई करितात.

बिटा, बोथाटी, त्रिशूळ, वगैरे जुनीं हत्यारें आणखी आहेतच.

थोडक्यांत लिहावयाचें म्हणजे, भाल्याचे हात आल्यानें, वरील सर्व हत्यारें मनुष्य वापरूं शकतो. ज्याला भाल्याचे हात, रोंक, लपेट व बंदेश येत असतील तो वरील सर्व हत्यारांचे वरील प्रकार करूं शकतो.

हल्लीं भाल्याच्या फेकींचीं जीं नांवें प्रचारांत आहेत तीं येणेंप्रमाणें:—

१ बजरंग तडफ—आगे. २ बजरंग तडफ—पीछे. ३ वंदे—एक. ४ वंदे—दो. ५ वायु—वेग ६ चौघुमान—फेक. ७ विजयी—खोंच. ८ पवन—फेंक. ९ चक्र-फेंक. १० सुदर्शन—फेंक. ११ हनुमान—फेंक.

भाल्याची लढन्त आणि त्याचे बंदेश निरनिराळे आहेत. या बंदेशांनीं बोटें बांधिलीं जातात. पायाचे आडंगे अनेक आहेत.

सारांश.


सर्वसाधारण माणसाला या बंदेशांची थोडी फार कल्पना यावी म्हणून खालील दर्शविलेल्या आकृतींत त्यांचे स्पष्टीकरणासह प्रत्येक बाबीचे फक्त दोन दोनच बंदेश दाखविण्यांत आले आहेत. तलवार, जंबिया, भाला, लाठी, माडू, जमधर, धोक, बांक, कट्यार, परशु, कातर, कुकरी, सुरी, अगर किरपाण, कोणतेंहि हत्यार लहान असलें तरी त्यावर बांधण्या या आहेतच. पवित्रा, रोंक, लपेट, फेकन, छीन या गोष्टी झाल्यावरच बंदेश ही शेवटची पायरी समजली जाते.

म्हणून या कलेचें शिक्षण घेणाऱ्या प्रत्येक मनुष्यानें आपला पाया चांगला घालणें जरुरीचें आहे. पाया जर कच्चा असेल, तर या कला पूर्णतेला पोंचणार नाहींत. प्रत्येक हाताचे बंदेश निरनिराळे आहेत. वास्तविक हा एक एक विषयच पूर्णरीतीनें लोकांपुढें मांडण्याची जरूर होती, परंतु तशी सोय नसल्यामुळें एखाद दुसरा नमुना दर्शवून थोडक्यांत हा भाग लिहिला आहे. पुढील होतकरू तरुणांना उपयोग झाल्यास आणखीहि लिहितां येईल. इतकेंच लिहून संपादकमहाशयांनीं हा विषय लिहिण्यास संधि दिल्याबद्दल त्यांचे आभार मानून विराम पावतों.

टीप:—लाठी बंदेश हा लेख लिहिते वेळेस जे ग्रंथ मी वाचले ते या विषयावर अभ्यास करणारानें अवश्य पहावें म्हणून त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत.

१ प्राचीन युद्धविद्या, २ पौरस्त्य धनुर्वेद, ३ खड्ग परीक्षा, ४ शाहनामा, ५ अभिलषितार्थ चिंतामणि.

चि: भालचंद्रराव खळे यांनीं जुन्या हत्यारांचीं चित्रें काढून दिल्याबद्दल धन्यवाद.




नं. १ नं. २ नं. ३ नं. ४ न. ५

(१) महाराणा प्रतापसिंहजी यांचे वेळचा भाला. (२) लट्टूदार बाना. (३) लठ.
(४) माडु. (५) पोलादी बाना.


चित्र संख्या ४८७

तलवार.



चित्र संख्या ४८८–४९३


तलवारीच्या निरनिराळ्या भागांची नांवें.



चित्र संख्या ४९४

तलवार बांध १ ला.

चित्र नं. १ प्रमाणें खेळणारांनीं उभें रहावें. नंतर डावे पाय पुढें टाकून हुश्यारचे स्थितींत यावें व प्रतिस्पर्ध्यावर वार करण्याचे तयारीनें उभें रहावें. नंतर ब नें चित्र नं. ३ प्रमाणें तलवार अ चें कमरेवर वार मारण्यासाठीं उगारावी व चित्र नं. ४ प्रमाणें वार मारावा. अ नें पवित्रा काढून त्याच चित्राप्रमाणें गदक्याचे सहाय्यानें आपला बचाव करावा. नंतर अ नें चित्र नं. ५ प्रमाणें आपले डावे हातानें ब चें मनगट धरून ब चें हाताचा काट करून गदका पुढें सरकवावा. नंतर अ नें ब चा धरलेला हात लपेटून निर्जिव करावा व गदक्याचें टोंक ब चें गळ्यावर चित्र नं. ६ प्रमाणें ठेऊन त्यास बांधावें.



चित्र संख्या ४९५-५०२

तलवार बांध २ रा.

चित्र नं. १ प्रमाणें उभे राहून नंतर हुशीयारचे स्थितींत चित्र नं. २ प्रमाणें समोरच्या गळ्यावर वार करण्याचे तयारीनें उभे राहावें.

चित्र नं. ३ मध्यें ब नें स्वतःचा हात अ चे पोटांत आनी मारण्याकरितां उगारला आहे. आनी जास्त जोरानें लागावी म्हणून ब नें तलवार धरलेला हात अ चे पोटावर तलवारीचे टोकाचा इशारा धरून शरिराचे उजवे बाजूस सरळ मागें घेतला आहे. अ स्वतःवर येणारा वार रोकण्याच्या पूर्ण तयारीनें उभा आहे.

चित्र नं. ४ प्रमाणें ब नें स्वतःचा पाय पुढें टाकून अ चे पोटांत आनी मारली असून, अ नें गदक्याचे सहाय्यानें पवित्रा काट करून ब नें मारलेला आनीचा वार गदक्यानें रोकला आहे.


चित्र नं. ५ मध्यें अ नें स्वतःचे डाव्या हातांत गदक्यासुद्धां धरलेले ब चें मनगट गदक्याचे सहाय्यानें टाळ करण्याकरितां डावीकडून वर नेलें आहे.

चित्र नं. ६ प्रमाणें अ नें स्वतःच्या गदक्यानें टाळ करून ब चा हात तलवारीसह गदक्या खालीं दाबला आहे. दोघांची नजर परस्पराकडे रोकलेली आहे.

चित्र नं. ७ प्रमाणें अ नें ब चा तलवार धरलेला हात त्याचे दोन्ही पायांचे मधून पाठीमागें ओढला आहे व स्वतःचा डावा पाय ब चे उजव्या पायाचे पंजावर दाबला आहे.

चित्र नं. ८ प्रमाणें अ नें ब चा तलवार धरलेला हात त्याचे दोन्ही पायांतून पाठीमागें ओढून स्वतःचे हातांतील गदका जमिनीवर फेकून देऊन ब चें हातांतील तलवार काढून घेऊन त्यास निशस्त्र करण्याची सुरुवात केली आहे.

पोलादी बाना.



चित्र संख्या ५०३–५०९

चौमुखी एक.

बान्याची कोणतीहि फेंक ज्या स्थितीपासून करतात त्या उभें रहाण्याच्या पूर्व स्थितीस "हुश्यार" हा हुकूम आहे.

चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें व उजवा पाय मागें पूर्ण अंतरावर ठेवून हुश्यारचे स्थितींत उभें रहावें. डावा पाय गुडघ्यांत वांकलेला ठेवावा व उजवा पाय गुडघ्यांतून सरळ लांब ठेवावा. दोन्ही पायांच्या टाचा जमिनीवर टेकून ठेवाव्या. छाती उचललेली व समोरच्या बाजूस फिरलेली ठेवावी. बाना दोन्ही हातांचे मुठींत मजबूत धरावा. उजवी मूठ लाकडी दांड्याच्या खालचे टोकाजवळ ३–४ इंच जागा सोडून धरावी. उजवा हात लांब पण कोपरांतून किंचित् वाकलेला ठेवावा. उजव्या हाताची मूठ व बान्याचें खालचें टोंक चित्राप्रमाणें मांडीजवळ ठेवावें व डावा हात जमिनीला समान्तर ठेवावा. दृष्टि बान्याचे टोंकावर स्थीर ठेवावी व चेहरा रुबाबदार ठेवावा.

बान्याचें टोंक चित्र नं. २ प्रमाणें वरून मागें उजवीकडे आणून तसेंच उभ्या पातळींत फिरवून पुढें न्यावें नंतर खालून वर वर्तुळाकार फिरवून व मागील उजवा पाय पुढें लांब टाकून उजवीकडील वर्तुळ पूर्ण करावें आणि तोंड डावीकडून फिरवावें व चित्र नं. ३ प्रमाणें बाना आणावा व मागें तोंड करून डावे पवित्र्यावर उभें राहावें.

नंतर बान्याचें पुढचें टोंक डावीकडे उभ्या पातळींत खालून डाव्या पायाबरोबरच मागें घेऊन वर आणावें व डावा पाय पूर्ण अंतर मागें टाकून चित्र नंबर ४ प्रमाणें ठेवावा.


बाना त्याच दिशेनें व वेगानें फिरता ठेवून उजवे बाजूस उभें एक वर्तुळ घ्यावें. बान्याचे उजवेकडील हें वर्तुळ होत असतां डावा पाय वर उचलून उजव्या पायावर तोल सांभाळून चित्र नं. ५ प्रमाणें उभें राहावें.

उजवेकडील वर्तुळ पुरें करून बाना उभ्या रेषेंत आला कीं, उजव्या पायाचे पंजावर उजवीकडे ९० अंशांतून बान्यास डाव्या हाताच्या मुठीनें शरिराजवळ ओढून धरून तशीच डाव्या बाजूनें मागून खालीं मुरड चित्र नं. ६ प्रमाणें द्यावी.

डाव्या पायाबरोबरच बाना खालून पुढें न्यावा. डावा पाय पूर्ण अंतर घेऊन पुढें टाकावा व बाना हुश्यारच्या स्थितींत चित्र नं. ७ प्रमाणें रोकून ठेवावा.

येथपर्यंत **चौमुखी एक** या फेंकीचा एक चतुर्थांश भाग झाला. याचप्रमाणें आणखी तीन तुकडे जोडून पूर्ण फेंक होईल.

लट्टूदार बाना.



चित्र संख्या ५१०–५१७

लट्टूदार बाना.

चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें व उजवा पाय मागें पूर्ण अंतरावर ठेवून हुश्यारचे स्थितींत उभें रहावें. डावा पाय गुडघ्यांत वांकलेला ठेवावा व उजवा पाय गुडघ्यांतून सरळ लांब ठेवावा. दोन्ही पायांच्या टांचा जमिनीवर टेकून ठेवाव्या. छाती उचललेली व समोरच्या बाजूस फिरलेली ठेवावी. बाना दोन्ही हातांचे मुठींत मजबूत धरावा. पहिल्या दोन लट्टू-मध्यें उजव्या हातानें बाना धरावा. उजवा हात लांब पण कोपरांतून किंचित् वांकलेला ठेवावा. उजव्या हाताची मूठ व बान्याचें खालचें टोंक चित्राप्रमाणें मांडीजवळ ठेवावें. डावा हात जमिनीला समांतर ठेवावा. दृष्टि बान्याचे टोंकावर ठेवावी व चेहरा रुबाबदार ठेवावा.

नंतर चित्र नं. २ प्रमाणें बाना वर नेऊन उजवा पाय उचलावा. नंतर बाना डावी-कडून गोल फिरवून पुढें आणावा व उजवा पाय चित्र नं. ३ प्रमाणें पुढें लांब टाकावा. नंतर डावा पाय उचलून चित्र नं. ४ मध्यें दर्शविल्याप्रमाणें आपल्या डाव्या हाताकडे बान्याचें टोंक करून बाना आडवा पण जरा कपाळाच्यावर समोर धरावा.

नंतर उचलेला पाय जमिनीवर न टेकतां आपल्या डाव्या बाजूस उजव्या पायावर काटकोनांत फिरावें म्हणजे पूर्वेकडे तोंड करून उभें असल्यास उत्तरेकडे पाव वर्तुळ फिरावें. फिरतेवेळीं आपल्यासमोर धरलेला बाना डोकी वरून आडवा फिरवून चित्र नं. ५ मध्यें दाखविल्याप्रमाणें आपल्या हातांची स्थिति ठेऊन उभें रहावें. उजव्या हाताची मूठ डाव्या हाताचे खालीं असावी व बाना आडवा धरावा.


नंतर उजव्या पायावर पाव वर्तुळ फिरावें म्हणजे पूर्ण पश्चिमेकडे तोंड होतें. नंतर उचललेला डावा पाय पूर्वेकडे मागें घेऊन उजव्या पवित्र्यावर उभें रहावें व चित्र नं. ५ मध्यें असलेल्या बान्याच्या डाव्या हाताखालीं उजवा हात तसाच उजवीकडे घ्यावा म्हणजे बाना तसाच आडवा फिरवून चित्र नं. ६ प्रमाणें बाना धरावा.

नंतर उजवा पाय उचलून बान्याचें टोक डाव्या हाताकडे करून चित्र नं. ७ मध्यें बाना आडवा दिसतो तसा धरून उभें रहावें.

उचललेला पाय तसाच वर धरून डाव्या पायावर पाव वर्तुळ फिरावें म्हणजे उत्तरे-कडे तोंड करावें व चित्र नं. ८ मध्यें दाखविल्याप्रमाणें डोक्यावरून बान्याला अर्ध वर्तुळ गोल फिरवून डाव्या हाताखालीं उजवा हात येईल अशा प्रकारें बाना आडवा धरावा.

नंतर फिरून पूर्वेकडे तोंड करून पाय पुढें टाकावा. याप्रमाणें डोक्यावर बाना गोल फिरवींत पुढें जावें. यास **चक्रगोल** म्हणतात.

माडू.



चित्र संख्या ५१८-५२४

माडू बांध १ ला.

माडू :--चित्र नं. १ प्रमाणें **अ** आणि **ब** हें दोघे गडी माडूची लढत करण्यासाठीं साधारण तिरपे एकमेकांस तावून व समोरील प्रतिस्पर्ध्याच्या मनगटाकडे नजर रोखून उभे आहेत. दोघांच्याहि उजव्या हातांत माडू आहेत. दोघांच्याहि पावलांत ४५ अंशाचा कोन आहे. दोघांचीहि तोंडें एकमेकांचे विरूद्ध दिशेस असावी व **अ** नें व **ब** नें एकमेकांस सबंध शरीर न दाखवितां एकच बाजू दाखवावी.

नंतर चित्र नं. २ मध्यें दर्शविल्याप्रमाणें **अ** आणि **ब** ह्या दोन्ही गड्यांनीं आपला उजवा पाय मागें घेऊन तडफेनें पवित्र्यावर उभें रहावें. ह्या स्थितींत उभें राहिल्यावर पुढील डावा पाय गुडघ्यांतून वांकवून व मागील उजवा पाय ताठ ठेवून रुबाबदारीनें उभें रहावें. यावेळीं माडू धरलेल्या उजव्या हाताचें मनगट डाव्या हाताच्या मनगटावर ठेवून दोन्ही हात **अ** नें व **ब** नें एकमेकांकडे समोर लांब करावे. यावेळीं छाती उचलून धरावी व प्रतिस्पर्ध्याच्या वार करणाऱ्या मनगटाकडे लक्ष असावें.


चित्र नं. ३ मध्यें दाखविल्याप्रमाणें पुढील डावा पाय शक्य तितका वर उचलावा.

नंतर पुढील डावा पाय खालीं टेकून मागील उजवा पाय चित्र नं. ४ प्रमाणें वर उचलावा. यावेळीं मागील पाय पुढें पोटाकडे न आणतां तो मागेंच थोडासा उजव्या हाताकडील बाजूस उचलावा. हा पाय अशा स्थितींत उचलल्यावर माडू धरलेल्या हाताचे मनगट डाव्या हाताच्या मनगटावर ठेवावें व दोन्ही हात **अ** नें व **ब** नें एकमेकांकडे समोर सरळ करावें. यावेळीं कमरेपासून छातीचा झोंक थोडासा पुढें असावा.

नंतर डावे पाय मागें ठेवून चित्र नं. ५ प्रमाणें उभें रहावें.

ब नें मारलेला उजव्या कानसळीचा वार चित्र नं. ६ मध्यें दाखविल्याप्रमाणें **अ** नें आपल्या उजव्या हातानें रोखावा. रोखतांना प्रकोष्ठावर रोखला जाऊं नये. रोखतांना वार लागून इजा होणार नाहीं अशा रीतीनें मनगटावर रोखावें. वार मारतांना **ब** चा उजवा पाय पुढें पडतो. हा पाय पुढें पडल्याबरोबर त्यास अ नें वार आडवितांक्षणींच आपल्या पुढील पायाखालीं दाबावें. वार आडविल्यावर **अ** नें शक्य तितके खालीं जावें.

नंतर **ब** चा रोखलेला हात **अ** नें तसाच मागें दाबून **ब** च्या मानेस त्याच्याच माडू धरलेल्या हातानें विळखा घालावा. नंतर **अ** नें **ब** च्या मागून माडूचें डाव्या बाजूकडील टोंक व प्रकोष्ठ यांमधून आपला डावा हात घालून त्या हाताचा पंजा थेट मानेपर्यंत न्यावा. म्हणजे चित्र नं. ७ मध्यें दाखविलेला **गलुबंद** हा बंदेश बांधिला जाईल.



चित्र संख्या ५२५–५३४

माडू बांध २ रा.

चित्र नं. १ प्रमाणें खेळणारांनीं उभें रहावें. नंतर चित्र नं. २ प्रमाणें उजवे पाय मागें घेऊन उभें रहावें. नंतर चित्र नं. ३ प्रमाणें डावे पाय उचलून उजवे हात मागें न्यावे. नंतर पुढील डावे पाय खालीं ठेवून चित्र नं. ४ प्रमाणें उजवे पाय वर उचलून हात त्या चित्राप्रमाणें ठेवावे. नंतर चित्र नं. ५ प्रमाणें उजवे पाय मागें ठेवून होशीयारीचे स्थितींत उभें रहावें.

अशा रीतीनें होशयारच्या स्थितींत उभें राहिल्यावर चित्र नं. ६ मध्यें दाखविल्याप्रमाणें **अ** नें मारलेला शीरचा वार **ब** नें माडू धरलेल्या उजव्या हाताच्या मनगटानें **अ** च्या मनगटावर रोखावा. **अ** नें मारलेला शीरचा वार आडवितांना **ब** नें उजवा हात थोडासा आडवा करून शक्य तितकें खालीं जावें. **ब** नें **अ** च्या माडू धरलेल्या हाताच्या मनगटाकडे आपलें लक्ष ठेवावें. **अ** नें शीरचा वार मारतांच त्याच्या पुढील पायाचें पाउल **ब** नें आपल्या पुढील पायाच्या पावलाखालीं दाबावें.


नंतर चित्र नं. ७ मध्यें **ब** नें मारलेला शीरचा वार रोंखून त्याचा माडू धरलेला हात **ब** नें आपल्या डाव्या हातानें धरून घ्यावा. हा हात धरतांना त्याचे मनगट बरोबर धरून घ्यावें. म्हणजे **अ** नें जरी हात वाकडातिकडा केला तरी **ब** ला माडू लागण्याचा संभव कमी राहील.

अशा रीतीनें हात धरल्यानंतर चित्र नं. ८ मध्यें दाखविल्याप्रमाणें **अ** चा माडू धरलेला हात न सोडतां **ब** नें माडू धरलेला हात रोंखलेल्या ठिकाणावरून काढून घेऊन **अ** ला कुख हा वार मारण्याची स्थिति दाखवावी. हा वार मारतांना **ब** नें मागील उजवा पाय थोडा उजवीकडे घ्यावा. मात्र पुढील पाय **ब** नें न हालवितां **अ** चा पुढील पाय आपल्या पुढील पायाखालीं दाबून ठेवावा. नंतर ब नें वार मारतांना कमरेंतून आपला झोंक थोडा मागें न्यावा म्हणजे वार जोरानें लागेल.

नंतर चित्र नं. ९ प्रमाणें **अ** नें **ब** ला कुख हा वार मारावा. हा वार मारतांना **ब** चा पुढील पाय **अ** च्या पुढील पायाखालीं दाबलेला असतो व दोघांच्याहि पुढील पायांचे गुढघे एकमेकांस टेकलेले असतात.

नंतर मारलेला वार काढून घेऊन **अ** चा माडू धरलेला हात न सोडतां त्या हाताच्या कोपराचा सांधा चित्र नं. १० मध्यें दाखविल्याप्रमाणें **ब** आपल्या डाव्या खांद्यावर घेतानां **अ** च्या हाताची रेषा असलेली पंजाची बाजू वर असावी. म्हणजे हाताच्या सांध्याला ताण पडेल व अधिक ताण दिसल्यास हात सांध्यांतून तुटून जाईल. हात सांध्यावर घेतल्यानंतर **ब** नें आपला खांदा वर उचलावा व **अ** चा मनगटांत धरलेला हात सांध्यांतून उलटीकडे लवविण्याचा प्रयत्न करावा. असें केल्यापासून **अ** च्या हातास ताण पडून तो अगदीं निर्बळ होईल. या स्थितींत सुद्धां **अ** चा उजवा पाय **ब** च्या पुढील पायाखालीं दाबून ठेवावा. अशा रीतीनें हा बंदेश पूर्ण होतो. या बंदेशास कोणी **तोड** असें म्हणतात.

भाला.




चित्र संख्या ५३५–५४४

भाला (आडंग्याचा बंदेश).

आडंग्याचा बंदेश—चित्र नं १ प्रमाणें उजवे हातांत भाले धरून व एकमेकांकडे तोंड करून **आरामाचे** स्थितींत उभें रहावें. एकमेकांकडे भेदक दृष्टि ठेवावी. दोन पायांमध्यें ४५ चा कोन करावा व कंबर व मान ताठ ठेऊन सरळ उभें रहावें. भाल्याचे शाम (बट) उजवे पाउलाच्या करंगळी जवळ ठेवावें. नंतर उजवा हात खालीं सरकवावा आणि भाला वर फेकून व चित्र नं. २ प्रमाणें तो धरून उभें रहावें. भाल्याचे टोंकाकडे लक्ष ठेवावें. नंतर डावा पाय वर उचलून डावे हातानें भाला धरावा व चित्र नं. ३ प्रमाणें उजवा हात मागें लांब करावा आणि भाला जमिनीशीं समान्तर ठेऊन मागें दृष्टि ठेवून उभें रहावें. नंतर उचललेला पाय पुढें टाकून चित्र नं. ४ प्रमाणें पुढें जोरानें सामनेवाल्यावर खोंच मारावी. दृष्टि सामनेवाल्याकडे ठेवावी. नंतर उजवा हात मागें घेऊन चित्र नं. ५ प्रमाणें सावधानचे स्थितींत उभें राहावें.

. चित्र नं. ६ प्रमाणें **ब** नें डावा पाय उचलून **अ** ला छातींतील मध्यपटलावर खोंच मारण्यासाठीं तयार व्हावें. नंतर उचललेला डावा पाय पुढें टाकून **ब** नें चित्र नं. ७ प्रमाणें खोंच मारावी. यावेळीं **अ** नें आपले डावीकडे वळून व डावा पाय उजवे बाजूस टाकून चित्र नं. ७ प्रमाणें तोंड फिरवून भाल्याची खोंच वाचविण्यासाठीं उभें रहावें व उजवा हात वर करून भाल्याचें टोंक त्याच चित्राप्रमाणें खालीं आणून भाला उभा धरावा. यावेळीं **अ** नें **ब** चा भाला पुढें जोरानें दाबून आपले डावे हातानें त्याचा भाला धरावा. नंतर **अ** नें दोन्ही भाल्यासह चित्र नं. ८ प्रमाणें डावा हात वर करावा व आपले उजवे हातानें **ब** चा भाला धरावा म्हणजे **अ** चें हातांत त्या चित्राप्रमाणें दोन्ही भाले येतात. नंतर **अ** नें आपला उजवा पाय आपले डावे बाजूस पाव वर्तुळ मागें घेऊन **ब** चें मागें जोरानें जावें व भाले फिरवून चित्र नं. ९ प्रमाणें उजवा हात वर व डावा हात खालीं आणावा. याप्रमाणें केल्यानें **ब** ची **धज** बिघडते व तो तोल संभाळण्यासाठीं त्याचा उजवा पाय **अ** चें डावे पाया पुढें ठेवतो. यावेळीं **ब** चें हातांस पीळ पडतो. नंतर **अ** नें **ब** ला आपले उजवे बाजूस ओढून दोन्ही भाले **ब** च्या मागील बाजूनें त्याचे दोन्ही पायांमध्यें चित्र नं. १० प्रमाणें घालावें व त्याचे डाव्या पायाचे गुडघ्यावर दाबावें म्हणजे त्याच चित्राप्रमाणें तो **अ** चें पूर्ण ताब्यांत येतो. या बांधांत **ब** चें दोन्ही हातांचीं बोटें भाल्यामध्यें दाबलीं गेल्यानें त्याचे हातांस कळ लागते.

भाला लढंत.




चित्र संख्या ५४५–५५५

भाला लढंत.

भाला लढंत—चित्र नं. १ प्रमाणें उजवे हातांत भाले धरून व एकमेकांकडे तोंड करून **आरामाचे** स्थितींत उभें रहावें. एकमेकांकडे भेदक दृष्टि ठेवावी. दोन पायांमध्यें ४५ चा कोन करावा व कंबर मान ताठ ठेऊन सरळ उभें रहावें. भाल्याचें **शाम** (बट) उजवे पाउलाच्या करंगळीजवळ ठेवावें. नंतर उजवा हात खालीं सरकवावा आणि भाला वर फेंकून व चित्र नं. २ प्रमाणें तो धरून उभें रहावें. भाल्याचे टोकाकडे लक्ष ठेवावें. नंतर डावा पाय वर उचलून डावे हातानें भाला चित्र नं ३ प्रमाणें धरावा, उजवा हात मागें लांब करावा आणि भाला जमिनीशीं समान्तर ठेवून मागें दृष्टि ठेवून उभें रहावें. नंतर उचललेला पाय पुढें टाकून चित्र नं. ४ प्रमाणें पुढें जोरानें सामनेवाल्यावर खोंच मारावी. दृष्टि सामनेवाल्याकडे ठेवावी. नंतर उजवा हात मागें घेऊन चित्र नं. ५ प्रमाणें सावधानाचे स्थितींत उभें रहावें.

नंतर **अ** नें डावा पाय उचलून चित्र नं. ६ प्रमाणें **ब** ला भाला मारण्याची तयारी करावी. **ब** नें कोणता वार मारणार त्याकडे लक्ष लावून पहावें. नंतर **अ** नें डावा पाय पुढें ठेवून चित्र नं. ७ प्रमाणें खोंच मारावी व **ब** नें आपला उजवा पाय उजवे बाजूस घेऊन चित्र नं. ७ प्रमाणें तोंड फिरवून व भाला उभा करून आपला बचाव करावा. **ब** नें भाल्याचा दाब **अ** चे भाल्यावर ठेवावा. नंतर **ब** नें **अ** चा भाला ढकलून आपला उजवा पाय चित्र नं. ८ प्रमाणें उचलून **अ** ला शाम (बट) मारण्याची तयारी करावी. नंतर **ब** नें उजवा पाय पुढें टाकून चित्र नं ९ प्रमाणें शाम मारावी. **अ** नें त्याच चित्राप्रमाणें बाजूस सरकून वार आडवावा. यावेळीं दोघेहि बचावासाठीं एकमेकांस रोकत असतात. **अ** नें डावा पाय **ब** चे उजव्या पायाचे गुडघ्यास लावून ठेऊन **ब** चा पाय ढकलावा. नंतर **ब** नें आपला उजवा पाय उचलून व डावे पायावर उजव्या बाजूस फिरून चित्र नं. १० प्रमाणें उभें रहावें. नंतर **ब** नें उजवा पाय मागें ठेवून डावा पाय चित्र नं. ११ प्रमाणें उचलून **अ** ला खोंच मारण्याची तयारी करावी.

जंबिया.



चित्र संख्या ५५६--५६६

जंबिया (हातकडी).

अ व **ब** हे दोघे जंबिया करण्यासाठीं रुबाबदारीनें साधारण तिरपे एकमेकांस तावून, एक डोळा समोरील प्रतिस्पर्ध्याचे मनगटावर रोकून व दुसरा डोळा प्रतिस्पर्ध्याचे डोळ्यास भिडवून उभे आहेत. दोघांच्याहि उजव्या हातांत जंबिया असून डाव्या हातानें उजव्या हातास आधार दिलेला आहे. दोघेहि पावलांत ४५ अंशाचा कोन करून उभे आहेत (चित्र नं. १).

हुश्यार ही स्थिति चित्र नं. २ मध्यें दाखविली आहे. दोघेहि डावा पाय वाकवून उभे आहेत. उजवा पाय मागें ताठ ठेविलेला आहे. त्यांच्या हातांतील जंबिये वार करण्याच्या तयारीनें धरलेले आहेत. ह्या वेळेस नजर मनगटाकडे रोखलेली आहे.

अ नें वार मारण्यासाठीं हात उचलला असून उजवा पाय पुढें टाकला आहे व **ब** नें आपला बचाव करण्यासाठीं हात उचलला आहे (चित्र नं. ३).

अ नें केलेला बाहेऱ्याचा वार, **ब** नें जंबिया हातांत असलेल्या हातानें **अ** च्या मनगटाला आपल्या मनगटानें लगट करून रोखला आहे (चित्र नं. ४).

रोख असतांनाच **ब** नें डाव्या हातानें **अ** च्या उजव्या हाताचें मनगट चित्र नं. ५ प्रमाणें धरलें आहे.

ब नें **अ** चा हात पकडला असतांनाच **ब** सरक करून उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. ६ प्रमाणें डूब घेत आहे.


अ चा जंबिया असलेला उजवा हात पुरा काबूंत आल्यावर त्याला हिसका देऊन **ब** नें हात खालीं खेचला आहे. लगट करून **ब, अ** च्या पाठीमागें गेल्यावर **ब** नें **अ** चा उजवा हात दाब देऊन चित्र नं. ७ प्रमाणें निरुपयोगी केला आहे.

ब आपल्यावर वार करीत आहे असें पाहून लगेंच **अ** पवित्रा तोच ठेवून कमरेला गरका देऊन **ब** चा वार झेलण्यासाठीं चित्र नं. ८ प्रमाणें तयार झाला आहे.

ब नें केलेला वार **अ** नें आपल्या डाव्या हातानें चित्र नं. ९ प्रमाणें मनगटांत रोखला आहे.

ब नें हातांतील जंबिया टाकून **अ** चा हात खालीं दाबला व त्यामुळें **ब** चे हातांत **अ** चें मनगट चित्र नं. १० प्रमाणें सांपडलें. **ब** नें नंतर **अ** चा हात फिरवून **अ** च्या डाव्या हाताच्या कोपरांत त्याचेंच उजव्या हाताचें मनगट ठेवून **हातकडी** केली आहे.

आधींच संपूर्ण निर्बल झालेल्या **अ** ला **ब** नें आणखी दाबल्यावर चित्र नं. ११ प्रमाणें **कमरबंध** बांधला आहे.



चित्र संख्या ५६७-५७२

जंबिया (लकेकच).


चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर डावे पाय पुढें टाकून वार मारण्याचे तयारीचे स्थितींत चित्र नं. २ प्रमाणें उभें रहावें. नंतर **अ** नें उजवा पाय चित्र नं. ३ प्रमाणें वार मारण्यासाठीं पुढें टाकावा व हात वर न्यावा.

अ नें **ब** च्या शिरावर मारलेला वार **ब** नें वरच्यावर डाव्या हातानें चित्र नं. ४ प्रमाणें रोखला आहे. वार रोखण्याकरितां **ब** नें आपला उजवा पाय **अ** च्या पंजावर दाब देण्याकरितां तडफेनें पुढें टाकला आहे.

ब नें डावा पाय पुढें टाकून व डाव्या हातानें तडफेनें लगट करून **अ** चा उजवा हात उलटा मागें नेला आहे व चित्र नं. ५ प्रमाणें **लकेकच बंध** बांधला आहे.

तसाच मागें दाबून **ब** नें **अ** च्या छातीवर गुडघा दाबून वीरासन करून **अ** ला चित्र नं. ६ प्रमाणें हातबंध केलें आहे.

लाठी बंदेश.



चित्र संख्या ५७३–५७७

लाठी (देवपरण बंध).

चित्र नं. १ प्रमाणें लाठी खेळणारे दोघे गडी, **अ** व **ब**, समोरासमोर हुश्यारच्या पोझिशन-मध्यें, स्वतःच्या समोर असलेल्या प्रतिस्पर्ध्यावर त्याच्या शरिराचा कोणता भाग उघडा आहे व कोणता वार केला असतां प्रतिस्पर्धी जास्त घायाळ होईल हें पाहत उभे आहेत. दोघांचा एक एक डोळा एकमेकांवर रोकला असून दुसऱ्या डोळ्याची नजर प्रतिस्पर्ध्यांच्या मनगटावर आहे. दोघेहि वार मारण्यास अगर स्वतःवर वार करण्यांत आल्यास तो रोकण्यास पूर्ण तैयारीनें पवित्र्यावर उभे आहेत.


दोघांमधील अंतर साधारणपणें एका गड्यानें वार केल्यास त्याची लाठी प्रतिस्पर्ध्याचे शरिरापर्यंत पोहोचूं शकेल इतकें असून प्रत्येकाच्या स्वतःच्या पुढच्या व मागच्या पायांतील अंतर सुमारें तीन फूट आहे. दोघांनींहि आपले पुढले पाय वांकविले असून मागील पाय गुडघ्यांतून ताठ ठेविले आहेत.

चित्र नं. २ प्रमाणें **ब** नें **अ** चे कमरेवर कमरचा वार मारला असून **अ** नें तो वार स्वतःची लाठी डाव्या बाजूचे कमरेवर आणून शरिरास समांतर ठेवून सर्व शरिराचा भाग त्या लाठीच्या सहाय्यानें संरक्षिला आहे.

चित्र नं. ३ प्रमाणें जेथें एकमेकांच्या लाठ्या भिडल्या आहेत तेथें **अ** नें आपल्या डाव्या हातानें दोन्ही लाठ्या पकडून व स्वतःचा उजवा पाय पुढें टाकून व डावा पाय मागें घेऊन म्हणजे सरक करून, **ब** च्या उजव्या कुशींत दोन्ही लाठ्यांच्या कुंद्यांनीं **कुख आनी** मारली आहे.

नं. ४ च्या चित्रामध्यें **अ** नें **ब** ला कुख आनी मारल्यावर दोन्ही लाठ्या **ब** च्या दोन्ही हातांमध्यें घातल्या आहेत. अशा प्रकारें या चित्रांत **अ** नें **ब** चीं दोन्ही हातांचीं बोटें व मनगटें दोन्ही लाठ्यांनीं चिमटा देऊन दाबलीं आहेत.

नं. ५ च्या चित्रामध्यें **अ** नें आपल्या लाठींत सांपडलेलीं **ब** चीं बोटें दोन्ही लाठ्यांमध्यें जास्त जोरानें दाबलीं असून दोन्ही लाठ्या वरून खालीं फिरवून **ब** च्या पाठीमागें जाऊन त्याचे लाठ्यांमध्यें बांधलेले हात त्याच्या डोक्यावरून मागच्या बाजूस दाबले आहेत. अशा रीतीनें **अ** नें **ब** स **देवपरण बंध** बांधला आहे.



चित्र संख्या ५७८–५८३

लाठी (शहाजोर चिमटा).

चित्र नं. १ प्रमाणें हुशयारच्या स्थितींत उभें रहावें.

नं. २ च्या चित्रामध्यें ब नें अ चे डोक्यावर शीरचा वार केला असून, अ नें आपला बचाव लाठी डोक्यावर, परंतु डोक्याचे पुढें जमिनीस समांतर अशी, धरून केला आहे.

नं. ३ च्या चित्रामध्यें अ नें आपल्या लाठीचे सहाय्यानें ब ची लाठी **टाळ** करून जमिनीवर स्वतःच्या लाठीनें दाबली आहे.

नं. ४ च्या चित्रामध्यें **अ** नें आपल्या लाठीचा **कुंदा ब** च्या दोन्ही हातांमधून घालून ब च्या व स्वतःच्या अशा दोन्ही लाठ्यांचे सहाय्यानें **ब** चे बोटांस व मनगटांस चिमटा दिला आहे. **अ** नें स्वतःचा डावा पाय पुढें सरकावून **ब** च्या डाव्या पायाचा पंजा आपल्या पंजानें दाबला आहे.

नं. ५ चे चित्रांत **अ** नें दोन्ही लाठ्यांमध्यें चिमट्यांत पकडलेल्या **ब** च्या हातांना लाठ्यांचे सहाय्यानें फिरविण्यास सुरवात केली आहे.

नं. ६ चे चित्रांत **अ** नें **ब** चे हात दोन्ही लाठ्यांच्या चिमट्यांत पकडून **ब** स पूर्णपणें फिरविलें असून **ब** च्या दोन्ही हातांचीं बोटें व मनगटें त्याचे डोक्यावरून मागच्या बाजूस लाठ्यांच्या पकडींत दाबलीं आहेत.

ह्या बंधास **शहाजोर चिमटा** हें नांव आहे.

श्री.

बोथाटी



उपोद्‍घात.

❀

बोथाटीचा खेळ मुसलमानी अमदानीपासून सुरू झाला असला तरी त्याचा प्रसार मराठेशाहींत फार झाला. मराठी साम्राज्याचे काळीं मराठ्यांची मुख्य फौज घोडेस्वारांची असे. त्याकाळीं फौजेची जलदी हालचाल करण्याचें मुख्य साधन म्हणजे घोडा हेंच असे. मराठ्यांची उत्तम स्वार म्हणून फार ख्याति होती. महाराष्ट्रांतील घोडेस्वारांनीं आपल्या भीमथडी घोड्यांवर बसून अटकेपर्यंतचा मुलूख सर केला होता. राघोबादादा पेशवे हे तर रोज ४० कोसांची मजल मारून शत्रूस चकवून टाकीत असत. या त्यांच्या चपलतेमुळें त्यांस राघोभरारी असें नांव मिळालें होतें. मराठ्यांचें साम्राज्य स्थापन करण्याचे कामीं घोडेस्वारांचाच मुख्य उपयोग झाला. त्यावेळीं प्रत्येक मराठे सरदाराचे पदरीं पुष्कळ घोडेस्वार असत. पेशव्यांची हुजरात पागा तर प्रसिद्धच होती. या हुजुरात पागेनें पानिपतच्या मैदानावर शौर्याची शर्थ करून मराठ्यांचें तेज अहमदशहा अबदल्लीच्या पठाणी फौजेस चांगल्या रीतीनें दाखविलें. मल्हारराव होळकराचे भालाईत स्वार प्रसिद्ध होते. घोडेस्वारांजवळ तरवार वगैरे दुसरीं हत्यारें

लेखक :—



श्री. सरदार
माधवराव श्रीधर आपटे, ग्वाल्हेर.

असलीं तरी भाला हें घोडेस्वाराचें मुख्य हत्यार असें. घोड्यावर बसून लष्करांत काम करणारांस शिलेदार अथवा एकांडे म्हणत असत. भाला हें मुख्य हत्यार असल्यानें तें चांगल्या रीतीनें कसें वापरावें याबद्दलचें एक शास्त्रच त्यावेळीं निर्माण झालें होतें. कोणतेंहि हत्यार चांगलें चालवावयाचें म्हणजे तें हत्यार वापरण्याची नेहमीं संवय ठेवणें जरूर असतें. पण अशा रोजच्या अभ्यासाचे वेळीं संवय करणारास त्या हत्यारापासून इजा न होईल याबद्दल काळजी घेणें अवश्य असतें. भाला मारण्याची व भाल्याचा मार चुकविण्याची चांगली संवय व्हावी म्हणून रोजचे सरावाचे वेळीं भाल्याचे बांसास लोखंडी अणकुचीदार फळ न लावतां बासाचे टोकास चिंध्या बांधून कापडी चेंडू तयार करीत. अशा भाल्याची अणी बोथट असल्यानें त्यास **बोथाटी** असें नांव पडलें. अशा प्रकारच्या बोथाट्या घेऊन भाल्याचें द्वंद्व करण्यास शिकत असत. हा बोथाटीचा खेळ मराठे स्वारांचा अत्यंत आवडीचा खेळ झाला होता. प्रत्यक्ष लढाई-शिवाय जेथें जेथें घोडेस्वारांचा तळ पडे तेथें तेथें रोज हा खेळ चालू असे. हा खेळ नुसता दिखाऊ नसून द्वंद्वाचा आहे. हा एक उत्तम मर्दानी खेळ आहे.

या खेळानें स्वारास भाला पेलण्याची व वापरण्याची चांगली संवय होते. शिवाय घोड्यावर बसण्याची उत्तम संवय होऊन घोडा देखील उत्तम प्रकारें तयार होतो. स्वाराची कर्तबगारी पुष्कळ अंशीं घोड्याचे बरेवाईटपणावर अवलंबून असते. हा खेळ मराठी तऱ्हेचा आहे. यासाठीं घोडेस्वारांत व घोड्यांत फार चपळपणा असावा लागतो. थोड्या जागेंत इच्छेप्रमाणें घोड्यास वळणें देऊन काम करावयाचें असतें. नुसत्या मांडीच्या इशाऱ्यानें घोडा पलटला पाहिजे तरच स्वारास आपला बचाव करून शत्रूवर मार करतां येतो. या खेळासाठीं घोडा व स्वार चपळ असावे लागतात.

खेळ म्हटला म्हणजे त्याचे कांहीं नियम ठरवावे लागतात. ऐन लढाईचे प्रसंगीं असल्या नियमांचें पालन होत नाहीं हें उघडच आहे.

हा खेळ नीट खेळतां यावा म्हणून भाला (बोथाटी) नीट फिरविण्याचा सराव करणें जरूर असतें. म्हणून जमिनीवर उभें राहून भाला निरनिराळ्या तऱ्हेनें फिरविण्याचा प्रथम अभ्यास करीत. यासाठीं त्याचे कांहीं हात ठरविण्यांत आले आहेत. हे हात जमिनी-वर उभें राहून शिकणें विशेष सोईचें असतें. **सलाम, बंद, बेल, दुहेरी बेल** असे या खेळाचे कांहीं हात आहेत. हे हात केल्यानें करणाराचे हातांत शक्ति येऊन उत्तम प्रकारचें वळण येतें. अशा प्रकारचे हात पुष्कळ वेळ-पर्यंत करण्याचा सराव करणें जरूर असतें.

आट्यापाट्या, खोखो, वगैरे महाराष्ट्रीय खेळ आहेत, त्यांत तडफ, शरिराचा लवचिकपणा व दमकसीची जरूर असते. त्याच गुणांची बोथाटीचे खेळांत जरूर असते. दोन्ही पक्षांचे स्वार एकमेकांत मिसळून त्यांची लढाई सुरू झाली म्हणजे या खेळानें प्राप्त झालेल्या कौशल्याचा चांगला उपयोग होतो. ही कला मराठशाहींत फार उच्च दरजास

नेली होती. पण मराठेशाही गेल्यानंतर महाराष्ट्रांतील घोडेस्वार गेले व घोडेहि गेले, त्यामुळें हा खेळ नामशेष झाला. निरनिराळ्या मराठीं संस्थानांतील फौजांचें शिक्षण नवीन युरोपियन तऱ्हेनें होऊं लागल्यानें येथूनहि या खेळांचें उच्चाटण झालें. जुनें तें सर्व वाईट या समजानें '**बोथाटी**' सारखा मर्दानी खेळ आम्ही घालविला. **बोथाटी** म्हणजे काय हें देखील लोकांस माहीत नाहीं. हल्लीं तालमींतून **बनेटी** निरनिराळ्या तऱ्हेनें फिरवितात. त्यासच पुष्कळ जण **बोथाटी**चा खेळ असें समजतात. ४० वर्षांपूर्वी बडोद्यास बोथाटीचा खेळ शिलेदार मंडळींत पुष्कळ होता. पण तो वर्गच नाहींसा झाल्यानें हा खेळहि नाहींसा झाला. आमचे सुदैवानें या खेळाची माहिती असलेलीं ४–५ वृद्ध माणसें अजूनहि ग्वाल्हेर येथें आहेत. त्यांचेकडून मला ह्या खेळाचे फोटो व माहिती व्यायामज्ञानकोशासाठीं बडोद्याचे सरदार मुजुमदार यांस मिळवून देतां आली. या लोकांचे मदतीवर मी हा खेळ महाराष्ट्रापुढें थोडक्यांत कां होईना मांडूं शकलों. या खेळाचें पुनरुज्जीवन करणारास या माहितीचा पुष्कळ उपयोग होईल अशी माझी उमेद आहे. या कामीं फोटो घेण्यास व माहिती लिहिण्यास ग्वाल्हेर बॉडीगार्डमधील अहमद मीरखा यांचा पुष्कळ उपयोग झाला. तसेंच कॅप्टन रामराव फाळके, आनंदराव निकम, बापूखा पीरखा, गंगाराम मांडकर, कॅप्टन अण्णाजीराव थोरात, त्रिंबकराव सदाशिव सावरकर यांची या कामीं फार मदत झाली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

बोथाटी (९॥ फूट) लांब असावी. भाल्याची लांबी १० फूट असावी. उंचीवर मारण्याचा भाला ९ हात (१३॥ फूट) लांब असावा. बोथाटी खेळतांना कमरेच्या वरचे अंगावर भाल्याचे हात करावयाचे असतात. घोड्याचे अंगावर बोथाटीनें मार मारूं नये, कारण तसें केल्यास घोडा बिघडतो. बोथाटीचा चेंडू रंगांत बुडवून खेळ करावा म्हणजे हात लागल्याची खूण स्वाराचे अंगावर होते व नीट लागला किंवा नाहीं याबद्दल तकरार करण्यास जागा रहात नाहीं. दुहेरी चक्रावर (काव्यावर) घोडे फिरवून हा खेळ खेळतात.

या खेळासाठीं घोडे फिरवितां येतील असें सपाट मैदान असावें. त्यावर पाणी शिंपडून मग खेळावें म्हणजे धुरळा उडत नाहीं. हल्लीं निरनिराळ्या देशी संस्थानांत लष्करी खेळ करतात त्यांत ह्या खेळाचा समावेश केला तर याचें पुनरुज्जीवन होईल.

बोथाटी :—बोथाटीची लांबी ९॥ फूट असते. त्यापैकीं बोथाटीचे मागचे टोंकापासून ३॥ फूट अंतर सोडून त्या जागीं बोथाटी धरावी म्हणजे धरलेल्या मुठीपासून भाला ३॥ फूट मागें व ६ फूट पुढचे अंगास राहील. याप्रमाणें बोथाटी धरल्यानें बोथाटी खेळतांना बोथाटीचे हात मारण्यास सोईचें होतें. जुन्यावेळीं लढाईंत तलवार अगर भाल्याचे मारापासून शरिराचा बचाव व्हावा म्हणून शिलेदार मंडळी अंगांत पोलादी कड्यांचें केलेलें चिलखत घालीत व पाठीस मोठी ढाल बांधीत. तसेंच डोक्यास पोलादी शिरस्त्राण व मनगटावर वार लागूं नये म्हणून हातांत पोलादी पऱ्याचें

आच्छादनहि घालीत. त्याशिवाय कमरेच्या पट्ट्यांत अगर शेल्यांत जंबिया, कट्यार, तमंचा वगैरे हत्यारें खोंचून ठेवीत असत. चित्र नं. ५८४ व ५८५ पाहिल्यानें त्या वेळच्या स्वाराचा पोशाख लढाईस जातांना कसा असे याची चांगली कल्पना येईल.



चित्र संख्या ५८४




चित्र संख्या ५८५

याप्रमाणें पोशाख करून त्या वेळचे वीर भाला घेऊन घोड्यावर बसत. घोड्यावर बसल्यावर घोडेस्वाराची ऐट कशी असे त्याची कल्पना चित्र नं. ५८६ वरून यईल. भाल्यास अणकुंचीदार लोखंडी टोंक असतें, त्याचेऐवजीं त्याच्या टोंकास चिंध्या बांधून कापडी चेंडू केलेला असतो त्यामुळें बोथाटीनें सामनेवाल्यावर जोरानें हात मारला तरी इजा होत नाहीं. चेंडूचे खालील अंगास रंगीत कापडाच्या दोन पट्ट्या शोभेसाठीं बांधून लोंबत्या ठेवतात. या चित्रावरून



चित्र संख्या ५८६

बोथाटीची कल्पना येईल. खेळाचे सुरवातीस चित्र नं. ५८७ प्रमाणें बोथाट्या धरून खेळाचे मैदानावर यावें.




चित्र संख्या ५८७




चित्र संख्या ५८८

सलामी :— बोथाटीचा खेळ सुरूं करण्याचे आधीं खेळणारे स्वार काव्याच्या (चक्राच्या) मध्यभागीं चित्र नं. ५८८ प्रमाणें बोथाट्या जमिनीवर ठेवून सलामी घेतात किंवा चित्र नं. ५८९ प्रमाणें बोथाट्यांचीं टोकें टोकांस लावून सलामी घेतात अथवा चित्र




चित्र संख्या ५८९




चित्र संख्या ५९०

नं. ५९० प्रमाणें बोथाट्या धरून सलामी घेतात. याप्रमाणें कोणत्या तरी एखाद्या रीतीनें सलामी घेऊन खेळास सुरवात करावी. पुढील होणारा खेळ खेळणारे गडी खेळाडू वृत्ति ठेवून खेळणार आहेत हें सुचविण्याचा उद्देश सलामी घेण्यांत असतो.

नंतर दुहेरी काव्याची आकृति चित्र नं. ५९१ मध्यें दाखविली आहे. त्यावर १ व २ चे जागीं उलट सुलट दिशेस तोंड करून खेळणारांनीं उभें रहावें. नंतर घोडे दुहेरी मंडळावर फिरविण्यास सुरवात करावी. दोन स्वारांची अ च्या ठिकाणीं समोरासमोर गाठ पडते अथवा




चित्र संख्या ५९१




चित्र संख्या ५९२

दोन घोड्यांपैकीं ज्याचा घोडा जास्त चालाख असतो तो स्वार अ वरून दुसरे स्वाराचे आधीं दुसऱ्या काव्यावर जाऊन त्याचे मागें लागतो. याप्रमाणें मागें लागणारा स्वार पुढील स्वाराचे जवळ आला म्हणजे तो चित्र नं. ५९२ प्रमाणें बोथाटी धरून चित्र नं. ५९३ प्रमाणें पुढील स्वारावर बोथाटी मारण्यासाठीं हात वर करतो. पुढील स्वार त्याच चित्राप्रमाणें मागें बोथाटी




चित्र संख्या ५९३




चित्र संख्या ५९४

नेऊन वार मारणाराची बोथाटी आडवून बाजूस सारतो. तीच क्रिया चित्र ५९४ मध्यें जास्त चांगली दाखविली आहे. याप्रमाणें पुढच्या स्वारानें वार वाचविल्यानंतर तो चित्र नं. ५९५ प्रमाणें जास्त मागें वळून मागचे स्वाराचे छातीवर बोथाटी मारतो. अशा वेळेस तो वार चुकाविण्याचा




चित्र संख्या ५९५.




चित्र संख्या ५९६

मागील स्वारानें त्याच प्रमाणें आपले बोथाटीनें प्रयत्न करावयाचा असतो. चित्र ५९६ मध्यें मागील स्वारानें आपला बचाव केलेला दाखविला आहे. याप्रमाणें खेळ झाल्यावर दोघांहि खेळणारांनीं चित्र नं. ५९७ प्रमाणें सलामी घ्यावी.




चित्र संख्या ५९७




चित्र संख्या ५९८

नंतर पुनः खेळास सुरुवात झाल्यावर चित्र नं. ५९८ मधील उजवे बाजूचा मनुष्य पलटतो आहे असें दिसतांच चित्रांतील डावे बाजूकडील स्वारानें त्याचे बरगडीवर बोथाटीचा वार करावा. तो वार वाचवून पलटणारानें वार मारणारावर चित्र नं. ५९९ प्रमाणें उलट वार




चित्र संख्या ५९९




चित्र संख्या ६००

करावा. नंतर खेळणारांनीं चित्र नं. ६०० प्रमाणें पुनः सलामी घ्यावी. चित्र नं. ६०१ मध्यें पगडीवाला स्वार वार मारतो आहे व फेटेवाला स्वार बचाव करतो आहे असें समजावें.




चित्र संख्या ६०१




चित्र संख्या ६०२

या खेळांत तीन स्वार सामील असले तर तिघेजण वर्तुळाच्या मध्यभागीं बोथाट्या जमिनीवर चित्र नं. ५९८ प्रमाणें ठेऊन गोल फिरून सलामी घेतात. नंतर बोथाट्या जमिनीवर तशाच टेकून ठेवून स्वार चित्र नं. ६०२ प्रमाणें घोडे पलटविण्याचे तयारींत उभे रहातात. याप्रमाणें पलटतांना बोथाटीचा हात ऊंच करून त्याचेखालून डोकें पलीकडे न्यावें व घोडे मागचे अंगानें बोथाटीचे खालून फिरवावें. चित्र नं. ६०३ नंतरची स्थिति चित्र



चित्र संख्या ६०३




चित्र संख्या ६०४

नं.६०४ मध्यें दाखविली आहे. याप्रमाणें पलटल्यावर खेळास सुरुवात करावी. पलटण्याच्या क्रियेची नीट कल्पना यावी म्हणून मुद्दाम चित्र नं. ६०५ दिलें आहे. खेळतांना व लढाईचे प्रसंगीं पलटतां येणें बचाव व माराचे दृष्टीनें फार जरूर असतें म्हणून त्याप्रमाणें घोड्यास पलटविण्याचा मुद्दाम सराव करावा.



चित्र संख्या ६०५




चित्र संख्या ६०६

दांड मारणें:—बोथाटीचे खेळांत सामनेवाल्यानें मारलेला भाल्याचा वार (बोथाटीचा) आपले भाल्यानें त्याचा भाला बाजूस ढकलून वाचवावयाचा असतो. पण अशा रीतीनें त्याचा भाला बाजूस ढकलला तरी कित्येकवेळां बोथाटी फिरवून व चित्र न. ६०६ प्रमाणें बगलेंत भाला धरून उलट बाजूचे (बुडाकडील) दांड्यानें त्याचे भाल्यावर जोरानें आघात केला तर सामनेवाल्याचा भाला प्रसंगीं मोडतां येतो अथवा भाला त्याचे हातून पाडतां येतो किंवा निदान त्याचा भाला जोरानें बाजूस सारून त्याचेवर आपले भाल्यानें वार तरी करतां येतो. चित्रांत दाखविल्याप्रमाणें भाला बगलेंत धरल्यानें त्यास सर्व अंगाचा जोर मिळून समोरच्या गड्याचे भाल्यावर त्याचा आघात चांगला करतां येतो. याप्रमाणें उलट बाजूनें जोराचा आघात करण्यास **दांड मारणें** म्हणतात.

सळक मारणें : – बोथाटीचे खेळांत खोच मारतांना सामनेवाला लांब असल्यानें आपली बोथाटी त्याचेपर्यंत पोहोंचत नाहीं. अशावेळीं खोच (वार) मारण्याचे अवसानांतच बोथाटीवरील आपली मूठ जरा सैल करून व जरुरीप्रमाणें एक हातभर बोथाटी आपले मुठींतून पुढें सरकूं देऊन वार करावा व बोथाटी परत पुनः मुळचे जागीं ओढून घ्यावी. जरुरी-प्रमाणें बोथाटी पुढें सरकवून मागें घेण्याच्या क्रियेस **सळक मारणें** असें म्हणतात.


भाला आढून काढणें:—बोथाटीचे खेळांत बोथाटीची अणी बोथट असल्यानें बोथाटीनें वार मारला तरी ती सामनेवाल्याचे शरिरांत घुसत नाहीं, पण प्रत्यक्ष लढाईत भाला


चित्र संख्या ६०७



जोरानें मारला तर तो शत्रूचे शरिरांत खोल शिरून अडकून बसण्याचा संभव असतो. त्यावेळीं भाला नुसत्या हातानें ओढून काढणें शक्य नसतें. अशा प्रसंगीं काय करावें तें माहीत असणें जरूर असतें. चित्र नं. ६०७ प्रमाणें सामनेवाल्यावर भाला मारला व तो परत निघत नसेल तर घोडा फिरवून भाला चित्र नं. ६०८ प्रमाणें आपले बगलेंत धरावा व नंतर घोडा पुढें चालवावा म्हणजे घोड्याचा जोर मिळून भाला बाहेर निघतो.


चित्र संख्या ६०८






चित्र संख्या ६०९

स्वाराची व पायदळ शिपायाची लढंत:—खेळांतील कौशल्याचा प्रकार म्हणून पायदळ शिपायावर एका स्वारानें, दोन स्वारांनीं व तीन स्वारांनीं एकदम हल्ला केला तर पायदळ शिपायानें आपला बचाव कसा करावा हें चित्र ६०९ ते ६१२ मध्यें दाखविलें आहे. चित्र नं. ६०९ मध्यें खेळणारे सलामी घेत आहेत. चित्र नं. ६१० मध्यें पायदळ




चित्र संख्या ६१०




चित्र संख्या ६११

शिपाई बोथाटीवर तरवारीचा वार मारून आपला बचाव करीत आहे. चित्र नं. ६११ मध्यें एकदम दोन स्वारांनीं हल्ला केला तर एकाची बोथाटी बगलेंत धरून व दुसऱ्याचे बोथाटीवर तलवारीनें वार मारून बचाव कसा करावा तें दाखविलें आहे. चित्र नं. ६१२ मध्यें तीन स्वारांनीं एकदम हल्ला केला असतां एकाची बोथाटी बगलेंत, दुसऱ्याची बोथाटी डावे हातांत व तिसऱ्याचे बोथाटीवर तलवारीचा वार करून बचाव केल्याचें दाखविलें आहे.



चित्र संख्या ६१२

चित्र परिचय:—बोथाटीचा खेळ स्वतः खेळणाऱ्या स्वारांचा व बोथाटीच्या खेळाची माहिती देणाऱ्या खेळाडूंचा फोटो यासोबत आहे, त्यांपैकीं,



चित्र संख्या ६१३

घोड्यावर बसलेले:—डावीकडून उजवीकडे (१) कॅप्टन रामराव फाळके. (२) रा. आनंदराव निकम. (३) बापूखा पीरखा. (४) अहमद मीरखा. (५) गंगाराम मांडकर.

जमिनीवर उभे असलेले:—(१) कॅप्टन अणाजीराव थोरात. (२) रा. त्र्यंबकराव सदाशिवराव सावरकर. (३) श्री. सरदार अण्णासाहेब आपटे आहेत.

गोफण.

गोफण हें जुन्या वेळचें एक प्रकारचें हत्यारच आहे. हातानें दगड फेकून मारण्यापेक्षां गोफणीनें दगड जास्त लांब व जास्त जोरानें फेकतां येतो. हल्लीं याचा हत्यार म्हणून मुळींच उपयोग होत नाहीं; पण व्यायामाचा व हस्तकौशल्याचा एक प्रकार म्हणून या साधनाचा उपयोग करण्यासारखा आहे. निरनिराळ्या ठिकाणीं मर्दानी खेळांचे सामने होतात त्यावेळीं मर्दानी खेळ म्हणून हा खेळ दाखल करण्यासारखा आहे.

लेखक :—




श्री. लक्ष्मण नारायण सप्रे,
बडोदें.

पूर्वीं रामोशी लोक दरोडा घालतांना गोफणीचा उपयोग करीत. चांगला सराव केला तर गोफणीनें मनुष्यास दुरून जखमी करतां येतें. वर्मीं धोंडा लागला तर मनुष्याचा प्राण देखील जाण्याचा संभव असतो. गोफणीच्या माऱ्यानें दरोडा घालणारे लोक गांवलोकांस घराचे बाहेर निघणें जोखमीचे करीत व एखादें घर लुटून निघून जात. अगदीं अलीकडे **नाना मिसाळ** म्हणून एक धनगर जातीचा प्रसिद्ध दरोडेखोर होता. बुधगांव संस्थानचे (मिरज धाकटी पाती) कुटकोळी गांवीं नाना मिसाळचा जन्म सन १८७० मध्यें झाला. याचा बाप विठू चांगला तालीमबाज होता. नानासहि लहानपणापासून तालमीचा शोख लागला होता. वयाचे २५ वे वर्षापर्यंत नानास कुस्त्या करण्याचा व शिकारीचा शोख होता. त्यानें उत्तम प्रकारें शरीर कमाविलें होतें. त्याचें वजन ३०० रतल होतें. त्यास शिकारीचा फार नाद असे. शिकार करण्यांत त्याचें मुख्य हत्यार गोफण होतें. शिकारीचे निमित्तानें गोफण फिरवून अचूक नेम मारण्याची कला त्यानें हस्तगत केली होती. एका हातांत गोफण व दुसरें हातांत फरशी कुऱ्हाड घेऊन तो फिरे. कमरेस बांधलेल्या धोतरांत कांहीं दगड असत. कसलेंहि सावज असो गोफणीच्या एक दगडांत त्याचा तो कपाळमोक्ष करी. गोफण हा मर्दानी व्यायाम आहे याबद्दलची कल्पना यावी म्हणून नाना मिसाळचे गोफणीच्या कौशल्याची हकीगत मुद्दाम दिली आहे.

हल्लीं हत्यार म्हणून त्याचा उपयोग नाहीं. तरी दक्षिणेंतील शेतकरी लोक शेतांतील धान्याचें रक्षण पक्ष्यांपासून करण्यांसाठीं गोफणीचा अजूनहि उपयोग करतात. गोफणीचा खेळ सामन्यांतून ठेवावयाचा असेल तर गोफणीच्या दोरीची लांबी व जाडी, तसेच फेकण्याचे दगडाचा आकार व वजन बरोबर ठरवावें लागेल.

साधारणपणें गोफणीची दोरी ७ फूट लांब असावी. त्या दोरीचे दोन तुकडे, एक तुकडा ३६ इंच (३ फूट) लांबीचा व दुसरा ४८ इंच (४ फूट) लांबीचा असे करावे व ते दोन तुकडे एका कातड्याचे ९ इंच लांब व ४ इंच रुंद तुकड्यास मजबूत बांधावे म्हणजे गोफण तयार होते. कातड्याचा तुकडा लांबीचे दोन्ही टोकांस निमुळता करावा व मध्यभागीं ४ इंच रुंद असावा. त्याचे दोन टोकांस भोकें पाडून त्यांत दोरीचा एक एक तुकडा घालून मजबूत गाठ मारावी. याप्रमाणें केले म्हणजे गोफण तयार होते. मध्यभागीं कातड्याचा तुकडा असतो त्यांत दगड ठेवून, मग दोरीचीं दोन्ही टोकें उजवे हातांत धरून गोफण फिरवावयाची असते. अखुड दोरीच्या तुकड्याचे टोकास करंगळी आंत जाईल अशा रीतीची पोकळ गाठ मारावी.

नंतर अखुड दोरीचे शेवटीं बांधलेल्या गाठींत उजवे हाताची करंगळी घालावी व ती दोरी उजवे हाताचे बोटांनीं घट्ट धरावी नंतर कातड्याचा तुकडा असतो त्यांत दगड ठेवून, दुसरी दोरी पहिल्या दोरीच्या मापाइतकी घेऊन उजवे हातांत पहिले दोरीबरोबर घट्ट




चित्र संख्या ६१४

धरावी. (चित्र नं. ६१४) हातांत धरलेल्या दोन्ही दोऱ्या सारख्या लांब ठेवून खालीं लोंबत्या ठेविल्या म्हणजे कातड्याच्या तुकड्यांत ठेविलेला दगड नीट राहतो. एक दोरी लांब असल्यानें तिचें एक टोक मुठीबाहेर लोंबत राहतें. नंतर गोफण आपले डोक्याभोंवतीं जमिनीस साधारण रीतीनें समांतर राहील अशा रीतीनें गोल फिरवावी. (चित्र नं. ६१५) एकदां गोफणीचें टोक खांद्याच्या खालीं जातें व दुसरें बाजूस डोक्याचे वर जातें याप्रमाणें तिरपट गोफण फिरवावी. नंतर गोफण गोल फिरवून, नीट वेग आला म्हणजे, लांब असलेली दोरी एकदम हातांतून सोडावी (चित्र नं. ६१६) म्हणजे दगड सुटून लांब जातो.



चित्र संख्या ६१५



चित्र संख्या ६१६

याप्रमाणें गोफण फिरवून एक दोरी सोडण्याचा नीट सराव झाला म्हणजे दगड अगदीं नेमक्या जागीं मारतां येतो. सवयीनें दगडाचा पल्ला व मार वाढतो.

गोफण तयार करतांना कातड्याचा तुकडा मध्यें न घालतां दोरी विणतांनाच मध्यें दगड ठेवितां येईल असा रुंद भाग विणून, सर्व गोफण अखंड तयार करण्याचीहि दुसरी तऱ्हा आहे. गोफण तयार करणाऱ्यास फार खर्च लागत नाहीं. गोफण मारण्यास शिकल्यानें हातास उत्तम व्यायाम मिळतो. गोफणीनें निशाण मारण्याचा प्रयत्न केल्यानें दृष्टीसहि उत्तम वळण मिळतें. या खेळांत शक्तीपेक्षां कौशल्य व तडफ जास्त लागते.

चक्र.


❀

पंजाबांत शीख लोकांची पुष्कळ वस्ती आहे. शीखांचा धर्म हा हिंदु धर्माचाच एक पंथ आहे. मुसलमानांचे हल्ले पंजाबावरच प्रथम झाले. त्यामुळें तेथील हिंदु लोकांस धर्माचे बाबतींत फार छळ सोसावा लागला. अशावेळीं मुसलमानांचे आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठीं धर्मानें संघटित झालेल्या लढवैय्या समाजाची जरूर होती. ती जरूर शीख पंथानें भरून काढली. या शीखांस स्वधर्मरक्षणाकरतां अनन्वित छळ सोसावा लागला. पण या लढवैय्या लोकांनीं तो सहन केला त्यामुळेंच त्यांचे शौर्यवीर्यादि सद्गुण वाढून त्यांनीं प्रसिद्ध रणजीतसिंगाचे वेळीं पंजाबांत एक मोठें राज्य स्थापन केलें. ह्या पंथाचे स्त्रीपुरुष आपलेजवळ नेहमीं धर्माचें एक अंग म्हणून स्वसंरक्षणासाठीं कृपाण (एक प्रकारची सुरी) नांवाचें हत्यार सदोदीत बाळगतात. शीख लोकांचे मस्तकावरील फेट्यांतहि **चक्र** या नांवाचें एक विशेष प्रकारचें हत्यार सदोदीत ठेवलेलें असतें. हें हत्यार पोलादी पट्टीचें गोल आकाराचें बनविलेलें असतें. चक्राची पट्टी १ इंच रुंद असून आंतले बाजूस गव्हाइतकी जाड असते. या चक्राचे बाहेरचे अंगास तीक्ष्ण धार असते. या चक्राचा व्यास सुमारें १० इंच असतो. हें चक्र शीख लोक आपले फेट्यावर अडकवून ठेवतात. यासोबत चित्रें दिलीं आहेत त्यांवरून चक्राची कल्पना चांगली करतां येईल. चित्र नं. ६१७ मध्यें कृपाण पट्ट्यांत कसें अडकवितात तें दिसेल. त्याच चित्रांत चक्र हातीं धरलेलें दाखविलें आहे.



चित्र संख्या ६१७

हें चक्र अंगठ्या जवळचे बोटांत घालून सुदर्शन चक्राप्रमाणें गोल फिरवून फेंकून मारतात. अथवा चित्र नं. ६१८ प्रमाणें आंगठा व त्याचे जवळील दोन बोटांत, आंतले बाजूनें धरून शत्रूवर जोरानें फेंकून मारतात. चांगल्या रीतीनें चक्र फेकणारा मनुष्य चक्रानें शत्रूचा शिरच्छेद करूं शकतो असें सांगतात.



चित्र संख्या ६१८

चित्र नं. ६१९ मधील शीख मनुष्यानें हातांत लोखंडी भाला घेतला आहे व डोक्यावरील फेट्यांत निरनिराळ्या आकाराच्या सुऱ्या, चक्र वगैरे हत्यारें खोचलीं आहेत.



चित्र संख्या ६१९



चित्र संख्या ६२०

कोयता.

हें हत्यार पोलादी असून कोंकणचे शेतकरी लोक झाडाच्या फांद्या कापण्याचे कामीं मुख्यतः वापरतात. प्रसंगविशेषीं याचा उपयोग संहारक हत्यार म्हणूनहि चांगला होऊं शकतो. शिवाय नेहमींच्या वापरण्यांतील हत्यार असल्यानें हें नेहमीं चांगल्या स्थितींत राहूं शकतें व त्या लोकांस त्यामुळें मोठ्या शीताफीनें वापरतांहि येतें. गुरखे लोकांची जशी कुकरी त्याप्रमाणें कोंकणी लोकांचा हा कोयता आहे.



चित्र संख्या ६२१

फणा.

हें हत्यार पोलादी बाण्याप्रमाणचें असतें, पण याचा आकार निवडुंगाच्या फण्याप्रमाणें असतो. हें हत्यार बरस्यापेक्षां जड असतें. यासहि दोन्ही अंगास धार असते. हें हत्यार बान्याप्रमाणें फिरवतां येतें.




चित्र संख्या ६२२

बरसा.

❊

हें एक संहारक शस्त्र आहे. तीन फूट लांब, दीड इंच रुंद व दोड दोरा जाड अशी पोलादी पट्टी घेऊन तिचें एक टोंक ठोकून बारीक करतात व तें एका २–२॥ फूटांच्या जाड बांबूच्या तुकड्यास रवेट करून बसवितात. तिचें दुसरें टोंक ठोकून अणीदार करतात. या पट्टीच्या दोन्ही बाजूंस धार काढलेली असते. या हत्याराचा उपयोग कोकणांत डुक्करें मारण्याकडे फार करतात. हें शस्त्र वजनदार असतें. हें पोलादी बाण्याप्रमाणें फिरवतां येतें.




चित्र संख्या ६२३

कुकरी.

कुकरी हें नेपाळांतील गुरखे लोकांचें कोयत्यासारखेंच एक हत्यार असतें. कोकणांत कोयत्याचा उपयोग ज्याप्रमाणें झाडाच्या फांद्या वगैरे कापण्याचे कामीं तिकडील लोक करतात त्याचप्रमाणें नेपाळांतहि गुरखे लोक कुकरीचा उपयोग करतात. गुरखे लोकांच्या पलटणींतील प्रत्येक शिपायाच्या कमरेस कुकरी अडकविलेली असते. महायुद्धांत गुरखे लोकांनीं हातघाईचे लढाईत जर्मनी विरुद्ध या हत्याराचा उपयोग फार परिणामकारक रीतीनें केला, म्हणून तेव्हांपासून हें हत्यार प्रसिद्धीस आलें. गुरखे लोकांच्या नेहमींच्या उपयोगांतील हें हत्यार असल्यानें याचा उपयोग ते लढाईत फार सफाईनें करुं शकतात.

धारियें.

ह्या हत्याराचा प्रचार गुजराथेंतील शेतकरी लोकांत आहे. चित्र नं. ६२४ वरून या हत्याराची कांहीं कल्पना येईल. हें २ इंच रुंद व १–१॥ फूट लांब असतें. लांबट आकाराचें कोयत्यासारखेंच हें हत्यार असून तें ३–४ फूट लांबीच्या मजबूत व भरीव अशा एखाद्या लाठीचे एका टोंकास पक्कें बसविलेलें असतें. याची पोलादी पातीसह एकंदर लांबी ४ तें ५ फूट असतें त्यामुळें याचा मारा दुरून लांब असलेल्या शत्रूवरहि करतां येतो. शेताचें संरक्षणार्थ



चित्र संख्या ६२४

बांधलेल्या कुंपणातील, शेंड, निवडुंग वगैरे कांटेरी झाडांच्या फांद्या तोडण्याकडे शेतकरी याचा नेहमीं उपयोग करतात त्यामुळें हें हत्यार सफाईनें वापरण्याची त्यांस चांगली संवय झालेली असते. प्रसंग पडल्यास स्वसंरक्षासाठीं किंवा शत्रूस मारण्यासाठींहि गुजराथ देशांत या हत्याराचा नेहमीं उपयोग करण्यांत येतो. या हत्याराच्या एका घावानेंच मनुष्याचा शीरच्छेद होऊं शकतो. उत्तर हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें खेड्यांतील लोक नेहमीं स्वसंरक्षार्थ लाठी घेऊन फिरतात त्याप्रमाणेंच गुजराथ देशांतहि तेथील लोक धारियें हातांत घेऊन फिरत असलेले नेहमीं दृष्टीस पडतात.

गलोल (कामटीची).

धनुष्याचा उपयोग बाण मारण्याकडे करतात. धनुष्याचे रचनेंत थोडा फेरफार करून खडे मारण्यासाठीं एक प्रकारचें धनुष्य तयार करतात त्यास गलोल म्हणतात. (चित्र नं. ६२५)



चित्र संख्या ६२५

गलोल तयार करण्यासाठीं एक चांगली मजबूत पाठ (साल) असलेली सुमारें ४४ इंच लांबीची भरीव बांबूची जाड कामटी घ्यावी. ही कामटी सोलून दोन्ही बाजूंचीं टोकें निमूळतीं करावीं. कामटी मध्यभागीं १॥ अगर १॥। इंच रुंद असावी व टोंकाचे बाजूंस -॥।- इंच रुंद राहील अशी दोन्ही बाजूंस निमूळती करावी. नंतर दोन्ही टोंकांस १॥ इंच जागा सोडून दोरी अगर तात बांधण्यासाठीं त्या कामटीचे दोन्ही टोंकांस दोन्ही बाजूंस जरा खोल खाचा पाडाव्या. या खाचांचे पुढें एक बोटभर जागा सोडून पुढचा भाग अणीदार करावा. या कामटीचे मध्यभागीं आंतले बाजूंस ६ इंच लांबीचा लाकडाचा एक तुकडा बसवावा व तो दोरीनें कामटीस घट्ट बांधावा. या तुकड्यास मध्यभागीं ४ इंच लांबीची खाच करावी म्हणजे त्याठिकाणीं बोटाची पकड नीट बसते. याप्रमाणें केल्यानें गलोल धरण्याची मूठ तयार होते. ती झाल्यावर ८०–८२ इंच लांबीची बकऱ्याचे आंतड्याची तांत अगर मजबूत दोरी घेऊन ती धनुष्याच्या प्रत्यंचेप्रमाणें कामटीस दुहेरी बांधावी. नंतर एका टोंकापासून ६–७ इंच जागा सोडून तेथें ३ इंच लांबीची एक मजबूत जाड काडी घेऊन व दोन तांती रुंद करून चित्र नं. ६२५ प्रमाणें ती काडी तांतीस जाडा दोऱ्यानें बांधावी. याप्रमाणें करून दोन तांती एकमेकांपासून दोन इंच लांब राहतील असें करावें. नंतर एक इंच रुंद व १॥ इंच लांब असा जाड चामड्याचा तुकडा दोन्ही तांतींच्या भोंवतीं शिवून बसवावा. हा तुकडा अशा रीतीनें शिवावा कीं, तो तांतीतून पुढें मागें सरकूं शकेल. कित्येक मंडळी दोरीनें विणून हा तुकडा तयार करतात. नंतर हा चामड्याचा तुकडा मुठीच्या समोर पण २ बोटें पुढचे अंगास ठेवून गलोलीचा उपयोग करावा. यावेळेस

ह्या तुकड्यांत एक खडा ठेवून व चित्र नं. ६२६ प्रमाणें ओढून, धनुष्यानें बाण सोडतात त्याप्रमाणें खडा सोडावा. खडा सोडतांना आपले आंगठ्यास सोडलेला खडा लागूं नये म्हणून चामड्याचा तुकडा जरा तिरपट करून सोडावा.




चित्र संख्या ६२६

चांगला सराव झाला तर या गलोलनें खडा अगदीं नेमक्या जागेवर मारतां येतो. गलोलीसाठीं केलेलें धनुष्य जितकें जोरदार असेल त्या मानानें हा खडा जास्त लांब जाईल. धनुष्याची प्रत्यंचा ज्याप्रमाणें काम झाल्यावर एका बाजूनें काढून ठेवतात त्याचप्रमाणें याच्या तांतींच्या दोऱ्या एका बाजूनें काढून ठेवाव्या. याप्रमाणें केल्यानें बांबूचे कांबीचें स्थितिस्थापकत्व कायम राहतें व खडा जोरानें लांब मारतां येतो. रबराचा शोध लागण्या-पूर्वींची ही गलोल आहे. रबर मिळूं लागल्यावर त्याच्या सहाय्यानें दुसऱ्या तऱ्हेची गलोल पण करतां येऊं लागली आहे. तिची माहिती दुसरीकडे दिली आहे.

गलोल (रबरी).

❋

पेरु, चिंच, जांभूळ, कडुनिंब या सारख्या चिवट झाडांची दोन फाटे फुटलेली हाताच्या आंगठ्या एवढी जाड फांदी घेऊन तिचा उपयोग गोफण करण्याचें कामीं करतात. चित्र नं. ६२७ पहिल्यानें या फांदीची नीट कल्पना येईल. गोफण हातांत नीट धरतां यावी म्हणून मूठ ४ इंच लांबीची ठेवावी. वरील दोन्ही फाटे पण चार चार इंच लांबीचे ठेवावे. नंतर २॥ इंच लांब व १॥ इंच रुंद असा एक जाड कातड्याचा तुकडा घेऊन त्याचीं दोन्हीं टोकें किंचित् निमूळती करावी. या कातड्याचे तुकड्याचे दोन्ही टोकांस करंगळी जाईल अशी गोल भोकें पाडावीं. नंतर ६ इंच लांब व ।।- इंच रुंद असें मजबूत रबराचे दोन तुकडे घेऊन व कातड्याचे तुकड्याचे एक एक भोकांत एक एक रबरी तुकड्याचें टोक घालून तीं टोकें वळवून दोऱ्यानें बांधावीं. नंतर रबराचे तुकड्याचीं दुसरीं टोकें फांदीच्या दोन फाट्यास दोरीनें मजबूत बांधावीं म्हणजे गलोल तयार होते.



चित्र संख्या ६२७

नंतर कातड्याचे तुकड्यांत एक वाटोळा खडा ठेवून अंगठा व त्याचे जवळचे बोटांनीं त्यांत तो दाबून धरावा. आणि चित्र नं. ६२७ प्रमाणें गलोल डावे हातांत व कातड्याचा तुकडा उजवे हातांत धरून गलोल मारण्याची तयारी करावी. नंतर उजवे हातानें

कातड्याचा तुकडा आपलेकडे जोरानें ओढावा म्हणजे रबराचे तुकडे लांब होतात. नंतर निशाण मारण्यासाठीं नेम धरून कातड्याचा तुकडा एकदम सोडावा. याप्रमाणें केल्यानें रबर एकदम अखूड होतें व त्या हिसक्यानें खडा लांब असलेल्या लक्ष्यावर जोरानें फेकला जातो.

रबराचे तुकडे जसे जाड असतील व जितक्या जोरानें ओढून ते सोडण्यांत येतील त्या मानानें गोफणींतील दगड लांब फेकला जातो. चिमण्या, खारी वगैरे सारखे लहान प्राणी या प्रकारच्या गलोलीच्या साह्यानें मारतां येतात. संवयीनें खडा अचूक मारतां येतो. पारधी लोक खिशांत अगर बगलथैलींत लहान लहान गोल आकाराचे खडे भरून घेऊन गलोलींनें शिकार करण्यास जातात.




चित्र संख्या ६२८

वर निशाण मारण्यासाठीं गलोल, उजवा हात व दृष्टि कशी एका रेषेंत ठेवावी याची कल्पना चित्र नं. ६२७ व ६२८ वरून चांगली येईल. चित्र नं. ६२७ मध्यें समोर असलेल्या वस्तूवर नेम धरला आहे व चित्र नं. ६२८ मध्यें उंच जागीं असलेल्या वस्तूवर नेम धरला आहे.

वाघनखें.

❀

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज यांनीं विजापूरचा सरदार अफझुलखान याचेवर वाघनखांचा उपयोग केला व त्याची आंतर्डीं बाहेर काढलीं त्यावेळेपासून या शस्त्रास प्रसिद्धि मिळाली. वाघाचीं नखें ज्याप्रमाणें तीक्ष्ण असून उपयोगांत आणण्यापूर्वीं दिसत नाहींत त्याचप्रमाणें हीं पोलादी नखें बोटांत घातलीं तरी शत्रूस सहज दिसत नाहींत. म्हणून या हत्यारास वाघनखें असें नांव पडलें आहे. या पोलादी नखांचा आकारहि वाघाच्या नखांप्रमाणें बांकदार असतो. वाघनखें आंगठ्यांस बसवून बोटांत घालतात. या आंगठ्या पोलादाच्या असतात. पण त्याऐवजीं या आंगठ्या सोन्याच्या किंवा चांदीच्या करून बोटांत घातल्या तर माहितगार



चित्र संख्या ६२९

माणसाशिवाय हें शस्त्र हातांत घातल्याचें शत्रूचे ध्यानांत सहसा येत नाहीं. बोटांत साध्या आंगठ्या घातल्या आहेत असाच बोटांचा देखावा दिसतो. हाताचा पंजा उघडा असतो तोपर्यंत नुसत्या आंगठ्या बोटांचे बाहेरचे बाजूनें दिसतात पण चित्र नं. ६२९ प्रमाणें मूठ मिटतांच वाघनखें बाहेर येऊन त्यांचा उपयोग करतां येतो. हें शस्त्र बहुतकरून डावे हातांत घालतात कारण त्यामुळें तें शत्रूचे दृष्टि आड ठेवून लपविणें सोपें जातें. याचा मारा बरगडीखालींल पोटावर किंवा मानेच्या घाटीपलीकडील भागावर करतात.

गदा.

महाभारतांत गदायुद्धांचीं अनेक वर्णनें आहेत. रामायणांत हनुमंताचें गदायुद्ध वर्णन करून सांगितलें आहे. महाभारतीय योध्यांत जरासंध, भीम, दुर्योधन हे उत्तम गदायुद्ध करणारे म्हणून प्रसिद्ध आहेत. भीमानें व दुर्योधनानें बळरामाजवळ गदायुद्धाचें शिक्षण घेतलें होतें. "गदेचा दांडा ५० अंगुळें लांब असावा. गदेला मुठीकडे एक लहान बोंड असावें व मारण्याच्या अंगाला एक मोठा वजनदार गोळा असावा. गोळयाचा व्यास १० अंगुळें असावा व त्याचे वरचे अंगास एक अंगुळाचा कळस असावा. एकंदर गदेची लांबी ६० अंगुळें असावी व तिच्या दोन्ही टोंकांस पांच पांच घुंगरें असावीं. गदा परजतांना घुंगरांच्या अवाजानें उत्साह वाढतो" असें गदेचें जुन्या ग्रंथांत वर्णन आहे. गदेचें अडतीस हात वर्णिले आहेत व गदायुद्धाचे पवित्रेहि पुष्कळ सांगितले आहेत. गदेचा गोळा चांगलाच जड असतो कारण त्याशिवाय शत्रूचा घात सहज करतां येणार नाहीं.

भारतांत जरासंघ व भीम यांच्या गदायुद्धाचें उत्तम वर्णन आहे. त्यावरून लढणारे गडी गदेवरच सामनेवाल्याची गदा अडवून आपला बचाव करीत असें दिसतें. त्यामुळें कित्येक वेळां लढतांना गदांचे तुकडे उडत असें वर्णन आहे. कोणीहि गदेचा प्रहार प्रतिस्पर्ध्याचे कमरेच्या खालचे अंगावर करण्याची गदायुद्धांत मनाई होती.



चित्र संख्या ६३०

पुराणांतील वर्णनें वांचलीं म्हणजे गदेचा उपयोग पुराणकाळीं पुष्कळ करीत असत, पण पुढील काळांत मात्र गदेचा उपयोग शस्त्र म्हणून करण्याचें अगदींच बंद झालें असें दिसतें. नुसता खेळ म्हणून देखील गदेचा प्रचार कोठेंहि राहिला नाहीं. चित्र नं. ६३० चें पाहिल्यानें गदेबद्दल कल्पना येईल. करेला फिरविण्याची मेहनत किंवा बांबूचे काठीचे एका टोंकास लोखंडी अगर दगडी मोठा गोळा लावून तिचे सहाय्यानें होत असलेली मेहनत या दोन्हीहि मेहनती गदा बिनचूक व सहज लीलेनें फिरवतां यावी या हेतूनेंच करतात.

सध्यां गदायुद्धाचा लोप झाला आहे व पुनः गदेचा शस्त्र म्हणून उपयोग होण्याचा संभव दिसत नाहीं. पण जुन्या वेळचें एक शस्त्र या दृष्टीनें त्याची माहिती येथें दिली आहे. हलक्या वजनाच्या गदा करून त्यांच्या सहाय्यानें पुनः केवळ खेळ म्हणून या गदायुद्धाचे निरनिराळे हात खेळण्याचा रिवाज तालमींतून यापुढें सुरू केल्यास त्यायोगे निदान एका जुन्या मर्दानी खेळाचें पुनरुज्जीवन केल्यासारखें होईल असें वाटतें.

तिरंदाजी.

❀

बंदुकीची दारु निघण्याचे आधीं धनुष्य-बाण हेंच लांब पल्ल्यावरून शत्रूस मारण्याचें मुख्य शस्त्र होतें. भारतवर्षांत धनुर्विद्येचा प्रचार फार पुरातन काळापासून झालेला होता. त्याबद्दलचा सविस्तर लेख या खंडाचे सुरवातीस रा. गाडगीळ शास्त्री यांचा दिला आहे. आपले देशाप्रमाणेंच इतर बहुतेक सर्व देशांतून धनुष्यबाणाचा उपयोग लढाईचे कामीं करण्यांत येत असे. अलीकडे मात्र याचा उपयोग लढाईचे कामासाठीं करण्यांत येत नाहीं, पण युरोपअमेरीकेंत खेळ म्हणून तिरंदाजीचा बराच प्रचार आहे. त्या देशांतील स्त्रियांमध्येंहि या खेळाची बरीच आवड आहे. आपलेकडे जंगलांत रहाणारे भील वगैरे मागसलेल्या जातीचे लोक तीर–कामठ्यांचा उपयोग शिकारीच्या कामीं करतात. युरोपअमेरिकेंत उत्तम प्रकारचें तीर व कामठे (धनुष्यें) खेळासाठीं म्हणून बनवून विकतात. आपल्या देशांत भरीव बासाचे कामठे तयार करतात व एका प्रकारच्या बोरूचे तीर करतात. पक्क्या सालीचा बांबू घेऊन त्याचें धनुष्य बनवितात व बकऱ्याच्या आंतड्याची तांत दोरीचे जागीं वापरतात. अचुक व लांब पल्ल्यावर बाणाचा नेम मारण्याबद्दल भील लोकांची प्रसिद्धी आहे. युरोपप्रमाणें आपले देशांतील सुशिक्षित स्त्रीपुरुषांत खेळ म्हणून तिरंदाजीचा प्रसार होणें इष्ट आहे. तिरंदाजी करण्यांत एक प्रकारचें कौशल्य आहे व त्यापासून चांगल्या प्रकारचा व्यायामहि होतो. निरनिराळ्या ठिकाणीं मर्दानी व मैदानी खेळांचे सामने होतात त्यांत तिरंदाजीची चढाओढ दाखल करण्यासारखी आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांची धनुर्विद्येंत ते फार प्रवीण असल्याबद्दल ख्याति होती. सात तवे एकामागें एक ठेवून ते एकाच बाणानें फोडीत असत अशी त्यांचे बद्दलची हकीकत आहे. पृथ्वीराजास महमद घोरीनें कैद करून काबूलास कैदेंत ठेविले होते. तेथें त्यांचे डोळे फोडण्यांत आले होते. त्यानतर त्यांचे तिरंदा-

जीचें कौशल्य पाहण्याची महमद घोरीस इच्छा झाली. त्यासाठीं सात तवे लोंबते ठेवून ते फोडून दाखविण्याचा प्रयोग करण्यासाठीं त्यांस घोरीचे दरबारांत आणण्यांत आलें. यावेळीं त्यांचे बरोबर चंदभाट पण कैदेंत होता. पृथ्वीराजास दिसत नसल्यानें चंदभाटानें त्यास तवे किती अंतरावर व उंची वर आहेत तें सांगावें व पृथ्वीराजानें त्या नुसत्या माहिती वरून वेध करावा असें ठरलें होतें. नंतर ऐन वेळेस चंदभाटानें तव्याचें अंतर सांगण्याचे ऐवजीं महमद घोरी ‘ चार बांस चोवीस गज व आठ आंगुळें ’ अंतरावर अमुक उंची वर बसला आहे असें एका दोहऱ्यांत (कवितेंत) सांगितले व त्या मापानें पृथ्वीराजानें बाण मारून महमद घोरीचा वध केला अशी एक दंत कथा सांगण्यांत येते. यावरून पृथ्वीराजाचें तीर मारण्याचें कौशल्य दिसून येतें. लांब अंतरावर जोरानें बाण मारून मजबूत व जाड लक्ष्याचा वेध करणें कौशल्याचें व शक्तीचें काम आहे. तसेंच एका मिनिटांत जास्त बाण सोडतां येण्यास देखील शरीर-सामर्थ्याची जरूर लागते. जपानांत तिरंदाजीचा अजून देखील फार शोख आहे. धनुष्य व बाण थोड्या वेळासाठीं तेथें भाड्यानें मिळतात व तेथील पुष्कळ लोक ते धनुष्यबाण भाडयानें घेऊन तिरंदाजीचा सराव करतात. लांब अंतरावर जोरकस अचूक बाणाचा नेम मारणें हें जें तिरंदाजीचें मुख्य तत्व त्यांवरच तेथें लक्ष देण्यांत येतें. आपलेकडे आर्य समाजाचीं गुरुकुलें आहेत त्यांतून तिरंदाजी खेळ म्हणून शिकविण्याचा उपक्रम करण्यांत आला आहे. पण त्या ठिकाणीं लहानसें धनुष्यबाण घेऊन त्यानें अनेक प्रकारचे कौशल्याचे वेध करून दाखविण्याकडेच जास्त लक्ष देण्यांत येतें असें दिसतें. त्यापेक्षां जोरदार तीर मारण्याचा सराव करणें व्यायामाचे दृष्टीनें जास्त हितावह आहे.


प्रत्येक माणसानें आपल्या हाताच्या मापानें चार हात लांबीचें धनुष्य घ्यावें. चांगला भरीव बांबू घेऊन त्याचें धनुष्य बनवावें. बांबूची साल बाहेरचे अंगांस ठेवून आंतले बाजूनें बांबू गोल करावा. बाहेरच्या सालीचे बाजूस धनुष्याची **‘पाठ’** म्हणतात. व आंतली बाजू गोल असते तिला **‘पोट’** म्हणतात. धनुष्यास दोरी लावावयाची ती फार जाडी नसून मजबूत असावी. बकऱ्याच्या आंतड्याची तांत दोरीच्या ऐवजीं लावल्यास उत्तम. रेशमी बारीक मजबूत दोरी असेल तर चालेल. धनुष्य वांकवून दोरी चढविली म्हणजे दोरीवर जोर येतो व बाण मारतांना धनुष्य जोरानें वांकवावें लागतें, त्यावेळेस दोरीवरच सर्व जोर येत असतो, म्हणून ही दोरी फार मजबूत घेणें जरूर असतें. धनुष्याचें स्थितिस्थापकत्व जाऊं नये म्हणून वापरण्याचे वेळींच धनुष्य वांकवून त्यास दोरी चढवावी व काम संपल्यावर दोरी एका बाजूनें काढून ठेवावी. जोरदार धनुष्य वांकवून त्यास दोरी (प्रत्यंचा) चढविणें हें शक्तीचें काम आहे. तसेंच बाण सोडतांना देखील कानापर्यंत दोरी ओढून बाण सोडयाचा असतो. तसें करण्यासहि शक्ति लागते. धनुष्य बिघडूं नये म्हणून तें जपून ठेवावें. तेलाचा हात लावून ठेवावें म्हणजे बांबू

जास्त वेळ चांगला रहातो व त्यास कीड लागत नाहीं. तसेंच तांतीची दोरी असेल तर त्यास देखील तेलाचा हात लावून ठेवावा. जास्त वापर झाल्यानें दोरी बिघडते व तुटते म्हणून तिरंदाजी करण्याचे आधीं दोरी नीट चांगले स्थितींत आहे किंवा नाहीं तें काळजीपूर्वक पाहावें. तसेंच दोरी तुटली तर काम अडूं नये म्हणून २-३ दोऱ्या नेहमीं शिलकेंत ठेवाव्या. सहा फूट लांबीचें धनुष्य असेल तर त्यास दोरी चढविल्या नंतर **धनुष्याचे मध्यापासून दोरी ६ इंचावर राहील इतक्या** बेतानेंच धनुष्य वांकेल अशा लांबीची दोरी असावी. यापेक्षां धनुष्य जास्त वांकविलें तर बाण जोरानें जाणार नाहीं. वांकविलेलें धनुष्य दोरी उतरविल्यावर पुनः पहिल्याप्रमाणें सरळ होईल तर तें उत्तम धनुष्य समजतात. सहज वांकवितां येऊं नये इतकें तें जाड असावें.

तसेंच शक्ति अजमावण्यासाठीं धनुष्य फार वांकवू नये. त्यांमुळें त्यांतील तंतूंवर फाजील जोर येऊन ते कमजोर होतात.

धनुष्याचे मध्यभागापासून जरा एक बाजूस बांबाचा ५ इंच लांबीचा एक तुकडा धनुष्याचे आंतले बाजूनें ठेवून तो दोरीनें पक्का बांधावा. याप्रमाणें करण्याचा हेतु धनुष्य धरण्यास गोल आकाराची पुरती जाडी मूठ करण्याचा असतो.

बाणाची लांबी २ फूट असावी व त्याचे टोंकास आणकुचीदार लोखंडी फळ बसविलेलें असावें. मागचे टोंकास तीन बाजूंस पिसें बसवितात. पिसांमुळें बाण सरळ जाण्यास मदत होते. त्यामुळें बाण हवेवर उचलून धरला जातो. पिसाचे बाजूचे टोंकास खाच केलेली असते. दोरीमध्यें बरोबर बसेल अशा बेताची खाच असावी. बाण सरळ असावा. अचुक निशाण मारण्याचा सराव करण्यासाठीं एका लाकडी चौकटीवर कापड लावून त्यावर लहान मोठीं पांढऱ्या व काळ्या रंगाचीं वर्तुळें काढावीं व तो फळा (टार्जेट) समोर ठेवावा. मध्यभागीं पांढरें वर्तुळ ठेवावें व त्याचे बाहेरचे अंगास काळ्या रंगाचें व पुनः बाहेरचे अंगास पांढरें वर्तुळ ठेवावें. याप्रमाणें तीन चार वर्तुळें (चित्र नं. ६३१) काढावीं.



चित्र संख्या ६३१

मध्यभागीं नेम लागला तर सर्वांत जास्त गुण ठेवावे व त्याचे बाहेरच्या वर्तुळांस कमी कमी गुण ठेवावे, म्हणजे तिरंदाजीचे चढाओढींत पहिला गडी ठरविण्यास सोईचें जातें.

बाण ठेवण्यास कातड्याचा भाता असावा. त्यांत १२ बाण राहतील इतकी जागा असावी. पिसांची बाजू भात्याचे बाहेर राहील अशा वेताचा भाता असावा. त्यांत लोखंडी टोकें खालीं करून बाण उलटे भरून ठेवावे. हा भाता डावे बाजूचे खांद्यावर लोंबत ठेवितां येईल अशी दोरी त्यास लावावी. डावे हातांत धनुष्य धरावयाचें असतें म्हणून डावे बाजूस भाता असल्यानें त्यांतून जरुरीप्रमाणें उजवे हातानें एक एक बाण काढून घेतां येतो.

निरनिराळ्या तऱ्हेनें उभे राहून अथवा उताणें अगर पालथें निजून बाण मारण्याचा सराव करावा. याप्रमाणें करण्यांत कौशल्य आहे.

(१) निरनिराळ्या प्रकारचीं धनुष्यें.

आपले देशांत बांबूच्या पाठीचे धनुष्य बनवितात. त्याचप्रमाणें पोलादी पट्टीचेहि




चित्र संख्या ६३२

धनुष्य बनवीत असत. युरोपअमेरिकेंत तिकडील कांहीं विशिष्ट झाडांच्या लाकडाचीं धनुष्यें बनवितात. चित्र नं. ६३२ वरून निरनिराळ्या धनुष्यांची कल्पना येईल.

(२) निरनिराळ्या प्रकारचे बाण.

चित्र नं. ६३३ मध्यें निरनिराळ्या



चित्र संख्या ६३३

बाणांचे नमुने दाखविले आहेत. बाणांच्या टोंकांस निरनिराळ्या आकारांचीं पोलादीं फळें बसविलेलीं असतात. बाणांच्या दुसऱ्या टोकास धनुष्याचें दोरींत बसण्यासाठीं खाच पाडलेली असते व त्या खाचेंच्या जवळच बाणाला तीन अगर चार पिसें लावलेलीं असतात.

(३) धनुष्यास दोरी चढविणें.

धनुष्याचे एक टोकास दोरी बांधलेली असते पण धनुष्य वापरण्यास घेण्याचे आधीं

त्या दोरीचे दुसरे टोकाचा फास धनुष्यास चढवावयाचा असतो. यासाठीं धनुष्याचे पोटाची (आंतील) बाजू आपलेकडे करून व धनुष्याचें वरचें टोक आपले डावे हातानें धरून तें आपले समोर उभें धरावें. नंतर डावे हातानें त्याचें वरचें टोंक खालीं जोरानें दाबून उजव्या हातानें दोरीचा फास धनुष्याचे खाचेंत बसवावा. धनुष्य मजबूत असल्यानें डावे हातानें तें पुरेसें वांकण्यासारखें नसेल तर आपले दोन्ही हातांचा जोर घेऊन डावे पायाचा गुडघा धनुष्याचे मध्यभागीं धनुष्याचे पोटावर लावावा व धनुष्य वांकवून खाचेंत फास बसवावा. धनुष्यास तळपाय लावून दाबणें गौण समजतात.


(४) तयारीची स्थिति.



चित्र संख्या ६३४


चित्र नं. ६३४ प्रमाणें दोन पायांत अंतर ठेवून तोल घेऊन उभें रहावें. डावे हातांत धनुष्य घ्यावें व त्याचेवर (म्हणजे आपले डावे अंगास) बाण आडवा ठेवून तो आपले डावे हाताचे बोटांत धरावा व बाणाचे मागील बाजूची खाच दोरीवर चढवून उजवे हाताचा आंगठा व पहिलें बोट यांत बाण धरावा. नंतर निशाण कोठें मारावयाचें तें नीट पहावें. बाण धरण्याच्या निरनिराळ्या तऱ्हा खालील चित्रांत दाखविल्या आहेत.

चित्र संख्या ६३५




चित्र नं. ६३५ मध्यें आंगठ्या जवळचें बोट व मधलें बोट यांचेमध्यें बाण धरला आहे व तीन बोटांचे मदतीनें बाण व दोरी ओढलेली दाखविली आहे.

चित्र संख्या ६३६




चित्र नं. ६३६ मध्यें बोटें लांब करून बाण कसा सोडावा तें दाखविलें आहे.

चित्र संख्या ६३७



चित्र नं. ६३७ मध्यें आंगठा व त्याचे जवळचें बोटामध्यें बाण धरून ओढण्याची क्रिया दाखविली आहे.


चित्र संख्या ६३८



चित्र नं. ६३८ मध्यें आंगठा व त्याचे जवळचें बोटामध्यें बाण धरला आहे व तीन बोटांनीं दोरी ओढून बाण सोडण्याची क्रिया दाखविली आहे.

(५) निशाण मारणें.


चित्र नं. ६३९ प्रमाणें धनुष्यास बाण लावून धनुष्य डावा हात लांब करून धरावें. बाण मारण्यासाठीं दोरी उजवे हातानें आपले कानाकडे ओढावी. ज्या वस्तूवर निशाण मारावयाचें असेल ती वस्तु फार अंतरावर नसेल तर, बाण सोडलेल्या रेषेंत सरळ जातो त्यामुळें त्या वस्तूवर नेम धरावा. पण वस्तु जास्त अंतरावर असेल तर सोडलेला बाण कांहीं अंतरापर्यंत सरळ जाऊन, नंतर गुरुत्वाकर्षणाच्या नियमाप्रमाणें, तो वजनानें खालीं खालीं येतो. चित्र नं. ६४०–६४१ पाहिल्यानें आमच्या म्हणण्याची कल्पना येईल. म्हणून नेम धरतांना वस्तूच्या वरचे अंगास नेम धरावा म्हणजे बरोबर निशाण लागेल.



चित्र संख्या ६३९



चित्र संख्या ६४०



चित्र संख्या ६४१




चित्र संख्या ६४२




चित्र संख्या ६४३

उडणाऱ्या पक्ष्यावर नेम धरावयाचा असेल तर चित्र नं. ६४२ प्रमाणें वरचे बाजूस धनुष्य धरावें. पक्षी अगदीं डोक्यावर असेल तर धनुष्य डोक्यावर धरावें लागेल. नंतर नेम धरतांना पक्ष्याची गति व आपल्या बाणाचा वेग यांचा विचार करून नेम धरावा. आपला बाण तेथें पोहोचण्याचे सुमारास पक्षी ज्याठिकाणीं येईल असा अंदाज असेल त्या बेतानें पक्षाचें पुढचे अंगास नेम धरावा. यावेळीं वाऱ्याचा जोर असेल तर तोहि विचारांत घ्यावा म्हणजे निशाण बरोबर लागेल.

चित्र. नं. ६४३ प्रमाणें बसून देखील बाण मारण्याचा सराव करावा. तसेंच चित्र नं. ६४४ प्रमाणें पालथें निजून पुढील वस्तूवर व उताणें




चित्र संख्या ६४४




चित्र संख्या ६४५

निजून पुढच्या वस्तूवर बाण मारावा. तसेंच डोक्याचे मागचे बाजूचे वस्तूवर बाण मारण्याची संवय करावी. तसेंच चित्र नं. ६४५ प्रमाणें मागचे अंगास वांकून वेध करावा.

जमिनीवर पाण्यानें भरलेली परात ठेवून त्यांत वरील वस्तूचें प्रतिबिंब पाहून चित्र नं. ६४६ प्रमाणें नेम मारावा. तसेंच चित्र नं. ६४७ प्रमाणें डोळ्यास रूमाल बांधून शब्दवेध करावा. ज्या वस्तूवर निशाण मारावयाचें असेल ती वस्तू डोळ्यानें दिसत नसल्यानें त्या वस्तूवर दुसऱ्याकडून आघात करून आवाज होतो त्या आवाजाचे अनुसंधानानें नेम धरून बाण मारावा.



चित्र संख्या ६४६



चित्र संख्या ६४७

तरवारीचे हात.

उपोद्घात.

तरवारीचा उपयोग शस्त्र म्हणून फार पुरातन काळापासून चालू आहे. जुन्या वेळीं खडग्युद्धाचें एक स्वतंत्र शास्त्रच होतें. अलीकडे नानातऱ्हेचीं अस्त्रें व शस्त्रें यांचे शोध लागल्यामुळें आतां युद्धांतून तरवारीचा उपयोग पुष्कळच कमी झाला आहे. त्याचेऐवजी हातघाईचे लढाईंत संगीनीचा उपयोग जास्त होतो. तरीपण लष्करी पोषाखांत अजून तरवारीनें आपलें स्थान कायम ठेविलें आहे. तरवारीच्या फेकी करणें व तरवारीनें निरनिराळ्या प्रकारच्या काटी करून दाखविणें हा सध्यां एक उत्तम प्रकारचा मर्दानी व लष्करी खेळ बनला आहे. या खेळानें चांगली मेहनत होते व प्रसंग विशेषीं स्वतःचा बचाव करण्याचें साधन म्हणून या खेळाचा उपयोग होण्यासारखा आहे. हल्लीं आपल्या देशांत कोणतेंहि हत्यार बाळगण्याची बंदी केलेली असल्यामुळें तरवार कशी असते याचें ज्ञानहि सर्वसाधारण जनतेंतून नाहींसें झालें आहे. त्यामुळें नुसत्या पत्र्याच्या बिनधारी तरवारी बनवून त्यांचे साधनानेंच तरवारीचे हात निरनिराळ्या व्यायामशाळांतून करण्यांत येतात. पुष्कळ ठिकाणीं तरवारीचे हात संघ—पद्धतीनें करून घेतात. हल्लीं तरवारीचे हात एकेकट्यानें अगर संघानें करावयाचे असतात, त्यांत प्रत्यक्ष काट करून दाखविण्याचा रिवाज नाहीं व फिरविण्याची तरवार देखील नकली, बिन धारेची व कमी वजनाची असते, त्यामुळें पट्याचे साधारण हातांप्रमाणेंच तरवारीचे हात केले जातात. अशा रीतीनें तरवार फिरविण्यानें नुसता देखावा चांगला झाला तरी त्याचा प्रत्यक्ष उपयोग कांहींच होण्यासारखा नसतो. जोडीचे अगर लाठीचे हात करण्यानें अगर फरीगदक्याच्या नुसत्या घाई केल्यानें जशी एक प्रकारची नुसती मेहनत होते तसाच हाहि प्रकार होतो.

ज्यास तरवारीचा हत्यार म्हणून उपयोग करावयास शिकावयाचें असेल त्यानें खरी तरवार घेऊन निरनिराळे हात केले पाहिजेत व हात करतांना ज्या निरनिराळ्या काटी करतात त्या प्रत्यक्ष केळीचा खांब पुढें ठेऊन त्यावर केल्या पाहिजेत.

रोज नवीन केळीचें खांब मिळणें शक्य नसतें म्हणून जुन्यावेळीं चिक्कणमातींत कापूस मिळवून व ती माती भिजवून तिचा ओला गोळा करून ठेवीत असत. या मातीचा जरुरीप्रमाणें जाडा व लांब गोळा करून त्यावर तरवारीचे वार मारून काट करण्याची संवय करीत

असत. त्यामुळें योग्य रीतीनें तरवार हातांत धरून वार कसा करावयाचा याची प्रत्यक्ष संवयीनें माहिती होत असे. तिरपट वार मारून नंतर तरवार मागें सफाईनें ओढावयाची असते. याप्रमाणें संवय करून योग्य रीतीनें वार केला तरच कमी श्रमानें जास्त जोराचा काट करतां येतो. नुसत्या नकली तरवारी जोरानें फिरविल्यानें फरफर आवाज होईल इतकेंच पण त्याचा उपयोग कांहीं होणार नाहीं.

तरवारीचे वारांचा सराव करण्यासाठीं उसाचे जुडीचाहि चांगला उपयोग होतो. उसांवर किंवा केळीच्या खांबावर वार करतांना जर नीट वार मारला गेला नाहीं तर तरवार वाकते व वार माराणाराचे खांद्यास, कोपरास अगर मनगटास वाराचे अवसानाप्रमाणें झटका बसून इजा येते.


तरवार चांगल्या उत्तम पोलादाची व चांगलें पाणी चढविलेली घ्यावी. तरवारीस धार नीट लावण्याची व तरवारीस गंज चढून ती बिघडणार नाहीं याबद्दल काळजी घ्यावी.

तरवारीच्या फेकी नीट करतां आल्यातर चारी बाजूचे शत्रूंवर प्रसंगानुंसार वार करून आपला बचाव करतां येतो.

एक हातांत तरवार धरून तरवारीच्या फेकी करतात त्या प्रमाणेंच दोन हातांत तरवारी घेऊन एकाचवेळीं दोन तरवारींच्या फेकीहि करून दाखवितात. त्यांत देखील वरप्रमाणेंच दोष राहतो. उजव्या हातानेंच नीटसा काट करणें अवघड जातें तर मग डाव्या हातानें काट करणें त्याहून कितीतरी कठीण जाणार हें उघडच आहे. एक तर वार नेमक्या जागीं मारण्याची सवय झाली पाहिजे व त्याशिवाय त्या वारानें चांगला काट झाला पाहिजे, म्हणून शक्य असेल तर योग्य रीतीनें तरवारी फिरविण्याचा सराव करावा. अशा रीतीनें पुष्कळ दिवस सराव केला तर दोन्ही हातांनीं बिनचूक काटी करतां येतील. पण तूर्त या दिशेची जाणीवच कोणास राहिली नसल्यानें मुद्दाम याप्रमाणें सविस्तर लिहीणें भाग पडलें आहे.

नुसती तरवार हातांत असून तिचा प्रसंगीं कांहीं उपयोग होणार नाहीं. कोयता, कुकरी, धारीये यांसारखीं हत्यारें शेतकरी रोज शेतीच्या कामासाठीं, लांकडें, झाडाच्या फांद्या कापण्यास वापरतात. तींच हत्यारें वापरण्याची संवय असणारांस तरवारी पेक्षां प्रसंगीं जास्त उपयोगी पडतात, कारण तीं खरोखरी कशी वापरावीं त्याचा हातास सराव झालेला असतो, तशी तलवारीची स्थिति नसते. तरवारीच्या काटी संवय केल्याशिवाय करतांच येणार नाहींत म्हणून तरवार वापरणारांनीं तशा तऱ्हेची तयारी अगोदर पासूनच करून ठेवावी हेंच बरें.


एक तरवारीचे हात.



चित्र संख्या ६४८–६५३

एक तरवारीचे हात—हात १ ला.

एक तरवारीचे हात—हात १ ला—चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेऊन व उजव्या हातांत त्याच चित्राप्रमाणें तरवार जमिनीशीं समान्तर धरून उभें रहावें. नंतर तरवारीचा हात शक्य तितका मागें नेऊन एकदम अवसानानें चित्र नं. २ प्रमाणें शरिराचा झोंक पुढें टाकावा व सामनेवाल्यास खोंच मारावी. याप्रमाणें खोंच मारल्यानंतर सामनेवाला दूर असेल तर उजवा पाय व डावा पाय थोडा थोडा पुढें सरकवीत **सरकपवित्र्यानें** जरूरी-प्रमाणें पुढें जाऊन सामनेवाल्यास खोंच मारावी. नंतर एकदम मागें उजवे बाजूस फिरून चित्र नं. ३ प्रमाणें उजवे हाताकडील शत्रूवर गर्दनकाटचा वार मारावा. नंतर मागील डावा पाय चित्र नं. ४ प्रमाणें पुढें टाकून त्याच चित्राप्रमाणें तरवार डोक्याचे मागें धरून उभें रहावें. नंतर मागील उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. ५ प्रमाणें त्या बाजूचे सामनेवाल्यावर **शीरचा** वार मारावा. नंतर आपले डावीकडे फिरून चित्र नं. ६ प्रमाणें मूळचे बाजूस तोंड आलें म्हणजे त्या बाजूचे शत्रूवर **खोपरीचा** वार करावा. नंतर तो हात आपले डावे बाजूस आला म्हणजे त्या बाजूचे शत्रूवर **जानव्याचा** वार मारावा. नंतर उजवीकडून पाऊण चक्कर फिरून उजवा पाय पुढें टाकून शत्रूचे उजवे **कानशिलावर** वार मारावा. नंतर हात मागें घेऊन डावा पाय पुढें टाकावा. याप्रमाणें चारी बाजूंची तोंडें करून मूळचे स्थितींत येऊन उभें रहावें.




चित्र संख्या ६५४–६६०

एक तरवारीचे हात–हात २ रा.

एक तरवारीचे हात–हात २ रा–चित्र नं. १ प्रमाणें उभें राहून खोंच मारण्याची हूल दाखवावी व तरवार डोक्यावरून फिरवून चित्र नं. २ प्रमाणें मागें न्यावी व मागील उजवा पाय पुढें टाकून शत्रूचे पुढील पायाचे मांडीवर चित्र नं. ३ प्रमाणें **जांघेचा** वार मारावा. नंतर तरवारीचा हात चित्र नं. ४ प्रमाणें मागें न्यावा. नंतर पुनः चित्र नं. ५ प्रमाणें पहिले बाजूस तोंड करून शत्रूवर त्या चित्राप्रमाणें **गर्दनकाटचा** वार मारावा. नंतर उजवे बाजूनें मागें फिरून चित्र नं. ६ प्रमाणें खालीं बसून शत्रूचे गुडघ्यावर वार मारावा. नंतर तसेंच उठून व हात डोक्याचे मागें नेऊन उजवे बाजूनें शत्रूवर कमरेचा वार चित्र नं. ७ प्रमाणें मारावा. नंतर डावीकडे फिरून मागचे बाजूस तोंड करून सुरुवातीचे स्थितीप्रमाणें उभें राहवें. पहिल्या डावाप्रमाणें या डावाची चौमुखी करावी.

दोन तरवारीचे हात.




चित्र संख्या ६६१–६६६

दोन तरवारीचे हात–हात १ ला.

दोन तरवारीचे—हात १ ला–चित्र नं. १ प्रमाणें डावे पवित्र्यावर उभें रहावें. डावे हाताची तरवार समोर व उजवे हाताची तरवार मानेच्या मागें चित्राप्रमाणें धरावी. नंतर उजवा पाय पुढें ठेऊन डावे हातानें शत्रूचे डावे कानशिलावर वार मारावा म्हणजे डावा हात चित्र नं. २ प्रमाणें पुढें येतो त्यावेळीं उजवा हात तसाच मागें ठेवावा. नंतर डावा हात खालून पाठीचे मागें नेऊन चित्र नं. ३ प्रमाणें धरावा व चित्र नं. २ मध्यें डावा पाय मागें असतो तो उचलून उजवे पायाचे मागें तिरपा ठेवावा. याप्रमाणें करण्यासाठीं डावे बाजूस फिरावें. त्याचवेळीं चित्र नं. २ मध्यें उजवा हात मागें असतो तो चित्र नं. ३ प्रमाणें खालीं आणून व शत्रूचे गुडघ्यावर वार करून चित्र नं. ४ प्रमाणें डावे बाजूस वर न्यावा. त्याच अवसानांत उजवा पाय चित्र नं. ४ प्रमाणें पुढें टाकावा.

नंतर उजवा हात फिरवून व डावा पाय पुढें टाकून शत्रूचे उजवे घोट्यावर वार मारावा म्हणजे उजवा हात चित्र न. ५ प्रमाणें येईल. यावेळीं डावा पाय पुढें टाकतांना पाठीमागील डावा हात चित्र नं. ५ प्रमाणें पुढें आणावा व नंतर तो डावा हात डोक्यावर उजवीकडे आणून डोक्याचेभोंवतीं पूर्ण वर्तुळाकार फिरवून शत्रूचे कानशिलावर डाव्या हातानें वार मारावा. नंतर उजवा पाय उजवीकडून मागें नेऊन व अर्ध वर्तुळ फिरून डावे पायाचे मागें चित्र नं. ६ प्रमाणें ठेवावा व त्याच चित्राप्रमाणें दोन्ही हात ठेवावे. नंतर मूळ स्थितीच्या डावे बाजूस फिरून उभें रहावें. तेथून पुनः त्या तोंडानें वरचाच हात करावा. याप्रमाणें चारी बाजूस तोंडें करून हात करावे.

वरील हात करतांना दोन्ही तरवारींत सारखें अंतर राहिलें पाहिजे. एक हात पुढें फिरत असला तर त्यावेळीं दुसरा हात मागें न्यावा. याप्रमाणें केल्यानें तरवारी एकमेकींवर आपटत नाहींत व वार मारतांना दुसऱ्या हाताची अडचण येत नाहीं. डोक्यावरून हात फिरवितांना देखील दोन तरवारींत अंतर ठेवावें व एका मागून एक हात न्यावे.




चित्र संख्या ६६७–६७०

दोन तरवारीचे हात–हात २ रा.

दोन तरवारीचे हात–हात २ रा–चित्र नं. १ प्रमाणें तरवारी धरून उभें रहावें. नंतर समोरचे शत्रूवर उजवा पाय पुढें टाकून उजव्या हातानें लंगोटाचा हात चित्र नं. २ प्रमाणें मारावा. त्याच गतींत डावे हातानें आपले डावे बाजूस असलेल्या शत्रूवर गर्दनचा वार मारावा. नंतर डावे बाजूस फिरून डावा पाय मागें न्यावा. डावे हातानें वार मारल्यानंतर तो हात फिरवून उलटा करून पाठीवर चित्र नं. ३ प्रमाणें न्यावा व उजवा हात डोक्याचे डावे बाजूस वर न्यावा. नंतर मागचे बाजूस असलेल्या शत्रूचे उजवे गुडघ्यावर वार मारण्यासाठीं चित्र नं. ३ प्रमाणें खालीं बसावें व उजव्या हातानें वार मारावा. हा वार मारतांना उजव्या हाताचें मनगट गोल फिरवून वार मारावा. नंतर उजवा हात चित्र नं. ४ प्रमाणें मागें नेतांना उभें रहावें व डावा हात मागें असतो तो फिरवून वर आणावा. नंतर मागील डावा पाय चित्र नं. ४ प्रमाणें पुढें ठेऊन, डावे हातानें आपले उजवे बाजूचे शत्रूचे उजवे कानशिलावर वार मारावा. नंतर उजवा पाय डाव्याचे मागें टाकला म्हणजे मूळ बाजूस तोंड फिरेल. नंतर मूळ स्थितीच्या उजवे बाजूस दोन्ही तरवारी फिरवून त्या बाजूस तोंड करून उभें रहावें. नंतर त्या तोंडानें वरप्रमाणें क्रिया करून हात करावा. याप्रमाणें चारी बाजूचे हात करावे.

हे हात नीट करतां आले म्हणजे चौक, चौरंग, चौमुखी व अष्टमुखी वगैरे सारखीं तोंडें फिरवून हात करण्याचा सराव करावा. याप्रमाणें केल्यानें गोल फिरतांना चक्कर येतें तें येईनासें होतें.

रा. बाळकृष्ण ऊर्फ रावसाहेब गणपतराव कुदळे, काशी.



चित्र संख्या ६७१

पटा, तलवार, भाला, वगैरे हत्यारांच्या कामांत हे चांगले निष्णात आहेत. पांच हत्यारें एकदम घेऊन हे निरनिराळ्या प्रकारचे हात करतात.

हनुमन्ती पटा.

उपोद्‌घात.

तरवार, भाला, बरची, धनुष्यबाण, कृपाण, भिंदीपाल वगैरे हत्यारें प्राचीन काळीं निघालीं त्यावेळेपासूनच पट्याचा जन्म झाला असावा असें वाटतें. पटा हें एक तीक्ष्ण धारेचें तरवारीप्रमाणें शस्त्र असून त्याच्या योगानें आत्मसंरक्षण व शत्रूचा नाश करितां येतो. पटा धारण करणारानें आपले सभोंवतीं फिरविला असतां श्रीकृष्णाच्या सुदर्शनचक्राप्रमाणें तो फिरविणाराचें रक्षण करतो. बंदुकीचे दारूचा शोध लागला नव्हता त्यावेळेस हातघाईच्या लढाईंत पट्याचा चांगला उपयोग होत असे. बंदुकी, तोफा वगैरे नवीन साधनांचा शोध लागल्यापासून जुन्या प्रकारचीं हत्यारें आतां लढाईंचे कामीं निरुपयोगीं ठरलीं आहेत. त्यामुळें हल्लींच्या लष्करांतून पट्याचा उपयोग करण्यांत येत नाहीं. मराठे लोकांच्या कारकीर्दींत पट्याचा उपयोग लढाईचे कामीं फार होत असल्यानें महाराष्ट्रांत पट्याचा प्रसार फार झालेला आहे. लष्करांत दाखल होण्यापूर्वी त्यावेळीं प्रचलित असलेलीं हत्यारें वापरण्याचें शिक्षण आधीं देण्यांत येत असे व तीं हत्यारें वापरण्याचे कौशल्यावर त्या इसमाची लष्करांत दाखल होण्याची लायकी समजण्यांत येत असे. त्यामुळें तरवार, पटा, भाला वगैरे प्रकारचीं हत्यारें कशीं वापरावीं याचें मराठ्यांनीं एक शास्त्रच बनविलें होतें व त्या शास्त्राचा प्रचार त्यावेळीं महाराष्ट्रांत खेडोपाडीं झालेला होता. त्याप्रमाणें पटा फिरविण्याची कला देखील त्यावेळीं उच्च दर्जास पोहोंचली होती. पुढें सर्वच परिस्थिति बदलली. त्यामुळें ह्या युद्धोपयोगी कलांचाहि ऱ्हास होत चालला. अजून देखिल महाराष्ट्रांत तालमींतील निरनिराळ्या मर्दानी खेळांपैकीं एक खेळ म्हणून पटा फिरविण्याचा प्रचार कायम राहिला आहे. पण पुढें तालमीची निकृष्ट दशा झाल्याकारणानें ह्या पट्याचे कलेचा लोप होत चालला. आमचे सुदैवानें पुन्हां समाजाचें लक्ष जुन्या मर्दानी खेळांकडे वळलें आहे. त्यामुळें ह्या नामशेष होत चाललेल्या पट्याचे खेळाकडे समाजाचें लक्ष पुन्हां गेलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

मराठे लोकांच्या लढाईंत पटा उत्तम फिरवून शत्रूचा पराजय केल्याचे अनेक प्रसंग आहेत व त्यांचीं वर्णनेंहि आहेत. लढाईचे प्रसंगीं पटा चांगला फिरवितां यावा म्हणून दोन दोन तास एक अगर दोन्हीं हातांत पटे घालून फिरविण्याचा सराव लोक करीत असत. अशा रीतानें मेहेनत केल्यामुळें त्या लोकांचें शरीरसामर्थ्य फार उच्च

दर्जाचें होत असे. त्याकाळीं पुरुषांप्रमाणें स्त्रिया देखील पटा फिरविण्याच्या कामीं तरबेज असत. झांशीच्या श्री. सौ. लक्ष्मीबाई ह्यांची उत्तम पटा फिरविणार म्हणून ख्याति होती असें म्हणतात. त्याप्रमाणें रा. वासुदेव बळवंत फडके यांच्या पत्नीनें पट्ट्याचे साहाय्यानें आपलें पातिव्रत्य रक्षण केलें होतें असें म्हणतात. अशा प्रकारचीं पुष्कळ उदाहरणें देतां येतील. यावरून ही एक जुनी कला आहे हें सिद्ध होतें. त्याचा उपयोग आतां एक उत्तम व्यायाम अशा दृष्टीनें करावयाचा आहे. शिवाय अजून देखील प्रसंग विशेषीं गुंडांपासून आत्मरक्षण करण्यास याचा चांगला उपयोग होण्यासारखा आहे.

पट्ट्याचा व्यायाम नियमित रीतीनें केल्यास त्यापासून शरिरास स्फूर्ति येऊन मेंदु तरतरीत होतो. शरीर सुटसुटीत व निरोगी राहून, शरिरांत एक प्रकारचा जोम येतो. ज्यास स्वतःचें बलसंवर्धन करून आरोग्य रक्षण करावयाचें असेल त्यानें देखील हा व्यायाम जरूर करावा.

या विश्ववंद्य व पवित्र भरतभूमींत जन्म घेणाऱ्या बालकांनों, या देशाच्या आधारभूत तरुणांनों,तुमच्या मायदेशाच्या भाविष्य कालाची जबाबदारी तुमच्यावर आहे. यासाठीं तुम्ही स्वतःस व आपल्या मित्रदेशबांधवांस पट्ट्यासारख्या मर्दानी खेळाची गोडी इतकी लावा कीं जेणेंकरून त्यांचें आत्मबल वाढून त्यांचे अंगांत स्फूर्ति, चपलता व काटकपणा येऊन आत्मसंरक्षण करण्याचें त्यांचें सामर्थ्य वृद्धिंगत होईल.

पट्ट्याचे विभाग.

पट्टी या शब्दापासून पट्टा हा शब्द झाला असून प्रचलित व्यवहारांत 'पटा' या शब्दानें रूढ झाला आहे. पट्ट्याचे एकधारी पटा व दुधारी पटा असे दोन प्रकार आहेत. एकधारी पट्ट्याचें खोबड्याजवळील पातें दीड फूट लांब असून त्याच्या एका अंगास धार असते व पुढील पातें दुधारीं असतें. म्हणून एकधारी पट्ट्याचा देखील दुधारी पट्ट्याप्रमाणें उपयोग करतां येतो. दुधारी पट्ट्यास दोन्ही बाजूंनीं धार असल्यामुळें भाऊगर्दींत त्याचा उपयोग चांगला होतो. पटा हा पांच तुकडे जोडून केलेला असतो. खोबडा, चिमटा, पातें, मूठ व कडी असे पट्ट्याचे पांच भाग आहेत.

पटा तयार करण्याची रीति.

एक फूट रुंद, दोन फूट लांब व एक दोरा जाड असा पोलादी, लोखंडी, पितळी अगर तांब्याचा एक पत्रा घ्यावा. नंतर हाताच्या आकाराचा घाट करण्यासाठीं दाब तयार करून त्यांत तो पत्रा घालून दाबावा, म्हणजे खोबडा तयार होतो. नंतर त्या पत्र्यास मूठ घालण्याच्या जागीं दोन व कडी घालण्याच्या जागीं दोन अशीं भोंकें पाडावीं. पटा हातांत धरतां यावा म्हणून मुठीच्या जागीं (खोबड्याच्या पुढच्या बाजूची मुठीची एक अगर दीड इंच जागा सोडून) दोन्ही अंगांस करांगुलीच्या टोकाइतकीं जाड भोंकें पाडून त्यांत तितक्याच जाडीचा (सुमारें अर्धा इंच जाडीचा) लोखंडी गजाचा तुकडा बसवावा व पत्र्याचे बाहेरचे अंगास बाहेरचे दोन्ही बाजूस पितळेच्या चकत्या बसवून तो गजाचा तुकडा न हालेल असा पक्का करावा. हा गजाचा तुकडा बसविण्याचे आधीं त्यांत गजाचे जाडीपेक्षां जास्त व्यासाचा पोकळ

लोखंडी नळीचा तुकडा घालावा. गज पक्का बसला तरी ही नळी त्या गजाचे भोंवतीं फिरेल अशा रीतीनें बसवावी. नंतर खोबड्याचे टोंकापाशीं, खोबड्याचे बाहेर हात निघूं नये म्हणून, धनुष्याचे आकाराची एक कडी बसवावी. नंतर १२ इंच लांबीच्या व एक इंच रुंदीच्या दोन लोखंडी पट्ट्या घेऊन त्याचा चिमटा तयार करावा व चिमट्याच्या पट्ट्यांची एका बाजूचीं टोंकें वांकवून तो चिमटा खोबड्याचे पुढील गोल बाजूस रिवेट करून जोडावा. नंतर चिमट्यास दोन दोन इंचांवर जरुरीप्रमाणें भोंकें पाडून व त्याच मापानें पट्याचे पात्यांसहि भोंकें पाडून आंत स्क्रू अगर खिळे मारून पक्कें बसवावे. पट्याची पात अशा प्रकारची लवचीक व जाड असावी कीं, पटा हातांत घालून हलविला असतां पातीचा अर्ध्या भागा पुढील भाग वांकून वरखालीं हलूं शकेल व वळविला असतां वळूं शकेल.

खोबड्याचा उपयोग.

तरवारीची मूठ लहान असते व त्यामुळें हातास घाम आला असतां तरवार हातांतून निसटून जाण्याचा संभव असतो. पट्याची मूठ–खोबडा–हाताच्या आकाराची असून हाताचे कोपरापर्यंत लांब असते व तिचे आंत हात घालावयाचा असतो. त्यामुळें हातांतून पटा फिरवितांना निघत नाहीं. तिची रचना अशा प्रकारची असते कीं एकाएकीं तिच्यांतून हात काढतां येत नाहीं. शिवाय खोबडा कोपरापर्यंत लांब असल्यामुळें व हाताचे आकाराप्रमाणें गोल केलेला असल्यामुळें हातावर शत्रूचे पट्याचा अगर तरवारीचा वार बसला तरी हाताचा उत्तम रीतीनें बचाव होतो.

पट्याचा हात मारण्याची रीति.

फरीगदक्याप्रमाणेंच पट्याच्या खेळांतहि डोकें, कानशील (उजवें व डावें), खांदे, बरगड्या, कंबर, मांड्या, पायांच्या पोटऱ्या व घोटा अशा वार मारण्याच्या जागा असतात. पट्यास दोन्ही बाजूंनीं धार असली तरी एका बाजूनेंच जोराचा वार मारतां येतो. पटा हातांत घेतला म्हणजे करंगळीचे बाजूस जी धार असते त्या बाजूनेंच वार चांगला बसतो, म्हणून वरील निरनिराळे वार मारतांना करंगळीची बाजू पुढें येईल अशा रीतीनें वार मारावा. वरून खालीं वार मारावयाचा असेल तर त्या वेळेस करंगळीची बाजू खालीं ठेवून वार मारावा व खालून वर वार मारावयाचा असेल त्यावेळीं करंगळीची बाजू वर ठेवून वार मारावा. उजवीकडून डावीकडे वार मारावयाचा असेल तर हात उताणा करून करंगळीची बाजू डावीकडे करावी. पुष्कळजण वरील धोरण ध्यानांत ठेविल्याशिवाय पट्याचे हात करितात, पण तसें करणें बरोबर नाहीं. बरोबर धार ठेवून वार मारला तर पट्याचा फरफर आवाज येत नाहीं. चुकीनें पटा आडवा धरला तर पट्याचा आवाज फरफर असा होतो व त्यामुळें पटा फार स्फूर्तीनें फिरतो असें पाहाणारास वाटतें, पण तसा पटा धरून वार मारल्यानें काट होणार नाहीं. पट्याचा हात मारतांना हात तोकडा (आखूड) न ठेवतां शक्य तितका लांब करून सफाईनें तिरपा वार मारावा.

काटी.

पट्याच्या सर्व राहांत काटींचें काम फार महत्वाचें आहे. तें जर साधलें नाहीं तर नुसता पटा फिरविण्यांत कांहींच अर्थ नाहीं. काटींचा मुख्य हेतु वार नेमक्या जागीं मारून शत्रूस जाया करतां यावें असा असतो. यासाठीं पटा लवचिक पातीचा, अणकुचीदार, अस्सल पोलादाचा व चांगल्या धारीचा असणें जरूर असतें. नाहींतर काट चांगली न होतां काट करण्याची वस्तु पुढें उडून जाते.

काट करतांना पुढें ठेविलेली वस्तु आपल्यापासून किती लांब आहे, ती पट्याचे आटोक्यांत आहे किंवा नाहीं हें काट करणारानें पाहिलें पाहिजे व ती जर पट्याचे टप्प्याचे बाहेर किंवा जास्त जवळ असली तर, जरुरीप्रमाणें पुढें मागें पवित्रा काढून नंतर काट करावी. नीट सफाईनें हात गेला तरच चांगली काट होते व लिंबाचे दोन तुकडे होतात. एकाबाजूनें नीट काट करतां येऊं लागली म्हणजे दुसऱ्या बाजूनें काट करण्याचा सराव करावा.

नवीन शिकणारासाठीं निरनिराळ्या काटींची माहिती स्वतंत्र दिली आहे, पण काटी नीट करतां येऊं लागल्या म्हणजे त्या निरनिराळ्या राहांच्या हातांत मिसळून करण्याची संवय करावी.

पट्याचा वार बरोबर लागतो किंवा नाहीं हें पाहाण्यासाठीं केळीचा खांब अगर उंसांचा भारा टांगता ठेवून तो कापून पाहावा. नीट तिरपा हात गेला तरच टांगलेली वस्तु कापली जाईल. वार बरोबर तिरपा न लागला तर वस्तु कापण्याचे ऐवजीं पट्याची पात वांकडी होईल. चांगले पटा करणारे पन्नास उंसांचा भारा एका वारानें सफा कापून टाकीत असत असें सांगतात. वार नीट बसूं लागला म्हणजे हातास झटका बसल्याशिवाय समोरची वस्तु कापली जाते, नाहींतर हातास झटका बसून मनगट व हात दुखावतो. त्याचप्रमाणें पट्याचा हात नेमका जाऊं लागला किंवा नाहीं तें पहाण्यासाठीं लिंबू, बटाटा अगर लवंग वगैरे लहान पदार्थ ठेवून तो कापण्याचा सराव करावा. चांगला सराव झाला म्हणजे डोळे बांधून देखील अशा लहान वस्तु कापतां येतात.

पट्याच्या तऱ्हा.

एका हातानें पटा चांगला फिरवितां येऊं लागला म्हणजे दोन्ही हातांत पटे घालून ते फिरविण्यास शिकावें. नंतर एका हातांत पटा व दुसऱ्या हातांत बनेटी धरून फिरविण्याची संवय करावी. तसेंच एका हातांत पटा व दुसऱ्या हातांत लकडी धरून फिरविण्यास शिकावें. याप्रमाणें एक हाती पटा, दुहाती पटा, पटा बनेटी व पटा लकडी असे याचे चार प्रकार आहेत.

शिक्षणपद्धति.

पट्याचा विषय चक्रें, पलट्या, काटी, काढण्या, वगैरेंनीं युक्त असल्यानें शिकणारास कठीण जातो. म्हणून प्रत्येक 'राहा' शिकवितेवेळीं शिकविणारानें प्रत्येक राहाचे तुकडे पाडून शिकवावें. एका राहांतील एकेक भाग संपेल तेथें तुकडा करून शिकवावें म्हणजे शिकणारास सोपें जाईल.

त्याचप्रमाणें प्रत्येक निरनिराळ्या क्रियेस 'एक, दोन, तीन,' असे अंक जरूर वाटल्यास देऊन शिकवावें. एकदां तुकड्या तुकड्यानें पटा करतां येऊं लागला म्हणजे मग सलग राहा करून घ्यावी. नंतर चांगला सराव झाला म्हणजे उडून राहा करण्यास शिकवावें.

पट्याचे परिभाषिक शब्द.

राहा :—पट्याची फेक, घाई किंवा हात, हूल, काट, वार, पलटी वगैरे कांहीं ठरीव क्रिया मिळून एक राहा होते.

पलटी :—तोंड मागें फिरवून व काहीं काटी करून मागें फिरण्याची रीति.

काट :—वार मारण्याची क्रिया.

काढणी :—वार मारतांना अगर वार मारून पटा पायाचे मधून अथवा उडून पायाचे खालून काढून घेण्याची रीति.


मोहोरा फिरविणें :—तोंड फिरविणें.

डूब मारणें :—वार मारून अथवा हूल मारून बगलेखालून निघून जाणें किंवा हात टेकून पुढें अगर मागें उडी मारणें.

काट छाट :—वार मारून कापणें.


पटा घेण्याची पद्धति.

व्यायामशाळेंत पटा खुंटीस टांगून ठेविलेला असतो, तेथून तो उचलून बाहेर मैदानावर न्यावयाचा असतो. त्यावेळीं पटा हातांत घेण्याचे आधीं त्यास वंदन करावें अशी जुनी चाल आहे. नंतर उजव्या हातानें पट्याचा खोबडा अगर चिमटा धरून पटा खुंटीवरून खालीं घ्यावा व पट्याचें टोंक वर करून तो डावे हातांत धरून पालथा करावा. नंतर खोबड्यांत उजवा हात घालून पटा मजबूत धरावा. पटा आपले हातास नीट बसतो किंवा नाहीं हें पहाण्यासाठीं हलवून पाहावा. पटा ढिला असल्यास पुढील बाजू हातास घासते. पटा ढिला असेल तर हातास रुमाल बांधून धरून पाहावा म्हणजे बरोबर बसेल. पटा नीट बसत नसेल तर दुसरा घ्यावा. पटा नीट बसला म्हणजे बाहेर नेऊन मैदानावर ठेवावा. नवीन शिकणारानें खालीं दाखविल्याप्रमाणें एका सरळ रेषेंत तीन वर्तुळें काढावीं.



नंबर १ व २ चे वर्तुळांत ३० फूट अंतर ठेवावें व २ नंबरचे वर्तुळापासून १२ फूटांवर एक ३ नंबरचें वर्तुळ काढावें. यांपैकीं २ नंबरचे वर्तुळावर पटा ठेवावा व मागें पवित्रे टाकीत १ नंबरचे वर्तुळावर जाऊन डावा पवित्रा (पाय) पुढें ठेऊन उभें रहावें. डावा पाय उंच करून व दोन्ही हात वर नेऊन पुढें पवित्रे टाकीत नंबर ३ चे वर्तुळाकडे जावें. उजवा पाय गुडघ्यांतून ताठ धरावा व डावा पाय, बोटें, जमिनीकडे रहातील अशा बेतानें पंजा मुरडून उंच ठेवावा. नंतर पुढें जातांना एक एक पाय वर उचलून पुढें पवित्रे टाकीत जावें. पट्याजवळ गेल्यावर उजवा पाय पुढें नसेल तर पाय बदलून उजवा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर इष्ट देवतेचें व गुरूचें स्मरण करून दोन्ही हातांनीं पट्यास नमस्कार करावा. नंतर पुन्हां पवित्रा बदलून डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें.

पलटी.




चित्र संख्या ६७२–६७९

पलटी.

पलटी-चित्र नं. १ प्रमाणें उजवे हातांत पटा धरून व डावा पाय पुढें टेकून तयारीचे स्थितींत उभें रहावें. नंतर पट्याचा हात डोक्यावरून मागें नेऊन, पटा डावीकडून उजवीकडे फिरवून आणून वार मारण्यासाठीं तयारीचे स्थितींत चित्र नं. २ प्रमाणें धरावा. नंतर त्याच चित्राप्रमाणें मागील उजवा पाय पुढें ठेवावा. नंतर सामनेवाल्याच्या डावे खांद्यावर चित्र नं. २ प्रमाणें जानव्याचा तिरपा वार मारावा म्हणजे पटा चित्र नं. ३ प्रमाणें डावे बाजूस येतो. नंतर पट्याचा हात चित्र नं. ४ प्रमाणें डोक्यावर नेऊन समोरच्या गड्याचे उजवे खांद्यावरून जानव्याचा तिरपा हात मारावा म्हणजे पटा चित्र नं. ५ प्रमाणें उजवे बाजूस येतो. नंतर डावा पाय उचलून उजवे पायाचे पुढें चित्र नं. ६ प्रमाणें टाकावा व शरीर मागें फिरवावें म्हणजे त्या चित्राप्रमाणें शरिराची स्थिति होते. नंतर चित्र नं. ७ प्रमाणें उजवा पाय उचलून डावे पायावर उभें रहावें व पट्याचा हात त्या चित्राप्रमाणें डोक्याचे मागें न्यावा. नंतर उजवे बाजूस अर्ध वर्तुळ फिरावें व मागचे बाजूस (मूळ दिशेस) तोंड करून चित्र नं. ८ प्रमाणें उजवा पाय पुढें ठेवून व त्या चित्राप्रमाणें पटा धरून उभें रहावें. नंतर मागील डावा पाय उजवे पायाचे पुढें ठेवून चित्र नं. १ प्रमाणें तयारीचे स्थितींत उभें रहावें.

नवीन शिकणाराचे लक्षांत सर्व क्रिया याव्या म्हणून तुकड्यानें क्रियांचें वर्णन केलें आहे. पण वरील क्रिया ध्यानांत आल्यानंतर सर्व क्रिया एकामागून एक, मध्यें न थांबतां करावयाच्या असतात. या सबंध क्रियेस **पलटी** म्हणतात. पुढील निरनिराळ्या राहा, सलाम्या वगैरेंच्या क्रिया केल्यावर ही पलटीची क्रिया करून सुरुवातीचे स्थितींत यावयाचें असतें, म्हणून पलटीची माहिती प्रथम दिली आहे. पलटीची क्रिया नीट करतां आली म्हणजे सर्व क्रिया उड्डाण घेऊन करण्याची संवय करावी म्हणजे काम सफाईदार दिसतें व मेहनत चांगली होतें.

पहिल्या राहाची सलामी.




चित्र संख्या ६८०-६८३

पहिल्या राहाची सलामी.

पहिल्या राहाची सलामी-चित्र नं. १ प्रमाणें तयारीचे स्थितींत उभें रहावें. नंतर कोंपरापासून उजवा हात वरखालीं करून पटा हलवावा. याप्रमाणें पटा हलवीत हलवीत सरक पवित्र्यानें दोन चार पवित्रे पुढें जावें व पट्याचा हात पुढें करून सामनेवाल्यास हूल मारावी व त्याच अवसानांत हात मागें छातीजवळ घेऊन चित्र नं. २ प्रमाणें मागें फिरून उभें रहावें. नंतर पाय न बदलतां उजवे बाजूस चित्र नं. २ मध्यें डावा पाय मागें असतो तो उचलून उजवे पायास जुळवून ठेवावा. नंतर उजवा पाय चित्र नं. ३ प्रमाणें वर उचलून पट्याचा हात डोक्यावरून मागें न्यावा. त्याच अवसानांत उजवा पाय उचलेला ठेवून, डावे बाजूनें मागचे बाजूस फिरून चित्र नं. ४ प्रमाणें उजवा पाय पुढें ठेवून त्या बाजूचे सामनेवाल्याचे डावे खांद्यावर जानव्याचा हात मारण्यासाठीं पट्याचा हात तयार ठेवावा. नंतर जानव्याचा हात मारून पलटीची क्रिया उड्डाण मारून करावी व चित्र नं. १ प्रमाणें सुरवातीचे स्थितींत येऊन उभें रहावें.

पुढील पाय एक वीत पुढें सरकवून मागील पाय एक वीत पुढें सरकवावा. नंतर पुनः पुढील पाय एक वीत पुढें सरकवून मागील पाय तितकाच पुढें सरकवावा. या प्रमाणें दोन्ही पाय थोडे थोडे पुढें सरकवीत त्याच पवित्र्यावर पुढें जातात त्यास **सरकपवित्रा** म्हणतात.

पहिली राहा (तीन चक्रांची).



चित्र संख्या ६८४–६८६

पहिली राहा (तीन चक्रांची)–चित्र नं. १ प्रमाणें तयारीचे स्थितींत उभें रहावें. नंतर मागील उजवा पाय उचलून व पट्ट्याचा हात डोक्यावर नेऊन चित्र नं. २ प्रमाणें उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. ३ प्रमाणें गर्दनकाटचा वार मारावा व त्याच अवसानांत पुढील उजवा पाय वर उचलून हात चित्र नं. २ प्रमाणें डोक्यावर घ्यावा व डावे पायावर उभें राहून डावे बाजूनें संपूर्ण चक्कर फिरावें व पुनः चित्र नं. २ प्रमाणें तोंड आलें म्हणजे पुनः चित्र नं. ३ प्रमाणें गर्दनकाटचा वार मारावा व पुनः उजवा पाय उचलून वरप्रमाणें

डावे बाजूनें संपूर्ण चक्कर फिरून पुन: मूळचे बाजूस तोंड आलें म्हणजे गर्दनकाट करावी. याप्रमाणें तीन चक्करें घ्यावीं व तिसरें चक्कर पूर्ण झाल्यावर गर्दनकाटचा वार मारून पलटीची क्रिया करावी व चित्र नं. १ प्रमाणें तयारीचे स्थितींत उभें रहावें.


पहिल्या राहाचा वेल.

पहिल्या राहाचा वेल–चित्र नं. १ प्रमाणें तयारीचें स्थितींत उभें रहावें. नंतर चित्र नं. २ व ३ प्रमाणें क्रिया करून गर्दनकाटचा वार मारावा. नंतर पट्याचा हात डावे बाजूस गेला कीं त्याच अवसानांत मागील डावा पाय उचलून व डावीकडून फिरून, डावा पाय उजवे पायाचे मागून नेऊन उजवे पायाचे पुढें ठेवावा. नंतर पुन: मागें राहिलेला उजवा पाय उचलून डावीकडून फिरावें व उजवा पाय डावे पायाचे पुढें ठेवावा. याप्रमाणें दोनदां पाय पुढें टाकले म्हणजे आपले भोंवतीं संपूर्ण चक्कर होतें व पुन: चित्र नं. २ प्रमाणें तोंड येतें. याप्रमाणें दोनदां पाय पुढें सरळ रेषेवर ठेवून जातांना पट्याचा हात डोक्यावरून फिरवून चित्र नं. २ प्रमाणें गर्दनकाट मारण्यासाठीं आणावा लागतो. नंतर पुन: उजवा पाय चित्र नं. २ प्रमाणें उचलून चित्र नं. ३ प्रमाणें गर्दनकाटचा वार मारावा. नंतर वरप्रमाणें पुन: प्रथम डावा पाय उजवे पायाचे पुढें ठेवून वर सांगितल्याप्रमाणें आणखी पुढें जावें. याप्रमाणें जागेच्या सवडीप्रमाणें ३–४ वेळां चक्करें घेऊन पुढें जावें म्हणजे **पुढचा चक्करांचा वेल** होतो.

नंतर उलट दिशेस मागें पाय टाकून **मागचा चक्करांचा वेल** करून मूळचे जागीं यावें. यावेळीं प्रथम उजवा पाय पुढें असतो तो उचलून चित्र नं. २–३ प्रमाणें गर्दन काटचा वार मारावा व त्याच अवसानांत पटा डावे बाजूस आला म्हणजे पुढील उजवा पाय उचलून डावे पायाचे पुढून डावे बाजूस फिरून उजवे पायाचे मागें ठेवावा. नंतर डावा पाय उचलून डावे बाजूस फिरून, उजवे पायाचे पुढून उजवे पायाचे मागें ठेवावा म्हणजे आपल्या भोंवतीं एक चक्कर पुरें होऊन, सुरवातीच्या दिशेस तोंड येतें व उजवा पाय पुढें व डावा पाय मागें रहातो. याप्रमाणें चक्कर घेतांना पट्याचा हात चित्र नं. २ प्रमाणें डोक्यावर ठेवावयाचा असतो. नंतर उजवा पाय उचलून पुन: चित्र नं. २–३ प्रमाणें वार मारून व वरप्रमाणें प्रथम उजवा पाय मागें व नंतर डावा पाय उजवे पायाचे मागें टाकून मागें जावें. याप्रमाणें **मागील चक्करांचा वेल** करून मूळचे जागीं जावें. याप्रमाणें चारी बाजूचे वेल करावे.

नवीन शिकणारानें जमिनीवर सरळ रेघ ओढून त्यावर पुढें व मागें जावें. शेवटीं डावा पाय पुढें ठेऊन चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें.

दुसऱ्या राहाची डूबेची सलामी.



चित्र संख्या ६८७–६९४

दुसऱ्या राहाची डूबेची सलामी.

दुसऱ्या राहाची डूबेची सलामी:—चित्र नं १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर डावा पाय उचलून पुढें टाकून चित्र न. २ प्रमाणें सामनेवाल्याच्या पुढें असलेल्या पायाचे गुडघ्यावर खोंच मारावी. नंतर उजवा पाय डावे पायाचे मागें चित्र नं. ३ प्रमाणें ठेवून डोकें पट्याचे हाताखालीं न्यावें. नंतर उजवे बाजूस फिरून चित्र नं. ४ प्रमाणें मागें तोंड करून उभें रहावें. नंतर हात फिरवून समोरच्या गड्याचे डावे कानशिलावर वार मारला म्हणजे चित्र नं. ५ प्रमाणें हात येतो. तेथून खालून वर उजव्या मांडीवरचा हात चित्र नं. ६ प्रमाणें मारून डावा पाय पुढें टाकावा व त्याच अवसानांत उजवीकडून डावीकडे डोक्यावरून हात फिरवून समोरच्या गड्याचे उजवे खांद्यावर जानव्याचा वार मारावा व नंतर पलटी घेऊन मूळ दिशेस तोंड करून उभें रहावें.


दुसरी राहा.

दुसरी राहा—चित्र नं. १ प्रमाणें राहून मागील उजवा पाय उचलून चित्र नं. २ प्रमाणें पुढें हूल मारावी. नंतर मागील उचललेला उजवा पाय पुढें टाकण्याचे अवसानांत पट्याचा हात डोक्यावरून डावीकडून उजवीकडे फिरवून गर्दन काट करावी म्हणजे चित्र नं. ८ प्रमाणें पट्याचा हात येतो. नंतर मागील डावा पाय पुढें टाकून उजवे बाजूचे कोठ्याचा (कमर व बरगड्याचे मध्यें) वार मारावा व हात पुढें असतांनाच चित्र नं. २–३–४–५–६ प्रमाणें डूब करावी. नंतर कानशिलावर वार मारून पलटी करावी व मूळ दिशेस तोंड करून उभें रहावें.

दुसऱ्या राहाचा वेल.

दुसऱ्या राहाचा वेल—दुसऱ्या राहाची माहिती सांगितली आहे त्याप्रमाणें उजवा पाय वर उचलून चित्र नं. ७ प्रमाणें हूल मारावी. नंतर उजवा पाय पुढें टाकून गर्दनकाटचा वार मारून हात चित्र नं. ८ प्रमाण आणावा. नंतर तेथून पट्यानें कोठ्याचा वार मारावा. पण यावेळीं वार मारल्याबरोबर पुढें टाकलेला डावा पाय उचलून उजवे बाजूस तोंड होईल अशा रीतीनें पुढें ठेवावा व नंतर तेथून चित्र नं. ३, ४, ५, प्रमाणें डूब घ्यावी. नंतर तेथून डावीकडून उजवीकडे पट्याचा हात नेऊन कोठ्याचा वार मारावा. यावेळीं डोक्याचे मागून हात जाऊं देऊन पुन: चित्र नं. ७ प्रमाणें हूल मारावी व वर सांगितल्याप्रमाणें क्रिया करावी. प्रथम तोंड पूर्वेकडे, नंतर दक्षिणेकडे, नंतर पश्चिमेकडे व नंतर उत्तरेकडे करून हा वेल करावा.

तिसऱ्या राहाची सलामी (उलट डूब).



चित्र संख्या ६९५-७०१

तिसऱ्या राहाची सलामी (उलट डूब).

तिसऱ्या राहाची सलामी (उलट डूब)—चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर सरक पवित्र्यानें एक दोन पवित्रे पुढें जाऊन डोक्याचे वरून डावे बाजूनें पट्याचा हात फिरवून व मागील उजवा पाय पुढें टाकून समोरच्या गड्याचे डावे खांद्यावर वार मारावा व हात डावीकडे गेला म्हणजे तो उलट नेऊन समोरच्या गड्याचे छातीवर वार मारावा. त्याच अवसानांत उजवा पाय मागें घ्यावा व हात खालून मागें वळवून वर घ्यावा; नंतर उजवा पाय पुढें ठेवून चित्र नं. २ प्रमाणें हूल मारावी. नंतर डावा पाय उचलून उजव्या पायाचे मागून पलीकडे ठेवून, शरीर डावीकडून उजवीकडे फिरवावें व हाताखालून डोकें काढून चित्र नं. ३ प्रमाणें डूब घेऊन फिरावें व चित्र न. ४ प्रमाणें उजवा पाय पुढें ठेवून समोरच्या गड्याचे उजवे बरगडीवर वार मारावा. तो हात चित्र नं. ५ प्रमाणें मागें गेला म्हणजे उडून चक्कर फिरून व डोक्यावरून हात फिरवूत पलटी घ्यावी व सुरवातीचे स्थितींत येऊन उभें रहावें.

तिसरी राहा (उलट डूबेची).

तिसरी राहा (उलट डूबेची)—चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर सरकचे पवित्र्यानें दोन तीन पवित्रे पुढें टाकून जावें. याप्रमाणें पुढें जात असतांना हात वरखालीं करून पटा हलवावा. नंतर पट्याचा हात चित्र नं. ६ प्रमाणें वर न्यावा व उजवा पाय पुढें ठेवून उजव्या बाजूनें हात मागें टाकून खालून वर समोरच्या गड्याचे डावे गुडघ्यावर वार मारावा व चित्र नं. ७ प्रमाणें हात डावे बाजूस वर नेऊन समोरच्या गड्यावर शीरचा वार मारावा व चित्र नं. ३, ४, ५ प्रमाणें उलट डूब घ्यावी. नंतर पलटी घेऊन प्रथमचे स्थितींत येऊन उभें रहावें (चित्र नं. १).

तिसऱ्या राहाचा वेल (उलट डूबेचा)


तिसऱ्या राहाचा वेल (उलट डूबेचा)—चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. २ प्रमाणें हूल मारावी. नंतर चित्र नं. ३ ते ५ प्रमाणें उलट डूब घेऊन चित्र नं. ५ प्रमाणें हात आला म्हणजे चित्र नं. ६ प्रमाणें हात वर न्यावा व पट्याचा हात मागून पाऊण वर्तुळ फिरवून समोरच्या गड्याचे गुडघ्यावर खालून वर हात मारावा व चित्र नं. ७ प्रमाणें हात वर आला म्हणजे गर्दन काटचा वार मारून **मागील चक्रांचा वेल** करावा. याप्रमाणें २–४ वेळ मागचा वेल करीत मागें जावें व नंतर **पुढील चक्रांचा वेल** करीत पुढें यावें व शेवटीं पलटी घेऊन चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें.

काट १ ली



चित्र सं. ७०२

काट २ री



चित्र सं. ७०३

काट ३ री



चित्र सं. ७०४

काट पहिली

काट पहिली–आपले समोर दोन पवित्र्याचे अंतरावर एक लिंबू ठेवावें. आपण डावे पवित्र्यावर उभें रहावें. नंतर मागचा उजवा पाय पुढें टाकावा व त्याच अवसानांत समोर कानाशिलाचा वार मारून पट्ट्याचा हात डाव्या खांद्याकडे न्यावा. नंतर पट्ट्याचा हात पालथा करून पुढें ठेवलेल्या लिंबाचे मध्यावर पट्ट्याचे धारेकडून चित्र नं. ७०२ प्रमाणें सफा वार करावा व त्याच गतींत उड्डाण मारून पलटी घ्यावी आणि मूळ बाजूस तोंड करून उभें रहावें.

काट दुसरी.

काट दुसरी–डावे पवित्र्यावर उभें राहून समोर हूल मारावी. नंतर उजवा पाय उचलून डावे पायावर उभें रहावें व उजवीकडून डावीकडे संपूर्ण चक्कर फिरावें. नंतर उजवा पाय डावे पायाचे मागें ठेवून चित्र नं. ७०३ प्रमाणें बसावें व त्याच अवसानांत पट्ट्याचा हात पालथा ठेवून लिंबाची काट करावी. तसेंच वरप्रमाणें संपूर्ण चक्कर घेऊन उभ्यानें पण लिंबाची काट करण्याची संवय करावी.

काट तिसरी

काट तिसरी–डावे पवित्र्यावर उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकावा व लंगोटचा वार खालून वर मारावा. नंतर जानव्याचा वार मारून हात मागें नेला म्हणजे तो मागून डोक्यावर नेऊन चित्र नं. ७०४ प्रमाणें एकदम गुडघा जमिनीवर टेकून, डावा पाय समोर ठेविलेल्या लिंबावर ठेवावा. नंतर लिंबाचे मध्य भागावर वार मारून टाचेखालीं असलेल्या लिंबाची काट करावी. ही काट करतांना पटा आपलेकडे ओढून काट करावी व नंतर डावा हात पट्ट्यावरून पलीकडे ठेवून पाय उडवून गुलाट घेऊन पलीकडे जावें. ही काट फार अवघड आहे म्हणून प्रथम सावकाश करावी, नाहींतर पाय कापण्याची भीति असते.




काट ४ थी चित्र संख्या ७०५



काट ५ वी चित्र संख्या ७०६



काट ६ वी चित्र संख्या ७०७



काट ७ वी चित्र संख्या ७०८

काट चवथी.

काट चवथी–नेहमींप्रमाणें उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून उजवीकडून डावीकडे पटा नेऊन गर्दनकाट करावी व लागलींच उलट बाजूनें डावीकडून उजवीकडे वार मारून गर्दनकाट करावी. नंतर पुढील उजवा पाय मागें घेऊन डावे पायाचे रेषेंत चित्र नं. ७०५ प्रमाणें ठेवावा. नंतर दोन पायांचेमध्यें लिंबू असतें तें कापण्यासाठीं पुढून पटा दोन्ही पायांचे खालून मागें नेतांना काट करावी. पटा पायांस लागूं नयें म्हणून दोन्ही पायांनीं वर उडी मारून पाय अंतराळीं आहेत तोपर्यंत पटा पायांखालून नेऊन काट करावी. हीं काट फार अवघड आहे म्हणून सुरवातीस हातांत पट्याचेऐवजीं काठी घेऊन काट करण्याचा सराव करावा व काठी पायांस लागल्याशिवाय काट बरोबर होऊं लागली म्हणजे मग आखूड पट्यानें ही काट करावी. ही काट नीट आली म्हणजे सुलट कोलांटउडी मारून ही काट करावी.

काट पांचवी.

काट पांचवी–डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें घेऊन व पट्याचा हात डावीकडे नेऊन समनेवाल्याचे उजवे बाजूचे कमरेवर वार मारावा. नंतर पटा उजवे बाजूस आला म्हणजे चित्र नं. ७०६ प्रमाणें हात पालथा करून व उजवा पाय उचलून दोन पायांचेमध्यें असलेल्या लिंबावर काट करावी. नंतर उजवा पाय जमिनीवर टेकून डावा पाय उचलून त्याखालून पटा काढून घ्यावा. नंतर उलट डूब घेऊन चक्कर फिरून समोर यावें. ही काट करणें अवघड आहे म्हणून प्रथम काठीनें काट करण्याचा सराव करावा व पाय उचलून वार नीट जाऊं लागला म्हणजे मग लहान पट्यानें काट करावी.

काट सहावी.

काट सहावी–डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर पट्याचा हात वर घेऊन मोंड्याचा वार मारतो त्याप्रमाणें वरून खालीं वार मारावा व चित्र नं. ७०७ प्रमाणें डावा पाय वर उचलून, पायाखालीं असलेल्या लिंबावर काट करावी. नंतर पट्याचा हात तसाच मागें ओढून घ्यावा. काट केल्याबरोबर डावा पाय खालीं टेकून व उजवा पाय उचलून डावे पायाचे पलीकडे मागें ठेवून पूर्ण वर्तुळ फिरून मूळ बाजूस तोंड झालें म्हणजे खोपरीचा वार करावा व त्याच अवसानांत मूळ स्थितींत येऊन उभें रहावें.

काट सातवी.

काट सातवी–नेहमींप्रमाणें डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून कमरेचा वार मारावा व पट्याचा हात उजवे बाजूस आला म्हणजे डोक्याचे मागें न्यावा. नंतर पुढें ठेवलेला उजवा पाय परत मागें घेऊन डावे पायाचे रेषेंत ठेवावा. नंतर चित्र नं. ७०८ प्रमाणें मागें वांकून मागील जमिनीवर ठेवलेलें लिंबू दिसलें म्हणजे डावीकडून उजवीकडे वार करून काट करावी व सरळ उभें रहावें. याप्रमाणें काट नीट होऊं लागली म्हणजे उलट कोलांटउडी मारून काट करावी.



काट ८ वी चित्र संख्या ७०९


काट आठवी—दोन्ही पाय एका रेषेंत ठेवून उभें रहावें. नंतर पस्त्याचा हात डावे बाजूनें डोक्याचे मागून फिरवून आणून कमरेंतून वांकावें व पस्त्याचा हात मारून डावे पायाचे पलीकडे लिंबू ठेविलेलें असतें त्याची चित्र नं. ७०९ प्रमाणें काट करावी. नंतर डावा हात पुढें जमिनीवर टेकून गुलांट घेऊन चित्र नं. ७१० प्रमाणें पलीकडे उठून बसावें.

ही काट देखील अवघड आहे म्हणून सुरवातीस काठीनें करावी.



काट ८ वी चित्र संख्या ७१०

काट ९ वी




चित्र सं. ७११

काट नववी–डोळयास रुमाल बांधून चित्र नं. ७११ प्रमाणें बसावें व पट्याचा हात डावे बाजूनें मागें न्यावा. नंतर पालटचा वार मारून चित्र नं. ७१२ प्रमाणें काट करावी. ही काट करण्याचे आधीं डोळे उघडे असतात त्यावेळीं लिंबू कोठें ठेविलें आहे तें पाहून नंतर डोळे बांधून घ्यावे. नंतर अंदाजानें लिंबाची काट करावयाची असते. ही काट करण्यांत विशेष प्रकारचें कौशल्य आहे.


सूचना—याशिवाय दुसरे माणसाचे तोंडांत लवंग देऊन तिची काट करणें, रुमालाचे खालीं विड्याचीं ५० पानें ठेवून अथवा रुमालांत केळें ठेवून रुमाल न कापतां पानें अगर केळें कापणें वगैरे अनेक प्रकारच्या कौशल्यपूर्ण काटी आहेत. या करण्याची कला जाणत्या शिक्षकापाशीं शिकली पाहिजे. वर सांगितलेल्या निरनिराळ्या काटी, पट्याच्या सलामी, राहा व वेल करतांना करण्याचा सराव करावा. तसेंच समोर उभें असलेल्या माणसानें पटा करणाराचे अंगावर लिंबू फेकून मारलें तर तें अंगास लागूं न देतां पट्यानें कापतां आलें पाहिजे. अशा प्रकारें लिंबाची काट करतां आली तर तो उत्तम पटेकरी समजला जातो.

काट ९ वी



चित्र सं. ७१२

काढणी.



चित्र संख्या ७१३–७१७

काढणी पहिली.

काढणी पहिली–चित्र १ प्रमाणें उभें राहून सरक पवित्र्यानें दोन तीन पवित्रे पुढें जावें. नंतर मागील उजवा पाय पुढें टाकून उजवे हाताकडून डावे हाताकडे व नंतर डावे हाताकडून उजवे हाताकडे उलट सुलट गर्दनकाट करावी. डावे हाताकडून उजवे हाताकडे गर्दनकाट करतांना त्याच अवसानांत पुढें असलेला उजवा पाय मागें घ्यावा व पट्ट्याचा हात मानेमागें नेऊन डोक्यावरून फिरवून उलटा पाठीकडे न्यावा. नंतर चित्र नं. २ प्रमाणें खालीं बसून चित्र नं. ३ प्रमाणें पट्ट्याचे मागें डावा हात टेकून बसावें. नंतर शरीर वर उडवून पटा पायाचे खालून पुढें काढावा. नंतर उभें राहून खोंच मारावी. नंतर पलटी करून मूळ दिशेस तोंड करून उभें रहावें.


ही काढणी नीट करतां येऊं लागली म्हणजे उभ्यानें उंच उडी मारून करण्याची संवय करावी. पटा पायाचे खालून काढतांना शरीर बोजड असल्यानें उचललें गेलें नाहीं तर सुरवातीस जमिनीवर ढुंगण टेकून पाय वर घेऊन पटा त्यांचे खालून काढावा. नंतर संवय होईल त्याप्रमाणें ढुंगण टेकल्याशिवाय पट्टा काढण्याची संवय करावी.

काढणी दुसरी.

काढणी दुसरी–चित्र नं. १ प्रमाणें उभें राहून उजवा पाय पुढें टाकून भेंडाऱ्याचा वार मारावा. नंतर पटा डावीकडे आला म्हणजे चित्र नं. ४ प्रमाणें डावा पाय उंच करून त्याचेखालून पटा मागें न्यावा व लागलींच डावा पाय टेकून चित्र नं. ५ प्रमाणें उजवा पाय वर उचलून त्याचेखालून पटा बाहेर काढावा. नंतर पलटी करून मूळ दिशेस तोंड करून उभें रहावें.

काढणी तिसरी.

काढणी तिसरी–चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर पट्ट्याचा हात डोक्याचे मागून डावीकडून उजवीकडे वर्तुळाकार फिरवून पुढें आणावा. नंतर त्याच अवसानांत उजवा पाय पुढें टाकावा व डावा पाय वर उचलावा. नंतर दोन्ही पायांचेमध्यें चित्र नं. ४ प्रमाणें कडकचा वार मारावा. नंतर त्याच गतींत तो हात परत घ्यावा. नंतर डावा पाय जमिनीवर टेकून उजवा पाय वर उचलावा व पट्ट्याचा हात उजवीकडून डावीकडे डोक्याचे मागून फिरवून डावे पायावर पूर्ण चक्कर फिरावें व मूळ दिशेंस तोंड आलें म्हणजे उजवा पाय पुढें टाकावा व नंतर डावा पाय त्याचे पुढें टाकून चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें.



चित्र संख्या ७१८–७२०

काढणी चवथी.

काढणी चवथी–चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर सरक पवित्र्यानें, पटा वर खालीं हलवीत दोन तीन पवित्रे पुढें जावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून गर्दनकाट मारावी व तेथूनच हात फिरवून बाहिऱ्याचा वार मारावा. नंतर पुढील उजवा पाय मागें घेऊन चित्र नं. २ प्रमाणें डावे पायाचे जवळ ठेवावा व पुढें वांकून डावा हात जमिनीवर टेकावा. नंतर पटा खालीं करून उजवा पाय उचलून पट्यावरून पलीकडे ठेवावा व त्याच गतींत चित्र नं. ३ प्रमाणें डावा पाय उचलून पट्यावरून पलीकडे न्यावा. नंतर उभें राहून पलटी करावी.


सुचना—ही काढणी नीट करतां आली म्हणजे कुस्तींत ज्याप्रमाणें धड टाकून डंकी घेतों त्याप्रमाणें दोन्ही पाय वर उडवून डंकी घ्यावी व पाय पट्याचे पलीकडे टाकून काढणी करावी.

काढणी पांचवी.

काढणी पांचवी–चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर सरक पवित्र्यानें पटा वर खालीं हलवीत दोन तीन पवित्रे पुढें जावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून कोठ्याचा (समोरच्या गड्याचे डावे कोठ्याचा) वार मारवा व डावा हात उंच करून पट्याचा हात डावे बगलेंत न्यावा. नंतर डावा पाय उचलून उजवे पायाचे बरोबर पुढें ठेवावा. नंतर डावा हात चित्र नं. ३ प्रमाणें जमिनीवर टेकून दोन्ही पाय एकदम वर उडवून कोलांटी घेऊन, डावा पाय उभा ठेवून उजव्या पायाचे गुडघ्यावर बसावें.

सुचना—काटी व काढण्या चांगल्या करतां येऊं लागल्या म्हणजे राहा व वेल यांतील हात करतांना त्यामध्यें काढण्या करण्याची संवय करावी.

दोन पट्ट्यांची सलामी (पहिल्या राहाची).




चित्र संख्या ७२१–७२४

दोन पट्यांची सलामी (पहिल्या राहाची).

दोन पट्यांची सलामी (पहिल्या राहाची)–चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेवून व पटे चित्रांत दाखविल्याप्रमाणें धरून उभें रहावें. नंतर सरक पवित्र्यानें पटे वर खालीं हलवीत दोन तीन पवित्रे पुढें जावें. नंतर मागील उजवा पाय पुढें टाकून डावे हातानें खोपरीचा व उजवे हातानें कोठ्याचा वार मारून चित्र नं. २ प्रमाणें पटे जाऊं द्यावे. नंतर मागें तोंड फिरवून पटे चित्र नं. ३ प्रमाणें डावे बाजूनें मागें न्यावे. नंतर दोन्ही पटे पाठीचे मागून गोलाकार फिरवावे. याप्रमाणें पटे फिरवितांना मध्यंतरी चित्र नं. ४ प्रमाणें स्थिति येते. नंतर दोन्ही पटे उजवे बाजूस जाऊं द्यावे व मूळ दिशेस तोंड करून चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें.

सुचना :—जोडपट्याचें काम करतांना दोन्ही पटे एकमेकांशीं समान्तर ठेवून फिरविण्याची काळजी घ्यावी. नाहींतर पटे एकमेकांवर आपटून पट्यास खांड पडण्याचा अथवा पटा शरिरास लागून इजा होण्याचा संभव असतो.

दोन पट्ट्यांची पहिली राहा.




चित्र संख्या ७२५–७३०

दोन पट्ट्यांची पहिली राहा.

दोन पट्ट्यांची पहिली राहा-चित्र नं. १ प्रमाणें डावा पाय पुढें ठेवून उभें रहावें. नंतर उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. २ प्रमाणें उजवा हात मानेच्या मागें न्यावा. नंतर उजवे हातानें उलट्या जनोईचा वार मारावा व त्याचवेळीं डावे हातानें मोढ्याचा हात फिरवावा व डावा पाय उजवे पायाचे मागें उजवे बाजूस ठेवावा म्हणजे चित्र नं. ३ प्रमाणें स्थिति येते. नंतर डावीकडून उजवीकडे फिरावे व त्याच गतींत डावा हात पाठीचे मागें न्यावा व उजवा हात पुढें (चित्र नं. ४) ठेवावा. नंतर त्याच तोंडाकडे सरक पविञ्यानें दोनतीन पवित्रे पुढें जाऊन उजवे हातानें कमरेचा वार मारावा व डावा हात उलट फिरवून वर न्यावा म्हणजे चित्र नं. ५ प्रमाणें स्थिति येते. कमरेचा हात मारण्याचे अवसानांतच मागील डावा पाय उजवे पायाचे मागून उजवीकडे टाकावा व दोन्ही हातांनीं मोढ्याचे हाताप्रमाणें पटे फिरवावे. या-प्रमाणें पटे फिरवितांना मध्यंतरी चित्र नं. ६ प्रमाणें स्थिति येते. नंतर उजवा पाय पुढें आणून डावा पाय त्याचे पुढें टाकावा व चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर सलामीची पूर्ण क्रिया करावी.

दोन पट्ट्याचा वेल (पहिल्या राहाचा)



चित्र संख्या ७३१–७३३

दोन पट्ट्याचा वेल (पहिल्या राहाचा) चित्र नं. १ प्रमाणें उभें रहावें. नंतर चित्र नं. २ प्रमाणें दोन्ही हातांनीं उजवे बाजूस वार मारावा म्हणजे चित्र नं. ३ प्रमाणें हात मागें जातात. नंतर पुढील डावा पाय उचलून उजवे पायाचे पुढून उजवे पायाचे मागें टाकावा. नंतर उजवा पाय उचलून डावे पायाचे मागें टाकावा. याप्रमाणें केल्यानें शरिराचें संपूर्ण चक्कर होतें व चित्र नं. १ प्रमाणें मूळ दिशेस तोंड होतें. याप्रमाणें जागेच्या सवडीनुसार मागें पाय टाकून चक्करें घ्यावीं म्हणजे **मागचा वेल** होतो. नंतर वर सांगितल्याचे उलट क्रिया करून व पुढें पाय टाकून चक्करें करून मूळचे जागीं चित्र नं. १ प्रमाणें यावें म्हणजे पुढील **वेलाची** क्रिया होते.

उपसंहार

आमचे घराण्यांत (परंपरेंत) पट्याच्या राहा करतांना सुरवातीस सलामी, नंतर राहा, वार व शेवटीं सलामी करतात. म्हणून त्याप्रमाणेंच माहिती दिली आहे. त्याचप्रमाणें प्रत्येक राहामध्यें सलामी, हूल, काट, काढणी वगैरे भाग केले असून वाचणारास विषय नीट समजावा म्हणून प्रत्येकाचीं निरनिराळीं चित्रें दिलीं आहेत. चित्रांचे साहाय्यानें हा विषय समजविणें कठीण आहे, तरी शक्य तितका सुलभ व्हावा म्हणून प्रयत्न केला आहे. थोडासा पटा ज्यास येतो त्यास तर ही माहिती सहज समजेल. प्रत्येक राहा नीट येईपर्यंत पुष्कळ वेळ करावी म्हणजे चक्कर न येतां दम वाढेल व काम सफाईदार होऊं लागेल. एक राहा नीट करतां येऊं लागली म्हणजे पुढली राहा शिकावी.

पट्याच्या सलामींची, राहांची, हूबांची व काटींची माहिती दिली आहे त्याप्रमाणें सर्व क्रिया नीट तडफेनें व बिनचूक करतां आल्या म्हणजे त्याच क्रिया इच्छेप्रमाणें दोन, चार अथवा आठहि दिशांस तोंड करून करतां आल्या पाहिजेत. लढाईचेवेळीं शत्रु आपलेसमोर एकच बाजूस असतो असें नेहमीं घडत नाहीं. कित्येक वेळीं आपल्या-भोंवतीं चारहि बाजूंकडून शत्रूंनीं आपणांस वेढलें तर त्यांचेवर हल्ला करणें व त्यांचे-पासून आपला बचाव करणें जरूर असतें. अशावेळीं ज्याबाजूस शत्रू जवळ असेल त्याबाजूस जाऊन त्याचेवर वार करून लागलींच दुसरे बाजूनें लगट करणाऱ्या शत्रूवर वार करणें जरूर असतें. त्यामुळें निरनिराळ्या बाजूंस वळून पट्याचे वार करावे लागतात; म्हणून द्विमुखी, चौमुखी, अष्टमुखी अशा निरनिराळ्या पवित्र्यांवर पट्याचे हात करण्यास शिकावें, म्हणजे प्रसंगीं त्यांचा चांगला उपयोग होतो. यासाठीं ह्या निरनिराळ्या पवित्र्यांची माहिती पुढें दिली आहे. तसेंच पुष्कळांनीं मिळून संघांत पटा फिरविण्याचा सराव करावा म्हणजे प्रसंगीं निर-निराळ्या प्रकारच्या व्यूहांसारख्या रचना करून आपणास आपल्या पक्षांतील निःशस्त्र मंड-ळींचें संरक्षण करतां येतें असें गुरुबंधु रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर एम. ए एलएल. बी. यांनीं लिहिलेल्या **'दांड–पटा'** या पुस्तकांत लिहिलें आहे व त्याबद्दलची माहितीहि त्यांनीं तेथें दिली आहे. इच्छा असेल त्यानें ती त्यांचे पुस्तकांतून वाचावी.

नुसतें पवित्र्यावर चालून वार करण्यास उशीर लागतो म्हणून जरूरीप्रमाणें उड्डाण करून निरनिराळ्या बाजूंस तोंड फिरवून स्वतःचें रक्षण करावें लागतें व शत्रूंवर हल्ला करावा लागतो.

तसेंच काटीचे प्रकार दिले आहेत ते नीट करतां येऊं लागले म्हणजे खालीं दिलेल्या जास्त कौशल्याच्या व चमत्कृतिजन्य काटी करण्यास शिकावें. मनुष्याचे तोंडांत लवंग धरण्यास देऊन लवंगेची काट करावी. मनु-ष्यास उताणा निजवून त्याचे पोटावर लिंबू

अथवा बटाटा ठेवून त्याची काट करावी. रुमालांत केळें बांधून रुमाल कापल्याशिवाय केळाची काट करावी. विड्याच्या ५० पानांची चळत एका टेबलावर ठेवून त्यावर रुमाल टाकावा व रुमाल न कापतां, पानांची काट करावी. केळांच्या व पानांच्या काटी करण्यास खास जाणत्या गुरूपाशीं शिकावें लागतें. निरनिराळ्या प्रकारचीं कसरतींचीं झाडें करून त्यांत काम करणाऱ्या माणसांचे शरिरावर बटाटे अगर लिंबें ठेवून त्यांच्या काटी कराव्या.

बनेटीपटा, लकडीपटा वगैरे प्रकारांची माहिती मेहनतीच्या स्वरुपाची असल्यानें ती येथें दिली नाहीं. ‘ मेहनतींचे–प्रकार देशी ’ या ज्ञानकोशाचे खंडांत ती देण्यांत येईल.

द्विमुखी पवित्रा.

चित्र नं. ७३४ मध्यें १ या आकड्यानें दाखविलेल्या जागेवर उजवा पाय व २ या




चि. सं. ७३४

आकड्याचे जागेवर डावा पाय ठेवून उत्तरेकडे तोंड करून पवित्र्यावर उभें रहावें. नंतर निरनिराळ्या प्रकारच्या राहा, वेल, काटी वगैरे पट्ट्याचे हात करून, उत्तरेकडे जावें. पुढें जातांना निरनिराळ्या हातांच्या स्वरुपाप्रमाणें उजवीकडून अगर डावीकडून फिरून हात करावे. उत्तरेकडील शत्रूवर वार केल्यानंतर पलटी घेऊन परत मूळचे जागीं यावें. नंतर दक्षिणेकडे तोंड करून १ या जागेवर उजवा व २ या जागेवर डावा पाय ठेवून उभें रहावें व त्या बाजूस तोंड करून हात करावे. उत्तरदक्षिण अगर पूर्वपश्चिम अशा दोनहि दिशांस उलटसुलट जाऊन हात करतां येतात म्हणून या पवित्र्यास **द्विमुखी पवित्रा** म्हणतात.

चौमुखी पवित्रा.

चित्र नं. ७३५ मध्यें १ या जागेवर




चित्र संख्या ७३५

उजवा पाय व २ या जागेवर डावा पाय ठेऊन उत्तरेकडे तोंड करून उभें रहावें. नंतर निरनिराळ्या राहा, वेल व काटी त्या बाजूस तोंड करून कराव्या व मग मूळचे जागीं आल्यावर १ या जागेवर उजवा व २ या जागेवर डावा पाय ठेवून दक्षिणेकडे तोंड करून उभें रहावें. नंतर त्या दिशेस पट्याचे हात करावे. मध्यभागीं परत आल्यावर पलटी घेऊन १ या ठिकाणीं उजवा पाय व २ या ठिकाणीं डावा पाय ठेऊन पूर्वेकडे तोंड करून उभें रहावें. नंतर पूर्वेकडे पट्याचे निरनिराळे हात करून परत मूळचे जागीं मध्यभागीं यावें व १ या जागेवर उजवा व २ या जागेवर डावा पाय घेऊन पश्चिमेकडे तोंड करून उभें रहावें व त्या दिशेस पट्याचे निरनिराळे हात करावे. नंतर पुनः उत्तरेकडे तोंड करून उभें रहावें व पुनः वरप्रमाणें चारहि बाजूंस तोंडें करून हात करावें. या पवित्र्यास **चौमुखी पवित्रा** म्हणतात.

अष्टमुखी पवित्रा.

चित्र नं. ७३६ मध्यें वर्तुळाचे मध्यभागीं १ या जागेवर उजवा पाय व २ वर डावा पाय ठेवून **उत्तरेकडे** तोंड करून उभें रहावें. नंतर त्या दिशेस पट्याचे हात करावे व पुनः मूळचे जागीं येऊन १ या जागेवर उजवा व त्याचे पुढें डावा पाय ठेवून **दक्षिणेस** तोंड करून उभें रहावें. नंतर त्या दिशेस पट्याचे हात करावे. नंतर मध्यभागीं परत येऊन १ या ठिकाणीं उजवा व त्याचे पुढें डावा पाय ठेवून **आग्नेय दिशेस** तोंड करून उभें रहावें. त्या दिशेस हात केल्यावर मध्यभागीं येऊन **वायव्य दिशेस** तोंड करून हात करावे. नंतर **पूर्व, पश्चिम, ईशान्य, नैऋत्य** या दिशांस




चित्र संख्या ७३६

अनुक्रमें तोंड करून हात करावे व पुनः उत्तरकडे तोंड करून कामास सुरुवात करावी. या पवित्र्यास **अष्टमुखी पवित्रा** म्हणतात.

चौरंगाचा पवित्रा.

चित्र नं. ७३७ प्रमाणें दहा फूट लांब व दहा फूट रुंद असा चौकोन मैदानावर काढावा व त्याचे आंतले बाजूस पांच फूट लांब व पांच फूट रुंद असा दुसरा चौकोन चित्र नं. ७३७ प्रमाणें काढावा. नंतर १ या आकड्याचे जागेवर उजवा व २ या जागेवर डावा पाय ठेऊन पवित्र्यावर उभें रहावें. १ व २ या दोन ठिकाणांमधील अंतर २॥ फुटांचें असावें. नंतर पट्याचे हात करून पुढचा वेल करावा व ३ या जागेवर उजवा व ४ या जागेवर डावा पाय ठेवून उभें रहावें. तेथून डावा पाय उचलून ५ या जागेवर ठेवावा व हात करून पश्चिमेच्या बाजूस जावें व ६ या जागेवर उजवा व ७ या जागेवर डावा पाय ठेऊन उभें रहावें. नंतर पुनः ७ या जागेवरून डावा पाय उचलून ८ या जागेवर ठेवावा व दक्षिणेकडे तोंड करून उभें रहावें. नंतर ९ या जागेवर उजवा व १० या जागेवर डावा पाय ठेवावा. याप्रमाणें दक्षिणेकडे जातांना पट्याचे हात करावे. नंतर तेथून डावा पाय ११ या ठिकाणावर ठेवून पूर्वेकडे तोंड करावें व त्या बाजूस हात करून १२ या ठिकाणावर उजवा व १३ या ठिकाणावर डावा पाय ठेवून उभें रहावें. या पवित्र्यांत आंतील चौकोनावर (चौरंगाचे काठानें) चालून हात करावयाचे असतात व चार दिशांस ४, ७, १०, १३ या ठिकाणांवर डावे पाय चौरंगाचे बाहेरचे बाजूस (चौरंगाचे पायांवर) ठेवावयाचे असतात. याप्रमाणें पवित्रा चालून हात करतात त्यास **चौरंगाचा** पवित्रा म्हणतात.



चित्र संख्या ७३७

गुरुज.

उपोद्घात.

गुरुज अथवा पोलादी गदा हें एक प्रकारचें संहारक शस्त्र आहे. हें प्रथम केव्हां वापरण्यांत आलें तें नक्की समजत नाहीं. मोंगल बादशहांच्या वेळीं हें शस्त्र अस्तित्वांत असावें असें वाटतें, कारण ह्या शस्त्राचें नांव गुरुज ऊर्फ गुर्ज आहे. हा मोंगलशाहींतील प्रचलीत फारशी भाषेचा शब्द असावा असा समज आहे. जुन्या संस्कृत ग्रंथांतून या शस्त्राचें नांव अगर वर्णन दिसत नाहीं. तसेंच गुरुजाचा प्राचीनकाळच्या लढाईंत जास्त मोठ्या प्रमाणावर उपयोग होत असल्याचेंहि कोठें सांगितलेलें नाहीं.


लाकडी गदेच्या कल्पनेवरून ही पोलादी गदा अथवा गुरुज करण्याची कल्पना निघाली असावी असें अनुमान आहे. तरवारीच्या मुठीसारखीच या गुरुजाची मूठ केलेली असते. गदेच्या लाकडी जाड दांड्याचे ऐवजीं गुरुजास तीन फूट लांबीची जाड पोलादी सळई बसविलेली असून त्या सळईच्या अंगास कमळाच्या पाकळ्यांप्रमाणें पोलादी पाकळ्या बसविलेल्या असतात. या पाकळ्यांस तीक्ष्ण धार असते. कांहीं गुरुजांच्या पाकळ्या बोथटहि असतात. तशाच कांहीं गुरुजांच्या पाकळ्या आकडेदारहि केलेल्या असतात. या प्रकारच्या गुरुजाचा वार शरिरावर लागला तर कातडें सोलून निघून जखम फार भयंकर होते.

गुरुजाचे पांच भाग असतातः—(१) मूठ, (२) गज, (३) कमळ, (४) कमळाच्या पुढें अर्धा इंच लांबीचें टोंक, (या टोंकाचा आकार मुगुटावरील कळसासारखा असतो) आणि (५) कड्या. गजांत आठ कड्या घातलेल्या असतात. गुरुज फिरवितांना कड्या पुढेंमागें सरकून त्यांचा जो नाद होतो त्यांत तल्लीन झाल्यामुळें गुरुज वापरणारास तो फिरविण्याचा कंटाळा तर येतच नाहीं पण उलट हुरूप वाढण्यास त्यामुळें मदत होते.

कुस्तींत विजयी झालेल्या फार मोठ्या दर्जाच्या पहिलवानांस गदा अगर गुरुज बक्षीस देण्याचा जुन्या वेळीं रिवाज असे. श्री.कै. खंडेराव महाराज गायकवाड यांचे वेळीं बडोद्यांतील नामांकित पहिलवानांस गुरुज इनाम दिलेले अजूनहि कांहीं तालमींतून ठेवलेले आहेत.

गुरुज गदेप्रमाणेंच फिरवितात. याचा घाव शरिरावर बसला तर फार वाईट प्रकारची जखम होते. मर्मस्थानीं मार लागला तर प्राण जाण्यासहि उशीर लागत नाहीं. या शस्त्राचे खेळांत शीर, बगल व पट यांवर मुख्यतः वार केले जातात. अशा या शस्त्राच लढाईंत बचावाचें धोरण ठेवून लढणेंच बरें. कारण याचा मार ढालीनें देखील आडावणें कठीण असतें. ढाल धरलेल्या मनगटास इजा होण्याचा विशेष संभव असतो.

गुरुज.



चित्र संख्या ७३८–७४२

गुरुज.

गुरुज–हात १ ला–चित्र नं. १ प्रमाणें डावे पवित्र्यावर चित्रांत दाखविल्याप्रमाणें गुरुज दोन्ही हातांत आडवा धरून उभें रहावें. नंतर गुरुज डावे हातानें वर झोंकून चित्र नं. २ प्रमाणें डोक्यावर धरावा. नंतर त्याच अवसानांत तो डोक्याचे मागून गोलाकार फिरवून चित्र नं. ३ प्रमाणें उजवा पाय पुढें टाकून समोर उभा असलेल्या शत्रूच्या डोक्यावर मारावा. नंतर त्याच झोंकांत डावा पाय मागें घेऊन आपले डावीकडून वळून चित्र नं. ४ प्रमाणें तोंड झालें म्हणजे त्या बाजूस (आपण सुरवातीस उभें होतों त्याचे उजवे बाजूस) उभा असलेल्या शत्रूचे डावे बाजूचे खोपरीवर गुरुज मारावा. नंतर गुरुजाचा हात तसाच परत घेऊन डावा पाय चित्र नं. ५ प्रमाणें तिरपे बाजूस पुढें टाकावा व त्या बाजूस उभा असलेल्या शत्रूचे उजवे खोपरीवर गुरूज मारावा. नंतर गुरुज तसाच आपले उजवे बाजूस फिरवून व उजवा पाय मागें नेऊन सुरवातीचे स्थितीप्रमाणें (चित्र नं. १) गुरुज दोन्ही हातांत धरून उभें रहावें.


हा हात करतांना पवित्रा त्रिकोणांत फिरतो म्हणून यास तिरंगी पवित्रा म्हणतात.

गुरुज लोखंडी असल्यानें वजनदार असतो त्यामुळें त्याचे हात करतांना सर्व क्रिया त्याचे झोंकांतच, मध्यंतरीं न थांबतां, करावयाच्या असतात.

तरवार अगर पट्ट्याप्रमाणें गुरुजाचे अनेक प्रकारचे हात करण्याचा सराव करावा.

समोरच्या गड्याचे हातांत गुरुज असून तो त्याच्या गुरुजानें आपणास मारण्यासाठीं आपले अंगावर आला तर चित्र नं. १ प्रमाणें आपण आपला गुरुज धरून व तो वर अगर बाजूस जरूरीप्रमाणें झोंकून आपला बचाव करावा.

परशु.



चित्र संख्या ७४३–७४९

परशु.

❋

लेखक :—रा. रा. **बाबुराव गोपाळ कोठी**, व्यायामविशारद, **बडोदें.**

परशु हें हत्यार भारतवर्षांत फार पुरातन काळापासून वापरण्यांत होतें असें दिसतें. वैदिक कालांतील कांहीं देवतांच्या हातांत परशु असल्याचीं वर्णनें आहेत. **श्री. परशुराम** यांचें तर परशु हेंच मुख्य हत्यार असल्याचें दिसतें. पण अलीकडील काळांत लढाईत या हत्याराचा फारसा उपयोग केल्याचें दिसत नाहीं. हातघाईच्या लढाईत याचा उपयोग होण्यासारखा आहे पण अलीकडील लष्करांत हें दिसत नाहीं. सध्यां याचे निरनिराळे हात करावयास शिकणें हा एक मर्दानी खेळाचा प्रकार आहे.

चित्रावरून या हत्याराचा आकार कसा असतो हें सहज समजण्यासारखें आहे. यास लाकडी अगर लोखंडी दांडा वापरण्यांत येतो. कुऱ्हाडीप्रमाणें याचा उपयोग हल्लीं देखील बागेंतील झाडांच्या फांद्या तोडण्याचे कामीं होण्यासारखा आहे. याचें पातें चांगलें जड व पोलादाचें असावें. याचा उपयोग प्रसंगीं करतां यावा अशी इच्छा असेल तर हें हत्यार झाडांच्या फांद्या वगैरे तोडण्याचे कामीं नेहमीं वापरावें म्हणजे चांगला घाव मारण्याचा सराव होईल.


तरवारीचे हात करतात तशा रीतीनें याचे हात संघव्यायामांत करून दाखवितात, त्यांपैकीं नमुन्यासाठीं एक हात खालीं दिला आहे.

परशु–हात १ ला–चित्र नं. १ प्रमाणें परशु धरून उभें रहावें. नंतर मागील उजवा पाय पुढें टाकून चित्र नं. २ प्रमाणें समोरचे शत्रूवर बाहूचा तिरपा वार मारावा. नतर परशु उजवे बाजूनें मागें घेऊन डोक्याचे मागचे बाजूनें अर्धवर्तुळ फिरवून मागचे बाजूस न्यावा व त्याच वेळीं आपले डावे बाजूस फिरून मागचे अंगास तोंड करावें. याप्रमाणें करतांना पाय बदलावयाचे नसतात. चित्र नं. २ मध्यें उजवा पाय गुडघ्यांतून वाकविलेला आहे तो चित्र नं. ३ मध्यें सरळ करून डावा पाय गुडघ्यांतून वांकवून डावे पवित्र्यावर उभें रहावें व त्या चित्राप्रमाणें **कटीचा वार** मारावा.

नंतर उजवे बाजूस फिरून चित्र नं. ३ मध्यें मागें असलेला उजवा पाय उजवीकडून मागें नेऊन चित्र नं. ४ प्रमाणें डावे पायाचे मागें ठेवावा व त्याच चित्राप्रमाणें गर्दनचा वार मारावा. नंतर उजवीकडून फिरून आपले भोंवतीं वर्तुळाकार फिरावें व चित्र नं. ५ प्रमाणें मागचे अंगास **गर्दनीचा** वार मारावा व तसेंच उजवे बाजूनें मागचे बाजूस फिरून **शीरचा** वार मारण्यासाठीं चित्र ६ प्रमाणें परशु धरून उभें रहावें. नंतर चित्र नं. ७ प्रमाणें डावा पाय पुढें टाकून शीरचा वार मारावा.

श्री.

साठमारी व डागदारी.



साठमारीची जागा (अग्गड)

उपोद्घात.

❀

जुन्या वेळीं मस्त हत्तीशीं लढाई करण्याचा मर्दानी खेळाचा एक प्रकार होता, त्यास गजयुद्ध म्हणत. मस्त हत्तीशीं बाहुयुद्ध करणारे श्रीकृष्णभीमसेनांसारखे मल्ल पुराणकाळीं होते असें पुराणांत वर्णन आहे. अशा या गजयुद्धांत मनुष्याच्या शारीरिक शक्तीचा, चपलतेचा व धाडसाचा फार उपयोग होत असला पाहिजे हें उघड आहे. मस्त हत्ती अंगावर चालून आला असतां लढणारे वीर त्याच्या पाठीमागें जाऊन, त्याची शेपटी धरीत व त्यामुळें तो फिरूं लागला असतां त्याचे मागोमाग आपणहि वाटोळे फिरत आणि शेवटीं हत्ती थकल्यावर त्यास ठार मारीत असत असें वर्णन केलेलें आढळतें. कंसाच्या गजशाळेंतील अत्यंत मस्त अशा कुवलयापीड नांवाच्या हत्तीला त्याचे माहूतानें श्रीकृष्णाच्या अंगावर सोडलें असतां हत्तीशीं झालेल्या श्रीकृष्णाच्या झटापटीचें वर्णन हरिवंशांत व श्रीमद्भागवतांतहि सविस्तर दिलेलें आहे.

लेखक :—



रा. रा. ना. ब. जोशी,
बडोदें.

यानंतर मोंगल अमदानींत बादशहा जहांगीर यांस स्वतःचे प्रयत्नानें मस्त हत्ती वठणीवर आणण्याचा फार शोख होता असें समजतें. त्याचप्रमाणें अगदीं अलीकडील काळांतहि सांगली संस्थानचे अधिपति कै. **श्री. तात्यासाहेब पटवर्धन** यास स्वतः घोड्यावर बसून मस्त हत्तीस खेळविण्याची फार आवड होती अशी

माहिती मिळते. श्री. तात्यासाहेब हातांत भाला घेऊन व घोड्यावर स्वार होऊन तयार होतांच मस्त हत्तीस त्यांचेसमोर मोकळा सोडीत. नंतर ते त्या हत्तीस चिडवून अंगावर घेत व त्याशीं खेळत. अशारीतीनें सर्व दिवसभर त्यास पळविल्यानें तो दमल्यानंतर त्यास बांधीत असत. या खेळासाठीं सांगलीस स्वतंत्र मोकळी जागा नसल्यानें ठरल्या दिवशीं हत्ती मोकळा सोडणार म्हणून गांवभर आगाऊ खबर देत असत. त्या-मुळें गांवांतील इतर प्रजाजनांस हत्तीपासून इजा होण्याची भीति रहात नसे. अशारीतीनें हत्तीस खेळविण्यासाठीं स्वारास घोड्यावर किती कौशल्यानें बसावें लागत असेल व मनांत किती हिम्मत बाळगावी लागत असेल याची वाचकांनींच कल्पना करावी.

कै. श्री. तात्यासाहेब पटवर्धन, सांगली संस्थानचे अधिपति.



चित्र संख्या ७५०


अगड.

मस्त हत्तीस खेळविण्याचा थोडासा निराळा प्रकार अजूनहि बडोदें संस्थानांत चालू आहे. मस्त हत्तींचे खेळ करविण्यांत बडोदें संस्थानाची प्रसिद्धि आहे. श्री. खंडेराव महाराज गायकवाड यांस अनेक प्रकारच्या मर्दानी खेळांची आवड होती. त्यांचे कारकीर्दींत या मर्दानी खेळांसाठीं **अगड** या नांवाची जागा त्यांनीं मुद्दाम बांधविली. ही जागा बडोदें शहराच्या पूर्वेस पाणीदरवाज्याचे बाहेर असून ३५० फूट लांब व २२० फूट रुंद अशी आहे. या जागेचे पश्चिमेस व उत्तरेस असलेल्या इमारतींचे दुसरे मजल्यावर श्री. खाशा स्वाऱ्या बसण्यासाठीं मुद्दाम सोईच्या जागा बांधल्या आहेत. बाकीचे सर्व बाजूंस चोहीकडून पंचवीस फूट उंचीचा तट बांधलेला असून त्यांवर प्रेक्षक लोकांस बसतां येईल अशा जागेची सोय अलीकडे श्री. सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं केली आहे. या मैदानाचे दक्षिण व उत्तर

दिशांस दोन मोठाले दरवाजे मस्त हत्तीस या अग्गडांत आणण्यासाठीं ठेवलेले आहेत. या दरवाजांतून हत्ती आंत आले म्हणजे भिंतींत बसविलेले वजनदार अडसर सरकवून ते बंद करतात. याशिवाय सर्वत्र तटाचे भिंतींत अंतराअंतरावर एकेकटा मनुष्य आंतबाहेर जाऊं येऊं शकेल अशीं लहान द्वारें (७ फूट उंचीच्या कमानी) ठेवलेलीं आहेत. शिवाय मैदानाचे मध्यभागीं एक गोल पण मोकळा ४० फूट व्यासाचा लहान बुरूज केला असून त्याचे आंत जाण्यास अशाच लहान कमानी ठेवलेल्या आहेत (चित्र नं. ७५१). मस्त हत्ती अगदीं जवळ येऊन बचावाचा दुसरा मार्ग नाहीं असें वाटतांच पुढें धांवणारा साठमार जवळच्या अशा एका कमानींतून कोठेंतरी बाहेर निघून जातो व आपला बचाव करतो. तसेंच अग्गडाचे एका बाजूस ३५ फूट व्यासाचा एक गोल कट्टा केलेला असून याचे-भोवतीं फिरण्यानेंहि हत्तीपुढें पळणाऱ्या साठमाराचा अगर घोडेस्वाराचा बचाव होऊं शकतो. कारण हत्ती ज्याप्रमाणें समोर व सरळ रेषेंत फार जोरानें धावूं शकतो त्याप्रमाणें तो त्याच्या अवजड शरिरामुळें गोलाकार वक्रगतीनें वाटोळा धावूं शकत नाहीं. याचाच फायदा पुढील वाकडेंतिकडें पळणारास मिळवितां येतो.


साठमारी.

श्री. खंडेराव महाराजांचे वेळीं बडोद्यास ९०–९५ हत्ती होते. या हत्तींपैकीं एखादा मस्त हत्ती सुटला किंवा दंगा करूं लागला तर त्यास धरून आणून पुनः ठाणावर नीट बांधण्यासाठीं वीस वीस माणसांचे तीन बेडे ठेविलेले होते. हे तीन बेडे मिळून या माणसांची व त्यांच्या हत्यारांची संख्या ६० होत



चित्र संख्या ७५१

मस्त हत्तीस धरण्याचीं साधनें.




चित्र संख्या ७५२

असल्यामुळें त्यांचेपैकीं प्रत्येक माणसास **साठमार** असें नांव त्यावेळीं पडलें. हे साठमार लोक अग्गडांत मस्त हत्तीस मोकळा सोडून व त्याचेपुढें पळून जो खेळ करून दाखवितात त्यास **साठमारी** असें नांव प्रथम पडलें. पण सध्यां मात्र हत्तीच्या टकरा, डागदारी, साठमारी वगैरे खेळांचा जो एकत्र कार्यक्रम अग्गडांत होतो त्या सर्वांसच सामुदायिक रीतीनें **साठमारी** असें म्हणण्याचा प्रघात पडला आहे.


मस्त हत्तीला आटोक्यांत आणण्यासाठीं भाले, चिमटे, आकड्या, पोच्या, बेड्या वगैरे अनेक हत्यारांची जरूर लागते. चित्र नं. ७५२ वरून, चिमटे, बाण, पोच्या यांची कल्पना येईल. तसेंच चित्र नं. ७५३ वरून त्यांचा उपयोग करणाऱ्या साठमार लोकांच्या स्वरुपाची कल्पना येईल.

मस्त हत्तीस खेळाचेवेळीं अग्गडांत एका कमानीपाशीं आणून उभा करतात. नंतर जवळील कमानींत उभे राहून एक दोन साठमार त्याचे मागचे पायांतील बांधलेले साखळदंड सोडतात. याच वेळेस हत्तीच्या पुढील एका पायांत असलेली काट्यांची पोची साठमार आकडीनें काढतात. नंतर बिगुलाचा इशारा मिळतांच हत्तीस मोकळें करण्यांत येतें. नंतर आजूबाजूस उभे राहिलेल्या साठमारांपैकीं एखादा साठमार हत्तीच्या पुढें जातो आणि आपला भाला हत्तीपुढें करून अगर डोक्यावरील रंगी फेटा त्याचेपुढें सोडून हत्तीस चिडवितो. हत्ती त्या साठमाराचे मागें लागला कीं दुसरे साठमार त्यास दुसरीकडून चिडवून आपले



साठमार. चित्र संख्या ७५३

अंगावर घेतात. (चित्र नं. ७५४). हत्तीहि चिडून चिडविणाराचे मागें सैरावैरां धावूं लागतो. याप्रमाणें त्यास सर्व मैदानभर पळण्यास लावून खेळवितात. हत्ती प्रथम एकाचे




साठमारी. चित्र संख्या ७५४

मागें लागतो, तोंच त्यास दुसऱ्यानें चिडविल्यामुळें पहिल्या इसमास सोडून तो नवीन इसमाचे मागें पळतो. इतक्यांत तिसरा साठमार त्यास चिडवून आपणामागें पळण्यास लावतो अशारीतीनें हा खेळ पुष्कळ वेळपर्यंत सर्व अग्गडभर अनेक साठमारांकडून खेळविण्यांत येतो.

हत्ती जरी स्थूल व आवाढव्य प्राणी आहे तरी मनुष्यापेक्षां त्याची सरळ दौड जास्त वेगाची असते, म्हणून हे साठमार त्यास एकाच माणसाचे मागें एकसारखा धावूं देत नाहींत. हत्ती एकाचे मागें फार वेळ लागला असें दिसतांच त्याचें लक्ष आपणाकडे ओढून घेऊन त्यास मधूनच आपले अंगावर घेतात. त्यामुळें तो पूर्वी ज्याचे मागें पळत असेल त्या माणसाचा बचाव होतो (चित्र नं. ७५५). याप्रमाणें खेळ चालूं असतां कित्येक वेळां साठमारास आपले हातांतील भाला किंवा फेटा जेथल्यातेथेंच टाकून देऊन आपला बचाव करावा लागतो. कित्येक वेळां तसाच प्रसंग पडल्यास दारूचे बाण सोडून त्याचे धुराचे सहाय्यानें हत्तीस घाबरवून साठमारास सोडवावें लागतें. अशा या खेळांत साठमाराचें कौशल्य व धैर्य पाहून प्रेक्षक आश्चर्यानें थक्क होऊन जातात. कित्येक वेळीं तर एखादा साठमार हत्तीचे तावडींत सापडून आतां अगदीं मरतोच कीं काय असें वाटतें. त्याबरोबर खेळ बंद करावयाचा हुकूम मिळून चिमटा टाकणारे लोक हत्तीचे मागें जाऊन त्यास अडविण्यासाठीं त्याचे मागचे पायांत चिमटा टाकतात. चिमटा टाकावयाचें कामहि फार जोखमीचें असतें.

साठमारी.




चित्र संख्या ७५५

हत्ती एकदम मागें वळून चिमटा टाकणाऱ्या साठमारास धरण्याचा प्रयत्न करतो. म्हणूनच पहिला चिमटा यशस्वी रीतीनें टाकणारास इनाम देण्यांत येतें. एक दोन चिमटे लागले कीं हत्ती उभा रहातो व त्यामुळें त्यास बांधणें सोपें जातें. हत्ती धरल्यावर त्यांस अग्गडाबाहेर त्याचे ठाणावर बांधण्यासाठीं घेऊन जातात व साठमारीचा खेळ संपविण्यांत येतो.

डागदारी.


घोड्यावर बसून मस्त हत्तीस खेळविणाऱ्या स्वारास **डागदार** असें म्हणतात. असे दोन तीन डागदार बडोद्यास अजूनहि नोकर आहेत. यांचे घोडे मुद्दाम शिकवून तयार केलेले असतात. नेहमीं हत्तीजवळ नेऊन या घोड्यांची हत्तीविषयींची भीति नाहींशी करावी लागते. कारण हत्तीस बुजणारा (भिणारा) घोडा या कामासाठीं निरुपयोगी असतो. शिवाय डागदारीचा घोडा चांगला पाणीदार व चपळ असावा लागतो. त्याचप्रमाणें या घोड्यावर बसणारा स्वारहि चांगला हिमती व बळकट असला पाहिजे. डागदार तयार होऊन अग्गडांत आल्यानंतर मस्त हत्तीस मोकळा सोडतात. या वेळेस डागदार हत्तीस चिडविण्यासाठीं त्याचेसमोर जातो (चित्र नं. ७५६). तो बराच जवळ आला आहे असें पहातांच हत्तीहि चिडून एकदम त्याचे मागें पळतो. याप्रमाणें हत्तीची व घोड्याची शर्यत लागते. कित्येकवेळां तर घोड्याचे अगदीं शेपटीजवळच हत्तीची सोंड येऊन पोहोंचते. आतां हा घोडेस्वार हत्तीच्या सोंडेंत सापडणार असें प्रेक्षकांस

डागदारी.



चित्र संख्या ७५६

डागदारी.



चित्र संख्या ७५७

वाटतें नाहीं तोंच घोडेस्वार घोड्यास टांच देऊन हत्तीपासून लांब निसटून जातो (चित्र नं. ७५७). त्याबरोबर प्रेक्षकांस एकदम आनंद होऊन सर्वत्र टाळ्या पडतात. अशा तऱ्हेचे हे साठमारी व डागदारी असे दोन्ही प्रकारचे मर्दानी खेळ खरोखरच पाहण्यासारखे असतात व ते पाहण्यासाठीं लांबलांबचे लोक मुद्दाम बडोद्यास येतात. कोणी मोठा सरकारी पाहुणा आला तर त्याचेसाठीं हे खेळ सरकारांतून मुद्दाम करविण्यांत येतात. या दोन्ही खेळांत खेळणाऱ्या साठमारांच्या किंवा डागदारांच्या हिमतीची, शक्तीची व चपलतेची चांगलीच कसोटी लागते. तूर्त हे खेळ बडोद्याशिवाय दुसरीकडे कोठें होत नाहींत.

शिकार.

डुकराची शिकार.

ही शिकार घोड्यावरून व पायदळानेंहि केली जाते. कोंकणांत व देशावर रानांतून डुक्कर हुसकून काढून, गांवकरी फरा धरून उभे राहतात व डुकराची मुसंडी चुकवून, भाला, बरची किंवा शेवटीं कुऱ्हाडीनें डुक्कर मारतात. बंदुकीनेंहि ही शिकार केली जाते; परंतु तीस कोणीहि शिकारी फारसें महत्त्व देत नाहीं. मागील शतकाच्या सुरुवातीपासून ही शिकार हिंदुस्थानांत घोड्यावरूनच करण्याचा प्रघात पडलेला आहे. पूर्वी बंगालच्या जंगलांत अस्वली फार असत. त्यावेळीं अस्वलींची शिकार घोड्यावरून भाल्यानें करीत असत. हा भाला आंखूड असून त्याचें फळ रुंद असे व तें अस्वलीवर लांबून जोरानें फेंकण्यांत येत असे. अस्वलींचा संहार झाल्यावर डुकराची शिकार भाल्यानें करण्यास सुरुवात झाली. सुरुवातीस आंखूड भाले वापरीत असत व डुकराच्या जवळ जाऊन ते त्यावर जोरानें फेंकीत असत. परंतु पुढें ही पद्धत बंद करून लांब भाले वापरण्यांत येऊं लागले व ते फेंकण्याच्याऐवजीं डुकराच्या जवळ जाऊन त्यांनीं भोंसकण्याचें सुरूं करण्यांत आलें. हाच प्रकार हिंदुस्थानांत सर्वठिकाणीं चालू आहे. अनादिकालापासून डुकराची शिकार करण्याची चाल हिंदुस्थानांत आहे. रजपूत लोकांत तर संक्रांतीच्या करीच्या दिवशीं डुकराची शिकार करून त्याचें मांस त्या दिवशीं खाण्याचा रिवाज आहे. मराठ्यांमध्येंहि कित्येक लोक डुकराचें मांस मोठ्या आवडीनें खातात. घोड्यावरून टोळीटोळीनें पद्धतशीर शिकार करण्याची कल्पना इंग्रज अंमलदारांची आहे.

लेखक :—



मे. जनरल नानासाहेब शिंदे, बडोदें.

शिकारीची थोडक्यांत हकीकत.

ही शिकार खालीं दिल्याप्रमाणें केली जाते. तिघां तिघांच्या दोन तीन टोळ्या करून, हातांत भाले घेऊन, शिकारीस जातात. ज्या जंगलांत डुकरें असतील त्या जंगलाजवळील

गांवकरी गोळा करून त्यांचेकडून रान हांकण्यांत येतें. शिकारी आपल्या घोड्यावर जंगलाच्या बाहेर उभे असतात. एखादा चांगला डुक्कर जंगलांतून बाहेर पडतांच शिकारी त्याचे मागें आपले घोडे एकदम भरधांव टाकतात. शिकाऱ्यांनीं आपल्याला गांठलें आहे असें पाहतांच पुढें पळणारा डुक्कर आपली चाल जरा तेज करतो. शिकारी आतां भाला मारणार हें पहातांच एकदम चपळतेनें तो उजव्या किंवा डाव्या बाजूस झुकांडी देतो व शिकाऱ्याचा घोडा पुष्कळ पुढें निघून जातो. शिकाऱ्याचे दुसरे जे साथीदार असतात, त्यांस अशा वेळीं चांगली संधि मिळते. ते या डुकरास भोंसकण्याचा प्रयत्न करतात. आतां आपला निभाव लागत नाहीं व शिकाऱ्याचा भाला आपल्या शरिरांत घुसणार हें पाहतांच डुक्कर मागील पायावर उलटून शिकाऱ्याच्या घोड्यावर असा जोराचा हल्ला करतो कीं, जर शिकारी बेसावध असेल अगर त्याचा घोडा नवखा असेल तर त्याला डुकरानें जमिनीवर लोळविलेंच म्हणून समजावें. अशा वेळीं रागानें त्याचे सर्व केंस ताठ उभे राहतात व तो मोठ्यानें आवाज करून एकदम डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या वेळांत घोड्यावर हल्ला करतो. डुकराच्या कमनशिबानें शिकाऱ्याचा भाला जरी त्याच्या अंगांत खुपसला गेला व तो खालीं जमिनीवर पडला, तरी एका क्षणांत तो पुन्हां आपल्या पायावर उभा राहून पळूं लागतो, अगर शिकाऱ्याबरोबर दुसरी टक्कर देण्यास तयार असतो. याप्रमाणें किती तरी भाले त्याच्या शरिरांत गेल्यावर तो जमिनीवर कायमचा मरून पडतो. अशी या शिकारीची थोडक्यांत हकीकत आहे.

या शिकारीपासून फायदे.

या शिकारीकरितां चांगल्या घोड्याची खास आवश्यकता असते. सर्व जंगली जनावरांच्या शिकारीपेक्षां डुकराच्या शिकारीस फार महत्त्व देण्यांत येतें. या शिकारीकरितां पुष्कळ शिकारी एकत्र होतात व त्यामुळें त्यांचा वेळ फार मजेंत जातो. लष्करी अंमलदारास या शिकारीपासून आपल्या पेशाचें शिक्षण मिळतें. धैर्य, चपळता, घोड्यावरील बैठक, हत्यार वापरण्याची सफाई व संकटास तोंड देण्याची तयारी वगैरे पुष्कळ गुण या शिकारीपासून शिकतां येतात. या शिकारीपासून डोळे व कान इतके तेज होतात कीं, कोठेंहि जरा खुट्ट झालें कीं तें शिकाऱ्यास तेव्हांच समजतें. डुकराची शिकार करणारा उत्तम लष्करी अंमलदार झालाच पाहिजे.

'मारो साब, मारो.'

हिंदुस्तानचे माजी सेनापति ख्रिस्तवासी प्रसिद्ध लॉर्ड रॉबर्ट्स यांनीं आपल्या Forty-one years in India या पुस्तकांत कै. महाराजा प्रतापसिंगांच्या धैर्याविषयीं दिलेली हकीकत येथे द्यावीशी वाटते. लॉर्ड रॉबर्ट्स लिहितात कीं, मी जोधपुरास गेलों असतां तेथें माझ्याकरितां महाराजा प्रतापसिंग यांनीं डुकराच्या शिकारीची व्यवस्था केली होती. या शिकारींत एका मोठ्या डुकरास मी भाल्यानें जखमी केलें असतां तो जवळच्या डोंगरांत जाऊं लागला व त्या जागीं त्याचा पाठलाग घोड्यावरून करणें शक्य नव्हतें म्हणून मीं महाराजा प्रतापसिंगांना ओरडून

सांगितलें कीं, आपण आपला घोडा मध्यें घालून त्या डुकरास माझ्याकडे परता. महाराजा प्रतापसिंगांनीं आपला घोडा एकदम सोडला; परंतु डुकराच्या जवळ जातांच त्यांच्या घोड्याचा पाय एका खळग्यांत गेल्यानें ते घोड्यासह डुकराच्या समोर जमिनीवर पडले. त्या जखमी झालेल्या डुकरानें महाराज प्रतापसिंगावर एकदम हल्ला करून त्यांच्या पायास मोठी जखम केली. त्यांच्या मदतीस मी धांवून गेलों, परंतु इतक्यांत, महाराजा प्रतापसिंग जरी रक्तबंबाळ झाले होते, तरी उभे राहून, त्यांनीं डुकराचें तोंड आपल्या हातानें धरून, त्यास मागील दोन पायांवर उभें केलें होतें. माझ्या भाल्याची जखम कांहीं फारशी झालेली नव्हती. त्यामुळें तो डुक्कर जोरांतच होता. महाराजा प्रतापसिंगांनीं त्या डुकरास जोराचा धक्का देऊन मागें पाठीवर पाडलें व त्याचे मागील पाय दोन्ही हातांत धरून मला म्हणाले, "मारो साब, मारो." मीं नंतर भाल्यानें त्या डुकरास मारलें. डुकराचें वजन व त्याची ताकद किती असते, हें ज्यांस माहीत आहे ते महाराजा प्रतापसिंगांच्या धैर्याची, शक्तीची आणि प्रसंगावधानाची तारीफच करतील.

डुकराचे शिकारीसंबंधीं जोधपूर सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध आहे. महाराजा प्रतापसिंगांच्या वेळीं जोधपुरांत डुकराची शिकार तरवारीनें करीत असत असें ऐकण्यांत आहे.

शिकारीचा हक्का.

डुकराची शिकार करण्यासाठीं रान हांकण्यांत येतें, त्यास हक्का असें म्हणतात. पुष्कळसे गांवकरी एकत्र करून त्यांचा सारखा फेरा धरून रान हांकण्यांत येतें. हक्का करणाऱ्या लोकांजवळ मोठेमोठे दंडे, शिंगें, तुताऱ्या व बंदुकाहि दिलेल्या असतात. कित्येकांजवळ आतषबाजीहि दिलेली असते. या सर्वांवर देखरेख ठेवण्यासाठीं एक मुख्य शिकारी असतो व त्याच्या हाताखालीं दुसरे दोनतीन शिकारी ठेवावे लागतात. त्यांनीं इशारा देतांच रान हांकण्याचें काम सुरू करण्यांत येतें. ज्या शिकारी लोकांजवळ बंदुका दिलेल्या असतात त्यांनीं मोठा डुक्कर नजरेस पडतांच गोळीशिवायच्या काडतुसांनीं आवाज काढले म्हणजे बाहेर घोड्यावर जे शिकार करण्यास तयार असतात त्यांस सूचना मिळते. मोठा डुक्कर जंगलाच्या बाहेर पडतांच व त्याच्यामागें घोडेस्वार लागतांच हक्का थांबविण्यांत येतो. बाहेर पडलेला डुक्कर मारला गेल्यावर पुन्हां हक्का सुरू करण्यांत येतो. ग्वाल्हेरमध्यें वाघाच्या शिकारीचा हक्का करण्याकरितां पलटणच्या लोकांचा उपयोग करण्यांत येतो. हा हक्का फार पाहण्यासारखा असतो. आगीला डुक्कर भितो. एखादा मस्त डुक्कर अगर जखमी डुक्कर एखाद्या जाळींत लपून बसला असला तर त्यास बाहेर काढण्याचे कितीहि प्रयत्न केले तरी तो बाहेर निघत नाहीं. परंतु त्याच्या जाळीस जर आग लावली तर तो भिऊन एकदम बाहेर पडतो. दक्षिणेमध्यें किंवा निजाम हैदराबादमध्यें फड्या निवडुंगांमध्यें डुक्कर राहतात. त्यांस तेथून बाहेर काढणें फार कठीण काम असतें. हुशार शिकारी हातांत तरवारी घेऊन निवडुंग कापून आंत शिरतात व डुक्कर दिसतांच अगदीं त्याच्याजवळ बंदुकीचा खाली आवाज

काढतात. त्यामुळें तो बाहेर येतो व बाहेर उभे असलेल्या घोडेस्वारांच्या भाल्यास बळी पडतो. डुकराच्या खुराच्या निशाणीवरून त्याची लपण्याची जागा कित्येक शिकारी अगदीं बरोबर शोधून काढतात. गुजराथीमध्यें यास 'पगलं काढवुं' असें म्हणतात. या कामामध्यें मराठे, कच्छी, भिल्ल, गोंड आणि गुजराथमधील वाघरी फार प्रसिद्ध आहेत.

डुकराची ताकद.

डुक्कर हा कावेबाज प्राणी आहे. हक्क्याची आरडाओरड ऐकतांच तो आपल्या जागेंतून बाहेर येतो व शक्य असेल तर ती जागा सोडून दुसऱ्या जंगलांत निघून जातो. हका जर त्याच्या जागेजवळच आला तर तो इतका छपून जातो कीं, पहाणारास तें एक मातीचें ढेकूळ आहे असें वाटतें. या उपरहि जर त्यास त्याच्या लपण्याच्या जागेंतून हुसकलेंच तर तो अशा जोराची मुसंडी मारून बाहेर पडतो कीं, हक्केवाले आपली रांग तोडून त्यास जागा देतात. जंगलांतून बाहेर मैदानांत पडल्यावर आपल्याला दुसरी सुरक्षित जागा कोणती आहे याचा विचार तो प्रथमच करून ठेवतो व त्या जागेकडेसच तो पळत जातो. पहाणारास डुकराची दौड फारशी वाटत नाहीं; परंतु कितीहि वेगवान् घोडा असला तरी अर्धापाऊण मैलपर्यंत डुक्कर त्याचे पुढें सहज निघून जाऊं शकतो. जातांना लपण्यासारखी जागा दिसली कीं, त्या जागेमध्यें तो एकदम घुसतो. पळतांना समोर एखादा नाला, भिंत अथवा शेताचें उंच कुंपण आलें तर त्यावरून तो सहज उडी मारून जातो. कच्छमध्यें एकेवेळीं ५० फुट उंच खडकावरून डुकरानें खालीं उडी घेतली व तेथून उठून तो जंगलांत गेला असें एके ठिकाणीं लिहिलें आहे. डुकराला पोहतां येत नाहीं, कारण पोहतांना त्याच्या पायाच्या तीक्ष्ण खुरांनीं त्याचा गळा कापला जातो, अशी कित्येक लोकांची समजूत आहे, परंतु ती खोटी आहे. लेखकानें पाठलाग केलेला जखमी डुक्कर समोर पाण्यानें भरलेला नाला आला असतां, त्यामधून पोहून पलीकडील तीरास सुरक्षित गेलेला पाहिला आहे.

डुकराची झुकांडी.

आपल्या पाठींत आतां शिकाऱ्याचा भाला बसणार हें पाहतांच डुक्कर इतक्या सफाइनें उजवीकडे किंवा डावीकडे झुकांडी देतो कीं, शिकाऱ्याचा घोडा पुढें कित्येक वार निघून जातो व डुकरामध्यें व त्याच्यामध्यें बरेंच अंतर पडतें. पाठलाग केलेल्या डुकराला गुराढोरांचा, हरणांचा, नीलगाईचा वगैरे कळप मिळाल्यास तो त्यामध्यें घुसून जातो व शिकाऱ्यास दिसेनासा होतो.

डुकराचे सुळे.

जखमी झालेल्या डुकरास जेव्हां आतां पळून आपला निभाव लागणार नाहीं असें दिसून येतें, त्या वेळीं त्याच्यामध्यें किती धैर्य असतें हें दिसून येतें. अशा वेळीं तो तोंड फिरवून शिकाऱ्याशीं लढण्यास तयार होतो व लढत लढत आसऱ्याच्या जागेकडे जाण्याचा प्रयत्न करीत असतो. समोरून भाला येतांच तो त्यावर बेलाशक जाऊन पडतो. कोणी मागाहून येऊन भाला भोसकण्याचा प्रयत्न करील तर तो एकदम त्याच्यावर

उलटतो. असे कित्येक भाले त्याच्या शरिरांत घुसून त्यास जखमा होतात; परंतु त्याला कांहींच पर्वा वाटत नाहीं. शरिरांत भाला घुसला असला तरी तसाच भाला रेटीत जाऊन शिकाऱ्यास अगर त्याचे घोड्यास जखमी करण्याचा प्रयत्न करीत असतो. पोटांतील आंतडीं बाहेर पडून जमिनीवर लोळत असलीं तरी तो शिकाऱ्याबरोबर व त्यांच्या घोड्याबरोबर सारखा लढत असतो. शिकारी अगर त्याचा घोडा त्याच्या आटोक्यांत आला कीं त्याला त्यानें जमिनीवर लोळवलेंच म्हणून समजावें आणि शिकारी एकदां घोड्यावरून खालीं आला व त्याच्या मदतीस त्याचा साथीदार नसला, कीं त्याचीं शंभर वर्षें पुरीं भरलींच म्हणून समजावें. जखमी झालेला डुक्कर तीनचार शिकाऱ्यांच्या भाल्यांबरोबर कशी टक्कर घेतो, "यह देखनेका मजा कुच्छ और है." जखमी झालेला डुक्कर अतिशय थकला म्हणजे जवळपास जी झाडी मिळेल तीमध्यें घुसून जाईल व अगदीं मेल्यासारखा पडून राहील. जवळपास घास असला तर त्यास आग लावतांच तो बाहेर निघेल; परंतु घास जवळ नसल्यास अशा डुकरास मारण्याकरितां घोड्यावरून खालीं उतरावें लागतें. जमिनीवरून असा जखमी डुक्कर मारणें फार धोक्याचें असतें. थोडा विसांवा मिळतांच तो ताजातवाना होतो व एकदम उठून कोणातरी शिकाऱ्यावर हल्ला करून, तो सावध नसल्यास, त्यास जखमी करतो. जखमी झालेला व थकलेला डुक्कर नाल्यांत, विहिरींत किंवा कोणाच्या घरांतहि शिरतो.

शिकारीचें हत्यार

सर्व देशांत डुकराची शिकार भाल्यानें केली जाते. हिंदुस्थानांत सवाशें वर्षांपूर्वीं लहान आंखूड भाल्यानें ही शिकार केली जात असे, असें पूर्वीं म्हटलेंच आहे. हे भाले डुकराचे जवळ जाऊन त्याचेवर जोरानें फेकण्यांत येत असत. हल्लीं या शिकारीसाठीं लांब, आंखूड असे दोन प्रकारचे भाले हिंदुस्थानांत वापरण्यांत येतात. पहिल्या भाल्याची लांबी ७ तें ८ फूट असते व दुसऱ्याची ६॥ फूटांपेक्षां जास्त नसते. डुकरास आपले घोड्याचे उजवे बाजूस थोड्या अंतरावर घेऊन त्याच्या डाव्या बरगडींतून काळजाच्या आरपार लांब भाला मारण्यांत येतो. इंग्रजींत यास under-hand spear असें म्हणतात. आंखूड भाला मारणारा फार निष्णात शिकारी असतो; कारण डुकरास आपल्या घोड्याच्या अगदीं जवळ येऊं देऊन नंतर त्याचे पाठीमधून काळजाचे आरपार जाईल असा उभा भाला त्यास मारावा. यास इंग्रजींत overhand spear असें म्हणतात. भाल्याचीं फळें पुष्कळ प्रकारचीं असतात; परंतु सर्वांत उत्तम अशीं बागनेटच्या आकाराचीं फळें लंडनमधील उइलकिनसन कंपनी तयार करते किंवा हिंदुस्थानांत औरंगाबाद येथें "बोदराज" या नांवाचीं उत्तम फळें तयार केलीं जातात. हीं फळें उत्तम पोलादाचीं केलेलीं असतात. बोदराजचीं फळेंच हिंदुस्थानांत सर्व शिकारी वापरतात. फळाच्या मागें लावण्यासाठीं जो बांबू वापरण्याचा तो मजबूत, लवचिक व पक्का असावा व त्याच्या गांठी जवळ जवळ असाव्या. भाल्याचें फळ नेहमीं तीक्ष्ण ठेविलें पाहिजे. डुकराची शिकार

केल्यावर त्याच्या जाड कातडीनें व चरबीनें तें बोथट होतें व त्यास गंज चढतो. साहणेवर घांसून त्यास तीक्ष्ण धार आणावी लागते.

शिकारीची जागा.

ही शिकार सपाट मैदानांत करण्यास मिळते असें नाहीं. डुकराच्या मागें भरधांव घोडा फेकण्यास सर्वच ठिकाणीं सारखी जागा मिळते असें नाहीं. इतकें मात्र खरें कीं, ज्या जागेंतून डुक्कर जाऊं शकतो त्या जागेवरून घोडाहि जाऊं शकतो. कापसाचें काळें रान, कलिंगडाचें शेत, खाडे, नाले, जमिनीबरोबरील लहान विहिरी, मोटेचे धैलांस मागेंपुढें जाण्याकरितां केलेल्या उतरत्या जागा व त्यांच्या भोवतीं बांधलेल्या मातीच्या भिंती, नदींतील वाळू, उंच वाढलेला घास, लहान लहान झुडपें वगैरे शेकडों अडचणींमधून शिकाऱ्याला आपला घोडा हांकावा लागतो. हें काम किती जोखमीचें आहे त्याची कल्पना ज्यांनीं ही शिकार प्रत्यक्ष केली आहे त्यांसच करतां येईल. वरील कारणांमुळेंच या शिकारींत नेहमीं अपघात होण्याचे जास्त संभव असतात. या शिकारींतील निष्णात शिकाऱ्यास असे कितीतरी अपघात झालेले असतात. अपघात झाल्याशिवाय उत्तम शिकारी होतच नाहीं, असा जणूं काय या शिकारींत कायदाच आहे.

शिकार करण्याची रीत.

ही शिकार करतांना खालील मुख्य गोष्टी लक्षांत ठेवाव्या.

(१) डुकराच्या समोर घोडा भरधांव न्यावा. कधींहि हळूं नेऊं नये.

(२) आपला घोडा डुकरापासून जरा काटकोनानें हांकावा. त्याचप्रमाणें एकदम अंगावर येणाऱ्या डुकरास जरा काटकोनानें आपल्या भाल्यावर घ्यावा.

(३) घोड्यावर जरा पुढें होऊन डुकराच्या पुढील भागांत भाला भोंसकावा.

(४) भाल्याचें फळ तीक्ष्ण धारेचें असावें व भोंसकल्यावर त्यास धरूनच ठेवण्याची जरूर नाहीं. जरूर पडल्यास सोडून द्यावा.

(५) ज्या ठिकाणीं डुक्कर जाऊं शकतो त्या ठिकाणीं घोडाहि जाऊं शकतो.

(६) शिकारींत आपला घोडा सर्वांच्यापुढें पळविण्याची तयारी असावी.

(७) घोडा पळवितांना घोड्याच्या लगामा ढिल्या (loose reins) ठेवाव्या.

एका जुन्या शिकाऱ्यानें असें लिहून ठेविलें आहे कीं, शिकार करणाराचे डोळे तेज पाहिजेत, बैठक चांगली पाहिजे, आत्मविश्वास पाहिजे, डोकें शांत पाहिजे, आपल्या घोड्याची खात्री पाहिजे, भाला सफाईनें मारण्याची तयारी पाहिजे व डुकराच्या कावेबाजपणाची चांगली माहिती पाहिजे. मी आतां मारीन, आतां मारीन अशा भरवंशावर आपली संधि जाते आणि दुसरा शिकारी त्याला जमिनीवर लोळवतो किंवा तो नाहींसा होतो. आपला घोडा संभाळून बरोबर वेळेवर भाला मर्मस्थानीं भोसकण्यांतच खरें कौशल्य आहे. भित्रा घोडा किंवा ज्या घोड्यास डुकरानें एकदां जखम केली असेल तो सहसा डुकराच्या अंगावर एकदम जात नाहीं हें शिकाऱ्यानें लक्षांत ठेवावें. चार पांच शिकारी एकाच डुकराच्या मागें "पहिला भाला" मिळविण्याकरितां

जेव्हां आपले घोडे भरधांव सोडतात तेव्हां डुकराच्या पाठीवर जो शिकारी असेल त्यास दुसऱ्या शिकाऱ्यांनीं धक्का देऊन अगर त्याच्याबरोबरीनें जाऊन त्याची शिकार बिघडवूं नये. जरा त्याच्या मागें राहून, त्यानें पहिला हात केल्यावर तो चुकून डुक्कर जर उजवीकडे किंवा डावीकडे फिरला तर त्या वेळीं आपला घोडा पुढें करून त्या डुकरावर वार करावा. शिकाऱ्यानें आपला भाला घोड्याच्या मानेवर आडवा ठेवावा किंवा त्याचें बूड आपल्या उजव्या पायाच्या बुटावर ठेवून हातांत उंच धरावा. डुकरास भोंसकतांनाच त्यानें आपला भाला खालीं करावा, नाहींतर आपल्या साथीदारांस अगर त्यांच्या घोड्यांस भाला लागण्याचा संभव असतो. एका नवशिक्या शिकाऱ्याचा भाला पुढील शिकाऱ्याच्या घोड्याच्या पुठ्यांत घुसलेला लेखकानें पाहिला आहे. ज्या स्वारास घोड्यावरून खालीं कसें पडावें हें माहीत नसतें तो स्वारच नव्हे. फारशी दुखापत न होतां घोड्यावरून खालीं कसें पडावें, ही एक कला आहे व ती प्रत्येक घोडेस्वारानें शिकली पाहिजे. कै. श्री. युवराज फत्तेसिंगराव गायकवाड हे डुकराच्या शिकारींत किती तरी वेळां पडले होते; परंतु प्रत्येक वेळीं ते आपल्या पायांवर उभे रहात असत व घोड्याच्या लगामा त्यांच्या हातांत रहात असत; इतक्या सफाईनें ते घोड्यावरून खालीं पडत असत. डुकरास आपल्या उजव्या बाजूला घेऊन भाला भोंसकावा. डाव्या बाजूनें अगर घोड्याच्या मानेखालून भाला भोंसकण्याचा प्रयत्न केल्यास आपघात होण्याची भीति असते. डुक्कर जर आपल्या अंगावर जोरानें येत असेल तर आपण आपला घोडाहि तितक्याच जोरानें हांकून आपल्या भाल्यावर त्यास घ्यावा. अशा वेळीं घोडा उभा करून डुक्कर जवळ येण्याची वाट पाहूं नये. जर कदाचित् डुकराचा हल्ला येऊन टक्कर होऊन शिकारी घोड्यावरून खालीं पडला व त्याचा घोडा निघून गेला व भालाहि दूर जाऊन पडला किंवा मोडला तर अशा वेळीं शिकाऱ्यानें जमिनीवर मेल्यासारखें पडून रहावें म्हणजे डुक्कर निघून जाईल. अशा वेळीं कमरेच्या पट्ट्याला मोठ्या पातीचा शिकारी-चाकू जरूर ठेवावा. प्रसंग पडलाच तर त्याचा उपयोग डुकरावर करतां येतो.

कादीर कप (Kadir cup)

मीरतच्या आसपास डुकराची जी शिकार केली जाते तींत जो डुकरास पहिला भाला मारील त्यास हा दिला जातो. "कादीर" या शब्दाचा अर्थ नदींतील वाळूचें पात्र असा आहे. गंगा व यमुना या नद्यांच्या काठांवर डुकराची वस्ती असते व तेथें हक्का केला म्हणजे तीं डुकरें नदीच्या वाळूमध्यें येतात व त्या ठिकाणींच शिकारी त्यांस मारतात. हिंदुस्थानांत या कादीर कपचें महत्त्व फार आहे. सन १८६७ पासून दरवर्षी ही शिकार केली जाते. कादीर कप जिंकणें हा फार मोठा मान समजला जातो. सन १८६७ पासून सन १९३० पर्यंतच्या मुदतींत हा कप ज्यांनीं ज्यांनीं जिंकला त्यांचा नांवें पाहतां त्यांमध्यें धोलपूरचे महाराणासाहेब, जनरल गुरुदत्तसिंग व कर्नल सेवासिंग यांचीं नांवें दिसून येतात.

शिकारी पोषाक.

आंखूड बाह्यांचा खाकी शर्ट, खाकी कॉर्डची ब्रीचीस, फील्ड बूट्स्, आंखूड ममरेज व टोपी, जिची चामड्याची मजबूत पट्टी टोपीच्या वरून जाऊन हनुवटीखालीं घालतां येते अशी असावी. ही चामड्याची पट्टी हनुवटीखालीं मजबूत बसवावी. घोडा भरधांव सोडल्यावर कित्येक वेळां ही पट्टी वाऱ्यानें तुटते अगर सैल असल्यास टोपी डोळ्यावर येते आणि पुढचें कांहीं दिसत नाहीं. दोन्ही हात गुंतलेले असतात. टोपीच्या आंत नवारीची पट्टी असावी. कित्येक शिकारी टोपीच्या आंत लहानसा टुवाल ठेवतात. घोड्यावरून खालीं पडल्यास ह्या टोपीनें कित्येकांचे जीव वांचविले आहेत. फील्ड बूट्स् घातल्यानें घोड्यावरून पडल्यावर पायीं सहज चालतां येतें. गच्च बूट असल्यास फार श्रम पडतात. प्रत्येक शिकाऱ्यानें आपल्याबरोबर एक मोठ्या पातीचा शिकारी-चाकू ठेवावा व तो पट्ट्याला पुढें अडकवावा; बाजूला अडकवूं नये. कारण घोड्यावरून खालीं पडल्यास चाकू आपल्यालाच लागण्याचा संभव असतो. घोड्यावरून खालीं पडल्यावर, असा शिकारी चाकू जवळ असल्यास डुक्कर जर अंगावर चालून आला तर, थोडा तरी आपला बचाव या चाकूनें करतां येतो. याशिवाय जिचा आवाज मैल दोन मैल लांब जाईल अशी पोलिसची एक शिटी बरोबर ठेवावी.

घोड्याचें सामान.

घोड्याचें जीन चांगलें मजबूत असावें. स्वस्त मिळणारें जीन या शिकारींत केव्हांहि वापरूं नये. शिकार करतांना जीन तुटलें तर जीव जाण्याची पाळी येते हें विसरतां कामां नये. जिनाचे तंग बरोबर खेंचून लावले आहेत कीं नाहीं हें प्रथम पहावें. तसेंच रिकाबसोट ज्या ठिकाणीं जिनामध्यें अडकविण्यांत येतात. त्या ठिकाणचे स्प्रिंग (Spring) खुले ठेवण्यांत आले आहेत कीं नाहीं हेंहि पहावें. कित्येक घोड्याला स्वतंत्र जीन व लगाम असावी, कीं ज्यायोगें बदलण्यामध्यें विनाकारण वेळ जाणार नाहीं. घोड्याच्या पायाला चामड्याचें व नमद्याचें गेटर बांधावें कीं ज्यायोगें डुकरानें हल्ला केला असतां त्याच्या पायास कमी दुखापत होईल.

डबक्याची डुकरांची शिकार.

श्रीमंत गायकवाडसरकारांच्या राज्यांत बडोद्यापासून १८ मैलांवर मही नदीच्या कांठीं डबका गांव आहे. तेथें डुकरांच्या शिकारीकरितां खास जंगल राखून ठेवण्यांत आलें आहे. साठ पाऊणशें वर्षांपासून हें शिकारीचें जंगल आहे व त्याचा बंदोबस्त आणि देखरेख शिकारखान्याकडून करण्यांत येते. संक्रांतीनंतर दरवर्षीं डबक्यास डुकराच्या शिकारीचा मोठा जलसा होतो. या शिकारीसाठीं श्रीमंत सर्व खाशांच्या स्वाऱ्या, युरोपियन मेहमान, लष्करी अंमलदार, सरदार, मानकरी व आतस्वकीय मंडळी डबक्यास जातात. तेथें एक आठवडा मुक्काम रहातो. पहिल्या दिवशीं मोठा हक्का व नंतर लहान हक्का याप्रमाणें दोन हक्के करण्यांत येतात. या हक्क्यांसाठीं रिसाल्याचे स्वार व खेडेगांवांतील लोक गोळा करण्यांत येतात. हक्क्याची देखरेख शिकारसुपरिंटेंडंट यांच्याकडे असते. शिकार करण्याकरितां आलेल्या

शिकारींच्या संख्येप्रमाणें चार चार जणांच्या पार्थ्या करण्यांत येतात व त्यांस शिकारीच्या जंगलांत मुक्रर केलेल्या जागीं ठेवण्यांत येतें. शिकार पहाण्यास येणारी मंडळी व श्रीमंत खाशे मंडळी हत्तीवरून शिकार पहातात. हक्का सुरू होऊन डुक्कर जंगलांतून बाहेर पडूं लागले, कीं ज्या पार्टीसमोर डुक्कर दिसेल त्या पार्टीनें त्याचा पाठलाग करून त्यास ठार मारावें. "पहिला भाला" यास येथें महत्त्व नाहीं; तर प्रत्येक पार्टीनें किती डुक्कर मारले यास महत्त्व देण्यांत येतें. प्रत्येक हक्क्यांत १५-२० डुक्कर मारले जातात. या शिकारीमध्यें श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज व कै. श्री. युवराज फत्तेसिंहराव आणि इतर राजपुत्र भाग घेत असत. श्रीमंत खाशांनीं मोठमोठे डुक्कर या शिकारींत मारले आहेत. अलीकडे तीनचार वर्षांपासून श्रीमंत राजपौत्र प्रतापसिंहराव यांना या शिकारीचा फार शौक लागला आहे.



चित्र संख्या ७५८

श्रीमंत युवराज प्रतापसिंहराव गायकवाड यांनीं डबक्यास घोड्यावरून डुकरांची शिकार केल्यानंतर घेतलेला फोटो.

हरणाची शिकार.

हल्लीं मृगया कशी करतात तें येथें सांगतों. मात्र वाचकांनीं एक गोष्ट लक्षांत ठेवावी ती ही कीं, मृगयेचें केवळ वर्णन वाचण्यापेक्षां ती प्रत्यक्ष पाहणें यात अर्थात् अधिक मौज आहे व त्याहिपेक्षां ती स्वतः करणें यांत तर फारच मौज आहे. पूर्वी रथांतून धनुष्यबाणानें मृगया करीत. हल्लीं आम्ही मोटारींतून रायफलींनें मृगया करतों. मृगयेंत मुख्य कौशल्य अचूक नेमाचें असतें. माझ्या मतें सर्व शिकारींपेक्षां हरणाचा वेध करणें ही गोष्ट अत्यंत कौशल्याची आहे.

लेखक :—



श्री. तात्यासाहेब पटवर्धन,
युवराज, संस्थानला मिरज
(सिनीयर.)

मोटारींतून हरणाची शिकार करतांना मुख्य ड्रायव्हर चांगला व सावध पाहिजे. नाहींतर हरणाऐवजीं स्वतःचीच शिकार व्हावयाची. शिकाऱ्यानें केव्हांहि हरणाच्या मागें मोटार लावूं नये. सर्व दिवस अशी मोटार हरणाच्या मागें लावली तरी हरीण मिळणें अशक्य. बहूतेक माळांवर हरणांचे कळप असतात. अशा एखाद्या कळपास पाहून त्याचे उजवे अगर डावे अंगानें मोटार न्यावी. मोटार पाहिल्याबरोबर कळप धावूं सांगतो. बहूतेक पुढें माद्या व मागें काळवीट असावयाचे, ही गोष्ट ठरलेलीच आहे. शिवाय एक गोष्ट लक्षांत ठेवावी ती ही कीं, सभोंवतालच्या सर्व प्रदेशांत जी जागा त्यांतल्या त्यांत उंच असेल अशाच ठिकाणीं केव्हांहि हरणें थांबतात. कारण त्यांना चारी बाजू तेथून दिसतात व अशा ठिकाणीं गोळी मारणें अशक्य असतें. कारण पुढें गोळी कोठें लागेल त्या जागेची अगोदर पाहणी केल्याशिवाय हल्लींच्या रायफलींतून गोळी मारणें अत्यंत धोक्याचें आहे. धर्मयुद्धाचे जसे ठरलेले नियम आहेत, तसेच शिकारीचेहि नियम आहेत. खरा शिकारी केव्हांहि काळवीट मारील. मादी मारणार नाहीं. त्याला एक कारणहि आहे. हरणांची वीण वर्षांतून दोन वेळ होते, एक उन्हाळ्यांत व दुसरी दिपवाळीचे सुमारास. यामुळें केव्हांहि मादी मारली तरी तिच्या पोटांत पोरें निघाल्याशिवाय रहात नाहीं. मागें लिहिलेंच आहे कीं, त्यांतल्या त्यांत उंचवस्याचे जागेवर कळप केव्हांहि थांबतो. सबब आपणहि चढाचढावरूनच मोटार न्यावी. अशानें तो कळप बुचकळ्यांत पडतो व ज्या ठिकाणीं आपण थांबणार त्या ठिकाणींच सारखी मोटार असते असें दिसतांच मध्येंच कोठेंतरी थांबून इकडे तिकडे पाहूं लागतो. अशा वेळीं गोळी मारणेची संधि मिळते. योग्य संधि केव्हांहि गमावूं नये व योग्य संधीशिवाय केव्हांहि गोळी मारूं नये.

गोळी मारतांना कळपांतील काळवीट पाहून त्याच्या पुढें जमीन उंच आहे अगर कसें व थोड्या फरकानें आपली गोळी चुकल्यास अगर काळविटामधून पार पलीकडे गेल्यास पुढें कोठें तटेल हें पाहून नंतरच बार मारावा. बार मारतांना काळवीट आपणापासून किती दूर आहे, हवा डावीकडून अगर उजवीकडून वहात आहे, दिवस पावसाळी अगर कोरडे आहेत ह्या सर्व गोष्टी लक्षांत घ्याव्या लागतात. कारण हवा उजवीकडून अगर डावीकडून वाहत असल्यास गोळी त्या मानानें उजवीकडे अगर डावीकडे झुकते. शिवाय हवा पावसाळी व दाट असल्यास गोळीला ती हवा कापून जाण्यास जास्ती वेळ लागतो. शिवाय गोळीवर पृथ्वीचें आकर्षणहि आहेच व त्या मानानें गोळी किती चढून धरणेची तेंहि पहावें लागतें. या सर्व गोष्टी फार थोड्याशा अवधींत ठरवाव्या लागतात. नाहींतर, हें सर्व गणित बरोबर सुटेपर्यंत तिकडे कळप निघूनहि जावयाचा व गणिताचें उत्तर जरी बरोबर आलें, तरी शेवटीं प्रत्यक्ष हातीं शून्यच पडावयाचें! या सर्व गोष्टी अभ्यासानेंच येतात व आपोआप साध्य होऊं लागतात. नुसतीं पुस्तकें वाचून अगर शिकारी माणसाचें तोंडीं व्याख्यान ऐकून हें हातून होणें अशक्य. हरणाइतकी धूर्त व सावध दुसरी जात नाहीं. शिकारी पाहिल्याबरोबर अचूक त्याला कसें चुकवावें हें त्याचें उपजत ज्ञान पाहून कौतुक वाटतें.

असो. मागें सांगितलेंच आहे कीं, मृगया प्रत्यक्ष करण्यांत सर्वांपेक्षां अधिक मौज; वाचून त्या आनंदापैकीं कांहीं कणच फक्त मिळूं शकतील. कोणतीहि विद्या अगर कला स्वानुभवाशिवाय व्यर्थ आहे. ज्याला शक्य असेल त्यानें अनुभव घ्यावा. ज्ञानाची परंपरा चालत असते, त्यांतूनच तें प्रत्यक्ष मिळूं शकते. पुस्तकांतून तें कसें मिळूं शकेल? तथापि पुस्तकांचा अगर लेखांचा एक उपयोगहि आहे. तो हा कीं, त्या त्या ज्ञानाची लालसा त्या योगानें वाचकांत उत्पन्न होते.

वाघाची शिकार.


वाघाची शिकार करण्यासाठीं 'कॉंझर्वेटर ऑफ फॉरेस्ट'ला लिहून जंगलांतील एखादा ब्लॉक (भाग) रिझर्व करावा लागतो. याप्रमाणें शिकार करण्याचें लायसेन्स मिळालें म्हणजे मग शिकार करतां येते. नंतर शिकार करण्याचे आधीं जंगलांत २–३ ठिकाणीं जंगलांतील माहीतगार माणसांस विचारून रेडे बांधावे लागतात. रेडे बांधल्याशिवाय वनराजाचें दर्शन होत नाहीं. जंगलांत माणसांच्या पाऊलवाटा पडलेल्या असतात. ज्या ठिकाणीं अशा दोन तीन वाटा मिळतात तेथें रेडे बांधतात. रात्रीं भक्ष्याचे शोधासाठीं वाघ नेहमीं माणसांचे पाऊलवाटेनेंच फिरतात. अशा वेळीं रात्रीं रेडा नजरेस पडला कीं वाघ त्याचेवर झडप घालतो व निदान अर्धाअधिक रेडा खाऊन टाकतो. रेड्याचें मांस उष्ण असल्यानें वाघास पाण्याची फार आवश्यकता भासते व पोट भरल्यामुळें सुस्तीहि येते. म्हणून जवळपास पाण्याची जागा पाहून तो तेथें मुक्काम करतो. रात्रीं रेडा बांधलेला असतो तो वाघानें मारला किंवा नाहीं तें रोज सकाळीं पाहून यावें लागतें. रेडा मारला कीं, वाघ त्या जंगलांत आहे असें ऐंशी टक्के समजावें. मग शिकारीसाठीं झाडावर माळा बांधवून हाका करविण्याची तजवीज सुरू करावी. एखादे वेळेस पंधरा पंधरा दिवस वाघ रेडा मारीत नाहीं. माळा जमिनीपासून १०–१२ फूट उंचीवर बांधतात. एका जंगलांतून दुसऱ्या जंगलांत वाघ कोणत्या वाटेनें जातो त्याची माहिती जंगलांतील कोकणे शिकारी लोकांना फार चांगली असते. ह्या बाबतींत त्यांचा अंदाज अगदीं चुकत नाहीं. म्हणून त्यांनीं सांगितलेल्या जागीं वाघाची वाट पाहात शिकाऱ्यानें बसावें, हें उत्तम. आतां नवीन तऱ्हेच्या बंदुकी व त्यांची दारु फार जोरदार असते. त्यामुळें नीट निशाण लागलें तर वाघ एका गोळीनेंच मरतो.

माळ्यावर शिकारी बसला म्हणजे ५०–६० माणसांकडून जंगलाचे एका बाजूनें हाका सुरू करतात. जंगलांत अनेक वाटा असल्यानें वाघानें अमूक एका वाटेनेंच यावें म्हणून दुसऱ्या वाटांवर झाडांवरून **ठोके** बसवितात.

वाघ हाका सुरू केला कीं, एका जंगलामधून दुसऱ्या जंगलांत जातो. त्याच्या दोन तीन वाटा असतात आणि शिकारी जर एकच वाट धरून बसेल तर बाकीच्या वाटांची वाट काय? सबब त्या वाटांवरील झाडांवर एकेका इसमानें चढून बसून हातांतील कुऱ्हाडीनें अगर कोयत्यानें झाडावर खट्खट् आवाज करीत बसावें लागतें. याला **ठोके बसाविणें** असें म्हणतात. शिकारी जरुरीप्रमाणें असे पांच-सहा लोक बसवितो. म्हणजे अर्थात् मारणारा बसलेला असेल त्या बाजूची जागा मोकळी राहते. वाघासारखा सावध व तीक्ष्ण कानाचा दुसरा प्राणी नाहीं. हाका सुरू झाला कीं, हाका मागें मैलभर आहे तोंच स्वारी मुकाट्यानें जंगल सोडून पुढें चालू लागते व पुढें ठोक्यांचा आवाज ऐकूं आला कीं रस्ता बदलून दुसऱ्या रस्त्यानें चालूं लागते.

याप्रमाणें ज्या ठिकाणीं विनआवाजाचा मोकळा रस्ता राहतो त्या ठिकाणाहून सावकाश मार्ग आक्रमीत वाघ अचूक शिकाऱ्यापुढें येतो.

वाघांची शिकार मुख्यतः दोन तऱ्हांनीं करतात. मारलेला रेडा ज्या ठिकाणीं वाघानें नेऊन टाकला असेल त्या ठिकाणीं थोडक्या अंतरावर, उंच झाडावर माळा घालून रात्रीं बसतात व ज्यावेळीं तो वाघ, मारलेला रेडा खाण्यासाठीं येतो, त्यावेळीं त्यावर विजेच्या दिव्यानें उजेड पाडून त्यास बंदुकीनें मारतात. अशा शिकारींत वाघ बेसावध असला तरी वाघा-वर रात्रीं अचुक नेम मारण्यास कठीण जातें, फार वेळ तिष्ठत बसावें लागतें व इतकें करूनहि त्या वेळीं तेथें कोणतें जनावर येईल याचा नेम नसतो. एखाद्या वेळीं हत्तींचा कळपहि येण्याचा संभव ! तशांतून मारलेली गोळी बरोबर वर्मी लागली तर ठीक, पण चुकून अर्ध-वट लागली तर मात्र माळ्यावरील शिकाऱ्यांस सकाळपर्यंत आपली जागा सोडतां येत नाहीं. मात्र अशा शिकारीस फारसा खर्च येत नाहीं.




चित्र संख्या ७५९

श्री. तात्यासाहेब पटवर्धन, युवराज, मिरज (थोरली पाती), यांनीं वाघाची शिकार केल्यानंतर घेतलेला फोटो. फोटोंत त्यांचे उजवे बाजूस श्रीमंत राजे **सर गंगाधरराव गणेश पटवर्धन** उभे आहेत.

सिंहाची शिकार.

[लेखक :—श्री. द. चिं. मुजुमदार, बडोदें.]

वाघाच्या शिकारीप्रमाणेंच सिंहाची शिकार करतात. पण सिंहाची शिकार करणें थोडें सोपें असतें असें म्हणतात. सिंह हाक्यानंतर शिकाऱ्याच्या पुढून सावकाश बेडरपणानें जातो. त्यामुळें त्याचेवर निशाण मारणें किंचित् सोपें जातें. काठेवाडांतील गीरचे जंगलांत सिंह पुष्कळ आहेत. सिंहांचे कळप असतात. (चित्र संख्या ७६०)



श्री. राजपौत्र उदयसिंहराजे गायकवाड यांनीं गीरचे जंगलांत सिंहाची शिकार केल्यानंतर घेतलेला फोटो.

हत्तीची शिकार.

म्हैसूरचे राज्यांतील जंगलांत रानटी हत्तींचे पुष्कळ कळप आहेत. अगाऊ सरकारी परवानगी घेऊन हत्तींची शिकार करण्यांत येते. हत्तीसारखा प्रचंड प्राणी मारणें हल्लींच्या सुधारलेल्या जोरदार बंदुकीनें सोपें झालें आहे. तरी पण ही शिकार करण्यास देखील शिकारी हिंमतवान व अचूक नेम मारणारा लागतो. मर्मस्थळीं गोळी लागली तर बरें, नाहीं तर अशा रीतीनें जखमी होऊन निसटलेला हत्ती मनुष्यास फार नुकसान करतो. वयस्क व मोठ्या गजराजाचीच शिकार करण्याचा प्रघात आहे. हत्तीणीस कोणी मारीत नाहींत.

हत्तीचें घ्राणेंद्रिय फार तीक्ष्ण असतें. त्यास लांबूनच माणसाचा वास येतो. म्हणून हत्तीच्या शिकारीचे वेळीं वाऱ्याची दिशा पहावी लागते. वारा शिकाऱ्यांचे बाजूकडून हत्तीकडे वाहत असलेला उपयोगी नाहीं. हत्तीकडून शिकाऱ्याकडे वारा वाहत असेल त्या वेळीं हत्तीस मनुष्याचा वास येत नाहीं. त्यामुळें तो शिकाऱ्याच्या जवळ येतो व शिकार करणें सोपें जातें. झाडावर चढून शिकार करण्यास मिळाली तर सुरक्षितपणा असतो. वाघ, सिंह, मस्त हत्ती अशा क्रूर जनावरांची शिकार करण्यानें मनुष्याचे अंगीं मर्दपणा बाणतो. शिकार ही युद्धाचे शिक्षणाची पहिली पण फार उत्तम अशी पायरी आहे.



(चित्र संख्या ७६१)

श्री. सौ. मातोश्री चिमणाबाईसाहेब गायकवाड यांनीं म्हैसूरचे जंगलांत हत्तीची शिकार केली त्यानंतर घेतलेला फोटो.

खंड दुसरा समाप्त

श्री.

देशी मर्दानी खेळांचीं मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेलीं पुस्तकें.

(१) **मल्लविद्याशास्त्र** (खंड १ ला):—लेखक श्री. राजे सर गंगाधरराव गणेश पटवर्धन, के. सी. आय. ई. मिरज संस्थानाधिपति, मिरज. प्रकाशक रा. धोंडो नारायण विद्वांस, व्यवस्थापक, व्यायामकार्यालय, रावपुरा, बडोदें. ... ... किं. रु. ६-०-०
(सन १९२६) ...

(२) **मल्लविद्याशास्त्र** (खंड २ रा):—लेखक, श्री. राजे सर गंगाधरराव गणेश पटवर्धन, के. सी. आय. ई. मिरज संस्थानाधिपति, मिरज. प्रकाशक रा. धोंडो नारायण विद्वांस, व्यवस्थापक, व्यायामकार्यालय, रावपुरा, बडोदें. ... ... ,, ६-०-०
(सन १९३२) ...

(३) **मल्लयुद्ध अथवा कुस्ती**:—ले. रा. लक्ष्मण नारायण सप्रे, श्री. प. प. नारायण गुरु यांच्या बालप्रभु व्यायामशाळेचे अध्यापक, जुजुत्सु, मल्लखांब, फरीगदका इत्यादि पुस्तकांचे कर्ते. प्रकाशक व मालक चित्रशाळा स्टीम ... ... ,, २-०-०
प्रेस, पुणें. (सन १९२५) ...

(४) **कुस्ती**:—ले. रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर, एम्. ए., एल्एल्. बी., ... ,, १-८-०
वकील, पुणें. (सन १९३०) ,, १-०-०

(५) **मल्लविद्याप्रकाशक**:—ले. रा. सिताराम बल्लाळ महाजन, पुणें

(६) **मल्लविद्या** अथवा **तालीम व कुस्तीचे डावपेच**:—ले. रा. बाजीराव ,, ०-८-०
(सन १८८९)...
बिन बाबाजी पवार खंडाळेकर, अहमदनगर. (सन १९११) ,, १-४-०

(७) **शरीरबलविद्या**:—ले. प्रो. जी. एम कार्लेकर, मुंबई

(८) **फरीगदका**:—ले. रा. लक्ष्मण नारायण सप्रे, प्र. चित्रशाळा प्रेस, पुणें. ... ... ,, १-०-०
(सन १९२०) ...

(९) **दांडपटा**:—ले. रा. लक्ष्मण बळवंत भोपटकर, एम्.ए., एल्एल्.बी., वकील, ... ,, १-८-०
पुणें. (सन १९२७)

(१०) **फरीगदका** (लकडी):—ले. श्री. दत्तात्रय चिंतामण मुजूमदार, बी. ए., एल्एल्. बी., बडोदें. प्रकाशक धोंडो नारायण विद्वांस, व्यवस्थापक, ... ,, २-०-०
व्यायामकार्यालय, बडोदें. (सन १९३२)

(११) **रमोजी फने कुस्ती** (उर्दु, इंग्लिश, मराठी, गुजराती):—ले. हकीम महमद करीम अनसारी व हकीम मजहर करीम अनसारी, मेडीकल ऑफीसर, कोल्हापूर (सन १९०८) मुंबई गुस्ताफाई प्रेस, (सध्यां मिळत नाहीं).

(१२) **बिनोट**:—ले. श्री. राजे सर गंगाधरराव गणेश पटवर्धन, के.सी.आय.ई., मिरज संस्थानाधिपति. प्रकाशक व्यायामकार्यालय, वडोदें. (सन १९२९). किं. रु. १–४–०

(१३) **कुस्ती–भीमसेनी** (भाग १ ला):—ले. श्री. राजे सर गंगाधरराव गणेश पटवर्धन, के. सी. आय. ई., मिरज संस्थानाधिपति. प्रकाशक रा. धोंडो नारायण विद्वांस, व्यायामकार्यालय, रावपुरा, वडोदें. (सन १९३०) ,, १–४–०

(१४) **कुस्ती–हनुमन्ती**:—ले. रा. हरि माधव सहस्त्रबुद्धे, व्यवस्थापक, श्री. नारायण गुरु देवधर यांची तालीम, वडोदें. प्रकाशक रा. धों. ना. विद्वांस, व्यायामकार्यालय, रावपुरा, वडोदें. (सन १९२१) ... ,, १–४–०

(१५) **भीमसेनी–कुस्ती** (भाग २ रा):—ले. श्री. राजे सर गं. ग. पटवर्धन मिरज संस्थानाधिपति. रा. स. धो. ना. विद्वांस, व्य. व्यायामकार्यालय, रावपुरा, वडोदें. (सन १९२२) ... ... ,, १–४–०

(१६) **डुकराची शिकार**:—ले. मे. रा. नानासाहेब शिंदे सेनापति, वडोदें, लेखसंग्रह भाग २ रा. (सन १९३७)... ... ... ,, २–०–०

(१७) **गजपरीक्षा व साठमारी**:—ले. रा. नीलकंठ गोपाळ डोंगरे, चित्रकला-शिक्षक, धरमपूर हायस्कूल, धरमपूर; क्रिकेट, अश्वारोहण, सचित्र योगासनें, वगैरे पुस्तकांचे कर्ते.

(१८) **हनुमन्ती कुस्ती** (भाग २ रा):—ले. रा. हरि माधव सहस्त्रबुद्धे, व्य. प. प. श्री. नारायण गुरु यांची तालीम, प्र. रा. धों. ना. विद्वांस, व्य. व्यायामकार्यालय, रावपुरा, वडोदें. (सन १९२३) ... ,, १–४–०

(१९) **भीमसेनी–कुस्ती** (तोडी भाग १ ला):—ले. श्री. राजे सर गं. ग. पटवर्धन, मिरज संस्थानाधिपति. प्र. रा. धों. ना. विद्वांस, व्य. व्यायाम-कार्यालय, वडोदें. (सन १९२३) ... ... ,, १–४–०

(२०) **भीमसेनी–कुस्ती** (बंदी भाग १ ला):—ले. श्री. राजे सर गं. ग. पटवर्धन, मिरज संस्थानाधिपति. प्र. रा. धों. ना. विद्वांस, व्य. व्यायाम-कार्यालय, रावपुरा, वडोदें. (सन १९२६) ... ... ,, १–४–०

विषयसूचि.